TIGHT BINDING BOOK

UNIVERSAL LIBRARY
OU_192666
UNIVERSAL LIBRARY

OUP—552—7-7-66—10,000

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M83/A75V Accession No. M241

Author आठवले न. ग.

Title व्यासांचे आश्रम

This book should be returned on or before the date last marked below.

व्यासविद्याश्रम

अर्थात्

# विद्यार्थ्यांचें साम्राज्य

लेखक

कै. नरहर लक्ष्मण आठवले

कि. २ रुपये ]

[ सन १९३८

मुद्रक व प्रकाशक
सदाशिव रामचंद्र सरदेसाई, बी. ए., एल्‌एल्. बी.,
नवीन समर्थ विद्यालयाचा ‘समर्थ भारत’ छापखाना,
४१ बुधवार, पुणें २

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन राखून ठेवले आहेत. ]

सोल एजंटः–
गोविंद वामन कुलकर्णी,
व्यवस्थापक, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला,
३७३ शनिवार पेठ, पुणें २

ज्यांच्या सहवासांत कितीतरी दिवस

मोठ्या आनंदांत घालविले

त्या

**माझ्या बालमित्रांस**

त्यांच्या

प्रेमळ सहवासाचें लहानसें स्मृतिचिन्ह म्हणून

**सप्रेम समर्पण**

# कादंबरीकाराची भूमिका

गुरुवारचा दिवस. वेळ सकाळची. सूर्याचे कोवळे किरण झाडांच्या शेंड्यावर सोनेरी छटा पसरीत होते, आणि वाऱ्याच्या शीतल लहरी त्या छटाना हेलावीत होत्या. एक नाही, दोन नाही सुमारे पन्नास मुली एकत्र गोळा झाल्या होत्या. पण जिकडे पाहावे तिकडे सामसूम. कोणी बोललेच तर अगदी हलक्या आवाजांत आणि चिंतेच्या सुरांत. पण त्या न बोलण्यातच पुष्कळ बोलले जात होते-पूर्वीचे तसेच पुढचे. खोलीत डोकावावे, एकमेकींकडे पाहावें आणि शेजारच्या खोलीसमोरील ओट्यावर मान खाली घालून बसावे-असा क्रम क्षणाक्षणाला त्या मुलींनी चालविला होता. हिंदुस्थानातील बहुतेक सर्व प्रांतातून आलेल्या त्या मुली त्या ओट्यावर निःस्तब्ध होऊन बसलेल्या होत्या-जणूं उत्कंठा, चिंता, विषण्णता याच तेथे घर करून राहिल्या होत्या. समोरच्या लांकडाच्या ओट्यावर बसून मी ही परिस्थिति पाहत होतो.

बाहेर जशा उत्कंठा, चिंता व विषण्णता या दुर्दैवी देवता बसलेल्या मी पाहिल्या, तशाच सेवा, भक्ति व अनासक्ति या पुण्यशाली देवताचे दर्शन खोलीच्या आत मी घेतलेले होते सतत अकरा दिवस-म्हणजे रात्रदिवस-दोनदोन विद्यार्थिनी शुश्रूषा करीत होत्या, क्षणाक्षणाला सेवेचे कर्तव्य बजावीत होत्या, कधी अंगावर पांघरूण घाल, कधी माशा वारण्यासाठी पंखा हालव, तर कधी फुले, उदबत्त्या लावून आणि तसेच मलमूत्रविधींची सिद्धता करून, पोटच्या कन्येइतक्या आपुलकीने, जिव्हाळ्याने, ममतेने अष्टौप्रहर सेवाशुश्रूषा त्या करीत होत्या. गुरुभक्तीचा नाम-सप्ताहच अखंड चाललेला होता.

अध्यापकवर्ग व चालकवर्ग हेहि घरच्या माणसासारखे साहाय्य करीत होते. डॉक्टरांनी तर रात्र पाहिली नाही की दिवस पाहिला नाही, जीविताची आशा शिल्लक असो वा नसो, उपचार करण्यात कसूर म्हणून नाही-' माझ्या वडिलांचे ठिकाणी मी त्याना मानतो ' हे उद्गार डॉक्टर महोदयानी आपल्या कष्टानी प्रत्ययास आणून दिले.

पण या सर्व जाणत्या जागरूकतेचा आणि आलोचन जागरणाचा सुपरिणाम दृष्टीस पडेल काय ? असा विचार करीत मी त्या लांकडाच्या ओडक्यावर बसून दूरवर पाहत राहिलो. आठाच्या सुमारास मोटार आली, कांहीं माणसांची धांवपळ झाली, सारे खोलीत गेले, मीहि आंत शिरलो.

" केम छे ? नाना ! केम छे ? " महात्मा गांधींच्या हास्यमुद्रेतून वात्सल्य-युक्त उद्गार बाहेर पडले. नानांनी मान वळविली, डोळे उघडले आणि महात्माजींकडे पाहिले. पुन: महात्माजींनीं प्रेमळ सुरांत प्रश्न केला, " केम छे, नाना? " " ठीक " अशा अर्थी नानांनी मान हालविली. महात्माजींनी नानाचा एक हात आपल्या हातांत घेतला आणि त्यावरून आपला दुसरा हात फिरविण्यास सुरुवात केली—आपल्या सात्त्विक अंत:करणांतील मातृप्रेमच त्या हातातून ते नानाच्या शरीरात जणूं ओतीत होते अशी तन्मयता त्या वेळीं त्यांच्या ठायीं दिसून येत होती.

प्रेमाच्या एकतानतेची ती समाधि उतरवून ते खाटेवर जवळच बसलेल्या आजीशी ( नानांच्या मातोश्रीशी ) बोलूं लागले. आजींना गुजराथी येतच होतें. त्याचें सांत्वन दुसऱ्याने करण्याची गरजच नव्हती ! आपला एकुलता एक मुलगा मृत्युशय्येवर दिसत असताना चित्त शांत व स्वर स्थिर ठेवून त्या बोलत होत्या. महात्माजींनाहि त्यांच्या या मनोधैर्याचे आश्चर्य वाटलें. मला वाटले, गांधीजी आणि आजी—दोघांच्याहि जीर्ण शरीरात महात्माच वास करीत आहे—एकाचे ज्ञानवैराग्य असेल तर दुसरीचे निर्वेदवैराग्य इतकेच ! " नानांची शादी झाली नाहीं ना ? " महात्माजींनीं विचारले. तेव्हा आजींनी एरवी बोलावे त्या निर्विकारतेने सांगितलेः

" पंजाब-प्रकरणांतील अत्याचार यानें जेव्हा ऐकले, त्याच दिवशी त्याने प्रतिज्ञा केली कीं, जन्मभर ब्रह्मचर्याने राहावयाचे आणि राष्ट्राची सेवा करावयाची. तळेगांवला राष्ट्रीय शिक्षणाचे काम केले. त्यानंतर आपल्या आश्रमाची सेवा येथे केली. पण त्याचे शरीर पहिल्यापासूनच अशक्त. तें टाकून देऊन सुदृढ शरीराने आपली सेवा करण्यासाठीं तो दुसरा जन्म घेत आहे. तो पुढच्या जन्मीं येथेच येणार पहा. त्याला देथल्या कार्याशिवाय दुसरें कांही सुचतच नसे."

आणि खरंच–ते अशक्त शरीर तसेंच टाकून नानांचा जीव निघून गेला! कै आगरकर लोकमान्य टिळक पटवर्धन व म. गांधी यांचे फोटो पाहून त्यानी हात जोडले, 'Comparative Study' असे कांहींसे बोलले आणि थोडयाच वेळानें त्यानी त्याग केला—आपल्या राष्ट्रकार्यार्थ झिजलेल्या देहाचा, राष्ट्रकार्यामुळे जवळ आलेल्या विद्यार्थिनींचा आणि एकेचाळीस वर्षे आपल्याला वाढविलेल्या वृद्ध आईचा.

आजी आतल्या खोलींत खुर्चीवर बसून राहिल्या. पाय वर घेऊन व हात जोडून त्या तेथे स्थिरपणे बसून राहिल्या. डोळे मिटून ओंठातल्या ओठात देवाचे नाव घेत खुर्चीवर बसलेली आजींची ती मूर्ति—'स्थितप्रज्ञतेचे लक्षण तरी दुसरें कोणतें?' माझ्या मनात विचार आला. "तुळशीची माळ आणि भस्माची गोळी त्या कोनाडयात आहे, ती बरोबर द्या हं" त्या म्हणाल्या. मी चटईवरून उठलो. माळ व भस्म शवावर ठेवले.

खाटेवरून घोंगडीवर आणि घोंगडीवरून तिरडीवर!—मुलींच्या मनांतली कालवाकालव मुद्रेवर नाचत होती. निसर्गाचे साहचर्य कादंबरीत रंगवितात ना? तें सत्यपणे तेथें अवतरलें. बाराच्या सुमारास एक एक ढग आकाशांत जमतां जमता सारे आभाळ काळेकुट्ट झाले. सोसाट्याचा वारा सुरू झाला व त्या रानांत सैरावैरा धावूं लागला. थोडया वेळांत पावसाच्या जोराच्या सरी आल्या. पण अर्ध्यापाऊण तासाच्या आंत सारें वातावरण एकदम निवळलें. परंतु हृदयांतील काहूर?–

आधी नानांच्या रुग्णावस्थेतलि मनाला त्रास पोचूं नये म्हणून व नंतर आजीचे चित्त व्याकुळ करूं नये म्हणून, अशा विचारानें त्या 'महिलांनी' आपल्या हृदयांतील दुःखाचे काहूर आंतल्या आंत दाबून ठेवले होतें. पण—

"**नाना!**"

असा एकच आक्रांत केला त्यांनी तिरडी उचलल्यावर! कृष्णवियोगाचे वेळी गोपींनी फोडलेल्या हाकेची आठवण मी चटईवर बसल्या बसल्या करीत होतो व आजींना धीर.........

आजीपासून धीर मिळाला खरोखर सर्वांना. जणूं बाहेरचा हंबरडा कानींच आला नाही अशा भावनेनें त्या एकसारख्या हात जोडून नमस्कार करीत होत्या

आणि तोंडाने रामाचे नाव घेत होत्या. आजोंचे अंतःकरण दुःखाला बधिरच झालेले आहे की काय ? अशा शंकेने मी त्यांच्या मुद्रेकडे बारकाईने पाहूं लागलो. तो त्यांच्या मिटल्या नेत्रांतून एकामागून एक अश्रु निघत होते व त्या मुरकुतलेल्या गालांवरून वाहत होते ! दुःख होते पण त्याचें वर्चस्व नव्हतें; हृदय हलले होते, पण विवेकापासून चळले नव्हते.

मी त्या तपोमूर्तीला मनातल्या मनात सहस्रशः वंदन केले. धीर देण्याला किंवा सांत्वन करण्याला माझी जरूरीच नाही असे पाहून थोड्या वेळानें मीहि स्मशान-भूमीकडे गेलो.

हा प्रकार ता. ११ ऑगष्ट १९३८ रोजी वर्धा येथील महिलाश्रमात घडला.

* * * *

**" मनुष्य अन्नावर जगत नाहीं, द्रव्यावर जगत नाही—श्रद्धा, प्रेम यांवर जगतो, आनंदावर जगतो.**

**" ब्रह्म आनंदमय आहे, जग आनंदमय आहे. आनंद हेंच आपलें स्वरूप आहे याचा अनुभव ज्याला झालेला आहे, तो कोणत्याहि संकटांत आपल्या मनाची शांति ढळूं देत नाहीं.**

**" ईश्वरावर श्रद्धा ज्याच्या अंतःकरणांत आहे, त्याचें जीवित सदा आनंदमयच असते. प्रभावशाली व चारित्र्यसंपन्न सत्पुरुषांवर—श्रेष्ठ विभूतींवर—ज्याची श्रद्धा आहे, त्याला कोणतींहि संकटें भिववूं शकत नाहींत. "**

कै. गु. नरहर लक्ष्मण आठवले यांच्या जीविताची ही सूत्रवाक्ये ! ती त्यांनी आपल्या 'आत्महत्या—त्याचा प्रसार व प्रतिकार' या पुस्तकाच्या शेवटी दिली आहेत. त्यात लिहिल्याप्रमाणे ते खरोखरच अन्नावर किंवा द्रव्यावर जगत नव्हते. जगण्याचे साधन म्हणून अन्नाची, आणि देशसेवेचे साधन म्हणून द्रव्याची ते जरुरी मानीत व तितकीच ते त्याची अपेक्षा ठेवीत. भाग्य त्यांचें की, श्रेष्ठ विभूतींचा सहवास, 'नको' म्हटले तरी लाभावा अशाच कुळात त्यांचा जन्म झाला होता. त्यांचे आजोबा हे महर्षि आण्णासाहेब पटवर्धन यांचे गुरुबंधु होत. कुलपरंपरागत अशी आण्णासाहेबांविषयींची श्रद्धा पंतांच्या ( हेंच त्यांचे रूढ नाव होते, 'नाना'ची उपाधि फक्त महिलाश्रमात

लागली. ) अंतःकरणात रुजली उशिरा, पण जी रुजली ती खोलवर व अगदी कायमची. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्या बुद्धीला चिकित्सेची धार इतकी लागली की, आण्णासाहेबांच्या दर्शनासीहि ते प्रारंभी क्वचितच जात. त्यांचा जन्म पुणे येथे भाद्रपद वा। ५, शके १८१८ मध्ये झाला व बालपण काठेवाडातील मोर्वी या गावी गेले. मॅट्रिकची परीक्षा ते उत्तीर्ण झाले तीहि गुजराथी भाषेतूनच. पुढे कलकत्त्यास ' राष्ट्रीय वैद्यक विद्यालयात ' डॉक्टरी शिकण्यास ते गेले; पण ते विद्यालय बंद पडल्यामुळे त्याना तेथून परत यावे लागलें. पुण्यास आल्यावर मातोश्री आण्णासाहेबांच्या दर्शनास किंवा आळंदीच्या यात्रेस जात असल्या, तरी पंतांचे लक्ष तिकडे नसे. परंतु आण्णासाहेबांच्या आयुष्याचे अखेरी-अखेरीस पंताना त्यांचे स्वरूप कळले व महत्त्व पटले. त्यानंतर त्या साक्षात्कारी पुरुषाला ते परमदैवत मानूं लागले. ' प्रभावशाली व चारित्र्यसंपन्न सत्पुरुषा-वरील ' ही श्रद्धा त्याना जीवितात अनेक वेळा पाठीराखी झालेली आहे. त्यांच्या अंतःकरणातील ईश्वरावरील श्रद्धा त्यांचे जीवित आनंदमय करूं शकली. त्यांच्या आयुष्याचे अधिष्ठान अध्यात्म हे होते आणि त्याचे प्रकट स्वरूप राष्ट्रसेवा हे होते. प्रस्तुत कादंबरीच्या अखेरच्या भागात ईश्वरी श्रद्धेचे माहात्म्य किती तन्मयतेने लिहिले आहे पहा.

फर्ग्युसन कॉलेजात शिक्षण घेत असतानाच ' रामवाचनालया 'ची स्वयंसेवा करून त्याना राष्ट्रसेवेचा श्रीगणेशा गिरविला. चिरस्थायी स्वरूपाची राष्ट्रसेवा करावयाची तर तरुण पिढीला शिक्षण देणे हा एकच मार्ग होय हे त्याना पटले. जेसुइट लोकांचा दाखला देऊन लोकमान्य टिळकांनी पदवी-धरांना ' आधुनिक रामदास ' होण्याचा जो उपदेश केला; त्याचें मूर्त स्वरूप पंतांच्या जीवितांत दृष्टीस पडते. बारामती येथे ते शिक्षक म्हणून इंग्रजी शाळेत शिकवूं लागले. मला तो दिवस नेहमी आठवतो. किरकिडित मूर्ति, पोशाख साधा, पायात कॅनव्हसचा बूट-पायमोजे नाहीतच, एक डोळा तिरळा-अशी ही मूर्ति दुपारचे वेळीं आमच्या वर्गावरून गेली तेव्हा किती तरी उच्छृंखळ मुले फिदिफिदी हंसूं लागली. पण मला हेहि आठवते की, ' आठवले सर ' जेव्हा शाळा सोडून निघाले तेव्हा तीच मुले-काय सांगावे!—शब्दशः ढसढसा रडली ! ! " चेष्टेखोर म्हणून आले आणि चहाते बनून गेले " हे

गोल्डस्मिथने वर्णिलेले परिवर्तन घडवून आणण्यास त्याना दोनचार महिनेहि लागले नाहीत. तेथे आल्यावर थोड्याच दिवसानी ते बी. ए. झाले. नियोजित अभ्यास शिकविण्यापलीकडे ते आपला जीव ओतून जे कांही शिकवीत, ते विद्यार्थ्यांच्या हृदयाला जाऊन भिडे व त्यामुळे तीं हृदये त्याना वश होत. जमिनींत मुरणाऱ्या झिमझिम् पावसाप्रमाणे त्याचे शिकविणे शांतपणे चाले– वक्तृत्वाचा धो धो मुसळधार पर्जन्य पाडून भावनांचे पाणलोट ते वर्गातून खळाळत ठेवीत नसत किंवा कोट्याकल्पनाचा चमचमाटहि पाडीत नसत. सर्व कारभार शांत–धिम्मा ! राग हा गावीहि नसे. वात्सल्य मूर्तिमंत. विद्यार्थ्यांच्या डोक्यात कांही कोंबण्यापेक्षा त्या डोक्यातून काय बाहेर निघते हेच त्यांचे पाहणे असे. विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याऐवजी ते फक्त प्रेरणा देत.

मुलांचा मनःपिंडच बदलण्याचा मूलग्रामी प्रयत्न ते करीत. त्याना ते संध्याकाळीं फिरावयाला नेत. पण तव्हा देशभक्तांची व्याख्याने न देता त्यांच्या अंतःकरणाची प्रवृत्तीच राष्ट्रोन्मुख करीत. मोठमोठ्या राजकीय प्रश्नाचा काथ्याकूट करीत न बसता किंवा भिन्नभिन्न पुढारी किंवा पक्ष याची तुलना न करता, विद्यार्थ्यांच्या चित्तातील ज्या शंका कथाप्रसंगाने सहजगत्या बाहेर पडत, त्या बारीकसारीक असल्या तरी ते ऐकून घेत, त्यांचे निदान मनाशी करीत आणि त्यावरून त्या विद्यार्थ्याचा मन:पिंड कोणत्या जातीचा आहे हे ओळखून त्याला योग्य दिशा लावीत. मुख्य व पहिली गोष्ट म्हणजे विद्यार्थ्याचा विश्वास संपादन करणे. ते ती प्रथम करीत. वडिलांजवळ जे बोलता येत नाही, आई जे ऐकून घेत नाहीं, मित्राला जे सांगून उपयोगी नाही, ते आपण पंताजवळ सांगावे, त्याच्याकडून उलगडून घ्यावे, त्याच्या सल्ल्याने त्यातून मार्ग काढावा अशी प्रवृत्ति त्यांच्या विद्यार्थ्यात उत्पन्न झाली व ती सतत वाढत गेली. त्यानी शाळा सोडीपर्यंत, नव्हे इहलोक सोडीपर्यंत, विद्यार्थ्यांच्या चळवळी–मग त्या कितीहि लहानमोठ्या असोत–ते उत्साहानें चालवीत, त्यांत लक्ष घालीत, तासन् तास त्यांसाठी मोडीत. वादसभा काय, हस्तलिखित साप्ताहिक काय किंवा पतपेढीचे दुकान काय—महत्त्व त्याचें नसे, तर त्यामार्फत ते विद्यार्थ्यांच्या पोटात जे शिरत, त्यांच्या काळजाला जो हात घालीत, तोच खरोखर खऱ्या शिक्षणाचा पाया नव्हे काय? बारामती सोडल्यावर त्यांच्यासारख्या गरीबींतील माणसाने

दोनदोन रुपये खर्चून आपल्या पूर्वीच्या विद्यार्थ्याला कॉलेजातून घरी आवर्जून बोलावून आणावे, तास दोन तास त्याच्याशी इकडच्या तिकडच्या गप्पा-गोष्टी बोलाव्या आणि महत्त्वाचा (!) भारदस्त (!!) विचार त्याला कोणताच न सुनावतां त्याला प्रेमानें निरोप द्यावा – मात्र त्या वेळी तो विद्यार्थी गहिवरून यावा-अशा त्याच्या आयुष्यांतील प्रसंगांचे रहस्य दुसरे काय असणार? परचित्त-प्रवेश हेच शिक्षणाचे खरे माध्यम. मुलाची मने त्यांनी गुपचुपपणें इतकी जिंकलीं की, एका दिवाळीचे वेळी शालाधिकाऱ्याशी पंतानी विरोध पुकारला असतां, सारी शाळा त्याच्या बाजूला झुकली—अपवाद एकच व तो म्हणजे मी! पण माझी समजूत त्यांनी दोनचार वाक्यांत घातली व शाळेतील 'सत्याग्रह' यशस्वी करून दाखविला. त्याच्या स्वभावाचे वर्णन त्या वेळी 'शिक्षक–सन्मणिमालें'त पुढील आर्याधाने केले होते.

**तनुधर क्षमत्व गमतें मातें, उत्साहपूर्ण आठवले।**

थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे ते मुलाच्या शीलाचे शिल्पकार व मनाचे मूर्तिकार झाले होते. आणि 'आधी केले, मग सांगितले' या दासबोधानुसार त्यांनी आपल्या पुढील मानसशास्त्रीय पुस्तकात अनुभूत असेच सिद्धांत मांडले. आणि त्याच्या उदाहरणांसाठी मुलाचे स्वराज्य वर्णन करणारी प्रस्तुत कादंबरी लिहिली. '**दुर्वर्तनी मुलांची सुधारणा**' या पुस्तकात त्यांनी 'शीलाचे शिक्षण' कोणते हे पुढील शब्दांनी सांगितले आहे,

**"योग्यायोग्यतेचा विचार करून नेहमीं योग्य मार्गाचीच निवड करणें व त्या निवडलेल्या योग्य मार्गानेंच नेहमीं जाणें अशा तऱ्हेचा स्वभाव तयार करणें यासच शीलाचें शिक्षण देणें असें म्हणतां येईल."**

मुलांचा मनःपिंड किंवा मनःस्वभाव सुधारण्यासाठी योग्य मार्ग कोणता हे पुस्तकाचे शेवटी ते लिहितात,

**"मुलांचा विश्वास संपादन करून आपल्याशीं अधिक मोकळे-पणानें वागण्यांत त्यांना उत्तेजन देणें व अगदीं साध्या शब्दांत, व्याख्यानबाजी न करतां निर्विकारपणें सद्वर्तनाचें महत्त्व त्यांच्या मनावर बिंबविणें......आणि त्यांच्या मानसिक व आध्यात्मिक**

**विकासास सवड देणें या गोष्टी अशक्य कोटींतील आहेत असें नाहीं. ''**

आणि या गोष्टी अशक्य कोटींतील नाहींत हे त्यांनी बारामती, तळेगाव व वर्धा येथील आपल्या शिक्षकीत सिद्ध करून दाखविलें—पण त्याबरोबरच त्या किती दुर्मिळ आहेत हेंहि दिसून आलें. त्यांच्या अध्यापनाच्या यशाचें व विद्यार्थ्यांच्या भक्तिभावाचें रहस्य वरील विचारसरणींत व तदनुसारी आचारपद्धतींतच आहे.

१९२० सालीं ते तळेगाव येथील 'नवीन समर्थ विद्यालय' या प्रो. विजापूरकर यांच्या राष्ट्रीय शाळेत शिक्षक म्हणून गेले. लवकरच ते तेथें आजन्म सभासद झाले व शेवटचीं चारपाच वर्षें तर त्या संस्थेचे प्रमुख (प्रिन्सिपॉल) म्हणून त्यांनी काम केलें. हिशेबाची व्यवस्था पाहण्याचें काम अंगावर पडलें तेव्हा तेंहि त्यांनी तत्परतेनें पार पाडलें. शाळेला जरूरी होती म्हणून 'इंग्लंडच्या राज्यघटनेचा इतिहास' हें पुस्तक लिहिलें. या सर्व कामापेक्षा त्यांचें चित्त कोठें रमत असेल तर विद्यार्थ्यांच्या सहवासात, त्यांच्याशीं संभाषण करण्यात, त्यांच्याबरोबर सफरी करण्यात;—त्यांचा स्वभाव सुधारण्याचा आनंद हा त्यांना सर्वांत प्रिय. एका विद्यार्थ्याची एक खोडी काढून टाकणें म्हणजे त्यांना एक किल्ला सर करणेंच वाटे! आजारी मुलांच्या शुश्रूषेतहि त्यांना गोडी वाटे. रात्रीं एकएक वाजेपर्यंत जागून व पहाटे पाच वाजतां उठून तेथें काम करीत असलेलें मी त्यांना पाहिलें आहे. विद्यार्थ्यांच्या संख्येच्या दृष्टीनें 'समर्थ विद्यालय' जेव्हा रोडावलें होतें, तेव्हा हातावर घेऊन पंतांनी त्याला पुष्ट केलें, बाळसें आणलें आणि चैतन्यपूर्ण बनविलें.

तेथें दहा वर्षें राष्ट्रीय शिक्षणाची व तद्द्वारां राष्ट्राची सेवा केल्यानंतर ते पुण्यास आले. या अवधींत त्यांनी मुलांच्या मानसशास्त्राचा (Child Psychology) अभ्यास खूपच वाढविला. अमेरिकेंतील एका संस्थेत नाव दाखल करून पत्रव्यवहारानें अभ्यास सुरू केला व त्यात प्रावीण्य मिळविलें. दोनतीनशें रुपये स्वतः खर्चून पुस्तकें आणविलीं. या व्यासंगांत आपल्याला शिक्षक व वसतिगृहाधिकारी म्हणून आलेले अनुभव मिसळून त्यांनी 'दुर्वर्तनी मुलांची सुधारणा' हें पुस्तक रचलें. त्याचा गौरव विद्वानांनी

चांगल्या रीतीने केला. 'आमच्या परीक्षापद्धतींतील दोष' या नावाच्या इंग्रजी निबंधास शंभर रुपयांचे बक्षीस लावलें होतें, ते त्यांच्या निबंधास मिळालें. Reynard the Fox याचें रूपांतर केलेलें 'राणा कोल्हा' हें त्यांचें पुस्तक असो की 'आत्महत्या-त्याचा प्रसार व प्रतिकार' हें पुस्तक असो, किंवा स्टीव्हन्सनच्या 'डॉ. जेकिल अँड हाइड'चें रूपांतर 'डॉ. शरच्चंद्र' हें असो – विकासशाली व संस्कारक्षम अशा उमलत्या पिढीची सुधारणा करावयाची हेंच सूत्र त्यांत गोवलेलें दिसतें. राष्ट्राला चांगले नागरिक– किंवा स्वातंत्र्याचे सैनिक–पुरविण्याचें गाजावाजा नसलेलें धिमेपणाचें काम तें पार पाडीत व तीच आपली राष्ट्रसेवा व तेंच आपलें परमार्थसाधन असें मानून पंत त्यासाठीं अहोरात्र परिश्रम करीत.

या अप्रत्यक्ष राष्ट्रसेवेबरोबरच त्यांना प्रत्यक्ष सेवेचाहि लाभ १९३०-३२सालच्या चळवळीनें आणून दिला. सरकारनें काँग्रेस बेकायदा ठरविली तरी तिची पत्रकें निघून, दिन साजरे होऊन, सर्वत्र तिचें कार्य पूर्वीपेक्षा अधिक जोरानें चालू राहिलें आणि आपले डोळे मिटले तरी कंसाला दाही दिशा 'कृष्ण! कृष्ण!' म्हणून पाहण्याची पाळी आली, तीच स्थिति काँग्रेसच्या बाबतींत सरकारची झाली. त्यासाठीं महाराष्ट्रांत जें यंत्र उभारलेलें होतें, त्यांत पंत एका प्रमुख जागीं काम करीत होते. 'पत्रं पुष्पं फलं तोयं' या नात्यानें त्यांना राष्ट्रीय लढ्यांत जें देतां आलें तें सर्व त्यांनीं दिलें, याहून या बाबतींत अधिक काय लिहावें? त्यांची एकमेव जिंदगी असलेलें राहतें घर त्यांनीं 'टिळक महाविद्यालया'च्या 'ताराचंद रामनाथ हॉस्पिटल'ला आपल्या मातोश्रींचे पश्चात् दिलें ही त्यांची रोकडी राष्ट्रभक्ति जनतेच्या नजरेसमोर आहेच.

या कामाबरोबरच त्यांचें लेखनाचें कार्य चालूच होतें. 'वात्सल्य' नावाचें मासिक काढण्याची योजना शिजत होती. वृत्तपत्रांतून व मासिकांतून, हिंदीमधून व गुजराथीमधून ते वारंवार लिहीत. प्रस्तुतचें 'व्यास-विद्याश्रम' लिहिलें जात होतें, त्याची प्रस्तावना मागण्यासाठीं ते श्री. काका कालेलकर पुण्यास आले असतां त्यांजकडे गेले. पुस्तकाचे आधीं पंतांची योग्यता जाणून काकांनीं त्यांना उचलून थेट वर्ध्यास नेलें व वर्ध्यानें त्यांना स्वर्गी पोंचविलें! श्री. कालेलकर तळेगांव येथें एका समारंभासाठीं आले असतां त्यांनीं केलेल्या भाषणाचा

पंतांच्या मनावर फार परिणाम झाला. ‘ खरा शिक्षक आहे हा माणूस ’ असे ते म्हणत. ‘ दुर्वर्तनी मुलांची सुधारणा ’ या पुस्तकाचे मुखपृष्ठावर त्यानी काकांचेंच गुजराथी वचन उद्धृत केले आहे. दोघे मानसशास्त्री शिक्षक एकमेकांस भेटले व एकमेकांचे जिवलग बनले. ‘ वर्ध्याने ऑक्सफर्ड-केंब्रिज ’ व्हावे असा काकांचा मानस. म्हणून त्यांनी ‘ व्यासविद्याश्रमा ’च्या कर्त्याला ‘ महिला-विद्यालया’त नेले.

तेथे गेल्यावर स्त्रियाच्या जीवनाचा त्यानी सशास्त्र अभ्यास केला. पाच वर्षे त्यांनी महिलाश्रमाची सेवा केली. त्याचे ते तळेगावप्रमाणेच प्रमुख बनले होते. साऱ्या मुलींचें चित्त त्यानी किती वेधले होते हे प्रारंभीच्या मृत्युप्रसंगीच्या वर्णनानंतर निराळें सांगावयास नको. पण एवढे सागणे जरूर आहे की, सुटीत पुण्यास आले तरी पंताच्या डोक्यात महिलाश्रमाशिवाय दुसरे कांही नसे. त्याच्या उत्कर्षाला उपयोगी पडावे म्हणून सेवासदन, अनाथमहिलाश्रम, हिंग-ण्याचे महिलाविद्यापीठ वगैरे स्त्रियाच्या संस्थांत ते जात व इतक्या बारकाईने तासन् तास माहिती गोळा करीत की माझ्या तितिक्षेची मर्यादा संपावी व ‘ चला आतां पुनः पाहूं ’ असे मी त्यांना म्हणावें. सुटी संपवून येथून जाताना फळांची भली थोरली करंडी महिलाश्रमातील मुलींसाठी त्यांनी नेली नाही असे क्वचित्च होई ! श्री. कालेलकरानी मला एका पत्रांत लिहिले आहे की, “ दर वर्षी मातोश्रीच्या भेटीला म्हणून ते जात, त्या वेळी पुण्ययात्रेला जात असल्या-प्रमाणे त्याना आनंद होत असे.” यात अस्वाभाविक काहीच नाही, पण येथून ते वर्ध्यास जावयास निघत ते तितक्याच उत्सुकतेने व आनंदाने, हें काका-साहेबांस कसे माहीत असणार ? दिवाळीची व उन्हाळ्याची सुटी आणि कै. आण्णासाहेब पटवर्धनाची पुण्यतिथि अशा निमित्तांनी ते पुण्यास येत. उन्हा-ळ्याच्या सुटीत त्यांचेबरोबर एकदोन मुली येथें शारीरिक शिक्षण घेण्यासाठी येत. फैजपूर येथील राष्ट्रीय सभेच्या वेळीं महिलाश्रमांतील मुलींनीं भोजनखाते चालविले होते व पंत ( त्यांचे ‘ नाना ’ ) तेथेहि प्रमुख होते. त्या वेळी मुलीचा त्याचेवर किती लोभ व आपलेपणा जडलेला होता हे मी पाहिले होते. आजींनी पंतांसाठी पाठविलेली हलव्याची मोठी-थोरली बाटली मुलींनीं आपले-पणाच्या हक्काने हातोहात लांबविली व हां हां म्हणतां रिती केली ! पंत त्यांना

घेऊन एकदां कोळशाची खाण पाहण्यास गेले होते, तेव्हा वाघाच्या तडाक्यात त्याची टोळी सांपडली. त्या वेळचे वर्णन त्यांनी एका पत्रांत बहारीने केले आहे. 'नूपुरे त्वेव जानामि नित्यं पादाभिवंदनात्' हे लक्ष्मणाचे उद्गार वारंवार म्हणणारे व तदनुसार आचरण ठेवूं पाहणारे पंत मुलींच्या राज्यांत इतके समरस कसे होत याचे मला आश्चर्य वाटे. ते मुलींमध्ये किती मिसळून वागत याचे चित्र श्री. कालेलकर यांनी एका पत्रात मोजक्या शब्दांनीं काढले आहे. ते म्हणतात,

**"महिलाविद्यालयांतील मुली नानांच्याकडे पितृभावनेनें पाहत असत. त्यांच्याशीं लडिवाळपणा करीत. त्यांच्याशीं भांडत व पुन्हां त्यांच्याकडूनच सांत्वन मागून घेत. नानांना वडीलहि होतां येत होतें आणि आईहि होतां येत होतें. नानांची संस्कारिता आणि तत्त्वनिष्ठा पाहून त्यांच्या मातोश्रीविषयीं आदरभाव दिवसें-दिवस वृद्धिंगतच होत गेला. नानांच्या चारित्र्याचें मूळ त्यांच्या मातृभक्तींत होतें हें मी प्रथमपासूनच पाहूं शकलों होतों."**

महिलाविद्यालयाचे हळुहळू विद्यापीठ करावे व नानाचे मार्फत पत्रव्यवहार-पद्धतीने सर्व हिंदुस्थानातील होतकरू स्त्रियाना तयार करावे अशी योजना वर्धा येथील चालकांची होती. पण 'मनसा चिन्तितमेकं दैवमन्यत्र चिन्तयेत्' हा कटु अनुभवच पंताच्या संबंधीयांना मिळावा लागला. बारामती, तळेगाव व वर्धा येथे त्याच्या हाताखाली शिक्षण घेतलेल्या व शीलसंपन्न बनलेल्या मुला-मुलींना हा अनुभव किती जहरी वाटला असेल आणि रामवाचनालयापासून राष्ट्रसभेपर्यंत त्यांच्याशी सह-कार्य केलेल्या कार्यकर्त्यांना त्याचे आकस्मिक निधन कसे जाणवले असेल, याची कल्पना मी बांधूं शकतो; पण –

उरलेल्या आयुष्याची वाटचाल एकाकीपणे व असहायपणे करावी लागलेल्या आजी !—त्यांचे दुःख कल्पनेपलीकडचे आहे, पण त्या दुःखाला कोंडून ठेवणारा त्यांचा विवेक त्याच्याहि पलीकडे आहे.

'सर्वश्रेष्ठ हिंदुधर्म' हें माझे प्रथम पुस्तक पंताना अर्पण करतांना मी स्वतःला त्यांचा 'विनयाधानाद्रक्षणाद् भरणादपि उपकृत' म्हणवून घेतले आहे, आणि त्याच भावनेने 'व्यासविद्याश्रमा'च्या लेखकाची भूमिका येथें

लिहिले आहे. ' विद्याश्रम तयार झाला पण त्यातील व्यास गेला ' असे त्याच्या एका विद्यार्थ्याने मला लिहिले आहे. ' विद्याश्रमा 'तील मोहन मृत्यूच्या मुखातून मुक्त होऊन आपल्या आईला भेटतो; पण कथासृष्टी व सत्यसृष्टी यात अंतर असते हेच खरे !

पुणे
ता. २० सप्टेंबर, १९३८

दामोदर नरहर शिखरे

# वातावरण*

मनुष्यमानसाचा ठाव पाहणे आणि समाजरचनेचे अत्युच्च शिखर गाठणे हा आजच्या युगाचा प्रधान व्यवसाय आहे. प्रशांत महासागराच्या तळाला पोहोचून तेथील वनस्पति व प्राणी यांची माहिती मिळवून आणणारे, आणि हिमालयाच्या गौरीशंकरावर पोहोचून आणि तेथेहि विमाने उडवून पृथ्वीच्या विरलतम वातावरणाची स्वभाव-रचना पारखणारे शोधक वीर जसे आज आपल्याला दिसतात त्याचप्रमाणे जीवनाचा अत्युच्च उद्देश ठरवून तो अंमलात कसा आणता येईल याची विवंचना करणारे आणि दिवसेदिवस जटिल होत जाणाऱ्या मनोरचनेची गुंतागुंत सोडविणारे प्रखर विद्वानहि दिसूं लागले आहेत, आणि या लोकांनी आपल्या विचाराचे वाहन म्हणून कादंबरीचे रूप पसंत केल्याने असाधारण सुंदर आणि शक्तिशाली कादंबऱ्या जेथे तेथे अवतरूं लागल्या आहेत. समाजातील सर्व प्रकारचा कचराहि कादंबऱ्यातून पाहावयाला मिळतो आणि व्यास-वाल्मीकीसारख्या धर्मज्ञ समाजनेत्याच्या आकांक्षांच्या भराऱ्या देखील कादंबऱ्यातून पाहावयास मिळतात. समर्थ लेखकांनी अंगीकार करून कादंबरीचे महत्त्व जणु अगदी कळसाला नेऊन पोहोंचविले आहे. समाजाचे पुढारीपण एके काळी महाकाव्यांकडे होते; हल्ली ते वर्तमानपत्राकडे गेलेले आहे आणि आता कादंबऱ्याहि ते सार्वभौमत्व उपभोगण्याची महत्त्वाकांक्षा धरून पुढें येऊं लागल्या आहेत.

---

* कादंबरीला प्रस्तावना कशाला? मलाही वाटते की कादंबरीला प्रस्तावनेची जरूर नसावी. पण माझ्या आग्रहाने तयार केलेल्या या कादंबरीला मी प्रस्तावना लिहावी असा नानाचा आग्रह पडला. माझ्या आग्रहाला त्यांनी मान दिल्यावर त्याच्या म्हणण्याला मान देणे क्रमप्राप्तच होते. आणि आम्हा शिक्षणशास्त्र्यांना प्रत्येक गोष्टीची थोडीफार मीमांसा करण्याची हौस असतेच. वाचकाना एवढेच सुचवावयाचे की प्रस्तावना गाळूनच पुस्तक वाचावें व नंतर वाटल्यास प्रस्तावनेवरून नजर फिरवावी.

**काका कालेलकर.**

आपल्या बुद्धि-शक्तीने आणि तरतरीने लोकांवर छाप पाडणारा मनुष्य समाजाचे जसे कल्याण करूं शकतो तसाच जर तो बेजबाबदार, धूर्त आणि भुरळ्या असला तर बघता बघतां आसपासच्या समाजाची रेवडीहि करूं शकतो. कादंबऱ्याचेहि तसेच आहे. रस्त्यावर आणि बाजारांत सर्व प्रकारच्या लोकांना हिंडण्याफिरण्याची सारखीच मुभा असते; पण आपल्या घरात कोणत्या प्रकारची माणसे यावीत आणि कोणत्या प्रकारची येऊं नयेत हे आपण काळजीपूर्वक आणि नाजुकपणाने ठरवितो. एखादा मनुष्य जरासा छाकटा दिसत असला तर त्याच्या विरुद्ध उघडपणे तोंडांतून ब्रहि न काढतां आपण मुकाट्याने त्याला टाळतों व अशांशी लगट न करावी असें घरच्या मुलांबाळांना अगदीं सौम्यपणे सुचवितों. अशा रीतीने व्यक्तींच्या बाबतींत आपण जितकी काळजी घेतो तीहून अधिक काळजी साहित्याच्या बाबतीत घेतली पाहिजे. आकर्षक साहित्य हे व्यक्तीइतकेच महत्त्वाचे आहे. राष्ट्राचा इतिहास लिहितांना ज्याप्रमाणें कर्तबगार विभूतींचे आपण वर्णन करतों त्याचप्रमाणे सार्वभौम साहित्य-विभूतीनाहि इतिहासांत स्थान असले पाहिजे. रामायण व महाभारत, गीता अथवा उपनिषदें, दासबोध आणि ज्ञानेश्वरी हे केवळ ग्रंथ नसून राष्ट्रपुरुष आहेत असे म्हटल्यास त्यांत तिळमात्र अतिशयोक्ति नाहीं. लहानपणचे शिक्षक आणि लहानपणचे सवंगडी याचा आपल्या चारित्र्यावर जसा परिणाम होतो तसाच लहानपणीं फार आवडणाऱ्या पुस्तकांचाहि आपल्या जीवनावर परिणाम होतो. एखाद्या मुलाला हातीं धरण्यासाठी, त्याच्या आयुष्याला विशिष्ट वळण लावण्यासाठी त्याला वारंवार उपदेश करण्यापेक्षां किंवा त्याचेवर देखरेख ठेवण्यापेक्षा त्याला कांही विशिष्ट काव्याची अथवा अभिजात साहित्याची गोडी लावून देणे हाच अधिक रामबाण उपाय आहे असें अनुभवास आलें आहे.

असे ग्रंथ संविधानकाच्या अद्भुततेने अथवा घटनाकौशल्याने थरारून सोडणारे असले पाहिजेत असे मुळींच नाहीं. अगदीं साधी गोष्ट, साधी घटना, साधेच वर्णन केव्हां केव्हा हृदयाच्या अगदी नाजुक तारेला हालवून सोडतें. मसाल्याचे चमचमीत पदार्थ खाण्याची संवय लागली म्हणजे साधा पौष्टिक आहार पूर्वीइतका आवडेनासा होतो; पण शारीरिक पुष्टि व तुष्टि स्वाभाविक भुकेनें आलेल्या चवीनेच गोड होणाऱ्या पदार्थापासून मिळत असते त्याचप्रमाणें

जीवनाला वळण लावणारी काव्ये, चित्रे अथवा संगीताचे आलाप पुष्कळ वेळां अगदी साधेच असतात. कादंबऱ्यांचेहि तसेंच आहे.

'सेंट विनिफ्रेड' ही इंग्रजी कादबरी विद्यार्थिजीवनावर असाधारण छाप पाडणारी म्हणून इंग्रजी साहित्यात प्रख्यात आहे. विद्यार्थ्यांच्या जीवनाशी सहानुभूतिपूर्वक समरस होऊन ही लिहिली असल्याने विद्यार्थ्यांना स्वतःच्या शालेय जगतात अगदी तल्लीन करून सोडणारी अशी झालेली आहे. ही वाचीत असतांना कितीतरी तरुणांनी आपल्या डोळ्यांतून अश्रू ढाळले आहेत, छातीचे धडधडणे अनुभविले आहे आणि सुटका झाल्यावर समाधानाचे सुस्कारे सोडले आहेत. ग्रंथकार फॅरारने याचसारख्या दुसऱ्या कादंबऱ्याहि लिहिल्या आहेत; पण त्या सर्वांमध्ये विनिफ्रेड ही विशेष आहे असे वाचकवर्गाचें एकमत आहे.

प्रथम जेव्हा ही कादंबरी आमच्या मित्रमंडळांत वाचली गेली तेव्हां कितीतरी दिवस आमच्या बोलण्याचा हा एकच विषय असे. कांहीं चांगले खावयास मिळाले किंवा ऐकावयास मिळाले म्हणजे लागलीच इतरांना बोलावून त्याची गोडी चाखावयास लावावी आणि त्याच्या आनंदाने आपला आनंद द्विगुणित करावा या स्वभावाला अनुसरून या कादंबरीला मराठी पोशाख चढवावा असें तेव्हाच वाटले होते. पण आळशाचे बहुतेक सर्वच मनोरथ मनांतल्या मनांत उत्कट होऊन विरून जातात. तसेच येथेंहि घडलें. मात्र मराठी वाचकांना याचा आस्वाद मिळाला पाहिजे येवढी वासनाच शिल्लक राहिली. ती वासना तृप्त करण्याचे श्रेय माझे मित्र रा. आठवले यांनी आतां घेतले आहे यासाठी प्रथम त्यांचे आभार मानले पाहिजेत.

या कादंबरीचें सरळ भाषांतर करावें कीं आपल्या इकडील परिस्थितीस अनुरूप असें रूपांतर करावें याविषयी मनात कितीतरी दिवस भवति न भवति झाली. जगांतील सर्व देशांशी संबंध ठेवूं इच्छिणाऱ्या जागृत राष्ट्राला प्रत्येक देशाची लोकस्थिति, तेथील रीतिरिवाज, हवापाण्याचें वैशिष्ट्य इत्यादि सर्व गोष्टींशी परिचय असला पाहिजे, आणि कोणत्याहि समाजाच्या आशा आकांक्षा तेथील प्रादेशिक वातावरणांतच रसिकपणे अनुभवितां आल्या पाहिजेत. शाकुंतलाचें रूपांतर करून युरोपियन लोक त्याला स्वदेशांतीलच एक घटना बनवूं पाहतील तर त्यांची रसिकता संकुचित आहे असेंच आपल्याला

वाटेल व आपण चिडूंहि. शेक्सपिअरच्या नाटकांना आपण जो देशी पेहेरवेश दिला आहे तो सर्व बाजूंनीं योग्य आहे असे आपल्यालाहि म्हणता येणार नाहीं. उत्कृष्ट कृतीचे केवळ भाषांतर करून बाकी सर्व वातावरण तद्देशीयच ठेवण्यात एक प्रकारचे औचित्य आहे. व खऱ्या रसिकाला त्यातून आस्वादहि अधिक मिळविता येतो. या दृष्टीने या कादंबरीचे सरळ भाषांतरच करावे असे एकवार वाटे. पण सरतेशेवटीं आमचा निर्णय झाला की, ज्यांचसाठी या कादंबरीचे प्रयोजन आहे त्याना दुहेरी ताण पडणे इष्ट नव्हे. आपल्या इकडील एखाद्या छात्रालयविशिष्ट शाळेचे वातावरण जमविले तर या कादंबरीचा उच्च उद्देश अधिक चांगल्या रीतीने सफळ होईल असे वाटून सेंट विनिफ्रेडचा येथे व्यासविद्याश्रम बनविलेला आहे.

केवळ भाषांतराला साहित्यकौशल्य बस असते. रूपांतरात साहित्य-कौशल्याच्या जोडीला स्वदेशी वातावरण जमवून आणण्याची सर्जकशक्ति असेल तरच ती गोष्ट साधते, आणि जेथे कादंबरीची दुनियाच विशिष्ट वर्गाची असते तेथे त्या दुनियेचीहि उत्तम परिचय असावा लागतो. छात्रालयातील विद्यार्थ्यांचा जीवनक्रम दाखविणाऱ्या कादंबरीला स्वदेशी पेहेराव चढवावयाचा म्हणजे आपल्या समाजांतील बाळगोपाळांच्या जीवनाशीं उत्कृष्ट सहानुभूति असली पाहिजे आणि छात्रालयातील विचित्र जीवनाचीहि चांगला परिचय असला पाहिजे. रूपांतर करणाऱ्या लेखकामध्ये या दोहोंची जोड उत्तम रीतीची असल्यामुळेच हे रूपांतर अगदी घरच्या गोष्टीइतके बेमालूम झाले आहे. रूपांतर करताना मुळातले स्वारस्य न सोडता जितका साधेपणा आणणे इष्ट आहे तितका यात आणला असल्याने वाचकवर्गाला गोष्टीच्या प्रवाहात मौजेने वाहत जाता येते.

इंग्रजीतून स्वभाषेत आलेल्या आणि विद्यार्थिजीवनाला विशिष्ट वळण लावणाऱ्या ग्रंथामध्ये 'हरि आणि त्रिंबक' या गोष्टीचे स्मरण पुष्कळाना होईल. पण 'हरि आणि त्रिंबक' मधील सर्व रचना अगदी प्राथमिक स्वरूपाची आहे. प्रस्तुत कादंबरी कलेच्या दृष्टीने बरीच पुढे गेलेली आहे आणि म्हणूनच आजच्या पिढीला हिची उपयुक्तता अधिक आहे. आपट्यांच्या 'मी' व 'पण लक्षांत कोण घेतो' या कादंबऱ्यांत बाल्यकाळाचें विवरण बरेंच मार्मिक आहे.

'आश्रमहरिणी' अथवा 'सुशीलेचा देव' यांमध्येहि ग्रंथकाराने विद्यार्थिजीवनाच्या कांही छटा बहारीने रंगविल्या आहेत; पण विद्यार्थिजीवनालाच वाहिलेल्या कादंबऱ्या आपल्या येथे नाहीत म्हटलें तरी चालेल.

आपल्या येथे जी थोडी छात्रालयें आहेत तेथे चारित्र्यसंवर्धनाच्या दृष्टीने बुद्धिपुरःसर प्रयत्न होत असला तरी छात्रालयीन प्रश्नाची मीमांसा अथवा समीक्षा करण्याचे अजून कोणाला सुचलेले नाही. मग छात्रालयीन जीवनाचे उपजीवन करून गोष्टी किंवा कादंबऱ्या लिहिण्याची गोष्ट दूरच राहिली.

दिवसेंदिवस सार्वजनिक जीवनाचे महत्त्व हल्ली वाढूं लागले आहे. राजकारण, समाजकारण, अर्थकारण आणि धर्मकारण संघटित रूपाने चालविण्याची आवश्यकता भराभर वाढूं लागली आहे. या सर्व सार्वजनिक जीवनाचे बाळकडू मिळण्याचे स्थान कोणते? अर्थात् कुटुंब किंवा शाळा. यांपैकी कुटुंब ही संस्था दिवसेंदिवस निस्तेज व रहस्यशून्य होऊं लागली आहे आणि शाळा तर बाजारी पायावर उभे राहण्यास केव्हांहि तयार. अशा स्थितीत विद्यार्थिजीवनाचा कोंडमारा झाल्यास त्यात आश्चर्य नाही. जीवनकलह दिवसेंदिवस कष्टाचा होत चालल्याने आणि तऱ्हेतऱ्हेच्या संस्थांनी जीवनातील एकेक विभाग आपलासा केला असल्याने कौटुंबिक जीवन असमृद्ध होऊं लागले आहे व कुटुंबातही सार्वजनिक कामाचें बाळकडू जसे मिळावयास पाहिजे तसे मिळत नाहीसे झाले आहे. छात्रालय आणि क्रीडांगण ही दोनहि क्षेत्रे सामाजिक सद्गुण वाढविण्यास कारणीभूत होतात, पण त्याना आपण अजून योग्य वाव दिला नाही. जर कुटुंबसंस्थेचे पुनरुज्जीवन करता आले तर इतर साधनाची फारशी मातब्बरी नाही. पण तेथील वातावरणांत आस्था, प्रगतीचा आग्रह, आणि बालजीवनाविषयीचा आदर या तीनहि गोष्टींना पोषण मिळत नाहीसें झालें आहे. छात्रालयांना अजून आपल्या सामाजिक जीवनांत स्थानच नाही असे म्हणतां येईल, आणि क्रीडांगणांना जी स्थायी प्रतिष्ठा असली पाहिजे तीहि आपणांला उत्पन्न करतां आली नाही.

प्रस्तुत कादंबरींत दाखविल्याप्रमाणें खऱ्या शिक्षणाचा पाया कौटुंबिक वातावरण हाच आहे. इतर कोणत्याहि उपायांनीं कौटुंबिक शिक्षणाची उणीव भरून काढतां यावयाची नाही; आणि कौटुंबिक शिक्षण परिणामकारक

करावयाचें म्हणजे आईबाप सुसंस्कृत, चारित्र्यसंपन्न व दक्ष असले पाहिजेत; व जीवनाच्या प्रधान आगोपागांचे महत्त्व आणि तारतम्य त्यांना समजलेलें असलें पाहिजे. बाळपणचे वळण म्हणजेच चारित्र्य हें ओळखून घरची प्रेमळ शिस्त त्यांनीं दृढतेनें सांभाळिली पाहिजे आणि सर्वत्र ईश्वरावरील निष्ठेचा सुवास पसरलेला असला पाहिजे. ईश्वरनिष्ठेवाचून चारित्र्यसंवर्धन अशक्य नसले तरी दुरापास्त आहे, याचा अनुभव केव्हां ना केव्हां तरी मनुष्याला येतोच. यासाठीं आईबापांनीं प्रथमपासून कौटुंबिक जीवन पवित्र, प्रसन्न आणि सुवासिक करण्याचा प्रयत्न अहर्निश चालू ठेवला पाहिजे.

कौटुंबिक जीवनामधूनच सार्वजनिक जीवनांतील सर्व सद्गुण उगम पावले पाहिजेत हे जरी खरे आहे तरी आजच्या परिस्थितींतील आईबापांना ते अजून सुचलें नाहीं अथवा साधलें नाही. तेव्हा शिक्षणशास्त्र्यानीं शाळेतून व छात्रालयांतून सामाजिक सद्गुणाचा पुरवठा केला पाहिजे.

जुन्या धार्मिक ग्रंथांतून सद्गुणांची रसभरित वर्णने वाचावयास मिळतात. पण तेथें जो गुण हातीं घेतला त्याला सर्वोच्च स्थानी पोहोचविण्याचा आग्रह दिसून येतो. ज्या देवतेची स्तुति आरंभिली तिला कर्ता, भर्ता, संहर्ता म्हणून वाखाणून सरतेशेवटीं तिला परब्रह्माशी नेऊन भिडविण्याची हातोटी जशी भक्ताना साधलेली असते त्याचप्रमाणे जुन्या कवींना एकेका सद्गुणाची परमावधि चित्रित करून चारित्र्याचा उत्कर्ष दाखविण्याचा मोह होतो. त्यामुळे व्यवहारांत सर्व वृत्तींचें आणि गुणाचें यथाप्रमाण सामंजस्य कसे उत्पन्न करावे याचे शिक्षण कोठेंच मिळत नाहीं. ही अडचण लक्षांत घेऊन बुद्धभगवानानीं मध्यम मार्गाचा उपदेश केला; आणि गीतेने ही दोनहि टोकें सोडून समत्व साधण्याचा मार्ग दाखविला. प्रस्तुत कादंबरीत नैतिक आदर्श अगदीं व्यावहारिक कोटीचा असल्यानें लहान मुलांना तो सहज झेपण्यासारखा आहे, आणि त्याच्यामध्ये चारित्र्याचा करारीपणा पुरेशा प्रमाणांत आल्यानें पुढील सर्व सद्गुण वाढीस लागण्याची सोय त्यांत केलेली आहे.

कादंबरींत काय आणि काव्यांत काय नैतिक बोध गर्भितच असलेला बरा. ग्रंथकार जेव्हां सुईणपणा करून तो बोध स्पष्ट शब्दांत लोकांपुढें आणूं पाहतो तेव्हां कलेची हानि होते आणि बोधहि अधिक परिणामकारक होतो असें नाहीं.

प्रस्तुत ग्रंथांत या सिद्धान्ताचें सर्वत्र पालन झालेले नाहीं. जेथे तेथे प्रासंगिक-तात्त्विक चर्चा करण्याचा मोह लेखकाला अनावर होतो, पण जातिवंत अध्यापक ही खोड केव्हांहि सोडूं शकत नाहीं. शिक्षक हा प्राणीच उपदेशासाठी आहे अशी कल्पना सार्वत्रिक असल्यानें त्याचाहि नाइलाज होतो; आणि उपदेशकाचे काम सोडून देऊन केवळ सहवासाने आणि अप्रत्यक्ष सूचनांनी विद्यार्थ्यांचे नैतिक जीवन परिपुष्ट कसें करावे याची कला उपदेशविरोधी लोकांनी अजून कमावून दाखविलेली नाहीं. नैतिक जीवनाची उपेक्षा हा कांहीं खरा उपाय नव्हे आणि नैतिक उपदेश हाहि परिणामकारक मार्ग नव्हे. खरें साधन म्हणजे वातावरणच होय. तें या कादंबरीत फारच कौशल्याने वठविलें असल्यानें मधून मधून डोकावणारा उपदेश सह्य होतो येवढेंच नव्हे, तर बऱ्याच वेळां तो गोडहि वाटतो.

प्रस्तुत पुस्तकांत कांहीं स्वभावचित्रणे फारच मार्मिक वठलीं आहेत. सामान्य लेखकानें पाठकशास्त्री अगदीं यांत्रिक आणि हृदयशून्य बनविला असता आणि शांतारामांना सहानुभूति आदि आदर्श सद्गुणाचा पुतळाच बनविला असता. पण प्रस्तुत पुस्तकांत तसे न करता वाळवंटाच्या आतून वाहणाऱ्या अंतःप्रवाही नदीप्रमाणें पाठकशास्त्र्यांचे क्षमाशील हृदय ग्रंथकाराने दाखविले आहे; आणि शांतारामांची सहानुभूति प्रतिष्ठित समाजातील शिष्टाचाराच्या सज्जनतेइतकीच खोल दाखविली आहे. मुलांच्या स्वभावचित्रणांत प्रथम स्थान नागेश या पात्राला दिलें पाहिजे. मोहन कथानायक खुशाल असो, त्याच्या जीवनांतील उच्चावच्च भाग ग्रंथकाराने मोठ्या कुशलतेने दाखविलेले असोत, पण बाळपणचें चारित्र्य किती अस्थिर असते आणि तरुणांना परिस्थिति किती लवकर बाधूं शकते, मधून मधून पश्चात्तापाचे आणि सज्जनतेचे उठलेले उमाळे कसे दबले जातात आणि सरतेशेवटीं चारित्र्याच्या उद्धाराला किती जबरदस्त धक्के आवश्यक असतात हें सर्व नागेशच्या चित्रणांत ग्रंथकाराने सिद्धहस्त चित्रकाराप्रमाणें रंगवून विद्यार्थिजगतावर कायमचा उपकार करून ठेविला आहे.

दुर्बल मुलें समर्थांचा आश्रय करून व त्यांच्या दोषांना उत्तेजन देऊन स्वतःचा बचाव कसा करतात आणि अशा रीतीने स्वतःला व दुसऱ्याला अधःपाताच्या गर्तेत कसे नेऊन टाकतात हें दाखविण्यास विष्णु हें पात्र

उत्तम होते. पण लेखकाने त्याचेवर घ्यावी तितकी मेहनत घेतलेली दिसत नाही. आचार्य रत्नाकरांना सर्व प्रकारची चागली चागली विशेषणे देऊनहि ग्रंथकार त्याना जिवंत पात्र करूं शकला नाही. चितोपंत नभळट कां ठरले आणि रत्नाकर समर्थ शिक्षक कशामुळे होते याचा विरोध याहून उठावदार रीतीने दाखविणं शक्य होते. पण लेखकाला छात्रालयातील अध्यापकांना पुढे करावयाचे नव्हते; विद्यार्थी स्वतःच काय काय करूं शकतात, परिस्थिति किती सुधारूं किंवा बिघडवूं शकतात हेच त्याला दाखवावयाचे होते व म्हणून त्याने अध्यापकमंडळींना फारसे रंगभूमीवर न आणता पडद्यावरील चित्रांतच बसवून दिले आहे. कलेच्या दृष्टीने लेखकाचा हा संयम वाखाणण्याजोगा आहे.

मोहनच्या मागोमाग मधूला आणून त्याचे वातावरण आणि मोहनच्या सुरुवातीचे वातावरण यांतील फरकहि लेखकानें उत्कृष्ट रीतीने दाखविलेला आहे.

छात्रालयातील वातावरण प्रस्तुत पुस्तकांत जितके आडदांड आणि रानटी दाखविले आहे, लहान मुलांचा छळ प्रस्तुत गोष्टीत जितका पचवून दाखविला आहे तसें आपल्या इकडे फारसें नसतें. विलायतेंतील छात्रालयात विद्यार्थी एकमेकांचा जेवढा छळ करतात तेवढा आपल्या येथे होत नाहीं, म्हणून प्रस्तुत रूपांतरांत स्वदेशीय वास्तविक वातावरणाची अतिशयोक्ति झालेली वाचकाना दिसेल. ही गोष्ट एका रीतीने अपरिहार्य आहे व दुसऱ्या बाजूने इष्टहि आहे. आपली जात हाडाचीच सौम्य, परदुःखाने आनंदण्यापेक्षा दुःखी होण्याकडेच आपले वळण अधिक, हें जसे खरें आहे, तसेंच मुले जराशी भाडलीं कीं लगेच मध्यें पडून काझीचें काम करण्याची हौस आपल्याइकडील शिक्षकांस अतिशय. यामुळे प्रथमपासूनच आपल्या समाजाला अदालतबाजीची खोड लागूं लागली आहे. जरा कांहीं झाले की, जा कोर्टात. जीवन हें कांहीं आश्रितांचे अंतःपुर नव्हे, तर तो धकाधकीचा मामला आहे, ही गोष्ट बालकांना प्रथमपासून समजली पाहिजे. ज्या त्या गोष्टीची तक्रार करण्यापेक्षां अन्यायाचा होईल तितका स्वतःच प्रतिकार करावा, शिरजोरीपुढें नमून असण्यापेक्षां हालअपेष्टा मुकाट्याने सहन कराव्या आणि अशा रीतीने आपल्या मर्दानगीचा परिचय आसपासच्या लोकाना प्रथमपासून करून द्यावा यातच खरा पुरुषार्थ आहे हें आपल्या तरुण पिढीला समजलेच पाहिजे.

गेल्या तीस-चाळीस वर्षांत आपल्या शाळांतून व तरुणांतून आडदांडपणा बराच कमी झाला आहे. चाळीस वर्षांपूर्वीची पिढी कदाचित् अधिक रानटी असेल, पण ती अधिक जोमदार होती याविषयी शंका नाही. आजचा तरुण कार्यकारणभाव अधिक चांगल्या रीतीनें समजतो. जीवनकलहाची जाणीव त्याला प्रथमपासूनच होऊं लागते. त्याचा पुण्यप्रकोपहि बराचसा मावळलेला असतो, यामुळे इतर दोष वाढले असले तरी आडदांडपणाचे दोष बरेच कमी झाले आहेत. यामुळेंहि प्रस्तुत कथानक स्वाभाविक स्थितीचे चित्र नव्हे असे कित्येकांना वाटेल. पण एडवर्ड कार्पेंटरने म्हटल्याप्रमाणे नाजूक, फिटफाट, आणि शिष्टाचारसंपन्न अशा नागरसमुदायांत आरोग्य आणि यौवन यांनी मुसमुसत असलेला एखादा उघडाबोडका दणगट मनुष्य सहज येऊन उभा राहिला तरी सर्वांचे लक्ष एकाएकी त्याचेकडेच वेधते आणि स्वाभाविक तुलनेने नागर मंडळी अधिकच निस्तेज व फिकी दिसूं लागतात. शक्तिशून्य अनत्याचारिता ही कांहीं जीवनाची शोभा नाही. तळ्क घोड्याप्रमाणे किंवा महादेवाला सोडलेल्या पोळाप्रमाणे बेफिकिरीचे स्वातंत्र्य, आणि दणगट शक्तिशालिता ही मूळांत असावीच, व त्यावर सदाचाराचा ओप चढविलेला असावा-याचे नांव संस्कारिता, विद्याविनयसंपन्नता. युरोपांतील छात्रालयांइतके अत्याचार आपलेकडे नाहींत याचा आनंद तेव्हांच मानतां येईल की जेव्हा तिकडील तरुणांप्रमाणे आपले तरुणहि पूर्वीसारखे धिप्पाड, धाडसी आणि कष्टाळू होतील.

शाळेचे वातावरण जितके शिक्षकाच्या हाती असते तितकेच अथवा त्याहूनहि अधिक ते प्रभावशाली विद्यार्थ्यांच्या हाती असते ही गोष्ट ग्रंथकाराने अगदी सहज सिद्ध करून दाखविली आहे. आणि त्याबरोबर कोवळ्या मनाच्या वाचकावरहि हे ठसविण्याचा प्रयत्न केला आहे की कोणाहि विद्यार्थ्याने शाळेतील दोषांविषयी 'मला काय त्याचे' असे म्हणून उदासीन असतां कामा नये. जहाज बुडत असतां पंपानें पाणी काढण्याची जबाबदारी जहाजांत बसणाऱ्या सर्वांचीच जशी असते, तशीच जागृत जाणीव दरेक कुटुंबांत, दरेक संस्थेत, व दरेक राष्ट्रात, प्रत्येकाला असली पाहिजे. जहाज फुटले किंवा बुडाले तर सर्वांनाच समुद्राचा तळ गाठावा लागणार, त्याचप्रमाणे वातावरण बिघडले तर सर्वांनाच त्याची कडू फळें चाखावी लागणार, हे सतत ध्यानात ठेवून

प्रत्येकानें आपली व्यक्तिगत व सामाजिक जबाबदारी ओळखली पाहिजे. हे शिक्षण घरांतूनच मिळालें असेल तर फारच चांगले, तसें नसल्यास निदान शाळेत तरी ते उत्पन्न केलें पाहिजे. एकट्या मोहनने हे वातावरण व्यासविद्याश्रमाला मिळवून दिले असें म्हटल्यास त्यात अतिशयोक्ति नाही. प्रभाकर बुद्धीने व शक्तीनें श्रेष्ठ असला तरी तो मोहनचा शिष्य झाला, याचे कारण हेच. मोहनच्या चारित्र्याच्या ह्या बाजूचा शिक्षकावर किती परिणाम झाला हे ग्रंथकाराने अगदी हलक्या हाताने दाखविले असते तर वावगे झाले नसते. शाळेच्या आसपास शिक्षण-संस्थेला सेवा करण्याचे क्षेत्र असते एवढी गोष्ट शिक्षकांना पढवून देणे अवश्य असते. युरोपांतील ख्रिस्ती मठ हे तिकडील शाळांचे पूर्वज असल्याने बाहेरच्या जगाशीं काहीच संबंध न ठेवणें, शाळेच्या बाहेर ढुंकूनहि न पाहणे हा तेथील शिक्षकाचा स्वभावच झाला असल्यास आश्चर्य नाही. आतां मात्र सर्वच ठिकाणी ही स्थिति पालटूं लागली आहे. वस्तादाच्या कामात भाग घेतां घेताच शागीर्द जसा सर्व विद्या ग्रहण करतो त्याचप्रमाणे समाजसेवा करीत करीतच समाजसेवेचे आणि समाजव्यवस्थेचे, समाजरचनेचे आणि समाज-शासनाचे शास्त्र शिकणे ही खरी पद्धति आहे.

शिक्षकानी पदोपदी विद्यार्थ्यांचे न्यायाधीश बनण्यापेक्षां त्यांच्यापैकीच जबाबदार व्यक्तींना ते काम सोपून दिले असता शिक्षकाच्या मागचा त्रास कमी होतो, त्यांची प्रतिष्ठा राहते, विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनावडीप्रमाणें न्याय मिळतो; आणि पुढारीपणाला लागणारे सामाजिक सद्गुण आणि त्यांपासून येणारी कर्तबगारी हीं अनायासें लाधतात, याचा पुरावा मात्र या कादंबरीत चांगल्या रीतीनें दिलेला आहे. लोकप्रिय होण्यासाठीं समुदायाच्या छंदाने वागण्याचा एक मार्ग आणि आब्रू संभाळण्यासाठी झटून समुदायाला योग्य वळण लावण्याची हिमृत बाळगणे हा दुसरा पंथ. या दोन• निष्ठांचे गुणदोष अगदी सहजपणे दाखवून लेखकाने शालेय जगतावर मोठाच उपकार केला आहे.

चहाडखोरीची चीड हा तेथील समाजाचा एक उत्कृष्ट गुण आहे. प्रस्तुत रूपांतरांत तो तसाच राखला गेल्याने आपल्या येथेंहि त्या वृत्तीचे महत्त्व वाढेल हा एक लाभ आहे. काही काही वाचकांना प्रस्तुत गोष्टींत चहाडखोरीला लाजण्याची किंवा भिण्याची वृत्ति अतिरेकाला पोहोचविलेली आहे असें वाटेल;

पण या अतिरेकाने देखील पौरुष वाढते, मर्दानगी खुलून निघते, हें त्यांच्या ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं.

लोकप्रीतीची आवड आणि आब्रूची चाड या दोन्ही गोष्टी एकाच वस्तूची उलटी सुलटीं दोन अंगे आहेत हे समजले तर विद्यार्थ्यांना प्रथमपासून स्वतःचा जीवनक्रम ठरविण्यास बरेच सोपे जाईल. त्याचप्रमाणे साहस दोन प्रकारचे असते— आर्य आणि अनार्य—हेंहि विद्यार्थ्यांना प्रथमपासून समजलेलें बरें. अनार्य साहसाची सर्वत्र निंदा होते आणि अंतीं लज्जा आणि फजिती हींच पदरीं येतात. आर्य साहसानें वाहवा होते, शक्ति वाढते, श्रेष्ठ व्यक्तींची मैत्री जडते, आणि जीवन सुवासिक होते, हेंहि दाखविण्यास ग्रंथकार चुकला नाही. आब्रूची चाड असली म्हणजे त्यातूनच स्वाभिमान व संस्थाभिमान हे गुण उत्पन्न होतात. पण मूळ आब्रूची चाड ही कौटुंबिक प्रेमांतूनच उत्पन्न होत असते, हे सूक्ष्म निरीक्षणहि आपल्या ग्रंथकाराने केलेलें आहे. कौटुंबिक प्रेमाच्या ऐवजी कौटुंबिक अभिमान व ताठा येवढेच उरले म्हणजे जहागिरदारी आढ्यता हा दुर्गुण बळावतो व तो किती हास्यास्पद असतो याचीही विद्यार्थ्यांना समजेल अशी थोडीशी चुणुक येथें दाखविलेली आहे.

जगामध्ये एखादा सोपा उपाय सापडला म्हणजे तो कितीका हीन असेना, सर्व त्याच्याच मागे लागतात. लोभ आणि भीति हे दोष यच्चयावत् मनुष्यांत असतात व सामान्य मनुष्य या दोन दोषाना बळी पडला नाही असें क्वचितच घडते. यामुळे प्रत्येकाला वाटते की, अशा गोष्टींचा फायदा घेऊन आपले काम थोडक्यात करता येईल. लहान विद्यार्थ्यांना व्याकरणाचे नियम समजत नाहीत ? समजावून देण्याचे श्रम कोण करतो ! चमकावा छडी म्हणजे मुलांना आपोआप सर्व समजूं लागते. शिक्षकाचा वर्ग विद्यार्थ्यांना कंटाळवाणा वाटतो ? त्याला कोणतीच गोष्ट आकर्षक करतां येत नाही? मुले थकून जातात? जांभया देऊं लागतात? त्यालाहि उपाय आहे. मुलांच्या लुसलुशीत मांड्यांवर जोराने चिमटे घ्या म्हणजे आपोआप मुले ध्यान देऊं लागतात. हा उपाय केवळ शिक्षकांनाच आवडला आहे असेंहि नाही; धर्मशास्त्रें भीतीची आणि लोभाची कितीहि निंदा करीत असलीं तरी याच दोन वल्लींचा धर्माचार्यांनी देखील उपयोग केला आहे. एखाद्या दुर्दैवी प्राण्याचा ईश्वरावर विश्वास बसत

नाही ? त्याला खाबाला बांधून जाळून टाका. बहुतकरून नुसत्या धमकीनेच त्याचा ईश्वरावर विश्वास बसेल, निदान इतर लोक तरी गर्भगळित होऊन ईश्वराचे गोडवे गाऊं लागतीलच. आणि असले आसुरी उपाय वापरावयाचे नसतील तर स्वर्गसुखाचा लोभ दाखवा म्हणजे झाले. इहलोकी प्राकृत जनाना ज्या गोष्टी आवडतात त्याचीच सुधारून वाढविलेली आवृत्ति तयार करा म्हणजे स्वर्ग बनला. येथे भोगविलासाने रोग होतात, म्हातारपण येते, तेवढे काढून टाका म्हणजे स्वर्गातील देवाच्या स्थितीची कल्पना येईल. अमृत नावाचे पेय यथेच्छ प्यावें, आणि अनिमिष लोचनानी अप्सराचे नृत्य पाहावे, अखंड संगीत ऐकावे याचे नाव स्वर्ग. या स्वर्गाचा लोभ दाखवून इहलोकी लोकाना सदाचरणाला प्रवृत्त करण्याची शक्कल पुराणकारानी लढविली. राज्यकर्त्यानाहि तोच लोभ सुटला. लोकाना कारावासात पाठवून तेथे भाजीभाकरी वर चक्की चालविण्याचे काम सोपविले अथवा गरगरीत दंड केला म्हणजे राजभक्ति आपोआप उगवते असे त्याना वाटूं लागले. एवंच जगातील सगळेच व्यवहार भीति आणि लालूच याच्या पायावर उभे केले गेले. सत्याची—सत्यनारायणाची उपासनादेखील याच पायावर थाटली गेली.

जगाची सर्व राहाटीच जर अशी तर प्रस्तुत कथानकात जनार्दन—बाळू इत्यादींच्या कंपूनी आपले दुष्ट हेतु पार पाडण्यासाठी त्याच मार्गाचा अवलंब केला असल्यास आश्चर्य कोणते ? पाठकशास्त्र्याचे आर्या-लेखन, श्रीकात आणि प्रभाकरांनी कायद्याच्या नावानें अथवा संस्थेच्या नावासाठी वापरलेल्या छड्या, आणि अन्यायीच्या दुकानातून चोरून माल आणून द्यावा म्हणून विद्यार्थ्याच्या चांडाळचौकडीने अरविंद किंवा मधू अथवा सतीश याना दाखविलेला धाकदपटशा आणि त्याचे केलेले अनन्वित छळ हे सर्व तत्त्वतः एकच प्रकारचे उपाय आहेत. तरीहि सामाजिक हिताच्या दृष्टीने व्यवहारात त्याच्यामध्ये फरक मानला जातो. तो फरक जमेस धरूनच ग्रंथकाराने भीतीची मीमांसा केली आहे. मूक जनावरावर होत असलेला छळ युगानुयुगे चालून देखील त्याचा जसा इलाज होत नाही, घरोघरीं सासूकडून आणि नवऱ्याकडून होणारी टोचणी सहन करून दिवस कंठणा-या सुनांची दाद अजून लागली नाही, त्याचप्रमाणे

सर्व जगात लहान मुलाची जी कुचंबणा होत असते तिचा इलाज कोणालाहि सुचला नाही. मोहनने जे सहन केले तेच मधूला सहन करावे लागते, आणि सतीशवर जो प्रसंग येतो तोच अरविंदावरहि येतो. सर्व जगभर असे चालू आहे. हा केवढा भयानक अत्याचार आहे याचा प्रत्येकाला अनुभव असूनहि कोणाला त्याचा उपाय सुचत नाही आणि तरीहि आपण मानतो की मनुष्यप्राणी सुधारलेला आहे.

आईबापानी प्रथमपासून निश्चय करून घरातून भीतीचे वातावरण काढून टाकलें पाहिजे आणि दुसऱ्या बाजूनें मुलाना सर्वप्रकारचे कष्ट सहन करण्याची आणि धाडसाची कामे हौसेने करण्याची संवय लावली पाहिजे. माराने मनुष्य मऊ येतो हा पहिला दोष होय. यामुळे पुढे मार खाणे हे लाजिरवाणे आहे असे वाटूं लागते व पुढे पुढे माराच्या भयाने व माराच्या लाजेने मार टाळण्यासाठी मनुष्य कोणतेंहि लाजिरवाणे व भीषण कृत्य करावयास तयार होतो अशी विचित्र गोष्ट आहे. अरविंदासारखा मुलगा जीव मुठीत धरून अन्यायीच्या दुकानी जातो म्हणजे एक भय टाळण्यासाठी दुसरें भय स्वीकारतो. या गोष्टीचा प्रत्येकाने खोलवर विचार केला पाहिजे.

मुलाना लहानपणापासूनच जर काटकपणा शिकवला असला आणि कसल्याहि माराला किंवा धमकावणीला दाद द्यावयाची नाही असा कणखरपणा आणि तेजस्वीपणा त्याच्यांत बिंबवला असला तर भीतीची काहीच मात्रा चालणार नाही. आपल्याविरुद्ध सर्व जग उलटले तरीहि आपल्या धर्मबुद्धीला जे अयोग्य वाटते ते आपल्याकडून करवून घेण्याची प्राज्ञा कोणाचीहि नाही असा विश्वास बाळपणापासूनच तरुणात उत्पन्न केला पाहिजे. खरेपणाचा आग्रह अशा रीतीने हाडीमासी खिळला म्हणजे जगात कसे वागावे हे निराळे शिकवावयास नको.

पण अशी शक्ति येण्यास व्यक्तीमध्ये सत्यनिष्ठा, न्यायनिष्ठा, धर्मनिष्ठा आणि मुळात आत्मनिष्ठा असावी लागते.

ही झाली एक बाजू. दुसऱ्या बाजूने प्रेम आणि सहानुभूति हीहि प्रथमपासून बाळगिली पाहिजे. हे सद्गुण मनुष्यांत उपजतच असले पाहिजेत हे जरी खरे असले तरी लहानपणच्या शिक्षणानें त्याची बरीच वाढ करणें शक्य आहे.

शांतारामासारख्या उथळ शिक्षकालाहि सहानुभूतिच्या जोरावर विद्यार्थ्यांचीं हृदये आपलीशी करतां येतात आणि पाठकशास्त्र्यांसारखे न्यायनिष्ठुर शिक्षकहि क्षमेचा थोडासा प्रयोग करताच विद्यार्थ्यांच्या प्रेमादरास पात्र होतात. येवढें पाहून तरी शिक्षकांनी व शिक्षणशास्त्र्यांनी लोभ आणि भीति याची कास सोडून प्रेम आणि सहानुभूति यांचा आश्रय केला पाहिजे. शिक्षकाच्या लहरी, त्यांचा गैरसमज, त्यांचा चिडखोर स्वभाव अथवा भोळसर वृत्ति या सर्व गोष्टी ज्या क्षमावृत्तीने विद्यार्थी सहन करतात त्याची लाज बाळगून तरी शिक्षकांनीं विद्यार्थ्यांशी प्रेमाने वागले पाहिजे. उच्च सद्गुणांचे शिक्षण देण्याची जबाबदारी स्वीकारून शिक्षणात प्रेम व सहानुभूतीच्या ऐवजी लोभ, भीति, ईर्ष्या, हेवा, चढाओढ इत्यादि हीन गुणाचा उपयोग आपण करतों याला काय म्हणावे ? अध्यापन हा धंदा नसून हे एक व्रत आहे. पवित्रपणे त्याचे पालन झाले पाहिजे. कोणत्याहि हेतूने असो, ज्याने मारावयास सुरुवात केली त्याने आपल्या आपण या व्रतास बट्टा लावला हें ओळखले पाहिजे. प्रस्तुत कादंबरीत शिक्षणशास्त्राच्या या उच्च शोधापर्यंत लेखकाची मजल गेली नाही. शिक्षकाच्या हातीं शारीरिक शिक्षा करण्याची सत्ता ठेविली नसली तरी आचार्य रत्नाकरांकडून केव्हांहि चौदाव्या रत्नाचा प्रसाद मिळूं शकतो ही जाणीवच सर्व शिक्षणाला कलुषित करूं शकते हे येथे पाहिलेले नाही.

पण ही सर्व वरच्या कोटीची टीका झाली. या टीकेमुळे पुस्तकाची किमत कमी होत नाहीं, ती तशी कमी करण्याचा उद्देशहि नाही.

सर्व प्राण्यांमध्ये मनुष्य प्राणीच सविशेष स्खलनशील आहे व त्यामुळेच दोष, गुन्हे व पाप यांची मीमांसा त्याला नेहमी करावी लागते. दोष करणे आणि त्याचे परिमार्जन करीत बसणे हा एक जीवनाचा मुख्य व्यवसायच होऊन बसला आहे. पापाचें क्षालन कसे करावे हा एक फार महत्त्वाचा प्रश्न मनुष्यापुढे अनादि कालापासून उभा आहे. सर्व धर्मांनी आणि सर्व राज्यतंत्रांनी शिक्षेचे, दंडाचे अनेक प्रकार अजमावून पाहिले व आजहि तोच मार्ग चालू आहे. पण प्रत्येक धर्मात दुसरा एक महत्त्वाचा उपाय सांगितलेला असतो, तो म्हणजे स्वतःचा आतरिक पश्चात्ताप आणि समाजाकडून केली जाणारी क्षमा. आपल्या येथे स्मृतींमधून स्वतःचे पाप उघडपणे समाजांत कबूल करणे हा एक

क्षालनाचा महत्त्वाचा मार्ग दाखविला आहे. पश्चात्ताप खरा असेल तर तो उघडपणे व्यक्त झालाच पाहिजे. गौप्याच्या वातावरणांतच पाप वाढूं शकतें हे आपल्या स्मृतिकारांनी व धर्मकारांनी फार पूर्वी पाहून ठेविलें आहे. क्षमेचें बळहि अमर्याद आहे, असे व्यासासारख्या महामुनींनी सांगून ठेविले आहे. अहिल्येचे सर्व आख्यान याच तत्त्वावर उभारलेलें आहे. पण सामान्य साहित्यात पश्चात्ताप, क्षमा वगैरेंचे प्रसंग फारसे आणले जात नाहींत. ख्रिस्ती लोकांनीं धर्मोपदेश करतां करता या गोष्टीचे महत्त्व ओळखल्यामुळे साहित्यामध्यें त्याचा बराच उपयोग केला आहे. व्हिक्टर ह्यूगोची 'पतित' ही कादंबरी एका बिशप्च्या एका महान् क्षमेच्या मंगल आचरणावरच उभारलेली आहे. पश्चात्ताप व क्षमा याना ख्रिस्ती धर्मातच पुरे पुरे स्थान मिळालेलें आहे, असें ते लोक मोठ्या अभिमानाने मानीत असतात. खऱ्या ख्रिस्ती लोकांपुरती ही गोष्ट अक्षरश: खरी आहे. इतर धर्मांशी तुलना करण्याचें सोडून दिलें तर त्याचा हा अभिमान सकारण आहे असें कबूल केले पाहिजे. आपल्या गोष्टीत दुर्वासाचा अवतार दिसणारे पाठकशास्त्री त्यांचें कधींहि भरून न येणारे नुकसान झाल्या-बरोबर स्वत:चा व गुन्हेगाराचा दोघाचा उद्धार क्षमेनेच होऊं शकेल हें चटदिशी ओळखतात. हा प्रसंग मोठा बहारीचा आहे व येथूनच संविधानकाला नवे वळण लागते.

पश्चात्तापाचे सामर्थ्य असेच मोठे आहे. पण स्वत: पश्चात्तापच बहुतकरून दुबळा असतो. नागेश व विष्णु हीं दोनहि पात्रे मधूनमधून दुबळ्या पश्चा-त्तापाचे प्रतिनिधी होतात. नागेश हाडाचा चांगला म्हणून त्याचा पश्चात्ताप दुबळा असूनहि दीर्घजीवी झाला. पुन:पुन: तो डोके वर करीत असे व सरतेशेवटी सगळ्याच बाजूंनी घेरले गेल्यामुळे त्याला मनाची अढी आणि कोता स्वभाव सोडून द्यावा लागला. अनुतप्त हृदयावर क्षमेचे किंवा उदारतेचें पुट चढले म्हणजे एकाएकी हृदयपरिवर्तन होऊं लागते आणि ते हृदयपरिवर्तन परिपक्व झालें म्हणजे त्यालाच द्विजत्व म्हणतात. संस्कार म्हणून, आदर्शाची आठवण म्हणून, आपण केव्हांहि उपनयन करावें; पण खरे उपनयन पश्चात्ताप व क्षमा या मातापित्यांच्या पोटीच जन्म घेतें.

मरण आणि मरणाची भीति या दोन गोष्टी अगदीं भिन्न आहेत. मरण कोणाला टाळतां येत नाहीं हे खरे. पण मरणाची भीति टाळणें हे कांहीं

अशक्य नाही. प्रथमपासून जर ईश्वरनिष्ठा आणि कर्तव्यनिष्ठा बाणली असली तर मरणाचे भय टाळणे हे कठीणहि नाही. खरे पाहू गेले तर मरण हे जीवनाची परिपूर्ति आहे, मोठा विसावा आहे. दुसऱ्या बाजूनें पाहता मरण हे दीक्षा गुरूच्यास्थानी आहे. जीवनभर ज्या गोष्टी अंगवळणी पाडता येत नाहीत, ज्या गोष्टीचा साक्षात्कार होत नाही त्या गोष्टी, मरण दत्त म्हणून उभे राहिले असता एका क्षणात आपल्याशा होतात. खरोखर मरणाची घटका म्हणजे जीवनाच्या सर्व घटकाचा अर्क आहे असे म्हणता येईल. मरणाची जर सोय नसती तर जीवन कंटाळवाणा भार झाले असते. येवढेच नव्हे, तर तो एक पोरखेळच होऊन बसला असता. स्वर्गातील देवाचे जीवन आपण पुराणात वाचतो तसे तितके विलासी आणि तुच्छ व सारशून्य होण्याचे कारण देव अमर आहेत हेच होय. जीवनाने मनुष्याला अनंत वेळा निराश केले असेल. मरणाविषयी खात्रीने म्हणता येईल की, "येथे नाही झाली कोणाची निराश। आल्या याचकास कृपेविशी ॥" मरणाविषयी नुसता बाऊ माजवून मनुष्यप्राणी जीवनातील उत्तमातील उत्तम लज्जत घालवून बसला आहे. मृत्यु म्हणजे शूरांचा महोत्सव, विरक्ताचे खेळणे, व्यक्ताचा अंतिम आश्रय, आणि जीवनाचें पारणे. याच्या सन्मुख उभे राहिलें असतां मनुष्याला आपले क्षणिकत्व व आपले ऐश्वर्य दोहोंचा एकाच क्षणी साक्षात्कार होतो; आणि म्हणूनच कोणत्याहि प्रकारचा पक्षपात न बाळगता ईश्वराने मरण हें सर्वांना आंदण देऊन ठेवले आहे. लहान अर्भकेहि मरतात आणि वाळून खारीक झालेले वृद्ध तपस्वीहि मरतात. पारिजातकाच्या हाराहून नाजूक अशा ललनाहि मरतात आणि "तोफे आधी मरे न बाजी कळवा मृत्यूला" अशा निकराने लढणारे स्वातंत्र्यवीरहि मरतात. मृत्यूनेच जीवन कृतार्थ झाले आहे.

आपल्या साहित्यांत आणि विशेषतः नाटकात मृत्यूचा प्रसंग आणूं नये अशी जुनी शिफारस आहे. केवळ मनोरंजन हा जर साहित्याचा विषय असेल तर ही शिफारस बरोबरहि आहे. सर्व वृत्ति उचंबळल्या, भावनांचा उद्रेक झाला, हृदयाच्या सर्वच तारा झणत्कार करूं लागल्या, म्हणजे मनोरंजन जागच्या जागी राहतें आणि दृष्टीसमोर पारमार्थिकता उभी राहते. साहित्याचा

हेतु जर मनोरंजनाहून कांही उच्च असेल, जीवनाचा साक्षात्कार करणे, जीवनाचे रहस्य उलगडणे, जीवनाला आरपार पाहणे हे जर साहित्याच्या द्वारा साधावयाचे असेल तर साहित्यामध्ये मृत्यूच्या प्रसंगाला गौरवाचे, किंबहुना कळसाचे स्थान असले पाहिजे. ऐहिक जीवन हे सनातन जीवनाचा पूर्वरंग आहे, मरणोत्तर जीवन हाच खरा उत्तर रंग आहे, ही गोष्ट जर कबूल असेल तर ह्या उभय रंगाचा संधिकाळ जो मरणाचा क्षण त्याचा साहित्याने अधिकाधिक उपयोग केला पाहिजे.

प्रस्तुत पुस्तकात मरणाचे दर्शन मोठ्या खुबीनें दोनतीन वेळा करविलेले आहे. घोकीव जीवनाचे पर्यवसान कसें होते याचे करुण चित्र आपल्याला प्रथम पाहावयास मिळते. दुःखिनी मातेची अखंड उपेक्षा करणाऱ्या मुलाला तिच्या मृत्यूचा एकाएकीं समाचार कळताच त्याची कशी असह्य कालवाकालव होते याचे चित्र लेखकाने अथवा अनुवादकाने आपल्यापुढे हुबेहूब रेखाटले आहे. काळ्या कड्यावर मरणाचे दर्शन न होता केवळ संकटाचेच होतें. पूर्वी ह्या कड्यावरून पडून मेलेल्या धनगराचे स्मरण मृत्यूशी आपली रुजुवात करून केवळ संकटालाच भीषण बनविते. पण मरणाच्या कल्पनेने दिङ्मूढ झालेल्या नागेशला वाचविण्यासाठी मधू-मोहनची जोडी एका जीर्ण नावेच्या साहाय्याने प्रयत्न करीत असता जीवनाचा एकमात्र आधार—मोडके वल्हे—तुटून गेल्यानंतर जी घटना लेखकाने घडवून आणली आहे तेथें एक ग्रंथ आटोपून दुसरा एक दिव्य ग्रंथ त्याने एकाएकी उघडून दाखविला आहे. मृत्यूच्या संनिध तीन महत्त्वाच्या जीवनांतील बाल्यकाळाचें विसर्जन झालें आहे आणि यापुढें प्रसन्न, गंभीर, धीरोदात्त आणि जबाबदार अशा जीवनास सुरुवात झाली आहे. एवढे महत्त्वाचे वर ज्याच्या केवळ दर्शनप्रसादांत भरलेले आहेत त्या मृत्युदेवतेला भक्तिभावानें कोण नमस्कार करणार नाही ?

**दत्तात्रेय बालकृष्ण कालेलकर.**

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| कादंबरीकाराची भूमिका ... ... ... ... | ५–१६ |
| वातावरण ... ... ... ... ... | १७–३३ |
| प्रकरण १ ले–पुष्करवाडी ... ... ... | १–५ |
| ,, २ रे–व्यासविद्याश्रम ... ... ... | ६–९ |
| ,, ३ रे–नवी ओळख ... ... ... | १०–१८ |
| ,, ४ थे–शत्रु आणि मित्र ... ... ... | १९–२८ |
| ,, ५ वें–शालेय जीवनाचा पहिला दिवस ... ... | २८–४० |
| ,, ६ वें–सैतानाचा संचार ... ... ... | ४०–४८ |
| ,, ७ वें–सुडाची लहर ... ... ... | ४८–५५ |
| ,, ८ वें–जळलेला लेख ... ... ... | ५६–६२ |
| ,, ९ वें–पश्चात्ताप ... ... ... | ६३–७१ |
| ,, १० वें–यशोमंदिराची चढण ... ... ... | ७२–८६ |
| ,, ११ वें– सुखाचे दिवस ... ... ... | ८७–९३ |
| ,, १२ वे– ऋषिऋण ... ... ... | ९४–१०० |
| ,, १३ वे– सप्तशृंगी ... ... .. | १०१–१०९ |
| ,, १४ वें–काळा कडा ... ... ... | ११०–१२० |
| ,, १५ वें–ऋषि-ऋणाची फेड ... ... ... | १२१–१२६ |
| ,, १६ वें–पद्मनाभ ... ... ... | १२७–१३३ |
| ,, १७ वें–हुतात्मा ... ... ... | १३४–१३८ |
| ,, १८ वें–कानगांव ... ... ... | १३९–१४७ |

प्रकरण १९ वे–समानशील मित्र ... ... ... १४८–१५८
,, २० वे–मित्राचा अबोला ... ... ... १५९–१६३
,, २१ वे–बिचारा अरविंद ! ... ... ... १६४–१७०
,, २२ वे–नरपशूंची करामत ... ... ... १७१–१७७
,, २३ वे–विद्यार्थ्यांचे स्वराज्य–बंडाचे निशाण... ... १७८–१९१
,, २४ वे–विद्यार्थ्यांचे स्वराज्य–पहिली चकमक ... १९२–२०२
,, २५ वें–दोन वर्षांनंतर. . ... ... ... २०३–२११
,, २६ वे–निर्नायक राष्ट्र... ... ... ... २१२–२१८
,, २७ वे–ऐरणीवरचा हिरा ... ... ... २१९–२३९
,, २८ वे–विद्यार्थ्यांचे स्वराज्य–बंडखोराची चढाई ... २४०–२४८
,, २९ वे–विद्यार्थ्यांचे स्वराज्य–यशाची माधुरी ... २४९–२६१
,, ३० वे–घडा भरला ... ... ... ... २६२–२७६
,, ३१ वें–अखेरचा आघात ... ... ... २७७–२८४
,, ३२ वे–मृत्यूच्या दारां ... ... ... २८५–२९५
,, ३३ वे–महापुरात ... ... ... ... २९६–३०१
,, ३४ वें–पुनर्जन्म ... ... ... ... ३०२–३०४

# प्रकरण पहिलें

## पुष्करवाडी

जो होउनी अनिल हें फुलवील फूल।
सारील दूर शशिचें घन मेघजाल।
कीं अंकुरास जल जो पुरवील माळी।
तो धन्य यत्करगता शिशुबुद्धि झाली॥

—रे. टिळक

"मोहन, संभाळून रहा. अचपळपणा करूं नको, पत्र पाठीव." आपल्या डोळ्यांत हट्टानें येऊं पाहणाऱ्या अश्रूंना आवरण्याचा निष्फळ प्रयत्न करीत आईनें मोहनच्या पाठीवरून प्रेमानें हात फिरविला. "दादा, नमत्काल, पत्ल पाठीव," आईच्या कडेवर असलेल्या धाकट्या बाळनेंहि आपले कोवळे हात जोडून दादाला निरोप दिला. मोहननें आपल्या आईला पुनः एकदां नमस्कार केला, आणि भावंडांचा निरोप घेऊन तो दाराशीं उभ्या असलेल्या टांग्यांत जाऊन बसला. नानासाहेब अगोदरच टांग्यांत जाऊन बसले होते. मोहन आल्याबरोबर त्यांनीं टांगेवाल्याला इशारत दिली, आणि स्टेशनच्या रस्त्यानें टांगा चालूं लागला.

कितीतरी प्रसंग अप्रिय असले तरी अपरिहार्य असतात; आणि घरोघरीं त्यांची पुनरावृत्ति होतच असते. नानासाहेबांचा मोहन व्यासविद्याश्रमांत दाखल होण्याकरितां आज प्रथमच पुष्करवाडीहून निघाला होता. आपल्या गावीं शिक्षणाची सोय नसल्यामुळे विद्याभ्यासाकरितां मुंबई-पुण्यासारख्या ठिकाणीं शाळेच्या वसतिगृहांत जाऊन राहण्याचा प्रसंग ज्यांना आला असेल त्या सर्वांना प्रेमळ आईबापांचा वियोग प्रथम घडवून आणणाऱ्या ह्या प्रसंगाची विस्मृति होणे शक्य नाहीं. नानासाहेब आणि मोहन यांच्या मनांत या वेळीं कोणते विचार येत असतील, कोणत्या भावना उचंबळून आल्या असतील, याची कल्पना त्या स्थितीचा अनुभव घेतलेल्यांना सहज करिता येईल. टांगेवाल्याची इशारत मिळतांच टांगा निघाला, बागेचें फाटक ओलांडून सडकेला

लागला व स्टेशनच्या रोखानें धावूं लागला. प्रेमळ आईबापांच्या छत्राखालीं आनंदानें बागडणाऱ्या मोहनला अपरिचित उच्छृंखल वृत्तीच्या तरुणांच्या धकाधकीच्या जगांत प्रवेश करून देण्यास आपण घेऊन जात आहोंत याची त्या बिचाऱ्या घोड्याला काय कल्पना!

सह्याद्रीच्या खोऱ्यांत उंचउंच डोंगरांच्या दोन रांगांमधील खिडींत लहानशाच पण रम्य अशा ‘ पुष्कर ’ तलावाच्या कांठीं वसलेली एक लहानशी वाडी, ‘ पुष्करवाडी ’ म्हणून ओळखली जात होती. डाव्या बाजूला असलेल्या नानाप्रकारच्या रानवेलींनीं आणि लहानमोठ्या झुडुपांनी व्यापलेल्या काळसर निळ्या डोंगराच्या पायथ्याशी असलेलीं ह्या वाडीची मूठभर ठेंगणी घरे एखाद्या प्रचंड राक्षसाच्या पायाशीं लोळणाऱ्या अर्भकाप्रमाणे दिसत. उन्हाळ्यात जवळजवळ कोरडा होणारा पण पावसाळ्यांत स्वतःच्या निनादानें सबंध खिड घुमवून सोडणारा, व जवळच्या लहानमोठ्या वाटोळ्या दगडाना आपल्या प्रवाहांत खेचून नेणारा ओढा उजव्या बाजूला उन्मत्तपणें वाहत होता. पुष्करवाडीपासून थोड्या अंतरावर ह्याच ओढयाचा प्रवाह एका लहानशा दरडीवरून खालीं उडी घेत असल्यानें होणारा छोटासा गिरसप्पा वाडींतल्या लहान मुलाचे एक आवडते स्थान होऊन बसला होता. थोडे खाली सपाट जमिनीवर वाहूं लागल्याने ह्या ओढयाचे पात्र बरेच रुंद झाले होतें, व त्याची गतिहि मंद झाली होती, आणि तेथेंच तो पुष्कर तलावांत जाऊन मिळाला होता. दोन्हींकडील उंच डोंगरांचें त्या तलावांत एकत्र पडलेले सुंदर प्रतिबिंब, सूर्याच्या उन्हांत चांदीच्या पत्र्याप्रमाणे चमकणारा त्याचा पृष्ठभाग, आणि तलावाच्या कांठच्या पठारावर असलेलीं टुमदार घरे हें सर्व दृश्य पर्वताच्या काळ्या-निळ्या पार्श्वभूमीवर फारच खुलून दिसत असे.

ह्या घरांपैकीच एका घरांत–तळ्याच्या अगदी कांठाजवळ असलेल्या हिरव्या रंगाच्या बंगलीत–आपल्या कथानायकाचा बालपणींचा सुखाचा काळ गेला होता. नानासाहेब देशमुखांना वतनवाडीचें उत्पन्न मुबलक येत असल्यानें कुटुंबपोषणाकरितां निराळे श्रम करण्याची आवश्यकता नव्हती. स्वतःच्या विद्याव्यासंगी व कलाप्रिय स्वभावाला पोषक असें स्थान त्यांना पुष्करवाडींत लाभलें होतें; व तेथें मुलांच्या शिक्षणास व स्वतःच्या विकासास भरपूर अवसर देत ते आपला काळ घालवीत असत.

नानासाहेबांचा थोरला मुलगा मोहन, हा आपल्या नावाप्रमाणेच मोहक, गुटगुटीत आणि आनंदी मुलगा होता. मोहनचें सर्व शिक्षण नानासाहेबाच्या खास देखरेखीखालींच चालत होतें; त्यामुळें त्याला तेरावे वर्ष संपत आलें होते, तरीहि शाळेच्या ठराविक सांच्याच्या पुस्तकी शिक्षणांत त्याची प्रगति बेताचीच झाली होती. त्याच्या वयाची इतर मुले पुस्तकांतील पाठ केलेल्या ज्ञानाचे व माहितीचें ज्या चलाखीनें प्रदर्शन करीत ती चलाखी मोहनच्या ठिकाणीं मुळींच दिसून येत नव्हती. पण जगांत यश संपादन करण्याकरिता आवश्यक व प्रगतीला पोषक असलेले सद्गुण, कुतूहलपूर्ण जिज्ञासा व ज्ञानलालसा या बाबतीत तो कोणालाहि हार जाणारा नव्हता.—पण हें सर्व आतांच कशाला? नानासाहेबांच्या शिक्षणविषयक कल्पना आणि मोहनला व त्याच्या भावंडांना त्यांनी दिलेले शिक्षण याविषयीं अगोदरपासूनच वाचकांचा अनुकूल वा प्रतिकूल ग्रह उत्पन्न करण्याचा माझा हेतु नाही. त्याच्या शिक्षणपद्धतीची माहिती देणे इतकेंच माझे काम. पुढील पृष्ठांत रेखाटलेले मोहनचे जीवन-चरित्र पाहून त्या पद्धताच्या यशापयशाची चर्चा करण्याचें काम वाचकाचे.

आपल्या मुलाना पद्धतशीर रीतीने शिक्षण देण्यास नानासाहेब फार उशीरा सुरुवात करीत. दहा-बारा वर्षाचीं होईपर्यंत त्यांच्या मुलांनी जे ज्ञान संपादन केलेले असे ते बहुतेक सर्व आपोआप नैसर्गिक विकासानुरोधान झालेलें व कोणत्याहि प्रकारच्या मुद्दाम केलेल्या परिश्रमावाचून प्राप्त झालेले असे. निसर्गाच्या रमणीय सौंदर्यात विहार करताना सृष्टिमातेच्या कोमल नेतृत्वाखालीच त्याचें सर्व शिक्षण चालत असे. नाना प्रकारच्या निमित्तांनीं नानासाहेब त्यांना नेहमीं आसपासच्या डोंगरावर फिरावयास नेत. केव्हां डोंगरावरील करवंदीच्या जाळ्यांतील करवंदें खाण्याकरितां, केव्हां सुंदर पारिजातकाची फुलें आणण्याकरिता, केव्हां डोंगरभर हिंडून एखाद्या धबधब्याच्या काठीं वनभोजनाकरिता अत्यंत रमणीय स्थान हुडकून काढण्याकरितां त्यांच्या अनेक सफरी होत. कधी कधी डोंगराच्या उंच शिखरांवरील पठारावर जाऊन तेथे वाहणारा सोसाट्याचा वारा आणि तेथून दिसणारें विस्तीर्ण प्रदेशाचे सृष्टिसौंदर्य यांचा उपभोग घेत ही लहान चमू बसत असे. उंच शिखरांवरून पलीकडच्या डोंगरावरील ढगांचा व विजांचा चमत्कार पाहत किंवा सूर्यास्तानंतरचे पश्चिम क्षितिजा-

वरील चित्रविचित्र रंगांचे गालिचे अवलोकन करीत त्यांचा वेळ केव्हाच निघून जाई. अशा सर्व प्रवासांच्या वेळी कोणत्याहि प्रकारे शिकविण्याचा आव न आणतां त्यांचे आईवडील त्याना वनस्पतींविषयीं, व भोंवतालच्या प्रदेशाविषयीं जरूर ते ज्ञान देत, त्यांची जिज्ञासा जागृत करीत, चित्रविचित्र वनस्पतींच्या फुलापानांचे व फळांचे छोटेसे पण व्यवस्थित संग्रह करण्यास त्यांना उत्तेजन देत किंवा त्यांतील कांहीं वन्य फुलझाडे स्वतःच्या बागेंत लावून पाहण्यास त्यांना प्रोत्साहन देत. अशा रीतीने कितीतरी शास्त्रीय ज्ञान त्यांना सुलभतेनें झालें होते. एखाद्या रम्य रम्य अशा संध्यासमयीं बंगलीपुढच्या बागेत हे छोटें कुटुंब बसे, आणि आकाशांतील तारे व नक्षत्रे यांच्या गोष्टी चालत. गुरु आणि शुक्र, ध्रुव व सप्तर्षि, मृग आणि पुनर्वसु किंवा व्याध व अगस्ति या आकाशस्थ ज्योतींशीं त्यांचा इतका परिचय झाला होता कीं त्या केवळ दूरच्या आकाशांत चमकणाऱ्या तारका असे त्यांना वाटत नव्हते, तर त्यांच्या बालसृष्टींत त्याना जिवंत व महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होतें.

सर्व भूतमात्रांवर प्रेम करणे व त्यांना ममतेने वागविणे ह्या गोष्टीहि मुलांना सहज व मनोरंजक रीतीने शिकविल्या जात. बागेत मागील दोन पायांवर बसून, शेपटीचा कमानदार तुरा उभारून, पुढील दोन पायांचा हातासारखा उपयोग करून फळे खाणाऱ्या खारीकडे मुलें कौतुकाने पाहत बसत. झाडाच्या फांद्यांवरून बांधलेल्या घरट्यांतून राहणाऱ्या चिमणीला दाणापाणी घालून व अन्य तऱ्हेने तिचा इतका विश्वास ते संपादन करीत कीं, चिऊताईहि त्यांच्याशी परकेपणाने वागत नसे व त्यांना भिऊन उडून जात नसे. पशुपक्ष्यांचें मुलांवरील हें प्रेम पाहून त्यांच्या घरीं आलेल्या पाहुण्यांनासुद्धां अतिशय आश्चर्य वाटे. खोलींत मुले आल्याबरोबर प्रेमाने गाऊं लागणारी मैना, मुलांनीं हांका मारल्याबरोबर शेपट्या उभारून त्यांच्याकडे धांवत येणारी वासरे व त्यांच्या हातांतील दाणे निर्भयपणें टिपून घेणारे मोर पाहून 'यत्र द्रुमा अपि मृगा अपि बंधवो मे' या वचनाची सार्थकता कोणालाहि प्रतीत होऊं शकत असे.

पुष्कर तलाव हें तर मुलांच्या करमणुकीचे फार मोठे साधन होतें. आईच्या अंगावर बागडणाऱ्या मांजरीच्या पिल्लांप्रमाणें निःशंक मनाने त्या तळ्यांत पोहण्याचा त्यांना कधीच कंटाळा येत नसे. केव्हां केव्हां तळ्याच्या कांठीं

झाडाखाली बांधून ठेवलेल्या नावेंत बसून वाचीत किंवा खेळ खेळत त्यांचे तासचे तास निघून जात. हवा अनुकूल असेल त्या वेळी नाव वल्हवून पलीकडचा कांठ ती मुले सहज गांठीत आणि वारा सुटून त्या छोट्याशा तलावांत मोठमोठ्या लाटा येऊं लागल्या असतांनाहि मोठी मुलें नाव घेऊन सहल करण्यास हौसेनें जात असत. पंचमहाभूतांच्या निकट सान्निध्यांत राहणाऱ्या या मुलांच्या शारीरिक व मानसिक निसर्गदत्त शक्तीचा झालेला विकास कल्पनेच्या आटोक्यांत येणारा नव्हता. आकाशांत एखाद्या ठिपक्याप्रमाणे दिसणारा बहिरी-ससाणा ते आपल्या मुंबईकर नातेवाईकांच्या शहरी मुलांना सहज लीलेने दाखवूं शकत किंवा रानांत हिंडत असतांना दूर अंतरावर गात असलेल्या पक्ष्याच्या मधुर पण इतरांना अस्पष्ट असलेल्या आवाजाकडे लोकांचे लक्ष वेधून ते सर्वांना आश्चर्यचकित करून सोडीत.

मुलांच्या शीलाचें संगोपन करणाऱ्या, त्यांना सत्यवादी, निःस्वार्थी, विनयशील व आज्ञाधारक बनविणाऱ्या गृहशिक्षणाचा अभाव असता तर ह्या शिक्षणांत, त्यांच्या नैसर्गिक शक्तीच्या घडून येणाऱ्या या विकासांत त्यांची व्हावी तितकी प्रगति झाली नसती. अशा तऱ्हेचें उत्कृष्ट गृहशिक्षण त्यांना अगदी बालवयांतच मिळाले होतें; आणि ते बालवयांतच देणें शक्य असतें. इच्छा, आकांक्षा आणि इतर मनोविकार तीव्र स्वरूप धारण करून आपल्या भयंकर उन्मादक शक्तीचा परिचय मुलाला करून देण्यापूर्वीच चांगल्या संवयीचे कुंपण घालून ठेवून मुलांचा मार्ग निष्कंटक करून ठेवणें बालवयांतच शक्य असतें.

केवळ काल्पनिक कादंबऱ्यांतून आढळणाऱ्या महाबुद्धिवान् व्यक्तीचे मी हें वर्णन करीत आहे अशी कोणीहि कल्पना करून घेऊं नये. देशभर पसरलेल्या कितीतरी सुसंस्कृत व सुखी कुटुंबांत अशी हजारो मुले कोणालाहि आढळून येतील. मुलांचे पालक मुलांच्या नैसर्गिक विकासाकडे जास्त विचारपूर्वक लक्ष पुरवितील तर घरोघरीं आनंदाने वागडणारी अशीं हजारों मुलें दिसूं शकतील. आणि सामाजिक व नैतिक ध्येयांचा विकास होत जाऊन समाजांत पावित्र्य व तेजस्विता यांची वाढ जसजशी होत जाईल, उच्चध्येयप्रेरित पण विनयशील मनोवृत्ति, दीर्घदर्शीने सर्व भूतांचे हित पाहण्याची तत्परता इत्यादि सद्गुणाचा विकास ज्या क्रमाने होत जाईल, त्या मानाने अशी किती, किती तरी अधिक मुलें राष्ट्रभर पसरलेली आढळतील.

---

# प्रकरण दुसरें

## व्यासविद्याश्रम

नद्यास्तीरे स्थानं रम्यं
हृद्या वन्या श्रीरालक्ष्या ।
एकान्तस्थः कान्तो देशः
सा क्रीडाभूः सद्विद्यायाः ॥

—वि. गो. विजापूरकर

मुलांच्या सर्व मनोवृत्तीचें पोषण करून त्यांचें जीवन रमणीय करणारें आणि बालपणापासून रम्य सृष्टिसौंदर्याशीं समरस होऊन जाण्याची संधि आणून देणारें असेंच व्यासविद्याश्रमाच्या भोवतालचें सृष्टिसौंदर्य होते यांत शंका नाही. विनीत-वेषानेंच आश्रमाच्या जवळून आपण गेले पाहिजे, या जाणिवेनेंच जणूं काय संथपणें वाहणारी समोरची कृष्णा नदी, सर्व संकटांतून विद्याश्रमाचें संरक्षण करण्याकरितांच जणूं काय उभ्या असलेल्या पाठीराख्या वीराप्रमाणें शोभणारा मागील बाजूचा उंच व अजस्त्र सप्तशृंगीचा डोंगर व आपल्या मधुर सुवासाने सर्व वातावरण सुवासिक करणारी विद्याश्रमाच्या भोवतीं असलेली सुंदर वनराजी यांमुळें विद्याश्रमात प्रवेश करतांच प्राचीन ऋषींच्या आश्रमांची आठवण कोणालाहि झाल्याशिवाय राहतीना. सर्व जगाचे कोडें उलगडूं पाहणाऱ्या मंत्रद्रष्ट्या ऋषींप्रमाणेंच मानवी जीवनांतील महत्त्वाची गूढें उकलून दाखवून त्यांचें शिक्षण विद्यार्थ्यांना देण्याची महत्त्वाकाक्षा बाळगणाऱ्या आचार्य रत्नाकराचा लौकिकांहि कुलपतींच्या प्राचीन परंपरेला साजेसाच होता; आणि रानावनातून मनसोक्त विहार करणाऱ्या हरिणांप्रमाणें स्वैर बागडणारी मनोवृत्ति, व सर्व शक्तींच्या विकासास भरपूर वाव देणाऱ्या तेथील मोकळ्या वातावरणांत अधिकच जोमानें वाढणारी तेजस्विता, यांचा सुंदर मिलाफ तेथील सर्व मुलामध्यें दिसून येत होता.

फाटकासमोर टांगा उभा राहिलेला पाहतांच सख्याबा पट्टेवाला लगबगीनें पुढें झाला. टांग्यांतील सामान भराभर काढून त्याने तें दुसऱ्या गड्याच्या

स्वाधीन केलें आणि आलेल्या पाहुण्यांना—नानासाहेब आणि मोहन यांना—घेऊन तो आचार्यांच्या कचेरीकडे निघाला. बागेंतील रस्त्यावरून एकदोन वळणें घेऊन दोनतीन इमारती ओलांडून गेल्यावर आचार्य रत्नाकर यांची कचेरी आली. नानासाहेब यांनीं मोहनचें नांव व्यासविद्याश्रमांत दाखल केले, आचार्य रत्नाकर यांनीं नेहमींच्या वाक्यांनीं मोहनचें स्वागत केलें, आणि वसतिगृहांतील श्रीपादराव यांच्या विभागांत त्याचे नांव दाखल केल्याचें त्याला कळविलें. नानासाहेब यांस लागलीच परत जावयाचें असल्याने जास्त वेळ बसण्यास सवड नव्हतीच, म्हणून आचार्यांची रजा घेऊन परत जाण्याकरितां ते निघाले व आश्रमाजवळच्या लहानशा टेकडीच्या पायथ्यापर्यंत मोहनहि त्यांना पोहोंचविण्याकरितां गेला.

आजपर्यंत प्रेमानें लालनपालन केलेल्या आपल्या मुलाला विद्याश्रमाच्या भिन्न वातावरणांत सोडून जातांना नानासाहेबाच्या अंतःकरणाला किती दुःख होत असेल याची कल्पना त्या स्थितीतून गेलेल्या आईबापांनाच होऊं शकेल. तेरा वर्षांच्या अवधींत मोहन त्यांना सोडून फार लाब असा कधींच राहिला नव्हता बालपणीचा हा सुखाचा काळ मोहनला जितका आनंददायक वाटला तितकाच तो त्यांनाहि वाटला होता. मुलांचे बालिश विचार व त्यांचा अविचारी उच्छृंखलपणा यांच्याशीं ते समरस होऊन जात असत; आणि मुलांशीं त्यांचें वागणें प्रेमळ पण शिस्तीचें असल्यानें, आपल्या स्वतःच्या अव्यवस्थितपणामुळे जी काळजी आणि निराशा पुष्कळ आईबापांना अनुभवावी लागते ती त्यांच्या वांट्यास कधीच आली नव्हती. मोहनवर त्यांचें मनापासून प्रेम होते. आणि मोहनसारखा मुलगा लाभल्याबद्दल कोणत्याहि पित्याला धन्यता वाटावी असाच मुलगा मोहन होता. कोणाचेंहि लक्ष सहज वेधून घेणारा त्याचा तरतरीत चेहरा, विनयशील व दिलदार वागणूक आणि प्रामाणिक अंतःकरणाची साक्ष पटविणारी निर्भयतेची वृत्ति या गुणांमुळें नानासाहेबांनाच काय, पण पुष्करवाडीतील सर्व लोकांनाहि त्याच्या गुणांबद्दल आपलेपणाचा अभिमान वाटे.

नीतिमत्तेवर उपदेशात्मक व्याख्यान देण्याची ही वेळ नव्हती, आणि अशा वेळीं केलेल्या शुष्क उपदेशाने मुलांच्या मनावर महत्त्वाचा परिणाम

होतो असें नानासाहेबांना वाटतहि नव्हतें. गृहशिक्षणाची उपेक्षा न करता स्वतःच्या शांत व निःस्पृह जीवनाच्या योगानें मुलांच्या पुढं उच्च आदर्श राखण्याचा प्रयत्न प्रथमपासून केला असल्याशिवाय शुष्क उपदेशाचे शब्द वाऱ्यावरच विरून जातात आणि माळरानांत पेरलेल्या धान्याप्रमाणे निष्फळ होतात. नानासाहेब यांनी मोहनला मधूनमधून पत्र पाठविण्यास बजाविले; खर्च फार न करण्याची सूचना केली; आणि खेळाकडे व अभ्यासाकडे अखंड लक्ष ठेवून प्रकृतीस जपण्यासहि सांगितले. सद्वर्तनाच्या उपदेशाचा एकहि शब्द उच्चारण्याची आवश्यकता नव्हती. आपण कसे वागलो असतां आपल्या वडिलांना समाधान होईल आणि आजपर्यंत कोणते ध्येय दृष्टीसमोर ठेवून वडिलांनी आपणांस शिक्षण दिलें याची जाणीव मोहनला पूर्णपणें होती.

टेकडीच्या पायथ्यापाशीं ते किती वेळ बोलत उभे होते हे त्यांच्या लक्षातहि आलें नाही. अखेर मोहनने वडिलांना नमस्कार केला आणि नानासाहेबांनीं त्याच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरवून अर्थपूर्ण नजरेने त्याच्याकडे पाहिले. जणूं काय त्यांच्या मनातील गूढ भावना व्यक्त करण्यास त्याना शब्द अपुरे वाटले.

“आईला माझा नमस्कार सांगा.” डोळ्यांत चमकूं लागलेले अश्रू आवरून धरीत आनंदी मुद्रेनें मोहननें वडिलांचा निरोप घेतला.

टांगा चालूं लागला; टेकडीच्या वळणावरून तो दिसेनासा होईपर्यंत मोहन त्याच्याकडे अनिमिष नजरेनें पाहत होता. अखेर तो परतला, आणि आपल्या आयुष्यांतील एका नवीन जीवनास सुरुवात झाली याची जाणीव त्याच्या दृष्टीपुढें उभी राहिली. प्रेमळ मातापितरें आणि खेडेगांवांतील त्याचे सवंगडी याच्या वियोगाचें दुःख व ह्या नवीन जगांतील दोन-अडीचशें सोबत्यांचा अपरिचितपणा यांची आठवण होऊन त्याच्या डोळ्यांला पाणी आलें असल्यास नवल नाही. पण तो स्वभावतः धीट व मोकळ्या वृत्तीचा असल्यानें आपले दुःख त्यानें आवरलें. आईच्या शिकवणीमुळें ईश्वरावर जडलेली त्याची दृढ निष्ठा जागृत झाली आणि निर्भय अंतःकरणाने पण जड पावलांनीं तो शाळेकडे परतला.

बालकांचे मनोविकार जितके तीव्र असतात तितकेच ते क्षणिकहि असतात, त्याच न्यायाने मोहनचा दुःखावेगहि लवकरच ओसरला. त्याचे डोळे पूर्वीप्रमाणें

तेजस्वी दिसूं लागले आणि भोवतालचे पर्वत व रम्य वनराजी यांचेकडे नव्या आनंदानें तो पाहूं लागला. हिरव्यागार करवंदीच्या जाळ्यांनीं आच्छादिलेली, ढगांना भेदून जाणारी पर्वतांची उंच शिखरें पाहून त्याला पुष्करवाडी-नजीकच्या डोंगरांची व त्या डोंगरावरून केलेल्या सहलींची आठवण झाली, व ह्या डोंगरांच्या भिंतीसारख्या सरळ कड्यावरून चढण्याचा आणि माथ्यावरच्या विस्तीर्ण पठारांवरून आपल्या नव्या सोबत्यांसह भटकण्याचा नवा आनंद तो कल्पनेनें अनुभवूं लागला. मागील बाजूस संथपणे वाहणारी व डोंगराच्या लहानमोठ्या टेकड्यांना नागिणीप्रमाणे वळसे घालणारी कृष्णानदी पाहून तर तो आश्चर्यानें थक्कच होऊन गेला. आतापर्यंत हें मनोहर दृश्य आपल्या लक्षांत कां आलें नाहीं याचाच जणूं काय तो विचार करूं लागला; आणि थोडक्याच वेळांत वाऱ्याच्या मंद लहरींबरोबर नाचणाऱ्या कृष्णेच्या लाटांचें आमंत्रण स्वीकारूनच की काय, लागलीच नदीकडे त्याने आपला मोर्चा फिरविला.

नदीकांठच्या वाळवंटांत गारगोट्या हुडकीत हिंडण्याचा, केवळ बालकाच्या वांट्यासच येणारा आनंद जगाच्या रूक्ष वाळवंटात हिंडण्याला सरावलेल्या इतरेजनांना अल्पांशानेहि समजूं शकत नाहीं; मग लहानपणापासून निसर्गाचे सौंदर्य अनिमिष लोचनांनीं पाहण्यास शिकलेला आणि झाडांझुडपा-तील रम्य शब्दांचें मधुर संगीत ऐकण्यास नादावलेला मोहन कृष्णेच्या कांठीं कोणत्या आनंदाचा उपयोग घेत हिंडला असेल याची कल्पना किती लोकांना येईल ! धाकटा मधु ह्या वाळवंटांतील हिरवे-पिवळे दगड गोळा करण्यास आपल्याबरोबर असता तर काय मजा झाली असती असाहि एक विचार त्याच्या मनांत आल्याशिवाय राहिला नाही. मधूला देण्याकरितां कांहीं रंगीत दगड त्यानेंहि आपल्या खिशांत भरले; कांहीं चपटे दगड घेऊन त्या भाकऱ्या त्यानें नाचणाऱ्या लाटांवर नाचविल्या. शेजारच्या झुडुपांवरील निळीं रानफुलें आपल्या फुलांच्या संग्रहांत सामील करण्याकरितां खुडून घेतलीं ! अशा तऱ्हेच्या बाल-सुलभ करमणुकींत आणखी कितीतरी वेळ त्याने घालविला असता; पण इतक्यांत विद्याश्रमाच्या घंटेचे सहाचे टोले त्याला ऐकूं आले, आणि परत जाऊन तेथील नवीन वातावरणाशीं समरस होण्याचा प्रयत्न आपणांस केला पाहिजे याची त्याला जाणीव झाली.

# प्रकरण तिसरें

# नवी ओळख

फाटकांतून आंत शिरल्याबरोबर डाव्या हाताला लागणाऱ्या इमारतीच्या खालच्या मजल्यावर पहिल्याच दालनांत एका डेस्काशी मोहन कांहींतरी करीत बसला आहे. हे दालन भले विस्तीर्ण असून त्यांत भिंतीला लागून प्रत्येक मुलाचे डेस्क व सामान ठेवण्याचे शेल्फ ठेवलेलें आहे. अभ्यासाची पुस्तकें, कपडे व इतर स्वसंपादित किंवा मालकी वहिवाटीची सर्व चीजवस्त मुलें या आपल्या डेस्कांतून व शेल्फांतून ठेवीत. एकाच दालनांत सर्व विद्यार्थी बसत असल्याने, सहवासांत एकलकोंडेपणा न भासावा, व अभ्यासाचे वेळीं एकमेकांची भरपूर मदत मिळावी या दृष्टीने ही व्यवस्था सोयीची होती हे कोणीहि कबूल करील. ह्या सवलतीचा दुरुपयोग करून सहवासजन्य कुरापती वाढविण्याकडेच याचा उपयोग मुलें करीत तो भाग निराळा! शेजारच्या दालनाचा उपयोग फक्त निजण्याकरितांच केला जाई. दुसऱ्या मजल्यावर स्वतंत्र लहानलहान खोल्या होत्या; पण त्या फक्त सहावी व सातवी या इयत्तांतील मुलांनाच उपभोगण्यास मिळत. अशा प्रकारच्या छात्रालयाच्या या एका विभागात ७०-७५ मुलांची सोय केली जाई व त्या सर्वांवर देखरेख करण्याकरितां एका शिक्षकाची नेमणूक असे. छात्रालयाचे ह्याच नमुन्याचे आणखी चारपाच विभाग वर्तुलाकार बांधलेले होते व त्याच्या मध्यवर्ति विद्याश्रमाची भव्य दुमजली इमारत होती.

वडिलांना पोहोंचवून परत आल्यानंतर मोहनने छात्रालयाच्या विभाग-व्यवस्थापकांकडून आपल्या डेस्क-शेल्फांचा व छात्रालयांतील जागेचा कबजा घेतला. डेस्कला असलेल्या कुलुपाची किल्ली त्याला व्यवस्थापकांकडून मिळाली होती. पण डेस्क उघडण्याकरितां त्याची आवश्यकता नाही ही गोष्ट मोहनच्या तात्काळ लक्षांत आली; कारण त्या डेस्काच्या पूर्वीच्या मालकाने त्याचा कोयंडा मोडून ठेवला होता. त्याशिवाय शाळेच्या अशाश्वत जगांत आपलें नांव शाश्वत टिकविण्याच्या महत्त्वाकांक्षेनें त्या डेस्कावर आपलं नांव, गांव, उमर, धंदा वगैरे परिचित माहिती तर चाकूनें कोरून ठेवली होतीच; शिवाय

आपल्या कलेचें व अभिरुचीचें द्योतक असे अनेक नमुनेहि त्यानें चाकूनें व रंगानें चित्रित केले होते. डेस्काच्या आंत कोळ्यांनीं व झुरळांनी वस्ती करून हें आमचें घर असा पुरावा तयार करून ठेवला होता. वारसा हक्कानें पूर्वीच्या मालकाकडून मोहनला मिळालेली ही मिळकत त्याला मोठीशी उत्साहवर्धक वाटली नसल्यास फारसें आश्चर्य नाहीं. आणि त्यांतील कोळिष्टकें व कचरा झाडून टाकून आपल्या पुस्तकांना व दऊत-टाकाना योग्य वसतिस्थान निर्माण करतांना मोहनच्या मुखावर आनंदाच्या रेषा उमटल्या नसल्या तर तोहि कांहीं त्याचा दोष नव्हे.

आपलें सामान आवरण्याचा मोहनचा हा उद्योग चालू असतांना त्याच्या शेजारी चाललेल्या मुलांच्या गडबडीकडे त्याचे लक्ष गेल्याशिवाय राहिलें नाही. छात्रालयांत नवीन येणाऱ्या मुलांच्या भोळसरपणाचा व अननुभवाचा फायदा घेऊन किंवा त्याच्या वागणुकीच्या तऱ्हेवाईकपणावर टीका करून सात्त्विक व बहुशः निरुपद्रवी आनंद उपभोगण्यांत बाकीचे विद्यार्थी दंग होते. कोंकणांतून नवीनच आलेल्या एका बावळट मुलाची उलट तपासणी त्यांनीं नुकतीच संपविली होती; पण आपल्या विनोदाला फारसे खाद्य त्यांतून निष्पन्न न होऊं शकल्यामुळें आतां दुसऱ्या एका भोळ्या मुलाकडे त्यांनीं आपला मोर्चा फिरवला होता. सदा तोंड उघडे ठेवून प्रत्येक गोष्टीकडे कौतुकाच्या दृष्टीनें पाहणारा हा शांत वृत्तीचा मुलगा कितीहि छेडले तरी चिडणारा नव्हता.

आपल्या मनांतील कोणताहि विकार प्रदर्शित करण्याकरितां "खरेंच की" हा एकच वाक्यप्रयोग तो वापरी. त्या घोळक्यांतला एक आनंदी व सदा हंसतमुख असलेला मनोहर नांवाचा मुलगा ह्या नवीन मुलाची थट्टा करण्याच्या हेतूने आपलें सर्व कौशल्य खर्च करण्यांत गुंग होऊन गेला होता.

"कायरे गंगानाथ, शाळेच्या फाटकाजवळचा आपला पट्टेवाला तूं पाहिलास का?" मनोहरनें आपले डोळे मिचकावीत सुरुवात केली.

"हो बुवा, कोणीतरी मला दिसला खरा."

"पण तूं त्याच्याकडे नीट पाहिलेंस का?"

"नाहीं बुवा, मीं नाहीं पाहिलें."

" वा! पुनः एकदां त्याला नीट लक्षांत ठेव बरं ना! त्याला ' सख्याबा ' म्हणतात. विचारून बघ मी सांगतों तें खरें कीं नाहीं तें. पण त्याला 'सख्याबा' का म्हणतात तुला माहीत आहे का? "

" नाही बुवा. " गंगानाथ म्हणाला.

" त्याचे असे आहे की, एका भुताचे आणि त्याचे फार सख्य आहे. " मोठी गूढ गोष्ट आपण सांगत आहोत अशा आविर्भावानें डोळे मिचकावीत मनोहरने खुलासा केला.

" खरेंच कीं! " आणि हे उत्तर देताना गंगानाथ इतका भ्यालेला दिसला की, बाकीच्या मुलांना त्याचे ते विस्फारित डोळे आणि चमत्कारिक मुद्रा पाहून हंसू आवरेना. आपली ह्यांनी चांगलीच थट्टा केली, ह्या जाणिवेनें गंगानाथहि खजील होऊन मागे सरला.

" खुळे आहांत झाले." मनोहर म्हणाला. " मी कशी छान गंमत जुळवून आणली होती अन् तुम्हीं हंसून घालविलीत. थोडा दम धरला असता तर मी त्याला कितीतरी नवीन माहिती देणार होतो. आचार्य रत्नाकर यांना एक भली लांब सडक शेपूट आहे आणि कुणी खोड्या केल्या की, त्या शेपटीने ते त्याला फटके देतात, ही गोष्ट मीं त्याला पटवून दिली असती. आणि वर्गांत नांव दाखल करण्यापूर्वी खाली डोकें वर पाय करून प्रार्थना करावी लागते हे त्याच्या मनावर मी ठसविणार होतो. पण माझी शिकार तुम्हीं हंसून घालविलीत. "

"अरे तो पहा दुसरा एक नवीन मुलगा." नागेश म्हणाला. "अहो पाहुणे, इकडे या." दोनतीन मुलानीं लागलीच हुकूम फर्माविले.

आपल्यालाच कोणी तरी बोलावीत आहे अशा कल्पनेने मोहनने वर पाहिलें, पण अजून त्याची पाळी आली नव्हती. त्याच्या समोरच दिसण्यांत तरतरीत पण अतिशय नाजूक व अशक्त मुलगा बसला होता. त्याचेकडे आतां रोख वळलेला दिसला. त्याच्या दृष्टीवरून सहज प्रतीत होणारी त्याची गर्विष्ठ वृत्ति आणि आढ्यतेची व तिरस्काराची भावना पाहून इतर मुलांना बरेंच आश्चर्य वाटलें.

" तुला कांहीं आमची शाळा आवडलेली दिसत नाहीं. " नाजूकपणें पावलें टाकीत तो मुलगा जरा पुढें सरल्याबरोबर नागेशनें सुरुवात केली.

" कांहीं विशेषशी नाहीं. " त्यानें अडखळत उत्तर दिलें. "सगळें सामान कसें येथील अगदीं भिकार दिसतें."

" अतिशय भिकार आणि कमालीचें रद्दी." मनोहरने त्याची नक्कल केली.

" आणि ह्या एकाच खोलीत कां आपण सगळ्यांनीं राहायचं? "

" छे छे असें कसें होईल?" मनोहरने किल्ली फिरविली. "येथे प्रत्येक मुलाला एक स्वतंत्र दिवाणखाना दिलेला असतो. तेथे ज्याच्या त्याच्या हौशीप्रमाणें साधे पण सुंदर जरीच्या नक्षीदार वेलबुट्टीचे गालिचे घातलेले असतात; आणि भोजनसमयीं प्रत्येकाचे शेजारी दोन-दोन शागीर्द वारा घालण्यास सज्ज असतात."

" ही थट्टा काय मला समजत नाही होय ? "

" होय थट्टा तर खरीच. पण मला वाटते अशी व्यवस्था जर येथे असती तर ती तुला जास्त आवडली असती नाही? "

" पुष्कळच आवडली असती. "

" पण आतां आपले नाव सागण्याची या दीन दासावर कृपा कराल का?"

" माझें नांव शंकरराव जामदार. "

" ओहोहो! " नम्रपणे मुजरा करण्याचा आव आणून मनोहर म्हणाला.

" मंदारपुरचे इनामदार सरदार आनंदराव जामदार याचा मी मुलगा."

" काय म्हणतां! " आनंदाने टाळ्या पिटीत मनोहर बोलला. " खरोखर आपण आपल्या कुलाला भूषणभूत आहांत, आपल्या शाळेला ललामभूत आहात, आपल्या राष्ट्राला अलंकारभूत आहांत, आपल्या पृथ्वीला भारभूत—देवाशपथ, आपण आमच्या शाळेत आलांत याबद्दल आम्हांला आपला अभिमान वाटतो."

" लक्ष्मीपूरचे दिवाण साखरे हे माझे मामा होतात."

" असें काय — तेंच ना हे दिवाण कीं जे

**लक्षावधी वधुनियां अरिसैन्य सारें।**
**वेगें पळे मम गृहीं बघतां ससा रे!"**

मनोहरनें आपले-गुऱ्हाळ आणखीहि चालविले असतें. पण त्या मुलाची आढ्यता विनोदापेक्षा तिटकाराच उत्पन्न करणारी त्याला वाटली. इतक्यांत बाळूचे लक्ष मोहनकडे गेलें.

“ अरे हा नवीन मुलगा पहा, याचा मूर्खपणा पाहून कसा हंसतो आहे तो. कायरे, तुझे नाव काय ? ”

“ मोहन नारायण देशमुख. ” मोहनने शांतपणे उत्तर केलें.

त्याची थट्टा करण्यास सुरवात करण्यापूर्वी तो मुलगा कोणत्या प्रकारचा आहे हें निश्चित कळणे जरूर होते. पण कोणत्या दिशेने मारा सुरू करावा याबद्दल बाळूचा निश्चय लवकर होईना, म्हणून त्याने ठराविक प्रश्न विचारण्यास सुरवात केली.

“ तुझे वडील काय करतात ? ”

“ ते घरींच असतात.” मोहनला हा प्रश्न जरा चमत्कारिक वाटला.

“ तूं राहतोस कोठे ? ”

“ पुष्करवाडीत. ”

“ तुझें वय काय ? ”

“ तेरा.”

“ तुला बहिणी किती ? ”

“ तुला काय करावयाचें आहे ? ” हे उत्तर मोहनच्या अगदी ओठावर आलें होतें, पण मुद्दाम आडरानांत कशाला शिरा, अशा विचारानें त्याने सरळ उत्तर दिलें. “ तीन.”

“ त्या चांगल्या देखण्या आहेत कां रे ? ”

“ कोणास ठाऊक. मी नाहीं कधीं त्यांना विचारायला गेलो. पण काय रे तुझ्या बहिणी देखण्या आहेत का ? ” हें सडेतोड उत्तर आणि विशेषतः शेवटचा उलट प्रश्न ऐकून तर बाळू खजीलच झाला, आणि इतरांच्या हास्याने खोली दणाणून गेली. मनोहर म्हणाला, “बाळू, हा तुला शेराला सवाशेर भेटला. हा अबलख पाठीवर हात नाहीं ठरूं द्यायचा. तुला आपले ससा, सैन्य आणि सरदारसाहेब बरे. कसें काय नामदार सरदारसाहेब, हा मुलगा तुम्हांला कसा काय वाटतो ? तोहि आमच्यासारखा भिकारच आहे का ?”

" मला कांहीं वाटत नाही, " आता त्याच्या डोक्यांत प्रकाश पडला की, ही सारी आपली थट्टा चालली आहे.

" बरोबर आहे, बरोबर आहे. आपल्यासारख्यांनी ह्याच्याकडे लक्ष देणे शोभणार नाही. "

डाव्या बाजूला ऐटबाज भांग पाडलेल्या, सुवासिक तेल लावलेल्या आपल्या सुंदर केंसांवरून हात फिरवीत शंकर जामदार उभा राहिला. मोहनपेक्षां आपण खरोखरच फार उच्च कुलांतील आहोत हे दर्शविण्याचा त्याने कितीहि आव आणला तरी त्याचा साधेपणाचा रुबाब आणि आपल्या मानभावी मोठेपणाची आढ्यता यांतील अंतर त्याच्या लक्षांत आल्याशिवाय राहिलें नाहीं. कोणीकडून तरी मोहनचा पाणउतारा करण्याच्या हेतूने तो म्हणाला : " माझ्याकडे काय सारखा पाहतो आहेस ? "

मुद्दाम भांडण कशाला उकरून काढा, या हेतूने मोहन दुसरीकडे पाहूं लागला. " कोणी कोणाकडे पाहिले म्हणून काय झाले ? " कोणीतरी सुचविले.

" कोणींहि कोणाकडे पाहावें; पण देशमुखांच्या भिकार मुलाने सरदार-साहेबाच्या मुखाकडे कधींच पाहूं नये. "

मनोहराची ही चेष्टा पाहून मोहनला थोडे हंसूं आलें. लागलीच जामदार मोठ्या रागानें त्याला म्हणाला, " हंसतोस काय माझ्याकडे पाहून ? "

" तुला कोण हंसतें आहे ? "

" तो तुलाच हंसतो आहे. फेक त्याच्या अंगावर हें. " संत्र्याच्या सालीचा भला मोठा तुकडा जामदारच्या हातांत देत बाळू म्हणाला. त्यानें विचार केल्याशिवाय तो तुकडा घेऊन मोहनच्या अंगावर फेंकला. मोहननें तात्काळ तो झेलला आणि त्याच्या तोंडावर परत मारला. जामदारनें अविचारीपणें मोहनच्या पाठीत गुद्दा मारण्याचा प्रयत्न केला, पण मोहननें तो वार सहज चुकविला. आपल्या करमणुकीच्या कार्यक्रमांत झालेला हा अनपेक्षित फेरफार त्या खोडकर मुलांना इष्ट असाच वाटला. त्याला चिडविण्याच्या उद्देशानें बाळू म्हणाला, " हा मुलगा तुझा अपमान करतो म्हणजे काय ? त्याला म्हणावें युद्धाला तयार हो. "

मनोहरनें लागलीच पुकारा केला: "अरे खंड्या शागीर्दाला कळवा कीं, सरदारसाहेबांनी देशमुखाशीं युद्ध पुकारलें आहे, म्हणून दोघांच्याकरितां ढाल-तलवारी आणि चौघाना पुरतील इतक्या लाडूकरंज्या घेऊन तालमीमागील रणांगणावर धांवत ये."

पण मोहनच्या कसलेल्या शरीराकडे पाहून त्याला दुसरा गुद्दा मारण्याची जामदारला इच्छा होईना. आपल्या रंगांत अशा ऐन वेळीं भंग होत असलला पाहून मनोहरचा फार विरस झाला. "छे, छे, कोणीतरी ह्या सशाच्या शेपटीवर पाय देऊन आपल्या अपमानाचा सूड घेण्यास त्याला शिकवा! काय हें!

**वीरांचें तें लोपलें सर्व शौर्य।**
**झाले सर्दार सर्वही हीनवीर्य ॥"**

"पुरेरे, मनोहर," आतापर्यंत गप्प बसलेला नागेश म्हणाला. "आजच नवीन आलेल्या मुलात पहिल्याच दिवशीं भांडण लावणे तुला शोभतें काय?"

पण मनोहरच्या चिडविण्याने शंकर चिडला होता. मोहनकडे वळून तो म्हणाला, "आहे का भांडणाची तयारी तुझी?"

"मुळींच नाहीं." मोहनने शांतपणें दिलेले हे उत्तर ऐकून सर्वांनाच आश्चर्य वाटले. त्यांना वेडावीत मोहनकडे पाहत बाळू म्हणाला, "अशा बांगड्या काय भरतां? नवीन मुले **सर्वच** भागुबाई दिसतात. छे, छे, जामदार ठोकून काढ त्याला."

"थांब तर खरा." नागेश मध्येंच म्हणाला. "ह्यानें माघार कां घेतली हें तर आपण पाहूं."

"उगीचच्या उगीच कोण मारामारी करतो." मोहनने खुलासा केला. "शिवाय कोणी आगळीक केल्याशिवाय मी कोणालाच मारीत नाहीं. आणखी असें कीं—"

"हं काय, आणखी काय?" मोहन मध्येंच थांबलेला नागेशला आवडलें नाहीं.

" आणखी असं कों, मला काही शक्तीचा गर्व आहे असें नाही. पण ह्या अशक्त मुलाशी काय मारामारी करायची ?"

वयानें तीं दोन्ही मुलें सारखीच असली तरी शक्तीने मोहन श्रेष्ठ होता, हे कोणीहि सांगितलें असतें. मोहनच्या या धीरगंभीर वागणुकीमुळें त्या मुलांना त्याच्याविषयीं एक प्रकारें आदर वाटूं लागला; पण त्याच्या शेवटच्या विधानानें जामदार चिडला. मोहननें सुरुवातीस आपली फजिती केली हें शल्य बाळूच्याहि मनांत सलत होतेंच. म्हणून जामदारला अधिकच चिडवीत बाळू म्हणाला, " जामदार, घाबरूं नको. मी तुला मदत करीन. असा त्याला चोप दे कीं चांगली जन्मभर आठवण राहील."

चिडविण्यामुळें आणि एकमेकांच्या उत्तेजनामुळें अधिकच अविचारी बनलेल्या जामदारानें मोहनच्या फाड्दिशी एक तोंडांत दिली. मोहनला राग आला, आणि आतां चांगलीच मारामारी जुंपणार असा रंग दिसूं लागला. पण तितक्यांत आत्म-संयमन करून त्यानें जामदारच्या कमरेला विळखा घालून त्याला उचलले; आणि त्याच्या हातपाय झाडण्याकडे किंवा ओरडण्याकडे लक्ष न देतां शूर सर-दारांच्या ह्या वंशजाला अगदीं एकीकडच्या कोपऱ्यांत नेऊन ठेविलें; आणि " पुनः असा मूर्खपणा करूं नको. " म्हणून बजावलें.

पण मोहनचा राग अजून शांत झाला नव्हता. 'कारणावांचून माझ्या वाटेस कोणी गेलेला मला खपणार नाही ' हे त्या मंडळींना दाखवावें असें त्याला वाटलें. म्हणून शांतपणें परत यऊन तो बाळूला म्हणाला, " तूंच मला मघाशीं भागुबाई म्हणाला होतास नाहीं कां ? मला भांडण आवडत नाहीं पण म्हणून मी भित्रा आहे असें समजूं नकोस. तूंच त्याला मारायला चिथविलेंस, पण मला तुझीसुद्धां भीति वाटत नाही."

" होय का ? मग घे तर ! " असें म्हणून बाळूनें एक गुद्दा त्याच्या पाठींत लगावला.

" आणि तूंहि घे. " मोहननें त्याच्या कर्जाची चक्रवाढीनें फेड केली.

मोहन बाळूपेक्षां कितीतरी लहान, असें असतांना त्यानें हें धाडस करावें हे पाहून बाळू चकितच झाला; हाताच्या मुठी वळून अस्तन्या सारीत तो पुढें

आला आणि रागाचा आविर्भाव आणून हातवारे करीत उभा राहिला, पण मोहनला पुनः मारण्याची त्याला फारशी उत्सुकता दिसली नाहीं.

" कां, जिरली का? मार कीं पुनः ! " प्रथमपासूनच बाळूबद्दल मोहनला तिरस्कार वाटत होता, त्यांत आतां अधिकच भर पडली.

'तृणीकृतजगत्त्रयसत्त्वसारा' अशा दृष्टीनें आपणाकडे रोखून पाहणाऱ्या वीररसाच्या ह्या छोट्या मूर्तीकडे बाळू कितीतरी वेळ पाहतच राहिला. इतक्यांत जेवणाची घंटा झाली आणि आपला नामर्दपणा झांकण्यास बाळूस योग्य संधि मिळाली. " जाऊं दे, आतां घंटा झाली." म्हणून तो परत फिरला आणि " नवीन मुलाशी कोण भांडत बसतो " असे आपल्या सोबत्यांना म्हणाला.

" मग खबरदार मला पुनः भागुबाई म्हणशील तर ! "

भोजनगृहाकडे जातांना नागेश मोहनला म्हणाला, "खरेंच, देशमुख, तूं आज मोठें मारू काम केलेस ! तो बाळू म्हणजे इरसाल झोड आहे. पण आज तूं त्याचा नक्षा छान उतरलास. आतां बरेंच दिवस त्याचे नाक नाहीं वर येणार !"

" अहो नागेश," मनोहर त्यांच्या मागून ओरडला. " पांच रुपयांची पैज. मी सांगूं कां तूं त्या नवीन मुलाला काय सांगत होतास ते ?"

" होऊन जाऊं दे पैज. तुला कधींच सांगतां येणार नाहीं. "

" तूं त्याला म्हणालास कीं 'प्राण गेला तरी तुझी दोस्ती मी सोडणार नाहीं.' "

" अगदींच खोटें. मी त्याला म्हणालों की माझ्या शेजारच्याच पाटावर तूं बैस. "

" एकूणएकच. मी सांगितले तेंच, फक्त निराळ्या शब्दात. "

# प्रकरण चौथें

## शत्रु आणि मित्र

सन्मित्र येताति निमंत्रिल्यास
संपत्प्रसंगीं सुख भोगण्यास ।
निमंत्रिल्यावांचुनियांच येती ।
विपत्प्रसंगीं समदुःखि होती ॥

—मोडक

विद्याश्रमांत आल्याबरोबर पहिल्याच दिवशीं मोहनने एक मित्र संपादन केला; मनोहरचें म्हणणें नागेशने जरी उपहासावर घालविलें होतें तरी त्यालाहि मोहनबद्दल मित्रप्रेम वाटूं लागलें होतें. दोघानांहि परस्पराबद्दल वाटणारें हें प्रेम कदाचित् पूर्वजन्मसंस्काराचा परिणाम असेल; कदाचित् तारामैत्रीचें अज्ञात आकर्षण असेल; नागेशचे आकर्षक तेजस्वी डोळे प्रिय वाटले असतील, किंवा त्याचा मोकळेपणा व त्याच्या चेहऱ्यावरील उदार परंतु स्वच्छंदी वृत्तीच्या निदर्शक छटा यांच्या योगानें मोहनने त्याच्याशीं दोस्ती केली असेल. इतकें मात्र खरें कीं, नागेशला विद्यार्थि-जगात बरेच मानाचें स्थान दिलें जात होतें, ही गोष्ट मोहनच्या केंव्हांच लक्षांत आली होती; आणि तो आपला मित्र झाला या कल्पनेनें त्याला पुष्कळच समाधान वाटलें.

नागेश मोहनला घेऊन भोजनगृहांत गेला, आणि मनोहरच्या थट्टेला न जुमानतां त्याने त्याला आपल्या शेजारच्या पाटावर बसविलें. बाकीचे विद्यार्थीहि भराभर येत होते आणि पंक्ति भरूं लागल्या होत्या. प्रत्येक पंक्तींत सुमारें २५।३० विद्यार्थी असत व व्यवस्था ठेवण्याकरितां एखादा शिक्षक किंवा छात्रालयांतील अधिकारी विद्यार्थी,–मंत्री–असे. लवकरच सर्व मुलें येऊन भोजनगृहाचें तें विस्तीर्ण दालन भरून गेलें, आणि भोजनास व त्याचबरोबर हलक्या आवाजांतील चेष्टांस सुरवात झाली.

" निजण्याची व्यवस्था कोठें असते ? " मोहननें प्रश्न केला.

" आपण बसलो होतों त्याच्या शेजारींच लहानमोठीं दालनें आहेत, आणि त्यांत प्रत्येक खोलींत १५।२० मुलें झोपतात." नागेशनें माहिती पुरविली. " तुझी परीक्षा घेतली का रे ? "

" नाहीं. पण मला काय काय येतें म्हणून आचार्यांनी विचारलें आणि मग म्हणाले कीं, पाठकशास्त्र्यांच्या वर्गांत बैस. तो कोणता वर्ग रे ? "

" तो चवथीचा वर्ग, पण आम्ही त्याला गमगच्छन्या वर्ग म्हणतों; तुला संस्कृत येतें का रे ? "

" फारसे नाहीं येत."

" मग वत्सा, तुझें कल्याण असो. "

" कां? पाठकशास्त्री कसे काय आहेत ? "

" पाठक होय, ते काय मनुष्य आहेत ! तें एक यंत्र आहे, शिस्तीच्या यंत्राचें तें एक चक्र आहे म्हणेनास, नाही तर मुलांना पिळून काढणारा लोखंडी चरक म्हण. नाहीं तर—"

" नाही तर भगवंतांनी गीतेत सांगितलेला दुःखसंयोगवियोग घडवून आणणारा योगसंज्ञित सत्पुरुष म्हण." समोरच्या पंक्तीत बसलेल्या मनोहरनें हलक्या आवाजांत चाललेला हा संवाद थोडासा ऐकला आणि त्यांत पूर्तता केली.

" हुश, गप बैस. पण मोहन, पाठकशास्त्री कसे आहेत हें तुला लवकरच समजून येईल. मुलांकडून पाठ करवून घेणारे ठक गृहस्थ आहेत ते– "

" कसली रद्दी कोटि केलीस ही!" असे म्हणून मनोहरने आपल्या भांड्यां-तील पाणी नागेशच्या तोंडावर उडविलें. समोरच्या पंक्तीतील शिक्षकांनीं हे पाहिलें आणि त्याबद्दल जेवण झाल्याबरोबर वीस केका लिहून दाखविण्याची शिक्षा त्यांनीं मनोहरला फर्माविली.

" उगीच शिक्षकांना कां दोष देतां? " मोहनच्या पलीकडे बसलेला पद्म-नाभ म्हणाला. पद्मनाभाच्या सुंदर नांवाचें ' पद्या ' हें सुटसुटीत रूप मनोहरने कधींच रूढ करून टाकलें होतें. "मला तर पाठकशास्त्री फारच चांगले वाटतात."

" तुला ना, वाटतलि तर काय झालें ! वर्गांत उंदरासारखें गुपचुप बसण्याचें तुझ्यासारखें अतुल सामर्थ्य सर्व मुलांत असतें– "

" किंवा नोटा घोटण्याची भयंकर धमक असती—" मनोहरनें मध्येंच सुचविलें.

" किंवा घोटलेलें बिनचूक बडबडण्याची विलक्षण ताकद असती तर—" नागेशने वाक्य पूर्ण केलें. "तर, माझ्या प्रिय मित्रा पद्या, तर आम्हां सर्वांनाहि पाठकशास्त्र्यांनी शाबासकी दिली असती."

" किंवा आमची नांवें पाठकांनीं पाठ केली असती." मनोहरनें कोटि केली.

" काय रद्दी कोटि केलीस हो ! " नागेशनें मनोहरचा टोला उलटविला आणि त्याच्या अंगावर पाणी फेंकलें; पण ४० केका लिहून दाखविण्याची शिक्षा मिळतांच ओठ बाहेर काढून डोळे विस्फारून त्यानें जी मुद्रा केली ती खरो-खरच प्रेक्षणीय होती.

" आणि तूं कोणत्या विभागांत राहतोस ?" थोडी विश्रांति घेऊन नागेशनें पुनः सुरुवात केली.

"आतां त्या शिक्षकांच्यावर तुमचा मोर्चा फिरणार वाटतें." पद्मनाभ हंसून म्हणाला, " देशमुख, हे सांगतील त्यांतलें निम्में सुद्धां तूं खरें समजूं नकोस."

" हो, हें पहा, जर तूं हुशार, बुद्धिमान्, अभ्यासी, सभ्य किंवा आनंदी किंवा त्या पंखीं असशील तर ते तुझी काळजी घेतील, आणि तुझ्यावर अत्यंत ममता दाखवितील; पण जर तूं मठ्ठ, उनाड, निष्काळजी, दगड किंवा चेंगट गडी असशील तर ते तुझी काळजी घेणार नाहीत, तुला शिकवणार नाहींत, तुझ्याशीं बोलणार सुद्धां नाहींत. तूं माझ्या विभागांत असतास तर किती छान झालें असतें ! "

" मला श्रीपादराव यांच्या विभागांत ठेवला आहे. "

" अस्सं !"

" कां ! श्रीपादराव कसे काय आहेत ?"

" त्यांची कांहीं मुलें निंदा करतात आणि कांहीं स्तुति करतात. "

" म्हणजे काय ? तूं कोणाच्या विभागांत राहतोस ? "

" शांतारामांच्या. ते त्या समोरच्या पंक्तींत मुलांशीं आणि मंत्र्यांशीं गप्पा मारताहेत ना ! ते; फार नामी शिक्षक आहेत ते, अगदीं शंभर टक्के गुलहौशी! अरे पण जेवणे झालीं कीं !"

भोजन आटोपलें आणि सर्व मुलें रांगेने भोजनगृहाच्या बाहेर पडून आंचवून आपआपल्या वसतिगृहांत गेलीं. नागेशने मोहनचें सर्व सामान व पुस्तकें व्यवस्थित लावून ठेवण्यास त्याला मदत केली; आणि त्याच्या डेस्काला नवीन कडीकोयंडा स्टोअरमधून आणवून दिला. त्यानंतरचा वेळ 'अभ्यासाचा वेळ' म्हणून संबोधला जात असे. सर्व मुलें आपआपल्या खोल्यांतून दुसरे दिवसाचा अभ्यास करीत आणि छात्रालयाच्या त्या त्या विभागाचे अधिकारी शिक्षक देखरेख करीत. पण मोहनच्या वर्गातील मुलांपैकी कोणताच मुलगा अभ्यास करीत नव्हता. साहजिकच उद्याला कांहीच अभ्यास करावयाचा नसेल असे त्याला वाटलें. म्हणून आपल्या आईला एक विस्तृत पत्र तो लिहीत बसला; आणि तें संपल्यानंतर मनोहरशीं गप्पा मारीत बसला. प्रार्थनेची घंटा होतांच सर्व मुलें सभामंडपांत एकत्र जमलीं, आणि प्रार्थना आटोपल्यावर खालच्या इयत्तांतील मुलें आपापल्या दालनांत जाऊन झोपलीं.

मोहनहि आपल्या खोलींत जाऊन खाटेवर पडला. आजच्या एका दिवसांत त्याला आलेले नवे अनुभव व प्राप्त झालेले ज्ञान यामुळें त्याला एक प्रकारचा विशेष उत्साह वाटत होता. व्यासविद्याश्रमाविषयीं त्याचा पुष्कळच अनुकूल ग्रह झाला होता व आपले दिवस येथें आनंदांत जातील अशी अंधुक आशा त्याला वाटूं लागली होती. विशेषतः नागेश आणि मनोहर या दोन मित्रांशीं नव्यानेच झालेल्या दोस्तीमुळे त्याच्या मनाला वाटणारी हुशारी अवर्णनीय होती.

प्रवासाचे श्रम व मित्रांशीं गप्पागोष्टी यांमुळें त्याचे शरीर व मन अगदीं थकून गेलें होतें. अर्थात् अंथरुणावर पडतांच त्याला झोंप लागली. पण झोंपेत सुद्धा त्यानें आपल्या या नव्या मित्रांची-मनोहर, नागेश या जोडीची-संगति सोडली नाहीं. एका लहानशा होडींत बसून आपण त्रिवर्गहि कृष्णेवर सहल करावयास जात आहोंत व तेथें मजेने हिंडत आहोंत, अशी स्वप्ने तो पाहत होता. त्यांची होडी संथपणें नदीच्या पात्रावरून जात असतां समोर एक मोठा अजस्त्र प्राणी त्यांना दिसला. ताबडतोब मनोहरनें एक भाला मारून त्या प्राण्याला बोटीवर उचलून घेतलें आणि पाहतो तों काय आश्चर्य ! तो अजस्त्र प्राणी म्हणजे बाळू होता. पण हें पाहून मोहनला मुळींच आश्चर्य वाटलें नाहीं. इतक्यांत नागेशनेंहि त्याचप्रमाणें दुसरा भाला मारून एक विचित्र प्राणी

बोटीवर आणला. तो शंकर जामदार निघाला! आपण संपादन केलेल्या शिकारीकडे ते आनंदाने पाहत आहेत इतक्यांत नाव विलक्षण तऱ्हेनें खालींवर हलूं लागली. व आपण सर्वजण पाण्यांत पडतों की काय असे त्यांना वाटलें. पण एकाच क्षणांत हा सर्व देखावा बदलून गेला. आपल्या मित्राला घेऊन तो जणूं काय घोड्यावरून फिरावयाला जात आहे असें त्याला दिसलें. दुसऱ्याच क्षणीं त्याचा घोडा बुजून एकाएकी मागील पायांवर पुढील दोन पाय उभारून सरळ उभा राहिला. मोहन आतां पडणार तोंच त्या धक्क्याने तो जागा झाला आणि पाहतो तो त्याचे अंथरूण धरणीकंपासारखें इतक्या जोरानें खालींवर होत होतें की तो खाटेवरून खालीं पडण्याच्या बेतांत आला होता. असा कांहीं प्रकार होईल याची नागेशनें त्याला थोडीशी पूर्वसूचना संध्याकाळीं देऊन ठेवली असल्याने सर्व प्रकार ध्यानांत येण्यास त्यास वेळ लागला नाहीं. कोणी-तरी खाटेखालीं शिरून त्याला भीति दाखविण्याकरितां त्याचे अंथरूण खालींवर करीत आहे हे त्याने तेव्हांच ताडलें. ज्या दालनांत त्याची खाट होती त्याच दालनांत असणाऱ्या मुलात दोनचार बरीच मोठीं व आडदांड मुलें होतीं ही गोष्ट त्याच्या रात्रीच लक्षांत आली होती; व त्यांच्या खोडांची दंगेखोरपणा-बद्दलची असलेली विद्यामंदिरांतील प्रसिद्धिहि त्याच्या कानी आली होती.

जात्याच धाडशी, व लहानपणापासून स्वतंत्र वातावरणात वाढल्यानें मोहनला मुळीच भीति वाटली नाहीं. धरणीकंपाच्या मधूनमधून बसणाऱ्या धक्क्यांतून संधि साधून त्याने खालीं उडी टाकली आणि खाटेखाली शिरून हा प्रचंड उत्पात करणाऱ्या व्यक्तीला पकडले. पण अंधारांतील झटापटींत ती व्यक्ति त्याच्या हातांतून एका झटक्यासरशीच निसटली; आणि शाहिस्तेखानाच्या बोटां-प्रमाणेंच त्याच्या शर्टच्या बाहीची गुंडी फक्त मोहनच्या हातीं राहिली. पण एवढ्यानें मोहन निराश होणारा नव्हता. अंधारांत अस्पष्ट दिसणाऱ्या त्या आकृतीचा पाठलाग करून दोनचार गुद्दे स्मरणार्थ ठेवून देण्यास त्यानें कमी केले नाहीं. पण त्या मुलाने शेजारीं पडलेली चादर एकदम त्याच्या तोंडावर टाकल्या-मुळें पाठलाग-संशोधनाचा प्रयत्न सोडून देऊन ह्या अवगुंठनांतून स्वतःचीच सुटका अगोदर करून घेणें त्याला भाग पडलें. त्याच्या हातीं लागलेली गुंडी मात्र त्यानें जपून ठेविली व अशा प्रकारची पुनरावृत्ति थांबविण्याच्या दृष्टीनें सकाळीं

कोणता उद्योग करावा याचा विचार करीत तो आपल्या अंथरुणावर जाऊन निजला. हा सर्व प्रकार थट्टेच्या स्वरूपाचाच त्याला वाटला; पण विद्याश्रमांत नवीनच आलेल्या मुलाची अपरात्रीं झोंपमोड करणारी अशी आडदांड थट्टा करणाऱ्या पशूला भरपूर शासन करण्याचें त्यानें आपल्या मनाशीं ठरविलें. झोंड किंवा खोडकर मुलें दुसऱ्याच्या खोड्या काढण्यात कितीहि पटाईत असलीं तरी त्या खोडयाच्या प्रतिकारार्थ स्वतःच्या शरीराला थोडासाहि ओरखडा निघूं लागला तर त्यांच्या खोड्या तावडताब थांबतात.

मोहनला या प्रकाराचे विशेष वाटले नाहीं. पण त्याच्याच शेजारच्या खाटेवर निजलेल्या नवीनच आलेल्या दुसऱ्या एका मुलाची–अरविंदाची–स्थिति अगदीं निराळी होती. मोहनप्रमाणेंच त्याचीहि झोंपमोड झाली होती. पण ह्या थट्टेच्या प्रकाराची त्याला कोणींहि आगाऊ सूचना दिली नव्हती, आणि जात्याच भित्रा असल्यामुळे त्याच्या अंथरुणाला धक्के बसूं लागतांच तो अगदीं घाबरा होऊन गेला; इतका कीं, जागे झाल्यावरहि त्याच्या तोंडांतून शब्द निघेना. दोन्ही हातांनीं गादीला घट्ट चिकटून धरून पुढें काय होते याची सभय अंतःकरणानें वाट पाहत तो पडून राहिला होता.

व्यासविद्याश्रमांत आल्यापासून जहाज फुटून अनोळखी रानांत, रानटी मनुष्यांच्या तावडींत सापडलेल्या दुर्दैवी प्रवाशाप्रमाणे तो अगदीं गांगरून गेला होता. नवीन आल्याबरोबरच त्याच्या अशक्तपणाची थट्टा करून कांहीं दुष्ट मुलांनीं त्याच्या अंतःकरणाला घरे पाडली होतीं. वयानें अवघा बारा वर्षांचा असल्यानें लहान मुलाची मोकळी व निरपराधवृत्ति त्याची अजून कायम होती. त्यामुळें मुलांनीं विचारलेल्या सर्व प्रश्नांची सरळ उत्तरें देऊन आपल्या घराविषयीं वडिलांविषयीं, धाकट्या बहिणीविषयीं निर्व्याज प्रेमाने त्याने सर्व माहिती सांगितली होती. अर्थात् नाजुक अंतःकरणावर निर्दय वाक्प्रहार करणाऱ्या, बालांच्या निर्व्याज कोमलतेची थट्टा करणाऱ्या दुष्ट मुलांना त्याला चिडवण्यास पुष्कळ दिवस पुरेल इतके भांडवल त्याने पुरविले होतें. आणि 'गण्डस्योपरि पीटिका' अशी कीं, चिडविण्याचा प्रकार असह्य झाल्यास मुक्तकंठानें रडून दुःखाला वाव देण्याची किंवा सांत्वनाचा शब्द ऐकण्याचीहि त्याला आशा नव्हती. छळाची जाणीव व्यक्त केल्यास, 'हळूबाई, रडवया,' किंवा ह्यापेक्षांहि

अधिक नामर्दपणाचीं विशेषणें स्वतःला उद्देशून उच्चारिलीं जातील, ही पूर्ण जाणीव असल्यानें हा सर्व छळ निमूटपणें सहन करणें त्याला भाग होतें. आजहि अंथरुणावर पडल्यावर किती तरी वेळ मूक रुदन तो करीत होता. आणि अखेर त्याला जी झोप लागली तिचाहि वर उल्लेख केल्याप्रमाणेंच भंग करण्यांत आला.

अपत्यांवर अत्यंत प्रेम करणारी परंतु वत्सलता व विवेक यांची फारकत करून मुलांचें हित साधतांना पुष्कळ वेळां त्यांचे अनहित साधणारी अशी ही पालकांची लोकविलक्षण जात आहे. मूळचा शरीरानें अशक्त असलेला अरविंद आईच्या लाडांत वाढल्यामुळें मनानेंहि कमकुवत झाला व आईच्या मृत्यूनंतर अफाट सागरावर सुकाणूंवांचून हिंडणाऱ्या जहाजासारखी त्याची स्थिति झाली. प्रेमशून्य वातावरणांत घरीं आपल्या डोळ्यांदेखत त्याची होणारी हेळसांड त्याच्या वडिलांना न पाहवल्यामुळें व्यासविद्याश्रमांत त्याला पाठविण्यांत आलें. तेथील शिस्तीच्या वातावरणांत व सशक्त मुलांच्या सहवासांत त्याचा भित्रेपणा जाऊन तो 'जवानमर्द' होईल अशी एक अंधुक कल्पना त्यांच्या या विचाराच्या-मागें होती. शालजोडीच्या वेलबुट्टींतील जरीला भट्टींत ताव देऊन तिचीं खोरीं-कुदळीं करण्याइतकीच ही गोष्ट शक्य कोटींतील होती, हें त्या वत्सल पित्याच्या लक्षांत कसें यावें ? एखाद्या योग्य मनुष्याच्या देखरेखीखालीं शांत व प्रेमळ वातावरणांत त्याला ठेवला असता तर ज्या मानसिक शक्ति त्याचे अंगीं नव्हत्या त्या तो संपादन करूं शकला असता; पण आज या गुद्दागुद्दीच्या वातावरणांत त्याच्या अंगच्या नाजुक व कोमल मनोवृत्ति करपून जाण्याचाच प्रसंग आला होता.

आणि तो अंतु बर्वे—ज्यानें अरविंदाच्या अंथरुणाला धरणीकंपाचे धक्के दिले, आणि त्याच्या हालाच्या कल्पनेनें आंतून येणारे हास्याचे उमाळे जो मोठ्या कष्टानें दाबीत होता तो अंतु—कितीहि असंस्कृत किंवा रानवट असला तरी जात्या दुष्ट बुद्धीचा किंवा क्रूर अंतःकरणाचा होता असें नव्हे. त्याची स्वतःची जर कोणीं अशी थट्टा केली असती तर त्याला थोडीशी मजाच वाटली असती; त्या थट्टा करणाऱ्याच्या पाठीवर चार-दोन रट्टे त्यानें दिले असते, किंवा फार तर जवळचा पाण्याचा तांब्या त्याच्या डोक्यावर रिकामा करून त्याला सचैल स्नान घातलें असतें. पण त्यानेंच जर अरविंदाच्या चेहऱ्याकडे आतां नजर टाकली असती तर बालकांच्या सहजमनोहर हास्यानें किंचित् विगलित होणारे

त्याचे ओंठ भीतीनें पांढरे फटफटीत झालेले त्याला दिसले असते; आणि हरणाच्या पाडसासारखे त्याचे सुंदर काळेभोर डोळे निस्तेज झालेले त्याला आढळले असते. पण आपल्या थट्टेचा काय परिणाम होत आहे, थट्टेच्या मिषाने त्याचे कसे भयंकर हाल आपण करीत आहोत हे त्याला कळत नव्हतें, कळण्याची पात्रताहि त्याच्या ठायी नव्हती.

अरविंद कांहीच हालचाल करीत नाहीं, कदाचित् त्याच्या गाढ झोंपेंतून तो जागाहि झाला नसावा अशा कल्पनेने अनंताने खाटेला जरा जास्त जोराचा धक्का दिला आणि एकीकडून ती थोडी उचलली गेली. आतां मात्र त्याच्या श्रमाचे साफल्य झाले. अरविंदाने एक किंकाळी फोडली आणि अंथरुण-पांघरुणासकट तो खाली घसरून पडला. सुदैवाने त्याला फारसे लागलें नाही. अंतूनें त्याचे गांठोडे एकदम उचलून खाटेवर टाकले आणि घाईघाईने आपल्या खाटेवर पळून गेला. इतक्यांत अरविंदाची किंकाळी ऐकून पलीकडच्या खोलीतील व्यवस्थापक शिक्षक दिवा घेऊन तेथे आले. पण सर्व सामसूम पाहून आपणास कदाचित् भास झाला असावा असा त्याचा समज झाला. कंदील घेऊन खोलीत त्यांनी एक फेरी घातली, अरविंदाचे विसकटलेले पांघरूण नीट केले आणि सर्व आलबेल आहे असें पाहून ते आपल्या खोलीत परत गेले.

“ हें पहा, झाली इतकी थट्टा आज पुरे झाली. आता ह्या नवीन मुलांना कोणी त्रास देऊं नका. ” हा नानाचा आवाज होता.

दिव्याच्या उजेडांत दिसलेलें दृश्य आणि त्यानंतर ऐकूं आलेली हुकूमवजा सूचना यांमुळे काय घडलें असले पाहिजे याची मोहनला स्पष्ट कल्पना आली. आतां आपल्याला कोणी त्रास देणार नाहीं याची त्याला स्वतःला विशेषशी पर्वा वाटत नव्हती. कारण त्रास देणाऱ्या व्यक्तीचा योग्य समाचार घेण्यास तो समर्थ होता. पण भीतीने अर्धमेला झालेल्या अरविंदाला आता तरी सुखाने झोप लागेल या कल्पनेनें त्याला समाधान झाले.

मोहनला पुष्कळ वेळ झोंप आलीच नाहीं. खोलीत सर्वत्र शांतता झाली, मुलांच्या घोरण्याच्या आवाजावरून इतरांनाहि झोंप आल्याचें दिसलें; तरीहि मोहन जागाच होता. अरविंदाचें मूक रुदन चालूच होते, आणि त्याने दाबून ठवण्याचा प्रयत्न केला असतांहि प्रकट होणारे त्याचे हुंदके त्या भयाण शांततेत

अधिकच केविलवाणे वाटत होते. आईबापांचें प्रेमळ कृपाछत्र सोडून ह्या आडदांड जीवनांत येऊन पडलेल्या आणि स्वतःचें संरक्षण करण्यास असमर्थ असलेल्या ह्या निरपराध जीवाबद्दल त्याचें अंतःकरण कळवळले. थोडा वेळ त्याने कांहीच केले नाहीं; आपणाला कांही करता येईल असेहि त्याला वाटले नाही. पण अखेर त्याला राहवेना. बाकीची सर्व मुलें गाढ झोपली आहेत याची पुनः एकदां खात्री करून घेऊन तो हलक्या आवाजांत म्हणाला:

" हें पहा, नवीन मुला–"

हुंदक्याचा आवाज क्षणभर थांबला; परंतु उत्तर देण्याचे अरविंदाला धाडस होईना. म्हणून थोड्या वेळानें मोहन पुन्हां म्हणाला:

" जागा आहेस ना ?"

" हो. " कष्टी पण कोमल आवाजांत उत्तर आले.

" भिऊं नको. मी सुद्धां आजच नवीन आलो आहे. तुझें नांव काय ? "

" अरविंद; पण हळू बोल, तीं उठतील ना."

" नाही उठावयाचीं. पण थांब, मी तुझ्या जवळ येतो." मोहन त्याच्या खाटेवर जाऊन म्हणाला: " किती भ्यालास रे. तो मुलगा तुला कांहीसुद्धां करणार नव्हता. खाटेखाली शिरून त्याने नुसतें तुझें अंथरूण वर केलें. ही नुसती थट्टा होती. माझ्यासुद्धां खाटेखालीं कोणीतरी शिरून माझी झोंपमोड केली, पण मी खाली उतरलो आणि त्याला कुदलून काढला."

" खरेंच का! पण मला किती भीति वाटली. पुनः ते असें करतील कां रे?"

" मला नाही वाटत. आणि कोणी आलें तरी घाबरूं नको. आपण खाटेच्या खाली उतरलें म्हणजे झालें. तुला लागणारबिगणार कांही नाही."

" तुझ्याइतके गोड शब्द माझ्याशी कोणीच बोलत नाहीं. तुझें नांव सांगशील ना मला ?"

" मोहन देशमुख. माझाहि एक लहान भाऊ आहे तो अगदीं तुझ्यासारखाच दिसतो. तुला पाहिले की मला त्याची आठवण होते. पण आतां नीज हो."

मोहनचा हात अरविंदानें प्रेमानें आपल्या हातांत दाबून धरला आणि थोड्याच वेळांत तो गाढ झोंपीं गेला. मोहनच्या गोड शब्दांच्या सांत्वनाच्या अभावीं कदाचित् सारी रात्रहि त्यानें तशीच दुःखांतच घालविली असती. आपणांपेक्षां सामर्थ्यवान् व ज्याच्यावर आपणांस पूर्ण विश्वास ठेवतां येईल असा मित्र आपणांस लाभला, या कल्पनेनें त्याला विलक्षण समाधान लाभलें. आणि त्या समाधानाच्या आनंदांत आपले दुःख तो पार विसरून गेला. मोहन आपल्या खाटेवर येऊन झोंपला आणि सकाळीं साडेपांच वाजतां उठविण्याच्या घंटेचा कर्कश आवाज त्यांच्या कानांत शिरेतोंपर्यंत दोघांनाहि कांहीं समजलें नाहीं.

---

# प्रकरण पांचवें

## शालेय जीवनाचा पहिला दिवस

**कठोर दुःखें मनुजांस चाखवी**
**तरी जगद्रूप विपत्ति दाखवी ।**

— वि. वा. भिडे

घंटेचा आवाज ऐकल्याबरोबर मोहन उठला, आणि मुखमार्जनादि प्रातर्विधि उरकण्याच्या मार्गाला लागला. अरविंदहि उठला. रात्रींचीं भीतीचीं आणि कष्टाचीं चिन्हें त्याच्या चर्येवर अजून स्पष्टपणें दिसत होतीं. मोहनला पाहतांच आभारप्रदर्शक स्मित करून त्यानेंहि त्याचेंच अनुकरण केलें. प्रार्थनेची घंटा सुमारें अर्ध्या तासानंतर होत असे, ती झाल्याशिवाय अंथरुणांतून हलण्याचा खोलींतील इतर मुलांचा विचार दिसला नाहीं. अर्थात् आपली प्रातर्विधीचीं कृत्यें सुरळीत पार पाडण्याकरितां निर्विघ्नतासिद्ध्यर्थ एखादें गणपतिपूजन करणें मोहनला भाग पडलें नाहीं हें सांगावयास नकोच.

आळस घालविण्याकरितां निरनिराळ्या प्रकारचे आळोखेपिळोखे देत इतर मुलें हळूहळू अंथरुणावरून उठूं लागलीं. रात्रीं संपादन केलेलें चांदीचें बटन

मोहननें पुनः एकदां न्याहाळून पाहिले; आणि त्या बटनाचा जोडीदार धारण करणारा गडी हुडकण्याच्या मार्गास तो लागला. प्रथम बाळू उठला; रात्रीं आपण आडदांडपणा केला आहे व त्याबद्दल आपणास कोणी ओळखील याची जाणीव त्याच्या चेहऱ्यावर दिसली नाहीं. आणि त्याच्या शर्टच्या बाह्याहि बिनगुंडीच्या होत्या. त्यानंतर आणखी कांहीं मुलें उठलीं. पण त्यांच्या दोन्ही बाह्यांच्या गुंड्या शाबूत दिसल्या. थोडयाच वेळानें अंतू उठला. उठतांच त्यानें अरविंदाकडे ओझरती नजर टाकली, आणि त्याच्या जवळ जाऊन "रात्रीचा प्रकार ही केवळ थट्टा होती, भीति दाखवून घाबरविण्याचा माझा मुळींच हेतु नव्हता," वगैरे खुलासा केला. सर्वांच्या शेवटीं जनार्दन–त्या सर्व गणांचा गणपति शोभणारा धिप्पाड जनार्दन–जांभया देत अंथरुणावर उठून बसला. कोणत्याहि छात्रालयांत न चुकतां हटकून आढळणारे जे विद्यार्थी असतात त्यांपैकीं जनार्दन हा होता. अभ्यासात मंठ्ठ, शरीरानें आडदाड, वारंवार नापास झाल्यामुळे पुष्कळ इयत्ता मागे पडलेला, चांगल्या मुलांच्या संगतीत चुकून न राहणारा, लहान मुलाना बिघडवून किंवा भीति दाखवून स्वतःचे वर्चस्व गाजविणारा, अंगीं कोणत्याहि गुणाची किंवा कलेची आवड नसणारा, आणि पालकांच्या व नातेवाईकाच्या आग्रहामुळेंच वसतिगृहांत टिकून राहणारा असा एखाद दुसरा मुलगा प्रत्येक वसतिगृहांत असतोच. घरीं आल्यास तो जास्त बिघडेल अशी आईबापांना भीति वाटत असते व त्याचें काय करावें हे त्यांना समजत नसतें. शाळेत व वसतिगृहात ठेवल्यानें त्याचे इतर उद्योग थांबतील अशी त्याची अंधुक कल्पना असते. पण त्यांना काय कल्पना कीं बाहेर त्यानें जें नुकसान केलें असते त्याच्या हजारपट नुकसान तो वसतिगृहांतील इतर मुलांचें शील बिघडवून किंवा त्यांचा छळ करून करीत असतो! कारण वसतिगृहाच्या बाहेरच्या जगांत स्वतःशिवाय इतरांचे तरी नुकसान तो निदान करूं शकत नाहीं.

रात्रीच्या नाटकांतील आपली झोंपमोड करणारा वीर जनार्दनच असला पाहिजे हें मोहनच्या लक्षांत आलेंच होतें. तितक्यांत आपल्या शर्टच्या बाह्या तपाशीत तो ओरडला: "आग लागो त्याला, काय उशीर झा! अरे, पण माझ्या शर्टची गुंडी काय झाली?"

मोहननें कांहींच उत्तर दिलें नाहीं. आपला अपराध नाकारण्यास त्याला सवड राहूं नये म्हणून तो गप्पच बसला; जनार्दनला अर्थातच थांबण्यास वेळ नव्हता. मोहनला उद्देशून तो म्हणाला : " ए नवीन मुला, माझी गुंडी तुला सांपडली आहे कां ? "

" मला एक गुंडी सांपडली आहे खरी. "

" आग लागो त्याला, आण ती इकडे लवकर. "

" रात्री माझी झोपमोड करण्यास एक मुलगा आला होता. त्याच्या शर्टची गुंडी माझ्या हातीं लागली आहे ही. " त्याच्याकडे गुंडी फेंकीत मोहननें उत्तर दिलें.

" आग लागो त्याला. "

" अन् मी त्याला रात्रीं मऊ केलाच आहे, आणि पुनः तो आला तर चोपण्यास कमी करणार नाहीं. "

" आग लागो त्याला. हे घे तुझ्या उर्मटपणाचें बक्षीस. " असें म्हणून शेजारीं पडलेली आपली चपल त्यानें मोहनच्या अंगावर फेंकली. त्यानें वार चुकवून ती चप्पल उचलली आणि दूर उडविली ती नेमकी बाळू तोंड धुवीत पलीकडे बसला होता त्याच्या पाठीवर आदळली.

" आग लागो त्याला! बराच निर्ढावलेला दिसतोस तूं. पण तुझी कर्जबाकी फेडण्यास मला आतां वेळ नाहीं. तुझ्या नादानें उगीच उशीर व्हावयाचा. पण पुनः– "

मोहनकडे पाहत अर्थपूर्ण हातवारे करून आपल्या अपूर्ण वाक्याचा अर्थ पूर्ण करीत तो निघून गेला. इतक्यात प्रार्थनेची घंटा झाली, आणि मुलें सभामंडपाकडे निघालीं. मोहन आंत जाऊन धांवत पळत येणाऱ्या मुलांकडे कौतुकानें पाहत बसला. कांहींना सदऱ्याच्या गुंड्यासुद्धां नीट घालण्यास वेळ मिळाला नव्हता, तर कांहींच्या तोंडावर पाण्याचे थेंब तसेच विलसत होते. शंकर जामदार आला तो ऐटीनें चालत सर्वांकडे तुच्छतेनें पाहतच आला. भ्यालेल्या हरिणाप्रमाणें अस्थिर दृष्टीनें चहूंकडे पाहत अरविंद हळूंच आंत शिरला व मोहनला पाहतांच त्याच्या शेजारीं बसला. कोट्या

करण्याची ती वेळ नव्हती तरीहि मनोहरनें जवळून जातांना " तुझें उत्तमांग धुण्यास मिळालेलें पाणी स्वच्छ होतें ना ? " असा अर्थपूर्ण प्रश्न विचारलाच. पद्मनाभाचे डोळे वर्गातील अभ्यासाकडे लागले होते. आणि प्रार्थनेच्या पहिल्या श्लोकास सुरवात होते न होते तोंच धापा टाकीत, डोळे पुशीत, सदऱ्याच्या बिनगुंडीच्या बाह्या लोंबत असलेला जनार्दन सभामंडपांत प्रवेश करता झाला.

वर्गाला जाताना मोहननें नागेशला विचारलें, " पाठकशास्त्री यांचा वर्ग कोणता?"

" चला, मी या बोकडाला बळी देण्याकरितां घेऊन जातों." मनोहरने उत्तर दिलें. " त्या यज्ञपशूला बांधण्याकरिता एखादा स्तंभ किंवा..."

" मुसक्या..." नागेशने सुचविलें.

" पहा, नवीन मुला, हा तुझा प्राणांतिक मित्र अर्थगर्भवाक्यांत तूं बैल आहेस असें सुचवीत आहे. चल, मी तुझी पाठ मऊ करण्याकरितां घेऊन जातों. " वेडयावांकडया कोट्या व अर्थहीन विनोद केल्याशिवाय मनोहरला बोलतांच येत नसे.

" तूं या वर्गात नाहींस का?" नागेश दुसऱ्या वर्गात जाऊं लागलेला पाहून मोहनने विचारलें.

"छे, छे, काय उद्धटपणा हा !" मनोहर म्हणाला. " त्या वर्गात मी आहे, पण तुझा हा प्राणांतिक मित्र फार वरच्या लोकांत वास करणारा आहे. त्या श्रेष्ठ लोकीं तुला गमन करावयाचें असल्यास बरेंच उंच उड्डाण करावें लागेल. पण ही पहा बळी देण्याची जागा आली. "

मोहन आणि मनोहर वर्गात जाऊन बसले, आणि थोड्याच वेळानें अभ्यास सुरू झाले. उंदरासारखें शांत बसण्याच्या पद्माकराच्या सद्गुणाची मनोहरने चेष्टा केली होती खरी; पण पाठक यांच्या वर्गातील बहुतेक सर्व मुलें पद्माकरा-इतकींच शांत बसली होती. मनोहरासारखे चळवळे महात्मेहि धीरगंभीर वृत्तीनें बसलेले पाहून पाठकांच्या कौशल्याची कोणीहि तारीफच केली असती. वाऱ्या-सारखा स्वैरवृत्तीचा मुलगाहि पाठकांच्या शिस्तीच्या दळाखालीं सरोवरा-सारखा शांत होऊन जात असे.

हा बदल कसा घडून येत असे हें सकृद्दर्शनीं लक्षांत येणें थोडें कठीण आहे. पाठक पुष्कळ शिक्षा करीत ही गोष्ट खरी; पण त्यांच्याइतकीच किंबहुना त्यांच्या-हूनहि जास्त कडक शिक्षा करणाऱ्या इतर पुष्कळ शिक्षकांना वर्ग व्यवस्थित चालविण्याच्या बाबतींत त्यांच्या निम्म्यानेंहि यश मिळत नव्हतें. खरें कारण असें होतें कीं, पाठकांची शिस्त नागेशनें म्हटल्याप्रमाणें यंत्रासारखी अंध, अचूक आणि अपवादरहित होती. एखादा धडा लिहून आणावयास त्यांनीं सांगितला असल्यास तो ठराविक वेळीं लिहून झालेला असलाच पाहिजे. त्याच्याआड कोणतीहि सबब, कारण, हरकत आलेली त्यांना खपत नसे, किंवा स्वर्गातून प्रत्यक्ष ब्रह्मदेव आला तरीहि चुकांबद्दल शिक्षा केल्याशिवाय ते राहत नसत. दुर्वासाप्रमाणें एखाद्या मुलाच्या पाठीमागें लागलेलें त्यांच्या शिक्षेचें सुदर्शन परतविण्याचें सामर्थ्य तिन्ही लोकांतील कोणत्याहि देवदेवतेत नव्हते. दैत्यांना आपल्या सौंदर्यानें मोहित करून त्यांचेकडून अमृत हिरावून घेणें मोहिनीला साध्य होईल; पण तिच्याहि नेत्रकटाक्षाला भुलून पाठकांनी एकसुद्धां शिक्षा माफ केली नसती.

पाठकांची शिस्त ही पोलादी चौकट होती. हुशार व बुद्धिमान् मुलालाहि त्याच्याबाहेर पाऊल टाकण्यास परवानगी नव्हती, आणि मठ्ठ मुलालाहि त्याच चौकटीच्या मापात मारून-मुटकून बसविले जाई. कांहींना ह्या शिस्तीचा जाच असह्य होई हे खरें, पण सामान्यतः ही पद्धति बरीच यशस्वी होत असे. आळशी व निरुद्योगी मुलांना परिणामीं ती हितकारकच होई व त्यांच्या शिक्षा कडक असल्या तरी निःपक्षपाती असल्यामुळे पुष्कळ मुलांना त्यांच्याविषयी पुढें पुढें आदर व कृतज्ञता वाटूं लागे.

वर्ग सुरू झाले आणि पाठकशास्त्री प्रत्येक मुलाला पाळीपाळीनें प्रश्न विचारूं लागले. मोहनची पाळी आल्याबरोबर त्यांनीं त्याचें पूर्ण नांव आपल्या नोंद-वहींत—पूर्णपणें स्वच्छ आणि एकहि वेडीवांकडी रेघ किंवा डाग नसलेल्या आपल्या नोंदवहींत—टिपून घेतलें आणि प्रश्न विचारण्यास सुरुवात केली.

"माझेजवळ पुस्तक नव्हतें आणि काय अभ्यास आहे हेंहि मला माहीत नव्हते." मोहननें उत्तर दिलें.

" सबबी, पोकळ सबबी आहेत या! म्हणजे आजचा अभ्यास तूं केला नाहींस असेचना!"

" होय."

" प्रथमग्रासे मक्षिका! मोहन, पुनः असल्या सबबी मला सांगूं नकोस. हा सगळा धडा उद्यां लिहून आण." आणि त्यांच्या नोंदवहीत मोहनच्या नावापुढे या दुर्दैवी शिक्षेची नोंद त्यांनी लागलीच केली. पुष्कळांनीं पहिल्या अपराधास शिक्षा केली नसती, किंवा फारतर " पुनः करूं नको " म्हणून बजावले असतें. पण पाठकांचा मार्ग भिन्न होता. दया आणि क्षमा हे शब्द त्यांच्या कोशातच नव्हते. अपराध कबूल करून एखाद्या मुलानें क्षमेची याचना केली असती तर महर्षि दुर्वासाच्या शब्दात पाठकशास्त्रयांनीं त्याला बजावले असते कीः—

**नाहं दयालुहृदयो न च मां भजते क्षमा।**
**अक्षांतिसारसर्वस्वं दुर्वाससमवेहि माम्॥**

सबबी सांगून स्वतःच्या चुका झांकून ठेवण्याचें शिक्षण आजपर्यंत मोहनला मिळाले नव्हतें. सबब ही असत्याची धाकटी बहीण तो समजे, आणि म्हणून पाठकशास्त्रयांना किंवा कोणत्याहि शिक्षकांना सबब समजले जाईल असें कोणतेंहि कारण पुनः कधींहि न सांगण्याचा त्यानें निर्धार केला. अर्थात् त्याला पुष्कळ वेळा शिक्षा भोगावी लागली. पण ही शिक्षा अपरिहार्य होती, अशी समजूत करून घेऊन तो निमूटपणें आलिया शिक्षेसी सादर होत असे.

आजच्या तासाला मनोहरलाहि शिक्षा झाली आणि त्याच्याच बरोबर शशीकान्त नांवाच्याहि एका मित्राला शिक्षा घेण्याचा प्रसंग आला. ' रिकामा जाऊं नेदी क्षण ' हें तत्त्व मनोहरच्या अंगीं पूर्ण बिबलें होतें, आणि म्हणून शशीकान्ताच्या दुःखांत आपण स्वतःहि समभागी आहोंत हें लक्षांत असतांहि ( पाठक इतर मुलांना प्रश्न विचारण्यांत गुंतले असतांना ) ' शशिविलाप ' नांवाचें महाकाव्य रचण्यांत आपल्या वेळाचा त्यानें सद्व्यय केलाः—

शशिविलाप

**( शिख॰) उभा राहे तेव्हां प्रमुदित मनें तो झडकरी,**
**वदाया लागे तो ' नृप ' ' कवि ' रुपें त्या अवसरीं।**

**परंतू ना येई जंवहि रूप तें एकहि खरें,**
**" बसा खालीं तुम्ही " वदुनि बसविलें पाठकसरें* ॥ १ ॥**
( शालिनी ) **ऐकोनी तीं उत्तरें शिक्षकांचीं**
**आणि शिक्षा शब्द ते लिहिण्याची ॥**
**झालें खिन्न चित्त तेव्हां शशीचें**
**नाहीं लोकीं चीज येथें श्रमाचें ॥ २ ॥**

आपल्या महाकाव्याचे हे सुरुवातीचे श्लोक त्यानें हलक्या आवाजांत शशीकान्ताला वाचून दाखविले. आपल्याला उद्देशून त्यानें केलेल्या कविता पाहून तो साहजिक चिडला आणि म्हणालाः

" मार खाशील अं, डुल्या."

" तुला डुल्या का म्हणतात रे ? " मोहननें हांसून विचारिलें.

" लुबऱ्या-डुबऱ्याचें तें संक्षिप्त रूप आहे." शशीकान्तानें खुलासा केला.

" शशीकान्त, मनोहर आणि मोहन, आज संध्याकाळीं वर्ग सुटल्याबरोबर कवितेच्या दोनशें ओळी लिहून दाखवा." पाठकांनी खणखणीत आवाजात फर्माविलें. अशा रीतीनें मोहनच्या शालेय जीवनाच्या पहिल्याच दिवशीं त्याच्या नांवापुढें दुसरी शिक्षा नोंदली गेली.

" हू–हू–हू–भगवंतांनी–दुःखसंयोग-वियोग...योगसंज्ञित " मनोहर दीर्घ निःश्वास टाकीत पुटपुटला. " जबरी शिक्षा झाली आं हीं ! " पण म्हणून त्यानें शशिविलाप काव्य करण्याचा प्रयत्न अर्धवट सोडला असें मुळींच नाही. त्याने त्यांत वाल्मीकादि मुनि व स्वर्गातील देव यांना शशीचे सात्वन करण्यास आवाहन केले आणि शशीकान्ताशीं गोड शब्द बोलून व

(शा.वि.) **घेऊनी करिं लेखणी त्वरित ती सोडोनी शोकास तें ।**
**लीही शब्द सुशुद्ध पूर्ण सगळे. कल्याण होवो तुझें ॥**

असा उपदेश करून आणि आशीर्वाद देऊन ते सर्व स्वस्थानाप्रत गमन करिते झाले.

---

* पाठकसरें = पाठकशास्त्री यानी. शिक्षकांच्या नांवापुढें 'सर' हा आदरार्थी प्रत्यय लावण्याचा संप्रदाय अलीकडे शिष्टसंमत समजला जाऊं लागला आहे. —मनोहर ऊर्फ डुल्या.

संध्याकाळीं छात्रालयांतील आपल्या खोलीत गेल्यावर शिक्षा म्हणून दिलेल्या कविता लिहिण्याकरितां श्रीपादराव यांचेजवळ त्याने कागद मागितले. “वा, मोहन,” तुच्छतेच्या स्वराने, कपाळाला आठ्या घालून ते म्हणाले, “पहिल्याच दिवशी शिक्षा!” सहानुभूतीचा एक शब्द नाही, चौकशीचे एक अक्षरहि नाहीं, उत्तेजनाचें नांवहि नाहीं, सल्ला नाहीं, सांत्वन नाहीं. श्रीपादरावांशी यापुढें मोहनचे पटले नाही तर आश्चर्य कोणतें!

मोहनच्या कष्टमय आणि निराशेच्या जीवनाला येथूनच सुरुवात झाली. जात्या बुद्धीने तो कांही कमी नव्हता. परंतु व्यासविद्याश्रमात दिल्या जाणाऱ्या पद्धतीनें शिक्षण ग्रहण करण्याची त्याला संवय नव्हती आणि म्हणून इतर मुलाना सहज अंगवळणीं पडलेल्या साध्या गोष्टीहि त्याला अगदीं नवीन होत्या. व्याकरणाचे नियम पाठ करून रूपे तयार करणे तर त्याला कधींच जमत नसे. शिवाय पाठांतराची त्याला विशेष संवयहि नव्हती. अर्थातच शब्द किंवा कठीण कविता घोटून तयार करणे त्याला पुष्कळ दिवस साधले नाही.

पाठकशास्त्री याच्या पद्धतीची थोडक्यांत रूपरेषा अशीः जर कोणताहि मुलगा इहलोकीच्या कोणत्याहि कारणामुळे आपला अभ्यास करण्यास चुकला तर त्याला तो धडा सबंध लिहून आणावा लागे. त्याने ठराविक वेळीं तो लिहून आणला नाही तर दुसरे दिवशीं तो दोनदा लिहावयाचा. पुनः तो अभ्यास केल्याशिवाय आला तर संध्याकाळीं खेळण्याचे वेळीं त्याला वर्गात बसवून ठेवण्यांत येई आणि असे प्रकार वारंवार घडून आल्यास त्याचे नांव आचार्य रत्नाकर यांचेकडे कळविले जाई. आणि प्रसंगी तेथे मुक्तहस्ताने छड्या खाव्या लागत. शिस्त हा पाठकांचा देव आणि पद्धत हे त्यांचे देवतार्चन, म्हणून नैसर्गिक बुद्धीचा कमीअधिक विकास किंवा मुलाचे स्वभावविशेष यासारख्या गोष्टी लक्षांत घेण्याइतक्या त्यांना महत्त्वाच्या वाटत नसत. पाठकशास्त्री हे हाडाचे सज्जन, अंतःकरणाचे दयाशील आणि मुलांच्या हिताकरितां झटणारे होते यांत शंका नव्हती. परंतु शिस्त आणि पद्धति याचे दास्य त्यांनी पत्करिले असल्यानें अभ्यास देतांना किंवा शिक्षा सांगताना मुलांच्या वैयक्तिक गुणदोषांकडे लक्ष देणें त्यांच्या गांवीहि नव्हते.

जिवंत सृष्टीशीं एकरूप होऊन स्वतंत्रपणें शिक्षण संपादन करण्याची सवय असलेल्या मोहनवर ह्या निर्जीव, यांत्रिक शिक्षणपद्धतीचा परिणाम भयंकरच झाला. ठराविक अभ्यास ठराविक पद्धतीनें तयार करणें त्याला अगदीच नवीन असल्यामुळे वर्गाचे वेळेपर्यंत त्याचे अभ्यास सहसा संपत नसत. दहा-पंधरा मुलें एकत्र बसून एकाच वेळीं चेष्टा आणि अभ्यास एकदम करीत असलेल्या खोलींत अभ्यासाकडे त्याचें लक्षच लागत नसे. अभ्यास झाला नाही म्हणजे लिहिण्याची किंवा उभे राहण्याची शिक्षा मिळे; आणि त्यामुळे दुसरे दिवसाच्या अभ्यासाला वेळ विशेषच अपुरा पडे. अशा रीतीनें अभ्यास कच्चा म्हणून शिक्षा, म्हणून दुसरे दिवशीं अभ्यास अधिक कच्चा आणि म्हणून अधिक शिक्षा ह्या चक्रव्यूहांतून बाहेर कसें पडावें हे त्याला समजेना. आणि विद्याश्रमांत येऊन एक महिना होण्याच्या आतच 'अभ्यास न करणारा मुलगा' म्हणून त्याचें नांव आचार्य रत्नाकर याना कळविण्यांत आलें. या सर्व प्रकारामुळें तो अगदीं उदास आणि निरुत्साही होऊन गेला. इतकेंच नव्हे, तर स्वतःचा कांहींहि अपराध नसतांना व प्रामाणिकपणे जीवापाड श्रम करीत असताना आपणांस हा अपमान सहन करावा लागणे हा अन्याय आहे, हा निष्कारण चाललेला छळ आहे, ही जाणीव त्याच्या अंतःकरणात शल्यासारखी टोचूं लागली. संध्याकाळचे वेळीं शिक्षा भोगीत वर्गात उभा असतांना त्याला घरची आठवण होई. आईचे प्रेम, वडिलांचा उत्साहवर्धक सहवास, भावंडाचें हृदयस्पर्शी बंधुप्रेम याची आठवण होताच विद्याश्रमांत राहणे त्याला नकोसें होई. वडिलांना पत्र पाठवून येथून घेऊन जाण्याबद्दल लिहिण्याचे त्याचे मनात येई, किंवा पळून जाऊन स्वावलंबनानें येथून सुटका करून घ्यावी असेंहि त्याला वाटे. परंतु आपल्या शिक्षा आणि अपमान यांचा वाढत जाणारा बोजा वडिलांच्या प्रेमळ पण मानी हृदयाला अगोदरच असह्य झाला आहे याची त्याला जाणीव होई, आणि म्हणून केवळ त्यांच्याकरितां येथील कष्ट आणखी कांहीं काळ सहन करण्यास आपले मनाला तो तयार करी.

विद्याश्रमांतील त्या छोट्या जगांत आळशी मुलगा म्हणून त्याची ख्याति अधिकाधिक होऊं लागली होती; आणि त्याच्या स्वाभिमानाला फार मोठा धक्का बसत चालला होता. स्वाभिमानाचें हे कवच एकदां नाहींसें झालें म्हणजे

शत्रूच्या क्षुल्लकशा माऱ्यानेंहि मुलांचें चारित्र्य रसातळास जाऊं शकतें. नैसर्गिक बुद्धिमत्ता कितीहि विशाल असो, शारीरिक सामर्थ्य कितीहि कमावलेले असो, किंवा स्वभाव कितीहि मनमिळाऊ असो, स्वाभिमान नाहीसा झालेल्या मुलाला जगातील प्रलोभनांचा प्रतिकार करणे किंवा अंतर्गत विकारांच्या विनाशक शक्तींपासून स्वतःचें संरक्षण करणे सारखेंच अशक्य होऊन बसतें. याच निर्जीव यांत्रिक शिस्तीचे आणखी कांही वळसे देऊन मोहनसारख्या उदार अंतःकरणाच्या, मोकळ्या वृत्तीच्या, बुद्धिवान् मुलाला गंगानाथसारखा बावळट, अगर जनार्दन-बाळूसारखा पाषाणहृदयी झोंड बनविणे बिलकुल अशक्य नाहीं.

पण त्याचा नाहींसा होणारा हा स्वाभिमान टिकून राहण्यास इतर कारणें अनुकूल होती हे मोहनचे सुदैव होय. एकदोन प्रेमळ व सुस्वभावी मित्र त्याला लाभले होते. अभ्यासांत त्याला यश येत नसले तरी खेळांत व इतर बाबतींत त्याची प्रगति वाखाणण्यासारखी होती. शिवाय व्यासविद्याश्रमांत आपल्या सामर्थ्याचा व सहवासाचा उपयोग कांही जणांना मदत करण्यांत किंवा त्यांच्या अंतःकरणाला समाधान देण्यांत होऊं शकतो आहे ही जाणीव निबिड अंधकारांत लुकलुकणाऱ्या एकाकी ताऱ्याप्रमाणें त्याच्या निराश मनाला प्रोत्साहन देत होती.

एक दिवस संध्याकाळी मोहन असाच शून्य मनाने आपल्या खोलीच्या एका कोपऱ्यांत स्वस्थ बसला होता. तो कांहींहि करीत नव्हता. गोष्टीचें किंवा कादंबरीचे पुस्तक वाचण्याइतकासुद्धां त्याच्या मनाला उत्साह वाटत नव्हता. सातव्या इयत्तेविरुद्ध बाकीच्या इयत्ता यांच्यामध्यें फुटबॉलचा सामना त्या वेळेला व्हावयाचा असल्यानें वसतिगृहांत एकसुद्धां मुलगा दिसत नव्हता. अशा वेळी, फुटबॉलचा एक महत्त्वाचा सामना सुरू असतांना दीडदोन महिन्यांपूर्वीचा मोहन आपल्या खोलींत कधींहि स्वस्थ बसला नसता. पण वर्ग सुटल्यानंतर अर्धा तास उभें राहण्याची शिक्षा नुकतीच भोगून तो आला असल्यामुळें उदास मनानें मान खालीं घालून गहन विचारांत गढून गेलेला मोहन उत्साहरहित होऊन बसून राहिला होता.

मोहनच्या स्वभावांत दिवसेंदिवस येत जाणारी उदासीनता नागेश व मनोहर यांच्या लक्षांत केव्हांच आली होती. त्याच्यासारख्या बुद्धिमान् मुलाला आळशी व निष्काळजी मुलांच्या पंक्तींत लेखले जावें याबद्दल त्यांना वाईट

वाटत होतें. पण त्याच्या उदास वृत्तीमुळे आपल्या निरर्थक बडबडीच्या व नर्म विनोदाच्या आनंदांतला एक वांटेकरी कमी होत आहे ही गोष्ट त्यांना विशेष जाणवत होती. म्हणून त्याला घेतल्याशिवाय आपण खेळावयास जावयाचे नाहीं, असें त्यांनी ठरविले होते. आणि त्याची शिक्षा संपल्यावर त्याला आग्रह करून घेऊन जाण्याच्या उद्देशानें ते आतां तेथें आले होते.

" चला दोस्त, आज मॅचमध्यें खेळणार आहेस ना?" नागेशने सुरुवात केली.

" पण आतां उशीर झाला असेल. मॅच तर केव्हांच सुरू झाली."

" छे, पंधरा मिनिटांचा उशीर कोणालाहि माफ होतो."

" बघ, पहिली सबब तर जर्मानदोस्त झाली तुझी." मनोहर म्हणाला.

" अरे पण मला अजून खेळाचे कपडे घालायचे आहेत."

" काय करायचे आहेत ? हे कपडेसुद्धां चालतील. बाह्या जरा वर चढव म्हणजे झालें."

" दुसऱ्या सबबीचाहि बालेकिल्ला उडाला. आता चल पाहूं लवकर." असे म्हणून मनोहरने त्याच्या डोक्यावर टोपी ठेवलीच. मोहननें निघण्याची तयारी करतांच तो म्हणाला, "आपला हा प्राणांतिक मित्र अगदी गोकुळांतील गोपी-सारखा झुरणीस लागला आहे."

ते क्रीडांगणावर जाऊन पोहोचले तेव्हां खेळ अगदी रंगांत आला होता. दोनहि बाजू जवळजवळ तुल्यबल असल्यानें अद्यापपावेतो निश्चित जय कोणाचा होणार याविषयी सर्व गड्यांना सारखीच उत्सुकता वाटत होती आणि त्यामुळे प्रत्येकजण आपली शिकस्त करून आपल्या बाजूला यश मिळवून देण्याकरिता झटत होता. सातव्या इयत्तेतील कसलेले वीर एका बाजूला तर खालच्या सर्व इयत्तातील निवडक पण वयाने लहान खेळाडू दुसऱ्या बाजूला—असा संच असल्यानें मोठ्या मुलांचा पराभव केल्याची हौस फेडून घेण्याच्या ईर्षेने लहान मुलें अधिकच आवेशानें खेळत होती. कसलेला खेळाडू व दमदार पळणारा म्हणून मोहनची खेळाडूंच्या दुनियेंत प्रसिद्धि असल्यानें तो लवकरच उत्साह-पूर्वक खेळूं लागला.

इतक्यांत चेंडू हद्दीच्या बाहेर गेला. त्यास आंत आणण्याची व्यवस्था होत होती आणि दोनहि पक्षांचे वीर लहानलहान गटांनीं चेंडूची प्रतीक्षा करीत उभे

राहिले. ह्या सवडीचा फायदा घेऊन नागेश म्हणाला: "हें पहा, मोहन, आतां पुन: चेंडू बाहेर गेला म्हणजे आंत मी घेऊन येईन. तूं जरा एकीकडे उभा रहा आणि मी नेमका चेंडू तुझ्याकडे फेंकीन, मग तूं त्याला वल्हवीत गोलमध्यें नेऊन घाल."

"फार छान, जरूर."

हवी असलेली संधि लवकरच मिळाली. मोहन कोठे उभा आहे हें लक्षांत घेऊन नागेशने चेंडूला किक् मारली. इतक्या सफाईने त्याने ती किक् मारली की चेंडू कोठे पडतो हे विरुद्ध पक्षांतील गड्यांच्या लक्षांत येण्यापूर्वीच मोहनने तो ताब्यात घेतला आणि सफाईने वल्हवीत एका बाजूनें गोलकडे चालविला. त्याचे धोरण लक्षात आल्याबरोबर दोनचार गडी त्याचेवर तुटून पडले; पण सदऱ्याच्या बाही एकाच्या स्वाधीन करून, दुसऱ्याला बगल मारून, कांहींना पाडून तर कांहींच्या अंगावरून उडी मारून त्यानें चेंडू पुढें चालविला. गोलकडे जाण्याचा कोणता मार्ग मोकळा आहे हे एका क्षणांत पाहून त्यारोखे तो हरणासारखा निघाला. आणि एकाच क्षणांत शेवटली ड्रॉपकिक् मारून गोलकीपरच्या डोक्यावरून चेंडू भिरकावला! त्याबरोबर टाळ्यांच्या कडकडाटानें क्रीडांगण दुमदुमून गेले. मोहनचें धाडस, आणि कौशल्य याची तारीफ करण्यांत विरुद्ध पक्षाचे गडीहि कौतुकाने सामील झाले होते. मग विजयी पक्षाच्या आनंदाचें वर्णन काय करावें? कोणी टाळ्या पिटल्या, कोणी त्याच्या पाठीवर थाप मारली, तर कांहींनी त्याला खांद्यावर उचलून मिरविले. अजून फारशा मुलांशीं त्याची ओळख झाली नसल्यानें आपल्या बाजूला गोल करणारा हा छोटा वीर कोण हा एकच प्रश्न जिकडे तिकडे ऐकूं येऊं लागला.

"तो ना? तो देशमुख, मोहन देशमुख; नवीन आलेला देशमुख." नागेश, मनोहर आणि त्याच्या ओळखीची इतर मुलें सर्वांना सागत होतीं. देशमुखची व आपली यापूर्वी ओळख झाली होती म्हणून आपण मोठे भाग्यवान् आहोंत, असे त्या सर्वांना आज वाटत होते.

"खरेंच, नागेश," क्रीडांगणांतून बाहेर पडतांना मोहन म्हणाला. "आज खऱ्या टाळ्या तुलाच द्यावयास पाहिजेत. तूं जर चेंडू माझ्याकडे फेंकला नसतास तर मला कांहीं गोल करतां आला नसता."

"च्, मला स्वतःला गोल कधीच करतां आला नसता आणि मला स्वतःला टाळ्या मिळाल्या असत्या तरीहि आत्ताच्यापेक्षा कांही मला जास्त आनंद झाला नसता."

दोन बालकांची मैत्री–स्वार्थानें न विटाळलेली, प्रपंचाच्या दुःखानें न करपलेली, नफ्यातोटयाच्या व्यापारी वृत्तीनें न डागळलेली, अंतःकरणपूर्वक जडलेली, शुद्ध प्रेममय मैत्री–त्या मैत्रीचे सहजमनोहर दृश्य वारंवार पाहण्याचे ज्यांच्या नशिबी येते ते खरोखरच धन्य होत!

---

# प्रकरण सहावें
# सैतानाचा संचार

फुटबॉलमध्ये व इतर ठिकाणी मिळणाऱ्या यशामुळें मोहनचा स्वाभिमान टिकून राहत होता व त्याच्या निराशेंतहि त्याला थोडासा उत्साह येई हे खरें; पण त्यामुळे त्याच्या शिक्षांची कर्जबाकी कमी होण्यास किंवा मागे पडलेल्या अभ्यासाचा बोजा हलका होण्यास कांहीच मदत होऊं शकली नाही. आपल्यापेक्षां निःसंशय कमी बुद्धीच्या मुलांच्याहि खाली अखंड बसावे लागावें ही गोष्ट कांही त्याला कमी दुःखदायक वाटत नव्हती; पण त्यामुळें आपल्या आईला वडिलांना किती दुःख होत असेल व आपल्याविषयीं त्यांनी केलेल्या मनोरथांत त्याची किती निराशा झाली असेल ही कल्पनाच त्याला जास्त दुःखदायक वाटे. त्यांतहि आपल्या अपयशाचें खरें कारण वडिलांच्या कधीहि लक्षात येणे शक्य नाही, या जाणिवेमुळे तर त्याचा मनस्ताप परमावधीस पोहोचे.

पाठकशास्त्र्यांचाहि त्याचेविषयी कांही कमी गैरसमज झालेला नव्हता. वर्गातील कांहीं प्रश्नांची त्यानें दिलेली उत्तरें व मधूनमधून चमकणारें त्याच्या तीव्र बुद्धीचे तेज यांमुळें हा मुलगा अतिशय बुद्धिमान आहे यांत त्यांना संशय राहिला नव्हता. असे असतांना सामान्य पाठांतरांत, तसेंच इतिहासाच्या सनावली किंवा व्याकरणाचे नियम यासारख्या पद्धतशीर करावयाच्या अभ्यासांत, त्यांच्या मतें अगदीं सोप्या गोष्टींत, तो मागें पडलेला पाहून, असलेल्या बुद्धीचा आळसामुळें उपयोग न करणारा मुलगा अशी त्यांची समजूत झाली होती;

आणि अशा जाणून बुजून अभ्यास न करणाऱ्या मुलाला ताळ्यावर आणण्याकरितां आपल्या सुदर्शन पद्धतीचा पूर्ण उपयोग करावयाचा निश्चय त्यांनीं केला होता. गुरुशिष्यांची मनें अशा रीतीने परस्परांविषयीं कलुषित झाल्यानंतर त्यांच्या नित्य होणाऱ्या घर्षणातून उत्पन्न होणारा अग्नि कोणाचा केव्हा बळी घेईल हे कोणी सांगावे ?

विशेषतः आज दुपारीं वडिलाचें एक पत्र आल्यामुळें मोहनचे चित्त जास्तच क्षुब्ध झाले होते. मासिक प्रगतीचें आचार्यांच्या शेऱ्यासह वडिलांना गेलेलें पत्र त्यांनी त्याला पाहण्याकरिता पाठवून दिले होतें आणि अभ्यासांत प्रगति करण्याबद्दल त्याची बरीच कानउघाडणी केली होती. अभ्यासातील शेऱ्याबद्दल त्याला फारशी फिकीर वाटत नसे. पण वडिलाच्या पत्रांतील प्रत्येक शब्दांत दिसून येणारा त्यांचा राग व क्षोभ त्याला असह्य झाला. ती वेळ संध्याकाळची होती; क्रीडांगणात आनंदाने बागडणारे विद्यार्थी दिसत होते; पलीकडील उंच डोंगरावर वनश्रीचे रम्य सौंदर्य पाहत हिंडण्याची किंवा नदीकाठी वाळवंटांत मित्रांशी थट्टा विनोद करीत बसण्याची ती वेळ होती. अशा वेळी वर्गाच्या खोलीत इतिहासाच्या अर्थहीन सनावल्या खरडीत, लिहून होतांच फाडून टाकण्याकरितांच खरडीत, त्याला तास दोन तास बसलें पाहिजे होते. गेला सबंध आठवडाभर त्याला मनसोक्त असे एकदांहि खेळावयास मिळाले नव्हतें; आजच पाठकशास्त्री त्याच्यावर रागावले होते, आणि कधींहि न सुधारणारा मुलगा म्हणून आचार्यांकडे त्याला पाठविण्याची त्यांनी धमकी दिली होती. सकाळीच गृहपति श्रीपादराव यांनीहि त्याला एक लांबलचक व्याख्यान झोडलें होतें. अखंड उदासीनता आणि उद्वेग यांचेमुळें शरिराला आणि मनाला थकवा आला होता; त्यांतच आजच आलेल्या वडिलांच्या पत्रानें त्याच्या सर्व दुःखावर कडी केली. सर्व शिस्त, नियम, कर्तव्य यांना पार झुगारून देऊन एकाच झटक्यास स्वतंत्र होण्याची बंडखोरी वृत्ति त्याच्या मनांत डोकावूं लागली. स्वतःचा कांहींहि अपराध नसतांना छळ, अपमान, गैरसमज किती दिवस सहन करावयाचा ? अभ्यास करण्याचे, कर्तव्यपालन करण्याचे आपले सर्व प्रयत्न जर अयशस्वी होतात तर विरुद्ध टोकाला जाऊन कर्तव्य, तत्त्व, ध्येय पार झुगारून देण्याचा प्रयोग कां करून पाहूं नये ? चैन,

सुख व स्वैर वर्तन यांच्यामागें लागून स्वतःच्या उन्मादक प्रवृत्तीचे तरी कां समाधान करूं नये ? त्या मार्गानें गेल्यास कितीतरी त्रास वांचेल. दुःख हलके होईल, मुलामधील लोकप्रियतेत भर पडेल. शिक्षकांची अप्रीति होईल हें खरें, पण हल्लींच ती अप्रीति इतकी होती की कसेहि वागले तरी ती वाढणे कसें शक्य होते ? हे उन्मादक विचार मनांत आल्याबरोबर त्याचे रक्त सळसळूं लागलें; त्याचा टाक झरझर चालूं लागला, त्याच्या मुद्रेवर एक प्रकारचें भीषण तेज विलसूं लागले.

चैनी, स्वसुखाच्याच मागे लागलेले, विद्यार्थिगणांत प्रिय असलेले कितीतरी विद्यार्थी विद्याश्रमात त्याला दिसत होते. आपणहि त्यांच्याच मार्गानें जाऊं, त्यांच्याचसारखे सुख भोगूं ही मोहक आशा, हे मनोहर दृश्य त्याला लोभवूं लागले. स्वातंत्र्याची व चित्तशातीची तहान भागविणारे हे सरोवर नसून स्वैर सुखाच्या वाळवंटावरील मृगजल आहे हे त्याच्या लक्षात आले नाहीं. निराशेच्या निबिड अंधःकारांत हा मार्गदर्शक दीप नसून जवळ जाताच दूर पळणारे भुताचे कोलीत आहे हे त्याला समजले नाही.

त्याच्या वडिलांचे पत्र, त्याच्या आईची प्रेमळ मूर्ती, हीं त्याला या मार्गापासून परावृत्त करू लागली. आईबापांवर व भावंडांवर त्याचे निरतिशय प्रेम होतें; त्यांच्या समाधानाकरिता तरी आपण सन्मार्गाने जावे असे त्याला वाटूं लागलें, पण आजपर्यंत त्यांना समाधान देण्याचाच प्रयत्न आपण केला नाही काय ? आणि त्याचें फळ हे आजचें पत्र ! किती निष्ठुर, प्रेमहीन, सहानुभूतिशून्य वाक्ये हीं ! त्या पत्राचा विचारसुद्धां त्याला वेड लावूं लागला !

त्याची शिक्षा संपली; इतिहासाच्या त्या शुष्क सनावळ्या संपल्या आणि त्याचबरोबर त्याच्या मनांत चाललेला हा तुमुल रणसंग्रामहि संपला. आपण लिहिलेल्या त्या कागदांवर टाकानें एक भली मोठी फुली त्यानें काढली, ते कागद तेथे हजर असलेल्या शिक्षकांकडे जरा जोरानेच फेकले आणि वर्गाच्या बाहेर पडून स्वैर स्वातंत्र्याचा उन्मत्त आनंद तो अनुभवूं लागला.

अंतःकरणांतील ही खळबळ शांत करण्याकरितां वेगानें पळत तो क्रीडांगणावर गेला आणि आपले दोस्त नागेश व मनोहर यांना गांठून म्हणाला,

" मन्या, बस्स, ठरलें माझे. हा त्रास आपण बिलकूल सहन करणार नाहीं. सहन करण्याला तरी मर्यादा आहेच ना ? मला या विद्याश्रमाचा वीट आला आहे. आचार्य रत्नाकर याचा वीट आला आहे. गृहपति श्रीपादराव याचा वीट आला आहे. पाठकशास्त्री याचा अगदी अगदीं अगदीं व्वीट आला आहे. "

" हुर्रेर्रे हुर्रे " मनोहर उद्गारला, " आपल्या प्राणांतिक मित्राच्या अंगांत संचार झाला. पहा, पद्याला हे सागूं नकोस अं. "

" अरे, पण झाले काय ? सांगशील तर खरे." नागेशने विचारले,

" व्हायचे आहे काय? किंवा व्हायचे राहिले आहे काय? अभ्यास, शिक्षा, छड्या, छड्या, शिक्षा, अभ्यास, हे माझे विद्याश्रमातले चरित्र आहे. मला वीट आला आहे. मी एक क्षणभरसुद्धा आता हे सहन करणार नाही. काय वाटेल ते झाले तरी मी ह्याची सव्याज फेड करणार. पहाच तूं. "

" कायरे, काय गडबड चालली आहे?" त्याच वेळेला सातव्या इयत्तेतील पहिल्या नंबरचा विद्यार्थी श्रीकान्त तेथून जात होता, त्यानें त्याचे अखेरचे वाक्य ऐकून प्रश्न केला.

" कांही नाही. नेहमीचेच रडगाणे, पाठकशास्त्र्यांचा त्रास, " नागेशने थोडेंसे निष्काळजीपणाने, थोडेंसे नापसंतीच्या स्वरांत उत्तर दिले. मोहनचे तिरस्काराचे उद्गार श्रीकान्ताच्या लक्षांत न यावेत अशी त्याची इच्छा असेल, किंवा ' तूं त्या नवीन आलेल्या आळशी मुलाशी हल्ली फारशी दोस्ती करतोस' असे त्याला एकदा श्रीकान्ताने बजाविले होते त्याचाहि हा परिणाम असेल.

" काय, आज नवीन काय झाले ?"

" कांही नाहीं. संस्कृतचीं रूपे चुकलीं होतीं म्हणून मला वाटते त्यांनीं ह्याला शिक्षा केली होती." नागेशचा उत्तर देण्याचा स्वर मोहनला आवडला नाहीं. शाळेच्या मुख्य मंत्र्यादेखत आपल्याला हिणविण्याचा त्याचा हेतु आहे असा त्याला संशय आला.

" इतकेंच ना? " श्रीकान्त म्हणाला, " मग त्याला उपाय सोपा आहे. थोडा जास्त अभ्यास करावा म्हणजे झाले..." आणि इतके बोलून एक श्लोक गुणगुणत तो तेथून निघून गेला.

" जास्त म्हणजे काय समजतो हा ?" हातवारे करीत मोहन म्हणाला. "मी जेव्हां पहिल्यांदा विद्याश्रमांत आलो तेव्हा पहाटे उठून डोके उठेतोंपर्यंत घोकीत बसत असे. त्याच्या बापजाद्यांनांसुद्धां इतका अभ्यास केला नसेल."

" होय, पण पाठकशास्त्र्यांना दोष देण्यात काय फायदा ?" नागेश म्हणाला. " तुझे जर उत्तर चुकलें तर अभ्यास केला नाहींस असेंच म्हणणार ते."

" आपले फार उपकार झाले," तुटकपणे मोहननें उत्तर दिले. " चल, डुल्या, चलतोस ना ? "

नागेशला वाईट वाटलें. आपण मोहनशीं थोडेंसे बेपर्वाईने वागलो, निदान जरूर ती सहानुभूति दाखविली नाही ही गोष्ट त्याच्या मनास लागली. मोहन आणि मनोहर चालूं लागल्यावर त्याचेकडे कितीतरी वेळ तो पाहत राहिला.

एकदम तो उठून उभा राहिला, आणि त्यांच्यामागे पळत जाऊन मोहनचा हात धरून म्हणाला, " मोहन, रागावूं नकोस. तुझ्या मनाला लागेल असे कांहीं मी मुद्दाम बोललो नाही. पण एखाद्या मुलाचा लागोपाठ दोनतीनदा जर अभ्यास झालेला नसला तर शिक्षकांनीं तरी काय करावें ? म्हणून मी म्हणत होतों कीं पाठकशास्त्र्यांवर रागावूं नकोस. "

" आग लाव त्या पाठकशास्त्र्यांना, " मोहन आता अगदी चिडला होता. त्याने नागेशचा हात झिडकारून टाकला.

"ठीक आहे, मोहन, आतां पुनः तुझें नांव घेतलें तर नांवाचा नागेश नव्हे. मनोहर, तुझें पुस्तक तिकडेच पडलें आहे. नको आहे वाटते तुला तें ? " असें म्हणून तो सावकाश चालूं लागला. प्रत्येक मनुष्याचें असें एक नाजूक मर्मस्थान असतें की, इतर ठिकाणीं झालेल्या केवढ्याहि आघातांना तो मोजीत नसला तरी त्या ठिकाणी झालेला क्षुल्लक आघातहि त्याला सहन होत नाहीं. एरव्हीं सर्वगुणसंपन्न असलेल्या नागेशचे मर्मस्थान त्याच्या गर्वात, ताठ्यांत, अभिमानांत होतें, आणि अपमानाची अस्पष्ट लकेरहि त्याला असह्य होई. कोणत्याहि मुलांपेक्षां मोहनशीं त्याचा स्नेह जास्त दृढ होता. म्हणून अशा क्षुल्लक कारणाकरितां त्याचा स्नेह तोडतांना त्याला वाईट वाटलें, आणि जड अंतःकरणाने तो तेथून निघून गेला.

थोडासा उच्छृंखल व विनोदी वृत्तीचा असला तरी मनोहर अंतःकरणाचा सुशील होता. मोहनशी दोन गप्पा मारून हंसून विनोद करून त्याच्या मनांत आलेले दुष्ट विचार घालवून टाकण्याचा त्याचा इरादा होता. पण आज आपलें बोलणें ऐकण्यासारखी त्याची मनःस्थिति नाहीं हे त्यानें तत्काळ ताडलें. आणि गंभीरपणें वाद करण्याचे किंवा अमुक मार्ग श्रेयस्कर आहे म्हणून तो अनुसरावा असें प्रतिपादन करण्याइतके मनोधैर्य त्याचे अंगीं नव्हतें. म्हणून मोहनला एकटा सोडून आपले पुस्तक घेण्याकरिता तो परतला.

मोहनपेक्षा सातपटीनें अधिक दुष्ट असलेली मुलें वसतिगृहांत कांहीं कमी नव्हतीं. आपल्या गोटांत नवीन येऊं पाहणाऱ्या या होतकरू उमेदवाराचें त्यांनी आनंदाने स्वागत केलें; आणि पाठकशास्त्र्यांची निंदा, तिरस्कार, उपहास आणि द्वेष यांनी फुलवून त्याचा राग त्यांनी अधिकच चेतविला. अर्थात् त्या दिवशींचा अभ्यासाचा सर्व वेळ हास्यविनोद, आणि मूर्खपणाच्या चेष्टा करण्यातच मोहनने घालविला; आणि गृहपतींनी त्याबद्दल त्यांच्या मतानें त्याला जरूर ती शिक्षाहि अर्थात् केलीच.

दुसरा दिवस उजाडला, आणि व्यासविद्याश्रमांतील ठराविक कार्यक्रमाचें चक्र आपल्या नेहमीच्या गतीनें सुरू झाले. अत्यंत आनंदी आणि उत्साही मुद्रेने आज सकाळपासून मोहन चैन करीत हिंडत होता. त्याच्या अंगांत उन्मत्ततेचें वारे संचारले होते. त्याच्या श्वासोच्छ्वासांतूनहि स्वातंत्र्याचे, स्वैर वृत्तीचे फवारे निघत आहेत की काय असा भास होत होता. वर्गात जातांच पहिल्याच प्रश्नापासून त्याची उत्तरें चुकण्यास सुरवात झाली. रोजच्या इतपतहि अभ्यासाची आज तयारी नाहीं हें पाहून पाठकशास्त्री यांनीं त्याला शंभर आर्या लिहून आणण्याची शिक्षा सुनावली. शिक्षा ऐकून खालीं बसतांना आपल्या हातांतील प्रत्येक पुस्तक धाड धाड आवाज करीत त्याने आपल्या डेस्कावर टाकलें. प्रत्येक पुस्तकाबद्दल त्याला शंभर आर्या मिळाल्या. हे ऐकतांच उद्धटपणानें व बेदरकार वृत्तीनें तो एकदां हंसला, ' इतकेंच ' असें कायसें पुटपुटलाहि. पाठकशास्त्री यांनीं त्याला आणखी दोनशें आर्या लिहून आणण्यास सांगितलें. एकीकडे पाठकशास्त्री यांचा अधिकारमद व दुसरीकडे निष्कारण चाललेल्या छळामुळें वैतागून गेलेल्या मोहनचा निराश उन्मत्तपणा यांचे हे युद्ध

वर्गातील सर्व विद्यार्थी आश्चर्याने व कौतुकाने पाहत होते. आपण आतां काय करतों, भित्रेपणाने आपली पिछेहाट होते की काय याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत हे जाणून मोहनला अधिकच चेव आला. टरकन् आपल्या वहींतील एक कोरें पान त्याने फाडले; आणि टाकाचा कर्कर् आवाज करीत वेडेवाकडे फराटे काढीत दो–न–शें–आ–र्या हे शब्द मोठ्या ढोबळ अक्षरांत त्यावर लिहिले, आणि तो कागद पाठकशास्त्री यांच्या समोर टेबलावर टाकला.

आजपर्यंत कधींहि न घडलेलें उद्धटपणाचें, बेपर्वाईचें, व अविचारी धृष्टतेचे हे प्रदर्शन पाहून पाठकशास्त्री यांच्या रागाचा पारा कमालीचा चढला. पण त्यांच्या आत्मसंयमनाची तारीफच केली पाहिजे. आपला राग बिलकुल दिसूं न देतां ते म्हणाले, " देशमुख, तुझे मस्तक आज ठिकाणावर दिसत नाहीं. तुझ्यासारखा अविचारी आणि उद्धट मुलगा मीं आजपर्यंत पाहिला नाहीं. हा तास संपल्यानंतर तुला छड्या मिळतील, आणि वर्ग सुटल्यानंतर अर्थात् एक तास तूं उभा रहाच."

" Thank you, Sir" मोहनने उत्तर दिले आणि कृत्रिम हास्य करून तो आपल्या जागेवर जाऊन बसला. पण हा शेवटला अपराध पाठकशास्त्री यानीं लक्षांत घेतला नाहीं.

आपल्या जागेवर बसल्याबसल्या मोहनने खालील मजकूर एका कागदावर लिहिला:

| पाठकशास्त्री यांचे कर्ज | देणे |
|---|---|
| अभ्यास न करण्याबद्दल | १०० आर्या |
| पुस्तके आपटण्याबद्दल | ३०० आर्या |
| हंसण्याबद्दल | २०० आर्या |
| " दोनशे आर्या " लिहिण्याबद्दल | छड्या |
| एक तास उभे राहणे | अर्थात् |

उपकारांचें केवढें ओझें !

कागदाच्या मागील बाजूवर ' जाऊं नये ' हे शब्द मोठ्या अक्षरांनीं खरडले आणि तो कागद आपल्या मित्रमंडळींना तो दाखवूं लागला.

" देशमुख, तो कागद इकडे आण पाहूं."

मोहनला ह्या खेपेला थोडीशी भीति वाटली—जाऊं नये लिहिलेली बाजू वर करून त्याने कागद शिक्षकांच्या हातीं दिला.

"काय लिहिलें आहेस हे?"

"जाऊन ये." हे उत्तर ऐकतांच वर्गातील मुलांना हंसूं आवरेना. कारण त्याचा "जाऊं नये" हाच अर्थ मोहनच्या मनात होता, हे त्यांना पक्के माहीत होते.

पाठकशास्त्र्यांनीं थोडा वेळ त्याच्याकडे निरखून पाहिले, "देशमुख, तूं इतका मूर्ख असशील अशी मला कल्पना नव्हती; प्रत्येक अपराधाला शिक्षा ही झालीच पाहिजे. वर्गाच्या बाहेर चालता हो. दिलेल्या सर्व शिक्षा तर तुला भोगल्या पाहिजेतच, शिवाय तुला मी आचार्यांकडे पाठवीन."

पाठकसाहेब, आपण चुकता आहा! आपली ही चूक सद्धेतुमूलक असली तरी परिणामीं भयंकर आहे. मनुष्यस्वभावाचे व मुलाच्या मनोवृत्तीचे सूक्ष्मपणे अवलोकन आपण केलें असते तर आपल्या लक्षात आले असतें कीं मोहन या वेळी रागाने बेफाम झाला होता. शालेय जगांतील त्याच्या समजुतीप्रमाणे चाललेला उलटा न्याय आणि निर्दय छळ त्याला असह्य झाला होता. या क्षणी कितीहि कडक शिक्षा केली असती तरी त्याला ताळ्यावर आणणें शक्य नव्हतें. अधिकाधिक शिक्षा करून त्याला चिडविल्यास त्याने असे एखादे बेफामपणाचें कृत्य केले असते कीं, मग त्याला शाळेतून घालवून देणें तुम्हांला अवश्य झालें असतें! एखाद्या मुलाला त्याची इच्छा नसतांहि बेफाम बनविणे इतकें सोपें आहे! तुमचे हेतु न्यायमूलक आणि हित करण्याच्या बुद्धीनें प्रेरित झालेले असले तरीहि मुलाच्या हृदयांतील शुद्ध भावनेचे कोमल अंकुर इतक्या सहज रीतीनें करपवून टाकतां येतात! तुम्ही जर त्याला प्रथमच वर्गाच्या बाहेर जाण्यास सांगितलें असते, तुम्ही जर त्याला म्हणालां असता कीं 'देशमुख, आज तुझें चित्त स्थिर दिसत नाही, मी तुला सोडून देतों.' तर मोहन तात्काळ गाई-सारखा गरीब झाला असता!

पण आतां निडर वृत्तीने, दांतओंठ चावीत, धडाधड दार आपटीत, मोहन वर्गाच्या बाहेर चालता झाला. परंतु दुसऱ्याच क्षणीं, त्याच्या बंडखोर वृत्तीस प्रोत्साहन देणारें त्याच्या मित्रांचें पाठबळ नाहींसें होतांच हताश

होऊन बागेंतील एका बाकावर तो बसला आणि मुक्तकंठानें रडूं लागला. एखाद्या मित्रानें या क्षणी सहानुभूतीचा एकच शब्द उच्चारून त्याला सन्मार्गवर्ती केला असता तर त्या मुलावर कोसळणारे कितीतरी भावी दुःख टळले असते. नागेश याच वेळी त्या बाजूने जात होता. त्याला पाहतांच मोहनने आपले डोळे पुसले आणि ताठ बसण्याचा प्रयत्न केला. पण नागेश फसला नाहीं. अश्रूंनी आर्द्र झालेले डोळे त्याने पाहिले होते आणि कांहीतरी विशेष घडलें असलें पाहिजे अशी त्याला कल्पना आली. इतक्यांत कालच क्रीडांगणावर झालेला क्षुल्लक अपमान त्याला आठवला. एक क्षणभर तो तेथें थबकला. पण अखेर त्याचे मानी हृदय त्याला तेथून घेऊन गेलें, आणि अखेरची संधि वायां गेली.

---

## प्रकरण सातवें

# सुडाची लहर

**क्रोधं प्रभो संहर संहरेति**
**यावद्गिरः खे मरुतां चरन्ति ।**
**तावत्स वह्निर्भवनेत्रजन्मा**
**भस्मावशेषं मदनं चकार ॥**

मधली सुट्टी झाली, आणि सर्व शिक्षक कॉमनरूममध्ये (शिक्षकांच्या खोलींत) एकत्र जमले. आंत आल्याबरोबर पाठकशास्त्री यांनी एका ईझीचेअरवर अंग टाकलें आणि कष्टानें एक निःश्वास सोडला.

"हे काय, शास्त्रीबोवा, आज कांही विशेष ?" श्रीपादरावांनीं त्यांची उद्विग्नता पाहून प्रश्न केला.

"छे हो, तसें कांही विशेष नाही. पण तो नवीन आलेला मोहन देशमुख नाही का, आज त्याला छड्या मारण्याचा प्रसंग आला. छे, कसला हट्टी आणि पाषाणहृदयी मुलगा आहे तो !"

"अगदी खरें आहे. माझ्याच विभागांत राहतो तो; त्याला शिक्षा केल्याशिवाय एक दिवससुद्धां जात नाही. पण तुम्हीसुद्धां हात टेंकलेत म्हणावयाचे त्याचेपुढें ! आज काय केलें त्यानें?"

मोहनचे सर्व प्रताप पाठकशास्त्र्यांनीं थोडक्यांत सांगितले.

"अशा मुलाला छड्यांशिवाय दुसरा इलाजच नाहीं. पण त्याचा तरी कांही उपयोग झाला का ?"

"काय उपयोग व्हायचा आहे! कृत्रिम उपरोधिक सभ्यपणा धारण करून तो खोलींत आला आणि स्वस्थ उभा राहिला. मी दोनच छड्या मारल्या. तुम्हांला माहीतच आहे, छडीचा उपयोग करणें मला आवडत नाही ते. पण आज नाइलाज झाला. मी पुरे केल्यावर शांतपणे विचारतो 'झाले काम? जाऊं आतां?' खरेच मला त्याच्याबद्दल फार वाईट वाटते. मी त्याला आज आचार्यांकडे पाठविणार आहे आणि तेथें त्याला चांगला चोप मिळेल."

"कसला खराब मुलगा!" श्रीपादरावांनी आपली संमति दर्शविली.

"छे हो, तो इतका खराब नाही आहे. त्याच्यांत पुष्कळ चांगले गुण आहेत, पण भारी हट्टी आणि उद्धट पोरगा!" पाठकशास्त्र्यांनाहि मोहनचे कांहीं गुण आवडूं लागले होते हे काहीं खोटें नव्हतें.

"हे पहा, मी कांहीं बोलूं कां ?" शांताराम नावाचे एक शिक्षक हा संवाद लक्षपूर्वक ऐकत बसले होते ते म्हणाले. "त्या मुलासंबंधीं तुमचे दोघाचें म्हणणें बरोबर नाही असे मला वाटते. फार चांगला मुलगा आहे तो."

"तुम्हाला काय त्याची माहिती ?"

"अशीच एक दिवस झाली. एकदोनदा मी त्याला वर्ग सुटल्यानंतर खोलींत उभा असलेला पाहिला. नवीनच आलेल्या मुलाला अशा वारंवार शिक्षा घेण्याचा प्रसंग यावा हें पाहून मला जरा आश्चर्य वाटले; म्हणून काय झाले हे मी त्याला विचारलें. त्याने मला प्रामाणिकपणें सांगितले. 'मी झटून अभ्यास करतो, पण हा सगळा अभ्यास मला अगदी नवीन आहे.' त्याच्या मुद्रेवरील नम्रता, प्रामाणिकपणा पाहून कोणालाहि त्याचें म्हणणें खरें वाटले असते. असाच एक दिवस संध्याकाळी मी त्याला घेऊन नदीच्या कांठी खूप लांब फिरावयास गेलो होतो. तेथें आमचें पुष्कळ बोलणे झाले, आणि माझी खात्री झाली की तो फार बुद्धिमान् व गुणी मुलगा आहे; मठ्ठ किंवा मूर्ख खास नाही."

"मला वाटतें, शांताराम, तुमच्याजवळ कांहींतरी जडीबुट्टी असली पाहिजे. पुष्कळ नाठाळ मुलांना तुम्ही ताळ्यावर आणतां ही गोष्ट कांहीं खोटी नाही. तो शरच्चंद्रसुद्धां हल्लीं बरा वागूं लागला आहे."

" शरच्चन्द्र वाईट होता कधी ? पण एखाद्या कमी बुद्धीच्या साध्याभोळ्या मुलाला सगळेच जर खायला उठले तर त्यानें तरी करावें काय ? मग कोठेंतरी तो पाणी दाखवितोच."

"शरच्चंद्रसारख्या मठ्ठ मुलालाहि तुम्ही चांगला म्हणूं लागलेत आतां ! मला तर तो शुद्ध दगड वाटतो. तुमची यक्षिणीची कांडी आम्हांला तरी द्या थोडिशी."

" प्रम आणि सहानुभूति–मजजवळ दुसरा मंत्रतंत्र कांहीं नाही."

"आमचेंसुद्धां मुलांवर प्रेम आहेच." शुष्क अंतःकरणाचे श्रीपादराव म्हणाले. " मी तर त्यांना उलट जास्तच मोकळीक देतो असें मला वाटते."

" हुशार बुद्धिमान् मुलें तुम्हांला आवडतात हें खरें, पण ज्यांना तुम्ही मठ्ठ समजतां त्याच्या बाबतींत हें खरें नाही. मुलाच्या दृष्टीनें त्यांच्या अडचणी तुम्ही समजून घेत नाहीं. त्यांच्या दृष्टीनें जगाकडे पाहत नाहीं. एखादा मुलगा थोडा मठ्ठ असला तरी त्यालाहि चालवून घेतला पाहिजे. पण काय हो, शास्त्रीबोवा–" संभाषणाचा ओघ श्रीपादराव यांस अप्रिय होत चालला आहे हे लक्षांत येतांच शांताराम यांनीं गोष्ट बदलली. " पण काय हो, शास्त्रीबोवा, ह्या देशमुखच्या बाबतींत तुमच्या शिस्तीचें जूं जरा हलकें करून पहाना कांहीं उपयोग होतो का ?"

" हें पहा, शांताराम, मीं कधी त्याला मुद्दाम त्रास दिला आहे असें नाहीं वाटत मला. एकाला जे नियम लागू तेच सगळयांना. मला असा पक्षपात नाहीं करतां येत."

" रागावूं नका, शास्त्रीबुवा, पण असली पोलादी शिस्त श्रेयस्कर आहे असें मला वाटत नाही. श्वन्, युवन्, मघवन्, [ कुत्रा, तरुण मनुष्य, इंद्र ] हे सर्व व्याकरणांत एकाच नियमानें चालतील, पण व्यवहारांत त्यांना एका पंक्तींत बसवून कसें चालेल ? आपल्या शाळेंत हजार प्रकारचीं हजार मुलें येणार, येथें 'साहे ओझें त्यास तेचि द्यावें.'"

" होय, तुम्ही म्हणतां त्याचा मी विचार करीन. पण आज तर मी त्याला आचार्यांकडे पाठविण्याचें ठरविलें आहे."

" ते त्याला आणखी शिक्षा न करोत म्हणजे झालें."

" कां ? मग त्यांनी दुसरें काय करावें ? "

" कारण त्यामुळे तो उलट जास्तच निराश होईल. त्याच्या मनोवृत्तीची मला माहिती आहे. मला वाटते शिक्षेचा परिणाम त्याच्यावर वाईटच होईल."

" मला नाहीं तसें वाटत. "

इतक्यांत वर्ग सुरू होण्याची घंटा झाली आणि हें संभाषण तितकेंच राहिले. संध्याकाळी वर्ग सुटण्याच्या सुमारास मोहन आचार्यांच्याकडे गेला. त्याचा अपराध उघड दिसत होता. त्यानें सर्व प्रश्नांची खरी आणि स्पष्ट उत्तरें दिली. त्याने दाखविलेला उद्धटपणा आणि शिक्षकांशी केलेलें अपमानकारक वर्तन व्यासविद्याश्रमांत क्वचितच घडे. अर्थात् आचार्य रत्नाकर यांनीं त्याला कशा व किती छड्या दिल्या असतील याची कल्पना वाचकांनीच करावी.

तीव्र अपमान, क्रोध, तिरस्कार इत्यादि मनोविकारांनी मोहनच्या अंतः-करणांत खळबळ उडवून दिली. संध्याकाळ होत आली होती. वर्ग सुटून सर्व मुलें छात्रालयांत केव्हांच गेली होती. पण मोहनच्या वर्गातील मुलें त्याची वाट पाहत अजून बसली होती. मोहन आल्याबरोबर सर्वांनीं त्याचे प्रेमानें आणि सहानुभूतीनें स्वागत केले. पाठकशास्त्र्याना सर्वांनी लाखोली वाहिली आणि त्यांच्या कोशांत असतील नसतील त्या सर्व निंदाव्यंजक शब्दांची उज-ळणी झाली. मोहनने त्यात कांहीच भाग घेतला नाही. त्याच्या अंतःकरणां-तील मनोविकारांची तीव्रता शाब्दिक हल्ल्यांनी समाधान मानून घेण्याच्या पलीकडे गेली होती. त्याच्या डोळ्यांत भीषण तेज चमकत होतें, उग्रतेची कृष्णछाया त्याच्या भव्य मुद्रेवर पसरून तिला विरूपता आणीत होती. सौज-न्याच्या भावनांना दडपून टाकून दुष्ट मनोविकारांनीं त्याचें अंतःकरण काबीज केलें होते.

" ह्याचा सूड उगवावयाला आपल्याला कांहींच करतां येणार नाही काय ?" मोहनच्याच विभागांत राहणारा किसन म्हणाला.

" काय करायचें ? " किती तरी आवाज एकदम ऐकूं आले.

" मी सांगतों काय करायचें तें, " नानानें सुचविलें. " आपल्या शिक्षांची नोंद असलेली ती दुष्ट वही आपण जाळून टाकूं."

" गरीब बिचारी वही, " मनोहरला चेष्टेशिवाय बोलतांच येत नव्हते. " जळत असतांना तिच्या अंतःकरणाला किती वेदना होतील ! तिला फुकटच्या फाकट हुतात्मा कां करितां ? मोहन, तूं असल्या भानगडीत पडूं नकोस."

" मी पडणार. कांहीं न करतांहि मला शिक्षा, छड्या, फटके खावे लागतातच आहेत. मग काहीतरी करून तरी मी छड्या खातों. "

" पण टेबलाला कुलुप आहे, " नानानें टेबल तपासलें.

" मी उघडतो, " मोहन म्हणाला, " पद्या, तो रूळ आण पाहूं इकडे."

" मुळींच नाहीं, " पद्मनाभाने शांतपणे उत्तर दिलें.

" काय भागुबाई आहेस, " नाना म्हणाला. " रूळ देण्याबद्दल काहीं तुला शिक्षा होणार नाही."

" शिक्षेचा काय प्रश्न आहे ? जी गोष्ट मला पसंत नाही ती तुमच्या चेष्टेच्या धाकानें मी केली तर तोंच खरा भ्याडपणा. तूं मार मला, " नानाने त्याचा हात मुरगळला हें पाहून तो म्हणाला, " पण जी गोष्ट मला आवडत नाहीं ती माझ्या हातून करवणें तुला शक्य नाही. "

" पाहतोच मी. " नानानें त्याचा हात अधिक जोराने मुरगळला. पद्मनाभाच्या डोळ्याला पाणी आले, पण त्याने रूळ दिला नाहीं.

" नान्या, सोड त्याचा हात. " मनोहर तिरस्कारानें ओरडला. तो पद्मनाभाची चेष्टा करीत असे, पण त्याचे त्याच्यावर मनापासून प्रेम होते. " हा पाहा, रूळ माझेजवळ आहे. मी देत नाही तुला. वही जाळणारे तुम्ही अक्कलशून्य गाढव आहांत. चार दिडक्या टाकून पाठकशास्त्री नवी वही आणतील आणि वही जाळण्याबद्दल आणखी एक शिक्षा त्यात लिहून ठेवतील. "

" पण माझ्या ६०० आर्या आणि इतर शिक्षा त्याना थोड्याच आठवणार आहेत ? आण तो रूळ इकडे. " मोहन म्हणाला.

" हो, हो, मोहन, जरा शात हो. तुझ्या निम्म्या आर्या मी लिहून देईन. आणि दोन टाकांनीं बाकीच्या लिहीं. दोन टाकांची ही खुबी मी शिकवीन तुला. " पण मोहन थाबत नाहीं हे पाहून तो पुढें म्हणाला. "हा पहा, रूळ माझेजवळ आहे. ज्याला हवा असेल त्यांनीं दोन हात करून घ्यावा. " आणि खरोखरच मनोहर लढाईच्या पवित्र्यांत उभा राहिला.

"कुछ फिकिर नही." मोहननें जवळचें स्टूल उचललें आणि धाडदिशी टेबलावर मारलें. अगोदरच थोडी खिळखिळी झालेली वरची फळी, तात्काळ विचकली.

"अरे बापरे, आतां सगळ्यांचीच कंबख्त होणार" घाबरलेला नाना म्हणाला.

"झालें ते होऊन गेलें. आतां काय त्याचें?" असे म्हणून किसननें टेबलाच्या खणांत हात घालून नोंदवही बाहेर काढली. "हे घ्या पान नंबर एक-अग्नये स्वाहा," पहिले पान टरकावीत आणि खिशांतून पेटी काढून तें पेटवीत तो म्हणाला. "दुसरे पान कोणाला फाडावयाचे आहे?"

"वाघ म्हटले तरी खातो अन् वाघोबा म्हटले तरी खातोच." नानानें दुसरे पान फाडले आणि पहिल्या पानाच्या विझत आलेल्या जाळावर धरलें.

"आणि हें तिसरें" दुसऱ्या एका मुलाने एक पान फाडून वही मनोहर-पुढें केली.

"चांगला शहाणपणा. एका मेंढरानें विहिरींत उडी घेतली की बाकी-च्यांनींहि त्यांतच पडावयाचें. खासा न्याय!" पान फाडण्याची त्याची इच्छा नव्हती. पण आपण शिक्षेला भितो असे इतरांनी म्हणावें हेंहि त्याला खपत नव्हतें. त्याचा निश्चय लवकर होईना.

"आपल्या मनाला पटेल तेंच आपण करावें." पद्मनाभ मनोहरला म्हणाला. "आण ती वही इकडे. मी ती परत ठेवून देतों. दगडाची ठेच लागली म्हणजे दगडालाच मारणाऱ्या लहान मुलांसारखें काय करतां!"

"किंवा पाठींत बसणाऱ्या काठीलाच कुत्रा चावतो त्याप्रमाणें," मनोहर म्हणाला. "खरेंच पद्मा, तुझें म्हणणें खरें आहे. मी असला मूर्खपणा करणार नाहीं."

"कांही हरकत नाहीं," शंकर जामदार पुढे सरला. "मी पाठकशास्त्र्याचा सूड उगवणार." असे म्हणून पद्मनाभाच्या हातांतील वही हिसकावून त्याने ती सगळीच्यासगळीच जाळावर धरली.

"म्हणजे, मला जाळायला कांहींच शिल्लक उरलें नाहीं की," मोहन म्हणाला. "त्या टेबलाच्या खणांत आणखी कांहीं आहे कां? हें पहा, मासिक परीक्षांच्या जुन्या उत्तरपत्रिका! कसा छान भडका होईल यांचा!"

" थांब थांब, करतो आहेस काय हें ! " मनोहर काकुळतीनें म्हणाला. " त्या उत्तरपत्रिका नाहीत त्या. जुन्या उत्तरपत्रिका केराच्या टोपलींत टाकतात ते. अरे काय केलेस हें ! कांहीतरी महत्त्वाचे कागद आहेत ते ! "

" जाऊं दे ! " जळूं लागलेले कागद वांचविण्याचा प्रयत्न मनोहर करीत होता, त्याचा हात धरून मोहन म्हणाला, " काही का असेना. ते आता जळाले." ते कागद फडफडत जळूं लागले. थोड्याच वेळांत वेड्यावांकड्या काळ्या पानांचा ढीग फक्त शिल्लक उरला.

खोलीत एकदम स्तब्धता पसरली. काहीतरी भयंकर गोष्ट घडली ही, आणि आतां त्याबद्दल चांगलीच खरडपट्टी निघणार हें मुलांना कळून चुकले.

खोलींतून बाहेर पडतांना मनोहर मोहनला म्हणाला, " ते महत्त्वाचे कागद तूं उगीच जाळलेस, कसला तापट मुलगा आहेस तूं ! "

" आतां काय त्याचे ! " मोहनचा उन्माद विरूं लागला होता; झाल्या गोष्टीबद्दल त्यालाहि थोडेसें वाईट वाटूं लागले होते.

" आतां काहींच कां करतां येणार नाहीं? "

" होईल तो परिणाम भोगावयाचा ! दुसरें काय ! "

" मला वाटतें, तूं पाठकशास्त्र्यांकडे जाऊन सगळी हकीगत आधीच सांगितलीस तर ! "

" शक्यच नाहीं. " मोहन निश्चयानें म्हणाला, " आजपर्यंत माझा छळ करण्याशिवाय त्यांनी दुसरें कांहीच केलें नाहीं. मला त्यांची परवा नाहीं. "

"मग मी जाऊन सांगतो. माझी खात्री आहे, त्यांना जर सर्व गोष्टी सांगितल्या तर ते तुला क्षमा करतील."

" खरेंच डुल्या, तूं किती चांगला आहेस. पण आतां होईल तें होईल, तूं जाऊं नको. "

" बाकी, मोहन, मीं भित्रा आहें म्हणून मी आज मागें राहिलो असें समजूं नकोस तूं. मीहि तुमच्यापैकींच एक आहें आणि होईल ती शिक्षा सर्वांच्या बरोबर भोगीन मी. पण, हें उघडकीस नाहीं आलें तर किती छान होईल नाही !"

पण मनोहरने थोडा दूरवर विचार केला असता तर हें पाप उघडकीस यावें असेंच त्याला वाटलें असतें. गुप्त राहिलेलें पाप मुलांच्या चारित्र्याच्या

बघतां बघतां चिंधड्या उडवून टाकतें हे त्याच्या लक्षांत आले असतें. मोहनचें सुदैव की त्याच्या उच्छृंखल मनोवृत्ति गुप्त राहिल्या नाहींत. तो भाग्यवान् म्हणूनच त्यानें केलेला स्वैर उन्मत्तपणा उघडकीस आला आणि त्याला शिक्षा झाली.

मोहनने पाठकशास्त्रयांचें टेबल फोडून त्यांतील महत्त्वाचे कागद जाळून टाकले, ही गोष्ट पांचदहा मिनिटांच्या आंतच सर्व मुलांत पसरली, आणि ठिकठिकाणीं लहानलहान टोळ्या करून हलक्या आवाजांत त्याची चर्चा होऊं लागली. 'त्याला चांगली शिक्षा होईल. बहुतेक विद्याश्रमांतून घालवून देतील' असेंच बहुतेकांचें मत पडलें. जेवतांना नागेशहि काय झाले याची चौकशी लांबून लांबून करीत होता. पण मोहनच्या जवळच त्याचें पान होते तरीहि त्याने मोहनला त्याविषयीं विचारले नाहीं. मानी, गार्वेष्ठ पण खुळ्या मुलांच्या स्वभावास अनुसरून त्यानें मोहनशीं अबोला धरला होता. भोंवतालीं काय चाललें आहे तिकडे लक्ष देण्याइतके मोहनचेंहि चित्त स्थिर नव्हतें; आणि अशा रीतीनें ऐन वेळीं आपल्या मित्राचा सल्ला आणि सहानुभूति मोहनला मिळूं शकली नाहीं.

रात्र झाली. मोहन आपल्या अंथरुणावर जाऊन निजला. सकाळपासून घडून आलेले सर्व प्रसंग चित्रपटांतील देखाव्यासारखे त्याच्या डोळ्यांपुढें दिसूं लागले. एका दिवसांत आपल्या मनोवृत्ति इतक्या बेताल होतील आणि विद्याश्रमांतून घालवून देण्याइतका भयंकर अपराध आपण करूं ही गोष्ट दोन महिन्यांपूर्वी त्याला खरी सुद्धां वाटली नसती. मनोविकारांचें आपण वेळेवर संयमन करूं शकलों नाहीं, त्यामुळें आपल्यापेक्षां सर्व प्रकारें अनेकपटींनीं अधिक दुष्ट असलेल्या मुलांपेक्षांहि आपली परिस्थिति आपल्या हातानेंच आपण जास्त भयंकर करून घेतली' असें त्याला वाटूं लागलें.

दुर्दैवी मोहन ! पण खरोखरीच तो दुर्दैवी होता काय ? मानवी मनांत बीजरूपानें वास करीत असलेल्या दुष्ट प्रवृत्ति फोंफावून त्यांचीं कटु फळें चाखण्याचा प्रसंग येण्यापूर्वींच त्यांचे अंकुर निर्दयतेनें खुडून टाकण्यांत परमेश्वराचें प्रेम आणि सदयताच दिसून येत नाहीं काय ?

# प्रकरण आठवें

# जळलेला लेख

दुसरे दिवशी वर्गात येतांना मोहन कोणत्या मनःस्थितींत असेल याचे वर्णन करणे शक्य नाहीं. अपराधाची जाणीव त्याच्या अंतःकरणांत शल्यासारखी टोचत होती आणि तो उघडकीस येईतोपर्यंत त्याचें मन इतकें अस्वस्थ झाले होते कीं, त्याचे कोणत्याच गोष्टीकडे लक्ष लागेना. होणारी शिक्षा भयंकर असणार याची त्याला कल्पना होतीच पण त्या शिक्षेपेक्षा त्या शिक्षेची कल्पनाच त्याला दुःसह झाली.

अखेर जामदाराची उत्तर देण्याची पाळी आली. आत्मनिष्ठ तपस्व्यांप्रमाणे स्वतःच्या प्रौढींतच समाधान मानणारा, अभ्यास, वर्ग, शिक्षक या सर्वांकडे सारख्याच तुच्छतेनें पाहणारा, कोटाच्या सुरकुत्या व टोपीच्या बाहेर डोकावणारे सुंदर भांग पाडलेले, सुवासिक तेलाच्या वासाने दरवळलेले केस वारंवार साफसुफ करणारा शंकर जामदार उत्तर देण्याकरितां उभा राहिला. एखाद्या क्षुद्र जंतूची कींव करावी त्याप्रमाणे त्याच्या पोकळ आढ्यतेची कींव करणाऱ्या दृष्टीनें पाठकशास्त्री त्याच्याकडे पाहतच राहिले.

"आजहि अभ्यास झालेला नाहींच, जामदार. नेहमींप्रमाणें आजच्या कविता दोनदां लिहून आणा." पाठकशास्त्री आपली नोंदवही काढण्याकरितां टेबल उघडूं लागले.

"आतां बेतली!" अत्यंत उत्कंठेने सर्वांचे डोळे त्यांचेकडे लागले. टेबल मोडलेलें त्यांच्या दृष्टीस पडलें.

"टेबल कोणीं मोडले ?"

उत्तर नाही.

"अन् माझी नोंदवही कोठे आहे ?"

उत्तर नाहीं.

"आणि माझें--"

अत्यंत आतुरतेने पाठकशास्त्री यांनीं टेबलाच्या खणाचा कोपरान् कोपरा धुंडाळला.

" माझे हस्तलिखित पुस्तक मी येथे ठेवलें होतें तें काय झाले? " त्यांच्या आवाजात चिता आणि दुःख उघड दिसून येत होती.

" माझी खात्री आहे, माझे हस्तलिखित नाहीसे करण्याइतके तुम्ही दुष्ट नाहीं आहांत. " त्यांचा आवाज कंप पावूं लागला. " तो अत्यंत महत्त्वाचा हस्तलिखित ग्रंथ आहे. कोणी जर तो नेला असेल किंवा लपवून ठेवला असेल तर लवकर परत आणून द्या. "

वर्गात सर्वत्र स्तब्धता होती.

" पुनः एकदां मी विचारतों माझी नोंदवही कोठें आहे? "

" जळून गेली ! " कोणसे अगदी हलक्या आवाजांत पुटपुटले.

" आणि माझे हस्तालिखित ? " मोठ्याने पण घाबऱ्या आवाजाने त्यांनी विचारले: " इतके दुष्ट तुम्ही— "

मोहन आपल्या जागेवर उभा राहिला ! त्याने मान खाली घातली होती, त्याचा चेहरा पांढरा फटफटीत झाला होता. " मी तें जाळलें, " भीतीनें कांपणाऱ्या आवाजांत हे शब्द त्यानें इतक्या हलक्याने उच्चारले कीं, त्याचे त्यालासुद्धां ऐकूं आले नसतील.

" काय म्हणतोस तूं ? इकडे ये. मोठ्याने सांग."

मोहन पुढे सरला, " मी तें जाळलें."

" तूं—तें—जाळलेस ? " पाठकशास्त्र्यांचा राग अनावर झाला; कांहींहि विचार केल्याशिवाय त्यांनीं मोहनच्या फाडकन् तोंडांत लगावली. त्याचा प्रतिध्वनि खोलीत दुमदुमला, शेजारच्या वर्गातील मुलेंहि हादरली, मोहन धाडकन खालीं बसला. पण आपला अविचार पाठकशास्त्र्यांच्या लागलीच लक्षांत आला, त्यांनीं रागाच्या भरांत न जाणो आणखीहि एखादे अनन्वित कृत्य आपले हातून घडून जावयाचें ते टाळण्याकरितां ते ताबडतोब वर्गाच्या बाहेर पडले आणि मन शांत करण्याकरितां बागेत गेले.

शेजारींच शांतारामांचा वर्ग चालू होता. विलक्षण जोराने कोणाला तरी मारल्याचें त्यांनी ऐकले. पाठोपाठ पाठकशास्त्रीहि वर्गाच्या बाहेर गेलेले त्यांनी

पाहिले. रागाच्या भरांत मुलाला इतक्या जोरानें मारणें ही गोष्ट पाठकशास्त्री यांच्या नेहमीच्या शिस्तीला सोडून होती, म्हणून कांहीतरी विशेष घडलें असलें पाहिजे, असे वाटून ते पुढे आले. " कायरे, काय झालें ? " वर्गाच्या दाराशी येऊन त्यानी चौकशी केली. मुलानी अस्फुट अवाजांत कांहींतरी सांगण्याचा प्रयत्न केला. पाठकशास्त्र्यांचे महत्त्वाचे कागद कोणीतरी जाळले इतका निष्कर्ष त्यांच्या लक्षांत आला.

पाठकशास्त्र्यांच्या मागोमाग जाऊन त्याना गांठावे, काय झाले याची चौकशी करावी व शक्य तर त्यांचे सात्वन करावे अशा उद्देशानें शांतारामहि आपला वर्ग सोडून त्यांच्या मागोमाग गेले. अस्थिर मनानें, झपाझप पावलें टाकीत बागेंत येरझाऱ्या घालीत असताना त्यांच्या जवळ जाऊन त्यांनी विचारलें, " आज फार रागावलांत, कांही विशेष घडलें काय ? "

"होय, नाही, कांहीं विशेष नाही." मनोविकारांचे संयमन करण्याचे पाठकशास्त्री यांचे सामर्थ्य विलक्षण होते यांत संशय नाहीं. " माझे पंधरा वर्षांचे श्रम—आज फक्त त्याची मूठभर राख शिल्लक उरली आहे ! "

" म्हणजे तुमची ब्रह्मसूत्रावरील टीका जाळली की काय ? "

" तुह्मांला माहीतच आहे, शांताराम, मी आज किती वर्षें त्या टीकेवर परिश्रम करतो आहे तें. कॉलेज सोडल्यापासून स्वतंत्र बुद्धीनें ब्रह्मसूत्रांचा अर्थ विशद करणारी टीका लिहावी असा माझा विचार होता. आज पंधरा वर्षातला माझ्या फुरसतीच्या वेळेचा प्रत्येक क्षण मीं त्याकरिता खर्च केला आहे. आता तें काम जवळजवळ पूर्ण झालें होते. किरकोळ दुरुस्त्या करून मी ते पुढील महिन्यांतच छापायला देणार होतों. पण आतां काय त्याचें ! माझा एक अपूर्व ग्रंथ नाहींसा झाला."

ब्रह्मसूत्रावर एक उत्कृष्ट टीका पाठकशास्त्री लिहीत होते हें शांताराम यांना माहीत होतें. त्यांचा पौर्वात्य व पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा खोल व्यासंग, त्यांची अगाध विद्वत्ता, व उत्कृष्ट लेखनशैली यांमुळें तो ग्रंथ खरोखरीच अपूर्व झाला असता यांत शंका नव्हती. पण एका पोरानें रागाच्या लहरीत पाठकशास्त्र्यांचे सर्व मनोरथ-त्यांच्या आयुष्यांतला आनंद एका क्षणांत नाहींसा करून टाकला.

"मुले माझा द्वेष करितात हें मला माहीत आहे. पण त्यांना आपला द्वेष दाखवायचा होता तर त्यांनी दुसरें काय वाटेल ते केलें असतें तरी चाललें असतें. खरोखर माझी सर्व संपत्ति नाहीशी झाली असती तर मला इतकें वाईट वाटलें नसते."

"आणि खरोखर हे त्या मोहननें केलें?"

"कोणी कां करीना; त्याचें काय महत्त्व आहे? होय, तुमच्या त्या देशमुखाचेंच कृत्य हे."

"कसला नादान, हलकट, पोरगा! त्याला विद्याश्रमांतून घालवूनच दिला पाहिजे. पण तुम्हाला ती टीका पुनः नाहीं कां लिहितां येणार?"

"पुन: लिहावयाची? कल्पना सुद्धां अशक्य! माझा त्या वेळचा उत्साह आणि जोम आज कोठून आणूं? संदर्भाकरितां शेकडो ग्रंथ मी पाहिले ते आज कसे मिळणार? माझी त्या वेळची विचारसरणी, लिहिण्याचे श्रम–जाऊं द्या, तो विचार सुद्धां मला वेड लावील. तुह्मी आतां जा, मी जरा स्वस्थ बसतों म्हणजे माझें मन शांत होईल. असो, प्रभूची मर्जी!"

सांत्वनपर थोडें बोलून शांताराम उठले, आणि वर्गाकडे जाऊं लागले. पाठकशास्त्र्यांच्या वर्गावरून जातांना त्यांचें मोडलेले टेबल, व त्यावरील अस्ताव्यस्त पडलेल्या वस्तु पाहून त्यांचा दाबून ठेवलेला राग पुनः जागृत झाला आणि त्याच्या भरांत ते मुलाना खूपच बोलले: "तुम्ही अविचारी आहांत, मूर्ख आहांत. द्वेषाच्या भरांत तुम्ही किती नुकसान केलेंत याची तुम्हाला कल्पना नाही. असला मुलगा विद्याश्रमांत राहण्यासहि पात्र नाहीं. जो आज हस्तलिखित जाळील तो उद्या घरालासुद्धां आग कशावरून नाहीं लावणार?" इत्यादि इत्यादि रागाच्या भरांत ते जोराजोरानें बोलत होते.

"पण आम्ही सगळे सारखेच अपराधी आहोंत, नोंदवही आम्हींच जाळली, मोहनचा त्यांत कांहीं संबंध नव्हता." मनोहर मध्येंच म्हणाला. त्यांच्या रागाचे तीव्र आघात एकट्या मोहनवर पडावे हे त्याला पाहवेना. मोहनवर पडणाऱ्या या आघातांची तीव्रता कमी करण्याच्या भरांत या प्रकरणांत आपला कांहींच संबंध नव्हता हें सुद्धां त्याच्या लक्षांत आलें नाहीं.

"कसली नोंदवही? मला नाहीं माहीत कोणीं जाळली ती!" शांताराम पुढें बोलूं लागले, "नोंदवही तुम्हीं जाळलीत तर त्याबद्दल तुम्हांला आणखी

शिक्षा होईल. तुमच्यासारखे मूर्ख आणि अविचारी तुम्हींच, पण तूं–तूं” मोहनकडे पाहत ते म्हणाले, “ तूं कोणते प्रताप केले आहेस तुला माहीत आहे काय? तो ग्रंथ लिहायला शास्त्रीबोवाना वर्षानुवर्ष लागली आणि तूं एका मिनिटांत गाढवपणा करून त्याचे श्रम जाळून टाकलेस. तुला त्यांनी शिक्षा केली असेल पण तुझ्या हिताकरितांच केली होती ना? आणि तूं असा सापासारखा त्यांच्यावर उलटलास. आता खालीं पाहशील तर काय झालें! ” मोहन खालीं मान घालून बसला होता ते पाहून ते पुढें बोलूं लागले, “ वर पाहायला तुला तोंड आहे कोठें? ह्या तुझ्या प्रामाणिक आणि सुशील मुलांच्याकडे पाहण्याची सुद्धां तुझी योग्यता नाहीं. व्यासविद्याश्रमाला तूं काळोखी लावलीस! येथे राहण्याचीसुद्धा तुझी योग्यता नाहीं. ”

शांताराम याचा प्रत्येक शब्द मोहनच्या अंतःकरणात तीव्र जखम करीत होता. तो हलला नाहीं, त्याने वर पाहिले नाहीं, एखाद्या हातोड्याप्रमाणें त्याच्या डोक्यावर ताडन करणारे हे सर्व मर्मभेदी वाग्बाण त्याने शांतपणें सहन केले. शांताराम याचा प्रेमळ स्वभाव, मुलात मिळून-मिसळून वागण्याची, मुलाच्या अडचणी समजून घेण्याची त्यांची प्रवृत्ति यायोगें ते मुलांत पुष्कळच लोकप्रिय झाले होते. आणि त्यामुळे त्यांनीं त्वेषाने केलेले वाक्ताडन मुलांच्या हृदयाला फारच झोंबले. आकाशात चाललेल्या मेघांच्या गडगडाटाला भिऊन कोपऱ्यांत लपून बसलेल्या लहान मुलाप्रमाणे वर्गातील सर्व मुले गुपचुप आपआपल्या जागांवर बसून राहिली होतीं.

“ त्यांना सांग ना ” ते जाऊं लागलेले पाहून मनोहर मोहनच्या कानांत कुजबुजला, “ त्याना सांग कीं मीं ते कागद जाणूनबुजून जाळले नाहीत. जुन्या उत्तरपत्रिका आहेत त्या, असे मी समजलो. ”

तळहातावर हनुवटी टेकून मोहन बसला होता, तो हलला नाहीं की बोलला नाही.

“ मोहन, तूं हे मनावर घेऊं नकोस, ” त्याचे पाठीवर हात ठेवून मनोहर काकुळतीने म्हणाला. “दुर्दैव आहे तुझें, तूं अजून पाठकशास्त्र्यांना सर्व खरी हकीकत साग, मला वाटते ते तुला क्षमा करतील. ”

मोहन तरीहि स्तब्धच, त्याने उत्तर दिले नाहीं, तो रडला नाहीं, मनोहरचें बोलणेंसुद्धां त्याने ऐकलें नसेल.

अखेर मुख्यमंत्री श्रीकांत तेथे आला आणि मोहनला म्हणाला, "मोहन, शाताराम यानी तुला आचार्य रत्नाकर यांचेकडे घेऊन जाण्यास सांगितलें आहे."

एखाद्या कळसूत्री बाहुल्याप्रमाणे मोहन उठला आणि त्याच्या मागोमाग चालूं लागला. आचार्यांच्या खोलीजवळ त्याला उभा करून श्रीकात आंत गेला. थोड्या वेळाने बाहेर येऊन म्हणाला, "आचार्यांनीं तुला पुस्तकालयांत बसावयास सागितले आहे. चल."

पुस्तकालयाची खोली आली. आत जाऊन मोहन एका बाकावर निराश होऊन बसला. आपल्याला विद्याश्रमांतून घालवून देणार याबद्दल त्याला किमपिहि शंका राहिली नव्हती. पण विचारल्याशिवाय त्याला राहवेना.

"मला घालवून देणार आहेत कारे ?"

"मला नाही माहीत, पण तूं घालवून देण्याच्याच योग्यतेचा आहेस," असे म्हणून श्रीकांत तेथून चालता झाला.

होय, श्रीकांता, गर्विष्ठ, आणि निर्दय श्रीकाता, खरें आहे. पण दुःखी जीवाच्या व्रणावर चोच मारणाऱ्या या शब्दांखेरीज दुसरे शब्द तुझेजवळ नव्हते काय ? आणि आपण केलेल्या प्रत्येक कृत्याचे फळ इतके अचूक आणि निःपक्षपातपणे आपणां सर्वांना मिळत असते तर--!

श्रीकांत निघून गेला, त्याच्या पावलांचा अवाज अधिकाधिक अस्पष्ट होत अखेर विरून गेला आणि मोहन त्या पुस्तकालयांत एकटा राहिला. त्याच्या हृदयांतील वेदनाना अश्रूंच्या रूपानें त्यानें आतां पूर्ण वाव दिला. पाठकशास्त्री शिस्तीच्या बाबतीत कडक असले तरी निर्दय नव्हते, त्यांचे आपण जन्माचें नुकसान करण्यास कसे कारण झालो, आपणांविषयीं सर्व मुलें आज कोणकोणत्या तऱ्हेनें बोलत असतील, हे सर्व विचार त्याच्या मनांत थैमान घालूं लागले आणि तो मनमुराद रडूं लागला. इतक्यांत त्याच्या खोलीच्या दाराशी पावलांचा आवाज ऐकूं आला. हळूहळूं तो अधिकाधिक स्पष्ट होत जाऊन त्याच्या खोलीजवळ थांबला. दारावर हलकेच टिचक्या ऐकल्याचाहि त्याला भास झाला, पण त्यानें उत्तर दिलें नाहीं. कोणालाहि तोंड दाखविण्याचीच त्याला लाज वाटत होती. आंतून येत असलेल्या दुःखाच्या व उद्विग्नतेच्या उमाळ्यांमुळें त्याच्या तोंडांतून शब्दहि उमटूं शकत नव्हता. दार उघडल्याशिवायच एका

मुलानें लहानसा कागदाचा तुकडा फटीतून आंत सरकावून दिला आणि तो आला तसा निघून गेला.

पावलांचा आवाज नाहींसा होईपर्यंत मोहन जागचा हलला नाही, पण नंतर त्यानें तो सावकाश उचलून पाहिला. ती एक चिठ्ठी होती.

" प्रिय मित्र मोहन,

तुझ्याबद्दल माझ्या अंतःकरणाला किती वेदना होत आहेत याची तुला कल्पना सुद्धां येणार नाही. मला शक्य असतें तर मी स्वतः तुझी शिक्षा आनंदाने भोगली असती. तुझ्याशीं मी अबोला धरला याची मला क्षमा कर. तुझ्याशी बोलण्याची मला फार इच्छा होई, पण मला धीर झाला नाही, ही सर्व माझी चूक आहे. यापुढे मी तुझ्याशी कधीहि भांडणार नाही.

तुझा मित्र
नागेश. "

तो आतां माझ्याशी पुनः भांडणार नाही, मोहन आपल्याशींच म्हणाला. " मी जर उद्यांच विद्याश्रम सोडून गेलो तर माझ्याशी भांडण्याचा त्याला कधी प्रसंगच येणार नाही. " आणि त्याचे विचारचक्र पुनः सुरू झाले. आपण घर सोडून कसे निघालों, आपल्या व वडिलांच्या मनांत कोणत्या महत्त्वाकांक्षा आपण बाळगून होतों, आणि आपण घरी गेल्यावर कोणत्या मनःस्थितीनें आपलें स्वागत केलें जाईल, आईच्या मनाला आपला अपमान पाहून किती दारुण यातना होतील हें सर्व चित्र त्याच्या डोळ्यांपुढें उभे राहून त्याच्या दुःखी मनाला ते अधिकच दुःखांत लोटूं लागलें.

# प्रकरण नववें

## पश्चात्ताप

व्यासविद्याश्रमाच्या पुस्तकालयाच्या खोलीत आपल्या दुर्दैवी शिक्षेची वाट पाहत मोहन स्वस्थ बसला होता. पण त्याचे चित्त व्यासविद्याश्रम सोडून केव्हांच निघून गेले होते. विद्याश्रम आपल्याला सोडावा लागणार यांत त्याला शंका नव्हतीच. घरीं गेल्यावर वडिलांना आपण काय सांगूं, आईचें सांत्वन कसें करूं, लहान भावंडांना कोणत्या तोंडानें बोलावूं, हा एकटा एकच विचार त्याच्या डोक्यात होता. तासामागून तास चालले होते. मोहनच्या दुःखाचें, दुःखी जीवनाचे त्या तासांना काय ?

इतक्यांत कोणीतरी घाईघाईने त्याच्या खोलीकडे पळत येत आहे असा त्याला भास झाला. दाराच्या फटीतून पूर्वीप्रमाणेच एक चिठ्ठी सरकवून तो मुलगा पुनः त्याचप्रमाणे आला तसाच पळत निघून गेलेलाहि त्याला समजलें. त्यानें ती चिठ्ठी उचलून घेतली.

" प्रिय मित्र मोहन,

तुला विद्याश्रमांतून घालवून देणार नाहीत ही बातमी तुला सर्वांच्या आधीं कळविण्यांत मला किती आनंद होत आहे म्हणून सांगूं ! पाठकशास्त्री यांनीं रदबदली करून तुला ठेवून घेतला आहे. जास्त लिहिण्यास आतां सवड नाहीं.

तुझा मित्र<br>
नागेश. "

चिठ्ठी वाचतांक्षणींच त्याच्या आनंदाला पारावर नाहीसा झाला. विद्याश्रमांतून घालवून देण्याखेरीज दुसरी कोणतीहि शिक्षा आनंदानें त्यानें स्वीकारली असती. भक्तियुक्त अंतःकरणानें त्यानें देवाचे उपकार मानले. आपली प्रार्थना, सकाळपासून दुःखीकष्टी जिवाची काकुळतीनें केलेली विनवणी, देवानें ऐकली आणि आपल्या अपराधाची क्षमा केली याबद्दल देवाला त्यानें धन्यवाद दिले. आणि नागेशची चिठ्ठी पुनः एकदां वाचली.

"पाठकशास्त्री यांनीं तुला ठेवून घेतला आहे." हें वाक्य त्यानें तीन-तीनदां मनांत, मोठ्यानें, स्वतःशीं वाचलें; त्याला त्याचा अर्थ कळेना. पाठकशास्त्री—ज्याचे त्यानें अतिशय भयंकर, कधींहि भरून न येणारें नुकसान केलें—त्या पाठकशास्त्र्यांनी त्याला ठेवून घेतले. त्याच्या अपराधाच्या मानानें इतकी कडक शिक्षा त्याला व्हावयास पाहिजेच, असें प्रत्येक जण म्हणत असताना त्या भयंकर शिक्षेतून त्याला पाठकशास्त्र्यांनी वाचविलें! आपण त्यांचे काय नुकसान केले हें कळण्याइतका मोहन मोठा नव्हता; पण हात अगर पाय मोडण्यापेक्षां किंवा संपत्तीचा नाश होण्यापेक्षांहि आपण केलेले नुकसान अधिक भयंकर आहे हें त्याला समजूं शकत होतें. कोणत्या तरी मार्गानें त्यांचे झालेले नुकसान भरून येवो, म्हणून त्यानें परोपरीनें देवाची विनवणी केली. काय वाटेल तें करून त्याचे नुकसान भरून काढण्यास आपण झटूं असा त्यानें निश्चय केला, आणि आपला निश्चय पार पाडण्यास सामर्थ्य द्यावें म्हणून पुनः एकदा देवाजवळ मागणे मागितले.

पाठकशास्त्र्यांचें नुकसान त्यानें जाणूनबुजून केले नव्हतेंच. जुन्या उत्तरपत्रिका समजूनच त्यानें ते कागद जाळले होते. आणि तसें पाहिले तर त्याचा अपराध फारसा मोठा नव्हता. टेबल फोडून त्यातील कागद जाळणे हा अपराध कोणत्याहि परिस्थितीत कांहीं लहान नव्हता; पण सूडबुद्धीने जन्माचे नुकसान करण्याच्या अपराधाइतका तो मोठाहि नव्हता. पण मोहनसारख्या उदार अंतःकरणाच्या व्यक्तींना स्वतःचे लहानसे दोषहि फार मोठे भासत असतात. शिवाय कागद जाळतांना ते कदाचित् महत्त्वाचे असावेत अशी एक कल्पना त्याच्या डोक्यांत चमकून गेली होती, आणि रागाच्या त्या दुष्ट लहरींत त्याबद्दल त्याला थोडासा आनंदहि झाला होता. आणि आता पाठकशास्त्र्यांनी त्याला सोडविले! गुरुत्वाकर्षणाचा नियम पृथ्वी एकादे वेळीं विसरेल, पण प्रत्येक अपराधाला शिक्षा करण्याचा आपला नियम पाठकशास्त्री सोडणार नाहीत हें त्याला माहीत होतें, असें असताहि त्यांनी त्याची शिक्षा आज माफ करविली.

दुसऱ्याच क्षणीं पुस्तकालयाचें दार उघडले आणि पाठकशास्त्री स्वतः त्याचेसमोर उभे राहिले. तावडतोब मोहननें त्यांच्या पायांवर डोकें ठेवलें. आणि

विनवणीच्या स्वरात म्हणाला, "मला क्षमा करा; तुम्हांला भेटून तुमची क्षमा मागण्याची मी सारखी वाट पाहत होतों. तुम्ही एकदां क्षमा केलीत म्हणजे मग माझे कांहीहि झाले तरी मला त्याचे कांही वाटणार नाही. पण कसेंहि करून मला एकदां क्षमा करा."

"तूं काय केलें आहेस याची तरी तुला नीट कल्पना आहे काय ?"

"होय, होय; शांतारामपंत म्हणत होते कीं, वर्षानुवर्ष परिश्रम करून तुम्ही लिहिलेले कागद मीं नाहींसे केले. आणि आतां ते नुकसान कधीं—कधीहि भरून येणें शक्य नाहीं. माझें डोकें त्या वेळीं ठिकाणावर नव्हतें. पण तुम्ही मला क्षमा कराल का ?"

"क्षमेची याचना नेहमीं परमेश्वराजवळ करावी. तुझ्या उन्मत्तपणाची आणि तापट स्वभावाची तोच क्षमा करूं शकेल." आपल्या शांत गंभीर वाणीनें ते म्हणाले.

"मी परमेश्वराजवळ क्षमेची याचना करतों आहेच. आणि तो मला क्षमा करीलच याबद्दल माझी खात्री झाली आहे. एका दिवसांत मी इतका दुष्टपणा करू शकेन असे मला कधींहि वाटले नाही. तुम्ही मला क्षमा कराल तरच माझ्या मनाला समाधान होईल."

पायावर डोके ठेवून नमस्कार करणाऱ्या मोहनला पाठकशास्त्र्यांनीं केव्हांच वर उचलला होता आणि आता ते त्याच्या खांद्यावर हात ठेवून उभे होते. त्यांच्या चेहऱ्याकडे डोळे वर करून पाहण्याचेहि मोहनला धारिष्ट होईना. आपल्याकडे क्रुद्ध मुद्रेने ते कसे पाहत असतील याची कल्पनाच त्याला असह्य होत होती. आपल्या मनांतील विचार, व आपल्या अडचणी समजून घेण्याचा त्यांनीं प्रयत्न केला असता तर आज त्यांचे आपल्याविषयीं जितके वाईट मत झालें आहे तें तसे झालें नसतें असा विचार त्या क्षणींहि मोहनच्या मनांत आल्याशिवाय राहिला नाही.

पाठकशास्त्र्यांचा हात त्याच्या खांद्यावर अजूनहि तसाच होता. त्यांनी त्याच्या पाठीवरून हात फिरविला. त्याच्या डोळ्यांतून वाहत असलेले अश्रु त्यांनीं आपल्या हातांनी पुसून टाकले. मोहननें वर पाहिलें. त्यांच्या डोळ्यांत चमकत

असलेले दोन टपोरे अश्रुबिंदु त्याला दिसले. दुःख, शोक, दया, प्रेम हे सर्व मनोविकार त्यांच्या नेत्रांत एकवटलेले त्याला दिसले. इतक्या प्रेमळपणें ते आपल्याला उचलून घेतील, आपल्याकडे इतक्या दयार्द्र दृष्टीने पाहतील ही त्याची अपेक्षा नव्हती. त्याला हे सहन करवेना. पाठकशास्त्र्यांनी रागाच्या भरांत त्याला छड्या दिल्या असत्या, तिरस्काराने दूर लोटला असता, किंवा दुसरी कोणतीहि शिक्षा केली असती तर तें सहन करणें त्याला सोपे वाटलें असते. पण त्यांचा हा सौम्य, दयार्द्र, क्षमाशील प्रेमळपणा त्याला सहन करवेना. दुःख देण्याची सर्व शक्ती एकवटून आपले निष्कारण जन्माचे नुकसान करणाऱ्या मुलाच्या अपराधाला दयेच्या गंभीर समुद्रात जलसमाधि देणारा त्यांचा दृष्टिक्षेप त्याला सहन करवेना. तो पुनः खालीं बसला व त्यांच्या पायांवर डोके ठेवून हुंदके देत म्हणाला, " माझ्या जिवात जीव आहे तोंपर्यंत श्रम करूनहि तुमचें नुकसान भरून देणे मला शक्य नाही. "

पाठकशास्त्र्यांनी त्याला पुनः एकदा उचलला आणि जवळ असलेल्या बाकावर आपल्या शेजारी बसवला.

" मीं तुला क्षमा केली आहे, मोहन, अगदीं अंतःकरणापासून क्षमा केली आहे. तूं केलेले नुकसान लहानसान नाही आणि तें सहन करणें सोपेहि नाही, हे खरे आहे. ईश्वराने मला सामर्थ्य दिलें आणि मी माझे सर्व त्रुटित विचार एकत्र जुळवून पुनः ते सर्व लिहून काढण्याचा प्रयत्न मी करूं लागलों म्हणजे हें नुकसान किती भयंकर झालें आहें तें मला अधिक तीव्रतेनें जाणवेल. पण मीसुद्धां आज एक धडा शिकलों आहे. तूं माझ्याएवढा होशील तेव्हा तूंहि आपल्या दुष्ट मनोविकारांना जास्त निश्चयानें आवरण्यास शिकशील. आजच्या प्रसंगापासून तूंहि एक धडा घे. माझें नुकसान भरून काढण्याकरिता मी वाटेल तें करीन असे तूं म्हणालास, पण ते शक्य नाहीं. दुष्ट लहरीच्या भरांत एका क्षणांत जें नुकसान आपण करून टाकतो तें वर्षानुवर्ष श्रम करूनहि भरून येऊं शकत नाहीं; उदार अंत:करणाचे महात्मे त्या पापाची, त्या दुष्ट कृत्याची क्षमा करतील, तें कृत्य विसरूनहि जातील; पण त्याचे परिणाम, झालेलें नुकसान जन्मभर शोक करूनहि भरून येत नाहीं, हें लक्षांत ठेव आणि क्षणिक मनोविकारांच्या आधीन पुढें केव्हांहि होऊं नकोस. "

आणि इतक्या शांतपणानें, सरलतेने व दयार्द्रबुद्धीनें केलेल्या उपदेशाचा प्रत्येक शब्द मोहनच्या अंतःकरणांत कायमचा रुजून बसला.

"होय, मोहन, आजचा प्रसंग दुःखदायक तर खराच, पण त्यापासून आपणा दोघांसहि पुष्कळ फायदा होईल. मीं त्याबद्दल तुला क्षमा केली आहेच. ईश्वराने उत्पन्न केलेल्या अफाट विश्वांत मनुष्य हा एक क्षुद्र प्राणी आहे, क्षमा नाकारण्याचा त्याला अधिकारच नाहीं. ही सर्व घटना पूर्णपणें विसरून जाण्याचा मी निश्चय केला आहे. आणि माझी खात्री आहे की, आजपासून तुझीहि प्रगति वेगाने होऊं लागेल. तुला कांहीं दिवस त्रास सहन करावा लागेल हे मी जाणून आहे. पण तूं तें मनाला लावून घेऊं नकोस. माझा मित्र समजून तुला मी शक्य ती मदत करीन."

आपली कृतज्ञता दर्शविण्याकरिता काहीतरी बोलण्याचा मोहननें प्रयत्न केला, पण त्याच्या मुखातून शब्द निघेना. त्याने फक्त त्यांच्याकडे पाहिले. कोणत्याहि शब्दांनी कधींहि व्यक्त न होऊं शकणारी कृतज्ञता त्याच्या दृष्टीत भरून राहिली होती.

"ऊठ, मोहन, थोड्याच वेळांत भोजनाची घंटा होईल. चल, तुझ्या खोलीपर्यंत आपण बरोबरच जाऊं."

मोहन उठला आणि चालूं लागला. त्याच्या खांद्यावर प्रेमाने हात ठेवून पाठकशास्त्रीहि त्याच्याबरोबर चालूं लागले. जिना उतरून खालच्या पटांगणांतून वसतिगृहाकडे ते दोघे निघाले. पाठकशास्त्री आपल्याबरोबर येत आहेत या विचारानें मोहनच्या मनाला अवर्णनीय समाधान झालें. सातव्या इयत्तेंतील विद्यार्थ्यांना व वजनदार पुढारी समजल्या जाणाऱ्या इतर विद्यार्थ्यांना मोहनच्या कृत्याचा अतिशय राग आला होता व त्यांनी तो राग सकाळपासून अनेक वेळां व्यक्त केलेला त्याच्या कानांवर आलाहि होता. विद्यार्थिसमूहांत पुनः जाण्याची, पुनः त्यांच्या दृष्टीस पडण्याची त्याला अतिशय भीति वाटत होती. पण पाठकशास्त्री ह्या प्रसंगात आपल्या बरोबर आहेत त्या जाणिवेनें तें भयंकर दिव्य करणें त्याला फारच सोपें गेलें. आपल्या अविचारी कृत्यामुळें ज्याच्या हृदयाला आपण कायमची जखम केली आहे तोच मनुष्य आपणाला निर्माल्यवत् समजून दूर लोटण्यास तयार नाहीं, तर उलट आपणांवर पूर्वीप्रमाणें प्रेम करण्यास इतरांच्या

अगोदर तयार आहे याचा प्रत्यक्ष पुरावा पाठकशास्त्री इतक्या लवकर लोकांच्या प्रत्ययास आणून देतील असे त्याच्या स्वप्नांतहि आले नव्हते.

वसतिगृहाच्या पटांगणांत भोजनाच्या घंटेची वाट पाहत मुले लहानलहान टोळ्या करून आजच्या चमत्कारिक घटनांची चर्चा करीत उभी होतीं. त्या दोघांना आलेले पाहतांच अदबीने बाजूला सरून त्यांना मुलांनी वाट दिली, आणि घोळक्याच्या मधून मोहनच्या खांद्यावर प्रेमाने हात ठेवून गंभीर मुद्रेने चाललेले पाठकशास्त्री आणि त्यांच्या शेजारी दीन आणि पश्चात्तापदग्ध मुद्रेने खाली पाहून सावकाश चालणारा मोहन दोघेहि पुढे निघून गेले. व्यास-विद्या-श्रमांत वर्षानुवर्षे राहून जे नाना प्रकारचे धडे मुले शिकत त्या सर्वांपेक्षां अत्यंत श्रेष्ठ, उदात्त व परिणामकारक असा क्षमाशील शांत वृत्तीचा धडा, ते हृदयद्रावक दृश्य पाहून ज्यांना शिकण्याचे भाग्य लाभले ते विद्यार्थी खरोखर धन्य होत.

जेवताना मोहन उदास वृत्तीने मूक रुदन करीत आपल्या पाटावर बसून होता. पण त्याच्याकडे सहानुभूतीने, अनुकंपेने कोणींहि पाहिले नाहीं. प्रेम, दया, सहानुभूति हे सद्‌गुण जगात इतके दुर्मिळ असावेत ना! त्याने केलेल्या कृत्याचे बुद्धिपुरःसर विकृत स्वरूपात केलेले वर्णन सागितले जात होतें, आणि असभ्य व अक्षम्य अपराध करणारा म्हणून सर्व जण त्याचा तिरस्कार करीत होते. जेवण झाल्यानंतर वसतिगृहांत जातांनाहि तो ज्याच्या ज्याच्या जवळून गेला त्या प्रत्येकाने त्याच्याकडे तीव्र मर्मभेदक दृष्टिक्षेप करून त्याच्या दुःखावर डाग देण्याचाच प्रयन केला. बहुतेक शिक्षकांनी, शांताराम यानीं सुद्धा, की ज्यांच्या-विषयीं मोहनला सर्वांपेक्षा अतिशय प्रेम व आदर वाटत असे त्या शांताराम-पंतांनीं सुद्धां, त्याच्याकडे तिरस्कारानेच पाहिले. सकृद्दर्शनी हें चमत्कारिक वाटते. पण एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे की, ज्या ज्या वेळीं एखादे दुष्ट कृत्य घड-ल्याचे आपणाला कळते त्या वेळेला त्याचा पूर्व प्रस्ताव किंवा विरुद्ध बाजू आपणाला कधींच कळत नाहीं. त्या कृत्याला कारणीभूत होणारीं क्रमाक्रमाने वाढत जाणारीं, प्रलोभनें—याच्यामुळे मनांत सांठत जाणारी तीव्र असंतोषरूपी मनो-विकारांचीं स्फोटक द्रव्यें ही आपणास अज्ञात असतात किंवा समजलीं असल्यास विसरली जातात, आणि अखेरच्या क्षुल्लक ठिणगीनें उडालेला भडका, तें दुष्ट कृत्य, त्या घडवून आणणाऱ्या सर्व कारणांपासून अगदीं पृथक् असे आपण

पाहतों आणि मग त्यास तीव्र दोष देतों. शिक्षकांचे टेबल फोडून त्यांचे अत्यंत मूल्यवान् हस्तलिखित सुडाच्या दुष्ट भावनेने मोहननें जाळून टाकले, इतकेंच सर्वांनी लक्षात घेतलें आणि त्याबद्दल आपल्या मनानें त्यांनीं त्याला भरपूर शिक्षा देऊन घेतली.

बिचारा मोहन ! शालेय जीवनांतील त्याचे अत्यंत कष्टाचे दिवस होते हे ! पण मनोहर व नागेश यांनी त्याला सोडला नाहीं, आणि अरविंदानें त्याचेवरील प्रेम कमी केले नाहीं. अंतरींची मानी वृत्ति व आपले इतर मित्र काय म्हणतील ही भीति यामुळे नागेश उघडपणे आपली मैत्री दाखविण्यास कचरूं लागला, पण अखेर त्याच्या मित्रप्रेमाचा विजय होऊन तो पूर्ववत् मोहनवर प्रेम करूं लागला; मोहनच्या समाधानाकरिता मनोहर तर स्वतःचे प्राणसुद्धा अर्पण करण्यास कचरला नसता; आणि ज्या वेळेरा मोहन एकटा असेल किंवा उदासपणे विचार करीत बसला असेल त्या त्या वेळीं धाकटा अरविंद त्याच्याकडे जाऊन स्वतःच्या प्रेममय चेष्टांनी त्याचे सांत्वन करण्यास विसरला नाहीं.

पाठकशास्त्र्यांच्या झालेल्या भयंकर नुकसानाबद्दल सर्वच मुलांना वाईट वाटलें आणि त्या नुकसानास कारणीभूत होणाऱ्या मोहनबद्दल त्याना अतिशय तिरस्कार वाटूं लागला. त्याच दिवशीं रात्रीं प्रार्थना संपल्यानंतर सभामंडपांतून बाहेर पडताना मोहनविषयींचा आपला तिटकारा व्यक्त करण्याकरिता सर्व विद्यार्थी बाहेर जमून उभे राहिले. अशा तऱ्हेचा कांहीं प्रकार होईल याची मनोहरला आगाऊ थोडीशी कल्पना आली होती. म्हणून कांहींहि झालें तरी मोहनला न सोडण्याचा त्याने निश्चय केला होता. सभामंडपातून मोहन व मनोहर बाहेर पडले; पण मोहनचा पश्चात्तापाने म्लान झालेला चेहरा पाहताच त्याच्या वाटेस जाण्याची कोणाची छाती झाली नाहीं.

मोहनला मदत करण्याचें आश्वासनहि पाठकशास्त्री मुळीच विसरले नाहीत. संधि सापडेल त्या वेळी मोहनला ते आपल्याबरोबर फिरावयास घेऊन जात; आणि बहुशः दर रविवारी सकाळीं प्रार्थना आटोपल्यावर त्यांच्या बागेंत लांब लांब टांगा टाकत हिंडत असलेले पाठकशास्त्री व त्यांच्या गतीशी आपली गति जमवून घेण्याकरितां जलदीनें पावले उचलीत धांवपळ करणारा मोहन ही जोडी पाहून पुष्कळांना कौतुक वाटे.

आचार्य रत्नाकर यांच्या पत्रावरून दुसरेच दिवशी नानासाहेबहि विद्याश्रमात आले. परस्परांच्या मनोवृत्तींशी पूर्णपणे परिचित असलेले पितापुत्र मोकळ्या अंतःकरणाने संभाषण करूं लागल्यावर दुःख आणि शोक तेथे किती वेळ टिकाव धरू शकणार ? या भेटीमुळे मोहनला नवीन जोम, नवीन उत्साह वाटूं लागला आणि नानासाहेबांनाहि आपल्या मुलाबद्दल अधिक प्रेम वाटूं लागलें, त्याच्या चारित्र्याबद्दल त्यांची श्रद्धा अधिक दृढ झाली. शत्रूंशी सामना दिल्यानंतर, त्यांत पराजय आल्यानंतर आणि त्या पराजयाचे परिणाम भोगल्यानंतर आत्मनिरीक्षण करीत असताना जे सामर्थ्य प्राप्त होतें ते आता मोहनला प्राप्त झाले होते. कसोटीला न लागलेली तत्त्वनिष्ठा व ताव न दिलेले निष्पाप अंतःकरण यांच्यापेक्षा हे सामर्थ्य कितीतरी पटींनी अधिक स्पृहणीय होते.

आणि त्यानंतर वीस वर्षांनी मोहन आपल्या पुष्करवाडीच्या बंगलोत राहत असतांना पाठकशास्त्री यांनी लिहिलेली आणि विद्वान लोकांनी वाखाणलेली ब्रह्मसूत्रावरील टीका प्रसिद्ध झाली. त्यांतील स्वतंत्र विचारसरणी आणि गाढ विद्वत्ता यांमुळे ग्रंथकर्त्याचे नांव सर्वतोमुखी झाले व ब्रह्मसूत्रावरील वाङ्मयांत ही टीका प्रमाणभूत मानली जाऊं लागली. आपल्या जुन्या कृत्याची आठवण करून देणारा, आपल्या हृदयांतील नाजूक तार छेडणारा, त्याच्या प्रस्तावनेंतील खालील भाग वाचून मोहनचें अंतःकरण, प्रेम, आदर, आनंद, विषाद इत्यादि नानाविध मनोविकारांनी भरून आले.

"ब्रह्मसूत्रावरील ही टीका तयार करण्यात माझ्या आयुष्याची किती वर्षे व किती परिश्रम खर्ची पडले आहेत याची कल्पना सुद्धां भयप्रद होती. पुष्कळ वर्षांपूर्वी हा ग्रंथ लिहून तयार झाला होता आणि छापण्यास सुरुवात करण्याचेंहि ठरलें होतें. पण तितक्यांत एका मुलाच्या हातून—कोणत्याहि कारणाने का होईना—त्या ग्रंथाचें हस्तलिखित जळून गेले. दुर्दैवानें नाहीसा झालेला हा ग्रंथ पुनः लिहिण्याचा उद्योग माझ्याने होईल असें मला वाटले नाहीं, आणि तो माझ्या हातून पुनः लिहिला जाईल ही मला आशाहि नव्हती. पण जो दुःख देतो तो दुःख सहन करण्याचें सामर्थ्यहि देतो व त्यांतून पार पडण्याचा मार्गहि दाखवितो. ईश्वराच्या कृपेनें मला तितकी सवड सांपडली, हा प्रचंड उद्योग

हातीं घेण्याइतके सामर्थ्य मला आलें, आणि त्या वेळेला झालेलें नुकसान आज **भरून निघालें** आहे. ह्या खासगी गोष्टीचा उल्लेख प्रस्तावनेंत करण्याचें वास्तविक कांहीं कारण नाही; पण तें नुकसान भरून निघावें अशी ज्याची अंतःकरणापासूनची इच्छा होती त्याच्याकरितांच हा उल्लेख येथें केला आहे; हा मजकूर त्याच्या नजरेस कधीं आलाच तर 'भरून निघालें' हे शब्द ठळक अक्षरांनीं लिहिण्याचें प्रयोजनहि त्याच्या ध्यानीं येईल. आपल्या चुकीचे परिणाम निस्तरणें शक्य नाहीं या कल्पनेनें ज्याच्या डोळ्यांतील पाणी कधींहि खळलें नाहीं त्याच्या समाधानाकरितां मी ह्याचा उल्लेख मुद्दाम केला आहे. तसेंच त्याला अक्षय सुख व शांति मिळो म्हणून मी परमेश्वराची अखंड प्रार्थना करीत असतों हेंहि त्याला कळवावेसें वाटते."

# प्रकरण दहावें

# यशोमंदिराची चढण

**चढण कठिण मोठी ही असे कीं चढाया**
**परि वरि बहु यत्नें जाहलों सिद्ध जाया।**
**चढुनि विमल कीर्ती जी पुढें लाधणार**
**मजसि बल चढाया देतसे तीच फार** ॥ म. पां. ओक.

असे सांगतात कीं, 'लोके गुरुत्वं विपरीतता वा स्वचेष्टितान्येव नरं नयन्ति।' आणि म्हणून दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडल्यामुळे ज्याचेविषयी लोकमत क्षुब्ध झाले आहे असा मनुष्य आत्मसमर्थनाचे कितीहि प्रयत्न करूं लागला तरी तिकडे लक्ष देण्याची लोकांची तयारी नसते. मोहननेंहि आत्मसमर्थनाचे प्रयत्न केले असते तर विद्यार्थिगणानें ते कितपत मनावर घेतले असते याची शंकाच आहे. काही अंशी या जाणिवेनें, काही अंशी आपल्या चुकीबद्दल वाटत असलेल्या तीव्र अनुतापामुळे, काही अंशी आपल्याविषयी हेतुपुरःसर गैरसमज पसरविणाऱ्या कंपूच्या तिरस्कारामुळे, काही अंशी आपल्यापेक्षा अनेक पटींनी दुष्ट असलेल्या परंतु आपल्याशी संबंध तोडून स्वतःचा सावपणा दाखविण्याचा आव घालणाऱ्या मुलांचा वीट आल्यामुळे, अशा अनेक कारणांनी आत्म-समर्थन करण्याचा मोहनने कधीहि प्रयत्न केला नाही, किंवा आपल्याविषयीं कांहीसा खरा पण बराचसा मानभावी तिरस्कार दाखविण्याचे जे प्रयत्न चालले होते तिकडेहि त्याने लक्ष दिले नाहीं.

ह्याचे परिणाम व्हावयाचे तेच झाले. त्याच्या कृत्याचे विकृत व गैरसमज करविणारें वर्णन सर्व मुलामध्ये पसरविलें जात होते, आणि त्याला कोठूनहि विरोध होत नसल्यामुळें त्याच्या खरेपणाबद्दल कोणालाहि शंका येत नव्हती. ह्या अपराधाचें सर्व खापर विद्यार्थिगणांनीं त्याच्यावर फोडलें आणि त्या पापाचें भरपूर प्रायश्चित्त त्यांनीं त्याला दिलें. मुलांच्या समाजांत त्याचे असलेलें वजन तर नाहींसें झालें होतेंच; पण कालांतरानें सातव्या इयत्तेंत जाऊन मंत्रिपद प्राप्त झाल्यावरहि, आपल्या नांवावर हें पाप कायमचें मांडलें

गेल्याने, आपलें वजन व अधिकार पुष्कळ कमी होतील अशी त्याला भीति वाटत होती.

आपली गेलेली कीर्ति संपादन करण्याची आणि भूतकाळच्या अवशेषावर भविष्य काळाची टोलेजंग इमारत उभारण्याची महत्त्वाकाक्षा बाळगिणाऱ्या त्या लहान बालकाचें कोणीहि कौतुकच करील. निष्कारण मिळत असलेला तिरस्कार निमुटपणे सहन करतांना, आणि कोणत्याहि प्रकारे रागाचे किंवा असंतोषाचें प्रदर्शन केल्याशिवाय आपल्या कष्टकर परिस्थितीचा शक्य तितका उपयोग करून घेतांना त्याला पाहिले म्हणजे ज्याचे हृदय भरून येणार नाही असा मनुष्य विरळच आढळेल. पण हे परिणामी त्याला हितकरच झाले. स्वतःचा नम्रपणा केव्हांहि न सोडतां आला प्रसंग धैर्याने सहन करून त्याला शौर्याने तोंड देण्याचा महत्त्वाचा सद्गुण त्याने ह्याच कालात संपादन केला. आपल्या हातून चूक होऊं नये म्हणून जपणारा मनुष्यहि आपले वर्तन शीलसंपन्न राखूं शकतो, पण झालेली चूक निस्तरण्याची व गेलेले यश संपादन करण्याची आवश्यकता भासूं लागली म्हणजे शीलाचा मार्ग आक्रमण करताना विशेषच प्रोत्साहन मिळते हें त्याला स्वानुभवाने ह्याच कालात पटूं लागले.

मनुष्यस्वभावाचे मार्मिक अवलोकन करण्याची मोहनला हौस असती किंवा तसे करण्याइतका तो मोठा असता तर निरनिराळ्या मुलांच्या त्याच्याशी वागण्याच्या निरनिराळ्या तऱ्हा पाहून त्याला त्या प्रकारची पुष्कळ सामग्री मिळूं शकली असती. अनंत किंवा जनार्दन यांसारखीं कांहीं मुले त्याच्याशी अगदी पूर्वीसारखीच वागत होती. कारण त्याच्या अपराधाबद्दल स्वतःची नापसंती लोकलज्जेस्तवहि दाखविण्याची त्यांना अवश्यकता भासत नव्हती. नाना किंवा किसन यांसारखे जे त्याच्या कृत्यांत सहभागी होते ते अर्थातच त्याचा तिरस्कार करूं शकत नव्हतेच; पण बाळूसारखीं पुष्कळ मुलें त्याच्या विषयींचा आपला तिरस्कार वेळीं अवेळी दाखविण्यास कमी करीत नसत. अर्थात् मोहनच्या कृत्याची त्यांच्या नीतिमान अंतःकरणाला शिसारी येत असे म्हणून नव्हे; कारण त्याच्यापेक्षा किती तरी अधिक दुष्ट कृत्यें ते स्वतः अहर्निश करीत असत. पण मोहन मुलांत अप्रिय झाला होता आणि अशा अप्रिय मुलाशीं संबंध ठेवून स्वतःची लोकप्रियता कमी करून घेण्याची यांना इच्छा

नव्हती. उलटपक्षीं पुष्कळशा सुवृत्त मुलांना, बुद्धिमान, विचारी व उदार अंतः-करणाच्या मुलांना, मोहनबद्दल एक नवेंच प्रेम वाटूं लागलें; व थोडयाच दिवसांत पुष्कळ नव्या मुलांशी त्याची मैत्री जमूं लागली. उदाहरणार्थ, पद्मनाभाच्या तोडीचा प्रामाणिक आणि स्वतःची जबाबदारी ओळखून वागणारा दुसरा मुलगा त्यास विद्याश्रमांतसुद्धां सापडला असता की नाही शंकाच आहे. पण तोच पद्मनाभ मोहनशी सलगी करण्याचा एकहि प्रसंग वाया जाऊं देत नसे, आणि सवड सापडेल तेव्हां त्याच्याशी आपल्या भोळसर पद्धतीचा थट्टा-विनोद करीत असलेला आढळे. अशाच प्रकारच्या प्रभाकर नावाच्या दुसऱ्याही एका वरच्या वर्गातील मुलाशी त्याची मैत्री जमूं लागली होती. प्रभाकर हा अगदी निराळ्या प्रकारचा मुलगा होता. त्याचे पाणीदार डोळे, आणि मुद्रेवर विलसणारे प्रामाणिकपणाचे तेज कोणाचेंहि चित्त सहज आकर्षून घेई. त्याची तीव्र बुद्धिमत्ता आणि प्रत्येक विषयातील प्राविण्य, त्याचबरोबर त्याची सभ्य-तेची वागणूक, आणि सर्वसामान्य मुलाच्या घोळक्यात न मिसळतां वागण्याची तऱ्हा, यामुळें त्याचेशी मैत्री करण्याची पुष्कळांना इच्छा होई; पण फारच थोडयाशी त्याची दोस्ती होती आणि त्या थोडया मित्रांवरसुद्धां त्याच्या श्रेष्ठतेची छाप पडल्याशिवाय राहत नसे. आजपर्यंत मोहन त्याला आढ्यतेखोर आणि एकलकोंडाच समजत असे, तरीहि त्याचा एकमार्गीपणा त्याला रम्य व आकर्षक वाटे; पण तो वरच्या वर्गांत असल्यामुळे मोहनचा त्याचेशी फारसा परिचय अद्यापपावेतो झाला नव्हता. पण आज मोहनच्या संकटकाळीं तो स्वतः होऊन त्याच्याशी ममतेने वागूं लागला, आणि अशा तऱ्हेने त्याने प्रेमाने पुढे केलेला हात झिडकारण्याइतका अकृतज्ञ मोहन खास नव्हता.

त्याचे असे झाले. वरील गोष्टीला सुमारें पंधरा दिवस झाल्यानंतर एक दिवस संध्याकाळीं आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणें मोहन कृष्णेच्या कांठी जाऊन संध्याकाळचे रमणीय सृष्टि-सौंदर्य पाहत बसला होता. सृष्टि-सौंदर्याची त्याला नेहमीच आवड असे आणि अलीकडे तर फुरसतीच्या वेळीं नदीकांठी एकांतवासात जाऊन तेथील पाण्यांतील माशांची शिवाशिव किंवा कांठावरील बगळ्यांचे ध्यान पाहत बसणे ही त्याची आवडती करमणूक होऊन बसली होती. आजहि असाच तो नदीकांठच्या एका उंच खडकावर खालीं पाय

सोडून विचार करीत बसला होता. मंदमंद वाहणाऱ्या वाऱ्यामुळें नदीच्या संथ पाण्यावर उत्पन्न होणाऱ्या लहान लहान लाटा त्याच्या पायापाशीं खडकावर आदळून फुटत आणि भोवतालच्या वाळूवर त्यांचा मधुर असा सळसळणारा आवाज होई; एखादा बगळा पाण्यांत पटदिशी बुडी मारून दुर्दैवी माशाला पकडून गिळून टाकी, आणि उडून जातांना त्याचे पांढरे पंख मावळत्या सूर्याच्या सोनेरी किरणात चमकत असत. त्याच्याजवळच्याच एका दगडाखाली दोनतीन खेकडे एकमेकांना रेटीत त्या थोडक्या जागेत शक्य तितक्या दाटी-दाटीने शिरण्याचा प्रयत्न करीत होते. ही सर्व गंमत पाहण्यांत गुंतला असतांना त्याच्या शेजारीच प्रभाकरचा आवाज त्याला ऐकू आला.

" काय मोहन, हा हातरुमाल तुला नकोसा झाला आहे कीं काय ? का कृष्णेंतील माशांना रात्री थंडीत पाघरण्याकरिता द्यायचा विचार आहे ? "

प्रभाकर तेथे केव्हा आला हे त्याच्या लक्षातहि आले नव्हते; त्यानें चमकून वर पाहिले तो त्याच्या खडकाच्या खालीच नदीच्या काठी प्रभाकर उभा होता आणि त्याच्या शेजारीच त्याचा छोटासा हातरुमाल अर्धवट ओला होऊन जलसमाधि घेण्याच्या बेतांत आला होता.

" अरे ! हा केव्हां उडून गेला ! खाली उतरून पाण्यांत गेल्याशिवाय तो आता हातीं लागावयाचा नाही. " असे म्हणून मोहन खडकावरून हात लाब करून हातरुमाल निघतो का हे पाहूं लागला. पण तेथून त्याचा हात पोहचण्यासारखा नव्हता हें उघड दिसत होतेंच. प्रभाकर लागलीच धोतर वर आवरून पाण्यात गेला आणि हातरुमाल काढून घेऊन मुठीने पिळून त्यानें तो मोहनच्या हातीं दिला.

" तूं वेळेवर आलास म्हणून माझा हातरुमाल निघाला, नाहीतर गेलाच होता. " असे बोलून मोहन उठला आणि रुमाल घेऊन चालूं लागला. थोडा थाबून प्रभाकराच्या बरोबरच विद्याश्रमाकडे परतावें असं त्याच्या मनांत आलें. पण प्रभाकरला कितपत आवडेल याची शंका असल्यामुळें तो चालूं लागला.

पायाला लागलेला चिखल धुऊन काढण्यांत प्रभाकर गुंतला असतांना मोहन चालूं लागला हे त्याच्या लक्षांत आलें. त्याला थांबविण्याकरितां तो म्हणाला, " अरे गृहस्था, जरा थांबशील की नाहीं ! आह्मांला सुद्धां विद्याश्रमांत परत यावयाचें आहे. "

" वा! जरूर थांबतों की. मी थांबणार होतों पण म्हटलें तुला आवडेल की नाही कोण जाणे."

" कांही तरीच. न आवडायला रे काय झालं? चल आपण जरा वाळवंटांत हिंडूं. येतास? अजून घंटेला बराच अवकाश आहे."

ते दोघेहि नवीन झालेले मित्र पुढे चालूं लागतात तोंच मनोहर सावकाश पाठीमागून आला आणि मोहनच्या पाठीत, मुलेच मारूं जाणणारी प्रेमाची थाप मारून म्हणाला,

**येथं कां रे उभा रामा। मनमोहन मेघश्यामा॥**
**काय पाहतो समोर। जेवि चंद्रासि चकोर॥**

" तूं आज कोणते पुस्तक वाचीत होतास सांगूं?" प्रभाकरने हंसत उत्तर दिलें. " खरेच डुल्या, तुझे मन म्हणजे उथळ पाण्याच्या ओढ्यासारखे. ज्या पुस्तकांतून तो आज वाहत आला त्यांतील शब्द तुझ्या स्वकृत कवितेत यावयाचेच."

" उथळ पाण्याचा ओढा म्हणतोस! भले बहाद्दर, अरे खोल पाण्याची नदी म्हण, प्रभाकरच्या किरणानींहि न आटणारा समुद्र म्हण पाहिजे तर."

" गप्प बैस रे, माझ्या नांवावर कसल्या कोट्या करतोस. तुला कोट्या करण्यासारखे माझे नाव माझ्या आईने कशाला ठेविले कोण जाणे." आणि ते तिघेहि विद्याश्रमात परत येण्यास निघाले.

प्रभाकर आपल्या खोलीकडे वळल्यावर मनोहर म्हणाला, " खरेच मोहन, आज तूं एक नामी मित्र संपादन केलास यांत शंका नाही. प्रभाकर कांहीं सगळ्यांशी इतकी दोस्ती करीत नाही. आता तुझी प्रभा इतकी फाकेल की, दुसऱ्या मुलाना तुझ्याकडे डोळे वटारून पाहण्याचीसुद्धा लाज वाटेल."

" तूं, नागेश, आणि प्रभाकर यांनी माझ्याशीं दोस्ती ठेवली म्हणूनच मी सुखांत आहें. बाकीच्यांची मला पर्वा नाही पण माझ्याशी मैत्री करण्यास तो कसा काय तयार झाला कोण जाणे!"

" मला वाटते ही सगळी मुले तुला इतके नको नकोसे करून सोडतात हें त्याला आवडत नसावे. खरेच मोहन तूं धीराचा. इतका त्रास दुसऱ्या कोणीच सहन केला नसता."

" त्रास तर होतोच, डुल्या, पण त्याला काय इलाज ! मला भीति वाटते ती इतकीच की, तूं आणि नागेश यांनी कंटाळून माझी दोस्ती सोडली तर मात्र माझी धडगत नाही. कारण मग मला कोणीच मित्र उरणार नाही. त्या जनार्दनच्या कंपूत मी शिरलो आणि त्यांच्याशी दोस्ती केली तर त्यांना हवीच आहे; आणि तूं आणि नागेश नसता तर मला त्याच्याशीच दोस्ती करणे भाग होते. "

" घाबरूं नकोस, मोहन, हे सगळे आता ठिकाणी येतील बघ. "

अशा रीतीनें एक एक पाऊल पुढे टाकीत, यशोमंदिराची कठीण चढण मोहन हळूहळू चढून जात होता. त्याचे हृदय जात्याच धीराचे आणि निर्मळ होते; त्यातच त्याच्या सुशील मित्राच्या उत्तेजनाची मदत मिळाल्यामुळे त्याचा मार्ग पुष्कळच सुकर झाला. खेळातील त्याच्या प्राविण्यामुळेहि त्याची लोकप्रियता पुष्कळच वाढली. फुटबॉलमध्ये एक यशस्वी वीर म्हणून त्याची ख्याति होतीच आणि प्रत्येक सामन्याच्या वेळी तो ज्या बाजूला असेल त्या बाजूला यश मिळण्याची पुष्कळ खात्री वाटत असे. क्रमाक्रमाने त्याची तात्पुरती अपकीर्ति कमी होऊं लागली, आणि अद्याप जरी विद्यार्थिगणावर त्याचे पूर्वीप्रमाणें वजन पडत नव्हते तरीहि तो लवकरच आपलें स्थान पुनः पटकावणार यांत शंका राहिली नव्हती.

एका प्रसंगाची मात्र त्याची आठवण कधींहि बुजली नाही. विद्याश्रमाचा व्यास-पौर्णिमेचा वार्षिकोत्सव सुरू होता आणि त्याच्या अनुषंगाने व्यायाम-विषयक शर्यती व इतर खेळ चालू होते. सर्व विद्यार्थी पटांगणात जमले होते. विद्याश्रमाशी संबंध असलेले कांही सभ्य गृहस्थ, बरेचसे जुने विद्यार्थी आणि काही मुलांचे पालक व इतर नातेवाईक मंडळी उत्सवाकरितां मुद्दाम आलेली होती. व्यायामाची नैसर्गिक हौस असलेले आसपासच्या खेड्यातील काही हौशी जवानहि मुलांचे खेळ पाहण्यास कौतुकाने आले होते. उंच उड्यांची शर्यत नुकतीच संपली होती. आणि त्यांत सातवीतील एका चपळ मुलानें बक्षिस पटकाविलें होते. त्यानंतर पंधरा वर्षांच्या खालील मुलांच्याकरितां उंच उड्यांची सुरुवात झाली.

शशिकांत, नाना आणि आणखी दोन मुलें शर्यतीत भाग घेण्याकरितां पुढें आलीं आणि कपडे काढून तयारी करूं लागलीं.

"मोहन, तूं कां नाहीं जात? तुला खास बक्षिस मिळेल," मनोहरनें सुचविले.

"मी! छे, मी नाहीं जात, डुल्या," निराशेच्या आवाजांत मोहन म्हणाला. त्याने भोवताली पाहिले; दोन-अडीचशें विद्यार्थ्यांत आपल्याकरिता सहानुभूति दाखविणारा एकहि मुलगा त्याला दिसला नाही. " मनोहर, तूं जा ना, तुला सुद्धां बक्षिस मिळेल. माझा सगळीं मुलें द्वेष करितात आणि तूं मात्र माझ्याशीं मैत्री ठेवीत आहेस. तुलां सुद्धां आतां मुले त्रास देऊं लागतील बघ. "

" मला नाही त्याची पर्वा, त्यांचाच मार्ग चुकलेला आहे. प्रभाकर असता तर म्हणाला असता की ' कोणी निंदा कोणी वंदा, आपुला स्वहिताचा धंदा.' मग तूं जातोसना उडी मारायला?"

मोहननें मान हालविली. "मला नको आग्रह करूं. ही सगळी मुले मला हुशहुश करून खालीं बसवितील झाले. "

" तूं जात नाहीस तर आपणहि नाहीं जात. "

" छे, छे, असे करूं नकोस. तुला खास बक्षिस मिळेल बघ. हो ना पुढे. शहाणं बाळ ते आमचं. मी डोळे मिटूं कां? कोण जातो, डुल्या जातो. "

व्यायाम शिक्षक व एक दोन स्वयंसेवक हातांत दोऱ्या व तांबडी पाढरी निशाणें घेऊन मोकळ्या असलेल्या पटांगणांत शर्यतीची व्यवस्था करीत हिंडत होते. चारच मुलें उभी असलेलीं पाहून ते म्हणाले, "बस! चारच मुले शर्यतीत भाग घेणार? अरे आणखी या की कांहीं जण?"

" आम्ही दोघे आहोत. आमची नांवे टिपा, मनोहर आणि मोहन." मोहनचा हात धरून त्याला ' मैदानांत ' खेचीत मनोहर म्हणाला; आणि लागलीच कोट वगैरे काढून तयारीस लागला.

मोहनचा नाइलाज झाला. बळेंच पुढें आणून नांवेंसुद्धां टिपल्यानंतर परत जाणें त्याला प्रशस्त वाटेना. अर्थात् त्यालाहि तयारी करणें भाग पडलें.

तीन फूट उंचीवर दोरी धरून उड्या मारण्यास सुरुवात झाली. सहाहि मुलांनीं ही उडी सहज मारली. तरीहि त्यांच्या उड्या मारण्याच्या पद्धतींकडे पाहतांच अखेर मनोहर आणि मोहन यांच्यांतच खरा चुरशीचा सामना होणार हे कोणालाहि उघड दिसलें असतें. मोहनची चपळता आणि उडी मारण्याची

सफाई वाखाणण्यासारखी होती. पण मनोहर उंच असल्यामुळें त्याला उंचीचा फायदा मिळण्यासारखा होता.

प्रत्येक उडीच्या वेळी दोरी थोडी थोडी उंच केली जात असे. तीन फूट सहा इंचांवर दोन मुलें गळालीं.

त्याच्यानंतर गळणारा मुलगा शशीकांत. त्याच्या अजागळपणे मारलेल्या उड्यांमुळे दर खेपेला पुष्कळ हंशा पिकत असे. आणि जेव्हां तो अखेर गळला तेव्हां त्या गर्दींतहि मनोहरनें शशीविलाप महाकाव्याचा आणखी एक श्लोक तयार करून त्याला ऐकविला आणि शशीकांतानेहि पण " मार खाशील अं, डुल्या " हे आपले ठराविक उत्तर त्याला ऐकविले.

आता फक्त तीनच मुले उरली—नाना, मनोहर आणि मोहन. दोरी हळूं हळूं उंच केली जात होती आणि त्यांच्या उड्या एकामागून एक संथपणे चालूं होत्या. चारफूट एक इंचावर नानाचा पाय दोरीला लागला; पण आणखी एक संधि देण्यात आली आणि त्याच्या ह्या दुसऱ्या उडीत त्यानेंहि यश मिळविले.

आतां शर्यतीला खरा रंग चढला. चार फूट चार इंचावरहि मनोहर आणि नाना यांनीं उडी मारली. त्याबरोबर त्या दोनशे मुलांनीहि टाळयांचा कडकडाट केला. मोहनची पाळी शेवटची होती, त्याचीहि उडी गेली, दोघांच्याहिपेक्षा जास्त सफाईने गेली, पण उत्तेजनार्थ एकहि टाळी ऐकूं आली नाही. शिक्षक बसले होते त्या बाजूनें पाठकशास्त्र्यांचा फक्त आवाज ऐकूं आला, " शाबास, मोहन, छान. "

दोरी आणखी एक इंच उंच चढली आणि तिघांहि मुलांच्या उड्या त्याच्यावरून गेल्या, आणि मागील खेपेप्रमाणेच मनोहर व नाना यांच्या उडीच्या वेळेला टाळ्यांचा कडकडाट झाला. मोहनच्या उडीकडे कोणाचेंहि लक्ष गेलें नसावें असेच दिसले. नागेश आणि प्रभाकर यांनीं मात्र पुढे होऊन मोहनच्या पाठीवर थाप मारली आणि त्याच्या सफाईदार उड्यांबद्दल त्याचें कौतुक केले. परंतु त्यांच्या ह्या तुरळक टाळ्यांमुळे इतर मुलांची त्याचेविषयीची उदासीनता जास्त स्पष्टपणें भासूं लागली; आणि हे सुद्धां इतरांच्या सारखेच गप बसतील तर बरें असें मोहनलाहि वाटूं लागलें. त्याच्या सर्व अंगाला कंप सुटला, इतक्या सर्व पाहुण्यांच्या देखत आपलेविषयींचा तिरस्कार इतक्या उघडपणें

दाखविणाऱ्या मुलांचा त्याला राग आला, त्यांच्या त्या अनुदार आणि कोत्या मनोवृत्तीची त्याला चीडहि आली.

दोरी आणखी एक इंच उंच चढली. नाना आणि मनोहर दोघांनीहि टाळ्याच्या गजरात दोरी ओलांडली ; पण उडी मारताना राग, तिरस्कार इत्यादि विकारांनी मोहनच्या मनांत खळबळ उडवून टाकल्यामुळें त्याचें चित्त अस्वस्थ झाले होते. त्याच्या उडीत नेहमीची सफाई दिसली नाही आणि दोरीला त्याचा पाय लागला. त्याला दुसरी संधि मिळाली; त्याचे चित्तहि आता जरा स्थिर झाले असल्यानें ही उडी छानच गेली. तरीहि सर्व मुले शांतच. पहिल्यादा अपयश आले असतां पुनः प्रयत्न करून दुसऱ्या खेपेस यश मिळविणाऱ्याहि मोहनचें कौतुक करावे असे त्याना वाटले नाही ही चमत्कारिक तऱ्हा पाहून आलेल्या पाहुण्यानाहि आश्चर्य वाटले आणि त्यांची कुजबुज सुरू झालेली मोहनच्याहि लक्षात आली.

“ ह्या मुलाच्या खेपेला टाळ्या का देत नाहीत ? तो तर फार चांगला मुलगा दिसतो. ” एका मुलाजवळ बसलेल्या त्याच्या बहिणीने प्रश्न केला.

“ कांही दिवसांपूर्वी त्याने एक मोठा अपराध केला होता. ” हलक्या आवाजांत दिलेले असले तरी हे उत्तर मोहनच्या कानांवर आल्याशिवाय राहिले नाही.

आता मात्र मोहनला सहन करवेना. कुजबुज करणाऱ्या पाहुण्यांकडे त्याने एक दृष्टिक्षेप केला. त्याच्या नजरेंत रागापेक्षा दुःखच जास्त दिसून येत होते. तो घाईने परतला आणि पुनः उडी मारण्याकरिता जाण्याऐवजी तो मुलांच्या घोळक्यांत शिरला.

“ हे काय? मोहन शर्यत सोडून देतो आहे? ” कांही मुले एकदम म्हणाली.

“ सोडून जाईल नाहीतर काय करील? ” प्रभाकर तिरस्काराने म्हणाला. “ तुम्ही काय त्याला कमी छळता आहां! मोहन, तूं त्यांचें मनावर घेऊं नकोस. त्यानाहि आपल्या वर्तनाची लाज वाटेल. ” आणि मोहनचा हात धरून त्याला तो पुढें घेऊन येऊं लागला.

“ देशमुख, तूं उडी मारीत नाहींस? ” एका स्वयंसेवकानें विचारलें.

“नाहीं.” आणि मोहन मुलांच्या घोळक्यांत अधिकच आंत शिरूं लागला.

" कांहीं तरीच, " मनोहर त्याला आग्रह करूं लागला. " चल, कसा ऐन रंगांत भंग करतो आहेस अगदीं. "

" डुल्या, मला आग्रह करूं नकोस, " मोहननें मान फिरवली आणि डोळ्यांत हट्टाने येणारा अश्रुबिंदु पुसून टाकला.

" छे, छे, तूं अर्धवट सोडून गेलास तर कोणालाच बरें वाटणार नाहीं. चल, पुढें हो. त्यांच्याशी तुला काय करावयाचे आहे? तुझें बक्षिस तर कोठें गेलें नाहींना? ते पहा पाठकशास्त्री आले बरे कां. तूं नाहीं आलास तर त्यांना सुद्धां वाईट वाटेल. "

"हे पहा, डुल्या, केवळ तुझ्या समाधानाकरितांच मी येतों. नाहीतर माझी कांही आतां इच्छा नाही. " हें बोलतांना मोहनचे डोळे पाण्यानें डवरले होते.

"चालूं दे, मोहन, अर्धवट सोडूं नको." मोहन परत येऊन उडी मारण्याची तयारी करूं लागलेला पाहतांच पाठकशास्त्री त्याला उत्तेजन देण्याकरितां मोठ्याने म्हणाले.

ह्या खेपेला नाना गळाला, आणि मनोहरचासुद्धा पाय दोरीला अगदीं लागण्याच्या बेतांत होता. पण मोहनची उडी, तिरस्काराच्या आवेशामुळे किंवा पाठकशास्त्र्याच्या उत्तेजनामुळें म्हणा, सर्वांपेक्षा अत्यंत सफाईची आणि प्रेक्षणीय अशी झाली. आपल्या वर्तनाची मुलांनाहि आता लाज वाटूं लागली होती. इतक्या परिस्थितीत मोहन आपलें धैर्य खचूं देत नाही हे पाहून त्यांनाहि त्याचे कौतुक वाटूं लागले होतें. आणि ह्या खेपेस मोहननें उडी मारल्याबरोबर टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

आतां मनोहर आणि मोहन यांच्यामध्ये चुरशीचा सामना सुरू झाला. मोहननें चार फूट साडेसहा इंचांची उडी आपल्या नेहमीच्या सफाईनें झोकांत पेलून दिली, पण मनोहरचा पाय दोरीला लागून दोरी पडली. मनोहरला दुसरी संधि देण्यांत आली, आणि त्या खेपेसहि मोठ्या शिकस्तीनें त्याचा पाय दोरीला लागावयाचा राहिला. पण मनोहरच्या या यशाबद्दल जो प्रचंड कड-कडाट झाला तो अपूर्वच. या सामन्यांत मनोहरलाच यश मिळावें अशी मुलांची इच्छा होती ही गोष्ट आतां अगदीं उघड दिसून येत होती. ह्या सामन्यांतलें बक्षीस मनोहरला मिळावें अशी मोहनची इच्छा होतीच. त्याचा एकदम निश्चय

ठरला आणि पुढच्या उडीत अपयश घ्यावयाचे त्याने ठरविले. पण आपण हेतुपुरःसर अपयश घेतले हे कोणाच्या—विशेषतः मनोहरच्या—लक्षात येऊं नये म्हणून आपली सर्व शक्ति एकवटून आपण उडी मारीत आहोत असें भासवूनहि दोरीला स्पर्श करण्याचा त्याचा विचार होता. पण प्रयत्न करून अपयश मिळविणें वाटते तितके सोपे नसते; त्याची उडी नेहमीप्रमाणेच सफाईने गेली. हे पाहून त्याला स्वतःलाहि आश्चर्य वाटले. मनोहरलाहि ही उडी मारण्यात यश आले होतेच. अथार्त् मोहनने पुढील उडीचा प्रयत्न करण्याचेच नाकारले आणि सामन्याचे बक्षीस दोघात वाटून द्यावें असा पंचानी निकाल दिला. सामन्यातील चुरस, मुलांनी तिरस्कार दाखविला असताहि मोहननें दाखविलेली चिकाटी, त्याच्या उड्यांची सफाई व विशेषतः त्याचा दिलदारपणा या सर्वांमुळे हा सामना विद्याश्रमातील मुलाच्या स्मरणातून पुष्कळ दिवस गेला नाही.

शर्यती संपल्या आणि सर्व मुले, शिक्षक व अभ्यागत सभामंडपांत बक्षिस-समारंभाकरिता जमले. बक्षिसे वांटतांना मनोहरचे व मोहनचे नाव पुकारण्यात आलें. तेव्हा एकटा मनोहरच उभा राहिला. मोहन कोठेच दिसेना, कोठे गेला आहे हेंहि कोणास सागता येईना. अर्थात् बक्षिसाकरितां द्यावयाचे दोनहि चांदीचे बिल्ले मनोहरच्या स्वाधीन करण्यांत आले. आणि त्यापैकी ‘ एक मोहनला दे ’ म्हणून त्याला सांगितले.

बक्षिससमारंभ आटोपला, मुले आपआपल्या खोल्यातून पागली, पाहुणे-मंडळीहि आपल्या उद्योगास निघून गेली; मोहन कोठे गेला असेल याची मनोहरला बरोबर कल्पना होती. नागेशला घेऊन नदीच्या कांठी असलेल्या एका आंब्याच्या झाडाकडे त्यानें मोर्चा फिरविला, आणि त्याचे अपेक्षेप्रमाणे त्या झाडाखालीं पायावर पाय ठेवून नदीच्या पात्रावर नाचणाऱ्या लहान लहान लाटांचा खेळ पाहत निष्काळजीपणे बसलेला मोहन त्यांना आढळला.

मनोहरचा आनंद गगनात मावत नव्हता. मोहनच्या पाठीवर जोराने थाप मारून तो म्हणाला:

**घेवोनि संगरिं स्वतःच पराभवातें ।**
**आलासि तूं नदितटींहि पळून मातें ॥**

आणि खिशांतून आजच संपादन केलेला बक्षिसाचा बिल्ला त्याच्या पायावर टाकीत आपलें कवित्व त्यानें पुढे चालविलें.

**हें पारितोषिक तुझें अणिलेंच म्यां, तें।**
**ठेवीतसें तव पदीं, फळ त्या पदांचें॥**

मनोहरचें हें अगाध कवित्व ऐकून त्याच्या उदास मनस्थितींतहि मोहनला हंसूं आल्याशिवाव राहिले नाही.

"डुल्या, दोनहि बक्षिसें तूंच ठेव. खरोखर मी एकसुद्धां बक्षिस घेणार नाही. तुझा आग्रह नसता तर मी शर्यतींतसुद्धा भाग घेतला नसता."

"छे, छे, तुला बक्षिस घेतलेंच पाहिजे." त्याला अधिक आग्रह करीत नागेश म्हणाला. "तूं जर घेतले नाहीस तर मुले म्हणतील तुला गर्व झाला आहे."

"मला पर्वा नाहीं ते काय म्हणतील त्याची. त्यांनीं माझी कशी संभावना केली तीं तूं पाहिलीसच. हे बघ, डुल्या, तुझ्या आग्रहाकरिता मी एक बक्षिस घेतले असते, पण त्याच्याकडे पाहून उगीच नेहमी नेहमी आजच्या प्रसंगाची आठवण होत राह्यची म्हणून घेत नाहीं मी."

"पण मी दोनहि बक्षिसें कशी घेऊं?" मनोहरला त्याचें कारण पटलेंसे दिसले, म्हणून अधिक आग्रह न करता तो म्हणाला.

"मी सांगतो त्याचे. एक नानाला दे. नाही तरी त्याने आज छानच उड्या मारल्या आहेत आणि इतराच्यासारखा तो कुचकाहि नाही. पण मला आग्रह करूं नको. तुझें मन मला कधींच मोडवत नाही आणि तू किती किती तरी चांगला आहेस. पण मला किती वाईट वाटते याची तुला कल्पनाहि नाहीं."

"ठीक आहे, मोहन, तूं म्हणतोस तसेच करूं. हा बिल्ला नानाला देऊं. अन् आतां तूं किती दिवस रडत बसणार आहेस तो! चल ऊठ पाहूं."

मोहननें आपलें बक्षिस नानाला दिलें, ही गोष्ट दुसरे दिवशीं विद्याश्रमाच्या सर्व मुलांत पसरली; त्याचप्रमाणें क्रीडांगणावर जाऊन मोहनने नाना आणि मनोहर यांच्या देखत चार फूट आठ इंच उडी मारून दाखविली आणि मनोहर किंवा नाना या दोघांपैकीं कोणालाहि तितकी उडी मारतां आली नाहीं ही गोष्टहि सर्वांना लागलीच समजली. मोहनच्या या धीरोदात्त वागणुकीचा परि-

णाम मुलांवर झाल्याशिवाय राहिला नाहीं. पुष्कळ मुलांना आपल्या हेकेखोरपणाची लाज वाटूं लागली, आणि मोहनशीं पुनः दोस्ती करण्याचा प्रयत्नहि ते करूं लागले.

मोहनचें अंतःकरण कमी उदार असतें, त्याचा स्वाभिमान कमी तेजस्वी असता तर त्याला आपली गेलेली लोकप्रियता पुनः संपादन करण्यास इतके दिवस लागले नसते. " पानी तेरा रंग कैसा ? जिसमें मिलावे वैसा " या प्रकारची बेफिकीरीची ( ? ) वागणूक त्यानें ठेविली असती तर मुलांमध्ये तो यापूर्वीच मिसळून जाऊं शकला असतां. पण आज सावकाश पण सन्मानानें त्यानें आपलें गेलेलें वजन जसें परत मिळविलें, तो मान व ते वजन त्याला क्वचितच संपादन करता आलें असतें.

कोणत्याहि तऱ्हेनें पाठकशास्त्री याच्या मनाला काडीइतकेंहि दुःख होणार नाहीं याबद्दल तो कसा जपत असे हें पाहिलें म्हणजे कोणींहि त्याचें कौतुकच केलें असतें. वर्गांतील सर्व अभ्यास वेळेवर करून आणि वर्गांत पद्मनाभापेक्षांहि शांत बसून आणि स्वतःचा अल्लड व चापल्यप्रचुर स्वभाव मोठ्या प्रयासानें आंवरून शिक्षेच्या चक्रव्यूहांतून त्यानें कायमची सुटका करून घेतली होती. व्याकरणाचे नियम व पाठातर त्याला अजूनहि कठीण जाई, पण आता त्याला घोकंपट्टीची संवय होत चालली होती आणि त्याची स्मरणशक्तीहि तयार होऊं लागली होती, त्यामुळे सकाळीं व रात्रीं अधिक श्रम करून ह्या बाबतींतहि त्यानें अघाडी मारली होती.

कीर्तिरूपी कांचेचें भांडें एकदां फुटलें म्हणजे तें सांधणें किती कठीण असतें, याचा अनुभव मोहनला आता पूर्णपणें आलाच होता. सर्व लोकांची मनें आतां याचेविषयीं निवळत चाललीं होतीं. पण शांतारामपंत यांचे मनांतील त्याचेविषयींची अप्रीति अद्यापिहि कमी झाली नव्हती. पाठकशास्त्री यांचा महत्त्वाचा ग्रंथ कायमचा नाहींसा झाला याबद्दल तर त्यांचा राग मोहनवर होताच. पण ज्या मुलाचें आपण गुणवर्णन केलें किंबहुना ज्याचा पक्ष घेऊन आपल्या सहकाऱ्यांशींहि वाद घातला त्याच मुलानें आपल्याला असें फशी पाडावें व असलें निंद्य वर्तन करावें ही गोष्ट त्यांच्या मनाला फारच लागून राहिली होती. झालें असें कीं त्या दिवसानंतर पाठकशास्त्री यांनीं दिलेला अभ्यास मोहनचा लक्षा

नाहीं असा एकच प्रसंग आला होता. ज्या दिवशीं ते नियम वर्गात समजावून दिले त्या दिवशी मोहन गैरहजर असल्यामुळे त्याने कितीहि परिश्रम केले तरी दुसरे दिवशी त्याचे नियम कच्चे राहिलेच; आणि वर्ग सुटल्यानंतर सर्व नियम लिहून दाखविण्याची शिक्षा त्याला मिळालीच. पण 'अभ्यास न' झाल्याबद्दल मोहनच्या अंतःकरणाला किती दुःख होत होते याची जाणीव पाठकशास्त्र्यांना स्वतःलाहि झाल्याशिवाय राहिली नाही. वर्ग सुटल्याबरोबर मोहनला बोलावून त्यांनी सर्व खुलासा केला; त्याचा अभ्यास आज न होण्याचे कारण आपल्याला माहीत आहे, पण अभ्यास न करणाऱ्या सर्वच मुलांना शिक्षा दिली, तेव्हा मोहनच्या एकटयाच्या बाबतींत असा पक्षपात मला करतां येत नाही, असेहि स्पष्टीकरण त्यांनी केले. इतकेंच नव्ह, तर शिक्षा झाल्याबद्दल 'मला तुझा राग आला नाही व तूं सुद्धा मनाला मुळींच वाईट वाटूं देऊं नको असे त्याचें समाधानहि करण्यास त्यांनी कमी केले नाही.

त्याच दिवशी संध्याकाळीं मोहन वर्गात नियम लिहीत बसला असताना शातारामपंतांनी त्याला पाहिलें आणि अजूनहि त्याची गाडी सरळ रूळावर आली नाही अशीच त्याची समजूत झाली.

"वा अजून तुह्मी आहांतच का ?" तिरस्काराने त्याचेकडे तीव्र दृष्टि रोखून ते म्हणाले, "परवाच्या प्रकारानंतर पुनः शिक्षा भोगण्याच्या प्रसंग आला असता तर मला तर लाज वाटली असती!"

रात्रंदिवस परिश्रम करीत असताना, अनुतापयुक्त अंतःकरणाने बिकट परिस्थितीशी धैर्याने तोंड देत असतांना, अपराधाच्या मानाने अतिशय तीव्र शिक्षा भोगल्यानंतरहि हे शब्द ऐकण्याचा प्रसंग कोणावर येता तर त्याला मरणप्राय दुःख झाले असते. मग ज्या शिक्षकाबद्दल मोहनला विशेष आदर वाटे, त्या शिक्षकांनी वर्गातील अत्यंत आळशी आणि उनाड मुलाच्या देखत केवळ दैवयोगाने घडून आलेल्या एकाकी चुकीबद्दल हे शब्द उच्चारून आपला अपमान करावा हे पाहून मोहनच्या अंतःकरणाला किती तीव्र वेदना झाल्या असतील याची कल्पनाच करावी. त्याने वर पाहिले, त्याच्या काळयाभोर डोळ्यांमध्यें निराशा, दुःख, उद्वेग अगदी एकवटून आलेले होते, पण शांताराम यांनीं त्याच्याकडे पाहिलेंच नाही. ते केव्हांच पुढे निघून गेले होते. त्यानें मान खाली

घालून निर्जीव यंत्राप्रमाणें आपले लिखाण पुनः सुरू केले, भूतकाळची आठवण कधींच का बुजली जात नाहीं ! झालेला अपमान लोकांच्या स्मरणांतून कधींच कां जाऊं शकत नाही ! त्याच्या डोळ्यांतून एक मोठा अश्रुबिंदु टपकन खालच्या कागदावर पडला. त्याने तो पुसून टाकला, पण त्याच्या मागून दुसरा, त्याच्या मागून तिसरा, असे अश्रू येऊं लागले. त्याचा नाइलाज झाला. कारण सर्व शिक्षकांपेक्षां शांताराम याच्या मताला तो अधिक महत्त्व देई आणि वाटेल ते करून त्यांचें आपल्याविषयीं अनुकूल मत घडवून आणण्याकरिता तो जिवापाड परिश्रम करीत असे.

थोड्या वेळाने शांताराम पुनः त्याच्याजवळून जाऊं लागले, तेव्हा आपण सहज उच्चारलेल्या शब्दांनी कोणते कार्य करून ठेविले आहे ते त्यांच्या लक्षात आले. मोहनच्या हृदयाला लागलेला घाव त्यांच्या लक्षात आला. त्याच्या वहीवर पडलेल्या डागाचे कारणहि त्याना कळलें नाहीं असे नाहीं. त्यांचे अंतःकरण कळवळलें.

"अरेरे, मोहन, मी तुला फार बोललों ! माझ्या ते आता लक्षात आले. आज प्रार्थना आटोपल्यावर माझ्या खोलीत ये, मला तुझ्याशी कांहीं बोलावयाचें आहे."

# प्रकरण अकरावें

## सुखाचे दिवस

**' यदेवोपनतं दुःखात्सुखं तद्रसवत्तरम् ।। '**

शांताराम यांनी बोलाविल्याप्रमाणे रात्रीं प्रार्थना आटोपल्यावर मोहन त्यांचे खोलींत गेला. शांताराम काहीं कामांत गुंतले असल्यामुळे अद्याप आपल्या खोलींत आले नव्हते; पण मनोहर, नागेश आणि प्रभाकर यांनाहि त्यांनीं बोलाविलें होतें असें दिसलें. कारण मोहन आला तेव्हा तेहि त्याचीच वाट पाहत तेथें बसले होते, आणि आपल्या नेहमीच्या स्वभावास अनुसरून अर्थहीन कोट्या आणि शल्यरहित विनोद करून मनोहर सर्वांची करमणूक करीत होता.

" आज आमच्या वर्गांत केवढा अपघात झाला तुला माहीत आहे कां? " नागेश म्हणाला, " गोपाळराव यांचा तास चालू होता तितक्यांत त्यांना कसलीशी घाण आली. ते म्हणाले—"

" घाण? " मनोहर मध्येच म्हणाला, " छे! पैज तुझी माझी. त्यांनीं घाण हा शब्द सुद्धां उच्चारला नसेल. इतक्या साध्या शब्दांत त्यांनीं कसें बोलावें? 'स्टेशनवर टांगा पिटाळ' म्हणायचें असलें तर ' अग्निरथविश्रामस्थानावर अस्मादिकांना वाहून नेण्याची या दधिक्रावाला प्रेरणा कर ' असें म्हणावयाचे ते. "

" कां बरें, घाण आली असेंच म्हणणार ते—नाहीं तर काय म्हणतील ते? "

" वा, 'घ्राणेंद्रियाला उत्क्षोभित करणारी कोणती ही दुष्ट गंधि प्रवर्तित होत आहे.' " मनोहरनें शिक्षकाच्या रेकून बोलण्याची हुबेहूब नक्कल करीत उत्तर दिलें.

" असें म्हणायचे ते—नाहींतर ' कसला असह्यकारक संतापजनक—' ए प्रभाकर, घाणीबद्दल संस्कृत, कानडी, द्राविडी शब्द सांग ना एखादा. "

" उद्गीरण " प्रभाकरनें सुचविलें.

"हां, हां, बेश अगदी," मनोहरनें पुढें चालविलें, " 'संतापजनक वायुविशेषाचें उद्गीरण.' कां खरें की नाहीं मी म्हणतों तें? "

" असेच कांहींसें म्हणाले ते. पण मी काय म्हणत होतो—हो मग ते त्रिविक्रमाला म्हणाले की ' त्या कपाटांत पहा एखादा अनाहूत अभ्यागत गजाननवाहन मूषक तेथें मरून पडला आहे का. ' अन् मग काय झाले, तो त्रिविक्रम त्या कपाटाकडे गेला आणि दार जो उघडायला लागला तो त्याचा पाय भस्दिशी खालीं गेला. अरे खालच्या जमिनीला पडला होता खळगा. आह्मांला वाटले की आता हा खालच्या मजल्यावर जाणार. "

"खरेच आमच्या वर्गात पडला असता तर काय मजा झाली असती. आमचा पाठकशास्त्र्यांचा तास चालू होता. ते काय म्हणाले असते रे, मनोहर ? " मोहन म्हणाला.

" पाठकशास्त्री होय ! " मनोहरला तेच पाहिजे होते. " अगदी गंभीरपणे ते त्याला म्हणाले असते 'त्रिविक्रमा, त्रिविक्रमा, काय हे ? वर्गांत प्रवेश करण्याचा हा मार्ग नव्हे. अगदी गैरशिस्त; आणि तुझा हात जर मोडला नसेल तर वर्ग सुटल्यावर दोनशे आर्या लिहून दाखव.' "

" आणि श्रीपादराव काय म्हणाले असते ? " नागेशने पुनः प्रश्न केला.

" श्रीपादराव, होय.—त्यांनी आपली आरशी एकदा साफ केली असती आणि ती पुनः अल्लद बसवीत वर पाहिले असते. " मनोहरने त्या शिक्षकाचा अभिनय बरोबर वठवीत उत्तर दिले. " ' ओहो! त्रिविक्रम वरच्या मजल्यावरून पडला, एखादा हातबीत मोडून घेतला असेल, भारीच बावळट नाहीं तरी तो, निदान आजचे दिवस तरी त्याचा दंगा थाबेल एकदांचा, ' आणि मग त्यांनी पुढें होऊन त्याचे हातपाय तपासले असते. "

" आतां हें नाटक पुरेच कर, शांताराम काय म्हणाले असते ?" प्रभाकरने सूचना केली.

" शांताराम ! ते सागणें अगदीच सोपे ! त्यांनी एक सुंदरसे अवतरण म्हणून दाखवून आम्हांला सांगितलें असतें ' पहा ह्या त्रिशंकूला इंद्राने स्वर्गातून घालवून दिला आणि तो आतां खालीं पडत आहे. अरे तेथेच थांब, त्रिविक्रम, तिष्ठ, तिष्ठ यावद् घंटा भवेत् पुनः । ' "

" खरेंच कां असे म्हणाले असते ते " शांतारामांनी मागून येऊन त्याचे कान उपटीत उत्तर दिलें. त्यांचा हंशा चालू असतांना ते केव्हां खोलीत आले तें त्यांच्या लक्षांतच आलें नव्हते.

रात्रींची प्रार्थना आटोपल्यावर शिक्षकांच्या खोलीत जमण्याचा हा प्रघात व्यासविद्याश्रमांत किती तरी दिवसांपासून चालू होता. ज्या मुलांशी जास्त परिचय करून घ्यावा असे शिक्षकाना वाटे त्या मुलांना ते रात्री आपल्या खोलींत बोलावीत. थोडीशी फळे किंवा इतर साध्या अल्पोपाहाराचीहि व्यवस्था त्या वेळी ते करीत आणि नेहमीपेक्षा तास दीड तास उशीरां निजण्याची सवलत मिळे. विद्याश्रमांतील वातावरण उदात्त व अधिक निर्मळ आणि प्रेमळ राखण्यांत ह्या पद्धतीचा फारच उत्कृष्ट उपयोग होत असे. मुलांचा आणि शिक्षकांचा अधिक परिचय होई, मोकळ्या मनाने हास्यविनोद करताना एकमेकांच्या अंतःकरणाची परस्पराना अधिक स्पष्टपणे ओळख पटत असे. शाळेतील शिक्षामय आणि निरुत्साही वातावरणाच्या कृत्रिम बुरख्याचे दडपण दोघांच्याहि मनावरील या वेळीं निघून जात असल्यामुळे मुलाच्या हृदयांतील सूक्ष्म भावना व उदात्तता व्यक्त होण्यास संधि मिळे; आणि अशा वेळी शिक्षकांच्या चारित्र्यमय जीवनाचा त्यांच्या अंतःकरणावर जो ठसा उमटे त्याचा परिणाम त्यांच्या सर्व जीवनक्रमावर सूक्ष्मपणे झालेला दिसून येई. उच्च आदर्श, महत्त्वाकांक्षा, राहणीचा साधेपणा इत्यादि सद्गुणांचे इतर कृत्रिम उपायांनीं शिक्षण देण्याचे प्रयत्न सर्वस्वी कसे निष्फळ होतात हे ज्यांनी अनुभविलेले आहे, त्यांना व्यासविद्याश्रमांतील गुरु-शिष्याचा सहवास घडवून आणणाऱ्या या पद्धतीचे महत्त्व तत्काळ लक्षांत येईल. कोणत्याना कोणत्या शिक्षकाकडे थोडेसे विद्यार्थी बहुशः दररोज जमत असल्यामुळे विद्याश्रमांतील वातावरणांत उच्च विचार खेळूं लागत, आणि मुलांच्या विचारपद्धतीलाहि निराळे वळण मिळे.

मुलांच्या हृदयांतील सूक्ष्म मनोभावनांचा विकास घडवून आणण्याचे महत्त्व ज्यांना पटत नाही, किंबहुना अशा तऱ्हेने मनोविकास घडवून आणणे ज्यांना शक्यहि वाटत नाही अशांची संख्या कांही थोडी नाही. राष्ट्रीय भावना, धार्मिक जीवनाचे पावित्र्य हे त्याना अर्थहीन बुडबुडे वाटतात, व आपली ही मते शब्दानें उच्चारून त्यांनी दाखविली नाहीत तरी स्वतःच्या कृतीने ते सिद्ध करून देत असतात. अलीकडील मुलांचें ध्येयशून्य जीवन, यदृच्छया उत्पन्न होणाऱ्या सर्व मनोविकारांची पूर्तता करूं इच्छिणारी त्यांची बेछूट वृत्ति, आत्मसंयमनाचा वाढत जाणारा अभाव ह्या गोष्टी त्यांना लक्ष देण्याइतक्या

महत्त्वाच्या वाटत नाहीत. उच्च आदर्श आणि हृदयांतील सूक्ष्म भावनांचा विकास करूं इच्छिणाऱ्या प्रयत्नांना भावनामय खुळेपणा ते समजतात. पण हा उच्च आदर्शाचा भावनामय खुळेपणा व्यासविद्याश्रमांत प्रामुख्याने दिसून येत होता. ईश्वरावर दृढ निष्ठा असलेले व स्वतःच्या त्यागबुद्धीचे संस्कार विद्यार्थ्यावर उमटवूं शकणारे शिक्षक तेथे होते, आणि त्याच्या सहवासांत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीवनाला विशिष्ट आदर्श तेथे प्राप्त होत असे.

त्या रात्रींहि मोहन व त्यांच्या स्नेह्याचा तास दीड तास शांतारामांच्या खोलींत मोठ्या आनंदात गेला. निर्दोष हास्य-विनोद आणि अनेक विषयावर मोकळ्या मनाने चाललेल्या गप्पामध्ये शातारामहि पूर्णपणे मिसळून गेले होते. बोलतां बोलता घरच्या गोष्टी निघाल्या; आणि मुलाना त्या किती प्रिय असतात याची कल्पना इतराना क्वचित होऊं शकेल. पुष्करवाडीचें वैभव, पुष्कर तळ्याचे सौंदर्य, भोवतालच्या पर्वताच्या गगनभेदी शिखरावरून दिसणारे सृष्टिसौंदर्य आणि तत्संबंधी आपल्या अनेक आठवणी यांचे बहारीचें वर्णन करण्यांत मोहन तल्लीन होऊन गेला. त्या रात्रीचे मोहनचे संभाषण, त्याची वागण्याची सभ्यता, त्याचे उच्च विचार पाहून हाच मुलगा एका शिक्षकाचे अत्यंत बहुमोल हस्तलिखित सूड-बुद्धीने कसा जाळूं शकला हें कोडेच शांताराम याना समजेनासे झाले; त्याच्याशी अलीकडे आपण निःसंशय कठोरतेने व अन्यायाने वागलो याबद्दल त्यांना वाईट वाटूं लागले; पण त्यांतल्या त्यांतहि त्याच्याविषयीं प्रथम झालेले आपलें मत चुकीचे नव्हते हे पाहून थोडे समाधानहि त्यांना झाल्याशिवाय राहिले नाही.

मोहनपेक्षा प्रभाकर घरचा कितीतरी श्रीमंत होता. आपल्या वडिलांच्या जुन्या सरदारी थाटाचा भव्य वाडा व इनामदारीचें इतर वैभव याचे त्यानेंहि रसभरित वर्णन केलें. मनोहरनें आपल्या वडिलांच्या कारखान्यासंबंधी मनोरंजक आठवणी आपल्या नेहमीच्या विनोदी पद्धतीनें सांगून मंडळीची बरीच करमणूक केली.

पण नागेश गप्पच बसून राहिल्यामुळें शातारामांनी त्याला विचारलें, "अन् तुझें घर भूगोलाच्या कोणत्या खंडांत आहे?"

" माझें होय, तें आहे सहाराच्या वाळवंटांत! मी कानगांवला राहतो. कसले गांव तें! मला अगदी त्याचा कंटाळा येतो. भोंवताली सगळे रान आणि काळी माती-दुसरे कांही नाहीं. "

" रानाला आणि काळ्या मातीला कां कंटाळतोस रे तूं? मला तर त्या फार आवडतात " मोहन म्हणाला. " त्यांत दोन गोष्टी उत्पन्न होत जातात, सुंदर सुवासिक गुलाब, आणि काळीभोर करवंदें आणि त्यांच्याइतकें मला दुसरे कांहीच आवडत नाहीं. "

" अरे दहा वाजले रे! चला पळा आता तुम्ही, " घड्याळाकडे पाहत शाताराम म्हणाले. " आणि हे पहा, मोहन, जरा थांब, थोडे काम आहे तुझ्याशी. गेले कांही दिवस मी तुझ्याशी कठोरतेने वागलो खरा, पण तूं हल्ली किती श्रम करतो आहेस ते मला माहित आहे, मागील गोष्टी मी अगदी विसरून गेलो आहे असे तूं समज. तुला अभ्यास करावयाला शांतता हवी असली तर माझ्या खोलीत वाटेल तेव्हा येऊन अभ्यास करीत जा. "

मोहनचें अंतःकरण कृतज्ञतेने भरून आले. त्याचे तिघे मित्र त्याची वाट पाहत बाहेर उभे होतेच. त्यांना गाठून तो म्हणाला, " मला शातारामानीं आपल्या खोलींत येऊन बसण्याची परवानगी दिली. "

" हो का! छान, " मनोहर म्हणाला. " मलासुद्धां त्यांनीं दिली आहे. आता आपण खूपच जोराने प्रगति करणार. "

" ते काय रे? " प्रभाकर एका खिडकीकडे बोट दाखवून आश्चर्याने म्हणाला. मोहनच्या खोलीत दिवा दिसत होता. घाईघाईने एक गांठोडें किंवा तसेच कांहीतरी खिडकींतून आत घेतलेले त्यांनीं पाहिलें. लागलीच दिवा विझवला गेला आणि खिडकीहि ताबडतोब लावल्याचा आवाज त्यांनी ऐकला.

" मी जाऊन पाहतों ही काय भानगड आहे ती! " असे म्हणून मोहन आपल्या खोलीकडे वळला. इतरहि आपआपल्या खोल्यांकडे निघून गेले.

मोहन खोलींत आला तेव्हां सर्व सामसूम होते. पण खिडकीत नुकत्याच विझलेल्या मेणबत्तीच्या वातीवर धुराची एक लहानशी रेघ एक दोन वर्तुळे घेऊन हवेंत विरून जातांना दिसली. वातीच्या टोकावरची तांबडी ठिणगीहि

आतां आपलें काम झाले असें समजून निझून गेली. उघड्या दरवाज्यांतून चौकांतल्या कंदिलाचा प्रकाश अरविंदाच्या तोंडावर पडला होता आणि त्या प्रकाशांत त्याच्या डोळ्यांतील अश्रू सुकलेल्या फुलावरील दवाच्या बिंदूप्रमाणे चमकत होते.

" कायरे अरविंद, काय झाले ? " त्याच्या खाटेवर बसत मोहनने विचारलें.

" जर कां तूं फितलास तर माहीत आहेना काय होईल ते! " जनार्दन त्याच्या अंगावर ओरडला.

" म्हणजे तूं त्याला कांहींतरी त्रास दिलेला दिसतो. "

" आपण नाही रे बुवा कांही केले !" नाना आणि किसन एकदम म्हणाले.

" मी त्याला हात सुद्धां लावला नाहीं," अनंत बर्वे म्हणाला. पहिल्या रात्रीं घडलेल्या प्रसंगानंतर अरविंदाच्या वाटेस जाण्याचे त्यानें सोडून दिले होते.

" गरीब बिचारा अरविंद–माझा छकुला तो ! " हेल काढीत बाळू म्हणाला. " माझ्या बाळाचे कोणी हाल केले ते ! "

"मोहन, तूं त्याला आपल्या आजीकडे पाठवून दे," जनार्दनने पुस्ती जोडली.

" आणि तिला म्हणावे आपल्या बाळाला पाळण्यांत घालून अंगाई म्हण. तो कां शेणामेणाचा आहे हात लावल्याबरोबर मोडून जायला, तूं त्याची इतकी काळजी करतो आहेस ती ! तूं जर असा मध्येच चोंबडेपणा केलास तर तुला ठोकून काढीन. "

" मला ठोकशील ते पाहून घेईन मी. तुझे काय पाणी आहे मला हात लावण्याचे. पण मी तुला बजावून ठेवतो, असल्या लहान पोराच्या वाटेस जायला तुझ्यासारख्या लट्टंभारतीला लाज वाटायला पाहिजे. पुनः तर त्याच्या वाटेस जा म्हणजे सांगतो. "

" अरे वा, मोठाच आजीबाईचा आव आणला आहेस. काय करणार आहेस माझे ? "

" हें पहा, जनार्दन, तो पिचक्या आहे, फितेल बघ. तो किती हलकट आहे आपल्याला माहीत नाही का ? " मोहनला उद्देशून हे वाक्य बाळूनें उच्चारलें. मोहनच्या छळाचा हा शेवटला अवशेष होता आणि ही विशेषणें त्याला उद्देशून कांही मुलें पुष्कळ दिवस वापरीत. दुसऱ्या मुलाने हे शब्द उच्चारले

असते तर मोहनला खरोखरच वाईट वाटले असतें. पण बाळूसारख्या मुलानें केलेल्या दुरुत्तराकडे लक्ष देण्याचीहि त्याला आवश्यकता वाटली नाही.

तो त्वेषाने म्हणाला, " अरविंदला पुनः हात तर लावून बघ, होता का नव्हता करून टाकीन. "

" तुलाच करून टाकीन. " असे म्हणून जनार्दनने शेजारचा बूट उचलून मोहनच्या अंगावर फेकला. त्याने तो तत्काळ घेऊन खिडकीतून बाहेर भिरकावून दिला आणि उत्तर दिले,

" हवा असला तुझा बूट तुला तर जा आणायला. " त्याला जनार्दनची भीति वाटली नाही. लहानशा अरविंदाला छळणारे हे ढब्बू खरोखरी भेकडच असले पाहिजेत अशी त्याची खात्री झाली होती.

" जा लेका, उद्यां पाहून घेईन तुला. "

" उद्यां ! अं: ! " तुच्छतेने मोहनने उत्तर दिलें.

" मोहन, त्याच्या वाटेस नको जाऊंस, बाबा." अरविंद त्याचा हात धरून म्हणाला. " तुला मारील तो उगीच. तूं काहीं त्याच्या बरोबरीचा नाहीस; अन् माझ्यासाठी तुला मार खावा लागायचा एखादा. "

" अरविंद, तूं नीज पाहूं आता. अरे बापरे, तुझे अंग किती गार लागते आहे हे. त्यांनी काय केले तरी काय तुला ? "

" आतां नाहीं मी कांहीं सांगत. उद्यां सांगेन." अरविंद हलक्या आवाजांत म्हणाला.

" बरे तर. नीज आतां. अन् तूं ह्या जनार्दनाला काय किंवा कोणालाच भिऊं नकोस. आतां आज नाही तुला त्रास द्यायचे ते. "

बिचारा अरविंद ! त्याच्यासारखी नाजुक फुलें बागेतील माळ्याच्या प्रेमळ संगोपनाखालींच फुलावयाचीं, आणि तेथेंच त्यांचा परिमल पसरावयाचा. उघडया मैदानांतील धकाधकीच्या धगधगींत उन्हांत तीं करपून जाण्याचाच संभव जास्त. व्यासविद्याश्रमांतहि मेंढीच्या कळपांत मेंढीचें कातडें पांघरून हिंडणारे लांडगे नव्हतेच असें नाहीं. अशा लांडग्यांना हुडकून काढण्यांत ढिलाई झाली तर इतर निष्पाप कोंकरांना ते केव्हांच गट्ट करून टाकावयाचे.

# प्रकरण बारावें

## ऋषिऋण

मोहन अंथरुणावर पडला तरी त्याला पुष्कळ वेळ झोंप आली नाही. नुकत्याच घडून आलेल्या प्रकाराची चित्रे चित्रपटासारखी त्याच्या मनश्चक्षूंपुढें नाचत होती. ज्यांच्याबद्दल त्याच्या अंतःकरणात खरा आदर होता अशा शिक्षकांनी अखेर आपल्या उतावीळपणाने केलेल्या लहरी कृत्याची क्षमा केली याबद्दल त्याला मनापासून आनंद झाला होता. आता आपल्या पापाबद्दल या लोकीं किंवा परलोकींहि कांही प्रायश्चित्त भोगावे लागणार नाही असा जणूं काय त्याला विश्वासच उत्पन्न झाला. शातारामांच्या खोलीत जाऊन अभ्यास करण्याची परवानगी मिळाल्याने अभ्यासांत पुष्कळ प्रगति होईल या आशेने त्याच्या आनंदांत भर पडली होती. पण त्याने नुकत्याच पाहिलेल्या प्रसंगानें त्याच्या आनंदाचा बराच विसर झाला होता. छोट्या अरविंदाचे करुण उसासे त्याच्या हृदयाला भेदून जाऊं लागले. आपण त्याला जितकी मदत करावयास पाहिजे तितकी केली नाही ही कल्पना त्याला स्वस्थ पडूं देईना. आपल्याच संकटांत गढून गेल्यामुळे त्याचे अरविंदाच्या दुःखाकडे जावे तितके लक्ष गेले नाही याबद्दल त्याचे एक मन त्याला दोष देऊं लागले. त्याच वेळीं दुसरें मन त्याला सांगूं लागले की, 'तुझ्या संकटकालीं तुला मदत करून तुझा उत्साह ज्या शिक्षकांनी कायम ठेविला त्यांचे उपकार तूं कसे फेडणार ? तुला ज्या सवलती व जी सहानुभूति थोर लोकांकडून मिळते ती मदत तुझ्या धाकट्या भावाला करणें हे तुझें कर्तव्य नाहीं काय ? शिक्षकांचे उपकार फेडण्याचा–ह्या ऋषिऋणाचें उतराई होण्याचा हाच एक मार्ग आहे.'

दैवयोगानें अरविंद ज्या लोकांत येऊन पडला होता त्यांनीं त्याला छळण्यापलीकडे दुसरें कांहींच केलें नव्हते. अखंड दुःखपूर्ण असे मित्रहीन जीवित कंठून उत्साह आणि हौस नाहीशी झाल्यामुळें वर्गाचे अभ्यासांतहि त्याची प्रगति फारशी होईना. वारंवार त्याला शिक्षा होत. पण अतिशय चिडून जाऊन त्यानें केलेल्या बालिश चेष्टांच्या योगानें स्वतःची करमणूक करून

घेणाऱ्या जनार्दन, बाळू आणि त्याचा कंपू यांच्या सहवासापेक्षां वर्ग सुटल्यानंतर खोलीत शिक्षा भोगीत उभे राहणे किंवा पाठांतराच्या ओळी खरडणें त्याला अधिक सुखदायक वाटूं लागलें. त्याला छळणाऱ्या यमदूताच्या तावडीतून सुटण्याकरितां नदीकांठी झुडुपात जाऊन एकांतात लपून बसणे हीच त्याची मोठी करमणूक झाली होती. आणि आपली धूम्रपानाची तल्लफ एकांतांत भागविण्याच्या इच्छेने तेथे येणाऱ्या एखाद्या टोळीने त्याचा तेथेहि पाठलाग केल्यास आणखी पलीकडे जाऊन तो तेथे लपून बसे. झाडाची पाने, फुले निर्हेतुक तोडून त्याच्या पाकळ्या चुरगाळीत बसणे हाच त्याचा आवडता खेळ, नदीकाठी जाऊन गुळगुळीत दगड पाण्यात विषण्ण मनाने टाकीत बसणे हाच त्याची मनोरंजक करमणुक होती.

मुलाचे प्रेम किती मधुर असते, ते संपादन करणे किती दुर्मिळ असते आणि एकदा संपादन केल्यानंतर ते किती बहुमोल भासते याची थोडीशीहि कल्पना मनुष्याला असती तर मुलाची मृदु अंतःकरणे इतक्या कठोरपणे त्याने तुडविली नसती; कोमल वनलतेवर विकसणारी ही मधुर पुष्पे इतक्या निष्काळजीपणाने त्याने चुरगाळून टाकली नसती. त्या कठीण अवस्थेत अरविंदाशी प्रेमाचा एक शब्द कोणी बोलत असते, त्याच्या ह्या कंटकमय रूक्ष वाळवंटांतील प्रवासात त्याला प्रेमाने हात दिला असता, त्याच्या अडचणी समजून घेण्याची तयारी दाखवून त्याला स्वतःचे अंतःकरण मोकळे करण्याची संधि दिली असती तर इतक्या थोड्या श्रमाने, इतक्या अल्प मोबदल्यांत त्याला त्या बालकाचे निरुपम प्रेम संपादन करतां आलें असते. व्यासविद्याश्रमांत सुवृत्त, प्रेमळ वृत्तीच्या मुलाचा काही तोटा नव्हता. पण विशेष आयास न करतांहि दुसऱ्याचे जीवित सुखमय करण्याचा ह्या संधीचा फायदा मोहनशिवाय दुसऱ्या कोणीहि घेतला नाहीं.

दुसरे दिवशीं जेवण झाल्यानंतर मोहनने अरविंदला गांठलें. “चल जरा नदीकांठीं येतोस ? अजून घंटेला थोडा अवकाश आहे, जरा गप्पा ठोकूं.”

आनंदातिशयानें अरविंदला उत्तरसुद्धां देतां येईना. मोहनच्याबरोबर पटांगणांतून मुलांच्या घोळक्यांतून वाट काढीत मोठ्या अभिमानानें तो निघाला; आणि ते दोघे मोहनच्या आवडत्या नदीकांठावर आंब्याच्या वृक्षाखालीं

जाऊन पोहोंचले. तप्त कांचनाप्रमाणे चकाकणारें नदीचे पात्र, सप्तशृंगीच्या शिखरांची त्यांत पडलेलीं काळसर प्रतिबिंबें, तेथे वाहणारा शांत वारा आणि मोहनचा उत्साहवर्धक सहवास ! स्वर्गसुख यापेक्षां कांहीं निराळे असेल असें अरविंदला वाटले नाही.

" अरविद," तेथें बसत मोहनने सुरुवात केली, " अलीकडे तुला फार त्रास होतो."

" ते काय सागूं ! येथे मला एकहि मित्र नाहीं, माझ्याशीं कोणी धड बोलत सुद्धां नाही. "

" म्हणजे मी तुझा मित्र नाही का ? "

" होय. तूं माझ्याशीं प्रेमाने वागतोस हे खरे. तूं नसतास तर मला येथें राहणेंहि शक्य झालें नसतें. पण—"

ह्या 'पण'चा अर्थ मोहनच्या ध्यानात आला.

"होय, अरविद, मी समजलों ते. आजपासून मला तूं आपला दोस्त समज."

अरविंदाचे काळेभोर डोळे पाण्यानें भरून आले. " खरेंच का ? "

थोडा वेळ कोणीच कांही बोललें नाहीं. "काल रात्री ते काय करीत होते ?"

" पण तूं कोणाला सांगणार नाहींसना ? " मांजराची चाहूल लागतांच घाबरून गेलेल्या चिमणीप्रमाणें आपले भेदरलेले डोळे चहूंकडे गरगर फिरवीत अरविंदानें प्रश्न केला.

" छे, रे, किती भित्रा आहेस तूं ! "

पण मोहनच्या ह्या सौम्य टोमण्याने( ? )हि त्याच्या हृदयाचे पाणी झालें. आपली चूक मोहनच्या लक्षांत येतांच त्यालाहि वाईट वाटले.

" हें काय, अरु, मी कांहीं तुझ्यावर रागावलों नाहीं. काल रात्री खोलीत येतांना मला खिडकींतून दिव्याचा उजेड दिसला आणि पांढरें गांठोडें कोणी तरी आंत ओढून घेतल्यासारखें मला वाटलें. तें काय होते तें ? "

" तो मी होतों."

" तूं ? "

" होय, मीच तो. माझ्या कंबरेला धोतरें बांधून त्यांनीं मला खिडकींतून खालीं सोडला होता. "

" कशाला तो ! ती खिडकी तर चांगली उंच आहे. गांठ तरी त्यांनी नीट मारली होती कां ? "

" छे रे! काल तर मी पडतां पडतां वांचलो. त्यांनीच मी इतका घाबरलों होतो. "

" कसली दुष्ट मुले ! अंगावर शहारे येतात ! "

" होय. "

" रात्रभर मला त्याचीच स्वप्ने पडत होती. एक दिवस मला वाटतें धोतराची गांठ सुटेल आणि मी पडून मरून जाईन. पण त्यांना त्याची थोडीच पर्वा आहे! बाकी मग मी सुटेन तरी त्यांच्या त्रासांतून. "

" ऐक, असे बोलूं नकोस. " मोहनने हातांत धरलेला अरविंदचा हात भीतीने थरथर कांपत होता. " पण तुला ते खालीं सोडतात तरी कशाला ?"

" त्या – तिकडे – जाण्याकरितां, पण तूं सांगणार नाहीस ना? " आणि त्यानें पुनः एकदा चहूंकडे पाहिले, पण तो लागलीच ओशाळून म्हणाला, " मीं चुकून म्हटलें हें, मोहन ! पण माझी भीति कांही केल्या जातच नाही. "

" खरें आहे, " मोहन स्वतःशीच म्हणाला. " पण तुला आतां भिण्याचें कारण नाहीं. तुला आतां कोण त्रास देतो तें पाहतो मी. "

" मग हरकत नाही. मला ते अन्याजीकडे जायला सांगतात. "

" अन्याजी ! त्या–पलीकडे त्याचें हॉटेल आहे तो ! "

" होय तोच. "

" अरे पण तुला माहीत नाहीं का तो अन्याजी म्हणजे दारुड्या, बदमाष, शुद्ध पशू आहे आणि तेथे जातांना सांपडलास तर तुला विद्याश्रमांतून घालवून देतील. "

" सगळें खरें, मोहन. मला तेथें जायची किती भीति, वाटते म्हणून सांगूं ! तो अन्याजी अन् त्याचा दारुड्या मुलगा सदा दारु पिऊन तेथें बडबडत असतात अन् तेथें घाण तरी किती येते ती ! काल तर त्यांनीं माझी मानगुटच धरली. " त्या प्रसंगाच्या आठवणीनेंहि तो कांपायला लागला.

" रात्रीं फाटकाला असतें कुलूप; मग मला तारेच्या कुंपणावरून आचार्यांच्या बागेतून जावें लागते; अन् त्यांचा तो वाघ्या एखाद दिवशीं मला चावायचा सुद्धां. काल तो माझ्यावर केवढ्यांदा गुरगुरला. शिवाय काल होतें थोडें चांदणे आणि आचार्य स्वतःच बागेत हिंडत होते. त्यांना पाहताच मी एका झाडाच्या आड लपलों. असा घाबरलों म्हणतोस मी. पण मला एक परी वाटले की, त्यांनीं मला पाहिले तर बरें होईल; मला घालवून दिला तर ह्या त्रासातून मी सुटेन तरी एकदांचा-थोडया वेळानें सामसूम झालें अन् मी खिडकीखाली आलों अन् मग मला त्यांनीं वर ओढून घेतला. तितक्यांत कोणाचासा आवाज ऐकूं आला. मला वाटतें तूं आणि नागेश असावेत. पण त्याना वाटले कोणी तरी शिक्षक आले म्हणून त्यांनी असा घाईने मला ओढला-मी अगदीं घाबरून गेलो. मला रडूं आलें, काय करूं, मा[झ्]याने राहवेचना. "

" अरेरे ! पण ह्यापूर्वी तुला त्यांनी कधीं पाठविला होता कां? "

" एकदा पंधरा दिवसापूर्वी. "

" पण असें कोणते काम असतें त्याचे त्या अन्याजीकडे? "

" कांहीं चांगलें काम थोडेच असायचे आहे तें ! "

" चागले नसणारच. अन्याजी काय मोठा चागला लागून गेला आहे !"

" त्यांना सिगारेट आणि हॉटेलांतील इतर जिनसा हव्या होत्या. "

मोहन चकितच झाला. "पण, अरु, असल्या वस्तू आणून देणें चांगलें नाहीं हे तुला समजत नाही का? त्यांना जर त्याच्या हॉटेलांतील जिनसा हव्या असतील तर त्यांनीं स्वतः जावें. अरु, तूं जात जाऊं नकोस. "

" पण मी काय करूं? " बिचारा लाजेने अर्धमेला झाला. " जो उठतो तो मलाच नावे ठेवतो. " डोळे पुशीत तो पुढें म्हणाला, " यांत माझी कांहीं चूक नाहीं, मोहन, त्यांनीं बळजबरीनें पाठविले मला."

" जी गोष्ट करणें वाईट आहे असें तुला वाटतें ती सक्तीनें तुझ्याकडून करविण्याची कोणाची ताकद नाही. " मोहन प्रेमळपणें पण निश्चयानें म्हणाला.

" तुला सगळें ठीक आहे. तुझ्या अंगांत ताकद आहे, म्हणून तुझ्या वाटेस कोणी जात नाहीं. कोणी गेलेंच तर त्याचा समाचार घेण्याची तुझी धमक आहे पण मी काय करूं? "

" ते कां ! प्रभाकराकडे पहा, पद्या बघ. येथे आले तेव्हां ते तुझ्यासारखेच लहान आणि अशक्त होते. पण म्हणून असल्या गोष्टी त्यांना करायला लावण्याची कोणाची छाती झाली नाहीं. प्रभाकराला त्रास देण्याची कोणाला हिम्मतच होत नाहीं. ते त्याला इतके का भितात समजत नाही. पण पद्याचा तर कोणी पाठीराखा नाहींना ? पण सगळ्या जगांतले जनार्दन एकदम जमून आले तरी पद्याला अन्याजीच्या हॉटेलात पाठविणे शक्य नाहीं. "

मोहनने केलेला दोषारोप सहन करणे कठीण होते. कर्तव्याचा मार्ग कितीहि कंटकमय असला, कितीहि दुःखांनी आणि संकटांनी व्याप्त असला तरीहि अखेर तो सोपाच ठरतो, परिणामीं अधिक आनंददायक असतो हे कळण्याइतके सामर्थ्य अरविंदाच्या अंगीं नव्हते.

" पण ते मला जिवानिशीं मारतील एखादे दिवशी ! "

" तसे पाहिले तर मारण्याचा संभव आताच जास्त आहे. एखादे वेळीं तुला ते मारतील हे खरे; पण तुझ्याविषयीं त्याना सुद्धा आदर वाटूं लागेल. आपल्या मनाला जे पटत नाहीं ते करण्याचे नाकारण्याबद्दल मार खावा लागला तरी हरकत नाहीं; पण अशी गोष्ट करायची, खिडकीतून उतरून दोनदां अन्याजीच्या हॉटेलात जायचे आणि वर नफ्यांत मार खावयाचा यांत काय फायदा? म्हणजे तुझ्या म्हणण्याप्रमाणे सुद्धा पाहता तुला नाहीं म्हटलें पाहिजे."

" खरें आहे."

" पुन: जनार्दन किंवा दुसरे कोणी तुला असल्या गोष्टी सांगूं लागले तर लक्षात ठेव कीं, तुझ्या मनाविरुद्ध कोणतीहि गोष्ट सक्तीनें कोणीहि करवूं शकत नाही. स्पष्ट नाहीं म्हण. आणि कांहीं केलें तरी ऐकूं नको शेवटपर्यंत. त्यांत खरे शौर्य आहे. "

" मी सुद्धां पहिल्यांदा नाहीं म्हटलेंच. पण ते मला भीति दाखवूं लागले. मी किती वेळ टिकाव धरणार हें त्यांना माहीत होते. "

आणि खरी मख्खी येथेंच होती. लहान मुलांना स्वाभाविक असलेल्या भित्र्या मनोवृत्तीचा त्यांनीं इतक्या निर्दयतेने फायदा घेतला होता कीं, अखेर त्याच्या मनावर भीतीचा पगडा कायम बसून राहिला होता. त्याच्या मनांतील ही कळ दाबली कीं, एखाद्या यांत्रिक बाहुलीप्रमाणे वाटेल ते कृत्य

करण्यास त्याला प्रवृत्त करता येई. जी कामे करतांना खरोखर भय वाटावयाचे अशी कामेंहि भीतीच्या भयामुळें तो करूं लागलेला पाहून त्याला वेड तर लागलेले नाही ना अशीहि शंका मोहनच्या मनांत येऊन गेली. बिचारा अरविंद! त्याचे अभ्यासांत लक्ष नव्हते, खेळाची हौस नव्हती, कामाला उत्साह नव्हता, आणि हें सर्व अनेक सुवृत्त आणि सहृदय विद्यार्थ्यांच्या आणि कर्तव्यदक्ष शिक्षकाच्या डोळ्यांदेखत घडत होतें.

आणि मोहनने काय करावे? त्याला मानसशास्त्राचा गंध नव्हता, मनावर पगडा बसविणाऱ्या भीतीचे दुष्परिणाम त्याला माहीत नव्हते, ते टाळण्याकरितां काय करता येईल हे त्याला अवगत नव्हतें. पण त्याने अरविंदला वांचविण्याचा निश्चय केला.

"अरु, मी तुला दोष देत नाही. तूं मला आवडतोस, आणि म्हणून तुला ह्या दुष्ट मुलांनी तोंडीलावणे करावे हे मला सहन होत नाही. देवावर श्रद्धा ठेव. तोच आपल्याला मदत करील."

अरविंदनें उत्तर दिले नाही. श्रद्धेचे शिक्षण त्याला कोणीं दिले नव्हते; आणि प्रत्येकाच्या अंतःकरणांत असणाऱ्या ईश्वराच्या अगाध सामर्थ्यावर श्रद्धा ठेवून वागण्याची शिकवण, स्वतःच्या चारित्र्यानें, उदाहरणाने कोणीं त्याला आजपर्यंत शिकविली नव्हती.

"ही पहा घंटा झाली. आपल्याला आतां उठले पाहिजे; पण एक गोष्ट लक्षांत ठेव. मी तुझा मित्र आहें ना, माझ्याशीं विश्वासानें वागशील ना?"

अरविंदाचें अंतःकरण कृतज्ञतेनें भरून आलें. शब्दानीं न दर्शवितां येणारा भाव त्याच्या नेत्रांत प्रतिबिंबित झाला होता.

मोहन पुढे म्हणाला, "अरु, ईश्वरावर श्रद्धा ठेव, सद्वर्तनानें वागण्याचे सामर्थ्य परमेश्वरच देऊं शकेल. खरें ना?"

---

## प्रकरण तेरावें

# सप्तशृंगी

> आमेखलं संचरतां घनानां
> छायामधः सानुगतां निषेव्य ।
> उद्वेजिता वृष्टिभिराश्रयन्ते
> शृंगाणि यस्यातपवन्ति सिद्धाः ॥ कुमारसंभव

सहामाही परीक्षा आणि दिवाळीची सुट्टी अजून किती तरी लांब होती. इतक्यांत एके दिवशी दुपारी मोहन वर्ग सुटल्यानंतर धावतच नागेशला गाठण्याकरिता निघाला. आपणांस लागलेली नवीन बातमी सर्वांच्या अगोदर त्याला कळविण्याचा उत्साह त्याच्या सर्व शरीरात भरून गेलेला दिसत होता. नागेशची गांठ पडतांच त्याने उद्यां सुट्टी असल्याबद्दलची ताजी बातमी त्याला दिली.

" ओहो, " नागेशने आपली टोपी उंच उडवीत उत्तर दिले. " पण कशा-करितां? "

" अरे त्या श्रीकांताने एक निबंध लिहून कोठे तरी पाठविला होता. त्यांत त्याचा नंबर पहिला आला, अन् त्याला भलें मोठे घबाड मिळाले. आताच तार आल्याबरोबर आचार्यांनी सुट्टी जाहीर केली. "

" जिते रहो पठ्ठे. आतां उद्यां हल्ला कोठे करणार ? "

" मी सांगू? पुष्कळ दिवस मीं एक बेत योजून ठेवला आहे. ह्या सप्तशृंगी-च्या शिखरावर आपण जाऊं, येतोस?" डावीकडील उंच डोंगराकडे पाहत मोहननें सुचविले.

" हू-हू-हू—असल्या पावसाळ्यांत इतक्या लांब जायचे! "

" त्याला काय झालें? ह्या दिवसांतच तर खरी मजा. अन् आतां कसला आला आहे पाऊस ? "

" आपण दोघेच जाणार ? "

" छे! डुल्या पाहिजेच वाटेनें करमणूक करायला. शिवाय प्रभाकरला सुद्धां विचारूं का ? "

" तुला वाटलें तर विचार, " प्रभाकरशीं मोहनची दोस्ती वाढत चालली होती त्याबद्दल नागेशच्या मनांत थोडेसें वैषम्य वाटूं लागलें होतें; पण त्याच्या आवाजांतील हा रूक्षपणा लक्षांत घेण्यास मोहनचे मन जाग्यावर होतें कोठें ? तें गेले होतें सप्तशृंगीच्या शिखरावर.

" आणि पद्या आला तर रे? "

" वा! फारच छान ! नाहीं तरी तो सारा दिवस पुस्तकांत डोकें खुपसूनच बसलेला असतो. त्याला थोडा तरी थारेपालट हवाच. म्हणजे पहा हं–तूं, प्रभाकर, डुल्या, पद्या आणि मी. खूप झालों नाहीं ? "

प्रभाकर आणि पद्मनाभ यानीं त्याच्या बेताला ताबडतोब संमति दिली. रात्री जेवण झाल्यावर मोहनने मनोहरला आपला बेत कळविला. आज तुकारामाचे कांहीं अभंग मनोहर वाचीत होता म्हणून अभंगातच उत्तर देण्याची त्याला लहर लागली:

" पुसे तो मोहन येतोसी गिरिवर । जाऊं वेगीं वर लवलाहे ॥
नागांचा तो ईश येत आहे संगे । जाऊं सर्व संगे सप्तशृंगी ॥
पद्म ज्याच्या नाभीं तोहि येई उद्यां । आम्ही म्हणूं पद्या जयाला तो ॥
तैसा प्रभाकर तोहि उगवेल । गिरिवरी फांकेल प्रभा त्याची ॥ "

" अहो अभंगानंद! ही तुझी चर्पटपंजरी का अखंडमंजरी आतां पुरे कर." नागेश हंसत म्हणाला. " आणि तूं येणार की नाहीं ते सांग अगोदर. "

" मग तो मनोहर बोलतो उत्तर । सर्वांचे अंतर हरूनि घे ॥
हर निघे जैसा शीघ्र तो कैलासा । सप्तशृंगी तैसा तुम्ही लंघा ॥
तुम्ही लंघा...... "

" बाबा, माझ्या राजा!" मोहनने त्याच्या तोंडावर हात ठेवीत उत्तर दिले, " होय कीं नाहीं तें एक सांग. "

" त्वया सह गमिष्यामि " त्याने तोंड दाबले असतांहि उत्तर देण्याचा प्रयत्न करीत मनोहरने कवित्व केले, " वनेषु सप्तशृंगीनाम् ॥ "

" मजा–चला, आतां बैस सगळा अभंगाचा गाथा घोटीत. "

सप्तशृंगीच्या उंच शिखरावरून दिसणारें मनोहर सृष्टिसौंदर्य, त्याची कठीण चढण, भोंवतालच्या भयंकर दऱ्या व तुटलेले कडे यांमुळे त्या शिखरावर जाणें हा विद्याश्रमांतील मुलांचा हौसेचा भाग होऊन बसला होता. उन्हाळ्याच्या दिवसांत व इतर सुट्टीच्या दिवशीं मुलांच्या लहानमोठ्या टोळ्या त्यावर चढून जात अगर त्याच्या शिखरावरील पठारांत वनभोजन करीत. पावसाळ्यांत तेथील हिरव्यागार वनस्पति, ढगांचे आवरण भेदून येणाऱ्या सूर्यकिरणांचे सोनेरी पट्टे आणि तेथील उंच उंच दऱ्यांवरून उड्या घेणारे दुधासारखे पांढरे शुभ्र ओढे यांमुळे त्याची शोभा विलक्षण आकर्षक दिसे. पण पावसानें निसरड्या झालेल्या पायवाटांवरून चढून जाण्याचे धारिष्ट करणारे मोहनसारखे हौशी जवान विद्याश्रमात थोडेच असत.

दुसरे दिवशीं सकाळीं प्रार्थना आटोपताच आपले त्रिवर्ग वीर दशम्यांचीं गाठोडीं उचलून सप्तशृंगीचा गर्वपरिहार करण्याकरिता निघाले. पर्वतावरून वाहत येणारा गार वारा, मनोहर सृष्टिसौंदर्य, सूर्याच्या कोंवळ्या किरणांत सोन्याच्या मेखलेप्रमाणे चकाकणारी, टेकड्यांना वळसे घेत वाहत जाणारी कृष्णा नदी त्याच्या मनाचा उत्साह अधिकच वाढवूं लागली. मोहन, मनोहर आणि नागेश लांब लांब टांगा टाकीत केव्हाच पुढे चढूं लागले होते. चढाव सुरू होताच पद्मनाभ थकूं लागला आणि त्याच्याशी गप्पागोष्टी करीत त्याचा उत्साह कायम ठेवण्याकरितां प्रभाकर त्याच्या बरोबर चालूं लागला.

" तो मोहन पहा कसा हरणासारखा उड्या मारीत चालला आहे. " पद्मनाभ म्हणत होता. मोहनची चपळता आपल्यांत नाही याचे त्याला वाईट वाटत होतें.

" तुझें आज ठीक दिसत नाहीं. कांहीं होत आहे तुला?" प्रभाकर म्हणाला.

" कांही विशेष नाही. पण जरा दम लागला आहे. "

" लवकर थकलास तूं. मला वाटतें तूं अभ्यास जरा कमी कर आणि थोडें प्रकृतीकडे लक्ष दे. तुझा पहिला नंबर गेला म्हणून तुला वाईट नाहींना वाटत ! "

पद्मनाभ जात्या हुशार किंवा तीव्र बुद्धीचा होता असें नाहीं. पण चिकाटी, उद्योग आणि केवळ श्रम यांच्या योगानें त्यानें वर्गांत पहिला नंबर मिळविला

होता. जिवापाड मेहनत घेऊन तो आज पुष्कळ दिवस त्याने टिकाविलाहि होता. मोहनला शांतारामांच्या खोलींत अभ्यास करण्याची परवानगी मिळाल्यामुळें त्याच्या तीव्र बुद्धीच्या विकासास अनुकूल अशी संधि मिळाली आणि त्याने पद्मनाभाला थोडक्याच दिवसांत मागे टाकलें. पद्मनाभाबद्दल मोहनला अतिशय प्रेम आणि आदरहि वाटे; विशेषतः ज्या दिवशी मोहनने आपल्या मनाचे सर्व लगाम सोडून देऊन त्याला चारी खुरांवर उधळूं दिले होते त्या दिवशीं पद्मनाभाने कर्तव्यापासून च्युत न होण्यात जी निर्भयता व जो दृढ निश्चय दाखविला होता त्यामुळे मोहनच्या मनावर त्याच्या थोर मनाचे कायमचे परिणाम झाले होते.

पद्मनाभाला मोहनचा हेवा वाटला नाही, त्याची निराशा झाली नाहीं, त्याला वाईटहि वाटले नाही. मोहनच्या यशाबद्दल त्याला इतका आनंद झाला कीं, त्याला स्वतःला यश मिळाले असतांहि त्याला तितका आनंद झाला नसता. त्याचीं जाग्रणे, घोकंपट्टी आणि अभ्यासाची झोड यथापूर्व चालू होतीं, आणि त्याचा परिणाम त्याच्या प्रकृतीवर होऊं लागला होता.

" छे रे, मी काय असा नंबराच्या मागे लागलों आहे थोडाच!" प्रभाकराला कांहीतरी उत्तर दिले पाहिजे म्हणून त्याने उत्तर दिलें.

" पण मी सांगतो–तूं जर थोडा कमी अभ्यास केलास तर तुझा नंबर खास वर येईल. तूं इतके घोकतोस की सगळा घोटाळा करून ठेवतोस."

" तुम्ही सगळे चुकतां. मी काय परीक्षेकरितां आणि नंबराकरितां का इतकी मेहनत करतो ? मला शिकण्याची फार हौस आहे. कोणी मठ्ठ म्हटलेले मला खपत नाहीं. पण काय करें माझ्या डोक्यांत बटाटे भरले आहेत तेव्हां आमची आपली ' शनैर्गच्छेत्पिपीलिका'."

" तुला अभ्यासाची किती हौस आहे. खरेंच; पण तुझी प्रकृति बिघडत चालली आहे. परवांच शांताराम नाहीं का तुला म्हणाले, की तूं असाच अभ्यास करीत राहशील तर डॉक्टरला सांगून तुला घरींच पाठवून देईन म्हणून ? प्रकृति घालवून बसशील आणि पुष्कळ अभ्यास करशील. करणार काय त्या ज्ञानाचें तूं ?"

" मी कांहीं नेहमीच इतका अभ्यासी नव्हतो. लहानपणी तर मी भारी उनाड होतों. माझे बाबा त्या वेळी जिवंत होते. ते माझ्यावर भारी रागावत. एक दिवस मी बागेंत हिंडत होतो. पावसाळा नुकताच संपला होता आणि

आमच्या बागेत कुत्र्याच्या छत्र्या किती तरी उगवल्या होत्या. त्यांतली एक उपटून घेऊन बाबा मला म्हणाले, ' पाद्मलंस, आळशी मुलगा ह्या कुत्र्याच्या छत्रीसारखा आहे. नाहीं गाईला खाण्याच्या उपयोगी, नाहीं कोणाला सावली देण्याच्या उपयोगी ! ' काय असेल ते असो माझ्या ती गोष्ट चांगली लक्षात राहिली. तेव्हांपासून आळस मी अजीबात सोडून दिला. "

बोलत बोलत ते हळू हळू वर चढत होते. मधून मधून पद्मनाभाला दम लागल्यामुळे प्रभाकर त्याला हाताला धरून चालूं लागला.

" पण असा अति अभ्यास करून डोकें इतकें हलकें होईल की, परीक्षेच्या वेळीं तुला कांहीच आठवणार नाहीं."

एव्हांना ते एका टेकडीच्या माथ्यावर असलेल्या पठारावर येऊन पोहोंचले. पण समोर पाहतात तो त्याच्याच पुढे दुसरी एक टेकडी उभी आहेच. ती जमिनीतून तर एकाएकी वर नाहींना आली?असेंहि पद्मनाभाला क्षणभर वाटलें.

" प्रभाकर, मी थकणार, माझ्यानें पुढे नाहीं चढवायचें," निराशेनें पद्म-नाभ म्हणाला. मोहन आणि बाकीचे दोघे, समोरच्या टेकडीच्या शिखरा-जवळ हातांतील लांब काठ्या टेकीत, शत्रूच्या छातीवर उन्मादानें नाचणाऱ्या विजयी वीराप्रमाणें खडक तुडवीत चढताना दिसत होते.

" मला मघापासून दिसतेंच आहे तें; चल, परत फिरूं, मी येतों तुझ्या-बरोबर. "

" छे, छे, तूं नको, मी एकटाच जाईन; तुमच्या प्रवासाचा रसभंग कशाला करूं? "

पण प्रभाकर ऐकेना. पुढें गेलेल्या मित्रांना त्यानें हांका मारल्या, पण त्या त्यांना ऐकूं जाणें शक्य नव्हतें; म्हणून पद्मनाभाला तेथेंच बसवून जरा वेगानें पुढे जाऊन त्यानें तिघांना गांठलें. त्यांच्याजवळ जाऊन धापा टाकीत तो म्हणाला, " पद्या थकला, त्याला पुढे चालवत नाहीं, आम्ही परत फिरतों. "

" छे, छे, तूं कशाला, मी जातों त्याच्याबरोबर, " सर्व एकदम म्हणाले. सप्तशृंगीचें उंच शिखर गांठण्याचा मान आणि आजचा आनंद घालविण्याची कोणालाहि इच्छा नव्हती. पण आपल्या मित्राकरितां अत्यंत प्रिय वस्तूचासुद्धां त्याग करण्यांत मागें सरणाराहि त्यांच्यांत कोणी नव्हता. सर्वांची वर जाण्याची

उत्सुकता आणि स्वार्थत्याग करण्याची उदारता सारखीच होती. याचें पर्यवसान सर्वांनीच परत फिरण्यांत व्हावयाचें, पण सर्वांच्या आनंदाचा विरस करून परत फिरण्यास पद्मनाभ तयार होईना, म्हणून त्याने तोड सुचविली.

" तुम्ही चिठ्या कां नाही टाकीत ? "

ताबडतोब प्रभाकराने सर्वांच्या नांवाच्या चिठ्या तयार केल्या आणि मोहनने त्यांतील एक उचलली. उघडून पाहतो तो मनोहरचे नांव! ताबडतोब तो पद्याचा हात धरून चालूं लागला, पण जातांना सप्तशृंगीकडे एकवार धिःकाराने पाहून गंभीर शापवाणी उच्चारल्याशिवाय त्याच्यानें राहवले नाही. " तूं आज माझा उत्साहभंग केला आहेस म्हणून माझा शाप आहे की

**" होऊनि तूंही शतधा विदीर्ण**
**होईल तूझें अतिसूक्ष्म चूर्ण ।**

आणि मग शेतकरी तुझ्या पाठीवर बैलांचे नांगर फिरवतील. "

" घे म्हणावें," प्रभाकर हंसून म्हणाला, " सप्तशृंगीला इतका भयंकर शाप आजपर्यंत नसेल दिला कोणी ! त्यानें तुला आपल्या खांद्यावर नाचूं दिले नाही म्हणून तूं त्याचा सूड उगविलास. पद्याला संभाळून ने. "

" तुझे कितीतरी उपकार आहेत माझ्यावर, डुल्या! तूं नमता आलास तर मला एकट्याला परत जाणे किती तरी कठीण झाले असतें. पण माझ्यामुळे तुझा विरस झाला. " परत फिरतांना पद्मनाभ म्हणाला.

सप्तशृंगीच्या शिखरावर चढणे वाटते तितके सोपे नव्हते, हे लवकरच त्या तिघांना कळून चुकलें. एक डोंगर चढून गेले की, दुसरा त्याच्यापुढे उभा राहिलेला दिसे. राक्षसी मायेने रक्ताच्या बिंदूपासून उत्पन्न होणाऱ्या राक्षसांप्रमाणे खड्यांचे डोंगर होऊं लागले की काय असे त्यांना वाटूं लागले. अखेर एकदांचें पाचूच्या गालिच्यात बसविलेल्या हिऱ्याप्रमाणें शोभणारें हिरवें गर्द, वनस्पतींनीं आच्छादलेलें पाढरे शुभ्र जरीआईचें देऊळ दिसूं लागले. पर्वतावर चढण्याची लहानपणापासून संवय असल्यामुळे मोहन सर्वांच्या आधी वर जाऊन पोहोंचला आणि मोठ्याने ' जयजय रघुवीर समर्थ ' हा कृष्णाकांठचा महाराष्ट्रीय जयघोष करून त्याने आपल्या यशाची बातमी आपल्या सोबत्यांना कळविली. नागेश आणि प्रभाकरहि थोड्याच वेळांत त्याच्या शेजारीं जाऊन पोहोंचले.

शिखरावर त्यांना किती आनंद झाला असेल, तेथील निसर्गनिर्मित टाक्याच्या थंड पाण्याने त्यांचे श्रम कसे परिहार झाले असतील, आणि तेथून दिसणारा मनोरम देखावा पाहत मोठ्या वृक्षांच्या सावलींत बसून खाल्लेल्या दशम्या त्यांना किती गोड लागल्या असतील याची कल्पना शब्दांनी वर्णन करून येणे शक्य नाहीं. महाराष्ट्राच्या इतिहासप्रसिद्ध डोंगरांवरून वीरांच्या वीर कृत्याच्या आठवणी काढीत धाडसानें प्रवास करणाऱ्या हौशी जवानांनाच त्याचा अनुभव येऊं शकेल.

" प्रभाकर, " मोहनने पुष्कळ दिवस मनात योजून ठेवलेला प्रश्न काढला. " मी तुजजवळ एक मागणे मागणार आहे. "

" तूं मागितलेस आणि मी नाही म्हटलें असे कधीं झाले आहे काय? "

" पण आज मला तितकी खात्री वाटत नाही. माझी मागणी मान्य करणे तुला कठीण वाटेल. शिवाय ती माझ्या स्वतःकरिता नाही. "

" कांहीं कां असेना. तूं मागतो आहेस हेंच विशेष आहे. "

" पहा बरें! मग नाही म्हणणे जड जाईल! "

" पण सांग ना काय ते. उगीच माझी जिज्ञासा वाढवूं नकोस. शेवटी त्यांतून काहींच निष्पन्न होणार नाहीं हे मी आधीच सागून ठेवतो. "

" मी असे म्हणतो की अरविंदला तुझ्या खोलीत अभ्यासाला येऊं दे. "

" अरविंदला माझ्या खोलींत अभ्यासाला येऊं द्यायचा! ठीक आहे. तुझा आग्रह असेल तर माझी हरकत नाहीं. " एकदां कबूल केल्यानंतर नाहीं म्हणणें प्रभाकराला आवडले नाही; पण मोहनने मागितलेलें मागणें मान्य करणे त्याला बरेंच कठीण गेले यांत संशय नव्हता. प्रभाकराची खोली म्हणजे विद्यार्थि-जगातलें नंदनवन होतें. आपल्या कलाप्रिय स्वभावास अनुसरून त्याने निरनिराळ्या सुंदर चित्रांनीं ती सजविली होती आणि आपल्या अगदी खास मित्रांखेरीज तो सहसा कोणाला त्या खोलींत येऊं देत नसे, आणि आता आपल्या ह्या वैष्णवांच्या देवमंदिरांप्रमाणे पवित्र राखलेल्या खोलींत अरविंदसारख्या अजागळ पोराला वाटेल तेव्हां येऊं द्यावयाचें-छेः मोहन असले कांहीं सांगेल याची प्रभाकराला कल्पनासुद्धां नव्हती.

" समजलो मी, " मोहननें प्रभाकराच्या मुद्रेवरून त्याचे विचार ताडले असावेत. " तुम्हांला त्या दीन मुलाची कींव कशाला येईल? "

" तसें नव्हे रे, पण मी त्याला काय मदत करूं शकेन? त्याच्याशी काय बोलायचें हे सुद्धां मला समजत नाही."

" तूं मनात आणलेस तर तुला सगळे समजेल. त्याच्याकडे थोडे जरी तूं लक्ष दिलेस तरी त्याला स्वर्गाला हात लागल्यासारखे वाटेल. त्याला त्या जनार्दनने आणि त्याच्या कंपूने किती त्रास दिला आहे याची तुला कल्पना नाही. आला तेव्हा किती गोड आणि आनंदी असे तो. आणि आतां–पहा–येथें–व्यासविद्याश्रमात त्याची ही स्थिति झाली! मला सुद्धां दोनतीन मित्रांनी हात दिला नसता तर माझी काय स्थिति झाली असती त्याची मला कल्पनाहि करवत नाही. शांतारामाच्या खोलीत अभ्यासाला जाऊं लागल्यापासून मला कितीतरी फायदा झाला. म्हणून मला आपले वाटते की, आपल्याच्याने होईल तितकें कोणाहिकरितां आपण करावे."

" मोहन, मी त्याला आनंदाने येऊं देईन. विद्याश्रमात परत गेल्याबरोबर मी स्वतःच त्याला सांगतो. मग तर झाले ना?"

" खरंच! सांगशील तूं! माझ्याकरिता तूं पुष्कळच करतो आहेस; पण माझी खात्री आहे याचे सर्व चांगलेच परिणाम होतील."

विद्याश्रमात येऊन मोहनला कांहीं फार दिवस झाले नव्हते. पण इतक्यांतच कांही महत्त्वाचे धडे तो आपणास शिकवूं लागला आहे याची जाणीव प्रभाकर आणि नागेश याना झाल्याशिवाय राहिली नाही. आपल्या शेजारच्या इतर मुलाना मदत करण्याचे व त्याचे मानसिक सामर्थ्य वाढविण्याचे कितीतरी प्रसंग आपण वाया घालवितो आणि त्याची जबाबदारी आपणावर आहे, ही गोष्ट आतांपर्यंत त्याच्या लक्षात आली नव्हती. विद्याश्रमातील लहान मुलांना मदत करण्याचे किंवा नवीन परिस्थितीत येऊन पडल्यामुळें त्यांच्या मनावर पडणारें दडपण हलकें करण्याचे त्यांनी कांहीहि प्रयत्न केले नव्हते. आणि आज एका बावळट मुलाबद्दल मोहन हळहळतो आहे; ज्या मुलाचा व त्याचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाही अशा मुलाला दुष्ट संगति आणि त्यापासून येणारें भयंकर दुःख यांतून सोडवण्याकरितां प्रयत्न करतो आहे. एका उपेक्षित कर्तव्याची, एका नवीन जबाबदारीची जाणीव दोघांनाहि आज प्रथमच होऊं लागली.

थोडा वेळ कोणीच कांही बोलले नाहीं. आपल्या विचारतंद्रीतून जागा होऊन नागेशनें समोरच्या ढगांकडे बोट दाखवून पुनः संभाषणास सुरुवात केली. " ते ढग पाहिलेस कां, कसे वर्तुळे घेत टेकडीवर चढण्याचा प्रयत्न करीत आहेत. "

" डोंगरी किल्ल्यावर हल्ला करून वर चढणारें मराठ्यांचे सैन्य असेंच दिसलें असेल नाही ? खरे की नाही, मोहन, बोलत का नाहीस ? "

" होय; नाही. " त्याचें त्याच्या उपमेकडे तितकेसें लक्ष गेलें नाहीं. " समजा, हा ढग आला आणि त्याच्या मागोमाग पाऊस आला तर परत जाताना रस्ता तुम्हाला सांपडेल का ? "

" मी काय सांगू , पण मला वाटते सापडेलसा, " नागेश म्हणाला.

" होय, पण तुला डोंगरावरून हिंडण्याची फारशी संवय नाहीं. रस्ता आपणाला कसा तरी सापडेल, पण—"

" म्हणजे तुझे असे म्हणणे की आपण पावसात निसरड्या कड्यावरून घसरून पडूं. "

" ते पाहूं काय होतें ते. पण आता आपण उतरायला सुरुवात करावी हे चागले. निदान थोडे खाली गेलों तर निवाऱ्याची जागा तरी पाहता येईल. ह्या उघड्या मैदानावर ढगांशी सामना नको. "

" अगदी बरोबर. ढगांच्या पायदळाचे हल्ले पाहायला मजा वाटते पण—

---

# प्रकरण चवदावें

# काळा कडा

**क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया ।**
**दुर्गं पथस्तत्कवयो वदन्ति ॥**

सप्तशृंगीच्या उंच शिखरावरून खालीं उतरण्यास मुलांनी ताबडतोब सुरुवात केली खरी, पण उभ्या कड्यांवरून चढण्यापेक्षां उतरणेच जास्त कठीण असते, हें त्यांना लवकरच अनुभवानें समजलें. पर्वताच्या पायथ्याशीं काळेभोर ढग जणूं काय त्यांच्यावर निकराचा हल्ला करण्याच्याच हेतुनें आपले सैन्य जमवूं लागले होते आणि हळूहळं पण नेटाने एकएक टेकडी काबीज करीत त्याच्या जवळजवळ येत चालले होते. मुले उभी होतीं तेथे ते अजून आले नव्हते; त्यामुळे तेथे संध्याकाळच्या सूर्याची मंद रुपेरी किरणे चकाकत होतीं, आणि चहूंकडून तुफान दरिया उसळत असताना त्याच्या पर्वतप्राय लाटाना न जुमानता उभ्या असलेल्या खडकावरील दीपगृहाप्रमाणें ही तीन मुले त्या उंच शिखरावर एकाकी उभी असलेली दिसत होती.

पण हे रम्य आणि भयानक दृश्य फार वेळ टिकले नाही. महाप्रचंड राक्षसाप्रमाणें आपल्या दोन्ही भुजा दोहो बाजूंनीं पसरून त्याच्या कवळींत त्या मुलांना पकडणारे काळेकुट्ट ढग पुढे सरले आणि थोडक्याच वेळात मुलाच्या भोवती वारा, पाऊस, ढग आणि अंधार यांचें एकच आवरण झालें. [illegible] पाय घसरूं लागले. गार वाऱ्यामुळें थंडी कडकडून वाजूं लागली. पा[illegible] धारांमुळे पायाखालची वाटहि दिसेनासी झाली, आणि पाय घसरून [illegible] कडच्या कड्यावरून केंव्हां खाली पडूं किंवा खळाळून वाहूं लागलेल्या [illegible] ओढ्यांत झाडांझुडुपाप्रमाणे केंव्हां ओढले जाऊं याचा मुलांना नेम वाटेनासा झाला. सप्तशृंगीवर पावसाळ्यांत येण्यांत आपण केवढे संकट अंगावर ओढवून घेतलें, तसेच सप्तशृंगीवर जाऊन येणाऱ्याचा इतका बहुमान कां केला जात असे याचीहि त्यांना पूर्ण कल्पना आली. विद्याश्रमांतून निघतांना आम्ही सप्तशृंगीवर जाणार आहोंत हें त्यांनीं कोणालाहि कळविलें नव्हतें. 'आम्ही लांब

फिरावयास जातो आणि संध्याकाळीं जेवणाचे वेळा परत येऊं' इतकेच सागून नागेशने गृहपतीची परवानगी घेतली होती. आपल्या ह्या अचाट धाडसाची अगोदरच बढाई न मारण्याचा आणि मागाहून यशस्वी होऊन परत आल्यानंतर सर्वांना चकित करण्याचाच त्यांचा यांत हेतु होता हें खरे. पण त्यामुळे रस्त्यात वाट चुकल्यास किंवा दुसरे एखादे संकट आल्यास विद्याश्रमातून मदत येण्याची आशा समूळ नाहीशी झाली होती. सप्तशृंगीचे नांव त्यांनी काढले असते तर त्याना परवानगी मिळाली नसती, निदान कोणी तरी जाणता मनुष्य बरोबर घेतल्याशिवाय त्यांना जाता आले नसते हे खरे. पण आपण केवढी जोखीम अंगावर घेत आहोत याची त्यांना तेव्हां कल्पना होती कोठें ?

माथ्यावर लहानसे पठार आणि चहूं बाजूंनीं उभे तुटलेले कडे ही महाराष्ट्राच्या डोंगरांची सर्वसामान्य तऱ्हा आहे आणि सप्तशृंगीचा डोंगरहि त्याला अपवाद नव्हता. मागील बाजूस एखाद्या किल्ल्याच्या भिंतीसारखा काळाकुट्ट गुळगुळीत कडा होता म्हणून त्या बाजूने चढणे किंवा उतरणे शक्यच नव्हतें. पुढील बाजूंनी समुद्राच्या लाटाप्रमाणें क्रमाक्रमाने ठेंगणे होत जाणारे डोंगर असल्यामुळें त्याच बाजूनें नेहमीं जावे लागे. सप्तशृंगीच्या दक्षिणेस 'संगर पठार' या नांवान प्रसिद्ध असलेलें ठेंगणेंसे पठार होतें व त्या पठारावरूनहि सप्तशृंगीवर जाण्याचा एक रस्ता होता. पण त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंला उभे कडे आणि माथ्यावरची पाऊलवाट एका माणसाला पाऊल ठेवण्यासहि अपुरी असल्याने बाळपणापासून सरावलेल्या धनगरांच्या मुलांशिवाय त्यावरून को[illegible]त नसे. 'काळा कडा' किंवा 'जखिण वाट' या नावाने प्रसिद्ध [illegible] वाट अरुंद होती, इतकेंच नव्हे, तर त्याच्या दोनही बाजूंस तुट[illegible]तके भयानक दिसत कीं खालीं पाहतांच घेरी आल्यामुळें एखाद दुसरा [illegible]वासी मधून मधून तेथें दगावत असे. 'त्या वाटेवर राखण करणारी जखीण अमुक वेळांत अमुक बळी घेते' अशा आख्यायिकाहि त्याची भीषणता अधिक वाढवीत.

"मोहन, आपण वाट चुकलों नाहीं ना?" आपल्या स्वरांत शक्य तितका उसना निष्काळजीपणा दाखवीत प्रभाकर म्हणाला.

“ मुळीच नाहीं. पहा हं. ” आपल्या खिशांतून छोटेसें होकायंत्र काढीत त्यानें उत्तर दिलें, “ आपला विद्याश्रम येथून पूर्वेस आहे, बघ आपण बरोबर चाललों आहोंत. ”

“ ते खरें, पण आपण येतांना इकडून आलों नव्हतों. मला वाटतें थोडे उजवीकडे जास्त झुकलों आहोत. ”

“ हे पहा, आलों त्या रस्त्यानें जाणें शक्य नाहीं. ते ओढे पहा कसे तुफान झाले आहेत ते. त्या रस्त्याला चारपांच तरी ओढे ओलांडावे लागतील आणि ते शक्य नाहीं. डाव्या बाजूला ओढे आणि उजवीकडे काळा कडा अशा कात्रींत आपण सापडलों आहोंत खरें. ”

एका मोठ्या झाडाखालीं निवाऱ्याकरितां थाबून ते भोंवतालचें भयानक दृश्य पाहूं लागले. चवताळलेल्या नागांप्रमाणें चहूंकडे धांवणारे तांबडे-पिवळे ओढे, उंच उंच खडकांशीं झगडल्यामुळें ठिकठिकाणीं साचलेले पांढऱ्या फेसाचे समूह, संध्याकाळच्या मंद प्रकाशांत अधिकच काळसर दिसणाऱ्या पर्वताच्या पृष्ठावर फारच खुलून दिसत होते. हे सृष्टिसौंदर्य पाहून विनोद करण्यासारखी त्यांची मनःस्थिति असती तर प्रभाकरानें किती तरी रम्य उपमा देऊन त्याची स्तुति केली असती. ‘ पर्वत काबीज करण्याकरितां हे ढग चालून येत आहेत व त्याचा आम्हीं पराभव केला असून रणांगणावर त्यांच्या रक्ताचे पाट वाहावयाला लाविले आहेत ’ असें तो म्हणाला असता; किंवा ह्या असंख्य धबधब्यांचा डोंगराच्या दऱ्यांत घुमून अधिकच गंभीर होणारा प्रतिध्वनि म्हणजे पर्वतावर चढून त्याचा गर्व हरण करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या प्रवाशांचाच गर्व हरण करून पर्वतानें काढलेला गंभीर जयनाद आहे असेंहि एखादें वर्णन त्याला सुचलें असतें. पण आज आतां या संकटांतून बाहेर पडावें कसें हा एकच प्रश्न त्यांचे पुढें उभा होता.

अखेर प्रभाकर म्हणाला, “ मग आतां करणार काय ? वाट तर चुकलीच; कपडे थोडेबहुत भिजले आहेतच; थंडी, वारा आणि त्याच्या भरीला आतां येईल अंधार ! काय पण मजेदार प्रवास आहे आजचा ! ”

“ मोहन, तुला कांहीं सुचतें कां ? ”

" आपल्याला दोनच गोष्टी करणें शक्य आहे. देवाचें नांव घेऊन पुढें जायचे आणि आम्हांला वाट दाखव म्हणून त्याची प्रार्थना करावयाची, नाहीं तर ओढे थांबतोंपर्यंत येथे राहावयाचे. "

" राहणे कसे शक्य आहे? "

" शिवाय सप्तशृंगीवर रात्र काढायची, नाही पांघरुण, नाही खायला! अन् रात्री पाऊस जास्त येणार नाही कशावरून!" प्रभाकरने सुचविलें.

" छे ! माझ्या अंगावर शहारेच येतात. आपण पुढेच जाऊं या. " नागेश म्हणाला. " येथे थंडीत उपाशी मरण्यापेक्षां तर बरें "

चालतां चालता सप्तशृंगीच्या मागील बाजूच्या उभ्या कड्याकडे ते येऊन पोहोचले. "अरे रामा," मोहन उद्गारला! "यापुढे पाऊल टाकणें म्हणजे मृत्यूच्या दाढेतच पाऊल टाकण्यासारखे आहे." तो खोल कडा आणि त्याच्या पलीकडील विस्तीर्ण मैदान संध्याकाळच्या अंधुक प्रकाशांत अधिकच भयंकर दिसत होतें. मूर्तिमंत मृत्युच आपणासमोर उभा आहे की काय या भावनेने त्यांची गात्रें शिथिल झालीं, अंगाला कंप सुटला आणि प्रभाकर व नागेश तर मटकन खालीच बसले.

" असा धीर सोडूं नका. " मोहनला स्वतःला काहीं कमी भीति वाटली नव्हती. पण त्यांना धीर देत तो म्हणाला, " धीर धरून आपण चाललों तर सुटण्याची, पार पडण्याची काहीतरी आशा आहे. असे घाबरूं नका. ईश्वराच्या मनात असल्याशिवाय आपल्या केसालाहि धक्का लावण्याची कोणाची छाती नाही. "

" खरें, पण आतां अंधेर पडणार आणि रात्रभर येथेच राहावें लागले तर--" नागेश सर्वात अधिक घाबरला होता, " देवांनीं केलें अन् थोडासा जरी उजेड असता तर-- "

त्यांची अंतःकरणपूर्वक प्रार्थना देवानें ऐकली. पश्चिम क्षितिजाकडील ढगांचें आवरण थोडे विरळ झालें आणि सूर्यास्तानंतरच्या संधिप्रकाशाचे सोनेरी पट्टे हिरव्या झाडांवर प्रकाशूं लागले. त्यांच्या मागें असलेलें सप्तशृंगीचे शिखर, समोरचा भयंकर काळा कडा, उजवीकडील उभी दरड, आणि डावीकडील तुफान उधळणारे ओढे त्याना क्षणभर दिसले. ढगांत पडलेली ही तात्पुरती

फट पुनः बुजून जाऊं लागली, आणि हा सर्व देखावा हळूहळू अंधारात विलीन होऊं लागला.

"येथून काळा कडा अगदी जवळ आहे." बाळपणापासून डोंगरी प्रवासाच्या कष्टाची व संकटाची संवय असल्यामुळे मोहनच त्या सर्वांमध्ये अधिक सावध होता. "माझ्या डोक्यात एक विचार आला आहे. ह्या काळ्या कड्यावरून आपण गेलो तर! निदान वाट चुकण्याची तर भीति नाही. त्याच्या पलीकडे संगरपठार अन् त्याच्यापुढे तर सरळ सडक !–अगदी पळत विद्याश्रमात जाऊं."

"काळ्या कडयावरून जायचे !" नागेश आश्चर्याने थक्कच झाला. "आजपर्यंत एखाद दुसऱ्या धनगराशिवाय त्याच्यावरून कोणी तरी गेलं आहे काय?"

"पण ती तरी माणसेच आहेत ना ? ती जातात तर आपणहि जाऊं शकूं. मला वाटते तोच एक आतां मार्ग उरला आहे."

"आपल्याच्याने नाही व्हायचे." दोघांनीहि एका आवाजात उत्तर दिले.

"हें पहा, धोका आहेच. पण आपण येथे बोलत बसल्याने धोका कमी होणार आहे का ? तुम्ही येथे थाबा मी काळ्या कडयावरून जातो. जर मी सुरक्षित पलीकडे पोहोचलो तर संगरवाडीत जाईन आणि कोणाला तरी मदतीला घेऊन परत येईन. पहा तुम्हांला कसे वाटतें. तुम्ही नको म्हणत असाल तर माझा काही आग्रह नाही."

"मोहन, अरे मोहन, संकटांत उडी घालूं नको." प्रभाकर काकुळतीने म्हणाला. "ही गोष्ट फार भयंकर आहे."

"मला मुळीच भीति वाटत नाही. आणि शिवाय दुसरा मार्ग तरी कोणता ? येथें राहिलो तर थंडीनें गारठूनच मरूं."

"नको, नको. कांहीं झालें तरी तूं काळ्या कडयावरून जाऊं नको. भारंभार सोने दिलें तरी लोक त्याच्यावरून जायला तयार होत नाहींत अन् तूं असल्या अंधारांत तेथून जाणार !"

"प्रभाकर ! मला असा अडवूं नको. जाण्याचा माझा निश्चय ठरला आहे. मी जर पलीकडे सुरक्षित गेलों तर खालच्या वाडींतून कोणाला तरी घेऊन तास दीड तासाच्या आत येथें येईन. देवाचे नांव घेऊन मला जाऊं द्या."

असे म्हणून मोहननें आपले हात त्याच्या हातांतून सोडवून घेतले आणि मुखानें रामराम म्हणत काळ्या कड्यावर पहिले पाऊल ठेवले. नागेश आणि प्रभाकर त्या वीररसाच्या बालमूर्तीकडे पाहतच राहिले. प्रत्येक पावलागणिक त्याच्यावर कोसळूं पाहणारे संकट पाहून त्याची छाती धडधडूं लागली, डोळ्यांचीं पातीं लवेनाशीं झालीं, त्यांचा श्वासहि जणूं काय रोधला गेला.

पुष्करवाडीस डोंगरावरून हिंडण्याची त्याला संवय होती, उंच कड्यावरूनहि डोके शांत ठेवून घेरी आल्याशिवाय चालणे त्याला कठीण जात नसे. पण सहज गमतीखातर एखाद्या कड्यावरून थोडेंसे हिंडणे निराळे आणि आपले व आपल्या मित्राचे जीवित आपणांवर, आपल्या शांतपणावर अवलंबून आहे ही पूर्ण जाणीव ठेवून संध्याकाळच्या अंधुक प्रकाशांत शेदोनशें फूट जाणें निराळें! त्या भयंकर काळ्या कड्यावरून, भुताटकीच्या वाटेवरून जाताना एक पाऊल चुकले तर खालच्या खडकावर आपल्या ठिकऱ्या उडून जातील आणि मदत करणे तर लांबच—पण हे दृश्य प्रत्यक्ष पाहून आपल्या आईबापांना व इष्ट-मित्रांना आपली बातमी कळविण्यास सुद्धा येथे कोणी नाही हा विचार त्याला भेडसावूं लागला. त्याच्या सर्वांगाला दरदरून घाम सुटला, असल्या निर्जन वनांत भयंकर मृत्यूची कल्पना प्रत्यक्ष मृत्यूपेक्षांहि त्याला जास्त भयंकर भासली. रस्त्यावर पसरलेल्या व जमिनीत रुतून बसलेल्या एका वेलाच्या मुळाला घट्ट धरून तो मटकन् खाली बसला. डोळे उघडून त्या भयप्रद देखाव्याकडे पाहण्याची सुद्धां त्याला छाती होईना.

हात जोडून मनांतल्या मनांत त्याने ईश्वराची प्रार्थना केली. श्रद्धामय अंतःकरणाने केलेल्या प्रार्थनेच्या अगाध सामर्थ्याची त्याला आज कल्पना आली. त्याची भीति पार नाहीशी झाली. दोरीला साप समजून भ्यालेला मुलगा भीति नाहीशी झाल्यावर त्या दोरीकडे जसा आश्चर्यानें पाहतो त्याचप्रमाणें आपण असल्या क्षुद्र विचाराला कसे भ्यालों असें त्याला वाटूं लागलें. भीति दाखविणाऱ्या या कल्पनारूपी राक्षसाचा पूर्ण निःपात केल्या-नंतर त्यानें डोळे उघडले. तो उभा राहिला आणि चालूं लागला. कांहीं पावलें पुढें जातांच उजवीकडील कड्याच्या खालीं झाडावर कांहीं तरी पांढरा पदार्थ चकाकतांना त्याला दिसला. थोड्याच दिवसांपूर्वी एक धनगर त्या कड्यावरून

जातांना पडून मेल्याची गोष्ट त्यानें ऐकली होती. ती त्याला आतां आठवली. त्या दरींत जाऊन त्याचें प्रेत काढून घेणें अशक्य असल्यानें तें गिधाडांच्या भक्ष्य-स्थानीं पडले होते. पडतांना त्याची घोंगडी जवळच्या बाभळीच्या झुडुपाला अडकून राहिली होती. आणि तिच्या फाटक्या-तुटक्या दशा वाऱ्यात फडफड-तांना दिसत होत्या. मानवी जीविताचे हे आधिभौतिक अवशेष पाहून त्याच्या हृदयाला पुनः एकदा धक्का बसला. पण तो क्षणमात्रच. तो धनगर भूत होऊन तर आपली वाट अडवणार नाहीं ना, अशीहि एक बालसुलभ भीति त्याच्या मनांत येऊन गेली. त्याचे मानसिक सामर्थ्य कचें असते, हृदय मलीन विचारांनीं अपवित्र झालेले असते, शरीर अशक्त असतें तर तो ह्या भीतीच्या दडपणाखालीं चेंगरला गेला असता, त्याला घेरी आली असती, तो बेशुद्ध झाला असता आणि दुसऱ्याच क्षणीं असहाय होऊन कड्याच्याखालीं गडबडून पडला असता; त्याची हृदयद्रावक किंकाळी हवेंत विरून गेली असती, आणि जणूं काय कांहीच झाले नाहीं अशा रीतीने वाऱ्याचा भीषण प्रतिध्वनि त्या निर्जन दरींत नेहमींसारखा घुमूं लागला असता !

पण सुदैवानें त्याचे अंतःकरण पवित्र होतें, मन खंबीर होतें, शरीर सामर्थ्यसंपन्न होते. रामाचे नाव घेत तो पुढे चालूं लागला आणि आपली दृष्टि पायाखालच्या वाटेवरच खिळून ठेवून हातांतल्या भाड्यांतील तेलाचा एक थेंबहि न सांडता गांवभर फिरून घेणाऱ्या शुकाप्रमाणे भोवतालच्या सर्व वस्तूंकडे दुर्लक्ष्य करून तो पुढे निघाला. थोड्याच वेळांत तो बिकट मार्ग संपला आणि संगरपठारावर पाय ठेवतांच सुटकेचा निश्वास सोडीत हात जोडून आकाशाकडे पाहत त्यानें ईश्वराचे आभार मानले.

पठारावरील डोंगरी पायवाटेनें पळत जाऊन पायथ्याशीं असलेल्या वाडीत पोहोंचण्यास त्याला एक क्षणहि लागला नाहीं. गेल्याबरोबर पहिल्याच झोपडीच्या दारावर त्यानें थाप मारली. ती कृष्णा सारंगाची झोपडी होती.

ह्या अवेळी येणाऱ्या छोट्या पाहुण्याकडे कुतूहलानें पाहत त्याने दार उघडलें. त्याच्या हातांतील, पांढऱ्याशुभ्र फेसांनीं डवरलेल्या दुधाच्या कासंडी-वरून तो धार काढीत असावा असें दिसत होतें. मोहननें सांगितलेली हकीगत ऐकून तो थक्कच झाला. " तुमचं नांव काय, दादा ? "

" मोहन."

" मोहनराव, ह्या वखताला जखीन वाटेवरन तुम्ही आलां ! "

"होय. मी आतांच आलों आणि माझ्या मित्रांना आणण्याकरितां पुनः परत जाणार आहे."

" त्येची नका काळजी करूं. ह्या सप्तशृंगीवरून हिंडतांना माझा अक्षी जन्म गेला बघा. पण वाइच दूध घ्येता का, दमून आला असाल, जरा हुश्यार व्हा की. "

" नको नको. तिकडे जायचे अगोदर पहा. " त्याच्या प्रेमळ आदरातिथ्याचा स्वीकार मोहनला करवेना. आपले सोबती त्या अंधकारांत कोणत्या मनःस्थितीत असतील ही एकच कल्पना त्याच्या मनांत होती.

" असे घाबरूं नका. जरा थीर बसा, " मोहनच्या घाबऱ्या मुद्रेकडे पाहत कृष्णा म्हणाला. " त्या काळ्या कड्याची मला बिलकुल भीति वाटत नाही. थाबा मी एक कासरा घेतो की निघालोच बघा. "

" कसेंहि करा आणि लवकर चला. तुम्ही मागाल तितके पैसे आम्ही देऊं. "

" अहो पैशाला काय करतां! त्यांत काय हाय मोठंसं. एखादं मुकं करडूं चुकुनशानी गेलं तरीबी मी जाऊन घेऊन येतो. मग ही तर तुमच्यासारखी पोरं हायतना. माझ्या पोरावाणी पोरं तो. "

एक कंदील आणि एक लांब दोर घेऊन कृष्णा निघाला. मोहनला तेथेंच थांबण्याबद्दल त्यानें आग्रह केला. पण तो ऐकेना.

" मला येऊं द्याना. एकास दोघे होतील, अन् मी तुम्हांला थोडी मदत करीन. "

" हा तें बी खरं हाय. परवां त्यो जान्या म्येला नाहीं कां तथ. तो भूत झालाय म्हणत्यात. मला नाही भे वाटत. राम राम म्हटलं की पार भुतं पन् पळत्यात. तुमी चला. एकास दोघं होऊत. "

दोघेहि चालूं लागले. ढगांतून मधून मधून डोकावणाऱ्या चंद्राच्या प्रकाशांत त्यांच्या सावल्या संगरपठारावरील खडकावर व झुडुपांवर पडून चित्रविचित्र आकृत्या तयार होत होत्या, त्यांकडे पाहत पाहत, कृष्णा सारंगानें केलेल्या स्वतःच्या पराक्रमांचें, व जखीण वाटेवर मधून मधून दिसणाऱ्या भुतांच्या

आख्यायिकांचें रसभरित वर्णन ऐकत मोहन त्याच्याबरोबर चालत होता. जकिण वाटेवरून जातांना कृष्णा पुढें चालूं लागला आणि त्याच्या हातांतील दोराचें एक टोक घट्ट धरून मोहन त्याच्या मागून चालूं लागला. अशा रीतीने मोहनची भीति पुष्कळच कमी झाली आणि मोहन बरोबर असल्यामुळे कृष्णालाहि भुतांचें भय वाटेनासे झाले. परस्पराचा परस्परांना धीर वाटूं लागल्यामुळे वाटहि लवकरच संपली आणि थोड्याच वेळांत काळ्या कड्याच्या दुसऱ्या टोकापाशी थंडीत कुडकुडत बसलेली दोनही मुले त्यांच्या दृष्टीस पडली. मोहनला सुरक्षित परत आलेला पाहतांच ते दोघेहि त्याच्याकडे धांवतच आले आणि त्याचा हात आपल्या हातांत घेऊन त्यांनी त्याला अनेक प्रश्न विचारून भंडावून सोडलें. स्वतःचे प्राण धोक्यांत घालूनहि मोठे प्रसंगावधान राखून मोहनने आज आपली भयंकर संकटांतून सुटका केली, या जाणीवेने त्याचे हृदय भरून आले होते.

सप्तशृंगीवरून नेहमीच्या वाटेने खाली जाणे अशक्य आहे असे कृष्णा सारंगाचेहि म्हणणे पडले. पावसामुळे सगळे ओढे फुगून तुडुंब वाहत असताना रस्ताच सांपडणार नाही आणि शिवाय चिखलाचा व पावसाचा त्रास होईल तो निराळा. अर्थात् पुनः काळ्या कड्यावरूनच परत जाण्याची तयारी करणे भाग होतें. कृष्णाने प्रथम आपल्या कंबरेभोवतीं दोर घट्ट बांधला. नंतर नागेशच्या आणि प्रभाकरच्याहि कंबरेभोवती आवळला आणि अखेर मोहनच्या कंबरेला पुरण्याइतका शिल्लक न उरल्यामुळे त्याच्या उजव्या हाताला बांधला. अशा प्रकारें घसरून पडण्याची भीति अजीबात नाहीशी झाली नसली तरी बरीच कमी झाली; आणि निधड्या छातीच्या वाटाड्यावर विश्वास ठेवून ते निघाले. वाटेंत जान्या धनगराच्या प्रेताकडे आणि झुडुपावर अडकलेल्या त्याच्या घोंगडीकडे लक्ष जातांच प्रभाकर घाबरला, आणि घसरून पडलाच असता. पण कंबरेला बांधलेल्या दोरामुळेंच वांचला. दोराला हिसका बसतांच कृष्णाने नागेशचा हात आपल्या कसलेल्या हातानें पकडून त्याला जवळजवळ उचलूनच घेतला.

पलीकडे पोहोंचतांच सुटकेचा निःश्वास टाकून त्यांनी मागें पाहिले. सप्तशृंगी आणि त्याच्यावरील काळ्यापांढऱ्या ढगांचे ढीग, काळा कडा आणि त्याच्या दोन्ही बाजूंच्या खोल दऱ्या पाहून त्यांचा त्यांनीं अखेरचा निरोप घेतला.

संकटांतून पार पडल्यानंतर आता त्या संकटाची स्मृति त्यांना अधिकच रम्य वाटली.

संगरपठारावर जातांच त्यांनी कृष्णाचे आभार मानले आणि त्याला निरोप दिला. मदत केल्याबद्दल पैसे घेण्याची तो गोष्टच काढूं देईना. मृत्यूच्या दाढेंतून दोन मुलाना वाचविण्याच्या श्रमाचा मोबदला कोणत्याहि स्वरूपात घेणे त्याला कमीपणाचे वाटूं लागले. तुह्मी सुरक्षित आलात यातच मला माझ्या श्रमाचा मोबदला मिळाला, अशी त्याची भावना होती. अखेर मोहनने आपल्या खिशातून हस्तिदंती मुठीचा एक मोठा चाकू त्याला दिला. " आमची आठवण म्हणून हा तह्मी घ्याच. " तो म्हणाला.

त्या खेडवळ पण प्रेमळ धनगराला मुलाचा आग्रह मोडवेना.

ते विद्याश्रमांत येऊन पोहोचले तेंव्हा नऊ वाजून गेले होते. प्रार्थना आटपून सर्व मुले सभामंडपांतून बाहेर पडत होती. प्रत्येकाला बोलण्याला आज दुसरा विषयच नव्हता. त्याना उशीर का झाला, त्याच्यावर कांही संकट आले की काय, याबद्दल सर्वांचे नानाप्रकारचे तर्कवितर्क चालू होते. तोंच हीं दोनहि मुले तेथे येऊन पोहोचली. लागलीच मुलांचा त्यांचेभोवती एकच गराडा पडला, व प्रश्न विचारण्याची आणि त्याची उत्तरें देण्याची एकच गर्दी झाली. मोहनचे पराक्रम, त्याचे साहस, आणि प्रसंगावधान यांची बातमी वणव्यासारखी सर्व विद्याश्रमात पसरली. त्याचेविषयी मुलांची कलुषित झालेली मने मागे निवळूं लागली होती. पण आज सर्वांची खात्री झाली की, मोहनच्या तोडीचा शूर आणि कर्तबगार मुलगा मोहनच ! काळया कड्याच्या जखीण वाटेवरून एका रात्रींत तीनदा जाऊन येणारा आणि पहिल्यादा तर कोणाच्याहि मदतीशिवाय, केवळ आपल्या मित्रांचे प्राण वाचविण्याकरिता अंधारातून, पाय घसरत असतांना, भुताखेताना आणि प्रत्यक्ष मृत्यूलाहि न जुमानतां अगदी एकटा जाणारा मुलगा त्यांना द्रोणागिरी आणून लक्ष्मणाचे प्राण वाचवणाऱ्या हनुमंताइतकाच आदरणीय वाटूं लागला असल्यास काय आश्चर्य !

दोन अडीचशें मुलांनीं एकमुखानें आपली स्तुति करावी, अनोळखी मुलांनी सुद्धां आपली ओळख करून घेऊन आपलें अभिनंदन करण्याची उत्सुकता दाखवावी, भेटणाऱ्या प्रत्येक मुलानें पाठीवर थाप मारून किंवा हात दाबून

आपल्या कृत्यांची प्रसंशा करावी या अभूतपूर्व स्वागताचा कोणाला अभिमान वाटणार नाही ? मुलांनी केलेल्या या अव्यवस्तित, शिस्तरहित पण अंत:करणपूर्वक स्वागतापुढें, राजनिष्ठेचें प्रदर्शन करूं इच्छिणाऱ्या प्रजेने एखाद्या विजयी सम्राटाचा केलेला शिस्तीचा स्वागतसमारंभ नि:संशय फिक्का पडेल !

पटांगणात मोहन उभा असताना, आणि कमीअधिक ओळखीच्या मुलांनी पाठीवर दिलेल्या थापाचा वर्षाव होत असतांना त्याचा हात अत्यंत प्रेमळपणाने कोणीतरी दाबला. तो मनोहर होता हे त्याने ताबडतोब ओळखले.

" ओहो मनोहर ! " मोहन अंत:करणपूर्वक स्निग्धतेने म्हणाला. " तूं भेटलास, मला किती आनंद झाला म्हणून सांगूं ; पद्या आणि तूं सुरक्षित येऊन पोहोंचलातना ? "

" अगदी सुरक्षित. पण पद्या आता निजला आहे; त्याचें डोकें सपाटून दुखत आहे. निजावयाच्या आधी त्याला एकदां भेट. तो तुझी चौकशी करीत होता."

" शाबास, मोहन," श्रीकान्ताने मोहनचें अभिनंदन केले. पुस्तकालयांत झालेल्या भेटीनंतर तो आतापर्यंत मोहनशीं बोलला नव्हता.

" छान, मोहन, खरा वीर आहेस तूं ! " शांताराम मोहनला पाहतांच म्हणाले. पाठकशास्त्रीहि त्यांच्या बरोबर होतेच. एक शब्दहि न उच्चारतां मोहनच्या खांद्यावर प्रेमानें हात ठेवून त्यांनी फक्त त्याच्याकडे पाहिले; पण हजारों शब्दांनीहि जो भाव व्यक्त होऊं शकला नसता तो त्याच्या त्या स्निग्ध दृष्टीत स्पष्ट उमटलेला होता.

इतक्यांत आचार्य रत्नाकर यांनी त्यांना बोलविले, त्यामुळे ती मुलें आचार्यांच्या कचेरीकडे निघाली. आचार्यांनी गौरवाने आणि प्रेमाने त्याचें स्वागत केलें; सर्व घडलेली हकीकत थोडक्यांत विचारून घेतली आणि दोन प्रेमाचे शब्द बोलून त्यांना निरोप दिला. पावसाळ्यांत सप्तशृंगीवर चढण्यासारखें अविचारी धाडस पुन: न करण्याबद्दलहि त्यांनी जातां जातां बजावले. मोहनला उद्देशून म्हणाले " अलीकडे तुझी अभ्यासांत आणि वागणुकींत पुष्कळ सुधारणा होत आहे हें मला माहीत आहे. तुझी प्रगति पाहून मला खरोखरच फार आनंद वाटतो. "

---

# प्रकरण पंधरावें

## ऋषि-ऋणाची फेड

कचेरीतून बाहेर पडतांना मोहन म्हणाला " जरा इकडे येतोस कां, आपण पद्याकडे जाऊन येऊं. मनोहर म्हणत होता की त्याचे डोके खूप दुखत आहे. गरीब बिचारा! "

विद्याश्रमाच्या इतर इमारतीपासून जरा अंतरावर बांधलेल्या एका लहानशा इमारतीचा रुग्णालयासारखा उपयोग केला जात असे, व पद्मनाभाला तेथेंच आज ठेवला होता. त्याची बराच वेळ वाट पाहून अखेर कंटाळून त्याला नुकतीच झोंप लागली होती; इतक्यांत ही तीनहि मुले त्याच्या खोलीत आली. त्याच्या चेहऱ्यावर दुःखाची छटा आणि जिवापलीकडे केलेल्या श्रमामुळे आलेला थकवा स्पष्ट दिसत होता; पण अंतःकरण शुद्ध आणि निष्पाप असल्यामुळे त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारचा मधुर भाव उमटलेला दिसे आणि त्यामुळें तशा स्थितीतहि त्याच्याकडे पाहत राहावेसे वाटे.

" ह्याच्या तोडीचा सुशील मुलगा विद्याश्रमांत सापडणे कठीण आहे. " प्रभाकरने कंदील वर करून त्याच्याकडे पाहत हलक्या आवाजांत म्हटलें.

पद्मनाभाला नुकतीच झोप लागली असल्यामुळे प्रभाकराच्या हलक्या आवाजानेहि तो लागलीच जागा झाला. " तुम्ही केव्हां आलांत? " त्याने लागलीच विचारले. " मी केव्हाची तुमची वाट पाहत होतो. मनोहर मघाशी येऊन गेला. पण तोंपर्यंत काही तुम्ही आला नव्हता. आम्ही सगळेजण तुमचीच काळजी करीत होतो. मला स्वप्नातसुद्धां तुम्ही आणि तो सप्तशृंगी डोंगर हेच सर्व दिसत होते. जसे कांहीं चालतांना तुम्ही घसरून पडलांत अशींच स्वप्ने मला पडत होती. "

" आणि ते कांहीं अगदीच खोटें नव्हते. आम्ही पडण्याच्याच बेतात होतो. पण बरं का, पद्या, ह्या मोहनने आम्हांला वांचविलें," प्रभाकरनें उत्तर दिलें.

पद्मनाभाने उत्सुकतेने त्याच्याकडे पाहिले. मोहनचे सर्व पराक्रम विस्ताराने ऐकण्याची त्याला इच्छा दिसली. "पण आता नीज तूं. उद्यां सगळे सांगूं तुला. आता तुला कसे वाटत आहे?" प्रभाकर म्हणाला.

"मला कसेंसेच होत आहे, काय होत आहे ते मलाच समजत नाही. पण मी लवकरच होईन बरा."

"अरे तुम्ही काय करता हे?" रुग्णालयाची व्यवस्था पाहणारे डॉक्टर तितक्यांत म्हणाले, "त्याला चांगली झोप लागली होती ती कशाला मोडलीत?"

"आम्ही चाललोच. पद्मा, तूं उद्या चांगला बरा हो. मग तुला सगळे सांगूं. आम्ही जातो आता." असे म्हणून ते तिघेहि बाहेर पडले.

जेवताना कोणीच काही बोलले नाही. सकाळी पद्मनाभ आणि मनोहर यांचेबरोबर निघाल्यापासून आतापर्यंत घडलेल्या गोष्टी इतक्या अनपेक्षित आणि इतक्या विपुल होत्या की, आजचा एक दिवस म्हणजे त्यांना एका युगासारखा वाटला. श्रमांनी थकून गेल्यामुळे सर्वांनाच ग्लानि आलेली होती, म्हणून जेवण आटोपतांच आपापल्या खोल्याकडे ते निघाले.

"मोहन, तूं इतक्यांतच निजणार काय? जरा माझ्या खोलींत चल ना, बसूं थोडा वेळ गप्पा मारीत." प्रभाकरने सूचना केली.

"मी जातो. मला फारच झोप येत आहे." नागेश म्हणाला. "ठीक आहे. जा तूं. आम्ही सुद्धा थोड्याच वेळात तुझ्यासारखीच गाढ झोप घेऊं."

"मला वाटते आज मोहनला स्वप्नात सुद्धा तो काळा कडा आणि ते जान्याचे प्रेत आणि ती घोंगडी दिसणार."

"मला? छे! कधीच नाही. मी तर इतका थकलो आहे की पडल्याबरोबर गाढ झोंपी जाणार." आणि मोहन प्रभाकरच्या खोलीकडे वळला.

प्रभाकरपेक्षां मोहन एका वर्षाने लहान होता आणि वर्गांतहि त्याच्या खालच्या इयत्तेत होता. तरीहि दोघांचे स्वभावधर्म परस्परांस अनुरूप असल्यामुळे त्यांची मैत्री दिवसेंदिवस वाढत होती. एकमेकाच्या सहवासात ते आनंदात इतके तल्लीन होऊन जात की, त्यांच्या ह्या आनंदाचा कोणालाहि हेवा वाटावा.

" आजच्या एका दिवसात किती तरी विचित्र घटना घडून आल्या, नाही, मोहन? " प्रभाकराने खोलीत गेल्याबरोबर सुरवात केली. " मला ह्याचा विसर पडणे शक्यच नाही. शिवाय माझ्या दृष्टीतहि तूं एक प्रकारचा बदल घडवून आणलास आज. "

" मी ? कसा काय बुवा तो? माझ्या नाही लक्षांत येत. "

" सप्तशृंगीच्या शिखरावर असताना आपले नाही का बोलणे झालें ? माझी वृत्ति किती स्वार्थी होती हे माझ्या आजपर्यंत लक्षातच आले नव्हते. मला कोणी मानी म्हणतात, कोणी एकलकोंडा म्हणतात, हे मला माहीत आहे; माझा स्वभाव थोडा लाजाळू आहे हे खरे, पण माझ्या या वागण्याच्या मुळाशी माझी स्वार्थी वृत्ति आहे हे तूं आज माझ्या लक्षात आणून दिले. "

" ते कसे काय? " काही तरी म्हणावयाचे म्हणून मोहन म्हणाला. प्रभाकराच्या बोलण्याचा रोख त्याच्या नीटसा लक्षात आला नव्हता.

" हेच पहाना. तुला येथे येऊन अजून एक सत्र (term) सुद्धा झाले नाही. तोंच तूं ह्या अरविंदाकरिता किती खटपट करितोस; आणि आम्हांला येथे येऊन दोन वर्षे झाली तरी मी एकाहि मुलाकडे ढुंकूनसुद्धा पाहिले नाही. विद्याश्रमाचा मिळेल तेवढा फायदा आपण एकट्याने घ्यायचा हा माझा स्वार्थीपणाच नाही का ? पण अजूनहि वेळ गेली नाही; आणि देव करील तर अजूनहि मला पुष्कळाना मदत करता येईल. त्या अरविंदाला तर उद्यांपासूनच मी माझ्या खोलीत बोलावणार आहे आणि आणखी सुद्धा एखादे वाट चुकलेले वांसरूं मला आढळलें तर पकडून आणीन. "

" छान ! अरविंदाला तूं आता मदत करणार हे ऐकून मला फारच समाधान झाले. आणि तुझे अन् त्याचे जमले तर तुला सुद्धा वाटेल की तो फार चांगला मुलगा आहे. "

" तीच तर पंचाईत आहे. माझे जमतेच फार थोड्यांशी." प्रभाकरनें हंसून उत्तर दिलें. " मला वाटतें माझा स्वभाव थोडासा तुसडा आहे. दोन मिनिटात एखाद्याशीं मैत्री जोडण्याची तुझी कला आपल्याला नाही साधायची. तुला कसें काय जमते ते ? "

" कोण जाणे. मी कसा वागतो हे मला कोठें माहीत आहे? मी त्याचा कधीं विचारच करीत नाहीं. एखादा मुलगा चांगला आहे असे वाटलें की मी त्याच्याशी बोलूं लागतों, मग तोहि माझ्याशी सख्य करतो. अशी माझी पुष्कळांशी गट्टी जमली आहे."

" तूं त्या जखीण वाटेवरून सारंगवाडीकडे जायला निघालास तेव्हा मी आणि नागेश याविषयीं पुष्कळ बोलत बसलो होतो. तुझ्याबद्दल आह्मांला किती भीति वाटत होती म्हणून सांगूं ? आम्ही त्या वेळेला असा निश्चय केला की जर आपण आजच्या दिव्यांतून जगलो वांचलो तर इतर मुलांना मदत–विशेषतः नवीन आलेल्या लहान मुलांना मदत करण्याचा उद्योग करणार. आपण तिघे जर एकमतानें काम करूं लागलो तर मला वाटते आपल्याला पुष्कळ गोष्टी करतां येतील."

" होय, खरें आहे तूं म्हणतोस ते."

" तुझेंच पहाना. तूं नवीन आलास तेव्हा ह्या दुष्ट मुलाच्या संगतीमुळे तुला पुष्कळ त्रास झाला असेल नाहीं ?"

" कांहीं झाला खरा. पण मी त्याच्या नादीं लागलो नाहीं, ही ईश्वराची कृपाच म्हणावयाची. मला सारखे आश्चर्य वाटे कीं, इतकी येथे चांगलीं मोठी मुले आहेत, पण त्यातला एकहि मुलगा कांहीं दुसऱ्याला मदत करायला तयार नाही."

" अगदी वाईट गोष्ट आहे ही," प्रभाकर शांतपणे म्हणाला. " पण हें आमच्या लक्षांत तूंच पहिल्यादा आज आणून दिलेस. मी आज परमेश्वराची प्रार्थना करणार की आजपासून माझी स्वार्थी वृत्ति घालवून टाक आणि इतराना मदत करण्याची मला बुद्धि दे. विद्याश्रमाच्या दृष्टीने सुद्धा आपल्याला पुष्कळ गोष्टी करतां येतील."

थोडा वेळ कोणी कांहीच बोलले नाही. प्रभाकराचे अंतःकरणपूर्वक काढलेले हे कळकळीचे उद्गार ऐकून मोहन थक्कच झाला.

" तुझी भरारी फारच उंच आहे," तो म्हणाला. "येथे पुष्कळ मुलाचे वर्तन वाईट आहे हें मलाहि माहीत आहे. पण ते मला बदलतां येईल असे मला कधींच वाटलें नाहीं. एखाद दुसऱ्या मुलाला कोणी त्रास देत असेल तर त्याला

मदत करावी इतकीच माझी कल्पना. सगळ्या मुलाच्या वर्तनाला वळण लावायचे म्हणजे आकाशाला गवसणी घालण्यापैकीच !"

" म्हणून काय झालें. राक्षसांच्या राज्यांत विष्णूची भक्ति करणारा प्रल्हाद एकटाच नव्हता का ? "

" त्याने एकट्यानेहि आपल्या शाळेतील सर्व मुलांना विष्णुभक्ति करावयाला शिकविलें खरें. त्याच्या अंगी ईश्वरी सामर्थ्य होते. "

" चांगल्या कामाला ईश्वरी सामर्थ्याचे साहाय्य नेहमी मिळतेच. " प्रभाकराची निश्चयी मुद्रा पाहून मोहनला त्याचेबद्दल वाटत असलेला आदर द्विगुणित झाला.

मोहन आपल्या खोलींत आला तेव्हां एकटा अरविंदच काय तो जागा होता. मोहनला आलेला पाहताच तो उठून बसला.

" मोहन, मी केव्हांचा तुझी वाटच पाहत होतो. " हे म्हणतांना त्याचे अगोदरच सुंदर असलेले काळेभोर डोळे उत्साहाने आणि आनंदाने जास्त मधुर दिसत होते. " मला झोप येईच ना. आज जिकडे तिकडे प्रत्येकजण तुझीच स्तुति करतो आहे. तुझ्यासारखा मित्र मला लाभला हे भाग्यच म्हटले पाहिजे नाही ? " त्याची स्वतःची स्तुति केल्यानेहि त्याला इतका आनंद झाला नसता.

" कांहीतरीच म्हणतोस, अरु, " मोहननें हंसून उत्तर दिले. " कोणाला वाटेल की, खरोखरच मी एखादा मोठा वाघ मारून आलों आहे. आम्ही फिरायला गेलो आणि आलो. केलें आहे काय जास्ती ! मी तर तुलासुद्धा बरोबर नेणार होतो. पण तूं चालणार नाहीस म्हणून नाही नेला. "

" तूं आणि प्रभाकर आणि नागेश यांच्याबरोबर मला नेणार ! "

त्याचे चिमुकले डोळे आश्चर्यानें प्रफुल्लित दिसत होते. " नागेश आणि प्रभाकर यांच्यासारख्या बड्या लोकांच्याबरोबर मी फिरायला जाऊं लागलों तर मजा दिसेल नाही ? "

" त्यांत काय झाले ? उद्यांसुद्धां प्रभाकर तुला आपल्या खोलींत अभ्यासाला बोलावणार आहे. तुला वाटेल तेव्हां तूं त्याच्या खोलीत जाऊन अभ्यास करीत जा. "

" प्रभाकर **मला** बोलावणार ! "

" होय **तुला.** कां, त्यात काय झाले ! "

" प्रभाकर म्हणजे बुवा बडे लोक ! "

" मग तूंहि बडा हो."

" काही झाले तरी प्रभाकरची सर मला येणार आहे थोडीच! मला वाटते तूंच त्याला हे सांगितलें असले पाहिजे. खरेच तुझे माझ्यावर किती उपकार आहेत. हे मी कसे फेडूं ! "

" चांगला धट्टाकट्टा हो आणि शूर वीरांसारखा वागायला शीक म्हणजे झाले. पण नीज आतां. "

# प्रकरण सोळावें

## पद्मनाभ

**मरणं प्रकृतिः शरीरिणाम् । विकृतिर्जीवनमुच्यते बुधैः ॥**

—रघुवंश

पहिले सत्र (term) संपून दिवाळीची सुट्टी जवळ येत चालली होती, आणि विद्याश्रमाच्या नियमित कार्यक्रमाचे चक्र आणि मुलांचा वेळ आनंदात चालला होता. सत्रान्त परीक्षाहि त्याच वेळी होणार असल्याने बहुतेक मुले परीक्षेच्या तयारीत गढून गेली होती. वाढत जाणारी लोकप्रियता आणि अभ्यासातील यश यांमुळे मोहनला हे दिवस विशेष आनंदात जात होते सकाळी उठावे, रानात फुललेल्या निसर्ग-रमणीय गुलाबाच्या आनंदाचा उपभोग घेत अभ्यासास सुरवात करावी, वर्गात मधूनमधून पाठकशास्त्री यांनी काढलेल्या उत्तेजनपर शब्दांनी श्रमाचे सार्थक मानावे; मनोहरच्या निरर्थक कोटयांच्या आणि निरुपद्रवी विनोदाच्या अखंड चाललेल्या प्रवाहात स्नान करावे, जरूर तेव्हा छोटया अरविंदाला अभ्यासांत मदत करावी, प्रभाकरच्या सुंदरशा छोट्या खोलीत गप्पा माराव्यात किंवा त्याला अगर नागेशला बरोबर घेऊन आस-पासच्या रानातून हिंडावे, नदीकांठच्या आपल्या आवडत्या आम्रवृक्षाखालीं बसून लाटांचे मनोहर नृत्य पाहत बसावें, हुतुतु, आट्यापाट्या खेळाव्यात किंवा तालमीत कुस्ती करावी. ह्या त्याच्या अपवादरहित आनंदाचा पुष्कळांना हेवा वाटत असल्यास नवल नाही.

एक दिवस सकाळी तो शांतारामांच्या खोलीत अभ्यास करीत बसला असतांना आपल्याशींच हंसत आणि बडबडत मनोहर आंत आला. "अस्सें, आतां प्रभाकरलासुद्धा तुझ्या गांवचें पाणी लागलें म्हणावयाचें. तो आतां अगदी जगमित्रांच्या त्रिकूटांत सामील झालाच समजायला हरकत नाहीं."

"जगमित्र त्रिकूट ? हें कोठलें नवीन कूट आणलेंस ?"

"वा! तुला माहीत नाहीं मी जगमित्रांचे त्रिकूट म्हणून एक नवीन साग्रसंगीत नाटक लिहीत आहें तें ! त्यांत मी, नागेश आणि तूं ह्या सगळ्यांची

पात्रें मी घातली आहेत. पण आतां प्रभाकरचेहि घालीन. आता ही जगमित्र चौकडी झाली."

"पण अलीकडे प्रभाकरने नवीन काय केले असें ?"

"आणखी ते काय करावयाचे? त्यानें एका—पण आतां कोणाला चिडवावयाचे नाही, नाहीं कां—अरविंद हल्ली त्याच्या खोलीत अभ्यासाला बसतो ना !"

"अरे हो, मला माहीत आहे तें." मोहनने हंसत उत्तर दिलें.

मोहनला वचन दिल्याप्रमाणे दुसरेच दिवसापासून प्रभाकरने अरविंदला आपल्या खोलीत अभ्यासाला बोलाविले होते. दोघेहि स्वभावाने थोडेसे भिडस्त होते आणि समाजांत मिसळून वागण्याची आवड कोणालाच नव्हती. त्यामुळें पहिले काही दिवस मुलाच्या चेष्टेला आणि करमणुकीला एक नवीन विषय मिळाला होता. पण एकदोन दिवसाच्या सहवासातच त्याना एकमेकांची ओळख पटूं लागली आणि आतां प्रभाकरच्या खिडकींत राजासारखा ऐटीनें बसून अरविंद व्याकरणाचे नियम घोकताना किंवा आर्या पाठ करताना आढळत असे.

प्रभाकर हुशार, बुद्धिमान्, विचारी व शीलसंपन्न होता हे खरे; पण एखाद्या आत्मनिष्ठ योग्याप्रमाणे स्वतःच्या सुखातच समाधान मानून राहण्याची त्याची वृत्ति हा त्याच्या वर्तनात महत्त्वाचा दोष होता. त्याच्या ह्या एकलकोंड्या व कांहीं अंशीं बेपर्वाईच्या वृत्तीमुळें विद्यार्थिवर्गावर त्याचे एरवीं जे वजन पडलें असते ते पडत नव्हते इतकेच नव्हे तर काही विद्यार्थ्यांना तर तो पुष्कळ अप्रिय झाला होता. मोहननें त्याची अरविंदाशी दोस्ती जमविली; याचा एक अप्रत्यक्ष परिणाम असा झाला की, ह्या आत्मनिष्ठ योग्याची शालेय जगाविषयींची उदासीनता बरीच कमी होऊं लागली, आणि ह्या प्रेमळ, शीलसंपन्न परंतु भिडस्त मुलाच्या सद्गुणांची प्रभा जास्त उज्ज्वल व देदीप्यमान होऊन व्यासविद्याश्रमाच्या कोनाकोपऱ्यापर्यंतहि फांकली व तेथील दुर्गुणांचा अंधकार नाहींसा होऊं लागला.

"प्रभाकरची मदत अरविंदाला पुष्कळ होतेसें दिसतें. कारण त्याचा नंबरसुद्धां आतां बराच वर आला आहे." मोहननें उत्तर दिलें.

" जगमित्र चौकडी की जय ! " मनोहरने हलक्या आवाजांत जयजयकार केला. " पहिल्यादा मला वाटले की प्रभाकरची थोडीशी टिंगल करावी. पण नाही केली झाले. बाकी प्रभाकराने केलें हे चागलेच केलें. "

"आपल्याला सुद्धा शाताराम येथे बसूं देतात आणि अभ्यासात मदत करितात हा तरी त्याचा चांगुलपणाच नाही का ? मला वाटतें पद्मासुद्धा येथे असता तर कशी मजा झाली असती नाही ? "

" तो खूपच आजारी आहे." मनोहर गंभीरपणे म्हणाला. " खूप म्हणजे खूपच आजारी आहे. मी आज सकाळीं त्याला भेटून आलो. त्याला माझ्याशीं बोलवत सुद्धा नव्हते."

" इतका का आजारी आहे तो ! गरीब बिचारा ! तो रुग्णालयांतच आहे हे मला माहीत होते. पण त्याचे दुखणे इतके विकोपाला गेले असेल अशी मला कल्पना नव्हती. "

" त्याचे दुखणे विकोपाला गेले आहे की नाही मला माहीत नाही. पण खूप आजारी आहे खरा. तसा तो दुखण्याला खंबीर मुलगा, पण तो सुद्धा आज खचलेला दिसला. "

" आपल्याला आता तेथे जाऊं देतील कां ? मला त्याला एकदा भेटावेंसे वाटते. "

" कोण जाणे. आपण शातारामाना विचारूं. " आणि ते दोघे आतल्या खोलीत गेले व त्यानी रुग्णालयात जाऊन पद्मनाभाला भेटण्याची परवानगी मागितली.

" ते मी काय सागूं ? " ते म्हणाले. "पण मीहि त्याला आजारी पडल्यापासून भेटलो नाही. चला मीच येतो. आणि डॉक्टराना विचारून त्याची गांठ घेणें शक्य आहे की नाही ते पाहतो. "

शाताराम आणि ती दोन्ही मुलें रुग्णालयाकडे गेलीं. शाताराम बरोबर असल्यामुळे डॉक्टरनीहि त्याना आंत जाण्याची परवानगी दिली.

"तुम्ही मला भेटायला आलांत !" पद्मनाभ शांतारामांना पाहतांच कृतज्ञतेने म्हणाला. " आणि हा मोहन आणि डुल्या सुद्धा – तुम्ही आलांत म्हणून मला किती तरी बरें वाटलें! अन् डुल्या, तूं तर मघाशींच येऊन गेला होतासना !"

" तुला भेटायला डाक्टरांची परवानगी आहे हें आम्हांला माहीत असतें तर आम्ही अगोदर सुद्धा आलो असतो." शांताराम म्हणाले. " पण तुला आता बरें वाटतें ना?"

" छे हो! कांही विशेषसे नाही. डोकें सपाटून दुखते आहे. अन् डोक्यात अशी कालवाकालव होत आहे की, काहीं विचारूं नका."

" पद्मनाभ, अति अभ्यासाचा परिणाम आहे हा. मी तुला किती तरी वेळां बजावीत होतों ना कीं, जरा अभ्यास कमी कर म्हणून. आता बरा झालास ना म्हणजे पुष्कळशी विश्रांति घे."

" बरा झाल्यावर ना? बरा होईन की नाही कोण जाणे! आणि बरा झालोच तर माझ्यासारखा मठ्ठ मुलगा तुम्हांला दुसरा सांपडणार नाहीं हं."

" मठ्ठ! तुला मठ्ठ कोण म्हणेल! पण जाऊं दे तें आता. फार बोलूं नको म्हणून डॉक्टरनी सांगितले आहे. मी जातो आतां. ही मुले आली आहेत तुला तुमच्या वर्गातल्या ताज्या बातम्या सागायला. फार बसूं नका. बरं ना." असें मुलांना सांगून ते बाहेर पडले.

" बरा झाल्यावर विश्रांति घ्यायची-बरा झाल्यावर"-पद्मनाभ आपल्याशीच हळूहळू बोलूं लागला. " मोहन, मी किती आजारी आहे ह्याची मला वाटते त्यांना कल्पना नाही. माझ्या आईला तारसुद्धां केली आहे. ती बहुतेक आज संध्याकाळींच येईल. पण तोंपर्यंत मी जगतो कीं नाही कोण जाणे."

" छे, छे! असे बोलूं नको." मनोहर म्हणाला. " आम्हाला टाकून तूं जाऊं नको. निदान आमच्याकरिता तरी रहा."

" मी गेलों म्हणजे चिडवायला कोणी उरणार नाहीं. मग तुला अगदी करमणार नाही, नाही!" असे म्हणून त्यानें आपला तापानें रूक्ष झालेला हात मनोहरच्या हातावर ठेवला. मनोहरच्या डोळ्याला पाणी आलेले त्याने पाहिलें. " छे, छे! असा रडूं नको. मी कांहीं तुला टोचून बोललों नाहीं. अर मला मुळीसुद्धां तुझा राग नाहीं."

" पद्मनाभ, मला खरोखरच तुझ्यावाचून करमणार नाही."

" पद्मनाभ! हें नवीन नांव कोठले आणलेंस बाबा आज? छे, छे, डुल्या, तूं आपला मला पद्या म्हण. तूंच ते नांव ठेवलें आहेस आणि तें मला खरोखरच फार आवडतें."

" खरेच, पद्या, मीं तुला खप त्रास दिला आहे नाही!" मनोहरचे अंत:करण शोकानें विव्हळ झाले होतें. " मीं सारा दिवसभर तुला चिडवीत होतो आणि तुझ्या चेष्टा करीत होतो. पण तूं किती शांतपणें सगळे सहन करीत होतास. मी दिलेला सगळा त्रास विसरून जा हं. माझ्यावर राग ठेवूं नकोस."

" छट, काहीतरीच!" रागाचा उसना आविर्भाव आणून पद्या म्हणाला. "पाहिलेस मोहन, डुल्या कसे बोलतो आहे ते. डुल्या, तूं मला कधीं त्रास दिलास? तुझी थट्टा मला नेहमीच आवडत असे आणि तुझें मनापासून माझ्या-वर प्रेम आहे हे काय मला माहीत नाही? मोहन, तूं असा माझ्याजवळ बैस. तुझी माझी इतक्या लवकर, मी... इतक्या लवकर दोस्ती जमली, त्यामुळे मला खरोखरच फार समाधान वाटते. तुम्ही अगेच येथें बसून रहा ना! आणि नागेश आणि प्रभाकर यानासुद्धा पाठवून द्या. मला एकदा सगळ्या मित्राना भेटावेसे वाटत आहे."

" पद्मनाभ, आम्ही जातो. आम्हांला फार वेळ बसायला परवानगी नाही." असे म्हणून पद्मनाभाच्या उत्तराची वाट न पाहताच मनोहर खोलीच्या बाहेर जाऊन उभा राहिला. डॉक्टरच्या परवानगीची सबब पुढे करून बाध फोडून बाहेर येऊं पाहणाऱ्या शोकाच्या उमाळ्याला अवसर देण्याकरिताच तो उठून गेला होता. वरून पाहणाराला त्याची वृत्ति डोंगरावरून खळखळणाऱ्या ओढ्या-सारखी उच्छृंखल दिसली तरी त्याचे हृदय कोमल होते. पद्मनाभाची तो अहर्निश थट्टा करीत असला तरी ती थट्टा स्नेहपूर्ण असे, त्यांत दुष्ट वृत्तीचा लेशहि नसे. आणि त्या दोघाचे स्वभाव आणि मनोभूमिका भिन्न भिन्न भासल्या तरी त्याचे एकमेकावर अकृत्रिम प्रेम असे.

" मोहन, मी गेल्यावर मनोहरशी दोस्ती तू कायम ठेवशील ना? तो अगदीं भोळा आणि आनंदी मुलगा आहे नाही? बिचारा डुल्या! तूं आल्यापासून त्याच्या वागण्यांत पुष्कळच अंतर पडलें आहे."

" त्याची अन् माझी छान गट्टी जमली आहे." मोहन त्याचे समाधान करीत म्हणाला. " पण, पद्या, तूं इतका निराश होऊन कां बोलतोस? अजून पुष्कळ दिवस जगशील तूं."

" कोण जाणे. देवाच्या मनांत असेल तर जगेनहि. मी कांही म्हातारा थोडाच झालो आहे ! मलासुद्धा तुझ्या संगतीत राहून खूप चैन करावी असे पुष्कळ वाटते." आणि असे म्हणताना एक अश्रू त्याच्या गालावरून खाली पडला. मोहननेहि मोठ्या कष्टाने आपले अश्रू आवरले होते.

"आणि खरे सांगूं, मोहन, ते हस्तलिखिताचे प्रकरण झालें ना ? त्या वेळेला तुझ्याबद्दल मला फार वाईट वाटे, ही सगळी मूर्ख मुले तुला खाऊं की डसूं करीत होती आणि तूं सुद्धा किती उदास होऊन हिंडत होतास ? तुला पाहिला की माझ्या अंतःकरणात घाव घातल्यासारखे वाटे. मीसुद्धा तुला फारशी मदत केली नाही त्या वेळेला, पण तुझ्याकरिता मी त्या वेळेला प्राणसुद्धा द्यायला तयार झालो असतो."

" पण मला सहानुभूति दाखविणारा पहिला मुलगा तूंच होतास. माझ्याशी पूर्वीसारखा स्नेह कायम ठेवण्यात तुला त्या वेळी कमीपणा वाटला नाही. तेव्हा मला माझ्या छातीवरून एक दडपण उचलल्यासारखे समाधान वाटले. माझ्यासारख्या बुडत्याला हात देऊन तू वर काढलेस हे काय लहानसहान काम केलेस तूं ? "

" खरंच का तुला इतके समाधान वाटले ?" पद्मनाभ म्हणाला. त्या दुःखातहि त्याच्या मुद्रेवर आनंदाचे तेज क्षणभर चमकले. बोलण्याचे श्रम, मित्राच्या सहवासाचा आनंद आणि मोहनच्या शब्दांनी झालेले अंतःकरणाचे समाधान या सर्वांचे योगाने पद्मनाभाला ग्लानि येऊं लागली. मोहनने आपला हात त्याच्या हातातून हलकेच सोडवून घेतला, एक क्षणभर त्या विनाशी जीवाकडे प्रेमाने पाहिले आणि पाऊलहि वाजविल्याशिवाय खोलीच्या बाहेर पडला.

मनोहर त्याचीच वाट पाहत उभा होता. " त्याला आता कसे वाटतें ? " आपल्या खोलीत परत जाताना त्याने विचारले.

" त्याला झोप लागत आहे आणि मला वाटते झोप घेतल्यावर त्याचें डोके पुष्कळ शांत होईल. खरेच, डुल्या, तुझें त्याच्यावर इतके प्रेम असेल अशी मला कल्पना सुद्धा नव्हती ! "

" मी नेहमी त्याची चेष्टा करीत असे म्हणून तुम्हांला तसे वाटतें." दुःखानें एक निःश्वास टाकीत मनोहरनें उत्तर दिले. " पण तो ती मुळीच मनावर घेत

नसे. नाहीतर मी त्याची इतकी चेष्टा केली नसती. मी कसला निर्दय पशु, अगदी गाढव आहे नाही! त्याच्या नखाची सुद्धा सर मला येणार नाही. पण त्याच्याशी एक शब्द बोलावयाचा असला तरी चिडविल्याशिवाय बोललो नाही. पण, मोहन, तो खरेंच मरणार कां रे?"

"अरे छे! मला नाही वाटत. आणि चिडविल्याबद्दल तूं सुद्धां इतके मनाला लावून घेऊं नकोस. तोच नाही का तुला म्हणाला की, तुझ्या चेष्टा ऐकून त्याला उलट हंसूंच येत असे म्हणून?" पण मनोहरच्या मनावर पडलेली उदासपणाची छाया फारशी कमी झाली नाही.

"त्याला एकदम आजारी पडायला काय झाले?"

"डॉक्टर म्हणतात की, अभ्यासाचा ताण त्याला फार झाला. त्यामुळे त्याच्या मेंदूवर परिणाम होऊन ब्रेन फीव्हर झाला आहे."

"तुझी आणि त्याची गट्टी जमावी यांत आश्चर्य काहीच नाहीं. तुमचे स्वभाव सारखेच होते." मनोहरला बोलल्यावाचून राहवेचना. "पण माझी गोष्ट निराळी आहे. त्याचे माझ्यावर इतके उपकार आहेत की, ते कधींहि फिटणे शक्य नाही. तो जर नसता तर मी आज एव्हाना दुर्वर्तनाच्या खोल खड्याच्या तळाशीं जाऊन जुना पुराणा होऊन गेलो असतो."

पद्मनाभाच्या गोष्टी बोलत, त्याचा मोकळा स्वभाव, निर्दोष मन आणि निष्कलंक शीलाच्या आठवणी काढीत नदीच्या कांठी किती तरी वेळ ते हिंडत होते. पद्मनाभाला दीर्घायुष्य द्यावें, तो आपणाला पुष्कळ दिवस लाभावा म्हणून अंतःकरणपूर्वक परमेश्वराची प्रार्थना मनोहरने कितीतरी वेळा त्या वेळी केली.

# प्रकरण सतरावें

## हुतात्मा

शीलानि ते चंदनशीतलानि
श्रुतानि भूमीतलविश्रुतानि
तथापि जीर्णौ पितरावतस्मिन्
विहाय हा वत्स कथं प्रयासि ॥

"पद्मनाभ, तुला एक आनंदाची बातमी सांगू का ?" उसन्या आनंदाने डॉक्टर खोलीत येताना म्हणाले.

"काय झाले ? आई आली आहे का ?" त्या निराश जीवाचे उदास मुखकमल तेवढ्या आनंदाच्या आशेनेहि प्रफुल्लित झालेले दिसले.

दुसऱ्याच क्षणी त्याची आई आंत आली आणि आपल्या सुरकुतलेल्या हाताने त्याचें निस्तेज होत चाललेलें तोंड कुरवाळूं लागली.

"आई, तुझी भेट झाली, आता मी अगदी सुखांत आहे; पण हे काय ?" पद्मनाभाचे काळजाला घरे पाडणारे शब्द ऐकून तिच्या डोळ्याला पाणी आले.

"हें काय, आई ? तूं अगदी सुद्धा रडूं नको. मला कांही सुद्धां होत नाही."

"खरे आहे, बाळ, देव माझी म्हातारीची काठी हिरावून घेणार नाही."

"देवाच्या मनांत असेल तसे होईल. पण मी कांही बरा होईन असे मला वाटत नाहीं. आता माझे डोके अगदी शांत आहे; पण मधून मधून अगदीं गोंधळ उडून जातो आणि माझे मलाच कांही कळेनासे होते."

"देव सगळे बरे करील बरे, बाळ; तूं फार अभ्यास करीत होतास म्हणून डॉक्टर सांगत होते. थोडा कमीच कां नाही केलास ? प्रकृति बिघडवून घेतलीसना आतां ?"

"कांही मुले कशीं भरदिशी अभ्यास करून टाकीत, आई. पण मला ते जमेचना. मी कुठें त्यांच्यासारखा हुशार होतों ? कांहीं असो, मीं आपलें कर्तव्य केलें. पण माझ्या डोक्यांत पहाना कशी कालवाकालव सुरू झाली."

"फार दमला आहेस तूं. जरा झोंप घे आतां."

" पण तूं येथून जाऊं नको. " असे म्हणून पद्मनाभानें डोळे मिटले. त्याचें पांघरूण नीट करून त्याला हलक्या हातानें थोपटीत त्याची आई तेथेंच बसली.

आपला एकुलता एक मुलगा, आपल्या वृद्धापकाळांच्या जीवनाचा एकमेव आधार आपल्या डोळ्यांदेखत मृत्युवश होत असलेला पाहून तिच्या जिवाची काय अवस्था झाली असेल ? देवाची मर्जी म्हणून येणाऱ्या सर्व प्रसंगांना न डगमगता तोंड देण्याचे तिच्यासारखें धैर्य सर्वांच्याच वांट्यास येत नाहीं ! असल्या प्रसंगातहि तिच्या मुद्रेवर दिसून येणारे गांभीर्य व ईश्वरावरील निष्ठा पाहून कोणीहि त्या धैर्याच्या मूर्तीपुढे आपले मस्तक नम्र केलें असतें.

बिचाऱ्या पद्मनाभाला झोंप कोठली येणार ? मध्येंच तो शुद्धीवर असे आणि सरळपणे बोलूं लागे, मध्येच त्याच्या दृष्टीपुढे चमत्कारिक देखावे दिसूं लागत आणि वाताची बडबड सुरू होई. थोडा वेळ डोळे मिटून अस्वस्थपणें पडून राहताच त्याला पुनः वाताचा झटका आला आणि त्याचें बडबडणें सुरू झालें.

"मठ्ठ म्हणता मला तुम्ही होय ? मी आहेच मठ्ठ. पण त्याला मी काय करूं—? आज पहांटे पाच वाजल्यापासून मी ह्या कविता पाठ करीत आहे. खरोखर मी कांहीं आळशी नाहीं—प्रभाकर, तुझ्यासारखा माझा अभ्यास चटकन् होत असता तर काय मजा झाली असती—माझ्यासारखी बोलणी तुला कधींच ऐकून घ्यावी लागत नाहींत——"

मध्येच आपण आपल्या खोलीत बसून अभ्यास करीत आहोंत असा त्याला भास होई आणि तो भराभर पाठांतर म्हणूं लागे.

**पिता जरि विटे विटो न जननी कुपुत्रीं विटे ।**
**दयामृतरसार्द्रधी न कुळ-कज्जलें त्या किटे ।**
**प्रसाद पट झा–**

पुढे कायरे——प्रसाद पट झाकिती—प्रसादपट झाकिति परोपरि—सांग ना काय आहे पुढे ते," आणि दोन्ही हात कपाळावर मारून घेऊन तो पुनः रडूं लागे.

" बाळ, कशाला म्हणतोस आतां ते? तुला येत आहे ते सगळे." डोळ्यांत हट्टानें येऊं पाहणारे अश्रू आवरीत त्याची आई त्याला म्हणाली.

" छे छे, माझ्या केका चुकल्या तर मला उद्यां शिक्षा होईल.—मग ते फार रागावतात—मला म्हणतात तूं असाच मठ्ठ राहणार—आणि कितितरी बोलतात .

—ऋ, र्, किंवा ष् यांच्यापुढे न् आला असतां न् चा ण् होतो. ऋ, र्, किंवा ष् आणि न् यांच्यामध्ये स्वर किंवा—किंवा—कवर्ग आणि पवर्ग, पवर्ग आणि—

हं, येथेंच चुकणार उद्यां. अगदां माझी खात्री आहे. जाऊं दे, प्रभाकर, कशाला माझ्याकरितां त्रास करून घेत आहेस? माझ्या ते कधीं लक्षांत राहणार नाहीं."

" बाळ ! आजच्या दिवस आतां स्वस्थ पड ना ! उद्यां कर ते पाठ पुनः—कायहो डॉक्टर, याला काहींच कां औषध नाहीं ? " दीन मुद्रेने डॉक्टरची विनवणी करीत ती म्हणाली.

" सकाळपासून तो असेंच करीत आहे. औषधाचा कांहीं उपयोग होत नाहीं, थोड्या वेळाने येईल शुद्धीवर." डॉक्टर तिचे सांत्वन करण्याचा व्यर्थ प्रयत्न करीत म्हणाले.

" त्याचे दुखणे खरेंच कठीण आहे तर मग." पुढील भयानक चित्र तिच्या डोळ्यापुढे उभे राहिले, तिच्या सर्व अंगाला कंप सुटला, शब्द सुद्धा तिच्याने उच्चारवेनात.

" असा अगदीं धीर सोडून कसें चालेल ?" डॉक्टर म्हणाले. " देवाजीची मर्जी असेल तसे घडेल. तेथे आपला काय उपाय आहे ? तो करतो ते सर्व आपल्या हिताकरिताच."

पद्मनाभाचे बडबडणे चालूच होते. मधून मधून कविता, मध्येंच कांहीं इंग्रजी किंवा संस्कृत वाक्ये अशी त्याची बडबड सुरू होती. मध्येंच आठवेनासे झाल्या-बरोबर तो थाबे आणि स्वतःच्या मठ्ठपणाला दोष देऊं लागे.

Data : Let ABC and DEF be two triangles in which—in which—

आं, हे कांहीं केल्या पाठ होतच नाहीं. आतांशा माझ्या डोक्यात पुष्कळच बटाटे भरले आहेत—Let ABC —"

" आजच्या दिवस पुष्कळ झाले, आतां पुरे कर ना ! " त्याच्या आईला बोलल्याशिवाय राहवेना.

" पण, आई, अभ्यास करणे-हें पाठ करणे, हे माझे कर्तव्य आहे. तूंच नाहीं का सांगितलेंस की अभ्यास झटून करावा म्हणून ! काय करूं, माझ्या हें

लक्षातच राहत नाही. देवाने तरी माझे डोके इतकें मठ्ठ कां केले ?" असे म्हणून त्यानें हात जोडून नमस्कार केला आणि आपली बुद्धि अधिक चांगली करण्याबद्दल मनापासून ईश्वराची प्रार्थना केली. रोगानें अशक्त झालेल्या, दुःखाने व त्रासानें क्षीण आणि निस्तेज झालेल्या, अभ्यासाला व पाठांतराला जीवितसर्वस्व मानणाऱ्या त्या मुलाला नेहमीच्या संवयीप्रमाणें वाताच्या झटक्यातहि हात जोडताना पाहून तेथे उभ्या असलेल्या डॉक्टरलाहि गहिवर आला, त्याच्या आईच्या हृदयाचे तर पाणीच होऊन गेले.

पुनः त्याला ग्लानि आली. आतां त्याचे बडबडणे थाबले आणि मृत्यूपूर्वीच्या शांततेला सुरुवात झाली. आपल्या मित्रांना–प्रभाकर, मनोहर आणि मोहन यांना अखेरची भेटण्याची त्याची इच्छा होती त्याप्रमाणे त्या मुलांना लागलीच तेथे बोलवण्यांत आले.

"मी आता देवाच्या घरीं जात आहे." तो गंभीरपणे हंसत म्हणाला. "असे रडूं नका. देवाच्या घरीं सर्व सुख असते. नमस्कार! मोहन, येतों मी. आणि डुल्या, हे काय–रडतोस काय असा! मी तर आतां उलट आनंदात आहे. माझी आठवण ठेव. व भलत्या मुलांच्या नादी लागूं नकोस. नमस्कार, प्रभाकर, आपल्या सर्वांच्या गाठी आता देवाच्या घरीं पडतीलच."

देवाच्या घरीं गाठी पडतीलच–पण केव्हा-किती दिवसांनी–आणि तोपर्यंत किती तरी दिवस–महिने–वर्षच्या वर्षे आपल्याला आपल्या आवडत्या मित्राचा वियोग सहन करावा लागेल या कल्पनेने त्या बालकांच्या डोळ्यांना पाणी आले. जास्त वेळ तेथे बसणे अशक्य झालें. बोलण्याचा तर प्रश्नच नव्हता त्यांची ही स्थिति पाहून पद्मनाभालाहि रडूं आले आणि तोंड फिरवून तो मुक्त कंठानें रडूं लागला.

हें करुण दृश्य पाहून त्याच्या प्रेमळ आईच्या हृदयाची स्थिति काय झाली असेल, याची कल्पना त्या दुर्दैवी स्थितीचा अनुभव घेतलेल्या आईलाच येऊं शकेल.

आईच्या हुंदक्याचा आवाज ऐकून त्यानें पुनः तोंड फिरविलें, "हे काय! तूं रडूं नकोस. ती मुले गेली कां ? पण आतां तूं जाऊं नको. येथेंच बसून रहा. माझे मित्र मला भेटले. आतां पुष्कळ समाधान झालें. मी आतां सुखानें मरेन. आई, तुझें तें आवडतें गाणे म्हणना, तूं नेहमीं म्हणतेस तें–"

तिनें आपल्या कोमल आवाजांत पहिलें कडवें म्हणण्यास सुरवात केली :

**रामा तुज नमन असो भक्तवत्सला ।**
**आनंदें साहूं सर्व जें गमे तुला ।**
**कुसुमसम शेज सुखद ।**
**कंटकमय मार्ग बिकट ।**
**दुःखसुख हें सर्व घडत ।**
**इष्ट जें तुला ॥ रामा० ॥**

दोन चरण म्हणताच तिचा गळा दाटून आला. " नाही बाळ, मला नाही म्हणवत—तूं आता चाललास, आता कधी भेटणार ? "

" अगदी थोडयाच दिवसांत–आई– मला पहिल्यांदा तुला सोडून जातांना फार वाईट वाटत होते, पण आता नाहीं वाटत. आई, म्हण ना पुढें–मला झोप येत आहे."

खाली वांकून त्याच्या आईने त्याच्या कोमेजूं पाहणाऱ्या निस्तेज गालाचे अखेरचे चुंबन घेतले. पद्मनाभाने आपल्या क्षीण हाताने आईच्या मानेला मिठी घातली.

हळूहळू त्याचे क्षीण हात शिथिल होऊन आईच्या खांद्यावरून खालीं घसरले, मान मागे पडली, त्याच्या कोमल मधुर डोळयांतील तेज नाहीसें झाले; त्याला झोंप लागली.

होय, त्याला झोप लागली ! थकलेल्या जिवाला विश्रांति देणारी झोंप त्याला लागली ; दुष्ट स्वप्नांनी चाळविली न जाणारी, दुःखदायक स्मृतींवर कायमचे पाघरूण घालणारी झोप त्याला लागली; क्लेशांचा व बंधनाचा नाश करणारी, नानाविध तापांनी अनुतप्त झालेल्या जीवाला नवे जीवन, नवीन जोमाने प्राप्त करून देणारी, मोह आणि वासना यांचा अंधकार नाहीसा करून ईश्वरी प्रेमाच्या कोमल किरणाच्या प्रकाशांत पूर्णत्वाप्रत पोहोचण्याचे आपले ध्येय नवीन साधनांनी, नवीन स्वरूपांनी पुढे चालू करण्यास मोकळीक देणारी झोंप त्याला लागली!!

---

# प्रकरण अठरावें

## कानगांव

**अकारणाविष्कृतवैरदारुणात्-**
**असज्जनात्कस्य भयं न विद्यते।**
**विषं महाहेरिव यस्य दुर्वचः—**
**सुदुःसहं संनिहितं सदा मुखे॥**

चालू सत्राचा आजचा शेवटचा दिवस. आज सुटी होऊन सर्व मुले आपआपल्या घरोघरी जाणार होती. पण त्यापूर्वी सहामाही परीक्षेचा निकाल जाहीर व्हावयाचा होता; आणि त्याकरितां सर्व मुले व शिक्षक त्या भव्य, विस्तीर्ण सभामंडपांत जमले होते. मध्यभागी उच्चासनावर आचार्य रत्नाकर आणि सर्व शिक्षक बसले होते. समोरच्या बाकावरून सर्व विद्यार्थी परीक्षेच्या निकालाची व निरनिराळ्या बक्षिसाच्या निकालाची उत्सुकतेने वाट पाहत होते.

आपल्या नेहमीच्या पद्धतीला अनुसरून अगदी खालच्या इयत्तेपासून निकाल सागण्यास त्यांनी सुरुवात केली. प्रत्येक इयत्तेतील गुणानुक्रमाने अखेरच्या मुलाच्या नांवापासून नावे वाचण्यास सुरुवात करून प्रत्येकाचे गुण ते सांगू लागले. आपल्या ओळखीच्या मुलांपैकी खालच्या इयत्तेतील अरविंदाचा निकाल पुष्कळच समाधानकारक लागला. प्रभाकर त्याला अभ्यासांत पुष्कळ मदत करीत असे हे खरे, पण सर्व विषयांत चागले गुण पडून गुणानुक्रमाने त्याचा क्रम तिसरा लागेल अशी प्रभाकरची, मोहनची किंवा त्याच्या मित्रांपैकीहि कोणाची अपेक्षा नव्हती. बाळू आणि जनार्दन ह्यांचा क्रम त्यांच्या त्याच्या वर्गात अगदी अखेरचा होता हें सांगण्याची अर्थात् आवश्यकता नाहींच.

अखेर मोहनच्या वर्गाची पाळी आली. शंकर जामदार याचा शेवटून दुसरा नंबर आला आणि नाना व किसन याचीहि नांवें त्याच्यानंतर थोड्याच अंतरावर होती. आपला नंबर निदान दहावा लागेल अशी मनोहरची अपेक्षा होती. पण दहावा, नववा, आठवा अशी नांवें तर आचार्यांनीं वाचलीच. मनोहरची छाती धडधडत होती. आपलें नाव वाचावयाचें आचार्य विसरले

तर नाहीत ना अशीहि एक शंका त्याला आली, पण आचार्यांचें नाव व गुण सांगण्याचे काम चालूच होते.

" सातवा हरि, सहावा वामन, पाचवा भार्गव, चवथा मनोहर,- "

आणि आपण सभामंडपात बसलो आहोत ही जाणीव पूर्णपणे ठेवून जितक्या मोठ्याने थाप मारणे शक्य होते तितकी मोठी थाप त्याच्या पाठीवर ठेवून देऊन मोहनने त्याचे अभिनंदन केले.

" तिसरा बाळकृष्ण, दुसरा सतीश आणि पहिला—

पहिला या शब्दावर थोडा जोर देऊन व विद्यार्थ्यांचे कुतूहल थोडेसे अधिक जागृत करण्याकरिता थोडे थांबून आचार्य म्हणाले " आणि पहिला— मोहन."

मोहनच्या पाठीवर थाप मारून त्याचे अभिनंदन करण्याची आता मनोहरची पाळी आली, पण डोंगरातील ओढयासारख्या खळाळणाऱ्या मनोहरचे नुसती थाप मारून समाधान झाले नाही. आनंदाच्या भरात त्याने टाळ्याहि पिटल्या, आणि त्याच्या टाळ्यांचे, सासर्गिक रोगाच्या सांथीसारखे इतक्या वेगाने इतरांनी अनुकरण केलें की, ती गोष्ट आचार्यांच्या लक्षात येऊन मुलाना गप्प बसवण्याचा त्यांनी प्रयत्न करण्यापूर्वीच मोहनच्या अभिनंदनार्थ तो विस्तीर्ण सभामंडप कडकडाटाने हादरून गेला. सप्तशृंगीवर जाऊन आल्यापासून मोहनची लोकप्रियता बरीच वाढली होती आणि परीक्षेतील या यशामुळे स्वतःलाच यश आल्याइतका आनंद त्या सर्व मुलांना वाटूं लागला होता.

मुलांच्या टाळ्यांच्या आवाजालाहि लोपवून टाकणारा आचार्य रत्नाकर यांचा खणखणीत आवाज ऐकल्याबरोबर हा अभिनंदनाचा प्रचंड ओघ तत्काळ थांबला, आणि आचार्य पुढील इयत्तांचा निकाल सांगूं लागले. नागेश आणि प्रभाकर आपापल्या वर्गात पहिले आले होते आणि सातव्या इयत्तेत श्रीकान्तने आपला पहिला नंबर सोडला नव्हता. अर्थात् पुढील सत्राकरितां परीक्षेंतील यश आणि विद्याश्रमांतील वास्तव्य (Seniority) या दोन्ही दृष्टींनीं पाहतां मुख्य मंत्री म्हणून त्याचीच नेमणूक कायम करण्यांत आली. हा निकाल जाहीर होतांच त्याचेंहि अभिनंदन मोहनच्या इतकेच कडाक्यानें

करण्यात आले. पण नेहमीच्या नियमाला आश्रमाच्या मुख्य मंत्र्याच्या बाबतीत एक अलिखित अपवाद समजून आचार्यांनी त्याला हरकत घेतली नाही, आणि मुलांनीहि श्रीकान्ताविषयीचा आपला आदर मनमुराद व्यक्त करून घेतला.

"जगमित्र चौकडीकी जय" सभामंडपातून मुलांचा घोळका बाहेर पडताच मनोहरने जयजयकार केला. "आमच्या जगमित्राच्या चौकडीने जगाचा पराभव केला, आणि, मोहन, समजलास ना, मी चवथा आलो आहे. संभाळून रहा, तुझा राजमुकुट लवकरच काबीज करण्यास मी कमी करणार नाही."

"त्याचे पाहू पुढे, पण आता अगोदर तो राजमुकुट मला पेटींत भरून टाकून सामान आवरून ठेवले पाहिजे. संध्याकाळ झाली की चलो."

आणि तो निष्काळजी फुलपाखराप्रमाणे आनंदाने जाऊं लागला.

"आम्ही जातो आमुच्या गावा।
आमचा राम राम घ्यावा॥"

मनोहर व प्रभाकर यांनीहि त्याची साथ केली.

दिवाळीच्या सुटीचा काळ मोहनचा अतिशय आनंदात गेला. नागेश आणि प्रभाकर या दोघांना त्याने काही दिवस आपले घरी राहण्यास बोलाविलें होते आणि त्याप्रमाणे नागेशला येणे शक्य झाले नाही तरी प्रभाकर आला होता. रम्य उद्यानात सहज उमलणाऱ्या कोमल पुष्पाप्रमाणे मुलाच्या स्वाभाविक विकसणाऱ्या मनोवृत्ति पाहून त्यातच संतोष मानणारी मातापितरे, व परस्पराना आनंद देण्यातच समाधान समजणारी बहिणभावंडे असलेल्या कुटुंबात मुलाना स्वर्गीय आनंद प्राप्त होतो.

मोहनने नागेशलाहि बोलाविलें होते, पण सुटीतील इतक्या लाबचा प्रवास करण्याइतकी त्याच्या आईची परिस्थिति नव्हती. कानगांवच्या उदास वातावरणांतच नागेश आपले सुटीचे दिवस घालवीत होता आणि त्याच्या मनाचीहि उदासीनता मोहनला लिहिलेल्या पत्रांत स्पष्ट दिसून येत होती.

आपले सुटीचे दिवस उदासपणें घालवून उत्साहरहित होऊन विद्याश्रमांत परत जाण्याचा प्रसंग आपल्या मित्रावर यावा हें पाहून मोहनला वाईट वाटले.

आणि निदान त्याच्या मनाला बरें वाटण्याकरितां तरी विद्याश्रमांत जातांना त्याचे घरीं उतरून चार दिवस राहून जाण्याचे त्यानी ठरविले. म्हणून सुटी संपत येतांच सर्वांचा प्रेमळ निरोप घेऊन कानगांवाला जाण्याकरिता तो निघाला. पण कानगांवला जाण्यामुळे त्याच्या व त्याच्या स्नेह्याच्या आनंदपूर्ण जीवितात क्रांति घडून येणार आहे आणि आपण कानगावला गेलो नसतो तर बरे झाले असते असे म्हणण्याचे त्याला वारंवार प्रसंग येणार आहेत याची त्या बिचाऱ्याला काय कल्पना!

गाडी सुरू झाली, पुष्करवाडीचे रम्य डोंगर आणि आकर्षक सृष्टिसौंदर्य मागे पडूं लागले आणि जो जो कानगांव जवळ येऊं लागले तो तो डब्याच्या खिडकीतून दिसणारा प्रदेश अधिकाधिक रूक्ष, आणि ओसाड भासूं लागला. क्षितिजापर्यंत लांबच लांब सपाट पसरलेले काळे भुरके मैदान, मध्येच संन्याशाच्या गुळगुळीत डोक्यावर आलेल्या टेंगुळाप्रमाणे तळपणारी एखादी लहानशी वृक्षहीन टेकडी, मधूनमधून कोरड्या शुष्क नद्या व ओढे, आणि त्या ओढ्यांचाच रस्त्यासारखा उपयोग करून हिंडणाऱ्या तुरळक बैलगाड्या—हा देखावा कोणालाहि उद्वेग उत्पन्न करणाराच होता. अशा प्रदेशात नागेशचे जीवनहि शुष्क व आनंदरहित झाले असल्यास नवल नाही, असा विचारहि मोहनच्या मनांत आल्याशिवाय राहिला नाही. अखेर एकदाचें स्टेशन आले. निराशेने कंटाळून इंजनाने एक मोठा निःश्वास टाकला, धडाड–धडाड असा कर्णकर्कश आवाज चाकातून निघूं लागला, आणि वाळवंटातील अरबाच्या एकाकी तंबूसारख्या भासणाऱ्या एका पत्र्याच्या झोपडीवजा स्टेशनासमोर गाडी उभी राहिली. मोहन दार उघडून डब्यातून खाली उतरतो तोच नागेशने त्याच्या खांद्यावर हात टाकला.

"अखेर तूं आलास, मोहन. तुझे पत्र आलें ते मला खरेसुद्धा वाटेना. असल्या रद्दी खेड्यात तुला कशाला बोलाविले असे एक हजारदा माझ्या मनांत आले."

"त्यांत काय झाले, नागेश, तूं असल्यावर आणखी काय पाहिजे? बरं पण खादा हमाल पाहिला पाहिजे ही ट्रंक गांवांत न्यायला."

"काय करावयाचा हमाल ! मी गाडी घेऊन आलो आहे. गाडी कसली–खटाराच आहे तो म्हणा-आमच्या शेजारच्या रामा पाटलाचा आहे तो. असल्या खटाऱ्यात बसायला तुला लाज नाहीना वाटणार ?"

"त्यांत लाज कसली ?" त्या खेडवळ गाडीत बसत मोहनने उत्तर दिले.

"येथून गांव जवळच आहे. शिवाय येथे तुझ्या ओळखीचेंहि कोणी नाहीं. हे एक त्यांतल्या त्यात बरेंच आहे."

"हुत्, नागेश, असल्या गोष्टींची मी मुळीच पर्वा करीत नाही." आणि खरोखरच नागेशने इतक्या वेळा पुनः पुनः त्या खटाऱ्याचे तुणतुणे चालविले नसते तर त्या खटाऱ्याकडे मोहनचे लक्षहि गेले नसते. वास्तविक नागेशलाच असल्या खटाऱ्यात बसून जाण्याची अधिक लाज वाटत होती.

"थाब, मी हाकतो गाडी," मोहन पुढे सरकत म्हणाला.

"कसला हाकतोस तूं ! त्या बैलाची हाडं बघ अगोदर. फुंक मारली तर मरून पडतील ते. खरेच प्रभाकर किंवा दुसऱ्या एखाद्या विद्याश्रमातील मुलाने आपणाला पाहिले तर त्याला गंमत वाटेल नाही ! आणि मन्या असता तर सहा महिने चेष्टा करायला त्याला विषय पुरला असता."

पण नागेशला किंवा मोहनला काय माहीत की त्यांचे हे अजब वाहन आणि हा रसिक प्रवास विद्याश्रमातील एका मुलाने खरोखरच पाहिला होता ! बाळू त्याच गाडीतल्या मागील एका डब्यांत होता आणि त्याने गाडी चालू होत असताच ह्या दोन बैलाच्या उघड्या खटाऱ्यांतून प्रवास करणाऱ्या ह्या दोघाना पाहिले होते, आणि विद्याश्रमात गेल्यावर आपल्या कंपूला ह्याचें रसभरित वर्णन करून जो आसुरी आनंद आपण उपभोगूं या कल्पनेनेच त्याचीहि हंसतां हंसतां पुरेवाट झाली होती.

"ते पहा कानगाव!" ओसाड वाळवंटांत जमलेल्या बगळ्यांच्या थव्या-प्रमाणे लांबून दिसणाऱ्या झोपड्यांकडे बोट दाखवून नागेश म्हणाला, "एखादा धरणीकंप होऊन पृथ्वीच्या पोटांत हे गडप होऊन गेलें तर मला किती आनंद होईल !"

आपल्या राहत्या गांवाबद्दल नागेशने असे उद्गार काढावेत हें कृतघ्नपणाचें तर खरेच, पण त्यांत आश्चर्य फारसें नाहीं. वर्षांतून बाराहि महिने भासणारे कडक

ऊन, पावसाच्या अभावी गुलालाप्रमाणें धूळ उधळणारे रस्ते, आणि नवानवसानी एखादे दिवशीं पडणाऱ्या पावसाने होणारा मनस्वी चिखल, नागेशसारख्या मुलाचे मन रिझवूं शकणार नाहीत हे उघड आहे. चाकूने कापल्याप्रमाणे सपाट दिसणाऱ्या त्या लांबच लांब मैदानांत हिरवळीचें नांवहि नव्हते. थकलेल्या वाटसरूला रिझविण्याकरितां एकाहि फुलवेलीला तेथें यावेसे वाटले नव्हते. वर निळे काळे आकाश आणि खालीं काळी भुरकी माती याच्या तावडीत सापडून कोणाचाहि उत्साह टिकून राहिला नसता.

नागेशचे वडील त्या गावचे वंशपरंपरा कुळकर्णी होते. परमेश्वराला स्मरून आपले कर्तव्य करणाऱ्या मनुष्याला कानगांवसारख्या रूक्ष प्रदेशातहि सुखाने राहता येईल अशी त्याची अपेक्षा होती आणि त्याप्रमाणे कुळकर्णीपण साभाळून व थोडीशी शेती करून ते आपला प्रपंच चालवीत असत. पण निसर्गाने निर्माण केलेल्या संकटापेक्षांहि क्षुद्र मनुष्याच्या सुपीक मेंदूंत पिकणाऱ्या व रिकामटेकड्यां उद्योगाने वाढणाऱ्या अडचणीच अधिक त्रासदायक होतात हा अनुभव त्याना लवकरच आला.

गुंडोपंत इनामदार म्हणजे कानगांवच्या वृक्षहीन प्रदेशात वाढलेला बडा एरंड होता. तेथाल वीतभर क्षेत्रांत अफाट समजली जाणारी त्याची टीचभर शेती, गरीब कुळाचे थेब थेब रक्त शोषण करून साठविलेले संपत्तीचे अगाध तळे, आणि त्याच्या भरीला एके काळीं भरीव असलेली—पण, आता पोकळ झालेली त्याची इनामदारी, यामुळे ते एक बडे प्रस्थ समजले जाई. कानगांवच्या पंचक्रोशीतील स्थावर-जंगम जीव जन्मजात आपली निगा राखण्यासच ईश्वराने उत्पन्न केले आहेत अशी त्याची प्रामाणिक समजूत होती. अर्थातच नागेशच्या मुंजीच्या प्रसंगी आमंत्रण केलेल्या ठरीव वेळेला मंडपात हजर राहण्याची त्यांना अवश्यकता भासली नाही. पुष्कळ वेळ वाट पाहून अखेर मुहूर्त टळूं नये म्हणून त्याच्या वडिलांनी समारंभास सुरुवात करण्यास आणि गुंडोपंत मंडपात हजर होण्यास एकच गांठ पडली. मग काय विचारता? अंबरीषाने पारणे केलेले पाहून दुर्वासालाहि इतका राग आला नसेल! या यःकश्चित् कुळकर्ण्यानें केलेल्या आपल्या या भयंकर अपमानाचे उट्टे मंडपांतच काढून घेण्यास त्यानीं कमी केले नाही. पण मागाहूनहि नागेशच्या कुटुंबाला—इतकेंच नव्हे,

त्याच्याशी संबंध असलेल्या चौऱ्याशी लक्ष योनींतील जीवजंतूंनाहि त्यांनी त्राहिभगवन् करून सोडलें. त्यांतच हिशेबाच्या दप्तरात नागेशच्या वडिलांच्या हातून झालेली हस्तदोषाची क्षुल्लक चूक गुंडोपंतांच्या कानावर आली.

पैसे खाणारा लबाड खाबू म्हणून त्याची त्यांनीं कानगावभर तर नालस्ती केलीच, पण आपले सरकारी अधिकाऱ्याजवळ होते नव्हते तेवढें सर्व वजन खर्च करून त्यानी त्याला बडतर्फ करवून खटला भरविण्यासहि कमी केले नाही. पुष्कळ दिवस कोर्टात खटला चालला. लोकांनाहि ह्या सर्व प्रकरणाची विस्मृति पडली, तेव्हा एक दिवस निकाल लागला की, नागेशचे वडील हे अप्रामाणिक कधीच नव्हते, त्यांनी पैशांची कांहींसुद्धां अफरातफर केली नाही. त्याची अब्रु साफ झाली. त्याना उजळ माथ्याने फिरतां येऊं लागले, पण धुतल्या तादळासारखी स्वच्छ असलेली त्यांची अब्रू उजळून घेण्याकरिता त्याना आपले घरदार धुऊन काढावे लागले. आपल्या शुभ्र कीर्तीवर हलकट गांवकुटाळानी उडविलेल्या या शितोड्याची त्याना अतिशय चीड आली. अन्यायाने चालविलेला छळ आणि सांपत्तिक स्थिति खालावल्यामुळे आपल्या सुशील पत्नीचे व मुलाचे होणारे हाल पाहून त्याच्या मनाला जबर धक्का बसला, व त्यातच त्यांचा अंत झाला.

ह्या सर्व गोष्टीचे पूर्ण आकलन करण्याइतका नागेश त्या वेळी मोठा नव्हता, पण आपल्या वडिलानां भयंकर मानसिक वेदना सहन कराव्या लागल्या आहेत याची त्याला जाणीव होती. वडिलांचा दिवसेदिवस क्षीण होत जाणारा उत्साह, अकाली पाढरे झालेले केस व उदास चेहरा त्याला अजूनहि आठवत होता. आपल्या आवडत्या पित्याचा अनेक अर्थानीं जीव घेणाऱ्या कानगावच्या लोकाचा त्याला मनस्वी राग येई आणि तो केवळ नाइलाज म्हणूनच तेथे राहत असे.

परंतु अशा परिस्थितींतहि संसाराच्या दुःखमय वाळवंटावर आपल्या पवित्र प्रेममय सहवासाची शीतल छाया पसरून सर्वांचे जीवन सुखमय करण्याचे सामर्थ्य नागेशच्या आईच्या अंगी होते. लग्न झाल्यानंतर पतिगृहीं येऊन संसार मांडतांना तिने कोणते मनोरथ केले होते! पण निर्दय, निरुद्योगी लोकानी स्वतःच्या क्षुल्लक करमणुकीखातर तिच्या संसाराची, तिच्या ध्येयाची, तिच्या सुखाची लीलेनें माती करून टाकली होती. मनुष्य इतका निर्दय कसा

होऊं शकतो, दुसऱ्याच्या मर्मावर घाव घालून हेतुपुरःसर त्याची निंदा आणि द्वेष करून, आडदाडपणे कोमल मनोवृत्ति तुडवून टाकून स्वतःची हौस भागविण्यात त्याला कां समाधान वाटावे, याचाच विचार करीत आज वर्षानुवर्षे एकांतवासांत तिने घालविली होती. या खडतर तपश्चर्येमुळे तिचे मन आता इतकें शांत झाले होतें की निंदेच्या किंवा द्वेषाच्या फूत्कारांनीहि त्या शांत समुद्रावर विकाराच्या लाटा उठूं शकत नव्हत्या; तिचे अंतःकरण आता इतके थोर झाले होते की मर्मावर घाव घालण्याकरिता योजिलेले तीव्र वाग्बाण तिच्यापर्यंत पोहोंचूंच शकत नव्हते.

ही जर एखादी कादंबरी मी लिहीत असतो तर असल्या शांत गंभीर वृत्तीच्या पतिव्रतेचा मुलगा नागेशहि तिच्यासारखाच सद्गुणी दाखविला असता. पण तसे नव्हते खरें. व्यासविद्याश्रमातला आनंदी, उदार-हृदयी नागेश कानगावाला येताच एकलकोंडा, निरुत्साही होऊन वागत असे. आपल्या आईच्या प्रेमळ सहवासानेहि त्याच्या थोर वृत्तीवर पडलेले कानगावच्या लोकांबद्दलच्या तिरस्काराचें आवरण दूर होऊं शकत नसे, आणि आपल्या या द्वेषाच्या व तिरस्काराच्या भरांत तो आपल्या आईशीहि अगदीं तुटकपणे वागून तिच्या कोमल हृदयावर तीव्र आघात करीत असे.

बोलतां बोलतां मुलांची गाडी नागेशच्या घरापुढे येऊन उभी राहिली. गाडीचा आवाज ऐकताच त्याची आई बाहेर आली आणि आपल्या निसर्गतःच गोड असलेल्या आवाजात तिने मोहनचे स्वागत केले.

स्टेशनाहून निघाल्यापासूनच नागेशच्या मनांत आपलें दारिद्र्य व दुःख यांचे विचार थैमान घालीत होते. घरी येऊन आईसमोर आल्यावरहि त्याच्या मनातील हे विचार दूर सरले नाहीत. आपली ही चंद्रमौळी सुदाम्याची कुटी पाहून मोहनची बरीच निराशा होईल अशी त्याची कल्पना होती. आणि म्हणूनच मोहनला उद्देशून पण वस्तुतः आपल्या मनांत डांचत असलेल्या विचारांना वाट देत तो म्हणालाः—" हें पाहिलेंस, मोहन, हें आमचें खोपटें! तुझी सेवा-चाकरी करावयाला आमच्या घरीं नोकरचाकर नाहींत की राबायला गडीमाणसे नाहीत."

नागेशाची ही कडू वाक्ये ऐकून त्याच्या आईचे हृदय कळवळले. पण मोहनच्या नजरेस आपले अश्रू पडू नयेत म्हणून आपले दुःख आवरीत ती मोहनला घरात घेऊन गेली. मन शांत करून अगदी सहजगत्या ती म्हणाली :

" गरिबीत काही कमीपणा नाही ही गोष्ट नागेशला अजून समजली नाहीं. पण, मोहन, तूं आमच्या गरीबाच्या घरची मीठभाकरी गोड करून घे. "

" त्यात काय आहे, काकू! तुम्ही आणि नागेश असल्यावर पंचपक्वान्नाना आणि श्रीमंतीच्या चोचल्याना करावयाचे आहे काय ? "

नागेशचा राग अजून गेला नव्हताच. आईच्या शात भाषणानें तो उलट जास्तच चिडला: " आईला आपले जेव्हा तेव्हा आमची गरीबी आणि दारिद्र्य याशिवाय सुचतच नाही काही."

" वा ! नागेश, गरिबीची गोष्ट अगोदर कोणी—तूं काढलीस की मी ? " त्याची आई खेदाने म्हणाली. आपल्या लाडक्या मुलाचा आवडता मित्र घरी आला असतांना नागेशने असले कुजके बोलणं काढून आनंदाचा विरस करावा हे पाहून तिला अतिशय दुःख झाले. "नागेश, देव करतो ते आपल्या बऱ्याकरितांच करतो. श्रीमंतानाच सुख असते आणि गरीबांना मात्र सदा दुःखच असते असे थोडेच आहे ! आपल्यालाहि सुख काही कमी आहे का ? "

आपल्या वर्तनातील दोष नागेशला दिसले नाहींत, पुष्कळ दिवसपर्यंत दिसले नाहींत आणि जेव्हा दिसले तेव्हां वेळ निघून गेली होती. श्रीमंतींचे तकलुपी वैभव त्याच्या डोळ्यांत भरले होते, त्याच्या उन्मादक चोचल्याचे आकर्षण त्याच्या कोवळ्या मनाला अजून मोह पाडीत होते. दरिद्री लोकाची निष्पाप मनोवृत्ति, त्याचे उदात्त शील हेच खरे वैभव आहे हे त्याला अजून पटले नव्हतें. संपत्ति आणि वैभवापेक्षाहि मनुष्याच्या मनाला खरे सुख, खरें समाधान व खरी शाति देण्याचे सामर्थ्य, ईश्वरावरील अनन्य निष्ठेत आहे, मानवी अंतःकरणातील निर्हेतुक प्रेमात आहे, हे तत्त्व त्याला अजून शिकावयाचे होते.

# प्रकरण एकोणिसावें

## समानशील मित्र

**तथारिभिर्न व्यथते शिलीमुखै-**
**र्हतो दिगन्ते हृदयेन दूरतः ।**
**यथा खलानां कुधिया दुरुक्तिभि-**
**र्दिवानिशं तप्यति मर्मताडितः ।।**

नागेशचें आणि त्याच्या आईचे संभाषण मोहनला चमत्कारिक वाटलें, विद्याश्रमात सुशील, आनंदी व मनमिळाऊ समजल्या जाणाऱ्या नागेशची दुसरी बाजू इतकी क्षुद्र असेल, विशेषतः प्रेमळ आईशी वागताना इतका निष्ठुरपणा तो दाखवील अशी त्याला कल्पना नव्हती. त्याच्या आईचा राजाच्या राणी-सारखा दिलदार स्वभाव, मधुर वाणी, आणि त्यापेक्षाहि मधुर आणि चुटकी-सरसें चित्त हरण करणारी वागणूक पाहून मोहनला तिच्याबद्दल अतिशय आदर वाटूं लागला आणि म्हणून नागेशच्या चमत्कारिक वर्तनाचा उल्लेख सहज बोलताना केल्यावाचून त्याला राहवेना.

"असे म्हणायला तुझें काय जाते? कानगावात राहून पहा म्हणजे समजेल येथील सुख तुला."

"मला तर हे तीन दिवस फारच मजेत गेले. तुझ्या आईचा स्वभावसुद्धां किती चांगला आहे!"

"ते खरं. माझे सुद्धा आईवर पुष्कळ प्रेम आहे. पण तुला दुरून हे कान-गाव पुष्कळ साजरे दिसेल, जवळ येऊन पहा म्हणजे त्यांतील दऱ्या आणि कांटे पाय मोडायला कमी करणार नाहीत."

"राहायचेच ठरलें तर त्यातहि पुष्कळ गोष्टी करतां येतील."

"हं! करतां येतील!" नागेश चेष्टेने म्हणाला. आणि "गाढवाचा घोडा करण्याइतकेंच हे सोपे आहे" असे कायसे तो पुटपुटला. आपल्या वडिलाना येथील लोकांनीं कसें छळले ही हकीकतहि हळूंहळूं त्याने मोहनला सांगितली.

सुटीचे दिवस संपले आणि व्यासविद्याश्रमात जाण्यास मुले निघाली. नागेश आतां विद्याश्रमाच्या एका दृष्टीने अपरिचित वातावरणांत जाणार आणि पाच सहा महिने त्याचा वियोग आपल्याला सहन करावा लागणार या कल्पनेने त्याच्या आईचे प्रेमळ हृदय भरून आले. उलट नागेश व मोहन यांची दृष्टि विद्याश्रम व तेथील अनेक करमणुकीचे कार्यक्रम इत्यादींकडे लागल्याने त्याचे आईवर प्रेम होते तरीहि हे वियोगदुःख त्याना तितके भासले नाही. किंबहुना थोडेसे उल्हासाच्या भरानेच ते निघाले. नागेशचा कानगाव सोडून जाण्याचा हा उत्साह पाहून त्याच्या आईला थोडे वाईट वाटले. त्याचे आपणावर असावे तितके प्रेम नाही अशीहि तिची कल्पना झाली. पण विवेकाने तिने मन आवरले. सामान्यतःच मुलाना आपल्या मनोविकाराचे प्रदर्शन करणे आवडत नाही, हे तिला माहीत होते. शिवाय जगाचे सौंदर्य त्याना अद्याप मोहक वाटत होते, विपत्तीची कृष्ण छाया त्यांचेवर अजून पडली नव्हती, जगातील दुःखाचा कटु अनुभव अजून त्याना यावयाचा होता. शिवाय नागेश तिला आपले जीवितसर्वस्व वाटत होता; पण नागेशचे आपल्या आईवर कितीहि प्रेम असले तरी आपले जीवित सर्वस्वी तिच्या ठिकाणीं एकवटलेले त्याला दिसणे शक्यच नव्हते, इष्ट तर नव्हतेच. मुले परवाच्याचं खटाऱ्यांत बसून स्टेशनवर जात असताना त्याना निरोप देण्याकरितां ती दारात उभी होती त्या वेळी हे सर्व विचार तिच्या तपश्चर्येने अनुतप्त झालेल्या, अनुभवाने शात बनलेल्या मनात एका क्षणात येऊन गेले, आणि आपल्या सजल नयनांनी मुलाना तिने प्रेमानें आशीर्वाद दिला.

त्याना विद्याश्रमात येण्यास थोडा उशीरच झाला होता. आदलेच दिवशी बरीचशी मुलें हजर झाली होती आणि मनोहर व प्रभाकर त्यांचे आणि त्याच गाडीने येणाऱ्या इतर मुलांचे स्वागत करण्यास बागेच्या फाटकाजवळ आलेले त्यांना दिसले. अरविंद व शशीकांतहि त्याच गाडीने विद्याश्रमांत आले होते.

"यावे, अरविंद," मनोहरने स्वागत केले. "मी तुझ्यावर एक लघुकाव्य करीत आहेः—

**मधुर मधुर मी शब्द बोलतो बुल्बुल् माझें नांव रे।**
**एकुनि घ्यावे बोल बोबडे इकडे करुनी कान रे॥**
**उंच नसें मी असे ठेंगणा बुद्धि माझी विशाल रे।**
**बुद्धीचा त्या प्रभाव पाहुनि सुख भोगा खूशाल रे॥**

आणि हा कोण—अरे हा तर विलाप करणारा शशी!" आश्चर्याचा खोटा आविर्भाव आणण्याचे नाटक करून त्याने आपल्या मित्राचे स्वागत केले.

"मार खाशील अं, डुल्या!" शशीकान्ताने आपले नेहमींचेच उत्तर नेहमी-पेक्षाहि जास्त आनंदाने देऊन त्याच्या पाठींत एक गुद्दा लगावला.

"मला वाटते हा मुद्दा पूर्वी माझ्या अवलोकनात आला आहे," मनोहरने त्याचा वार चुकवीत उत्तर दिले. "वा, दोस्त मोहन, तुझे कसे काय चालले आहे? मला आशा आहे की तूं आरोग्याच्या सिंहासनावर अधिष्ठित होऊन आनंदसागरात गटंगळ्या खात असशीलच."

"तुझ्यापेक्षाहि जास्त," मोहनने हंसून उत्तर दिले, "आणि मला वाटते तुझे डोके तर पूर्वीपेक्षा जास्त भडकलेले दिसते."

"ते काही विचारूं नको." प्रभाकरने पुरवणी जोडली. "आल्यापासून त्यानें सरासरीने पंधरा हजार रद्दी कोट्या केल्या आहेत. पण तूं आता आमचे आभार मानले पाहिजेस. कारण माझ्या खोलीत लाडू, करंज्या तुझी वाट पाहत बसल्या आहेत."

"हो, आणि आमच्या छोट्या बुलबुलालाहि आगंतुकी करण्यास मी आमंत्रण देतो." अरविंदाचा हात पकडीत मनोहरनें उत्तर दिले.

"अरे हो, अरविंद, तुला मी विसरलोच होतों." प्रभाकर म्हणाला. "कसे काय, सुटींत खूप चैन केलीस की नाही?"

"काहीं विशेष नाहीं." हे उत्तर देताना अरविंदाच्या चेहऱ्यावर थोडीशी खिन्नताच दिसली.

"तूं काही नेहमीसारखा आनंदात दिसत नाहीस." प्रभाकर त्याला म्हणाला. "कुछ फिकीर नाही. सुटींत मजा मारली नसलीस तर आता विद्याश्रमांत मजेने रहा म्हणजे झाले."

"ते तर आहेच. पण, मोहन, ह्या सत्रांतसुद्धा तूं माझ्याच खोलीत राहणार ना? तुझ्यावाचून मला करमणार नाहीं."

" हो, त्याचें कायरे, मनोहर?" मोहनने विचारले. " आपणां सर्वांना एका खोलींत ठेवण्याची खटपट गृहपतींच्या जवळ वशिला लावून तूं करणार होतास त्याचें काय झाले?"

" मीं तसें केले असेंहि म्हणतां येईल अन् नाहीं केले असेहि म्हणतां येईल." मनोहर मिस्कीलपणे हंसत म्हणाला. " म्हणजे असे कीं तूं आणि हा बुलबुल यंदाहि अजून दहा नंबरच्या खोलीतच राहणार. पण तेथें एका मुलाचीच जागा होती! तेथे मी आपला कसातरी घुसलों झालें."

" भले बहाद्दर ! " मोहन आणि अरविंद एकदम ओरडले. " अगदीं शंभर नंबरी."

" म्हणजे पहा हं," मोहन म्हणाला. " आतां त्या खोलीत कोण कोण, बाळू आणि जनार्दन–शुद्ध नंदीबैलच; मग अन्तु–निदान माणसांतला; आणि नाना आणि किसन–आता जरा शहाणपण शिकले आहेत ते; अन् तूं आणि अरविंद आणि मी–दे टाळी—"

विद्याश्रमांत आल्यावर पहिला आठवडा केव्हाच निघून गेला. मुले नुकतींच घरांहून आलीं असल्यामुळे मागील भांडणांच्या परंपरा उकरून काढायला किंवा नवीन कुलंगडीं उभीं करायला अजून त्यांना फुरसत झाली नव्हती. सर्वांचे सर्वांशीं तूर्त तरी पटत होते आणि चांगलें वागण्याचे व झटून अभ्यास करण्याचे बेत करण्यात प्रत्येकजण गढून गेला होता.

आज रविवारची सुटी होती, आणि बहुतेक मुले बागेतून किंवा पटांगणांतील आपापल्या आवडीच्या जागीं दोस्तांशीं गप्पा ठोकीत विखुरलीं होतीं. मोहनहि आपल्या नदीकांठच्या आवडत्या कुंजांत प्रभाकरशीं बोलत बसला होता आणि त्याच्याच शेजारी अरविंदहि गवतावर पडून मधूनमधून त्यांच्या गप्पात भाग घेत, मधून हातांतील पुस्तकाचीं पाने चाळीत होता. सुटीसंबंधीं गोष्टी निघताच प्रभाकराने मोहनला विचारलें:—

" नागेशच्या घरीं तूं गेला होतासना? मग ?"

" होय, माझे तीनचार दिवस तेथे पुष्कळच आनंदांत गेले. विशेषतः त्याच्या आईचा स्वभाव किती गोड आहे!"

" पण नागेश तर नेहमीं त्या कानगांवला—कानगांवच ना ते—त्याला सारखी नांवें ठेवीत असतो. "

" गांव आहे आपले असे तसेच. पण नागेशचें मन फारच विटलें आहे."

" ते का? "

" कोण जाणे, पण त्याच्या वडिलाना तेथील लोकानी फार त्रास दिला. ते त्या गांवचे कुलकर्णी होते."

" त्यांत काही विशेष नाही. गावातल्या कुळकर्ण्यावर पुष्कळ लोकांचा दात नेहमी असतोच."

" नाही, पण त्याच्या वडिलाना त्यानी फारच त्रास दिलेला दिसतो." असे म्हणून त्याने नागेशने सागितलेली बरीचशी हकीकत प्रभाकरला सांगितली.

इतक्यात त्याचे लक्ष अरविंदाकडे गेले. पुस्तक मिटून त्याच्या गप्पा तो लक्षपूर्वक ऐकतांना त्याना दिसला.

" अरे, अरविंद, तूं येथे आहेस हे माझ्या लक्षातच नाही. तूं आमच्या गोष्टी ऐकल्यास वाटते ?"

" होय, का ? तुमच्या काही खासर्गी गोष्टी होत्या का त्या ? मग तुम्ही तर इतक्या मोठमोठयानें बोलत होता तें–"

"ह्या वाऱ्यामुळें मोठयानें बोलावे लागते; बाकी तूं ऐकल्यास म्हणूनहि काय झाले ! त्या गुप्त गोष्टी थोड्याच आहेत पण कोणाजवळ बोलू नकोस हं ! ह्या काही बोलण्यासारख्या गोष्टी नव्हेतच."

" मी कशाला बोलतो आहें? म्हणजे पुष्कळांना घरी माझ्यासारखाच त्रास असतो म्हणावयाचा!"

" कां रे, तुला रे घरी कसला त्रास होतो ?" प्रभाकरने विचारले.

इतके दिवस फारसा नव्हता. पण आतां मला नवी आई आली आहे, अन् तिचें माझें मुळींच पटत नाही." त्याच्या उदास मुद्रेवरून त्याच्या सावत्र आईचा त्याला चांगलाच त्रास होत असला पाहिजे याबद्दल प्रभाकरची खात्री झाली.

" पण, अरु, तुझ्या केका पाठ झाल्या का ? " गोष्ट बदलण्याच्या हेतूने मोहनने त्याचे लक्ष दुसरीकडे वेधले.

" केव्हांच झाल्या."

नदीच्या कांठी त्या आम्रकुंजांत हा संवाद चालला असतांना तालमीमागील पटांगणांत दुसरेच नाटक चाललें होते.

बाळू आपल्या कंपूतील एक जानी दोस्त रंगनाथ याला बरोबर घेऊन तेथील एका झाडाखाली बसला होता. तितक्यात नागेश आणि भार्गव त्यांच्या-जवळून जातांना त्याने पाहिले. आपल्याला पाहताच बाळूने रंगनाथाला कोपराने खुणावले, आणि आपल्याकडे चेष्टेनें पाहून मिस्कीलपणे तो हंसला, या गोष्टी नागेशच्या लक्षात आल्या. नागेशचे आणि बाळूचे मोठे सूत होते अशातला भाग नव्हे, पण तरीहि आपली चेष्टा करण्याचे धाडस बाळूच्या अंगी आहे हे पाहून त्याला आश्चर्य वाटल्याशिवाय राहिले नाही. नागेश नवीनच आला होता तेव्हा बाळूने त्याला चिडविण्याचा व इतर तऱ्हांनी त्रास देण्याचा बराच उद्योग केला होता. पण आता नागेशचे विद्यार्थ्यांवर इतके वजन होते की, त्याच्या वाटेस ' बाळू, जनार्दन आणि कंपनी 'च्या भागीदारांपैकी कोणीहि जात नसे. पण रंगनाथ ही और वल्ली होती. घरचा श्रीमंत आणि थोरा-मोठ्यांच्या घराण्याशी त्याचें नातें असल्याने काही एका विशिष्ट प्रकारच्या, संपत्तीच्या आभासाला भाळणाऱ्या मुलांचा त्याचेभोवतीं घोळका जमे; शंकर जामदारालाहि मागे टाकणारे त्याचे अक्कडबाज कपडे, चकाकणारे बूट, बोलण्याचालण्यांतील मानभावी सभ्यतेची सफाई यामुळे त्याच्या आड राहून बाण मारणाऱ्या काही मुलांना त्याचा उपयोग होई; पण बहुतेक चांगल्या वळणाची मुले त्याचा तिरस्कारच करीत; मनोहर तर आपल्या कंपूंत त्याचा उल्लेख ' बूटपॉलिश ' या नावानेच करी. पण त्याची जीभ आपल्या विषारी फूत्कारांनी नागिणीलाहि मागे टाकणारी होती; आपल्या मर्मभेदी भाषणानें लहान मुलांच्या हृदयाला कायमच्या जखमा करण्याचे तिचे कौशल्य तरवारीच्या धारेतहि नव्हते. नागेश प्रथम विद्याश्रमांत आला त्या वेळी त्यानें नागेशच्या साध्या व गरिबीच्या कपड्यांबद्दल कसे हिणवले होतें, ' कुळकर्णीची करणी कसाबकरणी ' इत्यादि टोपण-नांवे ठेवून त्याला चिडविण्यास त्याने कसें कमी केले नव्हतें या गोष्टी नागेश विसरला नव्हता.

नागेशने त्या दुकलीकडे एकदा रागाने पाहिले. पण त्यामुळे त्यांना वाईट वाटण्याऐवजी त्याला चिडविण्याच्या आपल्या योजनेला यश येत आहे हे पाहून रंगनाथला मनांतल्या मनांत गुदगुल्या होऊं लागल्या. बाळू एकदा मोठ्याने खदखदां हंसला आणि नागेशला ऐकूं जावें या हेतूनें मुद्दाम मोठ्याने म्हणाला:

"अरे काय सांगू तुला. तसला अजब खटारा तुला स्वर्गात सुद्धा सांपडायचा नाहीं. आणि त्याला जोडलेले बैल तर मला वाटते त्यांनी सुदाम्याच्या घरचे चोरून आणले असावेत!" त्यांच्या हसण्यांत पुढील शब्द, नागेशला ऐकूं आले नाहींत, पण रंगनाथने कसाबकरणीबद्दल कांहीं तरी उल्लेख केलेला त्यानें ओझरता ऐकला.

"कसली हलकट कारटी आहेत ही !" भार्गव म्हणाला. "काय म्हणतात तरी काय ते ?"

"शुद्ध गाढव आहेत." नागेश रागाने बेफाम होत चालला होता.

"तुला उद्देशून बोलत आहेत होय ती? मग असा रागावून त्याना आसुरी आनंद पुरविण्याचे पुण्य पदरी कशाला घेतोस ? बूट पॉलिश आणि बांगडीखान— माहीत आहे आम्हाला त्याची काय किंमत आहे ती ! " भार्गव शांतपणें बोलून नागेशचा राग घालविण्याचा प्रयत्न करूं लागला. मोहनने पहिले दिवशी बाळूचा नक्षा उतरविल्यापासून त्याच्या भ्याडपणाला अनुलक्षून बांगडीखान हे नाव बरेच प्रचारांत आले होते.

"गाढव कोठले ! असा एकेकाला लंबे करतो की याद राखून रहा."

"जाऊंदे रे, चल आपण नदीच्या बाजूला जाऊं."

"छे छे, मला उद्देशूनच बोलत आहेत. ऐकूं तर खरे काय म्हणतात ते."

आणि ते ऐकणे मुळीच कठीण नव्हते. बाळू मुद्दामच मोठ्याने बोलत होता.

"मला वाटतें शेणखत वाहावयाचा खटारा होता तो. आणि त्यांत बसून आपल्या जिवलग मित्राचे स्वागत करायला चालला होता! आहे की नाहीं वीर —हो हो—"

"त्याची अशीच जिरली पाहिजे......" बाळूचा आवाज जरा मंदावला, तरीहि "बाप लबाड, पैसे खाल्ले..." इत्यादि तुरळक शब्द त्याला ऐकूं आलेच आणि मधले सुटलेले शब्द भरून काढणे दुर्दैवानें नागेशाला अगदींच कठीण नव्हते.

रागाने लालबुंद होऊन, बाळूकडे पाहत एक क्षणभर नागेश उभा राहिला. पण एकच क्षण; दुसऱ्याच क्षणीं बाळूला एक रट्टा लगावून त्याला त्यानें जमिनीवर लोळविलें. त्याची खाली पडलेली टोपी लाथेने लांब उडवून दिली.

" तूं काय समजतोस स्वतःला ? " बाळू चवताळून म्हणाला, " पांचवींत ऐंस की सहावींत ऐस. ऐसा ठोकून काढतो कीं जन्मभर आठवण राहील. "

" त्याच्या केसाला बोट तर लाव नुसते म्हणजे सांगतों काय ते. " भार्गव दोघांच्यामध्ये उभा राहून ओरडला. नागेशपेक्षां भार्गवचें शरीर चांगलेच कसलेलें असल्याने बाळूहि जरासा कचरला.

" त्याने मात्र मला विनाकारण गुद्दा द्यावा आणि आम्ही मात्र उगीच बसावें ? "

" उगीच का ? आधीं खोडी कोणी काढली ? चिडविण्याकरितां त्याला उद्देशून अगोदर तूंच कांहीतरी बडबडत नव्हतास का ? "

" काय झाले ? काय झालें?" कर्ीत मुलाचा घोळका इतक्यांत त्याच्या-भोवती जमूं लागला होता. त्याना उद्देशून आणि रागानें बेफाम होऊन कावऱ्याबावऱ्या मुद्रेने चहूंकडे पाहत धापा टाकीत उभ्या असलेल्या नागेशकडे बोट करून रंगनाथानें खुलासा केलाः

" काही नाही. ह्या आपल्या सुशिक्षित सभ्य गृहस्थाना एक सौम्यशी रागाची लहर आली."

" पण झाले काय? "

" कोण जाणे—पण खरोखर तसें काहीच कारण नव्हते."

रंगनाथचे हे मानभावीपणाचे उत्तर ऐकून नागेश अधिकच चिडला. " मला उद्देशून आता तुम्हीच खोट्यानाट्या गोष्टी बोलत होता की नाही ? पुनः म्हण की, पुनः ठोकून काढीन; सोडणार नाहीं."

" म्हणेन म्हणेन! जा, काय करणार आहेस तूं? " बाळू त्वेषाने ओरडला.

" तुला उद्देशून बोलत होतो ? " आश्चर्यचकित होऊन रंगनाथ म्हणाला. " मला वाटतें आम्ही एका पैसेखाऊ लबाड कुळकर्ण्याविषयी बोलत होतो. तूं तसा कुळकर्णी आहेस का ? "

" संभाळून बोल हं." नागेशला राग आवरेना.

" काय संभाळायचें ? आम्ही काय बोलत होतो हे आडून ऐकायला तुला कोणी आम्हीं सांगितलें होते ? "

" गप्प बैस, " भार्गव म्हणाला. " सात कोसावरून ऐकूं येईल इतक्या मोठ्यानें तुम्ही बोलत होतां. आडून कशाला ऐकावयाला पाहिजे?"

" बरं मग ? आम्हांला वाटेल तेवढ्याने आम्ही बोलू." रंगनाथ म्हणाला, आणि मग इतर मुलांकडे वळून खुलासा करूं लागला: "आम्ही नागेशचे नावसुद्धा घेतले नव्हते. शेणखताच्या खटाऱ्यांत बसून जाणाऱ्या एका पैसेखाऊ कुळकर्ण्याबद्दल आम्ही बोलत होतो, इतक्यात या राजश्रींनी पिसाळलेल्या कुत्र्यासारखी बाळूवर झडप घातली. त्याला जर असले बोलणे आवडत नसेल तर आम्हाला काय, आम्ही नाही पुनः त्याच्यासमोर असले बोलणे काढणार." रंगनाथच्या साखरेत घोळलेल्या प्रत्येक शब्दात हलाहल विष साठविले होते.

" बेमालुम बूटपॉलिश, " भार्गव म्हणाला. नागेशच्या रागाचे कारण त्याला पुरते कळले नव्हते. पण रंगनाथाच्या मानभावीपणाचा त्याला मनस्वी तिटकारा वाटूं लागला. " तुझ्यासारख्या कवडीकिमतीच्या मुलाच्या नादी नागेश कशाला लागला कोण जाणे! चल, नागेश." नागेशचा हात धरून त्याला जवळजवळ ओढीतच तेथून घेऊन जात तो त्याला म्हणाला: " ह्याची काय योग्यता आहे तुला माहीत नाही का ? "

नागेशच्या रागाचे खरे कारण कळले तर आपल्या हलकटपणाच्या वर्तनाला दोष दिल्याशिवाय एकहि मुलगा राहणार नाही, ही जाणीव बाळू व रंगनाथ याना पूर्ण होतीच. म्हणून ह्या संधीचा फायदा घेऊन त्यानीहि काढता पाय घेतला.

नागेशला जरा पलीकडे नेल्यावर भार्गवने त्याला इतके रागावण्याचे कारण खोदखोदून विचारले, पण नागेशने एका शब्दानेहि उत्तर दिले नाही. आपले दोन्ही हात कपाळावर ठेवून विचार करीत तो स्वस्थ बसला अत्यंत नाजूक जागच्या नुकत्याच रुजत आलेल्या जखमेवरील खपली कोणीतरी निर्दयपणे काढून घेतल्याइतके त्याला दुःख झाले. आपले दारिद्र्य आणि आपल्या वडिलांचा मानभंग यांची इतक्या सार्वजनिक रीतीने चर्चा व्हावी हे त्याला खपले नाही.

पण बाळूला ही हकीकत समजावी कशी ? हळुहळू तो त्याचा संवाद अक्षरशः आठवण्याचा प्रयत्न करूं लागला. " हां, खटारा आणि मरतुकडे बैल असे तो म्हणाला नाही का ? ह्याचा संबंध विद्याश्रमांतील फक्त एकाच मुलाशी भिडतो. अस्सें—मोहनराव—तर मग आमचें दारिद्र्य आणि आमच्या घरी ऐक-

लेल्या इतर गोष्टी यांची तुम्ही आपल्या खोलींत बसून चेष्टा करता काय ? बाळू-सारख्या मुलाच्या देखत आमच्या दुर्दैवाची थट्टा करण्यात तुम्हांला मोठी मजा वाटत असेल नाही ? ''

बाळूने ही गोष्ट डब्याच्या खिडकीतून स्वतः पाहिली होती, याची नागेशला काय कल्पना असणार ? तसेच बाळूची आतेबहिण कानगांवच्या शेजारच्या गावी राहत असल्याने त्याच्या वडिलांची कर्णोपकर्णी ऐकलेली हकीकत तिने सांगितलेली बाळूने ऐकलेली होती, ह्याची त्याला शंकाहि येण्यासारखी नव्हती. मोहनने आपला विश्वासघात केला आणि आपल्या पाठीमागे आपल्या चेष्टा तो करतो, हाच एक निष्कर्ष त्याला सुचला आणि एकदा त्याच्या डोक्यात तो ठाम बसल्यानंतर इतर पूरक कारणे शोधून काढून अजाणतांच तो ग्रह तो कायम करूं लागला.

खरी गोष्ट अशी होती कीं, मोहनविषयी त्याचे मन कलुषित होऊं लागलें होते आणि त्याचा स्फोट होण्यास सोयीचें असे कोणतेहि क्षुल्लक कारण त्याला पुरले असते. आपल्या आईशी तो नीट वागत नसे, ही गोष्ट मोहनला आवडली नव्हती. इतकेंच नव्हे, तर मोहनने त्याचा हा आडदांड-पणा अप्रत्यक्षपणे का असेना पण सूचित करण्याचा प्रयत्न केला होता. त्या वेळी आपला राग त्याने गिळला असला तरी तो नाहीसा झाला नव्हता. शिवाय अलीकडे मोहनचें प्रभाकर व मनोहर याच्याशी जास्त रहस्य चालतें, व ती मुलेहि आपल्यापेक्षा मोहनला जास्त चाहतात असा त्याचा ग्रह होत चालला होता. भार्गव हा एक सरळ मनाचा आणि प्रामाणिक मुलगा होता हे खरे, पण त्याच्याशी अधिक दोस्ती वाढविण्यात मोहनचे उट्टे काढण्याचा—तुझ्या दोस्ती-वाचूनहि माझे चालण्यासारखे आहे हे दाखविण्याचा नागेशचा हेतु होता. मोकळ्या मनाच्या मोहनला त्याच्या मनाच्या या सूक्ष्म मनोव्यापारांची काहीच कल्पना नव्हती; भार्गवचा व नागेशचा स्नेह वाढला म्हणून असूया वाटण्याइतका तो क्षुद्र बुद्धीचाहि नव्हता.

आपल्या प्रश्नाचे नागेश कांहींच उत्तर देत नाही, हें पाहून भार्गव त्याचे सांत्वन करण्याकरितां म्हणाला '' जाऊं दे रे, त्या बांगडीखान आणि बूटपॉलिश

यांच्यासारख्या हलकटांनीं बोललेले काय मनावर घेतोस तूं ? मी तर त्यांच्या शब्दाला कवडीची किंमतहि दिली नसती. ''

'' मला त्याचे नाहींरे वाईट वाटत,'' आपले डोळे पुशीत नागेश म्हणाला. '' प्रश्न आहे तो असा की, त्यांना समजले कसे ? विद्याश्रमांत ही गोष्ट फक्त एकालाच माहीत आहे आणि त्याने माझी चेष्टा करण्याकरिता ही जगजाहीर केली असली पाहिजे. त्याचें मला वाईट वाटते. ''

'' कोण तो ? ''

'' आपले मोहनराव ते. आणि तुला सांगून ठेवतो भार्गव, पुनः त्याच्याशीं बोलेन तर नावाचा नागेश नव्हे. ''

'' मोहन !'' भार्गव आश्चर्याने म्हणाला, '' मला नाही वाटत मोहन असें करीलसे ! तुझी खात्री आहे का ? ''

'' अगदीं शंकाच नको. दुसऱ्या कोणाला माहीतच नाहीं मुळी ते. ''

'' पण तूं त्याला आधी विचारीत कां नाहीस ? ''

'' काय करावयाचे आहे विचारून ? '' नागेश निराशेने म्हणाला. '' पण मी त्याला विचारीन–म्हणजे त्याला समजेल तरी की मला त्याच्या सर्व लीला कळल्या आहेत म्हणून ''

# प्रकरण विसावें

## मित्रांचा अबोला

रविवारीं संध्याकाळपर्यंत नागेशची आणि मोहनची गाठ पडलीच नाहीं. सोमवार उजाडला. कालच्या अपमानाचा राग नागेशच्या मनात आतल्या आत धुमसत असल्यामुळे अधिकच चेतला होता आणि शक्य तितक्या लवकर मोहनला गाठून आपला विश्वासघात केल्याबद्दल त्याची हजेरी घेण्याची तो संधि पाहत होता.

वर्ग संपताच भार्गवला बरोबर घेऊन तो क्रीडागणावर गेला. मोहन आणि मनोहर येणाऱ्या वादळाची कांहीच पूर्व सूचना नसल्यामुळे अगदी शांतपणे हिंडत होते. भार्गव दृष्टीस पडताच त्याची चेष्टा करण्याची संधि घालविणारा मुलगा कांहीं मनोहर नव्हता! म्हणून त्याने भार्गवाच्या स्वागतार्थ आपली स्तुति-कुसुमांजली म्हणण्यास सुरुवात केली.

**भार्गवासि पुजिलें स्वमुखानें ।**<br>
**भार्गवासि पुजिलें स्वकरानें ।**<br>
**भार्गवासि पुजिलें स्वपदानें ।**<br>
**भार्गवासि पुजिलें—** ”

हें भार्गवस्तोत्र तोंडानें म्हणत असताच जरूर तो अभिनय करून पूजिले शब्दाचे वाच्यार्थ व व्यंग्यार्थ स्पष्ट करण्याचें त्याचे काम चालू होते. अर्थात् त्याचें स्तवन पूर्ण होण्यापूर्वीच त्याच्यावर प्रसन्न होऊन वर देण्याकरिता त्याचा पाठलाग करण्यास भार्गवाने सुरुवात केली.

नागेशला पाहतांच मोहन आनंदानें जवळ आला, पण नागेशच्या चेहेऱ्यावरील दुःख, राग, तिरस्कार इत्यादि अनेक भावना व्यक्त करणाऱ्या आठ्या पाहून तो थक्कच झाला. उत्सुकतेने त्याचा हात आपल्या हातांत घेऊन तो म्हणाला, “ कायरे नागेश, काय झालें आहे? ”

नागेशने आपला हात सोडवून घेतला आणि शांतपणें म्हणाला,

" मोहन, मी तुला असे विचारणार आहे की – म्हणजे असे – की – माझ्या सगळ्या गोष्टी – माझ्या वडिलांची हकीगत – तूं जाहीर का केलीस? "

आपण प्रभाकरजवळ ह्याबद्दल ओझरता उल्लेख केल्याचे मोहनला आठवले म्हणून एकदम त्याला नाही म्हणवेना.

" म्हणजे तुझ्या घरची हकीगत मी मुलांना सांगितली? मला काय माहीत कीं– "

" हे पहा, असल्या सबबी मला नकोत. तूं सांगितल्या नसशील तर नाही म्हण. सांगितल्या असल्यास तर होय म्हण. उगीच पाल्हाळ कशाला? "

" पण तूं मला असे कोठे म्हणाला होतास की त्या गोष्टी— "

" होय की नाही, एक काय ते सांग. " नागेश अधीरतेने म्हणाला.

" मी सांगितल्या हे खरे. पण मी त्या— "

" पुरे पुरे, मला जास्त कांहीएक ऐकण्याची इच्छा नाही. " असे म्हणून नागेश परत फिरला.

" पण माझे ऐक तर खरें, " मोहन त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याला परत फिरवीत म्हणाला. " मी त्या फक्त— "

त्याचा हात नागेशने रागाने झिडकारला, " मला ते तुझे 'फक्तबिक्त' कांही-एक नको. सगळ्या विद्याश्रमभर ते 'फक्त' आता पसरले आहे. आणि लोकांचा विश्वासघात करण्याची तुझी कांही ही 'फक्त' पहिलीच खेप नाही. "

मोहनलाहि आतां त्याचा राग आला. " म्हणजे काय म्हणतोस तूं? "

" कांही नाही. विश्वासघात करणे काय आणि टेबले फोडून आणि– " अशा अवेळी असला टोमणा देणे हे हलकटपणाचे आहे याची जाणीव नागेश-लाहि क्षणभर झालीच.

" छान, छान, नागेश. " मोहन उदासपणे म्हणाला. " तूं असे म्हणशील ही मला कल्पना नव्हती. एखादी चूक माझ्या हातून झाली म्हणून आज त्याबद्दल हिणवण्याचें काय कारण आहे? सगळे लोक आतां माझा तो अपराध विस-रूनहि गेले आहेत. पण तूं जर जरा शांतपणें विचार करशील तर तुझ्या लक्षांत येईल कीं, आज माझी कांहीहि चूक नाहीं. "

" मग कोणाची–माझी? " नागेश आणखीहि कांहीं कटु शब्द बोलला असता, पण मनोहर आणि त्याचा पाठलाग करीत असलेला भार्गव, क्रीडां-

गणांत एक गिरकी मारून त्यांच्याजवळ आले. दोघांचे कांहींतरी बिनसलें आहे असे दिसतांच मनोहर म्हणाला,

" वत्सा चंद्रकेतु, हा लव तुला काय म्हणतो आहे? "

पण उत्तर देण्यासारखी नागेशची मनःस्थिति नव्हती. लागलीच पाठ फिरवून तो चालता झाला.

" तो तुझ्यावर खूप रागावला आहे," भार्गवने खुलासा केला. "तो म्हणतो की, त्याच्या घरगुती गोष्टी बाळूजवळ तू बोललास म्हणून."

" अगदी खोटी गोष्ट," मोहन त्वेषाने म्हणाला. " प्रभाकराजवळ मी त्याचा एकदा ओझरता उल्लेख केला हें खरे. पण प्रभाकरला समजले तरी नागेश रागावणार नाही असें मला वाटले. त्याची चेष्टा मी करीन असे तुला तरी वाटते काय ? तो जर आज इतका बेताल झाला नसता तर मी त्याची पाच मिनिटात समजूत काढली असती."

" तूं जर प्रभाकराशिवाय दुसऱ्या कोणाजवळ बोलला नसलास तर मला वाटते नागेशहि तुझ्यावर रागावणार नाही. मला भेटला म्हणजे मीहि त्याला सांगेन."

" साग तुला वाटले तर. पण माझ्याविषयी अशी. हलकटासारखी शंकाच त्याला का आली ? आणि मागल्या उखाळ्यापाखाळ्या काढून मला हिणविण्याचीहि त्याला कांही जरूर नव्हती. त्याला वाटले तर त्याने हुडकून काढावे ह्या गोष्टी कशा जगजाहीर झाल्या त्या. मला नाही त्याची पर्वा ! "

दोघानाहि परस्पराचा तीव्र राग आला होता आपल्या मर्मस्थळी झालेल्या व्रणावर निर्दयपणे चोंच मारून आपल्या इतक्या दिवसाच्या मैत्रीला त्याने कमीपणा आणला अशी दोघाचीहि समजूत झाली होती. त्यांच्या स्नेहांत पडलेले हे वितुष्ट सुरुवातीस सौम्य स्वरूपाचें होते. त्यांचा क्षुल्लक गैरसमज दूर होऊन पुनः पूर्ववत् स्नेह वाढू शकला असता, पण नागेशच्या मानी आणि हटवादी स्वभावामुळे त्यांच्यामधील हे खिंडार वाढतच गेले आणि त्याचें रूपांतर होऊन त्यांच्यामध्ये कायमचे वैर वाढले

मोहनची प्रभाकरशीं गांठ पडतांच त्यानें विचारले, " प्रभाकर, मी तुला नागेशच्या घरासंबंधीं सांगितलेल्या गोष्टी तूं दुसऱ्या कोणाला सांगितल्यास ?"

"काय म्हणतोस तूं, मोहन? मी सांगेन असे तुला वाटते तरी कां? तूं मला कोण समजतोस?"

"तसे नाही, प्रभाकर. तूं सांगणार नाहीस ही माझी खात्री होतीच. पण नागेश म्हणतो की, त्याच्या घरच्या सगळ्या गुप्त गोष्टी मी जगजाहीर केल्या. आताच तो मला एखाद्या पिसाटासारखा शिव्या देत होता." मोहनने सर्व हकीकत प्रभाकरला सांगितली. दोघा मित्रांनी अशा तऱ्हेनें अबोला धरावा हे पाहून प्रभाकराला वाईट वाटले. "तूं नागेशची समजूत का नाही काढीत?" त्यानें मोहनला सुचविले.

"काय उपयोग आहे? मी त्याला सांगूं लागलो तर एक शब्दहि तो ऐकेना. वाटेल तसा मलाच उलट बोलायला लागला."

"त्या वेळी तो रागात होता. त्याचे डोके शांत झाले म्हणजे त्यालाहि आपली चूक दिसेल. तसा तो हाडाचा गरीब आणि सज्जन आहे. त्याच्यावरचा राग सोडून भांडण मिटवून का नाही टाकीत तूं?"

या गोष्टीला दोन चार दिवस झाले. नागेशच्या बरोबर आनंदात आपण कितीतरी दिवस कसे घालविले ते मोहनला सारखे आठवूं लागले, आपल्या संकटकाळीं नागेशने आपल्याला कसे सोडले नव्हते याची आठवण त्याला वारंवार होऊं लागली. नागेशचे अंतःकरण किती कोमल होते हे त्याला माहीत होते आणि म्हणून ह्या अबोल्याबद्दल त्याला वाईट वाटूं लागले. निदान आपल्या मनाची रुखरुख घालविण्याकरिता तरी आणखी एक प्रयत्न करून पाहावा म्हणून त्याने पुनः एक चिठ्ठी नागेशला लिहिली.

नागेशने वारंवार झिडकारून टाकले असतांहि आपण त्याचो आर्जवे करीत आहोत हे दुसऱ्या कोणास समजावे असें त्यास साहजिकच वाटले नाहीं. म्हणून कोणालाहि नकळत तो स्वतः ती चिठ्ठी घेऊन त्याच्या खोलीत गेला आणि त्याच्या 'नवनीता'च्या पुस्तकांत ती घालून ठेवून तसाच परत आला. मराठीच्या समया (period) ला त्याला ती चिठ्ठी सांपडेल व संध्याकाळच्या आंत आपल्याला तो येऊन भेटेल अशी याला आशा होती. पण त्याची ही आशा कधींच सफळ झाली नाही.

त्याला काय माहीत की चिठी नागेशला कधीं पोहोचलीच नाहीं? नागेशच्या खोलीत राहणाऱ्या हरीने सहज पाहण्याकरितां म्हणून नागेशचे नवनीत घेतले आणि आपल्या नेहमीच्या निष्काळजीपणाला अनुसरून तो ते बागेत विसरून आला. आपले नवनीत कोणी पळविले म्हणून नागेशने दोनतीन दिवस त्याचा तपास केला. आणि अखेर ते कोणीतरी कायमचेच लांबविले असे समजून त्याने त्याचा नाद सोडून दिला.

पण बिचारा नागेश! मोहनशी भांडण झाल्यामुळे आपला एक सच्चा, व आनंदी मित्र दुरावला हे त्याच्या मनाला लागलें नाही असे नाही. प्रभाकर, मनोहर, भार्गव इत्यादि सर्व मित्रांनाहि नागेशचे करणे आवडले नाही आणि त्यामुळे त्यांच्या वागण्यांतहि पूर्वीचा मोकळेपणा नाहीसा झाला. पण काही झाले तरी आपण होऊन मोहनशी मिटते घेणे त्याला रुचेना, नव्हे त्यांत भासत असलेला अपमान त्याच्या मनाला सहन होईना. वर्गात, वसतिगृहात, सभामंडपात किंवा क्रीडांगणावर त्यांच्या गाठी पडत. पण त्या प्रत्येक वेळीं दुसऱ्याच्या अस्तित्वाचीहि आपल्याला जाणीव नाही अशी बतावणी त्यांना जाणूनबुजून करावी लागे. प्रत्यक्ष दिसणाऱ्या सर्व वस्तु मिथ्या असे समजणाऱ्या योग्याप्रमाणे आपला एक जिवलग मित्र शेजारी आहे याची पूर्ण जाणीव असतांहि तो आपला मित्र नाही अशी आपल्या मनाची समजूत करणे त्यांना काही कमी जड गेले नाही! दृष्टि किंचित् अंतर्मुख करून स्वतःचे दोष नम्रपणे पाहण्याचा प्रयत्न जर मनुष्य करील तर दुसऱ्याच्या राईएवढ्या दोषाचे पर्वत उभारण्याची त्याची वृत्ति कमी होईल; आणि सच्च्या मैत्रीचा सात्त्विक आनंद जगांत आजच्याइतका दुर्मिळ राहणार नाही.

# प्रकरण एकविसावें

# बिचारा अरविंद !

**" एकस्य दुःखस्य न यावदन्तं गच्छाम्यहं पारमिवार्णस्य ।**
**तावद्द्वितीयं समुपस्थितं मे छिद्रेष्वनर्था बहुलीभवन्ति ॥ "**

गतवर्षीच्या चित्रकलाप्रदर्शनांत हिमालयाच्या गौरीशंकराचें फारच मनोरम चित्र एका चित्रकाराने मांडले होते. बर्फाने आच्छादिलेले शिखर सूर्याच्या प्रखर किरणात स्फटिकासारखे चकाकत होतें आणि लांबवर पसरलेल्या निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर तर ते फारच खुलून दिसत होते. एकीकडून त्या उंच जवळजवळ उभ्या तुटलेल्या कड्यावरून दोन भाविक यात्रेकरू त्या रमणीय शिखराकडे दृष्टि लावून हातातील काठी टेकीत टेकीत मोठ्या कष्टाने चढत होते. प्रवासाचे कष्ट, अंतःकरणातील श्रद्धा, गौरीशंकराचें दर्शन झाल्या-मुळे आपल्या प्रयत्नाना आलेले यश पाहून वाटणारे समाधान इत्यादि अनेक मनोविकार त्याच्या मुद्रेवर स्पष्टपणे प्रतिबिंबित झाले होते. कड्याच्या दुसऱ्या बाजूने एक हरिण बेफिकीरपणे लांब लांब उड्या मारीत एकीमागून एक टेकड्या भराभर उतरत चाललें होते. कष्टाचे किंवा काळजीचे एकहि चिन्ह त्याच्या मुद्रेवर दिसत नव्हते. उड्या मारीत उतरण्याचा आनंद त्याच्या प्रत्येक पावलांत ओतप्रोत भरलेला होता.

शिखरावर चढण्याचा मार्ग नेहमीच कष्टाचा असतो. खाली घसरतांना कष्ट तर वाटत नाहीतच, उलट पुष्कळ वेळां एक प्रकारचा उन्मत्त आनंदहि असतो. कष्टाने व परिश्रमाने मोहन एकएक संकटांना मागें सारीत यशोमंदिराचे गौरी-शंकर गांठण्याच्या वाटेवर पुढे पुढेंच चालला होता; अंतःकरणांतील श्रद्धेमुळे त्याला समाधान प्राप्त झालें होतें. समाधानामुळें संयम, संयमामुळे दीर्घ दृष्टि, दीर्घ दृष्टीमुळे सद्भाव आणि सद्भावामुळें शांति अशा पायऱ्या पायऱ्यांनी तो उन्नतीचा मार्ग आक्रमीत चालला होता; तर बिचारा नागेश भराभर उड्या मारीत अंधःकार आणि निराशेच्या खोल दरींत जाऊन पडण्याच्या बेतांत आला होता.

अलीकडे मोहनची अखंड निंदा करण्याचेच काम नागेशने पत्करिले होतें, त्याच्या सरळ वर्तनांतहि त्याला वक्रता दिसत होती आणि त्याबद्दल स्वतःचा तिरस्कार व्यक्त करण्याची एकहि संधि तो वायां जाऊं देत नसे; पण तरीहि अंतःकरणांत त्याला मोहनबद्दल प्रेम वाटत होते. आपल्या मैत्रीच्या सुखाच्या दिवसाची आठवण होऊन त्याला वाईट वाटत होतें.

खरी गोष्ट अशी होती की, मोहनबद्दल त्याला प्रेम वाटे; त्याच्या सद्गुणांबद्दल त्याला आदर होता; पण ह्या सर्वांच्या बुडाशीं मोहनबद्दल त्याला एक प्रकारची असूया वाटे. ज्याने त्यानें मोहनला चांगले म्हणावे हें त्याला खपत नसे. मोहन, प्रभाकर आणि मनोहर यांची मैत्री फार गाढ होत चालली आहे, आपल्याशी ते थोडेसे रूक्षपणानें वागतात, असे त्याच्या मनाने घेतले होते. मोहनचें व त्याचे पटत होते तोपर्यंत ह्या भावना दडपून ठेवणे त्याला शक्य होते; पण आता त्याच्याशी उघड भांडण झाल्यामुळे ह्या सूक्ष्म भावनांना पाळेमुळें फुटून त्यांचा प्रचंड वृक्ष होऊं लागला होता. त्याला आपली चूक दिसत नव्हती. आपल्या मित्राविषयीं आपण जाणूनबुजून हट्टाने गैरसमज करून घेत आहोत हे त्याला पटत नव्हतें; त्याच्याविषयीं इतरांचें मन कलुषित करण्याचा आपला प्रयत्न अन्यायाचा आहे हे त्याच्या लक्षात येत नव्हतें. पण ह्या सर्वांचा परिणाम इतकाच झाला की, त्याचे पूर्वीचे पुष्कळसे मित्र त्याला अंतरले. भार्गवसारखीहि मुले त्याच्याशी नीट बोलेनाशी झाली, अर्थात् नवीन मित्र जोडणे त्याला भाग पडले, आणि दुर्दैवाने त्याने जोडलेले नवीन मित्र सगळेच चांगले होते असे नाही.

नागेशशी भांडण झाल्यामुळे मोहनच्या मनालाहि रुखरुख लागे; पण अभ्यासाच्या नादांत आणि परीक्षात व क्रीडांगणावर मिळत असलेल्या यशाच्या आनंदात तो ती लवकरच विसरून जाई. निष्पाप अंतःकरण, तारुण्याचा जोम आणि प्रभाकरासारख्या थोर मनाच्या मित्रांचा सहवास यांमुळे मोहनचे हे दिवस आनंदांत जात असत.

पण म्हणून मोहनलाहि कांहींच काळजी नव्हती किंवा विद्यार्थ्यांच्या कारस्थानांमुळें त्याला कांहींच त्रास झाला नाहीं असे नव्हे; आणि त्याला सर्वांत जास्त त्रास झाला तो त्याच्या संरक्षित मुलुखाच्या बाबतींत—अरविंदाच्या

संबंधी. बाळू जनार्दन आणि कंपनीच्या कचाट्यांतून त्यानें त्याची सोडवणुक केल्यापासून अरविंदाच्या हृदयातील नाहीशा होऊं पाहणाऱ्या कोमल अंकुरांना पुनः जीवन मिळाले होतें. आणि त्याच्या मुद्रेवर पूर्वीपेक्षां पुष्कळ टवटवी दिसूं लागली होती.

पण आपल्या कंपूंत शिरूं पाहणारा एक होतकरू उमेदवार, अडीअडचणीच्या प्रसंगीं आपणांस उपयोगी पडणारे एक खेळणें अशा तऱ्हेने मोहनने हिसकावून घ्यावें ही गोष्ट त्या वीरशिरोमणींना रुचणारी नव्हती. मोहनच्या देखत अरविंदला त्रास देण्याची त्यांची छाती नव्हती; पण त्याच्या गैरहजेरीत त्याना बारा वाटा मोकळ्या मिळत. मनोहरखेरीज त्यांच्या खोलीतील दुसऱ्या कोणत्याहि मुलाची त्याच्या आड येण्याची छाती नव्हती; आणि मनोहरच्या अंगी मोहनचे नैतिक सामर्थ्य नसल्यामुळे त्याची त्यांना तितकीशी पर्वाहि वाटत नसे.

आजसुद्धा असेंच झाले. दोन तीन दिवसांपूर्वी क्रिकेटमध्ये मोहनच्या पायाला चेंडु असा सणसणून लागला होता कीं, त्याचा गुडघा फुटून त्यांतून रक्त वाहूं लागले आणि नाइलाजास्तव त्याची रवानगी रुग्णालयात करण्यांत आली. त्याच्या वेदना लवकरच थाबल्या; पण त्याला विश्रांतीची आवश्यकता होती. म्हणून डॉक्टरनें त्याला आपल्या खोलीत राहण्यास जाण्यास परवानगी दिली नाही. वर्गापुरते शाळेत जाऊन बाकीचा सर्व वेळ त्याला रुग्णालयांतच बसून राहावे लागे. ह्या त्याच्या गैरहजेरीचा फायदा घेऊन अरविंदवर मागला सूड उगविण्याचा उद्योग दहा नंबरच्या खोलींतील टवाळखोरांनी केला नसता तर त्यांच्या नांवाला कलंक लागला असता. पण त्याच्या छळांनी भेदरून जाण्याला अरविंद आतां पूर्वीचा अरविंद राहिला नव्हता. मोहन आणि प्रभाकराच्या सहवासामुळें पूर्वीपेक्षा तो आता पुष्कळच धीट झाला होता. निदान भीतीला वश होऊन स्वतःचा प्रामाणिकपणा सोडण्याइतका तो कमकुवत खास राहिला नव्हता.

अरविंद रात्री अभ्यासास बसला असतांना दिवा मालवून टाकणें, त्याचीं पुस्तकें लपविणे, त्याच्या अंगावर पाणी उडविणें यांसारख्या प्रकारांना लवकरच सुरुवात झाली. बागेंतील बारीक वाळूचे दगड खिशांत भरून आणून त्यांचा अचुक नेम धरून अरविंदच्या पाठीवरहि मधून मधून वर्षाव होऊं लागला.

दुसरे दिवशीं वर्गातील अभ्यास अरविंदचे झाले नाहीत. सकाळीं उठल्यावरहि त्याच्या तोंड धुवावयाच्या पाण्यांत माती कालवून ठेवणे यासारखे प्रकार घडल्यामुळे सकाळच्या प्रार्थनेलाहि जाण्यास त्याला उशीर झाला. मनोहर शांतारामाच्या खोलीत अभ्यासास जात असल्यामुळे ह्या छळाची हकीकत त्याला पहिले दिवशीं समजली नाहीं. पण दुसरेंहि दिवशीं अरविंदला उशीर झाल्यामुळे त्याने सर्व प्रकार ताडला. बाळू आणि जनार्दन यांची त्याने आपल्या पद्धतीला अनुसरून चांगलीच कानउघडाणी केली. व हे प्रकार ताबड-तोब बंद झाले नाहीत तर मी मंत्र्याकडे तक्रार करीन म्हणून त्याना धमकी देण्यासहि त्याने कमी केले नाहीं. सातव्या इयत्तेतील एखाद्या जबाबदार मंत्र्याकडे तक्रार करून ह्या दुष्ट मुलाचा बंदोबस्त अरविंदलाहि करता आला असता. पण अशी तक्रार करण्याचें धैर्य अरविंदचे अंगीं नाहीं हें त्याना पक्केपणीं माहीत होतें. मनोहरचा फुलपाखरासारखा अस्थिर स्वभाव त्याना पुरा माहीत होता व त्याने घातलेला धाक तो कृतींत आणीलच याची त्याना शक्यता दिसत नव्हती. म्हणून एक दोन दिवस जरा शांतपणा धरून त्यांनी आपला उद्योग पुनः सुरू केला.

दुसऱ्याचा छळ करण्यात मनुष्याला आनंद का वाटावा ? निर्दयपणा हा त्याच्या स्वभावांत उपजतच आहे काय ? मनुष्याची वृत्ति स्वभावतः स्वार्थी आहे. स्वतःच्या क्षुल्लक स्वार्थापुढे दुसऱ्याचे हित, प्रेम, काळजी याचा बळी देण्यास मनुष्य पुष्कळ वेळा तयार होतो हे खरे आहे. पण केवळ करमणुक म्हणून–गमतीखातर–दुसऱ्याचा छळ करण्यात त्याच्या अंतःकरणाला समाधान कां वाटावें ? अरविंदाचे कोंवळें वय, त्याची निष्पाप मुद्रा, सभ्यपणाची निरु-पद्रवी वागणुक व त्याच्या डोळ्यांत विलसणारा मधुर सद्भाव पाहून त्याचे-विषयीं कोणालाहि जिव्हाळ्याचे प्रेम वाटूं लागले असते; पण त्याच्या त्या सुंदर मुद्रेवर त्याचा निर्दय छळ करून उत्पन्न होणाऱ्या दुःखाच्या रेषा पाहूनच जनार्दन बाळूसारख्या मुलांचे समाधान कां व्हावे ?

आणि ह्याचे प्रत्यंतर त्या रात्रींच आलें. निजण्याची घंटा केव्हाच होऊन गेली होती, आणि दिवसभर केलेल्या श्रमांमुळे थकून गेलेली लहान लहान मुले केव्हांच झोपी गेली होती. इतक्यांत अरविंद एकाएकी मोठ्याने किंचाळूं लागला.

"काय रे, अरविंद, काय झालें ?" अरविंदचें भयंकर किंकाळणे ऐकतांच मनोहर उठला आणि त्याच्या खाटेकडे जाऊं लागला. पुढें पाऊल टाकतांच त्याच्या पायाला दोरीचा एक हिसका बसला आणि त्याच क्षणी सर्व प्रकार त्याच्या चटकन ध्यानांत आला. जनार्दन आणि बाळू यांनी त्याच्या पायाच्या अंगठ्याला दोरी बांधली होती आणि आपल्या खाटेवर निजल्या निजल्या ते ती ओढीत होते. चेष्टेचा हा प्रकार काही नवीन नव्हता. पण अरविंदसारख्या लहान मुलावर हा प्रयोग जनार्दनने करावा हे पाहतांच मनोहरला फार राग आला. त्यानें दोरी जोरानें ओढून घेतली आणि खिशातून चाकू काढून ती तटकन तोडून टाकली.

"याद राखून ठेवा! पुनः तर असली चेष्टा करा तुम्ही!" जनार्दन व बाळू यांना उद्देशून तो म्हणाला. आपला प्रयोग पुष्कळच यशस्वी झाला हें पाहून त्यांना समाधान वाटत होतें आणि त्या निर्दय आनंदांत मनोहरकडे पाहून मिस्किलपणे ते हंसत होते.

"रेड्यासारखा माजला आहेस म्हणून मी तुला भिणार नाही समजलास. अगदी हलकट गाढव आहात तुम्ही." मनोहर रागाने दांतओठ खात म्हणाला.

"कसला गोधळ माजविला आहेस, डुल्या?" नाना अर्धवट झोपेतच म्हणाला.

"गोधळ ! हे रेडे पहाना. त्या बिचाऱ्या अरविंदला खोडा घालीत होते." खोडा घालणे हा त्यांच्या शालेय कोशांतला एक पारिभाषिक शब्द होता.

"अरविंदला ! लाज नाही वाटत त्या बारक्या मुलाच्या वाटेस जायला !" किसन चिडून म्हणाला. कारण मोहन व मनोहर यांच्या सहवासामुळे ते दोघेहि आतां पुष्कळच बरे वागूं लागले होते आणि लहान मुलाच्या चेष्टा करणाऱ्या जनार्दन बाळू यांचा त्यांना तिरस्कार वाटूं लागला होता.

"तोंड संभाळून बोला अं. ऐसे लंबे करून टाकीन एकेकाला—" जनार्दन हातवारे करीत म्हणाला.

"अरे जा, तुझ्यासारखे कैक पाहिले आहेत. आम्हांला वाटेल ते आम्ही बोलणार. मी पुनः म्हणतों की, त्या बारक्या मुलाला त्रास देणारा तूं अगदीं निर्लज्ज रेडा आहेस. तो तुझ्या वाटेस गेला होता कां कधी ?"

"तुझें तोंड फारच चुरचुरूं लागले आहे. थाब ते आताच बंद करतों" असे म्हणून शेजारची वहाण उचलून जनार्दन नानाच्या अंगावर धांवला.

"त्याला हात तर लाव, मी आणि हा किसन मिळून तुला चोपून काढूं." मनोहर मध्यें पडत म्हणाला, "आणि अतू, तूं मध्ये पडणार नाहीसना ?"

"मी ! मराना लेको, मला येत आहे झोप." अंतूने निजल्यानिजल्याच उत्तर दिले.

"जाऊं दे रे, जनार्दन," बाळू त्याला मागे ओढीत म्हणाला, "त्याच्या धमक्यांना काय भीक घालावयाची आहे? नीज आतां; उशीर झाला."

"जाते रहो-बागडीखान," मनोहरने उत्तर दिले. 'तुला मात्र आम्ही कोणीच भीक घालणार नाही. आणि आमच्या वाटेस जाण्याची तुझी हिमत नाही हे तुलाहि माहीत आहेच. काचेच्या बांगड्याचा आवाज पुष्कळ मोठा होतो, पण हात लावायचाच अवकाश की, लागलीच पिचून जातात त्या." इतके बोलून मनोहर अरविंदच्या खाटेकडे गेला. त्याच्या पायाच्या आंगठ्याला दोराचा बराच घट्ट करकोचा पडला होता; आणि त्याच्या दुःखाने व एकाएकी झालेल्या झोपमोडीने व भीतीच्या धक्क्याने त्याला अजूनहि मधून मधून रडूं येत होते.

"पाय फार दुखतो कां ? आतां नीज तूं. पुनः तुझ्या वाटेस ते जाणार नाहीत." मनोहर त्याचे सांत्वन करूं लागला.

"नाही तरी हे दोघे फारच त्रास देतात आतांशा." आपले अश्रू आवरीत अरविंद म्हणाला. "आज मोहन असावयाला पाहिजे होता नाहीं येथें ?"

"एकदोन दिवसांतच येईल तो. त्याचा पाय आता बरा होत आला आहे. पुनः तर तुझ्या वाटेस जाऊं दे यांना, मी ताबडतोब श्रीकांताला जाऊन सांगेन."

"मग पळ तर अगोदर, आतांच जा." जनार्दन वेडेवांकडे हेल काढीत त्याला वेडावीत म्हणाला. "आत्तांच जा, नाहींतर उद्यां सकाळीं एखादी माशी शिकायची."

"समजेल. जेव्हां का छड्या बसतील तेव्हां समजेल माशी शिकते कां—" मनोहरनें उत्तर दिले.

" अरे जा. श्रीकांताचा बाप आकाशांतून उतरायला पाहिजे मला छड्या मारायला." जनार्दनने तिरस्काराने मान वेळीत उत्तर दिलें. " आचार्य रत्नाकरांची नाहीं छाती मला हात लावायची, माहीत आहे ! "

" अस्से काय ? हं..."

" थांब, तुझे ' अस्सें काय ' काढतो आत्तांच. " असे म्हणून जनार्दन अंथरुणातून उठून मनोहरकडे जाऊं लागला. पण अंतूने पुनः मध्ये पडून त्याला अडवलें आणि तो म्हणाला,

" अजून तुमची भाडणाची हौस पुरी झाली नाहीं काय ? आम्हाला निजूं द्याना स्वस्थ जरा."

जनार्दन निजला आणि मनोहरहि अरविंदाशी आणखी एकदोन सांत्वनपर शब्द बोलून आपल्या खाटेवर गेला. त्यांना थोडक्याच वेळांत झोप लागली. पण दुःखाने व भीतीने तळमळत अरविंद पुष्कळ वेळ जागाच होता. मधून मधून त्याला झोप लागली तरी ' खोडा घातल्याची 'च त्याला स्वप्नें पडत आणि पुनः पुनः दचकून तो जागा होई.

दुसऱ्याच दिवसापासून त्या मुलांमध्ये उघड उघड दोन तट पडले. दोनहि पक्षांतील मुले एकमेकांशी सरळ बोलेनात. इतकेच नव्हे तर एकमेकांवर तुटून पडण्याची संधि पाहत रंगण घेणाऱ्या बैलाप्रमाणे एकमेकांवर प्रच्छन्नपणे शब्दांचे वार करीत. नाना आणि किसन उघडपणे जनार्दनचा पक्ष सोडून आपल्या पक्षाला मिळाले याबद्दल मनोहरला आनंद झाला; तितकाच जनार्दनला आपल्या पक्षाचे बळ कमी झाल्याबद्दल विषाद वाटूं लागला, आणि ह्याचे खापर निर्दोषी अरविंदच्या डोक्यावर फोडून त्याचा सूड उगविण्याची तो संधि पाहूं लागला. कोणत्याहि धमक्याना आपण भीक घालणार नाहीं हे दाखविण्याकरिता त्याने मनोहरला उद्देशून सकाळपासून दोन चार वेळा अपशब्द वापरले. आणि वर्गात जाईतोंपर्यंत दोनहि पक्षांमध्ये हळदीघाटच्या युद्धासारखा तुमुल रणसंग्राम होण्याचा प्रसंग कितीतरी वेळां आला. पण अंतू दर खेपेला मध्यें पडला आणि हा भावी अनर्थ टळला; पण तो तात्पुरताच. अरविंदाचा सूड घेण्याची आणि मनोहरच्या चोंबडेपणाबद्दल त्याला अद्दल घडविण्याची संधि जनार्दन पाहत होता आणि तशी संधि त्याला लवकरच मिळाली.

## प्रकरण बाविसावें

# नरपशूंची करामत

> " जिवंत बहु बोलकें किति सुरम्य तें उत्पल
> नरें धरुनि नाशिलें. खचित धन्य बुद्धीबल."
>
> —ना. वा. टिळक

दुसरेच दिवशीं मोहनचा पाय बरा झाला व तो आपल्या खोलींत राहावयाला आला. आपल्या पक्षाचा एक खंदा वीर आल्याबरोबर मनोहर व विशेषतः अरविंद यांस आनंद झाला आणि आतां आपल्या विरुद्ध पक्षाचा पाडाव आपण खात्रीने करूं शकूं अशी त्याना खात्री वाटूं लागली.

पण अरविंदचा सूड घेण्याची आपली प्रतिज्ञा जनार्दन विसरला नव्हता, आणि तो कदाचित् विसरला असला तरी त्याचा हा विसराळूपणा बाळूला चालण्यासारखा नव्हता. अलीकडे अन्याबाच्या हॉटेलात आपले संदेश पोहोचविण्याचे, व आवश्यक मालाचा पुरवठा करण्याचे काम अरविंद करीनासा झाला होता, या गोष्टीचे स्मरण जनार्दनला वारंवार बाळू करून देई. ' मोहन-मनोहरसारख्या कानामागून आलेल्या मुलापुढे तुझे काही चालूं नये काय? ' असा प्रश्न करून तो त्याच्या गर्वाला केंव्हा चालना देई, तर केंव्हा अरविंदाबद्दल व एकंदरींत कातडी बचावणाऱ्या ' साधुड्या ' बद्दल तिरस्कार व्यक्त करून त्याला प्रोत्साहन देई, व अशा अनेक मार्गांनी जनार्दनाच्या मनांतील द्वेषाचा अग्नि त्याने विझूं दिला नाहीं. दोन तीन दिवस जेंव्हा जेंव्हां अरविंदची व त्याची गाठ पडे त्या प्रत्येक वेळीं त्याला भयंकर धमक्या दिल्याशिवाय ते राहिले नाहीत. ह्या पोकळ धमक्या आहेत असे समजून त्यानें तिकडे दुर्लक्ष केले. पण त्या धमक्या खरोखरीच पोकळ ठरणाऱ्या नव्हत्या.

खोडा घालण्याच्या प्रसंगानंतर तिसरे दिवशीं रात्रीं अरविंद शांतपणे झोंपला असतां त्याच्या डोळ्यावर चोरकंदिलाचा प्रखर उजेड कोणींतरी पाडला आणि डोळे दिपल्यामुळें तो एकाएकी जागा झाला.

त्याच्या पायथ्याशीं पांढरा झगा घातलेली एक व्यक्ति बसली होती. तिचे तोंड अगदी विद्रूप, कान लांब उभे व डोळे मोठे व बटबटीत दिसत होते;

आणि तोंडांतून व डोळ्यांतून ज्वाळा निघत आहेत असा भास होत होता. त्याच्या उशाशीहि दुसरे एक असेच भूत उभें होतें आणि आपला मशालीसारखा जळत असलेला हात उगारून त्याच्या छातीवर बसण्याचा त्याचा विचार दिसत होता.

त्याच्या समोरचे हे दृश्य पाहतांच अरविंदच्या तोंडांतून शब्दहि निघेना. भीतीने एक भयंकर किंकाळी त्याने फोडली आणि ताबडतोब प्रेतासारखा पांढरा फटफटीत पडून लागलीच तो बेशुद्ध झाला.

अरविंदाचा तो कर्णकर्कश चीत्कार ऐकताच खोलीतील एकूण एक मुलें घाबरून उठली, आणि अरविंदच्या खाटेकडे धांवत येऊं लागली. मोहन आणि मनोहरहि उठून उभे राहिले. आणि त्याच्या खाटेच्याजवळ उभी असलेली ही भुते पाहून तेहि क्षणभर चकित झाले. कांहीच पूर्व कल्पना नसतांना एकाएकी हे दृश्य पाहताच मोहनला तर कांहींच उलगडा होईना. पण मनोहरला जनार्दनने दिलेल्या धमक्या माहीत होत्या, आणि गेले चार-पाच दिवस त्यांच्या चाललेल्या उद्योगांची त्याला बरीचशी कल्पना होती. म्हणून दुसऱ्याच क्षणीं उडी मारून पायथ्याजवळच्या भुताची त्याने मानगुट घट्ट धरली; त्याच्या तोंडावरचा रंगविलेला मुखवटा काढून टाकला आणि जनार्दनचे आसुरी हास्य विलसत असलेलें मुखकमळ सर्वांच्या दृष्टीस पडलें. अर्थात् त्याच क्षणीं त्याच्या छातीतहि एक गुद्दा ठेवून देण्यास मनोहरने कमी केले नाही.

हा प्रकार पाहतांच मोहनहि सावध झाला होता. रंगविलेल्या चिंध्यांचे मुखवटे आणि फॉस्फरस असलेल्या आगकाड्या यांचा हा सर्व खेळ त्याच्या ध्यानांत आला आणि उशाजवळ असलेल्या दुसऱ्या भुताला खाली पाडून त्याच्या छातीवर तो बसला. पण बाळूची चलाखी त्याच्या अपेक्षेबाहेर होती. आपल्या अंगावरचा मुखवटा व चादरी मोहनच्या तोंडावर फेकून त्याला त्यानें गुरफटून टाकला आणि आपली सुटका करून घेतली.

आपल्या तोंडावरची गुरफटलेली चादर काढून टाकण्याकरितां वेड्यावांकड्या माना करीत मोहन धडपड करीत आहे तोंच मनोहरने भेदरून मारलेली हांक त्याच्या कानावर आली. जनार्दननें टाकून दिलेला चोरकंदील घेऊन मोहन अरविंदाच्या जवळ जातो तोंच त्याचा अगदी निस्तेज झालेला पांढरा फट-

फटीत चेहरा आणि चलनवलनरहित निश्चेष्ट पडलेले त्याचे शरीर पाहून मनोहर घाबरून ओरडला.

" अरे रामा, तो मेला ना ! "

" मेला ! " म्हणून सर्व मुले त्याच्या खाटेभोवतीं गोळा झालीं.

" कसले भेदरट आहात ! तो नुसता बेशुद्ध झाला आहे ! " बाळू घाबऱ्या-घाबऱ्या पुढें सरला आणि अरविंदाकडे पाहत म्हणाला, " मूर्ख आहात तुम्ही, मी त्याला आतां शुद्धीवर आणतो. जनार्दन, थोडे पाणी आण रे. "

" चालते व्हा तुम्ही दोघेहि अगोदर. " मोहन त्याच्या अंगावर ओरडला. " व्हा दूर, आम्हीं आहोत येथे त्याची काळजी घ्यायला. ऐकत नाहीं कां तुम्ही ! " इतके ओरडल्यावरहि ते दोघे तेथून हलत नाहीत हे पाहून त्याने बाळूचा हात धरला आणि लहान मुलासारखा त्याला दूर भिरकावून दिला. " तुम्हीं एक पाऊल पुढे तर टाका की, मी आताच जाऊन श्रीपादरावाना बोलावून आणतो येथे. अरविंद सावध झाला तरी तुम्हाला पाहताच पुन: बेशुद्ध होईल तो ! "

मोहनचा हा रुद्रावतार पाहून ते दोघेहि चकितच झाले व मुकाट्याने बाजूला सरले. मनोहरनें पाणी आणले, नानाने वारा घातला व इतरांनी आपापल्या परीने त्याला सावध करण्याचे उपाय केले. पण त्याच्या या प्राथमिक उपचाराना लवकर यश येण्याचे चिन्ह दिसेना. म्हणून जास्त दिरंगाई न करतां त्याला ताबडतोब रुग्णालयांत पोहोचवावे व जबाबदार डॉक्टरला कळवावें असे मोहनने सुचविले. अशा रीतीने हे प्रकरण शिक्षकांच्या कानी जावे ही गोष्ट जनार्दनला अर्थातच पटणारी नव्हती. प्रथम सौम्य शब्दानी नंतर धाक दाखवूनहि असें न करण्याबद्दल ते दोघे त्याना सांगूं लागले. " तो आता शुद्धीवर येईल. " असेंहि ते म्हणाले. पण त्यांच्या ह्या अर्जविनंत्या आणि धाकदपटशा याना न जुमानताहि मोहन रुग्णालयात जाऊं लागलेला पाहताच त्याच्या वाटेंत आडवे येऊन ते दारांत उभे राहिले. पण अंतू आणि नाना या दोघांनींहि त्यांना तेथून खेचून काढले आणि मोहन व मनोहर बाहेर पडले.

डॉक्टर आले, आणि जरूर ते औषधोपचार करण्याकरितां अरविंदला रुग्णालयांत ताबडतोब नेण्यांत आलें. एकाएकीं बेशुद्ध पडण्यास काय कारण झालें

याची त्यानी साधारण चौकशी केली आणि अरविंद थोड्याच वेळात शुद्धीवर आला. " आतां तुम्ही येथें कशाला थांबतां ? तुम्ही आतां जाऊन निजा. " असे म्हणून त्यानी मुलांना रजा दिली.

मोहन आणि मनोहर खोलीत परत येतात तोंच " काय झाले, डॉक्टर काय म्हणाले? तो शुद्धीवर आला की नाहीं? " वगैरे प्रश्नाचा वर्षाव करीत खोलीत मुलांचा घोळका त्यांचेभोवती जमला. बाळू आणि जनार्दन हेहि प्रश्न विचारीत होतेच. पण त्याच्या प्रश्नाना मोहनने एकच उत्तर दिले:

" याद राखून ठेवा. आजच्या प्रकाराबद्दल उद्या सकाळीच मी श्रीकांताकडे तक्रार नेणार आहें. "

" चांगलाच चहाडबुचका दिसतोस तूं ! " जनार्दनने उत्तर दिले.

" तुझ्यासारख्या रानटी जनावराला शिक्षा झालीच पाहिजे. मग तूं मला चहाडबुचका म्हण की काय वाटेल तें म्हण. त्याशिवाय तुमची खोडकी जिरणार नाहीं. आज अरविंद बेशुद्ध झाला, उद्या एखाद्याचा प्राणसुद्धा घ्याल तुम्ही. "

" तूं श्रीकांताकडे तक्रार कर तर खरा म्हणजे दाखवतो काय आहे ते, " अर्थपूर्ण हातवारे करीत जनार्दनने उत्तर केले.

" अरे तुझ्यासारखे कैक पाहिले आहेत. "

सकाळी उठताच मुख्य मंत्री श्रीकांत यांचेकडे कालच्या प्रकाराची रीतसर तक्रार करण्याचा मोहनचा निश्चय झाला होता, आणि मोहन म्हटल्याप्रमाणे करण्यास चुकणार नाहीं याबद्दल जनार्दनची खात्री होती. म्हणून रोजच्या-पेक्षां सकाळी अर्धा तास लवकर तो उठला आणि वाटेल ते करून मोहनला श्रीकांताकडे जाऊं न देण्याचा त्याने निश्चय केला. आपला उद्योग आतां इतका लोकविश्रुत झाला होता की, मोहनने रीतसर तक्रार करण्याची आवश्यकताच उरली नव्हती हे त्याच्या लक्षांत आले नाहीं. मोहनला थांबविण्याच्या भरात आपल्या अपराधाला अधिक भयंकर स्वरूप येत आहे हे कळण्या-इतका तो भानावरहि नव्हता.

मोहन जागा होतांच त्याच्या खाटेजवळ बाळू व जनार्दन जाऊन उभे राहिले. जनार्दनच्या हातांत असलेला कातडी पट्टा पाहून त्याचा हेतु पूर्ण-पणें मोहनच्या लक्षात आला.

" बोल, तूं माझी चहाडी करणार आहेस का ? " जनार्दननें कार्यक्रमास सुरुवात केली.

" चहाडी ! छे मुळींच नाहीं—शाळेच्या मुख्य मंत्र्याकडे रीतसर तक्रार नेणार आहे. "

" अस्से. माझी चहाडी केल्याबद्दलचे बक्षीस मी तुला आधींच देऊन ठेवतो. तुझ्यासारख्या चहाडबुचक्याच्या उद्योगामुळे मला विद्याश्रमातून घालवून देतील हे माहीत आहे तुला ? "

" मग काय वाईट झाले ! आमच्या खोलीतील एक ब्याद कमी— "

" अस्से काय ! ब्याद कमी करायला पाहिजे तुला ? घे तर. " असे म्हणून हातांतल्या पट्टयाचा एक फटकारा त्याने मोहनच्या पाठीवर ओढला. दुसऱ्याच क्षणी मोहनने झाप घालून त्याच्या हातातील पट्टा हिसकावून घेतला आणि उलट वार केला.

ह्या झटापटीने खोलींतील इतर मुलेंहि उठून बसलीं. एवढ्यावरच हे प्रकरण संपेल असे समजून मोहन आपले अंथरूण गोळा करूं लागला. पण एवढ्यावर संपविण्याची जनार्दनची इच्छा नव्हती. मोहन स्वस्थ उभा राहिलेला पाहतांच त्याने त्याच्या पाठीला विळखा घालून त्याला खालीं पाडला, आणि पंधरा वर्षांचा मोहन आणि सतरा वर्षांचा दांडगा जनार्दन याच्यामध्ये मारामारी सुरू झाली. जनार्दन मोहनला एकावर एक तडाखे त्याच्या शरिराच्या सापडेल त्या भागावर देतच होता आणि मोहनहि मधून मधून संधि पाहून एखादा उलट वार करी. अशीच संधि साधून मोहनने जनार्दनाच्या गालावर असा एक तडाखा दिला की, त्याचा गाल हिरवा-निळा होऊन गेला आणि डोळ्या-पुढे काजवे चमकले. पण इतक्यांत जनार्दनने त्याच्या डोक्यावर गुद्दा मारला त्यामुळें त्याला घेरी आली आणि तो खाली पडला. पडतांना शेजारीच असलेल्या पाण्याच्या बादलीवर त्याचे डोकें आपटले. एक भलीमोठी खोक पडून त्यांतून रक्त वाहूं लागलें आणि ते बादलीतील सांडलेल्या पाण्यांत मिसळून त्या रक्त-मय पाण्याचे लालभडक पाट खोलीभर वाहूं लागले.

ही त्यांची झटापट आणि बादली पडण्याचा आवाज शेजारच्या खोलीत गृहपति श्रीपादराव यांनीं ऐकला आणि काय दंगा चालला आहे हे पाहण्या-

करिता ते खोलीत आले. खोलीतील दृश्य पाहून ते चकितच झाले. रात्रीचे चित्रविचित्र रंगविलेले लांब कानाचे मुखवटे आणि काळा चोरकंदील हे एका कोपऱ्यात पडले होते. रक्तबंबाळ झालेला मोहन आपले डोकें धरून रक्त थांबविण्याचा प्रयत्न करीत खाली बसलेला होता. नाना आणि मनोहर त्याला धरून त्याची शुश्रूषा करीत उभे होते. आपल्या कर्तृत्वाकडे अभिमानाने पाहत जनार्दन उभा होता. बाळूने केंव्हाच पोबारा केला होता आणि आपल्या खाटेवर जाऊन पांघरूण घेऊन बनावट झोपेचे सोंग खरे भासविण्याकरिता नेहमीपेक्षांहि मोठमोठ्याने घोरत आपल्या खाटेवर पडला होता. आणि खोलीतील सर्व वस्तु अस्ताव्यस्त पसरून जाऊन रक्तमय पाण्यात भिजत होत्या.

"काय हे, मोहन, काय दंगा आहे ?" श्रीपादरावांनीं आश्चर्याने विचारले. मोहनच्या डोळ्यापुढे सर्व खोली गरगर फिरत होती. उत्तर देण्यासारख्या परिस्थितीत तो मुळींच नव्हता. पण उत्तराची जरूरहि नव्हती. खोलीतील परिस्थिति पाहतांच सर्व प्रकार कोणाच्याहि ध्यानीं येण्यासारखा होता.

"हे तुझे काम दिसते आहे?" जनार्दनकडे वळून श्रीपादरावांनी प्रश्न केला.

"त्यांनींच मला आधीं मारले," स्वतःचे निरपराधित्व सिद्ध करण्याचा जनार्दनने प्रयत्न केला.

"गाढव ! वर खोटे बोलतोस का पुनः ?" मनोहरने रागाने उत्तर दिलें.

"गप बैस रे, माझ्या देखत असल्या शिव्या मी देऊं देणार नाहीं. आणखी तुम्हीं काय करीत होता ? तूं अंतू, तूं काय करीत होतास ! येवढ्याशा लहान मुलाला जनार्दनने मारले तर तुम्हाला मध्यें पडतां येत नव्हतें ?"

"तो काय आम्हाला ऐकतो आहे थोडाच ?" अंतूने उत्तर दिलें. "आणि तुम्ही ह्या दोघाना दुसऱ्या खोलीत घाला. हा आणि बाळू त्या अरविंदाला नेहमी त्रास देतात आणि त्याच्यावरूनच हे आता भांडण चाललें होते."

"होय रे, जनार्दन ? नाही तरी तूं आतांशा फारच उनाड होत चालला आहेस. आजच तुम्हांला दोघांना मी दुसऱ्या खोलींत घालणार आहे आणि एखाद्या मंत्र्याला तुमच्याकडे नजर ठेवायला सांगणार आहें, म्हणजे तरी जरा नीट वागाल तुम्हीं. अन् आजच्या ह्या मारामारीबद्दल एक महिनाभर रोज शंभर आर्या तूं लिहून दाखवीत जा."

ते परत जाणार तोंच त्यांची नजर मोहनकडे गेली. " अरेरे, मोहन, तुला बरेंच लागलेले दिसते. मनोहर, त्याला रुग्णालयात घेऊन जा आणि कांहीतरी औषध लाव. "

मनोहर आणि नाना उठले आणि दोघांनी मिळून मोहनला रुग्णालयात नेला. त्याला जनार्दनचे तडाखे कांही फारसे लागले नव्हते, पण बादलीमुळे झालेली खोक बरीच मोठी होती आणि आठदहा दिवस तरी त्याला विश्रांति घ्यावी लागेल, असे डॉक्टरांचे म्हणणें पडलें.

त्याला रुग्णालयात पोहचवून मनोहर खोलीत परत येतांच म्हणाला, " आणि हे पहा, जनार्दन, मोहनला खोक पडली म्हणून तूं सुटशील असे समजूं नकोस. मी जाऊन श्रीकांताला सांगेन आणि अरविंदला मरे मरेतों छळल्याबद्दल तुला चांगला अर्धामेला करवीन. काय समजलास ! "

" अरे जा रे ! मला श्रीपादरावांनीं एकदां शिक्षा केलीच आहे. पुनः पुनः काय तीनतीनदा शिक्षा होते काय ? "

"बच्चंजी! इतक्या थोडक्यावर तुला सुटून जाऊं देणार नाही मी. याद राख!"

" कसली चहाडबुचक्यांची अवलाद! एक दिवस तुझी मस्ती जिरवीन मी." जनार्दन गुरगुरला.

मनोहर त्याची पोकळ धमकी ऐकून तिरस्काराने हंसला; आणि अंतु म्हणाला, " मी सुद्धा सगळ्या विद्याश्रमांत जाऊन सांगेन कसला बायकी शूर आहेस तूं ते. "

" विद्याश्रमांतील सगळीच मुले तुझ्यासारखीं नाजूक नार नाहीत," जनार्दनने उत्तर दिले.

" नाजूक नार म्हण की साजूक वार म्हण " नानाने पुरवणी जोडली. "पण असल्या एका नाजूक मुलाने कसा साजूक वार उडवून दिला आहे ते तुझा हिरवा-निळा गाल सांगतो आहेना. मोहन तुझ्या गुडघ्याएवढा सुद्धां नाहीं."

" जाऊं दे. कशाला थोडक्याकरितां भांडतोस!" मनोहर त्याला दाबीत म्हणाला. " आज ही पीडा एकदांची आपल्या खोलीतून टळणार आहे. साखर वांटली पाहिजे आज त्याकरिता. "

---

# प्रकरण तेविसावें

## विद्यार्थ्यांचें स्वराज्य-बंडाचें निशाण

**यद्यपि तरणेः किरणैः सकलमिदं विश्वमुज्ज्वलं विदधे ।
तदपि न पश्यति घूकः पुराकृतं भुज्यते कर्म ॥**

एखादी संस्था पूर्वीपासून चालत आलेली असली तरी एखादा मनुष्य आपल्या दीर्घदर्शी धोरणामुळे तिला असें परिणामकारक वळण देतो की त्या संस्थेवर तो आपला छाप कायमचा मारून ठेवतो. व्यासविद्याश्रमांतील विद्यार्थ्यांच्या स्वराज्याचेंहि असेंच झालें होतें. पुष्कळ दिवसापासून ती संस्था अस्तित्वांत होती, पण आचार्य रत्नाकर यानी त्याला जें इष्ट वळण दिले त्यामुळे व्यासविद्याश्रमातील शिक्षणपद्धतीचें विद्यार्थ्यांचे स्वराज्य हें एक महत्त्वाचे अंग समजले जाऊं लागलें, आणि तेथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विचारसरणींत घडून आलेली क्रांति त्याच्या आयुष्यांतील सर्व व्यासंगांत व उद्योगात दिसून येऊं शकली.

विद्यार्थ्यांच्या स्वराज्याचें आज दिसणारें स्वरूप त्याला प्रथम नव्हतें आणि तें त्याला एकाएकी प्राप्त झालेलेंहि नाही. राखीव आणि सोपीव खात्याचा वाद, विद्यार्थ्यांना दिलेल्या अधिकाराचा दुरुपयोग आणि पक्षभेद व पक्षद्वेष यांच्यामुळे मुलाच्या छोट्या समाजात उद्भवणारी प्रचंड वादळें या सर्व पायऱ्यावरून उत्क्रांति होत होत त्याला हल्लीचे स्वरूप प्राप्त झालेले होतें. मंत्रिमंडळांतील सभासदाची व त्याच्या अध्यक्षाची निवडणूक करण्याचा अधिकार प्रथम देण्यात आला त्या दिवशीं फूटबॉल व क्रिकेटमधील उत्कृष्ट खेळाडूंचाच भरणा मंत्रिमंडळांत झालेला पाहून पुष्कळांना आश्चर्य वाटलें; आणि त्यानंतर कांहीं वर्षं तर आपल्या पक्षाचें बहुमत मंत्रिमंडळांत घडवून आणण्याकरितां विद्यार्थिवर्गांतील निरनिराळ्या तटांनीं जीं अनेक कारस्थाने केली तीं पुष्कळांच्या स्मरणांत अद्यापिहि आहेत. आचार्य रत्नाकर व्यासविद्याश्रमात आले त्या वेळीं विद्यार्थ्यांच्या स्वराज्याचें तारू अशा तऱ्हेनें खाजगी द्वेषाच्या वावटळींत सांपडून बुडूं लागलेले होतें. सामाजिक जबाबदारीची जाणीव किंवा

निरपेक्षपणे कर्तव्य पार पाडण्याची धमक उत्पन्न होण्याऐवजीं मुलाच्या क्षणिक मनोवृत्तींना चालना देऊन लोकप्रिय होऊं इच्छिणाऱ्या मुलांना महत्त्व येऊं लागलें होते, आणि विद्याश्रमाबद्दल आपलेपणा उत्पन्न होण्याऐवजी सर्वांचें काम ते कोणाचेच काम नाही अशी स्थिति आली होती.

आचार्य रत्नाकर यांनी आल्याबरोबर प्रथम महत्त्वाची सुधारणा केली ती ही की बहुमताने मंत्रिमंडळ निवडण्याची पद्धति त्यांनी बंद केली. सातव्या इयत्तेतील सर्व विद्यार्थ्यांना मंत्रिमंडळात दाखल केलें आणि विद्याश्रमांतील वास्तव्य व इतर गुण पाहून त्याच्यांतील योग्य विद्यार्थ्याला ते अध्यक्ष नेमूं लागले. निवडणुकीचे महत्त्वाचे समजले जाणारे अधिकार त्यांनीं काढून घेतले खरे, पण मंत्र्यांची सत्ता व त्यांचेवरील जबाबदारी यात त्यांनीं पुष्कळच वाढ केली. स्वतःच्या विशिष्ट अधिकाराचा उपयोग ते क्वचित्‌च करीत असत आणि त्यामुळे मंत्र्यांना खरी सत्ता उपभोगावयास मिळे; चुका करून त्या निस्तरल्याचें समाधानहि त्याना लाभूं शके. शिक्षकांचा कल पाहून त्या अनुरोधाने वागण्याची मंत्र्यांची पूर्वीची प्रवृत्ति कमी झाली व त्याचेबरोबर सामान्य विद्यार्थिसमाजाचेहि लक्ष निवडणुकीच्या पोकळ बखेड्यांतून निघून अधिक उपयुक्त विषयांकडे वळलें. विद्याश्रमातील शिस्त व त्याचा लौकिक याबद्दल विद्यार्थ्यांमध्ये आपले-पणा उत्पन्न झाला व सामुदायिक जबाबदारीचें वातावरण हळूहळू पण निश्चितपणे उत्पन्न होऊं लागले. मुख्य मंत्री श्रीकात याचेजवळ फिर्याद दाखल करण्याचा धाक मोहनने घालतांच जनार्दनसारख्या निढावलेल्या गुंडाची सुद्धां कशी गाळण उडाली हें पाहिलें म्हणजे आचार्य रत्नाकर यांचें धोरण किती दूरदर्शीपणाचे होते हें उघड होतें.

दुसरे दिवशी सकाळींच मोहन व अरविंद यांची चौकशी करण्याकरितां प्रभाकर रुग्णालयांत आला. एका खाटेवर अरविंद अर्धवट झोपेंत निजला होता. मधून मधून रात्रीचा प्रकार त्याच्या डोळ्यांपुढे दिसे आणि तो घाबरून ओरडे. त्याच्या उशाशीं मोहन गहन विचारांत गर्क होऊन बसला होता.

मनुष्यप्राण्याच्या निर्दय हृदयाचें आणि दुष्ट प्रवृत्तींचें दृश्य फळ आज त्याचे डोळ्यांसमोर दिसत होतें. छोट्या अरविंदाचे कोमल अंतःकरण आणि इतर सद्गुण यांचा परिचय त्याच्याशिवाय दुसऱ्या कोणालाहि झाला नव्हता, आणि

आज दोन आडदांड पशूंनी स्वतःची आसुरी लहर तृप्त करण्याकरिता त्याच्या सर्व गुणाची माती केली होती. कदाचित् त्याचे जन्माचे नुकसान होण्याचा संभव होता. कारण 'त्याच्या मेंदूवर कायमचा परिणाम होण्याचा संभव आहे ' अशा अर्थाचे गर्भित उद्गार अरविंदाची बडबड ऐकून डॉक्टरानीं काढलेले त्याच्या कानावर आले होते. खरोखरच त्याला वेड लागले काय? काही मुलांची मने ईश्वराने इतकी निर्दय का केली ? या विचारानीं मोहनच्या हृदयात काहूर उठविले होते.

प्रभाकराने अगदी आवाज केल्याशिवाय दार उघडले आणि पाऊलहि न वाजविता तो त्याच्या खाटेजवळ येऊन उभा राहिला. मोहनने त्याला पाहताच किंचित् हसून त्याचे स्वागत केले.

" अरेच्या, मोहन, अगदी रक्तबंबाळ झाला आहेस की!"

" चालायचेच. काही उगीचच्या उगीच भांडण उकरून काढले होते असे थोडेच! सत्कर्म करताना थोडासा मार खावा लागला तर लागला. "

" आणि अरविंदचे कसे आहे? तो तर अगदीच मलूल होऊन पडला आहे!"

" होय; चांगलाच धक्का बसला आहे त्याला!" मोहन त्या अर्धवट झोपेत असलेल्या पोराकडे पाहत म्हणाला.

" लवकर बरा होवो म्हणजे झाले बिचारा!"

"पण तो लवकर बरा होईल असें चिन्ह नाही. मघाशीच डॉक्टर म्हणत होते की कदाचित् त्याच्या मेंदूवर कायमचा परिणाम होण्याचा संभव आहे." मोहन सहानुभूतीनें म्हणाला. " आपल्याला त्याची चांगलीच काळजी घ्यायला पाहिजे."

" अरेरे, गरीब बिचारा!" त्याच्या अंगावरून हात फिरवीत प्रभाकर म्हणाला.

" डुल्याने श्रीकान्ताकडे जनार्दनची तक्रार नेली का? " मोहनला विचारल्याशिवाय राहवेना.

" विद्याश्रमांतील ताज्या बातम्या ऐकण्याइतकी तुझ्या प्रकृतीची तयारी आहे की नाही कोण जाणे."

" सांगना, जरूर सांग." मोहन उत्सुकतेनें म्हणाला.

" बाकी बातमी कांही चांगली नाहीं आहे. ' विवेकभ्रष्टाना भवति विनिपातः शतमुखः ।' शांतारामांना मी जेव्हां तुझी आणि अरविंदाची हकीकत सांगितली तेव्हां ते सुद्धां असेंच म्हणाले. हो, पण एक सांगायचें राहिलेंच. त्यांनी तुमच्या दोघांच्या प्रकृतीची चौकशी केली आहे, आणि ते स्वतः सुद्धा लवकरच तुझ्या चौकशीला येणार आहेत. "

" त्याचें प्रेम आहेच तसें आमच्यावर. बरें, जनार्दनचें काय पुढें? "

" डुल्या श्रीकान्ताकडे तक्रार नेणार होता. पण सकाळची प्रार्थना संपण्याच्या आतच ही गोष्ट सगळ्या विद्याश्रमांत पसरली. तुमच्या वसतिगृहाचा वामन हा अधिकारी मंत्री आहे. म्हणून त्यानें लागलीच जनार्दनला आपल्या खोलींत बोलाविलें आणि रात्रीच्या आडदांडपणाबद्दल त्याला शिक्षा करूं लागला. पण जनार्दननें त्याची छडी हातांत धरून ठेविली ती सोडीचना. सुदैवानें वामन चिरडीस गेला नाहीं. तो अगदीं शांतपणें म्हणाला, ' ठीक आहे, जनार्दन, तूं जर मुकाट्यानें शिक्षा घेतली असतीस तर त्यांत तुझेंच हित होतें. पण तुझी इच्छा नाहीं; तर मी आतां हें सर्व प्रकरण श्रीकान्ताकडे सोपवतों. माझें काय गेलें, माझ्यावरची तितकीच जबाबदारी कमी.' "

" येवढ्यावर मिटलें कां तें प्रकरण ?"

" बरें मिटेल! सगळ्या विद्यार्थ्यांमध्यें अगदीं खळबळ उडून गेली आहे. हल्लींचे मंत्री विशेषतः श्रीकान्त फारसे लोकप्रिय नाहींत हें तुला माहीत आहेच. शिवाय जनार्दन क्रिकेटचा कॅप्टन आहे म्हणून पुष्कळ मुलें त्याच्या बाजूचीं आहेत. म्हणून चांगलीच गडबड उडणार आतां. मंत्रि-मंडळाची आतांच सभा आहे जनार्दन प्रकरणाचा विचार करण्याकरितां; आणि मला वाटतें इतर मुलेंहि आपल्या बाजूनें बहुमत करण्यास कांहींतरी खटपट करतीलच."

" अजून शिक्षकांच्या कानावर हा प्रकार गेला नाहीं का ? "

" रीतसर तक्रार म्हणून कांही कोणी नेली नाहीं. पण सगळी हकीकत त्यांना समजली आहे यांत शंकाच नाहीं."

" पण बाळू जनार्दन यांच्यासारख्या निढावलेल्या गुंडांची बाजू मुलांनीं उचलून धरावी हें आश्चर्य आहे, नाहीं ? "

" आश्चर्य ! तत्त्वतः तूं म्हणतोस ते खरें आहे. पण मुलांची मतें कशी बनतात हें काय तुला माहीत नाही? पहिल्यांदा जे त्यांच्या कानावर जाईल तेंच ते घेऊन बसतात. आणि मुलाना चिथावणारा आणि तुझा, डुल्याची आणि सगळ्या मंत्र्यांची नालस्ती करणारा आणि जनार्दनची तळी उचलून धरणारा हा वीर कोण आहे असे तुला वाटते?"

" कोण बरे ? " मोहनने एकदम विचारले. पण त्याला उत्तराची अपेक्षाच नव्हती. कारण त्याची खात्री होती की, प्रभाकर उत्तर देणार–

" नागेश. "

मोहनने कांहीच उत्तर दिले नाही कपाळावर आलेला घाम उदासपणे पुसून डोक्यावर हात ठेवून तो स्वस्थ पडून राहिला. प्रभाकरने आणलेल्या बातम्यांमुळे त्याचा मनःक्षोभ थोडासा वाढलाच होता. आणि त्यामुळे त्याला अस्वस्थताहि वाटूं लागली होती.

" इतका त्रास सहन करण्याइतकी तुझी प्रकृति अजून झालेली दिसत नाही. आतां जरा शांत पड तूं. मी जातो आतां. "

" ठीक आहे. पण पुनः ये आणि काय काय होईल ते कळवीत जा."

रुग्णालयांतून प्रभाकर बाहेर पडतो तोंच त्याला सभामंडपांत बरीचशी गडबड चाललेली ऐकूं आली. विद्याश्रमांतील अर्धी अधिक मुलें तेथे जमली होतीं. बहुतेक खालच्या इयत्तांतील बरीचशी आणि पांचवीतील कांही अशी सुमारे शेसवाशे मुलें तेथे जमलीं होती आणि लहान लहान गटांतून वाद-विवाद ऐन रंगांत आला होता. जनार्दनचा अपराध भयंकर होता की नाही, मंत्र्याचें करणे कितपत युक्त आहे इत्यादि विषयांवर जोराची रणे पडत होतीं आणि कोणाचेंच कोणाला नीट ऐकूं जात नव्हते.

" थांबा, थाबा. " पाचवींतील एकदोन मोठी मुले पुढें सरून म्हणालीं. " आपण जरा व्यवस्थित चर्चा करूं. अध्यक्ष कोणाला करावें? "

पुष्कळांनीं नागेशचे नांव सुचविले. हजर असलेल्या मुलांत वरच्या इयत्तेतील बुद्धिमान मुलगा तोच होता. म्हणून एकमताने त्याची अध्यक्षस्थानी योजना झाली. आणि सभामंडपांतील मधल्या उंचवट्यावर चढून त्याने आपल्या अध्यक्षीय भाषणास सुरवात केली.

" जनार्दननें एका मुलाची काल रात्री थोडीशी थट्टा केली म्हणून वामन आज त्याला शिक्षा करणार होता ही हकीकत तुम्हांला माहीतच आहे. जनार्दनने छड्या खाण्याचे नाकारले. आणि म्हणून ह्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां आतां मंत्रिमंडळाची सभा होणार आहे. आतां **माझें** मत असे आहे की, अशी शिक्षा करण्याचा मंत्र्यांना कांहीं अधिकार नाही. आणि ते जर अशा तऱ्हेने स्वतःच्या लहरीप्रमाणे वागूं लागले तर आपणहि त्यांच्या असल्या बेकायदेशीर कृत्यांना अडथळा केला पाहिजे. मूळ प्रकार केवळ थट्टेचा होता. एखाद्या मुलाला बिचकविण्याकरितां सोंग आणून त्याची थोडीशी गंमत केली तर त्यांत काय बिघडले ? केवळ मजेखातर असले प्रकार केलेले आपण नेहमी ऐकतों आणि आपणांपैकीं बहुतेकांनी असलीं सोंगे पाहिलींहि असतील. अर्थात् आजच्या उदाहरणांत त्याचे जे वाईट परिणाम झाले त्याबद्दल कोणालाहि वाईट वाटेल. पण असे परिणाम घडतील याचे आगाऊ काय कोणाला स्वप्न पडले होते? आणि एखाद्या कृत्याचे परिणाम दुर्दैवाने वाईट झाले म्हणून ते कृत्यच वाईट हेतूने केले होते असे ठरविण्याचा कोणालाहि अधिकार नाही. म्हणून माझी अशी सूचना आहे की, मंत्र्यांना ह्या प्रकरणांत मध्ये पडण्याचा कांही हक्क आहे काय असा प्रश्न आपण चर्चेला घ्यावा. "

नागेशचे भाषण संपतांच टाळ्यांचा प्रचंड गजर झाला. विशेषतः एखादे कृत्य आणि त्याचे परिणाम यांचा विभक्तपणें विचार करण्याची त्याची अखेरची सूचना त्या चिमुकल्या जगांत मोठी विद्वत्ताप्रचुर आणि वकिली बाण्याची म्हणून वाखाणली गेली. "अगदी बरोबर", "नागेश पण नागेश आहे," "जनार्दनला मुळींच शिक्षा होता कामा नये" अशा अर्थाचे उद्गार त्या सभागृहात घुमूं लागले

नागेशच्या प्रत्येक शब्दागणिक मनोहरचा क्रोध आणि तिरस्काराचा पारा सारखा चढत होता; आणि नागेश खालीं बसल्याबरोबर लागलीच आवेशाने उडी मारून त्याने बोलण्यास सुरुवात केली. नागेशच्या अभिनंदनार्थ होणाऱ्या टाळ्यांच्या गजरांत त्याचीं पहिलीं कांहीं वाक्ये कशी लुप्त झालीं हे तर कोणाच्या लक्षांतहि आले नाहीं. पण तो बोलूं लागला आहे हें मुलांच्या लक्षांत येतांच विरोध करणारे आवाज सभागृहाच्या कोपऱ्याकोपऱ्यांतून सुरू झाले पण त्यांना नामोहरम होणारा कच्चा वीर काहीं मनोहर नव्हता. तिरस्काराने अशा मुलांकडे पाहत त्यानें आपलें भाषण पुढे चालविलें.

"तुम्ही हुशहुश का चालविले आहे हें मला माहीत आहे. तुमची अशी समजूत आहे की, जनार्दनची तक्रार मीं वामनजवळ केली. पण ही गोष्ट खोटी आहे. पण अशी तक्रार मी करणार होतो हें छातीवर हात ठेवून सांगण्यास मी मुळीच कचरत नाहीं. मात्र मी वामनकडे नव्हे तर श्रीकांतकडे तक्रार नेणार होतो. पण माझें ऐकून तर घ्याल तुम्ही!" हें प्रकरण ज्याच्या अंगावर शेकण्याचा संभव होता अशी मुलें मधून मधून हुशहुश, शुकशुक इत्यादि आवाज काढीत होतीं, आणि एक गंमत म्हणून लहान लहान मुले त्याची री ओढीत होतीं. त्यामुळें मनोहरला आपले भाषण पुढे चालविणेंहि अशक्य होऊं लागलें होतें.

प्रभाकराने त्याची सदऱ्याची बाही धरून त्याला अलीकडे ओढले आणि हलक्या आवाजात तो म्हणाला, "चालू दे, डुल्या, पण अगदीं शांत रहा, चिडूं नको."

"ही सभा सर्व विद्यार्थ्यांची आहे ना?" मनोहरने आपले भाषण पुढे सुरू केले. "मग नागेशइतकाच—किंवा कोणत्याहि विद्यार्थ्याइतकाच मलाहि यात बोलण्याचा हक्क आहे. अन् मी सांगतो ते इतकेंच कीं, नागेश तुमच्या डोळ्यात धूळ टाकीत आहे. खरी गोष्ट छपवून ठेवून तिला मुद्दाम विकृत स्वरूप देऊन ती तुमच्यापुढें मांडीत आहे. ही सगळी थट्टा होती, एक गंमत होती हे म्हणायला त्याचे काय जाते? पण मी त्यालाच विचारतो कीं, त्याला मनापासून असे वाटते कां? मुलांमध्ये लोकप्रियता संपादन करण्याकरिता आणि खाजगी सूड उगवून घेण्याकरिताच तो हे सांगत नाहीं का? पहा, त्याचें तोंडच सांगत आहे मी सांगतो आहे ते खरे आहे म्हणून—"

नागेश गोरामोरा होऊन गेला. उठून उभा राहून मनोहरला त्याने बजावलें कीं, "असलीं दुरुत्तरें मी ऐकून घेणार नाहीं; माझी व्यक्तिविषयक निंदा करण्याचा तुला कांहीच अधिकार नाहीं. असलेच आरोप तुला माझेवर करायचे असतील तर मी तुला बोलूं देणार नाहीं." इत्यादि. नागेशचे हे व्याख्यान चालू असतांना सभागृहांतून त्याचा प्रतिध्वनि उठत होताच. प्रभाकर पुनः मनोहरच्या कानाशीं लागून म्हणाला, "डुल्या, असले व्यक्तिविषयक आरोप कशाला करतोस? सगळें कांहीं खरें आहे तूं म्हणतोस तें; पण नागेशचा उल्लेख करूं नको. भाषण चालूं दे."

" कांहीं असले तरी मी छाती ठोकून सांगतो, मी सर्व हकीकत प्रत्यक्ष पाहिलेली आहे, आणि नाना, किसन आणि खोलींतील इतर मुलेंहि तुम्हांला सांगतील, मी सांगतो ते खरें आहे की नाही ते. ती **थट्टा** नव्हती. थट्टा म्हणून, गंमत म्हणूनहि चेष्टा करण्याचा त्यांचा **हेतु** नव्हता. तो एक, दुष्ट, सैतानी, पाषाण हृदयी, बुद्धिपुरःसर—"

" अब–ब–ब–ब ' विरुद्ध पक्षांतील ठराविक मुलांनी मान खालीं घालून कोल्हेकुई करण्यास सुरुवात केली आणि बाकीच्यांनी त्याची साथ धरली.

"मी पुनः हजारदा सांगेन–तो एक दुष्ट, सैतानी, पाषाणहृदयी, बुद्धिपुरःसर केलेला निर्दयपणाचा मासला होता, आणि यापेक्षा अधिक निर्दयपणा करण्याची त्यांना छाती असती तर त्यांनी तोहि केल्याशिवाय सोडला नसता. आणि मी अखेरचे सांगतो कीं—" सभागृहांतील चाललेल्या गोंधळाच्या वर आपला आवाज उंचावून तो मोठ्याने म्हणाला, " ज्या मुलांनी हे प्रकार केले त्यांनी व्यासविद्याश्रमाला कलंक लावला आहे; त्यांना शिक्षा ही झालीच पाहिजे."

तो खालीं बसताच सभागृहातून विरोधी आवाजाच्या हुशाऱ्या लाबचलाब हेलाचा एकच गोंधळ झाला, पण मनोहरच्या मुद्रेवर त्याचा किंचितहि परिणाम झाला नाहीं. पूर्वीसारखाच अभिमानाने तो चहूंकडे पाहत होता. आणि नागेश त्याच्या वरच्या इयत्तेत होता तरीहि त्याच्यावर आपल्या भाषणाचा परिणाम झाला, आपल्या नजरेशी नजर भिडविण्याची त्याची छाती होत नाही, हे पाहून त्याला समाधानहि झाले. खालीं बसताच त्याच्या खांद्यावर थाप मारून प्रभाकरने त्याचे अभिनंदन केले तेंव्हा तर त्याला त्या विरोधी वाग्बाणांची कांहीच किंमत वाटेनाशी झाली.

इतक्यांत रंगनाथ बोलावयाला पुढे सरसावला. सभ्यपणाचा आव आणून शक्य तितके चिमटे घेण्याचा, शक्य तितके कटु शब्द बोलण्याचा त्याचा विचार उघड दिसत होता. पण त्याचा हा परोपकारी सद्धेतु तितकासा साधला नाहीं. कारण त्याच्या प्रत्येक वाक्यागणिक त्याचे वक्तृत्व फिके पाडणारी टीका पुष्कळांना उघड ऐकूं जाईल इतक्या मोठ्या आवाजात मनोहर करीत होता.

" आत्तांच जे सद्गृहस्थ खालीं बसले त्यांनीं आपणांवर रागाच्या फवाऱ्यांचा वर्षाव—"

" बुटपालिशचे फवारे !" मनोहरने सुचविले.

" केला आहे. आणि म्हणून त्यांना उत्तर देण्याचा माझा विचार आह. त्याच्या भाषणात विचारावांचून उच्चारलेली कुचकी दुरुत्तरेंच भरलेली होतीं."

" लपवालपवीवांचून केलेली नासकी वस्तुस्थितिच दाखविलेली होती." मनोहरनें दुरुस्ती केली.

" जर अशा प्रत्येक क्षुल्लक थट्टेची तक्रार आपण मंत्र्यांकडे नेऊं लागलों तर मग चहाडबुचके आणि भेकड लोकांचेंच युग सुरू झाले म्हणावयाचे."

" नकली बुटपॉलिश आणि हेअर ऑईल यांचेच युग." मनोहरनें प्रतिध्वनि उमटविला. भरमसाट वक्तृत्व गाजविण्याची रंगनाथची हौस मनोहर पुरवूं देईना. त्याच्या प्रत्येक वाक्यागणिक मनोहरचीं मर्मभेदी उत्तरें ऐकून रंगनाथ चिडला आणि मनोहरच्या नावानें खडे फोडीत कुरकुरत खालीं बसला.

" आत्तांच भित्रेपणा आणि चहाडखोरीबद्दल ज्यांनीं उल्लेख केला आहे," भार्गव बोलूं लागला, " त्यांना मी एकच प्रश्न विचारतों. आपल्यापेक्षां दुप्पट लठ्ठ मुलाला चोप देऊन त्याच्या तोंडावर हिरवे निळे वळ उठविणारा मुलगा भेकड समजावयाचा कां? ( सर्व प्रकारचा शिष्टाचार सोडून देऊन भार्गव जनार्दनच्या तोंडावरच्या सकाळच्या मारामारीच्या खुणाकडे बोट दाखवून पुढें बोलूं लागला. )—कां एका अशक्त व कोवळ्या मनाच्या लहान मुलाला कीं, ज्यानें आपल्या उभ्या आयुष्यांत एखाद्या मुंगीलाहि दुःख दिले नाही अशा अजाण मुलाला अंधेरांत भीति दाखविण्याकरिता गुप्त कारस्थान करणाऱ्या नामर्दाला खरा भेकड समजावयाचा ?"

त्यानंतर शंकर जामदार उठला, आणि सुवासिक तेलानें चापून चोपून बसविलेल्या व ऐटदार भांग पाडलेल्या केसावरून हात फिरवीत बोलूं लागला, " मी ह्या प्रश्नाचा अगदीं निराळ्याच बाजूनें विचार करणार आहे." अरविंदाची कशी खोडी काढली, त्यांत जनार्दनचा अपराध किती या प्रश्नावर त्यानें आपलें निश्चित मत दिलेंच नाहीं. पण तो म्हणाला, "ह्या मंत्र्यांना कोणालाहि शिक्षा करण्याचा काय अधिकार आहे ? हे आमच्यापेक्षां मोठे श्रेष्ठ कशानें झाले? ते सर्व कांहीं मोठ्या सरदार इनामदारांच्या घराण्यांत जन्माला आलेले नाहींत; किंवा आमच्या कामांत ढवळाढवळ करण्याची त्यांना कोणी

सनदहि दिलेली नाहीं. माझ्या मतें हाच प्रश्न खरा महत्त्वाचा आहे की, ह्या मूठभर मंत्र्यांनी सर्व विद्यार्थ्यांवर हुकमत काय म्हणून गाजवावी ?"

"हा मुळीच आजचा प्रश्न नाही." नाना सरळपणें म्हणाला. "जनार्दन-सारख्या आडदांड राक्षसांनी कोवळ्या मुलाना मनसोक्त भीति दाखवून त्यांना वेड लावावे की काय, त्यांची लहर लागेल तितक्या वेळां ठोकून ठोकून लहान मुलांचे ढलपट वळवून टाकावे की काय हा आजचा प्रश्न आहे. जनार्दन कीं श्रीकांत राक्षसांचा आडदांडपणा की मंत्र्याचे सुराज्य? तुम्हाला काय पाहिजे बोला."

त्यानंतर निरनिराळ्या वक्त्यांनी एकच गोंधळ माजवून दिला. कांहींनी मंत्र्यांची थट्टा, चेष्टा केली. कांहींनी जनार्दनची, त्याच्या क्रिकेटनैपुण्याची स्तुति केली, आणि एखाद्या क्षुल्लक विनोदाबद्दल हे काहूर उठविले आहे अशी टीका केली. इतरांनी मोहन आणि मनोहर याच्या उखाळ्यापाखाळ्या काढल्या, आणि आपला खाजगी सूड उगविण्याकरितां हे कारस्थान त्यांनी रचिलें आहे असाहि आरोप त्याचेवर करण्यास कमी केले नाहीं. एकंदरीत ह्या प्रकरणात मंत्र्यांना आपल्या अधिकाराचा उपयोग करूं देऊं नये अशाबद्दल बहुतेकांचे एकमत दिसून आले.

आणि ह्या सर्व गोंधळांत प्रभाकर बोलावयास उठला. त्याला उभा राहिलेले पाहतांच सर्वत्र एकदम स्तब्धता झाली. प्रभाकराशी प्रत्यक्ष परिचय असा फारच थोडया मुलांचा होता. पण त्याची बुद्धिमत्ता, सभ्य व रुबाबदार वागणुक व उच्च निष्कलंक शील यांमुळे त्याचे बहुतेक विद्यार्थ्यांवर एक प्रकारचें वजन असे. कांहीं खलभुजंगांनी त्याला खाली बसविण्याचा प्रयत्न केला; पण त्यांच्या ह्या निंद्य उपक्रमाला अनुमति दर्शविण्याची नागेशलाहि लाज वाटली; आणि म्हणून पहिल्या एक दोन वाक्यांनंतर प्रभाकरचें भाषण प्रशान्त वाहणाऱ्या गंगेच्या ओघासारखे सर्व अडथळ्यांना दाबून टाकून अस्खलित सुरू झाले.

प्रथमच त्यानें नागेशनें लढविलेल्या वकिली कोटिक्रमाला उत्तर देण्यास सुरुवात केली. अरविंदाच्या छळाचा हृदयद्रावक इतिहास त्यानें निवेदन केला आणि त्या सर्व छळाची परमावधि म्हणून कालच्या प्रसंगाचा उल्लेख करून तो म्हणाला,

" अजूनहि तुम्हांला असे खरोखरच वाटतें काय की, कालचा प्रसंग सर्व थट्टेवारी घालविण्याइतका क्षुल्लक होता? अरविंदाचें कोवळे वय, त्याचे नाजुक मन लक्षांत घ्या; आणि आजपर्यंतची जनार्दनची वागणुक निर्दय छळाच्या रूपाची आहे की नाही याचा निर्णय करा. आपल्या छळाचे कोणते भयंकर परिणाम होतील याची पूर्ण कल्पना आगाऊपासून तो छळ करणाऱ्या व्यक्तींना निश्चयाने असलेच पाहिजेत, इतकेच नव्हे तर तसे परिणाम होतील हे लक्षात घेऊनच त्याला भीति दाखविण्याचा व्यूह रचला होता यात मुळीच शंका नाही." त्यानंतर त्याने अर्ध्या तासापूर्वीच रुग्णालयात पाहिलेल्या अरविंदाच्या केविलवाण्या स्थितीचे वर्णन केले; त्याच्या सरळ पण जोरदार भाषणामुळे अगदीं उदासीन असलेल्या मुलाचेहि अंतःकरण थरारून गेले आणि जनार्दनच्या कृत्यांचा तीव्र तिरस्कार पुष्कळाना वाटूं लागला.

" आताच एका वक्त्याने चहाडखोरी आणि भ्याडपणाचा उल्लेख केला आहे. त्या आरोपाचे निरसन भार्गवने केलेच आहे, आणि मोहन व मनोहर-पुरतेच बोलावयाचे तर त्या आरोपांना उत्तर देण्याचीहि आवश्यकता नाही. मनोहरची आणि तुमची सर्वांची ओळख पुष्कळ जुनी आहे आणि त्याच्या निधड्या छातीचा पुरावा आताच अगदीं स्पष्टपणे तुमच्यापुढे आला आहे. मोहनविषयी म्हणाल तर त्याच्या विद्याश्रमांतील एक वर्षाच्या वास्तव्यांतच त्याने आपल्या अंगी असलेला स्वाभिमान, धैर्य व उदारपणा यांचा प्रत्यय इतक्या अनेक वेळां आणून दिला आहे की, असल्या क्षुल्लक आरोपापासून त्याचे संरक्षण करण्याकरिता दुसऱ्या एखाद्या कवचाची मुळीच जरूर नाही. पावसाळ्यांतील अंधाऱ्या रात्री काळ्या कड्यावरून एकट्याने जाण्यास किती धैर्य लागतें याचा अनुभव कोणीहि जाऊन घ्यावा; आणि सत्याकरितां जनार्दनसारख्या धिप्पाड मुलाशींहि दोन हात करण्यास न कचरणारा दुसरा एखादा मुलगा विद्याश्रमात असल्यास कोणीहि दाखवून द्यावा. त्याच्यावर केलेल्या ह्या आरोपांना मी काडीचीहि किमत देत नाही आणि माझी खात्री आहे की, ते आरोप खरे आहेत असे तुमचे मनहि तुम्हांला सांगणार नाही. पण माझ्या या दोन मित्रांवर एका बाबतींत मात्र भित्रेपणाचा आरोप बरोबर लागू पडतो, हे मला कबूल केलें पाहिजे. त्यांना जी गोष्ट सत्याची—न्यायाची वाटते ती करण्यात

चुकवाचुकवी करण्याला ते भितात, जे कृत्य दुष्ट व हलकटपणाचे आहे अशी त्याची खात्री आहे असले कोणतेंहि कृत्य करण्याची त्याना अतिशय भीति वाटते. पण असल्या भित्रेपणाबद्दल कमीपणा वाटण्याचे मुळीच कारण नाही."

मुलाच्या नेहमीच्या सभामधून ऐकू येणाऱ्या विचारापेक्षा उच्च भूमिकेवरील ही विचारसरणी, अंतःकरणाची कळकळ व ओजस्वी भाषा पाहून सर्व विद्यार्थी थक्कच झाले. मधूनमधून होणारा टाळ्यांचा कडकडाट इतका प्रचंड होता की बाळू व रंगनाथ याच्या कंपूने आपल्या विरोधी मताचे केलेले प्रदर्शन कोणाच्या लक्षातहि आले नाही.

"शंकर म्हणतो की, 'मंत्र्याना मध्ये ढवळाढवळ करण्याचा अधिकार कोणी दिला?' मी म्हणतो की मंत्री हे आपलेच आश्रमातील थोरले बंधु आहेत. एके काळी तेहि आपल्यासारखेच लहान होते, आणि परिश्रमाने व अंगच्या हुशारीमुळे त्याना आज ह्या अधिकाराच्या जागा प्राप्त झाल्या आहेत. थोडक्यात ते आपणापैकी वयाने वडील, ज्ञानाने हुशार, कर्तृत्वाने सामर्थ्यवान् व अनुभवाने श्रेष्ठ आहेत. त्यांचे अधिकार आपल्या गुरुजनांनी, पालकानी आणि आपण स्वतःहि स्वतःच्या इच्छेने-राजीखुषीने त्याना दिलेले आहेत. आजपर्यंतच्या परंपरेने त्या अधिकाराला पावित्र्य आलेले आहे व अनेक प्रसंगी त्याची उपयुक्तता अनुभवास आल्याने हे अधिकार त्याना देणाऱ्याचे शहाणपण व न्यायबुद्धि कसोटीस लागली आहे. आणि काहीं असले तरी जनार्दनसारख्या मुलाला मंत्र्याच्या ह्या अधिकाराबद्दल तक्रार करण्याचा हक्कच पोहोचत नाही. एका लहान, निरुपद्रवी मुलाला त्रास देण्याचा, छळण्याचा, व मारहाण करण्याचा आणि प्रसंगी त्याचे जन्माचे नुकसान करण्याचा आणि अशा कृत्यांनीं विद्याश्रमाच्या नावाला कलंक लावण्याचा जर जनार्दनसारख्या मुलाला हक्क आहे असे वाटते तर मी म्हणतों की, मंत्र्यांना—सत्य, न्याय आणि स्वाभिमान याचे संरक्षण करणें हे ज्यांचें कर्तव्य आहे आणि विद्याश्रमाचें हित पाहण्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे अशा मंत्र्यांना—अशा मुलाला चोपून काढण्याचाहि हक्क आहेच आहे. मंत्री येथें नसते तर विद्याश्रमाची काय स्थिति झाली असती! विशेषतः लहान व अशक्त मुलाची स्थिति किती भयंकर झाली असती! प्रत्येक लहानसान त्रासाची तक्रार शिक्षकांकडे नेणे कोणालाच आवडणार नाहीं

आणि मंत्र्यांच्या अभावीं अशा मुलांना कोणी त्रातांहि राहणार नाहीं. नागेशनें केलेल्या सूचनेला मी अंतःकरणापासून माझी सर्व शक्ति खर्च करून कसून विरोध करतो. त्याची सूचना मान्य करणें भयंकर आहे. निरुपयोगी तर आहेच आहे आणि तसे करणें ही अन्यायाची परमावधि आहे.''

आपलें भाषण संपवून प्रभाकर खालीं बसताच टाळ्यांचा कडकडाट कितीतरी वेळ एकसारखा चालू होता. सभेत हजर असलेल्या पुष्कळांच्या मनावर त्याच्या भाषणाचा फार तीव्र परिणाम झाला होता, आणि नागेशला सुद्धा आपल्या पूर्वीच्या मित्राबद्दल सहानुभूति आणि आदर वाटूं लागला. शक्य असतें तर वाटेल तो स्वार्थत्याग करूनहि आपली पूर्वीची सूचना त्यानें परत घेतली असती, आपण केलेल्या विधानाबद्दल क्षमाहि मागितली असती; पण त्याची मानी वृत्ति, त्याचा क्रोध आडवा आला, आणि मुद्रेवर कोणताहि विकार दिसूं न देतां त्यानें मतें मोजण्यास सुरुवात केली.

बाळू, रंगनाथ आणि जनार्दन यांनी आपल्या बाजूनें मतें गोळा करण्याकरितां केव्हाच कॅन्व्हॅसिंग सुरू केलें होतें. आणि म्हणून हात वर करण्यास अध्यक्षांनी सांगताच कितीतरी हात वर दिसूं लागले. विरुद्ध बाजूनें मतें मागताच प्रभाकर, मनोहर, भार्गव आणि नाना या चौघांचे चार हात वर दिसूं लागले. शशिकांत, किसन आणि अंतू यांनीहि हात वर केले, आणि आपल्याहि बाजूला कोणीतरी आहे, याची जाणीव होऊं लागतांच पुष्कळ दुसरीं मुलेंहि भीतभीत हात वर करूं लागलीं. अखेर मतें मोजून पाहतां दोन्ही बाजूंची मतें समान भरलीं. अर्थात् मतमोजणीचा हा निकाल ऐकून कोणासच समाधान वाटलें नाहीं कीं कोणी टाळ्याहि दिल्या नाहीत.

" पण अध्यक्षांना मत असतेंच ना ?'' रंगनाथनें सुचविलें.

एक क्षणभर नागेश स्तब्ध बसला. त्याच्या अंतर्यामीं चाललेल्या मनोविकारांच्या तुमुळ युद्धाच्या छटा त्याच्या मुद्रेवरहि स्पष्ट उमटल्या होत्या. अखेर आपल्या नवीन संपादन केलेल्या मित्रांची लोकप्रियता सोडण्याची त्याची छाती झाली नाहीं. उठून उभा राहून तो झट्दिशीं एकच वाक्य बोलला, " आणि माझें मत मंत्र्यांच्या अधिकाराच्या विरुद्ध बाजूला आहे.''

विजयी पक्षाचा आनंद आणि तीव्र पक्षभेदाचे प्रदर्शन सभागृहात उघडपणें दिसूं लागलें. प्रभाकर पुनः एकदा उभा राहिला आणि म्हणाला—

" एक गोष्ट आपल्या नजरेस आणण्याची मी परवानगी घेतों. ती ही की, आजच्या सभेंत व्यक्त झालेलें मत हे विद्याश्रमातील सर्व विद्यार्थ्यांचे मत आहे असे कोणींहि समजता कामा नये. सहाव्या इयत्तेंतील सुमारें दहा बारा मुलें येथें गैरहजर आहेत. त्या सर्वांची मतें मंत्र्याना अनुकूल अशींच पडतील ही आपण खात्री बाळगा; म्हणून आजच्या सभेंत विजयी झालेल्या पक्षाला मी अशी विनंति करतों की, बहुमत आपल्या बाजूला आहे अशा भ्रमानें मंत्रि-मंडळाच्या विरुद्ध बंड पुकारून त्यांनी विद्याश्रमाच्या व्यवस्थेत घोटाळे उत्पन्न करण्याचा प्रयत्न करूं नये. "

" ते आमचे आम्ही पाहून घेऊं." नागेशने तडाख्याने उत्तर दिलें. "काही असले तरी बहुमतानें सूचना मंजूर झाली आहे. "

सभा संपली. विद्यार्थी आपल्या उद्योगाला पागले आणि ठिकठिकाणी लहान लहान टोळ्या जमून आजच्या प्रसंगाची चर्चा करूं लागले. आपल्या खोलीकडे नागेश जात असताना त्याची व प्रभाकरची गाठ पडली.

" एकूण, प्रभाकर," तो म्हणाला, " तुझें सर्व वक्तृत्व फुकटच गेलें म्हणावयाचें. खरें की नाही ? अगदीं जंगजंग पछाडलेस तरी जय आमच्याच पक्षाचा झाला की अखेरीस ! "

" होय, झाला आहे खरा. पण बाळू, जनार्दन आणि रंगनाथ याचा पक्ष हा नागेशचा पक्ष कसा काय समजला जाऊं लागला? "

# प्रकरण चोविसावें

# विद्यार्थ्यांचें स्वराज्य—पहिली चकमक

**खद्योतो द्योतते तावद्यावन्नोदयते शशी।**
**उदिते तु सहस्रांशौ न खद्योतो न चन्द्रमाः ॥**

सभा संपताच मनोहरने रुग्णालय गाठले. सभेची ताजी बातमी मोहनला सर्वांच्या अगोदर आपण जाऊन सांगावी अशी त्याला अतिशय उत्कंठा होती. अरविंद अर्धवट झोपेत मधून मधून बडबडत एका खाटेवर पडला होता आणि त्याचे शांतवन करीत मोहन त्याच्या उशाशी बसला होता. सभेतील धका-धकीचे वातावरण मनोहरच्या कानात अजूनहि घुमत होते, आणि त्या प्रसंगा-मुळे त्याच्या मनाची झालेली चलबिचल अद्याप शांत झाली नव्हती. रुग्णालयातील हे शांत आणि भयानक वातावरण सभागृहातील दंगलीच्या विरोधामुळें त्याला अधिकच भयाण व उदास भासले.

मोहनच्या शेजारींच खाटेवर बसत मनोहर म्हणाला, "केवढी दंगल माजली आहे तिकडे, म्हणतोस!" त्याच्या पाठीवर थाप मारीत त्याने सभेची सर्व हकीगत थोडक्यात सांगितली. "काय सांगूं, मोहन, प्रभाकरचे भाषण ऐकायला तूं पाहिजे होतास. अगदी एखाद्या वक्त्यासारखी त्याने झोड उठविली होतीन् आणि ऐसे टोले लगावलेन् की, जनार्दन-कंपूला त्याने अगदी हवेतच भिरकावून दिले. प्रभाकर खूपच पुढे येणार; छान. नाही?"

"खरोखरच. आणि तूं मुद्धां माझी बाजू राखलीस हे सुद्धां—"

"छट्, मुळीच नाही. पण तो नागेश असा उलटेल अशी कल्पना तरी! जनार्दनाच्या बाजूने त्यानें आपले निर्णायक मत दिलेन् ना आज! तो किती बदलून गेला आहे याची तुला कल्पना नाही, मोहन!"

इतक्यांत अरविंद झोपेंत विव्हळूं लागला आणि त्यांचे बोलणे तितकेंच राहिले. अरविंदने डोळे उघडले आणि भेदरलेल्या नजरेने तो चोहोंकडे पाहूं लागला. त्याच्या सर्व अंगाला कंप सुटला होता, दृष्टि चंचल झाली होती आणि दरदरून घाम सुटला होता. भीतीनें ओरडत त्याने पुनः डोळे मिटले आणि

तो विव्हळूं लागला. "नको नको, जनार्दन, मला भेवडावूं नको. नकोना पण. मोहन, मोहन, पहाना हा."

"अरु, अरु, किती भितोस तूं! येथे कोणी नाहीं. हा मी तुजजवळच बसलो आहेना. तें कांहीं खरे भूत नव्हते. त्यांनी नुसते सोंग आणले होते ते." असे म्हणून लहान मुलासारखा अरविंदला तो थोपटून निजवूं लागला. अरविंदनें दोन्ही हातांनी त्याच्या गळ्याला मिठी मारली आणि तो ओक्साबोक्सी रडूं लागला.

मनोहरचे डोळे पाण्याने भरून आले. "मोहन, तूं फारच कोवळ्या मनाचा आहेस. नागेश या वेळेला येथें पाहिजे होता म्हणजे त्याला दिसले असते आपल्या नव्या दोस्तानी कोणते पराक्रम गाजविले आहेत ते."

"त्याच्यावर का इतका रागावतोस तूं! मला सुद्धा वाटतें की, तो येथे आला आणि आपला अबोला सोडून देऊन त्याने पूर्वीसारखें सख्य केले तर किती समाधान होईल! पण मी तरी काय करूं? मी त्याला चिठी लिहिली. तिचे त्याने उत्तर सुद्धा दिले नाहीं. तो जरी कितीहि वाकड्यांत शिरला तरी त्याचे वाईट व्हावे असे माझ्या मनांतहि येत नाही."

"मला तर त्याचे करणे मुळींच आवडत नाहीं. अन् त्याचे स्वतःचे मनसुद्धा त्याला खात असेल."

"जाऊं दे. एके काळी तो आपला मित्र होताना! त्याचे मन त्याला खाते हे तूं कशावरून म्हणतोस?"

"कशावरून म्हणजे! त्याचे तोंड सांगतेंना. आपण करतो ते चूक आहे याची त्याला मनापासून लाज वाटते हे अगदी उघड दिसून येते."

"कांहीं कां असेना. जितक्या लवकर आपला अबोला मिटेल तितका चागलाच. तूं सुद्धां त्याच्याशी भांडलास का?"

"जवळ जवळ. हल्लीं आम्ही फारसे सरळ बोलत नाहींच, आणि आज तर सभेंत मीं त्याची अशी उडविली आहे की विचारूं नकोस."

मोहनने दुःखानें निःश्वास सोडला. तितक्यांत प्रभाकर आंत आला.

"अरेच्या! डुल्या आहे कां येथें?" तो आंत येतांच म्हणाला. "मला वाटते तूं आणि मी आपण दोघे यांच्या राशीला लागलो तर हे दुखण्यांतून कधींच

बरे व्हायचे नाहीत. डॉक्टर मला वाटेत भेटले. त्यांनी मला फक्त पांच मिनिटे बसण्याची परवानगी दिली. ते म्हणतात 'दोघांनाहि विश्रांतीची जरूर आहे.' आपण, मला वाटतें, बगल देऊनच आत शिरलांत."

"काय करावें बुवा? शिवाय तुझी ही दुसरी खेप आहे. मी यांना भेटावयास पहिल्यांदाच आलो तेव्हां उपाय नव्हता. मी सभेची बातमी आणली होती."

"त्याचें श्रेय–जर कांहीं असलेंच तर ते–तुझेंच आहे, डुल्या. पहिली सरबत्ती तूं केलीस. त्याची कल्पना होती कीं आपल्याला मोकळे रान सांपडेल. पृथ्वीवरील क्षत्रिय अजून नाहीसे झाले नाहींत हे तूं त्याना पहिल्यादा दाखविलेंस."

"पण तूं सुद्धां पुष्कळच कामगिरी केलीस." मोहन म्हणाला. "डुल्या तर म्हणतो की तूं अगदी त्यांना चीत मारलेस म्हणून!"

"त्या डुल्याच्या बाता आहेत." प्रभाकर म्हणाला. "पण जर मी काहीं केलेच असेल तर त्याचें श्रेय सर्व तुला आहे."

"मला! ते कसे काय बुवा?"

"एकतर असे की, रंगनाथसारख्या हलकटांनी तुझ्यावर तोंडसुख घ्यावें हे मला ऐकवेना आणि दुसरे असे कीं, तूं जर माझे डोळे उघडले नसतेस तर मी आपला पूर्वीसारखाच निष्काळजी एकलकोंडा राहिलों असतो. मग विद्याश्रमांत कांहीं कां चालेना. आजसुद्धां प्रथम उभे राहायला मला पुष्कळच संकोच वाटत होता. पण सप्तशृंगीवर आपले झालेले बोलणे मला आठवलें."

मोहन उत्तरादाखल फक्त हंसला. प्रभाकर पुढे म्हणाला, "पण मी तुला एक ताजी बातमी सागायला आलो आहे."

"ती कोणती?" दोघानीहि उत्सुकतेने विचारले.

"आतांच बोर्डावर श्रीकाताच्या सहीची नोटिस लागली आहे की, प्रार्थना संपून शिक्षक उठून गेल्यावर सर्व विद्यार्थ्यांनीं सभामंडपांत थोडा वेळ थांबावें."

"अस्सें, घोडामैदान जवळ आलें. चांगलीच चकमक झडणार तर!"

"आणि अशा वेळीं मी येथें अंथरुणावर निजून राहणार!" मोहन निराशेनें म्हणाला. "काय करूंरे, मला वाटतें कीं अस्सें उठून तिकडें यावे. पण इलाज नाहीं."

" ही तुझी खोक आणि हे बॅंडेस घेऊन तूं सभेत येणार? मुलें हंसायलाच लागतील."

" छे रे, त्या जखमेचे नाहीं काही विशेष, पण माझें डोकें आपटलें तेव्हां त्या-मुळें मेंदूला धक्का बसला आहे, असें आजच सकाळीं डॉक्टर म्हणाले."

" होय आणि डॉक्टर म्हणतात कीं, ह्या वटवट्यांची बडबड अशीच चालली तर तूं कधींच बरा होणार नाहींस." डॉक्टर स्वतःच त्यांच्या मागून येत म्हणाले. " पळा पाहूं येथून अगोदर."

डॉक्टरच्या प्रेमळ सूचना ऐकून मुलेंहि हंसलीं आणि मोहनचा निरोप घेऊन जाण्यास निघाली. " तूं सुद्धा एकदाचा डॉक्टराच्या तावडींतून सुटका करून घे." म्हणून सूचना देण्यास मनोहर चुकला नाहीं.

" आणि अरविंद पुनः वसतिगृहात राहायला कधीं येणार? मला त्याच्या-वाचून अगदीं करमत नाहीं." प्रभाकरानें विचारलें.

" त्याला पुष्कळ दिवस लागतील अजून." डॉक्टर म्हणाले.

रुग्णालयांतून बाहेर पडतांच मनोहर म्हणाला, "उद्यां काय होईल रे?"

" काय सांगावें? पण माझ्या शेजारींच बैस अं. आलाच प्रसंग तर एकासं दोघे बरे."

" मंत्र्याच्या बाजूला कितपत जोर आहे?"

" दिसेलच आतां."

विद्याश्रमांत जिकडे तिकडे एकच गर्दी उडून गेली होती. रात्रीं जेवतांना-सुद्धा मुलांच्या बोलण्यांत दुसरा विषयच नव्हता. खालच्या वर्गांतील मुलें उद्यां काय होईल याचा आपापल्या मताप्रमाणें अंदाज बांधीत होतीं आणि अमुक असेंच होईल असें ठासून सांगून त्याबद्दल पैजा मारीत होती. पण वरच्या वर्गां-तील मुलें या चर्चेंत भाग घेतांना मुळींच दिसत नव्हतीं.

संध्याकाळची प्रार्थना संपली आणि हजर असलेले शिक्षक शांतपणें सभा-मंडपांतून बाहेर पडतांच श्रीकांत पुढें आला आणि म्हणाला—

" जनार्दन आहे कां येथें?—कृपा करून कोणीहि जाऊं नका."

" हा मी येथें आहें—काय काम आहे माझें?" जनार्दननें निष्काळजी-पणाचा आव आणीत गुर्मीत उत्तर दिलें.

" पहिले काम असे की, निर्दयपणें दुसऱ्याचा छळ करण्याची तुला अत्यंत निंद्य खोड आहे आणि तिचा परिणाम एका लहान मुलावर अत्यंत अनिष्ट झाला आहे. तुझ्यासारख्या मोठ्या मुलाला असले वर्तन करताना लाज वाटायला पाहिजे. तुझ्या ह्या हलकट वर्तनाबद्दल तुला शिक्षा करणे हे विद्याश्रमाचे मंत्री म्हणून आमचे सर्वांचे आणि मुख्य मंत्री म्हणून माझे कर्तव्य आहे. चल पुढे ये— "

" येत नाही जा. " जनार्दनने उर्मटपणाने उत्तर दिले. "प्राण घेईन तुझा" असेंहि तो कांहीसे पुटपुटला. हा उघड अपमान पाहून सर्व विद्यार्थ्यांमध्येंहि चलबिचल सुरू झाली. पण श्रीकांत अगदी शांतपणे म्हणाला,

" या उर्मटपणाबद्दल मी जास्त कांही सांगत नाही; पण असले उत्तर पुनः दिलेस तर त्याबद्दल जास्त शिक्षा होईल. चल, पुढे ये पाहूं. "

हा खणखणित आवाज पाहून जनार्दन थोडासा कचरलाच. आपली बाजू कोणी उचलून धरण्याचेंहि चिन्ह त्याला दिसेना. पण तरीहि तो जागचा हलेना.

" हे पहा, " श्रीकांत म्हणाला, " एका मंत्र्याचा तूं आधीच अपमान केला आहेस आणि तुझ्या अपराधात भर घातली आहेस. उगीच सर्वांच्यापुढे शोभा करण्याची माझी इच्छा नाही. पण तूं शांतपणे शिक्षा भोगण्यास पुढे आला नाहीस तर सक्तीने तुला आणावे लागेल. चल, येतोस ना ? नाही—ठीक आहे—त्याला इकडे आणा रे कोणी तरी. " शेजारी बसलेल्या इतर मंत्र्यांकडे पाहत तो म्हणाला

दुसरा एक मंत्री दिनकर लागलीच उठला; त्याचबरोबर सहाव्या इयत्तेतील धिप्पाड मुलगा मुकुंद आपणहून पुढे सरला आणि दोघांनी जनार्दनचा एक एक हात धरून त्याला पुढे चालविले. मुकुंद आणि दिनकर यांना पुढें आलेले पाहताच जनार्दनचें अवसान अर्धे अधिक खचले. कारण दोघेहि क्रिकेटमध्यें त्याच्या बरोबरीचे खेळाडू होते आणि दोघेहि त्याच्यापेक्षां सशक्त होते.

" तुला पुनः बजावतो. " श्रीकांत निश्चयानें म्हणाला. " विद्याश्रमाच्या नांवाला तूं लावलेला कलंक धुवून टाकण्याकरितां तुला छड्या ह्या मिळणारच. त्या कांही चुकणार नाहींत. पण तूं जर आपणहून पुढें आला नाहींस तर तुला

घालवून द्यावे लागेल. बाकी तूं गेलास तर कांही फारसें नुकसान नाही म्हणा. पण इतके तुला सांगायला हरकत नाही की, विद्याश्रमाचे कीर्तीला कलंक लागणार नाही, हे पाहण्याची जबाबदारी आचार्यांनीं सर्वस्वी आमचेवर टाकलेली आहे."

प्रतिकार करणे निरुपयोगी आहे हे जनार्दनला उघड दिसून आले, आणि मुकाट्यानें तो पुढे येऊं लागला. पण येताना त्याने कालच्या सभेत आपली बाजू इतक्या नेटाने उचलून धरणाऱ्या अनेक मदतनिसांकडे एकदां दृष्टि टांकली. काय करावे हे त्यांनाहि सुचेना. आपल्या पक्षाचा पुढारी नागेश याचेकडे सर्वांचे डोळे लागून राहिले. आपला पुढारीपणाचा मान टिकवून ठेवावयाचा असेल तर कांही तरी करणे जरूर आहे हे जाणून नागेश उठला, आणि म्हणाला,

"मी या शिक्षेचा निषेध करतो."

"तूं! कोण तूं?" श्रीकांत त्याच्याकडे आश्चर्याने पाहत म्हणाला. आणि त्याबरोबरच एक हास्याचा अस्पष्ट ध्वनि सभागृहातून उठला. आपला हा अपमान नागेशच्या मानी हृदयाला शल्यासारखा बोचला, तो चिडला आणि रागाने ओरडला,

"विद्यार्थ्यांचे बहुमत या शिक्षेच्या विरुद्ध आहे."

"ते आम्ही पाहून घेऊं. बहुमत विरुद्ध असेल तर ते आपोआप दिसेलच. तूं आता खाली बैस. थोड्या वेळाने मी तुला सुद्धां कांही गोष्टी सांगणार आहें."

"आम्ही आड येणारच." असे म्हणून नागेशने पुढे येण्याकरिता पाऊल टाकले आणि हे पाहताच त्याच्या कांही दोस्तांनीहि आड पडण्याची हालचाल केली. पण मुकुंदाने जामदारचे आणि दुसऱ्या हातानें रंगनाथचें मनगट घट्ट धरून त्याना खाली बसविले; आणि दिनकरने त्याच क्षणी नागेशला आपल्याच जागेवर घालून ठेवलें. प्रतिस्पर्ध्यांचा निकाल लावण्याची ही चपळाई पाहून सभागृहात जो हंशा पिकला तो ऐकतांच इतरांचे पुढें येण्याचे विचार जागच्या जागीच जिरले. आणि कांही मूठभर विद्यार्थ्यांखेरीज मंत्र्यांच्या अधिकाराला विरोध करणारे खरोखर फारसे कोणी नव्हते, ही गोष्ट सहजच उघड झाली. जनार्दनच्या कृत्यांबद्दल बहुतेकाना पूर्ण तिरस्कार वाटत होता आणि मंत्र्यांचें करणे पूर्णपणे योग्य आहे अशीच त्या सर्वांची समजूत होती.

रागाने आणि लज्जेने लालबुंद झालेला नागेश चुळबुळ करीत जागच्या जागी बसून राहिला आणि श्रीकांताने जनार्दनला छड्या देण्यास सुरुवात केली. आपली सर्व सहनशक्ति एकवटून त्याने पहिल्या कांहीं छड्या आढ्यतेने सहन केल्या. तिरस्काराचे अस्पष्ट उद्गारहि त्याने काढले; पण ओढून आणलेल्या चंद्रबळाचा सांठा लवकरच संपुष्टात आला. थोड्याच वेळात त्याची मुद्रा केविलवाणी दिसूं लागली, आणि शेवटच्या छडीच्या वेळीं त्याच्या विव्हळण्याचा दीन आवाज मुलाना स्पष्ट ऐकूं आला.

अखेर जनार्दन आपल्या जागी जाऊन बसला. दुःख, लज्जा, तिरस्कार ह्या सर्व विकारांनीं त्याच्या मनांत खळबळ उडवून दिली होती. "मला शिक्षा करण्याची कोणाचीहि छाती नाहीं" ही बढाई त्याने अनेकाजवळ बोलून दाखविली होती; पण आज त्याला शिक्षा झाली, इतकेंच नव्हे, तर सर्व विद्यार्थ्यांच्या समक्ष झाली आणि त्या छड्या असह्य होऊन भित्र्या भागुबाईसारखे त्याचे विव्हळणे सर्व मुलांनी ऐकले. आपली फोल ठरलेली बढाई आणि झालेला हा अपमान यांमुळे त्याला स्वतःची अतिशय लाज वाटली. आजचा प्रसंग तो कधींहि विसरला नाहीं; इतकेंच नव्हे, तर संधि साधून त्याबद्दल सूड उगविण्याचाहि त्याने निश्चय केला.

पण बाकीच्या मुलांना त्याच्या अपमानाचे आणि सुडाच्या निश्चयाचे काय होय? त्याच्या अपराधाच्या मानाने त्याला जबर शिक्षा होणे न्यायाचेच होते, अशीच सर्वांची समजूत झाली. अर्थात् बहुतेक मुले शांतपणे बसून राहिलीं आणि जनार्दनची बाजू उचलून धरण्याची ज्या मुलांनी काल तयारी दाखविली होती त्यांना आपल्या पुढाऱ्याचा हा कमकुवतपणा आणि पोकळ बढाया पाहून आश्चर्य वाटले.

"आणि आतां, नागेश, जरा पुढे या पाहूं तुम्ही! काय, येत नाहीं? जरा या तर खरे."

पण नागेशनें फक्त त्याच्याकडे तिरस्कारानें एकदां पाहिलें.

"दिनकर, त्याला इकडे आण पाहूं." श्रीकांत म्हणाला. पण दिनकर त्याच्या कानाशीं लागून हलकेंच म्हणाला, "त्याला फार छळूं नकोस, श्रीकांत, उगीच प्रकरण चिरडीस जाईल. तो पांचवीतील एक हुशार मुलगा आहे आणि

आजपर्यंत त्याची वागणूकहि चांगली आहे. आजच्या ह्या क्षुल्लक लहरीला फार महत्त्व देऊं नको."

"ठीक आहे," श्रीकांताने उत्तर दिले आणि मग मोठ्यानें पण जरा सौम्य आवाजाने तो नागेशला म्हणाला, "नागेश, जरा पुढें ये. मी तुला दोन गोष्टी सागणार आहे." दिनकरहि पुढे सरला होता, त्याने हळूच नागेशला धरून पुढे आणले.

"तूं म्हणालास की, मुलांचे बहुमत आमच्या विरुद्ध आहे म्हणून ?"

उत्तर नाही.

"मुलांचे बहुमत तुझ्या बाजूला आहे किंवा तूं त्यांचा प्रतिनिधि आहेस, असें तूं समजतोस काय ?"

उत्तर नाही.

"हे पहा, नागेशराव, तुमची सभा आणि तुमचे बहुमोल निर्णायक मत आम्हाला माहीत आहे. पण तुला हें समजायला पाहिजे की, खालच्या इयत्तांतील मूठभर पोरें गोळा केली म्हणजे ते काही व्यासविद्याश्रमांतील मुलांचें बहुमत होऊं शकत नाही. आणि लक्षांत ठेव की, जरी हे बहुमत खरोखरीच आमच्या विरुद्ध असले तरीहि ह्या लहान मुलांना छळणाऱ्या आडदांड भागुबाईला शिक्षा केल्याशिवाय सोडून देण्याइतके व्यासविद्याश्रमांतील मंत्री अजून कर्तव्यशून्य झाले नाहीत. तुझे आजचे वर्तन अगदी खुळेपणाचे आहे आणि पोकळ गर्वाच्या भरीस तूं पडला आहेस, हे चांगले नाही. असा रागावून काय पाहतोस ? आजपर्यंत तुझ्याशी कधीहि कठोरपणे मी वागल्याचे तुला आठवतें काय ? पण मी आज तुला पुनः बजावतो की, ह्या पोकळ गर्वाच्या भरीस पडून तूं आपले नुकसान करून घेशील. तुझाच मित्र प्रभाकर पहा कसा सुवृत्त आहे तो. जा, पुनः असें करूं नको."

नागेश आपल्या जागी जाऊं लागतांच श्रीकान्त सर्वांना उद्देशून म्हणाला, "आणि ज्यांनी ज्यांनी अरविंदाला मदत केली त्या सर्वांचे व विशेषतः मोहन आणि मनोहर यांचे सर्व मंत्र्यांतर्फे मी आभार मानतों. त्यांची वागणूक अत्यंत सभ्यपणाची आणि खऱ्या वीराला शोभण्यासारखी होती. त्यांनी घालून दिलेला कित्ता इतर लहान मुलांनींहि गिरविला तर आपल्या विद्याश्रमाच्या कीर्तींत पुष्कळच भर पडेल."

" श्रीकान्ताचे सहज बोलणेसुद्धां अरेरावीपणाचें दिसतें नाहीं? " वामन दिनकरला हलकेच म्हणाला. " त्याला गोडीगुलाबीनें बोलतांच येत नाही. शिवाय प्रभाकरचे आभार मानायला तो विसरलाच. "

" खरेंच," दिनकर म्हणाला, " त्याची ही अरेरावीच पुष्कळ वेळां नडते. श्रीकान्त, प्रभाकरचा उल्लेख करायला तूं विसरलास ना? अन् ही मुलें तर आतां चालली. "

" आतां ते काम तूंच करना. पहिल्यापासून सारखा मीच बोलतो आहे. "

" मी ? छे, मला नाही जमायचें ते. मी थोडाच वक्ता आहे? हा वामन सांगेल. "

" ठीक आहे. जरा एक मिनिट थाबा." श्रीकाताने मोठ्याने म्हणून मुलाना थांबविलें. कारण त्याची ही कुजबुज चालू असताच पुष्कळशी मुलें बाहेर पडूं लागली होती.

" श्रीकांताने मला एक काम करायला सागितले आहे, " वामन बोलूं लागला, " आणि ते असे–मुलांच्या सभेत मंत्र्यांचे हक्क आणि कर्तव्य याची बाजू निर्भीडपणे, न डगमगतां प्रभाकरने उचलून धरली याबद्दल सर्व मंत्र्यांच्या तर्फे आणि पाचव्या व सहाव्या इयत्तातील मुलांच्या तर्फेहि मी त्याचे अंतः-करणपूर्वक आभार मानतो. आमच्यापैकी कोणत्याहि मंत्र्याला निष्कारण ढवळाढवळ करण्याची इच्छा नसते ही गोष्ट तुम्हाला सर्वाना माहीत आहेच. आणि शिक्षा करण्याचा अधिकार सर्व विद्यार्थ्यांनी आपण होऊन मंत्र्याना दिला असला तरीहि त्याचा उपयोग आम्ही अगदी क्वचितच करतो. विद्या-श्रमाच्या कीर्तीला कलंक लावणाऱ्या अपराध्याना आम्ही शिक्षा केली नाही तर मुलांच्या सद्वर्तनाच्या मुळावरच घाला येईल, आणि विद्याश्रमाचे उज्ज्वल नाव मलिन होईल. म्हणून हे विरोध सोडून देऊन आपण सर्व सलोख्याने वागूं या; आणि आपली सर्व शक्ति आपल्या आश्रमाचे हित साधण्याकरिता, त्याचा कीर्तिसुगंध दशदिशांत पसरविण्याकरितांच खर्च करूं या."

" अगदी खरे आहे, वामन. " सभामंडपांत चोहोंकडे ध्वनी उमटूं लागले आणि सर्व विद्यार्थी हळूहळू आपापल्या खोल्यांकडे पांगले. नागेशची वर मान करून पाहण्याचीसुद्धां छाती होईना. सर्व मुलांच्या समक्ष श्रीकांताने रागें

भरावें, आपले दोष दाखवावे आणि ते निमूटपणे ऐकून घेणे आपल्याला भाग पडावे, कांही मूठभर उपद्यापी मुलातच आपली गणना व्हावी या गोष्टी नागेशला–आजपर्यंत स्तुतीला आणि मानसन्मानाला सरावलेल्या नागेशला–सहन करणे जड गेले यात आश्चर्य नाही.

सभामंडपातून तो बाहेर पडला; लज्जा आणि अपमान यांमुळे त्याची मुद्रा कावरीबावरी झालेली दिसत होती. अपमान, क्रोध आणि द्वेष इत्यादि त्याच्या मनातल्या मनांत धुमसत असलेले विकाराचे स्फुल्लिंग त्याच्या डोळयातून बाहेर येऊं पाहत होते. बाहेर येताच त्याची व प्रभाकरची दृष्टादृष्ट झाली. "आजच्या सगळ्या प्रकरणाचा अगदी चिवडा करून टाकलास तूं. कसले घाणेरडे काम केले आहेस तूं आज!" तो प्रभाकरला म्हणाला.

"कोणी, मी ? नागेश, मुळींच नाही."

"नाही तर काय? तुला लाज वाटायला पाहिजे सगळ्या गोष्टीची."

"खरोखर, नागेश, कोणाला लाज वाटायला पाहिजे ? जनार्दन आणि त्याचे नादान दोस्त याना उचलून धरण्याबद्दल तुला, कां माझ्या नेहमीच्या शूर, वीर आणि धाडशी सन्मित्राची बाजू राखण्याबद्दल मला?"

"नेहमीचाच, शूर वीर काय?" नागेशने चिडून उत्तर दिले.

प्रभाकराने उत्तर दिले नाही; त्याच्याकडे आपली तेजस्वी दृष्टि रोखून क्षणभर पाहिले, आणि हलकेच त्याच्या खांद्यावर नेहमीच्या स्नेहभावाने हात ठेवून त्याला म्हणाला, "नागेश, तूं हल्ली पूर्वीसारखा आनंदी दिसत नाहीस."

"मला काय झाले आहे न दिसायला ?" नागेशच्या स्वरात चिडखोरपणाची झांक अजूनहि कायम होती.

"कारण तुझ्या हल्लीच्या कृत्यांपेक्षा तुझे अंतःकरण अधिक थोर आहे; तुझ्या आजच्या वागणुकीपेक्षा तुझा खराखुरा स्वभाव अधिक उदार आहे. आणि तो तुझा स्वभावच तुला आजच्या वागणुकीबद्दल पश्चात्ताप करावयास लावील. आपल्या अंतःकरणात तूं या क्षुद्र विचारांना इतका थारा का देतोस?"

नागेश अगदी स्वस्थ उभा राहिला. त्याने उत्तर दिलें नाही. डोळे वर करून पाहिलेंसुद्धा नाही. प्रभाकर चालूं लागला आणि जातांना अर्धवट स्वतःशीं अर्धवट नागेशला ऐकूं येईल इतक्या मोठ्याने गुणगुणूं लागला.

'प्रबलतमसामेवं प्रायः शुभेषु हि वृत्तयः
स्रजमपि शिरस्यन्धः क्षिप्तां धुनोत्यहिशंकया ॥'

नागेशनें हे सुप्रसिद्ध चरण ऐकले, तो समजला. प्रभाकराचे स्नेहार्द्र शब्द त्याच्या अंतःकरणांत खोल जाऊन रुतून बसले. शत्रूंच्या लाघवी व मायावी भाषणापेक्षांहि मित्राने अंतःकरणपूर्वक कळवळून उच्चारलेल्या शब्दांची ही जखम अधिक खोल, अधिक तीव्र होती. पण ती जखम भरून काढण्याची वेळ अजून आली नव्हती.

# प्रकरण पंचविसावें

## दोन वर्षानंतर

दोन वर्षे म्हणजे या अनंत कालाचा केवढा लहानसा अवधि; पण त्या लहानशा अवधीत व्यासविद्याश्रमांत कितीतरी नव्या-जुन्या घटना घडून आल्या.

ते पहा प्रभाकर आणि मोहन आपल्या नेहमीच्या धीर-गंभीर वृत्तीने नदीकांठी महल करावयास निघाले आहेत. पहिल्यापेक्षां आतां दोघेहि शरिरानें उंच आणि सशक्त झाले आहेत, पण त्यांच्या मुद्रेवरील पूर्वीचा भारदस्तपणा, व मोकळया मनाचे निदर्शक हास्य अजून तसेच कायम आहे. प्रामाणिक व सच्छील अंतःकरणाचे प्रतिबिंब त्यांच्या तेजस्वी व पाणीदार डोळ्यांत स्पष्टपणे दिसून येत आहे.

बाळपणाचा सुखाचा काळ फुलपांखरांप्रमाणे रंगीबेरंगी फुलांवरून निष्कारण नाचण्यात त्यांनी घालविला नाहीं. मोकळेपणाच्या आनंदाचा योग्य उपभोग घेऊनहि उदात्त ध्येये आणि जीवितांतील सुंदर तत्त्वे याच्याशी त्याचा उत्कृष्ट परिचय झालेला आहे; आत्मसंयमनाची संवय अंगी बाणून घेतल्यामुळे तारुण्यांतील विकाराच्या विनाशक शक्तीला स्वायत्त ठेवणें त्याना कठीण भासत नाहीं. तारुण्याच्या उन्मादक तुफानातून, शुद्ध अंतःकरण, आरशासारखी निर्मळ मनोवृत्ति आणि बाळपणाच्या आनंदाच्या आठवणी घेऊन ते जगाच्या धकाधकीत पुढे सरण्यास तयार झालेले आहेत.

आणि क्रीडांगणावर निष्काळजी वृत्तीनें हिंडणारा, आपल्या खुशालचेंडू दोस्तांशी मोठमोठ्याने गप्पा छाटणारा हा कोण बरें? विजारीच्या खिशांत हात ठेवून कुछ-पर्वा-नै-वृत्तीने टोपी एका कानावर कलती ठेवून देऊन ऐटीनें हिंडणारा हा आपला जुना दोस्त नागेश. सहज पाहताक्षणी त्याची ओळखहि पटत नाहीं, इतका त्याच्या मुद्रेत बदल झालेला आहे. आतांच पहा ना, त्याच्याजवळून ते शिक्षक जात आहेत त्यांना अभिवादन करण्याकरिता आपल्या मानेला पहा कसा ऐटीनें तो हिसका देतो आहे. जणूं काय आपण

त्यांना अभिवादन करीत आहोत हा त्यांच्यावर एक महदुपकारच आहे! गेल्या दोन वर्षांत नागेशच्या शीलाचा पारा पुष्कळच खाली उतरला आहे. त्याच्या गर्वाला प्रोत्साहन देणारीं व त्याची निष्कारण स्तुति करणारीं लहान मुलें त्याला आतां आवडतात. त्याच्या विचारांच्या ओघाला वाममार्गाने वळण देणारीं व त्याकरितां त्याच्या खोट्या अभिमानाचे प्रस्थ माजविणारीं मोठीं मुलें त्याच्याभोंवती आता जमत असतात. सहजसुंदर, मनोहर वस्तु त्याला आतां आवडत नाहीत; त्याऐवजीं मूर्ख मुलांचा बाष्कळ विनोद आणि दुसऱ्याचे मर्म ताडन करणारी निंदाप्रचुर थट्टा त्याचे मन आकर्षण करूं लागली आहे.

भिंतीला लागून असलेल्या बाकावर एक पुस्तक घेऊन अरविंद वाचीत बसला आहे. दुखण्यांतून तो लवकरच पूर्ण बरा झाला हें खरें; तरीहि जनार्दनच्या पाशवी क्रूरतेचे परिणाम त्याच्या चर्येवर अजूनहि स्पष्ट दिसत आहेत. कोणत्याच खेळांत तो हौसेने भाग घेत नाही. त्याचे भ्यालेल्या हरणाच्या पाडसासारखे मोठे काळेभोर पाणीदार डोळे व थोड्याशाहि विकारानें मनाची चलबिचल होताच त्याच्या निस्तेज चेहऱ्यावर येणारी खिन्नता पाहताच पाहणाऱ्याचे हृदय त्याच्याबद्दल अनुकंपेने भरून येते.

जनार्दन अद्याप विद्याश्रमात आहेच. दोन वर्षांपूर्वीच तो विद्याश्रमांतील विद्यार्थ्यांना अनीतीचा मार्ग दाखवून समाजाची व त्यांच्या आयुष्याची कमी हानि करीत नव्हता. आणि ह्या दोन वर्षांनंतर हे नुकसान करण्याचे त्याचे सामर्थ्य द्विगुणित झाले आहे. आडदांड शक्ति, क्रिकेटमधील त्याचे प्राविण्य, इतर दोस्तावरील त्याचे वजन या सर्वांच्या योगाने लहान मुलांच्या चारित्र्य-नौका फोडून टाकून त्याना भर समुद्रात गंटगळ्या खाण्याला लावणारा एक प्रचंड अपघाताचा खडकच तो बनून राहिला आहे. इतकें असूनहि सहसा शिक्षकांच्या नजरेस न येण्याची काळजी घेण्यांत तो अतिशय कुशल झाला आहे. त्यामुळें सर्व अपराधांचा मुख्य सूत्रचालक म्हणून आणि विद्याश्रमांतील स्वच्छ व पवित्र वातावरण गढूळ करणारा कालिया नाग म्हणून सर्वांना त्याची माहिती असली, तरी त्यानें केलेल्या अनेक अपराधांपैकीं एकाचेंहि माप पुराव्यानिशी त्याच्या पदरांत घालणें कोणत्याहि शिक्षकाला शक्य झाले नाही.

पण आपला मनोहर कोठें दिसत नाही तो ? तो पहा लहान मुलासारखा वसतिगृहाच्या दगडी पायऱ्यांवरून दुडदुड धांवत येणारा, पूर्वीसारखाच आनंदी वृत्तीने थट्टाविनोद करीत तो आपल्याकडेच येत आहे. दोन वर्षात त्याच्या आनंदी वृत्तीत आणि कोटिबाज विनोदात मुळीच बदल झालेला दिसत नाहीं. आतासुद्धां पोट धरधरून तो हंसत आहे आणि तोंडी परीक्षेंत शशिकान्ताने दिलेली चमत्कृतिपूर्ण उत्तरे आणि आचार्य रत्नाकर यांनी त्याची केलेली संभावना यांची सुधारून वाढविलेली आवृत्ति तो भार्गवला ऐकवीत आहे. त्याचे हें नाटक चालू असतांच शशिकान्त तेथे आला आणि आपली स्तुतिस्तोत्रे तो गात असलेला पाहून त्याने त्याच्या पाठीवर थाप ठेवून दिली व त्याला माहीत असलेली एकुलती एक कोटि केली.

" डुल्या, डोलणे पुरे कर आता!" तो म्हणाला. "मार खाशील अं, डुल्या! " या त्याच्या पूर्वीच्या ठराविक उत्तराऐवजी हे नवीन उत्तर त्याने पाठ केले होते.

" अगदीच शिळी कोटी ! मला वाटते ही आम्ही अनेकदा ऐकली आहे." असे म्हणून त्याने शातपणे शशिकान्ताच्या डोक्यावर चापटी मारून त्याची टोपी उचलली आणि क्रीडांगणावर पळण्यास सुरुवात केली. शशिकान्तानें त्याचा पाठलाग सुरू केला, पण तो फार वेळ चालणे शक्यच नव्हते. म्हणून भार्गवहि त्याच्या मदतीला धावून आला आणि मनोहरच्या मागे पळूं लागला.

क्रीडांगणाच्या दुसऱ्या टोंकाला जनार्दन आपल्या दोस्तांशी गप्पा छाटीत उभा होता " यंदाचे वर्ष मोठ्या आनंदात जाणार एकूण. "

" त्यात मुळीच संशय नाहीं, दोस्त, " बाळूने त्याला उत्तर दिले.

" मला वाटत होते की जगांतला सगळा आनंद अलीकडे नाहीसा होऊं पाहत आहे कीं काय—पण नाहीं. पुनः आपलें साम्राज्य या पृथ्वीतलावर चमकूं लागले." रंगनाथनें त्याची साथ केली.

" तो प्रभ्या यंदा म्हणे मुख्य मंत्री आहे. त्याच्या तोंडावरची माशी तरी त्याला उडवितां येते का?" जनार्दनाला तिरस्कारानें हास्याच्या उकळ्या फुटूं लागल्या आणि बाळू व रंगनाथ यांनीं त्याच्या हास्याचे प्रतिध्वनि उमटविले.

" एकादा शेणामेणाचा गोळा मंत्रिपदावर बसविला असता तरी चाललें असतें. " रंगनाथानें डोळे उडवीत वक्तृत्व केले.

" बूटपॉलिशची बाटलीसुद्धां–" मनोहर आपल्या उद्योगांत निमग्न होऊन त्यांच्या शेजारून पळत जात होता. त्याने रंगनाथाचे शेवटचे वाक्य ऐकून हळूच त्याचा टोला उलटविला.

" आग लागो तुझ्या–" "याद राखून ठेव कधी तरी तुझा सूड घेईन मी." रंगनाथने त्याची चेष्टा ऐकली. पण मनात पुटपुटण्याशिवाय त्याला कांही करतां येणे शक्य नव्हते.

" यंदाच्या मंत्रिमंडळात हा सुद्धा आहेना रे? " बाळूने प्रश्न टाकला.

" हो तर," शंकराने उत्तर दिले. " आणि मोहनसुद्धां ! " मोहनचे नाव निघतांच त्यांच्या कपाळावर तिरस्काराच्या तीव्र आठया दिसूं लागल्या. " आणि नागेश हाहि आहे! "

" हं, हं, नागेश; खरा वीरगडी तो," जनार्दनने आपली संमति दर्शविली.

" आणि अगदी आपल्या पसंतीचा. " बाळूने पुरवणी जोडली. " खरा दिलदार गडी ! "

नागेशची आणि बाळू-जनार्दन याची इतकी गट्टी जमावी हे जगातलें कितवे आश्चर्य !

" आणि त्याची आई सरदार घराण्यातली आहे नाही?" शंकर जामदार आपल्या केसाच्या भागावरून हात फिरवीत म्हणाला.

" हे पहा, दोस्त, आजच्या ह्या आनंदाच्या प्रसंगी अन्याबाच्या घरी वसंत-पूजा करायचा बेत ठरवायचा." जनार्दनने आपल्या गळ्याच्या पोटात प्रेमानें डंवचून सूचना केली.

" आणि ह्या उपटसुंभ मंत्र्यांची छाती असली तर त्यांनी चहाडबुचकेपणा करावा." रंगनाथने पुस्ती जोडली.

" त्याना आपला हात एकदा दाखवायला पाहिजेच नाहींतरी ! "

त्यांच्या या अधिकाधिक असभ्य होत जाणाऱ्या संवादाचें वर्णन करून वाचकांना उद्वेग आणण्याची माझी इच्छा नाही. त्यापेक्षां नदीकांठच्या पवित्र वातावरणांत उच्च भूमिकेवरून विहरणारे मोहन आणि प्रभाकर यांचा प्रेमळ संवाद ऐकणे कितीतरी अधिक आनंददायक आहे.

* * *

" तो बघ, मोहन, " प्रभाकरने एक लहानसा गुळगुळीत दगड उचलून थोड्या अंतरावरच्या उभ्या सुळक्यासारख्या उंच दगडावर नेम धरून मारला. " मला वाटते अगदी तोच तो दगड. "

" तोच दगड ! " त्याचा नेम चुकला तरी कोणत्या दगडाला उद्देशून तो बोलत होता ते मोहनच्या लक्षात आले. त्यानेहि त्यावर नेम धरून एक दगड मारला आणि विचारले, " तोच दगड ! मग काय त्याचे? "

" तीन वर्षांपूर्वी असाच एक दिवस संध्याकाळी तूं त्या दगडावर बसला होतास नाहीं?"

" होय, आणि माझा उडालेला हातरुमाल पाण्यात बुडण्यापूर्वी तूं उचलून आणलास. होय, तो दिवस मोठा भाग्याचा समजतो मी. मला चागली आठवण आहे त्या दिवसाची. पाठकशास्त्र्याच्या हस्तलिखित-प्रकरणानंतरचे दिवस होते ते. त्या दिवशी तूं माझ्याशी बोलशील ही मला स्वप्नांतसुद्धा आशा नव्हती."

" ते काय म्हणून?" अगदीं सहज प्रभाकरने विचारले.

" तूं म्हणजे इंद्राचा ऐरावत समजत होतो मी! तुझ्याशी परिचय व्हावा ही जरी इच्छा असली तरी आपण एकमेकाशीं बोलूं हे मला शक्यहि वाटत नसे."

" तुझे आपले काहीं तरीच! " प्रभाकर म्हणाला. " पण मी प्रथम आपणहून तुझ्याशी बोलायला सुरुवात केली हे एकाअर्थी चागलेच झाले म्हणावयाचे ! कारण तूं काही माझ्याशी मैत्री करायला आपणहून आला नसतास ही माझी खात्री आहे. कदाचित् आपली आजपर्यंत फारशी ओळखहि झाली नसती, नाही ? "

" निदान त्या वेळेला तरी मी तुझ्याशी मैत्री जोडण्यास पुढे आलों नसतों. ते माझे अज्ञातवासाचे दिवस होते ना. पण जाऊंदे, मला आठवतें ते सगळे–मी त्या दगडावर बसलो होतो नि खालची मजा पाहत होतों."

" किती सुखाचे दिवस होते ते, नाही? तसे दिवस पुनः परत आले तर किती छान होईल! आज तूं मंत्री झाला आहेस आणि मी मुख्य मंत्री झालों आहें."

" होय. आपण फार लवकर पुढे आलों येवढी गोष्ट खरी."

" माझ्याऐवजी तूं मुख्य मंत्री असतास आणि मी साधा मंत्री असतो तर किती छान झालें असतें असे मला अजूनहि वाटते. पण, मोहन, तूं मला मदत करशील ना?"

" मग तुला शंका कसली आली त्यात? तुला लागेल ती मदत मी करीन."

" शंका नाहींच मला. तुझी मला खात्री नसती तर मुख्य मंत्री होण्यापेक्षां मी विद्याश्रम सोडूनच गेलो असतो. पण कांहीं म्हण मुख्य मंत्री होण्याइतके माझे वजन आहे असें मला वाटत नाहीं. क्रिकेट, फुटबॉलमध्ये मी तुझ्यासारखा पटाईत थोडाच आहे!"

" म्हणून काय झालें, तूंहि कांहीं वाईट खेळत नाहींस. लढाईतून पळून जाणारा भित्रा शिपाई तूं खास नाहींस."

" मुळींच नव्हे. हा पहा मी खांद्यावर बंदूक घेऊन पवित्र्यांत राहिलो. आतां आकाशातून शस्त्रास्त्रांचा वर्षाव झाला तरी मी रणांगणांतून एक पाऊलहि मागे घेणार नाहीं." आणि खरोखरच सैन्यांतील शिपायाचा अभिनय करीत–' सावधान ' होऊन प्रभाकर उभा राहिला.

" आणि हा मी तुझा सहावा शिपाई गडी तुझ्या खांद्याशी खांदा भिडवून उभा आहे." मोहन उजवा पाय पुढे टाकून त्याच्या शेजारी उभा राहिला.

" सहावा ? माझा पहिला दोस्त मी म्हणेन. तुझ्यावरचे चार मंत्री कांहीं मला फारसे उपयोगी पडणार नाहींत. बाबूला धोरणच कमी. नेहमी त्याचे डोकें दुखत असतेच; घनश्याम तर नुसता पुस्तकांतला किडा, लहान पोरेंसुद्धां त्याची टर उडवितील. त्याचे वजन मुळींच नाहीं. राहतां राहिला नागेश–तुला माहितच आहे नागेश कसा आहे तो. "

" होय, हल्लीं नागेश कसा आहे हे मला चांगले माहीत आहे. घरभेद्या सेनापति तो. खरा धोका त्याचाच. ओहो! डुल्या, आपली स्वारी इकडे कोणीकडे? " मनोहरला येतांना पाहून तो म्हणाला.

" आपल्या सेवेस हा दास हजर आहे. पण हा घरभेद्या सेनापति कोण ? मी तर नव्हेना ? "

" तूं? छुल्या, छे! आपला नागेश. मंत्र्यांच्याबद्दल आमच्या गप्पा चालल्या होत्या. " मोहनने खुलासा केला.

" घरभेद्या सेनापति—देशद्रोही, फितुर, गुप्त हेर किंवा प्रत्यक्ष शत्रू म्हण," मनोहर संतापाने म्हणाला. " हे पहा, प्रभाकर, मला थांबवूं नको. त्याचे नाव निघाले की मला माझा राग आवरत नाहीं. आणि मी जर ही शिव्यांची लाखोली वाहून माझ्या रागाच्या वाफेला बाहेर येऊं दिले नाहीं, तर साचलेल्या वाफेमुळे माझा बॉयलर फुटून जायचा एखादे वेळीं. "

उदार अंतःकरणाच्या प्रभाकराला आणि शांत-स्वभावी मोहनला मनोहरच्या या लाखोलीत हातभार लावणे शक्य नव्हते. पण नागेशबद्दल त्यांना कमी तिरस्कार वाटत होता असे नाहीं. मंत्रिपदाचे अधिकार उपभोगणारा असला तरी, मंत्र्याची जबाबदारी न ओळखणारा, आश्रमाचे नियम मोडून शिस्तीला उघडपणे धाब्यावर बसविणारा, धूम्रपानादि व्यसनांना व हॉटेलांना उदार आश्रय देणारा आणि हलक्या मुलांशी उघड व गाढ दोस्ती राखणारा मंत्री, मंत्र्याचे वजन कमी करून वातावरण जितके दूषित करूं शकतो तितके कोणतीहि बाह्य संकटे करूं शकत नाहीत.

" क्षितिजावर ढग जमूं लागले आहेत. भयंकर तुफानाचीं ही पूर्वचिन्हे आहेत." प्रभाकर गंभीरपणे म्हणाला. " तूं मला मदत करशीलना ? "

" त्याची मुळीच काळजी नको. पण मी मंत्री असलो तरी माझा क्रम किती तरी खाली आहे. शिवाय माझा स्वभाव आहे उतावळा, एखादे दिवशी त्या जनाळ्याशी माझी चांगली झटापट जुंपायची मला भीति वाटते. "

" वाः, मग तर छान. आमच्यावर पडूं पाहणारी ही वीज तूं पकडून तिला गाडून टाक म्हणजे झाले. " प्रभाकर म्हणाला.

" आणि—

**पकडोनि तो लाल विलोल गोल**
**देई समाधी जलधींत खोल.** —असेचना? "

" श्रीकान्त अन् वामन अन् दिनकर हे कसे खणखणीत मंत्री होते नाहीं? ते दिवस तुला आठवतात का? " प्रभाकर त्याच्या काव्याकडे फारसे लक्ष न देतां म्हणाला.

" आणि एका प्रसंगी एका मुलाची कशी स्तुति केली होती ते तुला आठवते कां ? " मोहनने उत्तर दिले. " चल, उगीच का निराश होतोस? त्या वेळेला कांहीं आम्ही ह्या उडाणटप्पूंची पर्वा केली नव्हती, मग आतांहि त्यांना भिण्याचे काय कारण आहे? "

" पण त्या वेळेला त्यांच्या मदतीला मुकुंद होता आणि त्याच्यासारखीच पांचवी-सहावीतील कितीतरी मुले होती."

" मग आम्हालाहि मदत करणारीं आहेतच. " मनोहर म्हणाला. " सहावीतला भार्गव आहे. नंतर झालेच तर, आपला विलाप करणारा शशी आहे. त्याच्या डोक्यात बटाटे असले तरी हातात हत्तीचे बळ आहे आणि नाना काय कमी आहे—सिंहासारखा शूर आणि रेड्यासारखा प्रतापी वीर आहे तो— "

" वा डुल्या, तं तर अगदीं युद्धाच्या गोष्टी बोलूं लागलास की! "

" लढाई होणार यात शंकाच नाही—अगदी हातघाईची. त्या जनाळ्याची जाळी आताच तयार होऊं लागली आहेत. मघाशी अक्कड फक्कड आणि बागडे यांना मी पाहिले ना—अगदी हातात हात, गळ्यांत गळा घालून त्यांचे रहस्य चालले होते, ते काही उगीच नाही. "

" म्हणजे काय म्हणतोस तू?" मोहनने हंसत विचारले.

" काय म्हणतो ! —शंकर, रंगनाथ आणि बाळू, दुसरे काय म्हणावयाचे— अक्कडखान शंकर, फक्कडखान रंगनाथ आणि बांगडखान बाळू."

" या दुष्टांशी दोन हात करण्याचा प्रसंग आलाच तर आणखीहि दोघांची आपल्याला मदत होइल. " मोहन म्हणाला. " अंतु आणि अरविंद."

" सुग्रीव आणि अंगदच ते!" मनोहर म्हणाला. " पण अरविंदाची काय मदत होणार ? मोठ्या, टपोऱ्या, पाणीदार डोळ्यांनी तो टकमक पाहत बसेल झाले. "

" असे नको समजूंस तूं , डुल्या, त्याच्याहि डोळयांत कांहीं तेज आहे. "

" नाहीं कोण म्हणतो? त्याच्या तेजाची प्रभा प्रभाकरालाहि मागें सारील."

" डुल्याचा वेताळ आला पुनः मूळ पदावर. "

" पुरे कर रे आतां. पण हें भांडण आतांच विकोपाला जाईल असें तुला कां वाटतें?" प्रभाकरानें पुनः मूळ विषयाकडे लक्ष वेधलें.

" त्याचे असे आहे. हल्लीच्या इतकीं दांडगीं मुले सहावीत कधींच नव्हतीं. त्यांच्यांतल्या एकाच्याहि अंगीं सभ्यपणा नाहीं आणि त्या जनाळ्यांच्य जाळ्यांत ती सहज सांपडतात. " मोहननें खुलासा केला.

" शिवाय नागेश आहेच त्याची बाजू उचलून धरायला. "

" श्रीकान्ताच्या वेळेपासून तो आणि जनार्दन मंत्र्यांच्या अधिकाराविरुद्ध नहमी कारस्थानें करीत असतात. पण कुछ फिकीर नहीं!—तो पहा आपला अंगद दुसऱ्या एका नवीन मित्राला घेऊन येतो आहे. कोणरे तो? "

" तूंच ओळख की, " मोहन म्हणाला. त्याच वेळेला एका लहान गुट-गुटीत मुलाला घेऊन अरविंद त्यांच्याजवळ येऊन पोहोचला.

" वा मोहन, हा तुझा भाऊ दिसतो. पहिले दिवशीं तूं आलास आणि बाळूची जिरवलीस त्या दिवशीं तूं अगदीं असा दिसत होतास. कसें काय, छोटेसाहेब?" आणि नवीन मुलाला हातानें धरून जवळ बसवीत तो म्हणाला, " तूं खरा भाग्यवान आहेस, बुवा! थोरला भाऊ मंत्री आणि अरविंद तुझी काळजी घ्यायला प्रथमपासूनच तयार. आमच्या वाट्याला इतके भाग्य नव्हतें आलें. "

" खरेंच, दादा, विद्याश्रम मोठी छानदार शाळा आहे नाहीं! पुष्करवाडी-पेक्षांहि मला येथें जास्त करमते. " मोहनचा धाकटा भाऊ मधुकर म्हणाला.

" थोडा थांब, मधू, इतक्यांतच स्तुतीचा वर्षाव करूं नको. " मोहननें गंभीरपणे उत्तर दिलें. अरविंदच्या मुद्रेवर हास्यांतहि उदासपणाची छटा भासूं लागली, डोळ्यांत कारुण्याचा भाव दिसूं लागला.

---

# प्रकरण सव्विसावें

# निर्नायक राष्ट्र

**यदि न स्यान्नरपतिः सम्यङ्नेता ततः प्रजा ।**
**अकर्णधारा जलधौ विप्लवेतेह नौरिव ॥**

व्यासविद्याश्रमातील वातावरण दूषित करणाऱ्या ज्या अनेक घटना दोन वर्षांच्या अवधीत घडून आल्या त्यांपैकीं कांहींचे दिग्दर्शन मागील प्रकरणांत आलेंच आहे. तेथील शिक्षकमंडळींतहि पुष्कळ बदल झाला होता. पाठकशास्त्री यंदाचे वर्षींच विद्याश्रम सोडून गेले होते. प्रभाकरच्या वडिलांनी आपल्या इनामगावीं नवीनच स्थापन केलेल्या संस्कृत पाठशाळेवर मुख्याध्यापक म्हणून त्याची नेमणूक केली होती. पण ह्या त्याच्या बढतीमुळें व्यासविद्याश्रमाचे मात्र नुकसानच झाले. त्यांची कांटेतोल व निःपक्षपात शिस्त, त्याचे गंभीर व न्यायनिष्ठुर वर्तन या सर्वांचा परिणाम इतर शिक्षकांवर व पर्यायाने विद्याश्रमातील वातावरणावर पुष्कळच होत असे. तो नाहीसा झाल्यामुळे एका करारी शिक्षकाला विद्याश्रम मुकला व निःस्पृह व विद्याव्यासंगी गुरूला विद्यार्थी मुकले.

पाठकशास्त्री गेल्यानंतर दुसऱ्याच महिन्यांत शांतारामांनी विद्याश्रम सोडला. पुण्याच्या एका कॉलेजमध्यें प्रोफेसर म्हणून त्यांची नेमणूक झाली. त्याचे शिक्षकांवर व विद्यार्थिगणांवर असलेले वजन, त्याची लोकप्रियता, कच्च्या विद्यार्थ्यांशी सहानुभूतीने, ममतेने वागण्याची हातोटी व त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना मार्ग दाखविण्याच्या दृष्टीनें मदत करण्याची तत्परता या सर्व गुणांची यापुढे विद्याश्रमात होणाऱ्या वादळांत अतिशयच वाण भासली

आणि या संकटांवर ताण करण्याकरिताच कीं काय सत्र सुरू होताच आचार्य रत्नाकर अतिशय आजारी पडले. त्यांचेवर शस्त्रक्रिया करावी लागून दोनतीन महिने त्याना रुग्णालयांत काढावे लागले. विद्याश्रमाचीं सूत्रे दुसऱ्या एका कमकुवत शिक्षकाच्या हाती गेल्यामुळें हें सत्र विद्याश्रमाच्या सर्व इतिहासांत अत्यंत धकाधकीचें, वावटळींनीं पूर्ण आणि शिक्षक व विद्यार्थी या दोघांनाहि दुःखदायक झालें.

व्यासविद्याश्रमांत येतांच पुष्करवाडीपेक्षांहि हे स्थान मधूला अधिक रमणीय वाटलें; पण आल्यानंतर थोड्याच दिवसांत त्याचे मत बदलूं लागले. मधू आला तेव्हा शांताराम विद्याश्रम सोडून जातील याची कोणालाच कल्पना नव्हती. म्हणून त्याचे नांव त्यांच्या अधिकाराखाली असलेल्या वसतिगृहाच्या विभागांत दाखल करण्यांत आले होते. शांतारामांची योग्यता, विद्यार्थ्यांच्या शीलाकडे असलेली त्यांची अखंड दृष्टि इत्यादि अनेक गुणामुळे त्यांच्या विभागांत मधूला दाखल करविण्याची मोहनने खटपट केली होती. मोहनच्या शेजारी, त्याच्याच विभागांत मधूला ठेवल्यास मधूच्या गुणांचा स्वतंत्र रीतीने विकास होण्यास अवसर मिळणार नाही, थोरल्या भावाची मदत नेहमीच मिळूं लागल्यामुळे स्वावलंबी बनून स्वतःच्या परिश्रमाने संकटांतून मार्ग काढण्यास तो शिकणार नाही असे त्याच्या वडिलाना वाटले; व म्हणून त्यांनीहि या गोष्टीला संमति दिली. पण थोड्याच दिवसात शांताराम गेले आणि त्यांच्या विभागाची देखरेख चितोपंत या नवीन शिक्षकाकडे देण्यात आली. वसतिगृह व तेथील देखरेख, विद्यार्थ्यांशी प्रेमळपणे वागून त्याचबरोबर करारीपणाने त्यांना सन्मार्गावर राखण्याची कला, किंवा स्वतःचा बडेजाव भासूं न देतां स्वतंत्रपणे विद्यार्थ्यांच्या अंगच्या गुणाचा विकास घडवून आणण्याची हातोटी या सर्व बाबतींत चितोपंत अगदी नवीन होते. या गोष्टी त्यांना अजून शिकावयाच्या होत्या आणि त्या शिकतांना त्यांनी ज्या चुका केल्या त्यांचे परिणाम विद्याश्रमांतील मुलाना जाणवल्याशिवाय राहिले नाहीत.

नागेश आणि रंगनाथहि याच विभागांत होते. आणि नागेशच मंत्री असल्यामुळे त्यांच्या विभागांतील विस्कळित शिस्तीची जबाबदारी त्याचे-वरहि बरीचशी होती. नागेशचे स्वतःचे वजन हितकर नव्हतेच आणि शिस्त राखणारा दुसरा मंत्रीहि त्या विभागांत नव्हता. नवीन येणाऱ्या लहान मुलांवर योग्य देखरेख ठेवून, इतर आडदांड मुलांच्या त्रासापासून त्यांचें संरक्षण करून विभागांत शिस्तीचे वातावरण राखण्याची पूर्वपरंपरा नागेशने सांभाळली नाही. इतकेंच नव्हे, तर लहान मुलांना अधिक सवलती देऊन एक प्रकारें त्यांचे लाड करून तो त्यांना बिघडवून तरी टाकी अथवा स्वतःच्या बेशिस्तीच्या वर्तनाचें त्यांना अनुकरण करूं देऊन त्यांना वाहत्या वाऱ्यावर सोडून देई.

मधूच्याकडे त्याचे लक्ष प्रथमपासूनच वेधलें गेले. पाहतां क्षणींच कोणाचेहि लक्ष वेधून घेणारा मुलगा मधू होता हें तर खरेंच; पण त्याला दुसरेहि कारण होते. नागेशची मनोवृत्ति आज अत्यंत खालावलेली असली, तरीहि मूळची त्याची वृत्ति सुमार्गगामी होती. जे शांत पवित्र वातावरण आपण सोडून दिले, त्या मार्गानें जाण्याचा प्रयत्न करण्याकडे त्याची वृत्ति मधूनमधून वळे. मधूची दोस्ती करून आपला पोकळ गर्व व ताठा न सोडताहि आपल्या पूर्वीच्या दोस्तांशीं पुनः आपली गट्टी जमेल अशी त्याला अंधुक कल्पना होती.

पण ते आता होणार नव्हते. एखादा मुलगा एकदा उतरणीला लागला कीं, तो जातांना आपल्या मार्गात असे कांही कृत्रिम अडथळे उत्पन्न करून ठेवीत असतो की, त्याची इच्छा असली तरीहि त्याला परत त्या मार्गानें मागे फिरणें शक्य राहत नाही. आणि नागेशचा नवीन दोस्त विष्णु हाच त्याचा परत फिरण्याचा मार्ग आडवणारा खरा निवडुंग होता. विष्णु वयाने लहान–अवघा तेरा वर्षाचा असला तरी दुर्गुणांत अनेकांच्या गुरुस्थानी तो शोभण्यासारखा होता. निढावलेल्या गुन्हेगारासारखे त्याचें अंतःकरण शांत आणि कठोर होते, तरी त्याची मुद्रा लहान बालकासारखी निष्पाप दिसे.

नवीन येणारी मुले साहजिकच वयाने लहान असत, आणि रंगनाथ, विष्णु यांच्या तालमीत तयार झालेल्या मुलांचें चाडाळचक्र इतके दुर्लंघ्य असे कीं, ह्यांतील बहुतेक मुलें त्या वातावरणाच्या जाळयांत गुरफटून जात. एखादा मुलगा घरच्या उत्कृष्ट वळणामुळे किंवा स्वभावतःच निराळ्या वळणाचा असला तर ह्या नवीन नाठाळ घोड्याला तयार करून आपल्या उडक्या चालीवर चालावयास शिकविण्याचें काम विष्णु करी. अशा मुलाशीं सुरुवातीस अत्यंत प्रेमळपणे वागून त्याचा विश्वास ते संपादन करीत; आपली प्रचलित असभ्य भाषा, फसवेगिरीचे वाममार्ग, शिस्तींतील पळवाटा व शिक्षा चुकविण्याचे डाव, तसेंच असत्य भाषणाचे प्रकार व वसंतपूजादि कार्यक्रम यांचा ते त्याला थांगहि लागूं देत नसत. आपला विद्याश्रम, आपले वसतिगृह व त्यातील आपला विभाग यांबद्दल विलक्षण अभिमान त्याच्या अंतःकरणांत ते जागृत करीत व त्या अभिमानाच्या भावनेच्या जोरावर आपल्या विभागांतील मुलांच्या कार्यक्रमांत उत्साहानें भाग घेण्यास व त्याची कुणकुणसुद्धां दुसऱ्या

विभागांतील विद्यार्थ्यास लागूं न देण्यास ते त्याला शिकवीत. प्रसंगी त्याच्या प्रामाणिक भावनांची चेष्टा करून, केव्हा त्याला भीति दाखवून अगर इतर आमिषानीं किंवा प्रलोभनांनीं मोह पाडून ते त्याला आपल्या मार्गावर आणीत. विष्णु जाळे पसरी; सावज पकडून त्याची शिकार करण्याचे काम रंगनाथ उरकी; आणि नागेश मध्ये ढवळाढवळ करीत नसे व आपल्या डोळ्यांदेखत चालत असलेल्या प्रकाराकडे उघड दुर्लक्ष करून त्याना उत्तेजन देई. अनीतीच्या मार्गाला लागलेली आणि योग्य मार्गदर्शकाच्या अभावीं त्यातून बाहेर निघूं न शकलेली कितीतरी मुले म्हणत असतील कीं, " होय, नागेश, तूंच, तूंच आणि तुझ्या मित्रांनीच आम्हाला भुरळ पाडली आणि आमच्या आयुष्याचे नुकसान केलें. "

ह्या सत्राच्या सुरुवातीस चारपाचच नवीन मुलांना ह्या विभागात प्रवेश देण्यात आला होता. त्यापैकीं दोघे घरच्या लाडानीं बिघडलेले व गैर-शिस्तीच्या वातावरणात वाढलेले असल्याने चितोपंताच्या विभागातील सावळ्या गोंधळात ते सहज आत्मसात् होऊं शकले. मध्यम स्थितींत वाढलेला, जगातील दुष्टपणाचे वारेहि न लागलेला हरि या नांवाचा एक साधा-भोळा मुलगा होता. सत्यासत्याचा विधिनिषेध न बाळगणारी व अनीतीच्या कर्दमात मनसोक्त विहार करणारी ही मुले पाहून त्याच्या सरळ निष्पाप मनाला मोठाच धक्का बसला. पण प्रतिकूल परिस्थितीच्या वावटळींतहि सत्याचा मार्ग न सोडण्यास लागणाऱ्या निर्धाराचा त्याचे ठिकाणीं अभाव होता. त्यामुळे तो सहज पाण्याच्या ओघाबरोबर ओढला गेला आणि थोड्याच दिवसात वेगाने प्रगती करून दुर्वर्तनाच्या बाबतीत त्याच्या पुढें गेलेल्या मुलांना त्याने सहज गांठले. सतीश बिचारा अशक्त आणि भित्रा मुलगा होता. धाकदपटशा दाखवून कोणतेहि कृत्य त्याच्याकडून करवून घेणें मुळींच कठीण गेले नाही. भीतीच्या जोरावर कार्य करवून घेण्याची कल्पना भयंकर वाटते नाही? पण जगात सर्वत्र काय चालले आहे? राहतां राहिला मधू. त्याला आपल्या पंथाची दीक्षा देणें सहजसाध्य होणार नाहीं ही गोष्ट या काककंपूच्या तेंव्हांच लक्षांत आली. पण ते निराश झाले नाहींत. अत्यंत काळजीपूर्वक गळ टाकून मासा पकडण्याचा त्यांनी निश्चय

केला. विशेषतः आपला कट्टा दुश्मन मोहन देशमुख याचा अत्यंत निकटचा संबंध असल्यामुळे तर त्यांना दुप्पट अवसान आले व कांहींहि करून मधूला आपल्या कंपूंत ओढून मोहनचा सूड उगविण्याचा त्यांनी निश्चय केला.

सज्जनांच्या अंतःकरणप्रवृत्ति खरोखरीच नेहमी सन्मार्गदर्शी असतात काय? संदेह उत्पन्न झाला असताना त्याची साक्ष नेहमीच प्रमाणभूत मानावी काय? ह्याचे निश्चित उत्तर कोण देऊं शकेल? पण मधूच्या अंतःकरणात प्रथमपासूनच विष्णूबद्दल तिटकारा उत्पन्न झाला होता. विष्णूची निष्पाप दिसणारी मुद्रा, त्याचे मधुर भाषण, मधूबद्दल तो दाखवीत असलेले प्रेम व त्याची एकंदरीत सभ्यतेची वागणूक यामुळे पुष्कळांना तो सरलतेची, प्रामाणिकपणाची मूर्ति भासत असे आणि मधूलाहि त्याच्याविषयी आपल्याला तिटकारा का वाटतो याबद्दल स्वतःचेंहि समाधान करतां येईना. अर्थात् त्याने आपली ही वृत्ति दाबून टाकली आणि विष्णूशीं उघड मैत्री तो ठेवूं लागला. आणि मधूशी वागतानाहि विष्णूला आपले सभ्यपणाचे सोंग बरेच दिवस टिकवावे लागले. मधूचे हृदय इतके सरळ होते, त्याची वृत्ति इतकी प्रेमळ होती, त्याची वागणूक इतकी निष्पाप होती की, आपल्या विषारी बाणांनी त्याचे अंतःकरण दूषित करण्याची संधिच विष्णूला सांपडेना. आणि अखेर कंटाळून विष्णूने आपले खरे स्वरूप जेव्हा उघड केले तेव्हां मधूला त्याच्या दुष्ट हृदयाची इतकी किळस आली की, अंगावरचा घाणेरडा किडा तिरस्काराने झाडून टाकावा त्याप्रमाणे मधूने त्याची मैत्री तट्दिशी तोडून टाकली.

तेजस्वी मधूची निर्भय वृत्ति आणि बाणेदार वर्तन पाहून विष्णूच्या मनांतहि पश्चात्तापाची लकेर चमकून जाई. आजच पहाना, विष्णु नागेशच्या खोलीत बसला होता. आपल्या दोन्ही हातानी त्याने आपले डोळे झाकून घेतले होते. जणूं काय आपल्या बाळपणाची दृश्यें, हट्टाने डोळ्यापुढें मूर्तिमंत न दिसावीत म्हणूनच त्याचा हा प्रयत्न होता. त्याच्या डोक्यांत फक्त एकच विचार सारखा घोळूं लागला. "वेळ निघून गेलीच काय? मला पुनः सुमार्गावर येतां येणार नाही काय? सन्मार्गाकडे नेणारा रस्ता कायमचाच बंद झाला काय?"

इतक्यांत त्याच्या विचारांची सांखळी एकाएकी तुटली; त्याची विचारपरंपरा थांबली. नागेश खोलीत आला आणि धाडदिशी दार लावीत म्हणाला,

" चला, वेळ निघून गेली, आतां काय त्याचें ! "

विष्णूच्या विचारपरंपरेलाच हे उत्तर होते काय ? निदान विष्णूला तसें वाटले खास. विद्याश्रमातील शारदोत्सवांत विद्यार्थ्यांच्या स्वकृत कवितांचा एक कार्यक्रम ठरविण्यांत आला होता व उत्कृष्ट ठरणाऱ्या कविताना पारितोषिकेहि दिलीं जाणार होती. कीर्तीची हौस, महत्त्वाकांक्षेची धुकधुगी नागेशच्या अंतः-करणात अजून थोडीशी शिल्लक होती. त्याने कविता करण्याचें ठरविले. पण चिकाटी, उत्साह व प्रेमळ मित्रांचे उत्तेजन यांच्या अभावीं पहिल्यासारख्या उत्कृष्ट कृति त्याच्या हातून घडत नसत आणि वेळेवर तर त्या क्वचितच होत. आपल्या वेड्यावांकड्या कविता घेऊन तो आज सकाळीच शिक्षकांच्याकडे गेला. पण कविता घेण्याची मुदत टळून गेल्यामुळे 'आतां कविता घेतल्या जाणार नाहीत' म्हणून त्याला सांगण्यांत आले. खोलीत आल्याबरोबर त्याने उच्चार-लेले शब्द त्याच्या कवितानाच अनुलक्षून होते.

विष्णूचे डोळे केव्हाच पाण्याने भरून आले होते. आणि नागेशचे शब्द ऐकताच त्याच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. नागेश समोर उभा असलेला पाहूनहि त्यानें त्या पुसून टाकण्याचा प्रयत्न केला नाहीं.

" हे काय, विष्णु ? माझ्या कविताबद्दल तुला इतके वाईट कधींपासून वाटावयास लागले ? " नागेश आश्चर्याने म्हणाला.

" तुझ्या कविताबद्दलच का हे सारे ? "

" सारें ! थोडेच झाले वाटते ? पण तूं असा रडतोस कां ? पाळण्यांत तरी तुझ्या डोळ्यांना कधी पाणी आले असेल की नाहीं कोण जाणे आणि आज हें काय ? कां ढोंग सारे ? "

आपल्याला अश्रू गाळतांना नागेशने पाहावे ह्याबद्दल त्याला आता लाजल्या-सारखे वाटूं लागले. आपला त्यानें उपहास करावा, याबद्दल तर त्याला त्याचा रागहि आला तो एकदम झणकऱ्याने खोलींतून जाऊं लागला. हें पाहतांच नागेश जरा सौम्यपणें म्हणालाः

" छे विसू ! इतकें रागावायला काय झालें ? कांहीं विशेष झालें आहे काय आज ? " पण विसूचा राग अजून पूर्ण शांत झाला नव्हता. नागेशचा हात झिडकारीत तो म्हणाला, " मला जाऊं दे आतां. "

" जाऊं दे तर जा. येथे कोणाचें अडलें आहे तुझ्यावांचून! " नागेशलाहि आता त्याच्या चमत्कारिक वर्तनाचा राग येऊं लागला.

नागेशला चिडलेला पाहतांच विष्णु परत फिरला. नागेशवर त्याचें तसेच अढळ प्रेम होते. शिवाय नागेशला दुखवून आजच्या घटकेस आपलें चालणार नाही, हा विचारहि त्याच्या मनांत आला असावा. तो दारांत थबकून उभा राहिला.

" कां, थाबलास का ? जा ना. तुला जायचे आहे ना ? "

विष्णु परत आला. नागेशचा हात त्याने आपल्या हातात घेतला. त्याच्या मुद्रेवर कारुण्याच्या छटा मूर्तिमंत दिसत होत्या. जणू काय तो झाल्या प्रकाराबद्दल नागेशची क्षमाच मागत होता.

" आज तूं असा चमत्कारिक कां वागतो आहेस? काय झाले आहे तुला, विसू ? "

" थाब, मी तुला सगळें सांगतो. आपल्या विद्याश्रमांतील ही सर्व चागली मुले पाहून मला स्वतःबद्दल फार वाईट वाटले. वर्तन सुधारण्याची वेळ निघून गेली काय? सन्मार्गाने जाण्याचा माझा रस्ता बंद झाला काय? म्हणून माझ्या मनांत विचार येऊं लागले. इतक्यात तूं आत आलास, दार लावलेस आणि म्हणालास ' वेळ निघून गेली. ' मला वाटले माझ्या प्रश्नाचेच हे उत्तर ईश्वराने दिले, आणि मला वाईट वाटले."

विष्णूला इतक्या गंभीरपणे बोलताना नागेशने आजपर्यंत कधीच ऐकले नव्हतें. थोडा वेळ थांबून तो म्हणाला, " चांगली मुले! तुझ्यापेक्षां चांगली मुले! ढोंग आहे सगळे. इतर मुले जरा जास्त हुशार असतात, तुझ्यापेक्षां अधिक चागली बतावणी, उत्कृष्ट फसवेगिरी करूं शकतात इतकेंच. "

नागेशच्या ह्या खुळ्या शब्दांनी विष्णूला धीर आला. त्याच्या मुद्रेवर नेहमीचे मिस्किल हास्य विलसूं लागले, डोळे लबाड आनंदानें चमकूं लागले. पुनः त्याला पश्चात्तापाची लहर आली नाही; सदसद्विवेकबुद्धीची टोचणी भासली नाही.

नागेशने निराळ्या प्रकाराने त्याचे समाधान केलें असते तर—?

---

# प्रकरण सत्ताविसावें

# ऐरणीवरचा हिरा

**विन्ध्याटवीषु विरलाः खलु पादपास्ते**
**ये दन्तिदन्तमुसलोल्लिखनं सहन्ते ।**

"काय रे विसू , मधू काही वळणावर येण्याचे चिन्ह आहे का? " रंगनाथ एक दिवस विष्णूला विचारूं लागला.

"मुळींच नाही. तो अगदी आपल्या भावाच्या वळणावर जाईल. ही एक पीडाच आली आहे आपल्या विभागात! "

"आग लाव त्याला." रंगनाथची मुक्ताफळे वर्षू लागली. "गोडीगुलाबीने ऐकत नसेल तर चौदावें रत्न दाखविले पाहिजे. त्याची मिजास किती दिवस चालूं द्यायची ? "

"म्हणजे, रंगू , तुलासुद्धां त्याचा अनुभव आला म्हणतोस."

"कधींच मी त्याला ओळखून ठेवला आहे." मधू आणि रंगनाथ याना एकमेकांची ओळख कधींच पटली होती. निसर्गतः ज्यांच्या वृत्ति शत्रुत्वाच्या असतात त्यांना एकमेकांची ओळख न सांगताच पटते, ती कोणाहि मध्यस्थाने करून द्यावी लागत नाही.

एक दिवस सकाळी मधूच्या विभागांतील मुले वर्गातील अभ्यास करीत वसतिगृहांत बसली होती. मधूहि आपली पुस्तके घेऊन वर्गात दिलेल्या कवितांचे अन्वयार्थ लिहीत बसला होता, पण भोवताली चाललेल्या गोंधळात त्याला एक शब्दहि सुचेना. तेथील ५०-६० मुलांपैकी ५-६ मुलेसुद्धां मनापासून अभ्यास करीत नव्हतीं. कांहीचे आपसांत कुजबुजणे चालू होते. मधून मधून कागदाचे गोळे फेकणे, एकमेकाला हळूच चिमटे घेणें, वह्यांवरून किंवा पुस्तकांतील चित्रांना रंग देणें, असले उद्योग सर्वांचे सुरू होते. तेथें व्यवस्था ठेवण्यास व जरूर तर मुलांना अभ्यासात मदत करण्याकरितां चिंतोपंत हजर होते. पण अनुभवाच्या अभावीं त्यांना फारसें कांहीं करतां येईना. घटकेंत याला बोल, थोडया वेळाने त्याच्यावर रागव, मधूनमधून येरझारा घालून कोण

काय करतो आहे ते पहा, अशा प्रकारें खोलीत शांतता राखण्याचे त्यांचे प्रयत्न चालू होते. पण त्यांना यश क्वचितच येई. आज तर अगदीं निराश होऊन त्यांनीं तो प्रयत्नहि सोडून दिलेला दिसत होता. मधू एकटाच मन लावून पुस्तकात गढून गेलेला पाहून त्याला काही शब्द अडले आहेत कीं काय हे पाहण्याकरिता ते त्याची विचारपूस करूं लागले. चेष्टेने हंसण्याला आणि त्याच्याकडे पाहून वेडीवाकडी मुद्रा करण्याला मुलांना तो एक विषयच झाला. चिंतोपंत पुढे निघून गेल्यावर विष्णु हलकेंच मधूला म्हणाला, " कसा काय चालला आहे तुझा घोड्या? "

" हा अन्वयार्थ मला येत नाहीं. फारच कठीण आहे नाहीं ! "

" हो ! हो ! " विष्णूला हास्याचा उमाळा आला. " मी तुझी गाडी रूळावर आणून देऊं कां ? "

" तसे चालेल का केले तर ? " साधा भोळा मधू सरळपणे विचारूं लागला.

" हो ! हो ! हो ! " विष्णूला हास्याचा आणखी एक मोठाच उमाळा आला. " मी तुला एक जंमत दाखवितो. बघ तर खरा. आम्ही असे तुझ्या-सारखे दळीत बसत नाहीं. "

असे म्हणून त्यानें खिशातला हातरुमाल काढून नाकाला लावला आणि चिंतोपंतांजवळ जाऊन गंभीरपणे म्हणाला, " माझ्या नाकांतून रक्त येत आहे. मी बाहेर जाऊं कां ? "

" तुझ्या नाकातून रक्त येत आहे ? या आठवड्यात तुझ्या नाकातून हे तिसऱ्यांदा रक्त आले. तुला झाले आहे काय ? अन् दोघांचौघांच्या नाकांतून असेच रक्त येत आहे आताशी."

" मग मी काय खोटें सांगतो आहें की काय? " विष्णु जरा गरम होऊन म्हणाला. शिक्षकाने अशा तऱ्हेची शंका प्रदर्शित करून आपला मोठाच अपमान केला आहे अशी त्याची मुद्रा दिसत होती. पण त्यानें नाकावरचा हातरुमाल मात्र काढला नाहीं.

" उगीचच्या उगीच कोण म्हणेल तुला तूं खोटे बोलतोस म्हणून. बाकी हें विचित्र दिसते, पण तूं जा आत्तां. "

त्याच्या नाकातून रक्त खरोखर येत होते कीं नाहीं हें पुराव्यांनी सिद्ध करणे फारसे कठीण नव्हते. पण सर्व मुलांवर सारखाच विश्वास एकदम टाकून

त्यांना स्वाभिमानी व सत्यप्रिय बनविण्याचा हा चितोपंताचा भिडस्त प्रयत्न होता.

विष्णु दाराच्या बाहेर पडला. त्याच्या हास्याचा खडखडाट कोणालाहि सहज ऐकूं आला असता. दहाच मिनिटांत तो परत आला. सर्व कविताचा बिनचूक अन्वयार्थ लिहिलेला कागद त्याच्याजवळ होता.

"हा घे, नागेशनें मला लिहून दिला." मधूजवळ तो कागद देत तो म्हणाला. "दोन मिनिटेंहि त्याला लागलीं नाहींत. नागेश मोठा दिलदार दोस्त आहे नाहीं? तूं आतां अन्वयार्थाची कधींच काळजी करीत जाऊं नकोस. मी नागेशकडून करून आणीत जाईन."

"म्हणजे तूं वर्गात हाच दाखविणार काय ?" मधूला आश्चर्य वाटलें.

"त्यात काय झालें !"

"पण त्याना मार्क (गुण) देणार आहेत ना ?"

"छान, मला माहीत नव्हते तें. मग मला सगळेच्या सगळे मिळतील. त्यात बिघडलें कोठें ?"

"हे पहा, साधुमहाराज !" दुसरा एक तत्पक्षीय म्हणाला, "आमची ही नेहमींची युक्ति आहे. आयते आपल्यापुढे चालून येत आहे तर फुकट दळीत का मरा ?"

"नको बुवा," मधू इकडेतिकडे पाहत म्हणाला. "तुम्हाला वाटलें तर तुम्ही तसें करा. आपण नाहीं त्या फंदात पडणार."

"अहाहा, काय पण सत्पुरुष ! सत्याची मूर्तिमंत पुतळी ! सद्गुणाची खाण अगदीं !" विष्णु डोळे वर करून गंभीर मुद्रेने त्याची चेष्टा करूं लागला आणि इतरांनीं त्याची साथ केली. पण ह्या चिडविण्याचा परिणाम मधूवर मुळींच झाला नाहीं. अगदीं सरळपणे त्याने त्यांच्याकडे पाहिलें, त्याचा अन्वयार्थ लिहिलेला कागद परत केला आणि निमूटपणें तो आपल्या उद्योगाला लागला. मधूनें असा आपला उपमर्द करावा हें शूरांना कसें खपावें ? मधूला अन्वयार्थ लिहावयाचा असेल तर त्यानें ह्या कागदावरूनच उतरावा, नाहींतर त्याला अभ्यास करूं द्यावयाचा नाहीं, असा त्यांनीं निश्चय केला. एकानें त्याच्या वहीचें पान फाडून टाकलें, दुसऱ्यानें त्याचा टांक मोडून टाकला, तिसऱ्यानें त्याचा शब्दकोशत्र

उचलला. येथे कांहीतरी गडबड चालली आहे, हे चितोपंतांच्या लक्षांत आले. म्हणून ते तिकडे येऊन थोडा वेळ तेथेंच उभे राहिले. त्यांची चाहूल लागतांच उंदीर आपल्या बिळांत पळून गेले. मधू पुनः अन्वयार्थ आठवेल तसा लिहूं लागला. इतरहि नागेशनें लिहिलेल्या कागदावरून नकला करून घेऊं लागले. त्यांत एखादी चूक मुद्दामच करून ठेवण्यास व मधूनच एखादा शब्द बदलण्यास ते अर्थातच विसरले नाहीत. पण चितोपंतांची पाठ फिरतांच एका पठ्ठयाने आपली दौत उचलली आणि अगदी निर्विकार मुद्रेने मधूच्या वहीवर पालथी केली. मधूने परिश्रमपूर्वक लिहिलेल्या कागदावर शाईचे काळे-निळे तीनचार प्रवाह ओघळूं लागले. मधूहि हिरमुसला होऊन अगदी रडकुंडीस आला. अर्थात् त्या दिवशी अभ्यास केल्याशिवायच मधूला वर्गात जावें लागले. इतरांनी आपण लिहिलेले अन्वयार्थ दाखविले व कमी-अधिक गुण मिळविले. विष्णूला सर्वांत जास्त गुण मिळाले; पण मधूला—सर्व वर्गात प्रामाणिकपणे अभ्यास करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एकट्या मुलाला—अभ्यास न करण्याबद्दल शिक्षा भोगावी लागली. विष्णूची दुसऱ्या कोठेच तयारी नसताना आजच इतकी प्रगति का असावी याची शिक्षकाना शंका आली, पण त्याना त्याची चोरी उमगली नाही.

मधूशी जास्त खेळत बसण्याची जरूर नाही, तर आतां आपले खरे अंतरंग प्रगट करण्याची वेळ आली आहे असे विष्णूला वाटूं लागले. वर्ग सुटल्याबरोबर त्यानें मधूला गांठले आणि जणूं काय कांहीच घडले नाहीं अशा रीतीनें नेहमींच्या मित्रत्वाच्या नात्याने त्याच्याशी बोलण्यास सुरवात केली; पण मधूला हें सहन झालें नाही. त्यानें खांद्यावर ठेवलेला हात मधूने झिडकारला आणि त्याच्या तोंडाकडे टक लावून तो पाहूं लागला.

"अस्सें!" विष्णु म्हणाला. "एकदां काय ते नक्की ठरव. शत्रु कीं मित्र, काय पाहिजे तुला?"

"आजच्यासारखे फसवेगिरीचे आणि खोटे बोलण्याचे धंदे शिकवणार असलास तर तुझ्याशी मला मुळींच मैत्री ठेवायची नाहीं."

"ठीक आहे, आजपासून तुझा कट्टा वैरी मी. संभाळून रहा आणि माझी करामत बघ. पण एक प्रश्न विचारतों."

" तो कोणता ? "

" आजचा प्रकार तुझ्या भावाला तं सांगणार आहेस का ? "

मधूने उत्तर दिले नाही. चहाडी म्हणून किंवा तक्रार म्हणून नव्हे तर नेहमीप्रमाणेच एक नवीन घडलेली गोष्ट म्हणून तो आजचा प्रकार मोहनला सांगणार होता आणि अशा प्रसंगी कसें वागावे म्हणून त्याचा सल्ला तो घेणार होता. पण हें साधे विचारणेसुद्धां चहाडखोरीच्या सदरात पडेल की काय अशी त्याला विष्णूच्या प्रश्नामुळें शंका आली, म्हणून तो क्षणभर स्तब्ध राहिला.

" मला वाटलेच तसे. चहाडबुचके तुम्ही. तुझी जीभ लवल्याशिवाय कशी राहील ? तुला चाहेल ते करून घे. तूं सांगितलेस म्हणून माझे काय वाकडे करणार आहेस तूं ? "

" मी कशाला सांगायला बसलो आहें. " मधू म्हणाला. चहाडखोरपणा हा मुलांच्या जगात खरोखरच महा भयंकर अपराध समजला जात होता. अर्थात् मधूचे तोंड कायमचे बंद झालें.

विष्णूची धमकी कांही अगदीच पोकळ नव्हती. वसतिगृहाच्या अगदी टोकाला मधूची खोली होती. शिवाय त्याच खोलीत कुटाळ कंपूंतील पुढारी अशी चारपांच मुले असल्याने रात्रीच्या कुटाळ कंपूच्या अड्ड्याला ती जागा मोठी सोयीची होती. मधूची मनधरणी करण्यात आजपर्यंत फुकट वेळ दवडला अशी त्यांची आतां खात्री झाली होती आणि मधूने सरळ शरण यावे, नाहीतर होतील ते परिणाम भोगावे, या वृत्तीने तीं त्याच्याशी वागूं लागली. दिवसा त्याला फारसा त्रास होत नसे. वर्गात त्याचा बहुतेक वेळ जाई व मोहन, प्रभाकर, अरविंद यांच्या संगतीत तो उरलेला वेळ घालवी; पण रात्री व अभ्यासाचे वेळीं तो त्या अकारण शत्रूंच्या तावडींत सर्वस्वीं सांपडे. निजण्याची घंटा झाल्याबरोबर दिवे मालविले जात; पण ते थोड्याच वेळांत पुनः लाविले जात व कुटाळ कार्यक्रमास सुरुवात होई. पलीकडच्या टोंकाला एखादा हेर टेहळणीला ठेवून दिला कीं, शिक्षकांचा अचानक छापा येण्याची धास्ती मुळींच नसे व वसंतपूजा किंवा अग्निहोत्राचे कार्यक्रम निर्वेध चालवितां येत; पत्त्यांचा एखादा डाव अगर असाच दुसरा

एखादा साधा करमणुकीचा खेळ खेळण्याचाच कार्यक्रम असता तर मधूहि त्यांत सहज सामील झाला असता. पण चोरून संपादन केलेल्या पावबिस्किटा-वर ताव मारण्याचे, धूम्रपानाचे अगर एखाद्या नवीन आलेल्या लहान मुलाला छळून करमणूक करून घेण्याचे हे त्याचे कार्यक्रम त्याला शिसारी आणीत.

"हें पहा, मधू," विष्णु त्याला दुसरे दिवशी म्हणाला, "आज रात्रीं वसंतपूजेचा लहानसा कार्यक्रम ठरला आहे. आपला फाकडा गडी विठू आहेना—तो आजचा चहाचा खर्च करणार आहे आणि तो हरि—तो पत्त्यांची किंमत देईन म्हणतो. आपल्याला थोड्याशा विड्याहि हव्यात. त्याशिवाय मजा नाहीं."

मोठ्या ऐटीत व बेफिकीरीच्या स्वरात उच्चारलेली ही वाक्यें कशाची प्रस्तावना होती हे त्याच्या लक्षात आले नाही असे नाही. ह्या हलकट कार्यक्रमाची त्याला किळस येई. विशेषतः त्याच्याच वर्गातील दोन विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाला वर्गणी दिली आहे, असे सूचवून त्यानेहि वर्गणी द्यावी अशी अपेक्षा ध्वनित करण्यात आली, त्या वेळी काहीहि झालें तरी आपण वर्गणी देणार नाही असा त्याने आपल्या मनाशी निश्चय करून टाकला. आणि त्यांच्या त्या कार्यक्रमाचे रात्रीचे स्वरूप त्याने पाहिल्यानंतर आपला निश्चय योग्य होता याबद्दल त्याची खात्री झाली. त्या रात्रीची वसंतपूजा म्हणजे चहा-सिगारेटची रेलचेल, खादाडपणाचा सुकाळ, हलका विनोद आणि क्षुद्र निंदा व आनंदहीन उन्माद यांनी परिपूर्ण असलेला करमणुकीचा एक रानटी प्रकार होता.

"मग अर्थात् तूं कांहीतरी वर्गणी देणारच ना ?" विष्णूने अखेर उघड-पणें सुचविलें.

"नको बोआ."

"नक्यो बो—वाऽआ !" विष्णु वेडेवाकडे हेल काढीत त्याला वेडावून म्हणाला. "चुकलों. तुम्ही साधुडे लोक हे आमच्या लक्षांतच नाहीं. चहाचा तुम्हांला विटाळ व्हावयाचा आणि सिगारेटला शिवलात तर पितर नरकांत जावयाचे!"

तितक्यांत तिकडून विठू आला. विष्णूला मधूशीं बोलतांना पाहून कशा-संबंधीं संभाषण असेल हें त्यानें ताडलें आणि खिशांतून एक विडी काढून मधूपुढें धरली.

" नको बोआ, आपण नाहीं या फंदांत पडत." मधू म्हणाला.

" नको–बो–वाऽआ ! अरे या नको–बोवाला कशाला तूं आग्रह करतोस ? ते आपले साधुमहाराज आहेत ! "

झाले. त्या दिवसापासून मधूचे ' नको-बोवा ' हे टोपणनांव त्या कंपूंत रूढ होऊन गेले.

हा सर्व छळ मधूला एकट्याला निमूटपणे सहन करावा लागे. प्रतिकार करणे अशक्य नसले तरी निरुपयोगी होते. रुधिरप्रिय लांडग्यांमध्ये सांपडलेला एकाकी हरिण त्यांचा कितीसा प्रतिकार करूं शकेल? मोहन, प्रभाकर, मनोहर याच्याहि कानावर हळूहळू त्याच्या छळाच्या बातम्या जाऊं लागल्या, पण त्या पुष्कळशा दुसऱ्याच्या मार्फत कर्णोपकर्णी पसरलेल्या असत. मधूनें स्वतः या बाबतीत मौन धारण करण्याचे ठरविले होते; आणि चितोपंतांच्या विभागांतील विद्यार्थ्यांची जूट इतकी वाखाणण्यासारखी होती कीं, त्यांतील कोणतीहि बातमी इतर मुलाना समजत नसे. त्यामुळे मधूच्या छळाच्या भयंकर स्वरूपाची कोणालाच फारशी कल्पना आली नाहीं. मोहनचे प्रेमळ व 'उत्तेजनपर शब्द, प्रभाकरचें उत्कृष्ट उदाहरण, व मनोहरचा विनोद यांमुळे त्याला दिवस फारसा कंटाळवाणा वाटत नसे. आणि त्या उल्हासाच्या भरांत व परमेश्वरावरील निष्ठेच्या जोरावर रात्रीच्या दिव्यातून आपण लवकरच पार पडूं अशी त्याला उमेद वाटे.

त्याला खरे पाठबळ फक्त एका मुलाचेच होते आणि त्याला मदत करणारा हा मुलगा नागेश अर्थातच नव्हता. वसतिगृहातील त्या विभागाचा अधिकारी मंत्री म्हणून नागेशवर जी जबाबदारी येत होती ती ओळखून मधूचे संरक्षण करणे त्याचे काम होते. आणि थोडीशी न्यायनिष्ठुरता दाखवून हें अनीतीचें, निर्दयतेचे वातावरण दडपून टाकणें त्याला फारसें अशक्यहि नव्हते. कारण विष्णु व रंगनाथ यांच्या तंत्राने जरी बहुतेक मुले चालतांना दिसत असली तरी मुलांचा नैसर्गिक कल सत्याकडे, न्यायाच्या बाजूलाच असतो व थोडा कठोरपणा धारण करून त्यांना दुष्ट वळण देणारे हे कुजके आंबे निवडून काढले तर बाकीच्या नैसर्गिक मनोवृत्ति व्यक्त होण्यास अवसर सहजच मिळतो. मोहन व मनोहर हे श्रीपादरावांच्या विभागांतील अधिकारी मंत्री होते, आणि प्रभाकर हाहि दुसऱ्या विभागांत अधिकारी होता. त्यांच्या विभागांत एखाद्या लहान

मुलाला असा त्रास देण्याची कोणाची छाती झाली नसती, आणि झालेला त्यांच्या लक्षांत येताच त्याचा ताबडतोब बंदोबस्त झाला असता. बाळू व जनार्दन ही जोडी मोहनच्याच विभागांत होती. तरीहि त्याच्या विभागातील शिस्त इतर विभागापेक्षा अतिशय श्रेष्ठ होती. उलट आपल्या विभागांत वारा कोणत्या दिशेनें वाहत आहे हे पाहणे महत्त्वाचे आहे असें नागेशला कधींच वाटले नाही. यदृच्छया जे घडेल ते त्याने घडूं दिले, आणि अर्थातच गोष्टी नदीच्या ओघाबरोबर हळूहळू पण निश्चयाने रसातळास जाऊं लागल्या.

मधूला मदत करणारा एकटा मुलगा, मधूचा एकाकी दोस्त, नागेश नव्हता तर शशिकांत होता. अजागळपणें चालणारा, सर्व प्रकारच्या खेळांत स्वत:चें हंसूं करून घेणारा, वर्गात वेडींवाकडी उत्तरें देऊन स्वतःचा मंदपणा जाहीर करणारा हा शशिकात. त्याचें नांव ठेवताना त्याच्या आईबापांनी निःसंशय चूक केली होती. स्वतःच्या मंदपणाची जाणीव नेहमी तीव्रतेनें भासत असल्या-मुळे तो नेहमीं उदास वृत्तीने आपल्या खोलीत बसून राही. पण त्याचा स्वभाव एकलकोंडा झाला असला तरी त्याची मूळची वृत्ति कायम होती. त्याच्याशी सहानुभूतीने वागणारांशी त्याची मैत्री अगदीं शुद्ध व निष्कपट असे, आणि मनोहरच्या विनोदी चेष्टा व गमतीच्या खोड्या यांमुळे त्याची ही वृत्ति बरीच कायम राहिली होती. मधूचा छळ होत आहे हें त्याला समजलें. मधूच्याच खोलींत तो निजत नसल्याने प्रत्यक्ष मदत त्याला प्रसंगीं थोडीच करतां येई. पण जरूर तेव्हा त्याच्याशी सहानुभूतीचे चार शब्द बोलून तो धीर देई, ‘ आपला अखेर जय होईलच ’, ‘ सत्याचाच नेहमीं जय होतो ’ हे त्याला पटवून देई, आणि त्याचा उत्साह कायम ठेवी.

चहूंकडून दुष्टपणाचे पेंव फुटलेल्या चितोपंताच्या वसतिगृहात सहानुभूतीचे शब्द ऐकावयाला मिळणें व प्रसंगी मदत करणारा मित्र लाभणे ही गोष्ट कांहीं कमी महत्त्वाची नव्हती. मधूची व शशिकांताची मैत्री दिवसेंदिवस दृढ होत चालली असल्यास नवल नाही.

आणि शशिकान्त मधूला मदत करण्यांत प्रयत्नांची कसूर करीत नसे. नागेशकडे तो जाई, मधूच्या छळाची बातमी त्याला सांगे, आणि मधूला संकटांतून सोडविण्याचा त्याला आग्रह करी. “ तूं यांत लक्ष कां घालीत नाहींस ?” असेंहि तो त्याला विचारी.

" त्यात काय लक्ष घालावयाचें? लहान मुलाची भांडणें. आणि तो मधू आहेच जरा चढेल. टक्केटोणपे खाल्ले म्हणजे येईल ठिकाणावर." नागेश म्हणाला.

" खरें म्हणशील तर तुझ्यासारखा चढेल मुलगा मी पाहिलाच नाहीं. " शशिकान्त म्हणाला.

नागेश थक्कच झाला. " तुला ह्या भानगडींत पडून काय करावयाचे आहे ? मधूने वकील नेमला आहे का तुला ? "

" मी ह्यात पडणारच. मधू एक चागला मुलगा आहे. बाकीचे त्याला बिघडवूं पाहत आहेत, पण तो मला खंबीर भेटला आहे. त्याना आणि म्हणूनच हे त्याला छळताहेत. तो विष्णुच पहाना—"

" खबरदार विष्णूचें नाव घेशील तर; तो माझा मित्र आहे समजलास ? "

" मग तर तुला ह्याची अधिकच लाज वाटली पाहिजे. "

"अरे जा, आला आहे मला शहाणपण शिकवायला! असली पन्नास कारटी त्याच्यावरून ओवाळून टाकावीत. " नागेशला आपला आवेश आवरेना.

" कारटी !" शशिकान्त आपल्या आवाजात शक्य तितका तिरस्कार व्यक्त करीत म्हणाला. " तूं मधूला ओळखीत नाहीस. हे पहा, नागेश, तूं आपली जबाबदारी संभाळून वागूं लागलास तर हल्लीच्या आडदाडपणाला पुष्कळ आळा बसेल."

नागेश आश्चर्याने त्याच्याकडे टकमका पाहतच राहिला. शशिकान्ताचे तोंडून अशा तऱ्हेची भाषा त्याने आज प्रथमच ऐकिली. तो चिडून म्हणाला, " आपल्यासारख्या विद्वान्, हुशार, अक्कलवान् लोकांनी माझे कर्तव्य काय आहे हे मला शिकविण्याची कांही जरूर नाही. आमच्या व्यवस्थेला नांवें ठेवण्याची तुला जरूरी काय ? मधुटल्यासारख्या कानामागून आलेल्या मिर-पुल्यांची कड घेऊन भाडतोस होय? तुला कांही कोणीं माझ्यावरचा अधिकारी मंत्री नेमला नाहीं ना ? "

" तूं चिडलास म्हणून मी काहीं तुला भीक घालणार नाही. माझ्या मठ्ठ-पणाबद्दल तूं मला हंसलास तरी चालेल. पण तुझी हुशारी आणि तुझी ही बेजबाबदारी तुझी तुलाच लखलाभ होवो. तूं जर ह्याची व्यवस्था करणार नस-लास तर स्पष्ट साग. मग मी पाहतों मला काय करतां येईल ते. " शशिकांताचे

डोळे रागाने लाल झाले होते, आणि तो जेव्हा नागेशकडे टक लावून पाहूं लागला तेव्हां त्याच्या डोळ्याशी डोळा मिळविण्याची नागेशची छाती सुद्धा झाली नाही. शशिकांत रागारागानेच तेथून निघून गेला, तेव्हां शशिकांतहि आपल्यापेक्षा अधिक थोर, अधिक उदार अंतःकरणाचा आहे हे नागेशला भासल्यावांचून राहिले नाही. बिचारा नागेश! सर्व विद्यार्थ्यांमध्यें त्याच्यासारखा दुःखी मुलगा दुसरा नव्हता. आपल्या पापवृक्षाची कडू फळे चाखण्याचे प्रसंग आतां त्याच्यावर नेहमीं येत होते. पांकळ गर्व, वृथा अभिमान याच्या भरीस पडून त्याने लावलेल्या झुडुपाचे विषारी काटे आता त्याच्या अंतःकरणाला बोचूं लागले होते आणि त्याचे हृदय रक्तबंबाळ करून सोडीत होते.

दिवसामागून दिवस जाऊं लागले. मधू आपल्या पक्षात सामील होणे शक्य नाही ही गोष्ट त्याचा छळ करणाऱ्या कुटाळ कंपूच्या लक्षांत येऊन चुकली होती, आणि आता ते त्याचा नाद सोडून देण्याच्या बेतात होते. फक्त एकच गोष्ट मधूने कबूल केली असती तर ते मधूच्या वाटेस यापुढे फारसे गेले नसते.

आणि ती गोष्ट कबूल करणे मधूला फारसे कठीण का वाटावे हेंहि त्यांना समजेना. मधून मधून त्या खादाड कंपूच्या पार्ट्या, वसंतपूजा वगैरे होत. अन्यार्जाच्या हॉटेलातून वर्गणीच्या पैशांनी मागविलेल्या खाद्यपेयांवर यथेच्छ ताव मारला जाई आणि नंतर धूम्रपानाच्या आवृत्त्या चालत. हा सर्व कारभार खोलीत चालू असताना संकटाची आगाऊ सूचना देण्याकरितां एखादा टेहळ्या दाराबाहेर लांबवर बसवून ठेवण्यासहि ते चुकत नसत. रात्रीची निजण्याची घंटा झाल्यानंतर अखेरची फेरी मारून चितोपंत गेल्यानंतरच हे समारंभ सुरू होत हेंहि खरे. पण इतकी सावधगिरी घेतली असताहि आपल्या समारंभांची वर्दी शिक्षकांस लागणार नाही ना, ही भीति त्यांच्या हृदयात अखंड जागृत असे. अंधेरांत काजव्याप्रमाणे चमकणाऱ्या पेटविलेल्या विड्या उघड्या खिडक्यांतून सहज लांबवरहि दिसूं शकत आणि स्वतःचे अस्तित्व प्रकट करण्याची विड्या-सिगारेटच्या धुराला मोठी वाईट खोड आहे हेंहि त्यांच्या लक्षात असे. अर्थात् आपल्या समारंभाला हातभार न लावण्याइतका मधू अरसिक असला तर असो बापडा. पण निदान आपल्या कृत्यांची दाद त्यानें कोणत्याहि शिक्षकांस लागूं देऊं नये एवढी साधी मागणीहि त्यानें नाकारावी हें त्यांना सहन होईना.

त्याच्या खोलींतील सतीश आणि मधू यांखेरीज बाकीच्यांनी त्याना या बाबतीत वचनें दिलींच होतीं. पण मधू कांहीं केल्या ऐकेना. “मी कांहीं चहाडखोर हलकट मुलगा नाहीं. तुमच्या चहाडया मी अद्याप केल्या नाहीत आणि करण्याची मला जरूर नाहीं. पण जर एखाद्या शिक्षकाने मला उघड व सरळ प्रश्न विचारला तर मी खोटें सांगणार नाहीं.” असा खणखणीत जबाब तो देई.

अर्थात् ‘रंगनाथ, विष्णु आणि कंपनी’ यांनी इतरांची मदत घेऊन त्याचा हा विरोध, हा हट्ट नाहींसा करण्याचा निश्चय केला. त्याना तसें केल्याशिवाय गत्यंतरच नव्हते. गोड बोलून, समजूत घालून, वाद करूनहि मधू ऐकेना. ही एक गोष्ट मधूने मान्य केली, हा पहिला किल्ला सर झाला, की हळूहळू सबंध मधूला गिळंकृत करण्यास मुळींच वेळ लागणार नाहीं हें त्याच्या मनोदेवतेचें सांगणें होतें. शिवाय त्याच्या स्वतःच्या काळ्याकुट्ट मनोभूमिकेच्या पार्श्वभूमिकेवर मधूचा तेजस्वी, पाणीदार प्रामाणिकपणा इतका उठून दिसूं लागला कीं, त्याच्यासमोर त्यांना उभे राहण्याची, त्याच्यादेखत आपले समारंभ पार पाडण्याची त्यांना लाज वाटूं लागली. दगडासारख्या खंबीर मनोवृत्तीचा हा एकाकी निर्भय मुलगा आपले आनंदाने विहार करणारें अनीतीचे तारूं फोडून रसातळास नेतो की काय अशी त्याना भीति वाटूं लागली.

नीति-अनीतीचे हे युद्ध, दुष्ट निर्दय हलकट मनोवृत्तींनी निश्चयी सत्त्वशील मनोवृत्तीशी चालविलेला हा गजग्राह लवकर संपणारा नव्हता. तो कधींच संपणार नाहीं अशीच मधूला भीति वाटूं लागली होती. आणि केंव्हा केंव्हां माघार घेण्याचा, त्याचे म्हणणे कबूल करण्याचा मोह त्याला अनावर होई. त्यांच्या बाकीच्या गोष्टींत भाग न घेताहि फक्त गोप्यगोपनास साहाय्य करण्याची कबुली दिल्यासहि आपण किती लोकप्रिय होऊं याचें सुंदर चित्र त्याच्या नजरेसमोर उभे राही. शिवाय एखादा शिक्षक आपणास सरळ प्रश्न विचारण्याचा संभव अगदींच कमी आहे म्हणून खोटे बोलण्याचा प्रसंग कदाचित् कधींच येणार नाहीं, मग आजच्यापुरती कबुली देऊन हा छळ तरी कां थांबवूं नये असेंहि एक मन त्याला सांगे. एक दिवस रात्रीं त्याचें मन अगदींच हळवें झालें. त्याला हा छळ अगदींच असह्य झाला. इतका कीं, त्यांचें म्हणणें मान्य

करण्यास तो अगदी तयार झाला. गौप्यगोपनाची शपथ लिहिलेला कागद त्याच्यापुढे विष्णूने धरला. त्याच्यावर इतर सर्वांच्या सह्या होत्याच. मधू आणि सतीश यांच्याच फक्त सह्या नव्हत्या. पण सतीशबद्दल कोणालाच काळजी वाटत नव्हती. मधूची सही एकदा झाली का दोन रट्टे देऊन सतीशची सही सहज मिळवितां येईल ही त्यांना खात्री होती. म्हणून मधूला वळविण्याकरितां ते आपल्या प्रयत्नाची शिकस्त करीत होते.

मधू अंथरुणावर कागद व पेन्सिल धरून विचार करीत होता, भोवताली मुले घोळका करून उभी होती. एकजण त्याच्या पाठीवर थाप मारून त्याच्या सुविचाराबद्दल त्याला शाबासकी देत होता, " तूं अखेर आमच्यात येणारच " असे दुसरा म्हणत होता, तिसऱ्याने त्याच्या सद्गुणाची स्तुति चालविली होती. पलीकडे सतीश खिन्न मुद्रेने हे सर्व दृश्य पाहत होता. स्वत:चे मन कमकुवत होते तरी मधूच्या धैर्याची तो तारीफ करी, त्याच्या खंबीरपणाबद्दल त्याला खात्री वाटे आणि त्याच्या निर्धाराच्या आधारावरच तो आजपर्यंत टिकून राहिला होता. " मधू सही करणार काय ? " तो आपल्याशी विचार करूं लागला. " त्याने सही केली तर संपलेच. मग मलाहि सही करावी लागणार." असा विचार त्याच्या मनांत येत होता. अशा अर्थाचे अर्धवट वाक्य त्याने उच्चारलेंहि व मधूनें तें ऐकिले. झालें, त्याचा निश्चय ठरला. एका झटक्या-सरशी त्यानें कागद आणि पेन्सिल दूर भिरकावून दिली! आपण पाप करण्यास प्रवृत्त झालो तर त्याचे परिणाम आपण भोगूं. पण तेवढ्याने संपत नाही; आपल्या उदाहरणाने इतरांना आपण पापास प्रवृत्त करतो, ज्यांची मनें अस्थिर आहेत, निश्चय कोता आहे त्यांना पापी वृत्तीचा अवलंब करण्यास आपण उत्ते-जन देतो, हे चित्र त्याचे डोळ्यांसमोर उभे राहिलें. " छे, छे, दुसऱ्याला घेऊन मी पापांत पडणार नाही. " तो मनांत म्हणाला. ' **घडि घडि विघडे हा निश्चयो अंतरींचा। म्हणवुनि करुणा हे बोलतों दीन वाचा।**' अशी त्यानें परमेश्वराची प्रार्थना केली आणि हातांतली कागद–पेन्सिल तिरस्काराने दूर भिरकावून दिली !

" मी सही करणार नाही." तो म्हणाला. " मला सही करणे शक्य नाहीं. मी आजपर्यंत कधींहि खोटें बोलल्याचें मला आठवत नाही आणि मी खोटें

बोलणार नाही. '' हे त्याचे शब्द ऐकतांच इतरांचा नूर ताबडतोब पालटला. असभ्य व बीभत्स शब्दांचा पाऊस पडूं लागला आणि – पण नको, तें किळसवाणें वर्णन माझ्यानें पुढें करवत नाही.

ह्या सर्व दुःखाच्या भाराने, त्रासाच्या, संतापाच्या आगीने त्याचें अंतःकरण करपून चालले होते, त्याचे शरीर खंगत चाललें होते, त्याचा उत्साह मावळत चालला होता. विद्याश्रमात आला तेव्हाची त्याची हंसरी मुद्रा आतां नेहमी उदास दिसे. आनंदाने हरिणासारखा बागडण्याऐवजी तो मलूल होऊन कष्टाने जड पावलें टाकीत हिंडत असे. अद्यापपावेतों त्याने मोहनला आपल्या संकटांची जाणीव होऊं दिली नव्हती. पण आज त्याचे मन इतके उदास झालें होते की, कोणाला तरी सागून दुःखाचा भार हलका केल्याशिवाय, कोणाचा तरी सल्ला घेतल्याशिवाय त्याला राहवेना. जड पावलाने सावकाश सावकाश चालत तो मोहनच्या खोलींत आला. आपल्या छळणाऱ्याच्या विरुद्ध तक्रार करण्याकरितां तो आला नव्हता तर आपल्या वडिलांना पत्र लिहून दुसऱ्या शाळेत जाणे कितपत इष्ट, याबद्दल मोहनचा सल्ला घेण्याकरिता तो आला होता.

मोहन संस्कृत कोश पुढे घेऊन काव्य वाचण्यात गढून गेला होता. मधूला पाहतांच आनंदानें त्याने पुस्तके दूर सारलीं आणि मधूचे स्वागत केले.

" वा मधू, आज किती दिवसांनीं फिरकलास तूं इकडे. "

" तुला अभ्यास करायचा होयरे, दादा ? " मधूच्या आवाजांतील शोकमय विषण्णता मोहनच्या लक्षांत आली नाही.

" छे रे, मुळींच नाहीं. मी आतां उठण्याच्याच बेतात होतो इतक्यात तूं आलास. मला वाटतें कीं तुला भेटून किती तरी वर्षे होऊन गेलीं. होतास कोठें तूं इतके दिवस ? "

मधूने कांहीच उत्तर दिले नाही. मोहनच्या शेजारी बसून त्यानें मोहनच्या मानेला विळखा घातला आणि त्याच्या छातींत लहान मुलासारखें तोंड खुपसून रडूं लागला.

" अं, अरे झालें काय तुला एकाएकीं? " मोहनने त्याच्या डोक्यावरून प्रेमानें हात फिरवला. त्याच्या प्रेमळ कुरवाळण्यानें मधूला अधिकच रडें येऊं लागलें आणि आतां तर तो मोठमोठ्यानें हुंदके देऊं लागला. प्रेमळ माणसाच्या सहवासांत दुःखाचा उमाळा अधिक तीव्र होतो, अधिकच असह्य होतो.

"खरेंच, मधू, सांग ना काय होत आहे तुला?" मोहन थोडया वेळानें पुनः म्हणाला. "तुझे तोंड अगदी उतरलेले दिसतें. तुला वाटलें इतके कांहीं व्यासविद्याश्रम तुला मानवलेले दिसत नाही."

"छे रे, दादा, मला फारच त्रास होतो आहे येथें." आणि मधूच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या.

"अरे पण झालें काय तें तर सांगशील. सगळे मला सांग ना. अगदी भिऊं नको. तूं स्वतः तर कांहीं अपराध केला नाहीस ना?"

"मुळीच नाही, आणि मी तसले कांही करीत नाही म्हणून तर मला छळताहेत."

"असे आहे होय? त्यांत रडायला काय झाले? डोळे पूस पाहूं. तुझ्या मनाविरुद्ध एखादे वाईट कृत्य तुझ्या हातून करविण्याचे सामर्थ्य कोणाच्यातहि नाहीं. तुझा निश्चय मात्र खंबीर पाहिजे."

"ते खरेंरे, दादा, पण मला फारच छळतात ते. आतां अगदी सहन करणे शक्य नाही. अन् एकट्या शशीशिवाय माझ्या बाजूचें कोणीच नाहीं. तुलासुद्धा असाच त्रास झाला होता कायरे, दादा?"

"जाऊंदे ते. तूं स्वत: त्याच्या नादी लागूं नको म्हणजे झालें. लहान मुलांची भाडणे असतात हो, थोडा वेळ त्रास होतो. पण एकदा तूं त्यांना दाद दिली नाहीस म्हणजे तुझ्या वाटेस पुनः कोणी जाणार नाहीं! तुमच्या विभागांतील शिस्त अगदींच खालावलेली आहे हें मला माहीत आहे. पण म्हणून तर आपण आपले कर्तव्य अधिक नेटानें करावयास पाहिजे, नाही, मधू?"

"खरें आहे तुझे म्हणणे. पण माझ्यानें आतां नाही सहन होत हें. मला आतां येथे राहावेसे वाटत नाही. रोज उठून त्यांच्या शिव्यागाळी आणि लाथाबुक्क्या कोणी खाव्यात! रात्ररात्र मला झोंपसुद्धां येत नाहीं एखादे दिवशी."

"काय म्हणतोस तूं?" मोहनला आश्चर्य वाटलें; रागहि आला. "तुला थोडासा त्रास होतो हे माझ्या कानावर आलें होतें– अरविंदनें सांगितलें होते मला– पण इतक्या थराला गोष्टी आल्या असतील याची मला कल्पनाच नाही. खरेंच तुला त्रास देणारा एखादा माझ्या तावडींत सांपडूं दे, म्हणजे दाखवितों त्याला. त्याची काय छाती लागली आहे पुनः तुझ्या वाटेस जाईल?"

"पण हे सर्व मी तुला सांगणार नव्हतो. मी सांगणार नाही असें मीं वचन दिले होते. फारच त्रासदायक आहे येथे राहणे."

"त्याची तूं कांही काळजी करूं नकोस बरे ना, बाळ. आपल्याला योग्य वाटेल तें करावे आणि ह्या दुष्ट लोकांची मुळींसुद्धां पर्वा करूं नकोस. तुझ्या बाबतीत मी पाहतों काय करतां येईल ते. निदान हें सत्र वाट पहा; नाहींच जमले तर नानांना सागून तुला दुसऱ्या विद्यालयांत पाठविण्याची व्यवस्था करूं. बाकी, मधू, तुझ्यावांचून मला येथे करमायचे नाहीं अगदी."

"तूं जर येथे नसतास की नाही, दादा, तर मी इतके दिवस येथे टिकाव धरला नसता."

"माझ्यावर विसंबून राहण्यापेक्षा परमेश्वरावरच नेहमी विसंबून राहावे. पण एक गोष्ट तुला मी सांगतो, मधू, ऐकशील ना?"

"कोणती ती?"

"कोणीहि कांहीहि केले तरी कधीहि खोटे बोलूं नको किंवा तुझ्या स्वतःच्या मनाला वाईट दिसेल अशी कोणतीहि गोष्ट करूं नको."

"तुझ्या म्हणण्याप्रमाणे मी आजपर्यंत वागत आलोच आहें ना. यापुढेहि वागेन."

"तूं खोटं बोलणार नाहींस याची मला खात्री आहेच." मोहन त्याच्या आनंदी व तेजस्वी मुद्रेकडे पाहत म्हणाला. "तुझ्याबद्दल मला कधींच शंका वाटली नाहीं. मी प्रभाकरला सर्व हकीगत सांगेन. तो मुख्य मंत्री आहे आणि त्याच्या सल्ल्यानें सर्व व्यवस्था मी लवकरच करीन. वास्तविक हे नागेशचे काम आहे, पण—"

"नागेश! – दादा, त्याचा कांहींसुद्धा उपयोग नाहीं. तो सर्वांना मनमुराद वागूं देतो झालें. मला वाटते तो माझा तर तिरस्कार करतो."

"त्याची, आणि कोणाचीच तूं कशाला काळजी करतोस? तुझ्यासारखा भाऊ मिळायलासुद्धां भाग्य पाहिजे, बाळ. पण चल आतां जेवणाची घंटा होईल."

"मी तुझ्या वसतिगृहांत असतों तर किती छान झालें असतें नाहीं, दादा!"

दोघेहि तेथून उठले आणि भोजनगृहाच्या रोखानें चालूं लागले. मोहन उजवीकडच्या दाराने मंत्र्यांच्या पंक्तीकडे निघाला. मधूहि आपल्या बरोबरीच्या मुलांत मिसळून गेला.

जेवण आटोपून मधू आपल्या खोलींत जाऊं लागला तोंच त्याच्यामागून सतीशने त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याला अडविलें. त्याचा हात भीतीनें गांगरून गेलेला दिसत होता, आवाज कंप पावत होता. " मधू, आज काय करणार आहेस तूं ? सही करणार का रात्रीं ? "

" कारे ? आजच काय विशेष आहे? "

" आतांच रंगनाथ म्हणत होता कीं, आज रात्रीं सर्व तुझ्या खोलींत जमणार आहेत आणि तुझी अन् माझी सही घ्यायचे ठरलें आहे. बाकी तुझ्या-इतकी ताकद माझ्या अंगीं नाहीं खरेंच "

" मी खोटें बोलण्याचें कधींच कबूल करणार नाहीं. " मधूला मोहनशीं नुकतेंच झालेलें संभाषण आठवलें आणि तो निश्चयानें म्हणाला.

" मग मीसुद्धां कबूल करणार नाहीं. " मधूचा निश्चय पाहतांच सतीश-लाहि धैर्य वाटूं लागलें. "पण आज ते पुष्कळच त्रास देणार यांत शंका नाहीं."

" करून करून करणार काय ? दोन शिव्या देतील, एखाददुसरा गुद्दा लगावतील. आजपर्यंत शिव्या इतक्या ऐकल्या आहेत की आतां मला त्याचें कांहीं वाटेनासेंच झालें आहे. "

" तुमच्यासारखे दोन गुद्दे खाऊनहि धैर्य न सोडण्याची चिकाटी माझ्यात असती तर किती छान झालें असतें ! " त्याच्यामागें चालून त्यांचें संभाषण ऐकणारा एक लहान मुलगा म्हणाला.

" कोणरे तो ? " सतीशने मागे वळून विचारलें.

" मी तो–हरि–मी तुम्हांला सांगतो तुम्ही मुळीं धीर सोडूं नका. मी असाच त्याच्या धमकावणीला भ्यालो आणि आज माझी स्थितीहि कांहीं सुखाची नाहीं. त्या विठूसारखी किंवा माझ्यासारखी स्थिति होण्यापेक्षां थोडा त्रास सहन केलेला कांहीं वाईट नाहीं."

नेहमींच्या कार्यक्रमाप्रमाणे रात्रींची प्रार्थना आटोपली आणि मुलें आपापल्या अंथरुणावर पडलीं. पण आज कांहींतरी विशेष होणार आहे याचीं चिन्हें

भोवतालच्या वातावरणांत स्पष्ट उमटलेली त्याना दिसत होती. व्यवस्थापक शिक्षक रात्रीची फेरी मारून गेले. घंटा झाली, दिवे मालविले गेले, दोन-तीन मिनिटे शांततेत गेली असतील नसतील तोच एक मेणबत्ती पेटविण्यांत आली. बाहेरच्या दाराच्या पलीकडे टेहळणी ठेवून वर्दी देण्याकरिता एक मुलगा बसविण्यात आला आणि रंगनाथ, विष्णु आणि कंपनीची व्यवस्थापक मंडळी आंत आली.

"हे पहा, नको–बोआ, आज आम्ही तुला अखेरचे विचारणार आहो. हा कागद आणि ही सही करण्याची जागा. सगळ्याच्या सह्या झाल्या आहेतच आणि तुला पटो अगर न पटो तुला सही ही केलीच पाहिजे. तुझ्या-सारख्याच्या लहरीकरितां कांही आम्ही आमचे नियम बदलायला बसलो नाही. उद्यापरवा एक वसंतपूजेचा बेत आहे आणि तुझ्यासारख्या चहाड-बुचक्याना आम्ही चहाड्या करूं देणार नाही" हे रंगनाथचे वक्तृत्व होते.

"मी कांही चहाड्या करीत नसतो." मधू स्पष्टपणे म्हणाला. "आजपर्यंत तुम्ही काय मला थोडा त्रास दिला आहेत ? पण मी एकदाहि चहाडी केली नाही हे तुम्हाला माहीतच आहे."

"हे बघ आम्हांला ही व्याख्याने नकोत. होय की नाही एक काय ते सांग. सही करतोस की नाही?"

"थाब, रंगू, हा येथे एक दुसरा मुलगा आहे त्यानेहि सही केली नाही." विष्णूने सुचविले आणि सतीशचा हात धरून त्याने त्याला अंथरुणांतून उठवून बसविले.

"अस्से, तूंहि नाही सही केलीस अजून, होय? तुझ्या गमजा किती वेळ चालणार रे? हं, हा कागद, ही पेन्सिल आणि ही सही करण्याची जागा. आटप पाहूं, उगीच आम्हांला त्रास देऊं नको."

सतीशने कागद पाहिला, त्याच्या सर्वांगाला दरदरून घाम सुटला, हात कांपूं लागला.

"हें पहा," रंगनाथ म्हणाला. "तुझ्यासारख्या पाप्याच्या पितराला त्रास देण्याची माझी इच्छा नाही. पण थोडासा मासला पहा." असें म्हणून पाठी-मागं लपवून आणलेल्या वेताच्या छडीनें त्याच्या पाठीवर त्यानें जोरानें प्रहार

केला. सतीश बिचारा घाबराच झाला. चट्दिशीं पेन्सिल घेऊन त्यानें सही केली. पण लागलीच त्याने वर पाहिलें तो मधू त्याचेकडे पाहत असताना त्याला दिसला. त्याला धीर देण्याकरितां आपले सर्व बळ दृष्टीत एकवटून जणूं मधू त्याचेकडे पाहत होता. सतीश समजला, वरमला, चट्दिशी केलेली सही त्याने खोडून टाकली आणि डोक्यावर पाघरूण घेऊन गुरगुटून निजून गेला.

" रंगू, तूं त्याच्या कशाला नादीं लागतोस? आधी याला पकड. तो वळला की काम झालेच." विष्णूने सूचना केली. " मधू, तुझा मित्र म्हणून मी तुला सुचवितो की तूं आता नाही म्हणूं नकोस."

" माझा मित्र, तूं !" मधू तिरस्काराने म्हणाला. " तुला मी माझा मित्र मुळीच समजत नाही. तुझ्या शेजारीसुद्धा उभे राहण्याची माझी इच्छा नाही."

" अस्से होय. रंगू, त्याला जरा शहाणपणा शिकव–आणि तूं सतीश, तुझी हजेरी आम्ही लवकरच घेऊं." असे म्हणून त्याने निजलेल्या सतीशच्या पाठीतहि एक गुद्दा ठेवून दिलाच. पण हें पाहतांच मधूला त्वेष आवरेना; पुढे होऊन विष्णूच्या पाठीत त्याने असा एक जोराचा रट्टा ठेवून दिला की तो कोलमडून खालीच पडला. विष्णूची खोडकी जिरविण्याची मधूला अनेक वेळा इच्छा होई, तरी तो कष्टाने आत्मसंयमन करीत असे. पण आज सतीशला मारताना पाहतांच त्याला मन आवरणे शक्य झाले नाही.

रागाने–संतापानें लाल झालेला विष्णु उठून उभा राहिला आणि मधूच्या अंगावर धावला. पण रंगनाथने त्याला धरले आणि त्याचे समाधान करीत म्हणाला, " त्याची खोडकी तुला जिरवायचीच असली तर पुनः केव्हांतरी संधि येईल. आज त्याला सुटून जायचे आहे म्हणून त्याची धडपड चालली आहे हे दिसत नाही का तुला ? हं आता, नको-बोआ, बडबड पुष्कळ झाली, आता कामाला लागले पाहिजे. सही करतोस की नाहीं ? "

" कधीं नाहीं." मधू निश्चयाने म्हणाला.

" असें काय !"

"छडी नको, रंगनाथ, छडी नको." असें दोन चार मुलें सांगू लागलीं. पण त्यापूर्वीच रंगनाथनें हातांतील वेताचा एक प्रहार मधूच्या पाठींत केलाच.

काही माणसें शरिराने कितीहि सशक्त असली तरी त्याची त्वचा अतिशय नाजूक असते, त्यांना थोडेसेंहि दुःख सहन होऊं शकत नाहीं. त्यांच्यापेक्षा अशक्त मुलालाहि एखाद्या छडीचें कांही वाटले नसते, पण तोच प्रहार त्याच्या नाजूक त्वचेला दसपटीनी तीव्र भासतो. मधूची त्वचाहि ह्या वर्गापैकींच होती. असा काही प्रकार घडेल असे त्याला संध्याकाळपासून वाटत होते; त्याच्यापेक्षा अनेक पटीनी सशक्त असलेल्या आडदांड मुलांनी स्वतःच्या द्वेषाचे प्रदर्शन करण्याकरिताच त्याला अतिशय चिडविलेला होता आणि ह्या सर्व प्रकारामुळें त्याच्या क्षुब्ध झालेल्या मनोवृत्तीवर अतिशय ताण पडलेला होता. अर्थात् रंगनाथाने मारलेली छडी त्याला असह्य झाली; तो कळवळला; वाताचा झटका आल्याप्रमाणे हातपाय झाडूं लागला आणि त्याच्या कर्कश किंकाळीने तेथील नरपशूंच्या हृदयालासुद्धा घरे पडलीं. पण रंगनाथला त्याचे काय होय ? त्याने निर्दयपणाने दुसरी एक छडी ओढलीच.

इतक्यात धाडकन् दरवाजा उघडला आणि रागाने भयंकर दिसूं लागलेला शशिकान्त व त्याच्या पाठोपाठ नागेश आंत आले.

" अरेरे ! मी वेळेवर आलों नाहींच अखेरीस!" तो पाय आपटीत म्हणाला. "काय करीत होतां रे या पोराला तुम्ही ? " असे विचारीत त्याने मधूला जवळ घेतले आणि त्याच्या पाठीवरून हात फिरवून तो त्याचे शांतवन करूं लागला. पण शशिकान्ताच्या हाताचा पाठीला स्पर्श होताच मधूचे अंग थरारले आणि त्याने असे काही अंगविक्षेप केले की शशिकान्त चमकला; त्याचा सदरा वर करून त्याने पाहिले तो त्याच्या पाठीवर आंगठयासारखे जाड हिरवे-तांबडे दोन वळ त्याला दिसले.

"पहा, नागेश, पाहून घे हे." तो त्वेषाने बोलूं लागला. मधूला सोडून तो इतरांच्याकडे वळला आणि म्हणाला, "आणि हे कुत्रे येथें काय तमाशा पाहत होते काय? नागेश, **तुला** हें चालत असेल, पण **मला** हें चालणार नाहीं. पळतां कां नाहीं रे तुम्ही येथून ? " बाकीच्या मुलांना मेंढरांच्या कळपासारखें त्याने खोलीच्या बाहेर हांकून दिलें, आणि रंगनाथचा हात आपल्या लोखंडी पंज्यांत पकडून त्याच्या हातांतील छडी त्यानें हिसकावून घेतली. "तुझेंच कृत्य आहे ना हें सगळें ? "

" तुझा विचार काय आहे, शशिकांत ? " रंगनाथ म्हणाला. शशिकांतनें आपणाशीं इतक्या कठोरतेने वागावे हा जणूं काय आपला भयंकर अपमान झाला असें रंगनाथला वाटत होतें. " तूं जर अशी डोक्यांत राख घालून घेऊन गडबड करूं लागलास तर चितोपंत नाही तर दुसरे कोणी तरी येईल ना येथे!"

" अरे, अकलेच्या कांद्या, मला शहाणपण शिकवतोस होय !" शशिकान्ताला इतका रागावलेला कोणींच कधीं पाहिला नव्हता. " मला त्याची जरूर नाही, बरे ना. त्या मधूच्यासमोर उभे राहण्याचीसुद्धा तुला लाज वाटली पाहिजे. थांब, कुत्र्यासारखा झोडपून काढतो तुला. " आणि शशिकान्ताने एक छडी अशी जोराने ओढली की, नेहमीं अजागळ दिसणारा शशी इतका तापट कसा झाला याचेंच रंगनाथला आश्चर्य वाटले. त्याच्याशी जास्त बोलण्याची सोय नाहीं हे जाणून त्याच्या हातांतील छडी हिसकावून घेण्याचा रंगनाथ प्रयत्न करूं लागला. पण शशिकान्तानें त्याला एखाद्या लहान मुलासारखा झिडकारला आणि दुसरा एक रपाटा लगावला. ह्या माराखाली आपला निभाव लागणार नाहीं हे रंगनाथला पटलेले दिसलें आणि त्यानें उघड्या दरवाज्यातून बाहेर पळ काढला. पळता पळतांहि शशिकांताने आणखी दोन रट्टे त्याला लगावलेच.

मधूसारख्या असहाय मुलावर निर्दयपणें हात टाकणाऱ्या रंगनाथाला यथास्थित चोप देण्यास सापडल्यामुळे शशिकाताचा राग कमी झालेला दिसला. तो परत फिरला आणि नागेशकडे वळून म्हणाला, " नागेश, मी मठ्ठ असेन, तूं मला म्हणतोसच मुळीं तसें. पण तूं आपले कर्तव्य करीत नाहीस म्हणून मीं तें काम करायचे ठरविलें आहे. "

हातांतील छडीचा प्रसाद आपल्यालाहि देण्यास हा नरसिंह कमी करणार नाहीं, या भीतीने नागेश दोन पावलें मागेच सरला. इतर मुलांनीं केव्हाच काढता पाय घेतला होता. जातां जातां त्यानें त्यांना बजावलेच, " खबरदार, पुनः मधूच्या केसाला तर धक्का लावा तुम्ही ! याद राखून ठेवा. माझ्याशीं गांठ आहे. आणि तूं विष्णू, संभाळून रहा, समजलास ना? " आणि जातां जातां विष्णूलाहि थोडासा मासला दाखविण्यास त्यानें कमी केलें नाहीं. मग परत फिरून त्यानें छडीचे तुकडे केले आणि ते तुकडे खिडकींतून बाहेर फेंकून देऊन तो मधूच्या जवळ आला.

त्याचा राग आता शांत झाला होता. त्याची तडफ नाहीशी झाली होती. तो आता पुनः पूर्वीसारखा अजागळ शशी झाला होता. मधूशीं दोन शब्द बोलून त्याचे चित्त जरा शांत झाल्यावर तो आपल्या खोलीकडे निघाला.

" मधू, तुला फार लागले कायरे ?" हा हरीचा आवाज होता. शशिकांत बाहेर पडेतोपर्यंत बोलण्याचा त्याला धीरच झाला नाही, इतका तो ह्या सर्व प्रकारामुळे घाबरून गेला होता.

" नाहीं, विशेष नाही लागले. त्या वेळेला जरा वाटलें इतकेंच. "

हरीने त्याचा हात आपल्या हातात घेऊन दाबला. " मधू, आज खरा जय तुझा झाला आहे. शेवटपर्यंत तूं टिकाव धरलास. तुझ्याइतकी चिकाटी माझ्या अंगीहि असती तर ! "

# प्रकरण अठ्ठाविसावें

## विद्यार्थ्यांचें स्वराज्य–बंडखोरांची चढाई

**मातले बोकड विटवी पंचानना। घेतलें मरणा धरणें तें।**
**तुका म्हणे संतां पीडातील खळ। घेती तोंड काळें करोनियां॥**

होय, मधूचा अखेर जय झाला. त्याची चिकाटी, त्याच्या घरचे उत्कृष्ट गृहशिक्षण, मोहनचे त्याच्या डोळ्यांसमोर असलेले थोर उदाहरण या सर्वा-मुळे त्याचा अखेर जय झाला, आणि ह्या पहिल्या चकमकींत जय झाल्यामुळे त्याचा पुढचा मार्ग निष्कंटक झाला. त्याच्या वाटेस जाण्याची कोणाची छाती झाली नाही. आणि पुनः असा नेटाचा झगडा करण्याची त्याच्यावर पाळी आली नाही. दुर्मार्गाच्या प्रवृत्तीचा पहिला अंकुर त्याने नेटाने खुडून टाकला, प्रलोभनांना तो बळी पडला नाही, क्लेशांनी तो डगमगला नाही, आणि आता त्याचे तारूं शांत समुद्रावर यथेच्छ विहार करीत जाऊं लागले.

नागेशच्या अपमानाला तर सीमा नव्हती. त्याच्या वसतिगृहातील गैर-शिस्तीचा कलंक धुवून टाकण्याचे काम त्याने केले नाही, तर शशिकान्ताने केलें, ही गोष्ट सर्वांना जाहीर झाली. जेव्हां जेव्हा मंत्रिमंडळात त्याच्या वसति-गृहातील खालावलेल्या शिस्तीचा प्रश्न चर्चिला जाई त्या त्या वेळीं, हा आपला दोष आहे, ही आपली कर्तव्यपराङ्मुखता आहे, हे शल्य त्याच्या हृदयांत टोचूं लागे. प्रत्येकजण त्याला दोष देऊं लागला आहे, इतकेंच नव्हे, तर त्याच्या पेक्षांहि खालच्या इयत्तेतील शशिकात जास्त थोर व मानार्ह समजला जातो, त्याच्यापेक्षांहि विद्यार्थी शशिकांताला जास्त आदर दाखवितात, हे त्याला पदोपदी भासूं लागलें. आणि त्याच्या मानी, गर्विष्ट वृत्तीला हा अपमान असह्य होऊं लागला. प्रभाकर, मोहन, मनोहर यांनी जेव्हां त्याचे समक्ष शशिकांताचे आभार मानले तेव्हां तर त्याला मरणप्राय दुःख झालें.

“शशिकान्त, तुझे आभार मानायला माझ्याजवळ शब्दच नाहींत.” मोहन म्हणाला. “माझ्या लाडक्या भावाला त्या गाढवांच्या हातून तूं सोडविलास

हे तुझे उपकार मी आणि मधू कधींहि विसरणार नाहीं." हें बोलतांना मोहनचे डोळे पाण्याने भरून आले होते.

"त्यांत मी विशेष ते काय केले, मोहन?" शशिकान्ताने उत्तर दिले "माझ्या जागीं दुसरा कोणीहि असता तरी त्याने हेच केले असते."

"मधूच्याकडे असेंच मधून मधून लक्ष ठेवीत जा."

"जरूर ठेवीन. पण त्यात लक्ष ठेवायची फारशी जरूरच नाहीं. तुझा मधू म्हणजे एक खरा वीरपुत्र आहे. त्याच्याकरिता मी काय वाटेल ते करीन."

हे सर्व संभाषण नागेशने ऐकलें होते. आपल्याला उद्देशून जे शब्द मोहन बोलला असता, आपली जी स्तुति झाली असती, ती स्तुति, ते गौरवाचे शब्द आज शशिकान्तावर वर्षाविले जात आहेत, ह्या सर्व गोष्टी त्याच्या मनाला इतक्या लागल्या की, तो कायमचा उदास वृत्तीने राहूं लागला.

पण त्या कुटाळ कंपूचे एका विभागात वजन कमी होत चाललें असले तरी सर्व विद्याश्रमात आपले वजन कायम राखण्याचा त्याचा निर्धार होता. आणि म्हणून जनार्दन, बाळू वगैरेंनीं मंत्र्याच्या विरुद्ध एक पद्धतशीर कट रचण्यास सुरुवात केली. हिवाळा नुकताच संपला होता आणि विद्याश्रमास लागून असलेली नदीकांठची उंबराची झाडे फळांनी ताबडीलाल होऊन गेली होती. एक दिवस सकाळीं सर्व मुले भोजनगृहाकडे न्याहारी करण्याकरिता जात असतांना लहान लहान मुलांनीं मंत्र्याच्या अंगावर उंबराचा वर्षाव करण्यास सुरुवात केली. मंत्र्यांवर हा हल्ला करतांना नागेशला पद्धतशीर रीतीने वगळला होता. अर्थात् हा अपवाद नागेशला अपमानकारक होता. नागेशला स्वतःलासुद्धा तसे वाटले. पहिले एकदोन दिवस हा सगळा थट्टेचाच प्रकार आहे म्हणून सर्व समजले, एकदोघा मंत्र्यानी तर असलेली उंबरे उचलून घेऊन परत मारा करण्यासहि कमी केले नाहीं. पण तीनचार दिवसांनी हा मारा पद्धतशीरपणे आगाऊ बराचसा दारुगोळा साठवून ठेवून करण्यांत आला. जवळून जात असलेल्या एकादोघां शिक्षकांच्या अंगावरहि ही उंबरें ओझरती फेकण्यांत आलीं, आणि विशेषतः कांहीं व्यक्तींना उद्देशून हेतुपुरःसर हा मारा करण्यांत येतो हें उघड दिसूं लागलें. तेव्हां मुख्य मंत्री म्हणून प्रभाकरनें हे बंद करण्याचें ठरविलें आणि त्या अर्थाचें एक प्रसिद्धिपत्रक त्यानें दुपारीं फळ्यावर लाविलें.

दुसरे दिवशी सकाळी नेहमींप्रमाणे न्याहारीची घंटा झाली आणि सर्व मुले भोजनगृहाकडे निघाली. जनार्दन-पक्षाची कांहीं मुले ठिकठिकाणीं घोळका करून उभी आहेत, खिशांतून, पिशव्यातून किंवा इतर वस्तूंच्या आड लपवून ठेवलेला उंबराचा मोठा साठा त्यानीं करून ठेवला आहे, आणि संधि सांपडतांच मंत्र्याच्यावर हल्ला करण्याची त्याची तयारी दिसत आहे हे प्रभाकराच्या लक्षात येण्यास वेळ लागला नाही. लावलेल्या प्रसिद्धिपत्रकाचा उपमर्द करून हल्ला आलाच तर पुढाऱ्याना हुडकून काढून त्यानाच फक्त शिक्षा करावयाची, इतरांना सोडून द्यावयाचे, अशा सूचना प्रभाकरने सर्वांना देऊन ठेवल्या. मुले खोल्यांतून बाहेर पडतांच उंबराचा वर्षाव झाला, कित्येकाच्या टोप्या उडून गेल्या आणि पुष्कळांचे कपडे त्याच्या पिवळसर तांबड्या डागामुळे विद्रूप दिसूं लागले.

" जनार्दन, " उंबराच्या वर्षावामुळे उत्पन्न झालेल्या हास्याचा मुलाचा पहिला भर ओसरताच मोहन दरडावून म्हणाला, " जनार्दन, मी तुला उंबरे फेकताना पाहिला आहे. तुझ्यासारख्या मोठ्या मुलाला लाज वाटायला पाहिजे असल्या गोष्टी करताना. तूं क्रिकेटचा कॅप्टन आहेस म्हणून तूं सुटशील असें समजूं नकोस. न्याहारी संपताच मंत्रिमंडळाच्या कचेरींत ये."

" प्राण गेला तरी येणार नाही. " जनार्दन चडफडत म्हणाला

" तुझा प्राण एक दिवस खरोखरच कोणीतरी घेईल यात शंका नाही. " मोहनने उत्तर दिले. " पण तूं आलास तर ठीक आहे, नाहीतर परिणाम वाईट होईल. "

" शंकर, " मनोहर ओरडला, " आता प्रभाकरच्या टोपीचा नेम धरून उंबर तूंच मारलेस नाही? तुला नेम चागलाच मारतां येतो. तूंसुद्धा जनार्दन-बरोबर कचेरींत ये. "

" मोठ्या आनंदाने येईन मी. " शंकर मान वेळीत म्हणाला.

" आणि, तितक्याच आनंदानें तूं तेथून बाहेर येशील. " मनोहर त्याची अस्सलबरहुकुम नक्कल करीत म्हणाला. शंकरच्या मान वेळण्याचा अभिनय त्याने इतका हुबेहुब केला कीं सर्व मुलें खदखद हंसूं लागलीं.

“ बाळू ! ” प्रभाकरने त्याला हटकला, “ घनश्यामच्या अंगावर आतां उंबर फेकले तो तूंच. आणि काल बाबूची टोपी उंबर मारून पाडणाराहि तूंच होतास मला वाटतें. तूं आपले निशाणबाजीचें कौशल्य घनश्यामला आणि बाबूलाच का दाखविलेंस हे कोणाच्याहि सहज ध्यानात येईल. तूंसुद्धा त्याच्या बरोबरच ये. ”

“ मीं नाहीं उंबरे फेकलीं, ” बाळूने उत्तर दिले.

“ अरे चोरा, ” मनोहर म्हणाला, “ मी तुला उंबरे फेकताना माझ्या डोळ्यांनी पाहिले की ! ”

“ तर तर! पाहशील तर काय झाले! माझा तुला सूड उगवायचा आहे म्हणून तूं असे म्हणतोस. ”

“ तुझा सूड! भल्या गृहस्था, ” मनोहर तिरस्काराने म्हणाला, “ तुझी मला कधी चुकूनसुद्धां आठवण होत नाहीं. पण हे पहा, बाळासाहेब, आपण ह्या सर्व प्रकरणाच्या मुळाशीं आहात हे आम्हांला माहीत आहे. ह्यांचे पुढारीपण तुम्हीं स्वीकारणार होता नाहीं का ? मला वाटतें तुम्ही असेसुद्धां त्यांना म्हणालां असाल की,

**“ चला पळारे करा शत्रुवरि मारा तुम्ही उंबरांचा ।**
**पळवुनि लावूं मंत्र्यांना त्या करूं झणत्कार बांगड्यांचा ॥ ”**

मनोहरचे हे कवित्व आणि बांगडीखान ह्या बाळूच्या सुप्रसिद्ध टोपण-नावाचा उल्लेख ऐकताच सर्व मुलामधून हास्याचा एक मोठाच उमाळा आला.

“ ऐक रे, डुल्या, ” प्रभाकरने हलकेच सुचविले, “ सगळे चेष्टेवारी घालवूं नकोस. मग काय, बाळू!” तो गंभीरपणें त्याला म्हणाला, “ तूं घनश्यामच्या अंगावर उंबरे फेकलीं नाहीस होय?”

“ मी एकसुद्धां मारलें नाहीं.” बाळूचे हे शब्द ऐकताच कांहींजणांनी हुशहुश केल्याचा आवाज ऐकूं आला आणि बांगडीखान हें नांवहि उच्चारलें गेले. आपल्या भित्रेपणाचा हा उल्लेख ऐकून त्याचे स्वतःचें तोंडहि उतरलें.

“ कसला हलकट, भित्राभागुबाई आहेस रे!” नाना त्वेषानें पुढें येऊन म्हणाला, “ ह्या लहान मुलांना चढवितांना मी स्वतः ऐकलें आहे – तूं आणि

जनार्दनने त्याना भर दिली नसती तर त्यांची काय छाती होती ? – आणि आता माझ्यादेखतच तूं घनश्यामला उंबर फेंकून मारलेस."

"थाब थांब, नाना!" मोहन त्याला थांबवीत म्हणाला, "आम्ही त्याला पाहून घेतो. काय, बाळू, तूं अजूनहि म्हणतोस काय कीं मी उंबर फेकले नाही म्हणून ?"

"मीं एक लहानसे उंबर सहज उडविले होतें," बाळूच्या मुद्रेवर भीति, लज्जा इत्यादि सर्व हलक्या मनोवृत्तीची एकच गर्दी दिसत होती.

"फू–स्–स्!" प्रभाकर म्हणाला. "खरोखर, बाळू, तुझ्याशी कोणताहि संबंध ठेवणेसुद्धां कमीपणाचे आहे. इतराच्या बरोबर तुला कचेरीत बोलावण्याइतका सुद्धां तुला मोठेपणा का म्हणून द्यावा ? आताच तूं घनश्यामची येथल्या येथे माफी माग. तुला इतकी शिक्षा बस झाली."

"इतकेसुद्धा करायची तयारी नाही का तुझी ?" नाना ओरडला. "थोड-क्यात सुटतो आहेस हेसुद्धा तुला समजत नाहीं ? आटप लवकर, आम्हाला न्याहारीला जायला॰उंशीर होत आहे."

"काय करायची आहे माफी मागून?" घनश्याम म्हणाला. "झाली इतकी फजिती पुरे झाली त्याची?"

"असे कसे चालेलं?" मोहन म्हणाला, "आपल्या कर्माची फळे त्याला भोगलीच पाहिजेत. विद्याश्रमांत असला खोटेपणा चालूं देता कामा नये. माफी ही त्याने मागितलीच पाहिजे."

"मुळीच मागूं नकोरे." हा रंगनाथचा आवाज होता.

"कोण? रंगनाथच बोलतो आहे का हा?" मनोहर तिकडे पाहत म्हणाला. "मला वाटलेंच तसें—शशिकान्त नाहीं वाटतें येथें."

मनोहरची चेष्टा ऐकतांच रंगनाथने डोळे मिचकाविले आणि मुलांच्या घोळक्यांत मागल्या पावलींच दिसेनासा झाला. आपल्या शूर पुढाऱ्यांची ही दैना पाहतांच आपण भलत्याच वीरांच्या नादीं लागून मोठ्या मुलांशीं वांकडें होण्याचा हा मर्खपणा केला असें आतां बहुतेक मुलांना कळून चुकलें होते, आणि आतां बाळू-जनार्दनच्या पक्षाची कोणालाहि सहानुभूति वाटेनाशी झाली.

" हें पहा, बाळू! ह्या शब्दांत माफी मागायला पाहिजे." असें म्हणून मोहननें एका कागदावर कांहीं मजकूर लिहून तो बाळूच्या हातीं दिला. "घनश्यामच्या अंगावर उंबरें फेंकून मारल्याबद्दल त्याची आणि खोटें बोलण्याबद्दल हजर असलेल्या सर्व मुलांची मी नम्रपणे क्षमा मागतों."

बाळूने तो कागद घेतला आणि मोठ्या कष्टाने, ते वाक्य तो पुटपुटला; त्याचा आवाजहि कोणाला फारसा ऐकूं गेला नसेल.

" मोठ्यानें, मोठ्यानें, बांगडीखान." चहूंकडून एकच गिल्ला झाला.

नानाचा राग त्याच्या हृदयांत मावत नव्हता. एक उडी मारून तो पुढें आला आणि बाळूची मानगुटी त्याने पकडली. पुनः खाली लवून मोठ्याने क्षमा मागितल्याशिवाय त्याने त्याला सोडला नाही. तेथून सुटतांच बाळने भोजनगृहाकडे धूम ठोकली. तो ज्या दिशेने पळाला त्याच्या पाठोपाठ उंबरांचा पाऊस पडला; बाळूच्या नादानपणाबद्दल ज्याला तिरस्कार वाटला नाहीं असा एकहि मुलगा तेथे नव्हता.

" मला आशा आहे की आजच्या प्रसंगाची पुनरावृत्ति होणार नाहीं." प्रभाकर भारदस्तपणे म्हणाला. " विद्यार्थ्यांपैकींच कांहींना मंत्री नेमून त्यांच्या हातीं अधिकार देण्याची पद्धति व्यासविद्याश्रमात आज कितीतरी वर्षे सुरू आहे आणि विद्याश्रमाच्या दृष्टीने त्याचे कितीतरी सुपरिणामच झाले आहेत." बाळू पळत गेला होता त्या दिशेकडे बोट दाखवून तो पुढे म्हणाला, " ह्या असल्या मुलाला सर्व रान मोकळें सोडणे खरोखरच तुम्हांला इष्ट वाटते काय? विद्याश्रमाच्या हिताकरितां झटत असताना तुमच्या धाकाने आम्ही कर्तव्यपराङ्मुख होऊं असा विचार तुमच्या मनांतसुद्धां येऊं देऊं नका."

त्याच्या या साध्याच पण अंतःकरणपूर्वक उच्चारलेल्या शब्दांचा मुलांच्या मनावर अतिशय परिणाम झाला. वसतिगृहाची सूत्रे साभाळणारा मंत्री लेचापेचा नाही हे त्याना दिसून आले आणि अशा कर्तव्यदक्ष मंत्र्याबद्दल त्यांना साहजिकच अभिमान वाटूं लागला.

" आजचे प्रकरण येथेंच संपविण्याचा आमचा विचार आहे." मोहन तेथें उभ्या असलेल्या लहान मुलांना उद्देशून म्हणाला. " कांहीं मोठ्या मुलांनी तुम्हांला ही चिथावणी दिली आहे हें आम्हाला माहीत आहे आणि म्हणूनच

आम्ही फक्त दोघा-तिघांनाच निराळे काढले आहे. तुम्ही पुनः असे करणार नाही अशी आमची खात्री आहे, आणि पुनः असें घडल्यास इतक्या थोडक्या-वर तुम्ही सुटणारहि नाही ही खात्री ठेवा. ”

“ विष्णु, इकडे ये पाहूं. ” बाकीची मुले जाऊं लागलेली पाहतांच मनोहरनें त्याला हाक मारली. “आज तूं बराच उद्योग केलेला दिसतो आहे नाही? पाहूं हें काय आहे ते? अरे बापरे! हीं पांचसहा उंबरे रे तुझ्या खिशात कशाला हवींत तुला? आता हें पहा, ही सगळीं उंबरे गोळा करून त्या खड्डयात टाकून दे. वर्गाच्या घंटेच्या वेळी मला एकहि उंबर दिसता कामा नये. ” जाता जाता तो भार्गवला म्हणाला, “ आमच्या या छोट्या दुःशासनाला फराळ केल्याबरोबर लागलीच थोडे हातपाय हलवावे लागतील नाही? पण कांही केले तरी त्याच्या मनांत बदल होण्याची आशा नको. ”

मनात चरफडत विष्णूने आपल्या कामाला सुरुवात केली. मनोहर व इतर मुले फराळ आटोपून येतात तो त्याचें काम नुकतेच संपले होते. “ हं छान झाले!” मनोहर त्याला म्हणाला. “ मी तुला आणखीहि थोडा त्रास देणार आहें. जरा माझ्याबरोबर चल पाहूं. ”

कुरकुरत, चरफडत, मनातून शिव्याची लाखोली वाहत विष्णु त्याच्याबरोबर निघाला. एकदोन खोल्या ओलांडून ते मंत्रिमंडळाच्या कचेरीत येऊन पोहोचले. सर्व मंत्री जमलेले पाहून मनोहर विष्णूला म्हणाला, “ हे पहा, आता तुझे दोस्त जनार्दन आणि शंकर आहेत ना, त्याना लवकर इकडे पाठवून दे जा. ”

“ काय त्याला उगीचच्या उगीच छळतो आहेस रे?” नागेश कुरकुरला.

“ त्याला छळतो! मी त्याला अंगणातील उंबरें गोळा करावयाला लावली, नाही तरी तीं आणणाऱ्यात तो प्रमुख होताच, आणि मग मी त्याला त्याच्या दोस्तांना एक निरोप सांगायला पाठविला. त्यालाहि थोडासा धडा मिळावा म्हणूनच मी त्याला या गोष्टी करायला सांगितल्या. मग हा छळ झाला वाटतें ? ”

“ तो माझा दोस्त आहे हें तुला माहीत आहे आणि म्हणून माझा सूड तूं त्याच्यावर उगवून घेतो आहेस. ”

"छान! नागेश, असे म्हटल्याने तुझे समाधान होत असेल तर म्हण तूं तसें, पण मी एक गोष्ट सांगेन तुला–तुझ्या वसतिगृहात मधूला आणि इतर मुलांना कशा तऱ्हेने वागविले जात होते हें मला माहीत आहे–दुसऱ्यांवर मुलाना त्रास देण्याचा आरोप करणे तुला मुळीच शोभत नाहीं."

चागलें झणझणीत उत्तर देण्याचे नागेशच्या अगदी ओठावर आले होते. पण त्याच वेळेला जनार्दन आणि शंकर तेथे आले, आणि प्रभाकर म्हणाला, "भाडण पुरे रे आता. आमचो आपमात भाडणे आहेत हे जर मुलाना समजले तर त्याचा परिणाम चागला होणार नाही. नागेश! मला वाटते—"

"जेव्हा तेव्हा नागेश, मीच सर्व काही करतो!" नागेश रागाने म्हणाला. "हा मी चाललो. मला तुमच्या ह्या सभेशीं काही करावयाचे नाहीं." आणि तो उठून खरोखरच चालूं लागला. आजच्या सभेत हजर राहिल्याने जनार्दनच्या पक्षातील त्याची लोकप्रियता कमी होण्याचा संभव होता, तो अशा तऱ्हेने आयताच टाळता आल्यामुळे त्याला थोडे बरेच वाटले. अधिकारावर असलेले मंत्री हे आपले जन्मजात शत्रु होत अशी जनार्दनच्या पक्षाची समजूत होती, तरीहि उंबरांच्या लढाईत त्यानी नागेशच्या बाबतींत अपवाद केला होता हे त्याच्या लक्षात होतेंच.

मंत्र्याच्या समोर आपण खूपसा आडदाडपणा करूं, बेपर्वाईची उत्तरे देऊन उद्धटपणाचे प्रदर्शन करूं, अशी जनार्दन आणि शंकर याची इच्छा होती. पण आपल्यापेक्षा बुद्धीने, चारित्र्याने, अधिकाराने सर्वतोपरी श्रेष्ठ असलेल्या त्या दहापंधरा मुलांसमोर उभे राहिल्यानंतर त्याचे धैर्य अगदीच नाहीसे झाले. पण त्याची थोडक्यावरच सुटका झाली. सर्व मुलांच्यादेखत त्याची काही थोडी फजिती झाली नव्हती आणि ह्या युद्धात खरोखर मंत्र्याच्या अधिकाराचाच विजय झाला होता. म्हणून झालेल्या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त करून पुनः असें न करण्याबद्दल त्याच्याकडून वचन घेऊन प्रभाकरने त्यांना सोडून दिले.

ह्या सर्व प्रकाराचा परिणाम शंकरवर मात्र झाला.

"आजचें भांडण उकरून काढल्याबद्दल मला खरोखरच फार वाईट वाटलें." तो म्हणाला. "माझी चूक झाली हें मला पटलें आहे आणि मी तुमची सर्वांची

अंतःकरणापासून क्षमा मागतों. पुनः मी असल्या भानगडींत कधी पडणार नाही."

"छान, शंकर!" मोहन म्हणाला. "खऱ्या वीराला शोभण्यासारखीं वाक्ये आहेत हीं. पूर्वीपासून आपला परिचय आहेच आणि यापुढें आपली मैत्री जास्त दृढ होईल अशी मला आशा आहे. विद्याश्रमाचें हित अजूनहि तूं मनांत आणलेस तर तूं पुष्कळ करूं शकशील."

"मला कांही त्या बाबतींत फारशी आशा नाही. पण मी पाहीन प्रयत्न करून."

"उठलो तेथून उजाडलें." मनोहर म्हणाला. "सकाळीं मी तुझी थोडी थट्टा केली त्याबद्दल मीसुद्धां तुझी क्षमा मागतों."

# प्रकरण एकोणतिसावें

## विद्यार्थ्यांचें स्वराज्य—यशाची माधुरी

**कोहि तुलामधिरोहति शुचिना दुग्धेन सहजमधुरेण।**
**तप्तं विकृतं प्रथितं तथापि यत्स्नेहमुद्गिरति ॥**

विद्याश्रमातील शिस्त आणि नीति यांचे संरक्षण करणारी एकमेव संस्था—विद्यार्थ्यांचे मंत्रिमंडळ—हिचा अधिकार नामशेष करण्याचा प्रयत्न जनार्दन-प्रभृति मुले किती दिवसापासून करीत होती. पण आजच्या प्रकाराने त्यांना या बाबतींत चांगलीच थप्पड बसली. शशिकान्ताने रंगनाथाचा नक्षा पार उतरविला होता, आणि बाळूची चेष्टा तर लहान मुलेंहि करूं लागली होती. ' भागुबाई ', 'बांगडीखान' ही नांवें व त्याच्यावरील टीका, भाष्ये व कवित्वें विद्याश्रमांतील सर्वांच्या तोंडी ऐकूं येत. जनार्दन, बाळू या पुढाऱ्यांची ही स्थिति, मग विष्णु तर कोणत्या झाडाचा पाला?

शंकरने उघड उघड त्यांचा पक्ष सोडलाच होता. ' फितुर ' म्हणून जनार्दन त्याला चिडवूं लागला. त्यानेंहि उलट जनार्दनच्या उखाळ्यापाखाळ्या काढून उट्टे काढण्यास कमी केले नाही. आपले वजन कमी होत चालले आहे याचा हा प्रत्यक्ष पुरावा पाहून जनार्दनचे पित्त अधिकच खवळलें. त्याने त्याला धमक्या दिल्या; रंगनाथने आपल्या कोशातल्या शेलक्या मर्मभेदी शब्दांची उजळणी केली; शंकरने त्याच्या पितरांचा उद्धार केला आणि अशा प्रकारे हे भांडण विकोपास गेले. अखेर त्यांची गडी-फू झाली आणि त्यांनी एकमेकांशी अबोला धरला.

आचार्य रत्नाकर यांचीहि प्रकृति आता पुष्कळच सुधारली. त्यांनीं विद्याश्रमांत येऊन सर्व सूत्रे आपल्या हातांत घेतल्याबरोबर तेथील वातावरण बदलूं लागलें. त्यांच्या गैरहजेरीत शिथिल झालेलीं शिस्तीचीं बंधनें पुनः पूर्ववत कार्यक्षम होऊं लागलीं आणि बंडखोरी प्रवृत्ति उगमांतच खुडून टाकून निःपक्षपातपणे नियमांची अंमलबजावणी होऊं लागली.

परंतु इतकें झाले तरीहि स्वैरसंचाराला सवकलेल्या बंडखोराना शेवटचा एक निकराचा प्रयत्न करून पाहिल्याशिवाय राहवेना. मात्र अशा प्रयत्नाला यश यावयाचे असेल तर नागेश उघडपणे आपल्या बाजूस असला पाहिजे हे अपरिहार्य आहे असे त्यांना वाटले, म्हणून ते अशा संधीची उत्सुकतेने वाट पाहत होते. आणि त्याच्या व विद्याश्रमाच्याहि सुदैवाने अशी संधि लवकरच आली.

एक दिवस संध्याकाळी शेजारच्या गावांतला म्हातारा शिदबा आपली मोडकी हातगाडी ढकलीत आपला माल खपविण्याकरिता विद्याश्रमाच्या आवारांत आला. स्वभावानें सरळ व बोलण्यात मिठ्ठा असल्याने विद्याश्रमातील पुष्कळ विद्यार्थ्यांची त्याच्याशी ओळख झाली होती आणि त्याला मदत करण्याच्या बुद्धीनेच त्याचा माल विद्याश्रमात बराचसा खपे.

वर्ग नुकतेच सुटले होते आणि वर्गात बसून कंटाळलेल्या मुलांनाहि कांही मनोरंजनार्थ करमणूक मिळाल्यास हवी होती. साहजिकच त्याच्या हातगाडीभोवतीं लहान लहान मुलांचा घोळका जमला आणि त्याला उलटसुलट प्रश्न विचारून ते आपली करमणूक करून घेऊं लागले. त्यांची उत्तरें देण्यांत व वस्तु दाखवून त्याचे गुणवर्णन करण्यात तो गुंतला असताना पांडुरंग नांवाचा चितोपतांच्या वसतिगृहांतील एक मुलगा त्याच्या गाडीला लागूनच उभा होता. त्यानें अगदी सहज हात लाबवून कोणालाहि न कळत त्यातील एक लहानशी अत्तराची कुपी उचलून खिशांत घातली. आपली ही हातचलाखी कोणाच्या लक्षांत आली नाही याची खात्री करून घेण्याकरिता त्यानें एकदा सभोवार नजर टाकली आणि आपले समाधान करून घेऊन शिदबाशी गप्पा मारण्यात तो पुनः गढून गेला. पण त्याचा अंदाज चुकला होता. त्याच्यासमोरच उभा असलेल्या मधूच्या दृष्टीस त्याचे हे कौशल्य आले; कदाचित् त्याला ती बाटली विकतच घ्यावयाची असेल, तो आता तिची किमत विचारून ती देईल, या आशेनें त्याने थोडा वेळ वाट पाहिली. पण तशा प्रकारचें काहीच चिन्ह न दिसल्यामुळे त्याचा संताप अनावर झाला. विद्याश्रमांतील कांही निर्ढावलेल्या मुलांना ह्यांत कांहीं विशेष वाटलें नसतें हे त्याला माहीत होतें. एखादी वस्तु चोरली म्हणण्याऐवजी ती 'पळविली', 'लांबविली' असा ते उल्लेख करीत;

खोटे बोलावयाचे असले म्हणजे 'थाप देणें', 'बगल देणे' असे शब्द ते वापरीत. मूळच्या शब्दाऐवजी हे नवीन शब्द वापरून मूळच्या शब्दाशी साहचर्याने निगडित असलेल्या अनीतीच्या कल्पना नाहींशा करण्याची त्याची ही शक्कल होती. वस्तु पळविणे हे चोरण्याइतके भयंकर समजले जात नसे; थाप देणे हा खोटे बोलण्यापेक्षा कमी भयंकर अपराध समजला जाई. 'सापडला तर चोर नाहींतर पादशहाहून थोर' हे त्याचे तत्त्वज्ञान अद्याप मधूच्या अंगी भिनले नव्हते. त्याला चोरी ही चोरीच वाटे आणि पाडूने एका गरीब म्हाताऱ्याची एक वस्तु चोरून घ्यावी हा त्याला भयंकर अपराध वाटला.

"पाडु," त्याच्याने बोलल्याशिवाय राहवेना, "कसला दुष्ट निर्दय मुलगा आहेसरे! ती बाटली तूं चोरलीस त्याची?" पण पाडूचा उत्तर देण्याचा किंवा किंमत देण्याचा कांहींच मानस दिसेना. आपल्या विद्याश्रमातील एका मुलाच्या हातून एका गरीब म्हाताऱ्याचे नुकसान व्हावें हे मधूला खपेना. त्याने मुकाट्याने आपल्या खिशातील चवली काढून ती म्हाताऱ्या शिदबाला दिली आणि म्हणाला, "शिदबा, ही घ्या. नाहीं म्हणूं नका. तुमचे उगीच मधल्यामध्यें नुकसान कशाला?"

मधूचा राग आणि त्याचे कोमल कनवाळू हृदय पाहून पाडू एक क्षणभर तर चकितच झाला. त्याच्या विभागातील मुलाखेरीज इतर मुले जर तेथे हजर नसती तर ह्या आरोपाचे त्याला विशेष वाटले नसते. एक गंमत म्हणून उलट सर्व प्रकार हंसण्यावारीच त्याने घालविला असता. पण येथे जमलेली सर्व मुले कांहीं त्याच्या मताचीं नव्हती; त्यांनीं त्याचे हें वस्तु पळविण्याचे साधे कृत्य चोरीच्या भयंकर सदरात घातले असते हें त्याला माहीत होतें आणि म्हणून आरोप अजीबात नाकारणे हाच त्याला सोपा मार्ग वाटला.

"उगीच मूर्खासारखी का वटवट चालविली आहेसरे? मीं कशालासुद्धा हात लावला नाहीं."

हें अचाट धाडस पाहून मधू तर थक्कच झाला. हे धडधडीत असत्य विधान मुलें कशीं करतात हेच त्याला कळेना, आणि ते असत्य होतें यात तर त्याला मुळींच शंका नव्हती.

"तूं अत्तराची बाटली घेतली नाहींस? इतके खोटे तुम्हाला बोलवते तरी कसे? मीं माझ्या डोळ्यांनीं तुला घेतांना पाहिले."

" तुझ्या डोळ्यांनी पाहिलें कां नाकानें पाहिलें-मला काय करायचे आहे?"

" ह्या नको-बोआला नाहीं तरी कावळ्यासारखी ज्याला त्याला चोच मारण्याची संवयच!" विष्णु आपल्या गड्याच्या मदतीला धांवला. " पांडू, तूं त्याला असा खरपूस चोप दे की पुनः कसा आळ घेतो ते पाहूं."

" तुला वाटले तर तूंच भाड त्याच्याशी. मी त्याची इतकीहि पर्वा करीत नाहीं."

जुंपत आणलेली मारामारी जमत नाही हें पाहून विष्णूचा विरस झाला. पण त्याला गप्प बसवेना. " तो जर म्हणतो कीं मी घेतली नाही तर, नको-बोआ, तुला ही लुडबुड करायला कोणी सांगितली होती?" पण तरीहि मधू गप्पच. अखेर विष्णूने आपण होऊनच मधूच्या पाठीत एक रट्टा ठेवून आपल्या मित्रालाहि कोणीतरी पाठिराखा आहे हे मधूच्या नजरेस आणून दिले. मागील भांडणाचा त्याला मधूवर सूड उगवावयाचा अर्थात् होताच.

" मी काहीं तुझ्याशीं बोललो नाहीं ना? मुकाट्याने मी तुझा मार खाईन असें तूं समजूं नकोस." आणि मधूनेंहि उलट विष्णूच्या श्रीमुखांत भडकाविली.

चांगलीच मारामारी जुंपली. अधिकारी मंत्र्यांपैकी तेथे कोणीच हजर नसल्याने ती सोडविण्याच्या भानगडीतहि कोणी पडले नाहीं. दोघेहि वयाने व शक्तीने जवळ जवळ तुल्यबल असल्याने त्यांची मारामारी पाहून घटकाभर करमणूक करून घेण्याकडेच बहुतेकांची प्रवृत्ति दिसली. इतक्यात मनोहर व भार्गव पलीकडून जात होते. ते काय गडबड चालली आहे, हे पाहण्याकरिता सहज तेथे येऊन पोहोचले. पण त्यापूर्वी दोघांच्याहि डोक्याला एकदोन टेंगळे आलीं होतीं आणि सदऱ्यावर कांहीं ठिकाणीं रक्ताचे डागहि दिसत होते.

" कसली मारामारी आहेरे?" मनोहर म्हणाला. " अस्से, मधू आणि छोटा दुःशासन! बाकी त्यांचे सख्य असण्यापेक्षां वितुष्ट असलेलेंच जास्त बरे!"

" तें खरे, डुल्या, पण तूं मंत्री आहेस. ही मारामारी सोडवायला नको कां?"

" थांबारे! काय गोंधळ चालला आहे हा!" मनोहर वाट काढीत आंत शिरला आणि दोघांना एकीकडे करून मध्यें उभा राहिला.

" भांडण कशावरून जुंपले?"

" नको-बोआ म्हणतो कीं पांडूने--"

" कोण हा नको-बोआ ? " भार्गव आश्चर्याने विचारूं लागला.

" मधू म्हणतो की, " रंगनाथने खुलासा केला. " पाडूनें शिदबाच्या हातगाडींतील एक अत्तराची बाटली उपटली, आणखी तो पुष्कळ अद्वातद्वा बोलूं लागला म्हणून विष्णूने दिला ठेवून एक रट्टा. "

" पण विष्णूला काही फारसे यश आलेले दिसत नाही, " भार्गव म्हणाला.

" पण उगीचच्या उगीच आमच्या वसतिगृहातील मुलावर खोटा आरोप घेण्याचे त्याला कारण काय ? " विष्णूने आपली बाजू मांडली.

"तुमची बाटली एखादी खरोखरच हरवली आहे का, सिदबा?" भार्गवाने शिदबाला विचारले.

" होय, दादा, पण ह्या धाकट्या दादांनीं मला पैसे दिले तिचे. उगीच माझ्या म्हाताऱ्याकरिता तुम्ही कशाला भांडता, दादा ? "

" हे घ्या, शिदबा, नाही नका म्हणूं." मनोहरने एक आणेली काढून त्याच्या हातगाडीत टाकली. "पुनः आमच्या विद्याश्रमात तुम्हाला कोणी फसविणार नाही बरेंना. तुम्ही आता जा आपल्या मार्गाला." मग तो पाडूकडे वळून म्हणाला, "पाडू, तूं जर बाटली घेतली नाहीस तर तुझा झाडा घेण्याला तुझी हरकत नाहीं ना?"

" अर्थात् आहे. काय म्हणून तुम्ही माझा झाडा घेणार ? " पाडू चुळबूळ करीत म्हणाला. ती बाटली आता विस्तवाच्या निखाऱ्यासारखी त्याला भाजत होती. आणि शक्य तर ती नाहींशी करण्याची संधि तो पाहत होता.

" हं हं, असा पळूं नको, बाबा," भार्गव त्याची मान धरून म्हणाला. " मेहेरबानी करून असली चलाखी काही करूं नको. "

आतां अर्थातच सर्वांचे लक्ष पांडूकडे लागलें. पाडूच्या वसतिगृहांतील मुले मनोहर व भार्गव याचेभोंवती जमा झाली. पाडूची झडती घेण्याचा प्रयत्न त्यांनी केल्यास त्यास शक्य तितका अडथळा करण्याचा विचार त्याचा उघड दिसत होता. कांहीं तरी गडबड आहे हें पाहून इतर मुलेंहि तेथें जमा होऊं लागलीं आणि जनार्दन कंपूच्या मुलांनी हा आमच्या हक्कावर घाला आहे अशी हाकाटी पिटण्यासहि कमी केलें नाहीं.

इतक्यात नागेशहि येऊन पोहोंचला. आपल्या विभागांतील पांडूची बाजू घेण्यास त्याला केलेली सूचना अगदींच वायां गेली नाही. तो पुढें सरून एकदम मोठ्याने म्हणाला, “ मी त्याची झडती घेऊं देणार नाही. तुम्हाला काय अधिकार आहे त्याची झडती घेण्याचा ? ”

प्रभाकर व मोहन तिकडून जात होते त्याना पाहून मनोहर म्हणाला, “हा प्रभाकर आला. त्यालाच आपण विचारूं आणि तो सांगेल तसेच करू. साग तुला काय सांगायचे असेल ते, नागेश. ”

“ विशेष सागण्यासारखे त्यात काय आहे?” नागेश म्हणाला. “ शिद्बाच्या हातगाडीतील एक बाटली हरवली. पण म्हणून पाडुची झडती घेण्याचे काय कारण आहे ? मला तर त्यात कांही दिसत नाही. ”

“ मधूने ती बाटली घेतांना प्रत्यक्ष पाहिले आहे, हे तूं सागितले नाहीस.”

‘ मधू, तूं करीत होतास काय हे?” मधूचे नाव निघतांच सर्वांचे डोळे त्याचेकडे साहजिकच वळले आणि त्याचे खरचटलेले अंग, धुळीने भरलेले कपडे व डोळ्यावरची टेंगळे पाहून मोहनला आश्चर्य वाटले.

“ कांही विशेष नाही, दादा. मी कांही आपणहून भाडणात पडलो नाही. पांडूने बाटली घेतली असे मीं म्हटले म्हणून विष्णूने मला मारले. मग मींहि अर्थात् काही गप्प बसलों नाहीं. ”

“ तुझी खात्री आहे कां पांडूनेच बाटली घेतली म्हणून?”

“ मीं स्वतःच पाहिले आहे मुळी. त्यांत खात्रीचा अन् बिन खात्रीचा प्रश्नच काय आहे!” मधूने शातपणे उत्तर दिले.

“ मग अर्थातच पांडूची झडती घेतली पाहिजे. ” मोहन म्हणाला.

“ पण थाब अगोदर. ही तुम्ही उलटीकडून सुरुवात करीत नाही कां?” प्रभाकरने त्याला थांबविले. “ मला वाटते आपण जर पांडूलाच शांतपणें सांगितले तर तोच आपले खिसे आपणहून दाखवील. ”

“ मुळीच दाखविणार नाहीं.” पांडूनें चिडून उत्तर दिलें.

“ बरें मग नागेश तुझ्या बाजूचा आहे, तर नागेशला किंवा मला एकट्याला एकीकडे जाऊन तं आपले खिसे दाखविशील कां ?”

" नाहीं. "

" मग घे रे त्याची झडती, मनोहर." प्रभाकरने निर्णय दिला.

मनोहरला झडती घेऊं न देण्याबद्दल, शक्य तर त्याच्या आड येण्याची थोडीशी हालचाल काही मुलानी केली. पण त्याना काही करतां येण्याच्या पूर्वीच मनोहरने पाडूचे दोन्ही हात गच्च धरून ठेवले आणि भार्गवनें त्याच्या उजव्या खिशांत हात घालून लहानशी रंगीत वेलबुट्टीची अत्तराची बाटली बाहेर काढली.

गुन्ह्याचे हे प्रत्यक्ष प्रमाण पाहताच दोन्ही पक्षाच्या वीराचे ओरडणे व दंगा आपोआपच बंद पडला. सर्वत्र थोडा वेळ शातता पसरली आणि मग प्रभाकर म्हणाला, " पांडू, तूं चोरी तर केलीस आणि शिवाय खोटे बोलून वर आपला अपराध दुप्पट करून ठेवलास. तुझ्यासारखी लहान मुलं जर असले उद्योग करूं लागली तर विद्याश्रमाची काय वाट होईल? तुला चांगलीच शिक्षा व्हायला पाहिजे."

" ताबडतोब." मोहनने सुचविले. " नवीन येणाऱ्या लहान मुलानाहि उदाहरण होईल अशी शिक्षा व्हायलाच पाहिजे."

" घनश्याम, छडी आण रे. "

" खबरदार त्याला हात लावशील तर ! " नागेश आवेशाने म्हणाला. " अगोदर त्याची झडती घेण्याचाच तुम्हांला काय अधिकार होता ? "

" मी त्याला शिक्षा करणार आहें. कोण माझ्या आड येतो ते पाहतों."

" आम्ही येऊं." काही मुले कुजबुजली. त्यात रंगनाथ व जनार्दन याचे आवाज स्पष्ट ओळखूं येत होते.

" आणि, नागेश, तूं ह्यांना उत्तेजन देतोस ? " प्रभाकर म्हणाला.

" होय, देतो." नागेशचें डोकें खरोखरच ठिकाणावर नव्हते.

" कांहीं झाले तरी माझे कर्तव्य मी करणारच." प्रभाकरची शांतता प्रशंसनीय होती.

" आणि तुम्ही कोणी ह्या आडमार्गांत शिरूं नका," मोहन त्या सर्वांना उद्देशून म्हणाला. " कारण त्याला शिक्षा ही झालीच पाहिजे."

" जनार्दन," नाना त्याला म्हणाला, " तूं जर आडदांडपणा करशील तर याद राखून ठेव. एक पाऊल पुढें टाकलेंस की चीत पाडीन, सोडणार नाहीं. "

" आणि मीसुद्धां. " शशीकात पुढे सरला. " आणि मी " करीत अरविंद, अंतु, किसन वगैरे मंडळींनींहि मित्रमंडळाची बाजू राखण्याची तयारी दाखविली.

घनश्यामने छडी आणली आणि प्रभाकरनें पांडुरंगला शिक्षा करण्यास सुरुवात केली. जनार्दनने चारहि बाजूस पाहिले. सर्व बाजूला आपल्या विरुद्ध पक्षाची मंडळी कट करून उभी असलेली दिसली. त्याचा नाइलाज झाला. नागेशनें पुढे सरण्याचा प्रयत्न केला. पण मोहनने त्याचा दंड धरून त्याला मागे ओढले आणि शांतपणे तो त्याला म्हणाला, " नागेश, रागावूं नकोस; पण तुला आजच्या उतावळेपणाबद्दल मागाहून पश्चात्ताप होईल आणि मी केले हे योग्यच केले अशी तुझी खात्री होईल." मोहनचा स्पर्श होताच नागेश चमकला, त्याला थोडीशी लाजहि वाटली. त्याच्या आवाजांतील प्रेमळपणा, गाभीर्य व निश्चय पाहून तर त्याच्या त्या वेळच्या मनःस्थितीतहि मोहनबद्दल त्याला आदर वाटूं लागला.

पुढे टाकलेले पाऊल त्याने ताबडतोब मागे घेतले. गेल्या सुमारे तीन वर्षांत मोहनने त्याला आजच स्पर्श केला होता. तीन वर्षांनी मोहन त्याच्याशी आजच हे शब्द बोलला आणि हे सर्व त्याने स्वतः मोहनची निंदा, उपहास, विरोध, शत्रुत्व अखंड चालू ठेवले असताना! मोहनच्या अंतःकरणात आपले-विषयीं खरे मित्रप्रेम अजून वास करीत आहे, याबद्दल त्याची खात्री झाली. एक शब्दहि त्याने उच्चारला नाही. अगदी शातपणाने तो परत फिरला आणि गर्दीतून वाट काढीत खोलीकडे चालता झाला.

बाळू, जनार्दन व रंगनाथ याच्या कंपूतील अनुयायी क्रमाक्रमाने कमी होत चालले होते, आणि आता तर विष्णूशिवाय त्याचे पुढारीपण मानायला कोणीच मुलगा तयार नव्हता. आपला पराजय त्यांना मान्य करावाच लागला. आपल्या सद्दीचा जोर आतां संपला हे त्याना मोठ्या कष्टानें म्हणावें लागले. अन्याजीच्या हॉटेलातून खाद्य, पेये वसतिगृहांत आणवून ऐटींत वसंतपूजेचे समारंभ आतां साजरे करणें अशक्य झाले होतें. त्याऐवजीं चोरून मारून अन्या-जीच्या हॉटेलात मागल्या दारानें प्रवेश करून तेथें ते आपली तल्लफ भागवीत.

ही गोष्ट लवकरच उघडकीस आली आणि त्या तिघांनाहि लागलीच विद्या-श्रमाला मुकावें लागलें. पण जातां जातांहि त्यांनीं आपला स्वभावसिद्ध दुष्ट-

पणा दाखविण्यास कमी केले नाही. आचार्यांनीं प्रश्न विचारतांच बाळू म्हणाला, " अन्याजीच्या हॉटेलात जाणे फार वाईट आहे असे आम्हांला माहीत नव्हते. कारण मंत्रिमंडळापैकी नागेशसुद्धां तेथें कधींकधी जातो."

अर्थात् आचार्यांनी त्याला दाबलेच. " दुसऱ्याची चहाडी करून तुझा कांही फायदा होईल असें तूं समजूं नकोस."

पण ते तिघेहि विद्याश्रमांतून गेल्यानंतर आचार्यांनीं नागेशला बोलाविले. नागेशच्या आजपर्यंतच्या वर्तनाची त्यांना खाजगी रीतीनें सर्व माहिती होतीच. नागेशची बुद्धिमत्ता व त्याचा सुस्वभाव याबद्दल त्यांना एके काळी प्रेम वाटत असे. पण हळूहळू क्षुद्र वृत्तीच्या आधीन होऊन नागेशचा अधःपात कोणत्या थराला गेला होता हेंहि त्यांनीं पाहिले होतें. नागेश आल्यावर या सर्व गोष्टी लक्षात ठेवून त्यांनी त्याची चांगलीच कानउघाडणी केली.

" ह्या सर्व प्रकारामुळे, नागेश " ते अखेर म्हणाले, " मला तुझ्याबद्दल फार वाईट वाटते. तूं मंत्रिमंडळात आहेस व एका विभागाचा मुख्य अधिकारी आहेस. पण ह्या दोनहि जबाबदारीच्या जागा आतां तुझ्याकडे ठेवणे मला शक्य नाही. ही शिक्षा जबर आहे हें मला माहीत आहे; पण तुझ्या अपराधाच्या मानाने ही सौम्यच ठरेल. यापेक्षा जास्त शिक्षा तुला मी करीत नाहीं. कारण तूं अजूनहि प्रयत्न केलास तर पुनः आमचा विश्वास संपादन करूं शकशील अशी माझी खात्री आहे. म्हणून आजपासून मंत्रिमंडळांत तुझा अधिकार सर्वांच्या खालीं शेवटचा समजला जाईल, आणि तुझ्या वसतिगृहात भार्गव मुख्य अधिकारी मंत्री म्हणून काम पाहील. आणि तूं त्याच्याशी विरोध न करतां शक्य तितकी त्याला मदतच करशील अशी मला खात्री आहे."

मंत्रिमंडळात आपला अधिकार शेवटचा समजला जावा, आपल्या खालच्या एका मुलाच्या, भार्गवाच्या, अधिकाराखाली आपणास वागण्याचा प्रसंग यावा हा अपमान नागेशच्या मानी वृत्तीला कांहीं कमी नव्हता. पण याहिपेक्षां अधिक तीव्र अपमान त्याच्यापुढें वाढून ठेवलेला होता. दुःखे एकएकटीं येत नाहींत. येतांना आपला सर्व लवाजमा व गोतावळा घेऊन येतात व त्या सर्वांच्या ओझ्याखालीं मनुष्याच्या गरीब बिचाऱ्या मनाला दडपून टाकून त्याच्या चिधड्या करून टाकतात.

आचार्यांच्याकडे जाण्यापूर्वी "नागेशच्या वर्तनाचा विचार करण्याकरितां मंत्रिमंडळाची खास सभा बोलावण्यांत आली असल्याबद्दल" त्याला रीतसर कळविण्यांत आले होते. "मी येत नाही जा" असें आपल्या गर्विष्ठ वृत्तीला साजणारेंच उत्तर त्याने दिले होते. आचार्यांच्याकडून परत येऊन तो आपल्याच खोलीत बसतो तोंच मनोहर अगदी गंभीर मुद्रेनें त्याच्या खोलीत आला, आणि "नागेश, ही चिठ्ठी तुला आणून देण्याचें काम माझेकडे आलें याबद्दल मला फार वाईट वाटते." असे म्हणून त्यानें एक घडी केलेला कागद त्याचे हातो दिला. नागेशने तो उघडून पाहिला. मंत्रिमंडळाच्या धोरणाला विरोधी वर्तन केल्याबद्दल, पांडूच्या बाबतीत शक्तीच्या जोरावर दुर्वर्तनाला उघड उत्तेजन दिल्याबद्दल आणि अशा तऱ्हेने लहान मुलाना निंद्य उदाहरण घालून दिल्याबद्दल निंदाव्यंजक ठराव एकमतानें मंत्रिमंडळाच्या सभेत मान्य झाला होता त्याची ती नक्कल होती.

त्या ठरावाच्या नकलेखाली सर्व मंत्र्याच्या सह्या होत्या; पण छे, त्याला त्यांत मोहनची सही दिसत नव्हती. अर्थात् मोहनचे मत ठरावाला विरुद्ध नव्हतें, कारण ठराव एकमतानेंच मंजूर झाला होता. पण ह्या नकलेखाली सही करण्याचे. मोहननें टाळलेले पाहून मोहनच्या अंतःकरणाचा अभिजात थोरपणा, आपल्याशीं कितीहि वितुष्ट वाढलेले असले तरी आपल्याविषयीं त्याला वाटत असलेली तळमळ नागेशच्या लक्षांत आल्याशिवाय राहिली नाहीं. मागील आठवणी जागृत होतांच त्याचे डोळे पाण्यानें भरून आले. आतांच्या-आतां जाऊन मोहनशी झालेलें भांडण मिटवून टाकावे, 'अबोला' सोडून द्यावा, असा एक विचार त्याच्या डोक्यांत चमकून गेला. पण त्याची तितकी छाती झाली नाही. आजच्या दुःखाच्या प्रसंगी सहानुभूतीचा एक शब्द बोल-णाराहि कोणी: मित्र आपल्याजवळ नाहीं या जाणीवेने त्याला आपले दुःख अधिकच तीव्र भासूं लागलें.

इतक्यांत विष्णु आंत आला आणि त्याला विचारूं लागला, "नागेश, 'असाध्य ते साध्य करितां सायास। कारण अभ्यास तुका म्हणे॥' हा अभंग तुला माहीत आहे? सगळा आठवतो कां तुला?"

"नाही रे. त्यात तुकारामांनी प्रयत्नाचे महत्त्व वर्णिले आहे. पहिल्या

एक दोन ओळी आहेत पण मला आठवत नाहीत त्या. नवनीतात तुला सांपडेल तो बहुतेक. माझे नवनीत आज किती तरी दिवसांपूर्वीच हरवले. नाही तर मी पाहून दिला असता."

बोलाफोलाला गाठ पडून किती तरी चमत्कारिक घटना कादंबऱ्यातून घडतात, पण त्या रोजच्या जगांतहि काही कमी नसतात. आतांच पहाना. नवनीताची गोष्ट निघतांच एक नवनीताचे पुस्तक घेऊन शंकर आत आला.

" नागेश, मी पुस्तकालयांत आतां एक पुस्तक हुडकीत बसलो होतो, तों हे तुझें नवनीत मला एका कपाटात सांपडले. त्यावर तुझे नांव आहे, म्हणून म्हटले आणून द्यावे तुला ते."

" अरे वा, नवनीत म्हटल्याबरोबर नवनीत–" विष्णु उद्गारला.

" होय, ते माझेच आहे. किती तरी दिवस झाले ते सांपडत नव्हते. हें घे विष्णु आणि पहा–यांत सांपडेल तुझा अभंग. "

" नागेश, तुला एक गोष्ट सांगणार सांगणार म्हणून पुष्कळ दिवस मी म्हणत आहे, " शंकर त्याला म्हणाला. " सांगूं कां तुला ?"

" कोणती गोष्ट आहे अशी ती ?" नागेशने विचारले.

" चल आपण बागेत जाऊन बोलत बसूं." विष्णूकडे पाहत शंकरने सुचविले.

त्यांना काही खाजगी गोष्टी बोलावयाच्या आहेत हे विष्णूच्या लक्षांत आले. " येथेच का बसा ना ?" तो म्हणाला. " मी जातोच आहें नाहीं तरी माझ्या खोलीत. "

" मला सांगावयाचें आहे म्हणजे असे की,...बाकी मी तुला आजपर्यंत सांगितले नाहीं ही तरी चूकच आहे माझी...म्हणजे पहा कीं, ह्या लोकांनीं तुला अगदी फसविलें आहे. तुझ्या घरच्या गोष्टी मोहनने सगळ्या विद्याश्रमभर पसरविल्या असे बाळूने तुला भासविलें, नाही ? " शंकर हें सांगतांना मध्ये किती तरी वेळ अडखळत होता. कशी सुरवात करावी, नागेशचें मन न दुखवितां कसे सांगावे, याबद्दल त्याचा निश्चय लवकर होईना.

" होय मग? "

" ती गोष्ट खोटी आहे. बाळूनें स्वतः मजजवळ किती तरी वेळां कबूल केले आहे. "

" पण बाळू हें तरी खरे सांगतो म्हणून त्याच्यावर विश्वास ठेवावयाचा कसा? शिवाय मोहननें सागितल्याशिवाय बाळूला तरी समजलें कसे ? कारण मोहनशिवाय त्या गोष्टी कोणालाच माहीत नव्हत्या. मोहन म्हणाला, कीं मीं प्रभाकरखेरीज कोणाजवळच बोललों नाहीं, पण ते खोटे असले पाहिजे. "

" मोहन खोटें बोलेल हें मला कधींहि खरें वाटणार नाही, " शंकर म्हणाला. " शिवाय मी सागतों बाळूला कसे समजले ते. मोहन ज्या गाडीने तुझ्याकडे आला त्याच गाडीत बाळू होता. आणि त्यानें तुम्हां दोघाना जाताना पाहिलें होते. मला बाळूनें स्वतःच हे सारे सागितले. "

" अरे दुष्टा! " नागेशला अधिक एक शब्दहि बोलवेना. अस्थिर मनाने तो खोलींत येरझारा घालूं लागला. " खरेच शंकर, मी काय मूर्खपणा केला हा, अगदी शुद्ध गाढवपणा ! "

गेल्या तीन वर्षातील प्रसंग त्याचे डोळ्यांसमोर एकामागून एक येऊं लागले. आणि प्रत्येक प्रसंगी मोहनचा उदारपणा आणि आपला हटवादीपणा त्याला अधिक तीव्रतेनें भासूं लागला. मध्येंच तो येरझारा घालूं लागे, मध्येच खाली बसून विचार करूं लागे. विचाराच्या तंद्रीतच आताच शंकरने आणून ठेवलेली नवनीताचीं पानें तो सहज चाळूं लागला. शक्य तर विष्णूला हवा असलेला अभंग शोधून काढावा असेंहि त्याला वाटले. इतक्यांत त्यात त्याला स्वतःला मोहननें पाठविलेली जुनी चिठ्ठी सांपडली. दैव आज त्याच्या पुरेच पाठीस लागलेलें दिसत होते.

मोहनचे हस्ताक्षर त्याने ओळखले; अनेक वेळां त्यानें स्वतः त्याला धुडकावून लावलें असतांहि मोहनने त्या चिठींत मोकळ्या मनाने न केलेल्या अपराधाचीहि क्षमा मागितली होती. ही चिठी वेळेवर आपल्याला मिळाली असती तर आपलें आजपर्यंतचें आश्रमीय आयुष्य किती तरी निराळ्या रीतीनें गेलें असतें हा विचार त्याच्या मनात आल्याशिवाय राहिला नाही.

आपला उतावीळपणा, तुटपुंज्या बातम्यावरून अविचाराने काढलेलीं अनुमाने, मूर्खपणा आणि असूया, आपला पोकळ गर्व आणि या सर्वांच्या समुच्चयानें झालेला अधःपात आणि वायां गेलेल्या आयुष्यांतील महत्त्वाचा काळ, या सर्व गोष्टी त्याच्या हृदयाला शल्यासारख्या टोचूं लागल्या. शिक्षकांच्या मनांतून

तो उतरला होता, मित्रप्रेमाला पारखा झाला होता, विद्यार्थ्यांच्या आदराला तो आंचवला होता, ह्या सर्व अपमानाबद्दल त्याचें मन त्याला स्वतःलाच दोष देत होते. त्याच्या अंतःकरणाने त्याच्याशी शत्रुत्व केले नसते, निर्दय-पणाने त्याच्या प्रत्येक अपराधाचे माप त्याच्या गळी बांधलें नसते, तर हे सर्व दुःखहि त्यानें कसेबसे सहन केले असते. पण अंतःकरणाची टोचणी–हृदयाच्या खोल कप्प्यांत दडून बसलेल्या सदसद्विवेकबुद्धीने दिलेला दोष त्याला सहन करवेना.

* * * *

नागेशचे मन अनुतापानें इतके मृदु झाले असतांनाहि ताबडतोब मोहनकडे जाऊन त्याने त्याची क्षमा मागितली नाही, आणि ह्या निष्कारण वाढलेल्या वितुष्टाचा शेवट केला नाही हे कदाचित् आश्चर्यकारक वाटेल. पण भंगलेली मैत्री म्हणजे साडलेले पाणी. ते पुनः सांधण्याचा, जमविण्याचा प्रयत्न केला तरी त्यात गढूळपणा येणारच. पूर्वीचा स्वच्छपणा एकदां नाहीसा झाला तो पुनः उत्पन्न करणे त्याला अशक्य वाटले.

मंत्रिमंडळाच्या पुढील सभेस तो हजर राहिला आणि प्रथमच त्याने स्पष्ट शब्दात आपल्या वर्तनाबद्दल क्षमा मागितली.

नागेशसारख्या मानी मुलाला इतक्या स्पष्ट शब्दांत क्षमा मागतांना किती वेदना झाल्या असतील याची कल्पना सर्वांना आल्याशिवाय राहिली नाही. त्याच्या ह्या अनुतापाच्या शब्दांनी प्रत्येकाचे हृदय हलवून सोडले. प्रभाकरनें लागलीच पूर्वीचा ठराव रद्द करण्याकरितां सूचना मांडली. मनोहरनें अनुमोदन दिले आणि सर्वांच्या अनुमतीने ती सूचना मंजूर होऊन पूर्वीचा ठराव तात्काळ रद्द करण्यांत आला.

" नागेश," मनोहर त्याला म्हणाला, "तुला मी पुष्कळ वेळां विरोध केला आहे. तरीहि तूं परत पुनः आमच्यांत आलास याबद्दल माझ्याइतका कोणालाच आनंद झाला नसेल. तुझ्यामुळें आतां आपल्या मंत्रिमंडळाची कीर्ति दस-पटीने वाढेल."

"डुल्या, आपले भांडण कधीं झालेच नसते तर–"नागेशला जास्त बोलवेना.

# प्रकरण तिसावें

# घडा भरला

हे हेमकार परदुःख-विचारमूढ
 किं मां मुहुः क्षिपसि वारशतानि वह्नौ ।
संदीप्यते मयि सुवर्णगुणातिरेको
 लाभः परं तव मुखे खलु भस्मपातः ॥

रंगनाथची हद्दपारी, आणि भार्गवच्या हातीं अधिकाराचें संक्रमण या दोन्हींमुळे चिंतोपंतांच्या वसतिगृहातील शिस्तीचे वातावरण बरेंच निवळूं लागले होते. लहान मुलांतहि विष्णूचे वजन नाहीसे झाले होते व त्याऐवजी सर्व बाबतीत मधूचें अनुकरण तीं आता करूं लागली होतीं. 'वसंतपूजा', 'अग्निहोत्र', अभ्यासाच्या चोऱ्या, आणि शिस्तीच्या इतर पळवाटा आता लयाला गेल्या होत्या, आणि उनाडपणाच्या बाबतींत त्यानीं संपादन केलेला लौकिक आतां कमी होत होता.

पण त्याच सुमारास त्यांच्या विभागात लहान लहान चोऱ्याचा सुळसुळाट झालेला आढळून आल्यामुळें सर्वच मुले चकित झालीं. मुलें झोंपीं गेल्यानंतर त्यांच्या खिशांतील पैसे हरवूं लागले, मजबूत कुलूपकिल्ली असलेल्या ट्रंकातूनहि पैसे चोरीस जाऊं लागले; बालस्वभावाला अनुसरून ठिकठिकाणीं खुणेने ठेवलेले पैसेहि सुरक्षित राहीनात. पुष्कळ परिश्रम करूनहि चोराचा सुगावा न लागल्यामुळें सर्वच मुले मोठी संकटात पडलीं. आपल्या विभागाला लागलेला कलंक धुवून टाकण्याकरितां सर्वजण नेटाने प्रयत्न करीत असतांना ह्या चोऱ्या घडाव्यात याबद्दल प्रत्येकाला चोराचा संताप आला आणि त्याला शोधून काढण्याकरितां प्रत्येकजण आपखुषीनें प्रयत्न करूं लागला.

हळूहळू सर्वांची संशयित दृष्टि सतीशकडे वळली. एकाच्या पेटींतील पैशांबरोबर नाहीसा झालेला हातरुमाल सतीशच्या पुस्तकात सांपडला, दुसऱ्याच्या पैसे असलेल्या खिशांतील पेन्सिल सतीशच्या पेटीत सांपडली आणि सतीशवरचा सर्वांचा संशय दृढ होऊं लागला. सतीशचा संशय प्रथम कोणाला कसा

आला हे एक गूढच होतें. पण तो आला आणि येण्याबरोबर इतर आनुषंगिक पुराव्यांनी दृढ होऊं लागला. चोऱ्यांच्या विषयाची चर्चा चालू असताना सतीशकडे मुलें बारकाईने लक्ष ठेवून पाहत आणि त्या वेळी होणारी सतीशची मानसिक चलबिचल व मुद्रेवरील विकारांची चंचलता हा भरभक्कम पुरावा त्याना वाटे. अखेर एक दिवस संध्याकाळी भार्गवच्या खिशांतून दीड रुपाया नाहींसा झाला, आणि सतीश भार्गवच्या खोलींत नेहमी जात येत असल्यानें ही चोरी सतीशशिवाय झालीच नाहीं असा सर्वांचा ठाम ग्रह झाला.

सतीशकडे सर्वच मुलें इतक्या संशयी दृष्टीने पाहूं लागली कीं, अखेर सतीशच्या स्वतःच्या दृष्टीनेंहि ह्या संशयाचे निराकरण होणे जरूर आहे असे तेथील अधिकारी विद्यार्थी, भार्गव, नागेश, शशिकांत वगैरेना वाटूं लागले. ह्या प्रकरणाचा कायमचा निकाल लावून टाकण्याकरितां एक दिवस रात्रीची जेवणे झाल्यानंतर त्या विभागांतील सर्व मुले एकत्र जमली आणि " ह्या चोऱ्यांच्याविषयीं तुला कांही माहिती आहे काय ?" असा सरळ प्रश्न सतीशला विचारण्यांत आला. "त्याच्याशिवाय ही चोरी झालीच नाहीं" म्हणून एकाने सुचविलें; लागलीच सर्व अपराध कबूल करण्याबद्दल विष्णु त्याला दरडावूं लागला. हा प्रकार पाहतांच बिचारा सतीश घाबरला, त्याची मुद्रा कावरीबावरी झाली. त्याला एकदम रडूं कोसळले. प्रश्नांचीं उत्तरेंहि त्याला सरळपणे देता येईनात. " मी सर्वस्वीं निरपराधी आहे " हें मात्र तो निश्चयाने सांगे आणि लागलीच ओक्साबोक्शीं रडूं लागे. जणूं काय आपलें निरपराधित्व सिद्ध करण्याकरितां दुसरा कोणताच मार्ग त्याला सुचत नव्हता.

" तो कोणतीच गोष्ट कबूल करीत नाहीं, तर आपल्याला तरी जास्त काय करतां येणार ?" नागेश म्हणाला, " पण सतीश, प्रत्येकाला तुझाच संशय कां येतो ? तुझा कांही तरी संबंध ह्या चोरीशीं असला पाहिजे खास."

" नाहीं रे, मुळींच नाहीं, " सतीश डोळे चोळीत म्हणाला. " माझ्यावर असा खोटा आळ घेऊं नको. मला पैसेच हवे असते तर मला घरून नसते का मागवितां आले !"

"आणि आम्हांला नाही वाटते मागवितां येत?" हा विष्णूचा आवाज होता.

" गप्प बैस रे, त्याला असा त्रास काय देतोस?" भार्गव विष्णूला गप्प करीत

म्हणाला. " अशाने कां तो खरें सांगणार आहे ? सतीश, तूं जर घाबरून अशी वेडीवाकडी उत्तरे देऊं लागला नसतास तर आम्हाला वाटले असते की तूं खरोखरच निरपराधी आहेस."

" मी बोलूं कां ? " पलीकडच्या कोपऱ्यांतून हलक्या आवाजांत मधूनें विचारले.

" होय, जरूर, " नागेश त्याला उत्तेजन देत म्हणाला.

" तर मग मी म्हणतो की, त्याने खरें काय ते सांगितलेच आहे. तो निरपराधी **आहेच** अशी माझी खात्री आहे. "

" पण कशावरून तूं असे म्हणतोस ? " भार्गवनें विचारले.

" कारण मी त्याला याच्यापूर्वीच विचारले आहे आणि सर्व गोष्टी त्यानें मला सांगितल्या आहेत," मधू त्याची वकिली करूं लागला. " तुम्ही त्याला असा घाबरवून टाकलात म्हणजे काय उत्तर द्यावे हेच त्याला मुळीं सुचत नाही. त्याला जर शांतपणानें तुम्ही विचारलेत तर तुमच्या सर्व शंकांचा तो खुलासा करील."

" अगदी हळुबाई की नाही. येथे कोण त्याला खायला उठले आहे काय?" विष्णु म्हणाला.

" तूं कां मध्ये मध्ये उगाच बोलतोस ?" भार्गव म्हणाला. " मग, मधू, तूंच त्याला विचारना कसे विचारायचे ते. "

" वा ! जरूर विचारतो की, " आणि मधू पुढे येऊन सतीशच्या शेजारी बसला आणि त्याच्या खांद्यावर प्रेमाने हात टाकून म्हणाला, " आज सकाळी तूं मला जे कांही सांगितलेस ते सर्व सांग हं येथे. "

मधूचे प्रेमळ, आश्वासनपर शब्द ऐकून सतीशची कावरीबावरी झालेली मुद्रा बरीच शांत झाली. आपला पाठीराखा कोणी तरी मित्र येथें आहे या जाणीवेनें त्याला आधार वाटूं लागला आणि त्याच्या उत्तरांतहि एक प्रकारचा प्रामाणिक मोकळेपणा दिसूं लागला.

" आतां हें पहा, " मधूने आरोपीची तपासणी करण्यास सुरुवात केली. " हल्ली तूं पुष्कळसे पैसे खर्च करीत आहेस. महिन्याभरापूर्वी कांहीं तुझेजवळ इतके पैसे नव्हते खरे ना ? "

" माझे बाबा परवां येथे आले होते त्या वेळी त्यांनी मला खाऊला एक रुपाया दिला होता आणि माझ्या दादांनी आणि वहिनींनी मिळून मला दोन रुपये दिले."

" ही गोष्ट अगदीं खरी आहे. कारण त्याच्या वडिलांनी त्याला खाऊला पैसे दिले त्या वेळी मी स्वतःच तेथे हजर होतो. आता असे पहा, सतीश, तुझे पैशाचें पाकिट पाहूं."

सतीशने कोटाच्या खिशातून लहानसे पाकिट काढून मधूच्या हवाली केले. " आता मीच तुझ्या पाकिटांतले पैसे चोरतो हं." असे हंसत हंसत म्हणून मधूने त्यांतील पैसे डेस्कावर ओतले. " अरेच्या! हा एक रुपाया आणि हे नाणे मिळून बरोबर दीड रुपयाच आहे की हा! आता तुझा संशय कां घेऊं नये आम्ही ?"

" म्हणजे ! बाकीच्या दीड रुपयाचा हिशेब मी तुला सकाळीच नाही का सांगितला ?"

" आतां मी सर्व समजावून सागतो," मधूने खुलासा केला. " सतीशनें गेल्या आठवड्यांत काय काय वस्तु खरेदी केल्या त्यांची मी एक यादी केली. आणि त्याप्रमाणे दादा आणि मी सकाळीच दुकानदाराकडे जाऊन चौकशी करून आलो. एक पेपरवेट सहा आणे, एक चाकू बारा आणे, आणि इतर दोनतीन जिनसा मिळून सहा आणे म्हणजे हा बरोबर दीड रुपाया होतो. आता तरी सतीशवर काही संशय नाही ना?"

" काडीइतका नाही," शशिकात म्हणाला. " आणि तूंसुद्धां मधू बराच पाताळयंत्री दिसतोस! पण आता सतीशचे नाव मात्र निष्कलंक झाले."

पण सतीश नेहमी भार्गवच्या खोलीत जात असतो म्हणून विष्णूनें कांहीसे सुचविले.

" हं किती शंकेखोर आहेसरे, विसू!" नागेश म्हणाला. "सतीशची शंका घेण्याला आतां मुळीसुद्धां जागा नाही."

तिसऱ्यांदा ही थप्पड बसलेली पाहून विष्णु अगदी खजीलच झाला. आपल्या वसतिगृहाला अशा चोऱ्या होणे हें एक लाछन आहे असें कांहीसे तो पुटपुटला.

" खरेच मी तो मुद्दा विसरूनच गेलो." मधू म्हणाला. " बरे, भार्गव, तुझ्या खिशांतले पैसे केव्हां हरवले असावेत असे तुला वाटते ? "

" मला वाटतें काल संध्याकाळी चार आणि पांचच्या दरम्यान. मी वर्गातून आलों तेव्हां होते आणि संध्याकाळी पाहतो तो ते नाहीसे झाले होते."

" आतां प्रश्नच नाहीं, " मधू आनंदाने म्हणाला. " कारण बरोबर त्याच वेळेला मी आणि सतीश दादाजवळ अडलेली गणिते सोडवीत बसलो होतो. आता तरी सतीश निर्मळ आहे अशी तुमची खात्री झाली की नाही!"

" अगदी धुतल्या तादळासारखा ! " किती तरी मुले एकदम ओरडून उठलीं आणि सतीशच्या व मधूच्या पाठीवर प्रेमळ थापांचा पाऊस पडूं लागला.

" खरेच मधू, ह्या प्रकरणांत लक्ष घालून तूं हे मिटवलेस याबद्दल सर्वांच्या तर्फे मी तुझे आभार मानतो. " भार्गव म्हणाला. " आतां सतीश चोर नाही हे ठरले. पण **चोर** आहे तरी कोण ? तो तर हुडकून काढला पाहिजेच ना?"

"आणि आपण त्याला हुडकून काढूंच," शशिकात म्हणाला. " तो आता-सुद्धां येथेंच असेल. कोण आहे रे चोर तो ?" आणि तो मोठ्या गंभीरपणे इकडे तिकडे पाहूं लागला. " ठीक आहे. कोणी कां असेना. पण त्याचे मन आता त्याला कसं तोडतोडून खात असेल नाही ? "

सभा संपली, मुले पांगली आणि नागेश व शशिकांत, पुढील बेत ठरविण्या-करितां भार्गवच्या खोलीत जमले.

" तुला आणखी कोणाचा संशय येतो का रे, भार्गव? "

"कोणाचाच नाहीं. तुला ? नाही ना? मग आपल्याला काय करता येईल?"

" का बरें ? "

" मी सागतो. आतां पुनः तुझ्या खोलीत चोर येणार नाही खास. पण तो माझ्यावर हल्ला करण्यास कमी करणार नाही. समजा, आपण कांही खुणा केलेले पैसे माझ्या टेबलाच्या चोरखणांत ठेवले तर ! तो चोरकप्पा नांवाचाच आहे, कारण पुष्कळांना आतां तो माहीत झाला आहे."

" त्याचा काय उपयोग?"

" नाहीं कसा? आतांपर्यंत ज्या चोऱ्या झाल्या त्या बहुतेक सर्व ठराविक वेळेला संध्याकाळी चारपांचच्या सुमारास झालेल्या आहेत. तो आतां सवकला

आहे आणि कांहीं दिवस थांबून तो पुनः कोठे तरी डल्ला मारणार यात शंका नाहीं. माझ्या खोलीच्या दाराशीच सामानाची मोठी पेटी आहे. समजा, तूं, मी, हा शशिकांत आणि आणखी एकदोघे जर पाळीपाळीनें त्या पेटीत लपून बसलों तर ? ”

“ नामी युक्ति! ” शशिकांत ओरडला. “ पण माझे हे ताडाएवढे हातपाय त्या पेटीत मावायचे कसे? ”

“ अन् त्या पेटीला नेहमीं कुलूप असते ते! ”

“त्याचे काय मोठेसे! आपण त्याचे कुलूप अजीबातच कांहीं दिवस लावूं नये म्हणजे मुळींच संशयाला जागा नको. काय वाटेल ते होवो, पण चोर हा शोधून काढलाच पाहिजे. आपल्या वसतिगृहाचें नाव जातें अन् शिवाय निरपराधी मुलाचा नाहक छळ! ”

“ ठरलें तर, उद्यांपासून पाहऱ्याला सुरुवात. पहिली पाळी माझी.” भार्गव म्हणाला. “ अन् नागेश, धाकटा मधू मोठा चुणचुणीत छोकरा आहे नाहीं ? त्यानें सतीशची बाजू कशी छान राखलीन् आज ! ”

“ नाहीं तर! ” नागेशने उत्तर दिले. “ अगदी त्याच्या भावासारखा. तो-सुद्धा आला तेव्हा असाच बाणेदार होता. ”

“ अं नागेश, तूं कधीपासून म्हणूं लागलास हे?” आश्चर्यानें भार्गव म्हणाला.

“ होय, कांहीं दिवसांपूर्वी मी असे म्हणत नव्हतों हे खरें आहे. पण आतां काय त्याचे ? ” आणि एक निःश्वास टाकून तो आपल्या खोलीकडे गेला.

दुसऱ्याच दिवसापासून पाळीपाळीनें ते नागेशच्या खोलीवर पाहरा करूं लागले. प्रथम काही दिवस त्यांना कांहींच सुगावा लागला नाही, पण त्यांना फार दिवस वाट पाहावी लागली नाहीं. एक दिवस संध्याकाळीं नागेश पेटीत बसून पाहरा करीत होता. सुमारें अर्धा तास झाला. तो आतां कंटाळून तेथून निघून जाणार तोंच बाहेरच्या पडवींत कोणाची तरी चाहूल लागली. अगदीं हलक्या पावलानें, मुळींच आवाज न करितां एक मुलगा नागेशच्या खोलीत शिरला, आणि अगदी गुपचूपपणें नागेशचा चोरखण त्यानें उघडला. त्यांत दोन रुपये रोख, कांहीं नाणें-खुर्दा त्याला दिसले. आपल्या खिशातून स्वतःचे पैशाचें पाकिट काढून त्यांत तो ही स्वसंपादित संपत्ति सामील करणार तोंच

त्याच्या खांद्यावर नागेशनें हात ठेवला आणि त्याची मान घट्ट पकडली. त्यानें मागे वळून पाहिलें; आणि विष्णूची आणि नागेशची—कारण तो चोर विष्णुच होता—दृष्टादृष्ट झाली. त्या दोघा जुन्या मित्राचे ह्या नवीन परिस्थितीत झालेलें हे मधुरमीलन! विष्णु तर चकितच झाला. पैसे त्याच्या थरथर कापणाऱ्या हातातून लागलीच जमिनीवर पडले आणि चहूंकडे पागले!

एक क्षणभर दोघेहि एकमेकांकडे टकमक पाहतच राहिले; आपलें सर्व कृत्य कोणी तरी मुद्दाम पाळत राखून पाहिलें, आणि आज मुद्देमालानिशी आपणांस पकडले या कल्पनेने लज्जा, भीति, काळजी या सर्व विकारानी विष्णूची मुद्रा पांढरी फटफटीत झाली. मृत्यूच्या दारी उभ्या असलेला, सांपळ्यांत सांपड-लेला उंदीरसुद्धा इतका भेदरला नसेल.

"तूं, विष्णु, आजपर्यंतचा गोंधळ माजविणारा तूंच काय?" नागेश आवेशाने तोंडास येईल ते बोलूं लागला. "माझा जीवश्च कंठश्च मित्र समजलो तो तूंच ना? आज इतराच्यावर बेमालूम आळ घेणारा तूंच?"

"नागेश, नागेश, माझे नाव फोडूं नकोस अं!" विष्णु काकुळतीने म्हणाला.

"नाव फोडूं नको! एवढीच तुझी इच्छा! बस, दुःख नाही, क्षमा नाही! लाज सुद्धा वाटत नाही तुला हे बोलायला!"

"काय करूं रे मी! माझा नाइलाज झाला. अन्याजीचे देणे कितीतरी झाले! शिवाय जनार्दनने आणि त्यांनी मला त्यांत चांगलाच गंडा घातला. त्यांनी मला लुबाडले. मी काय करूं मग! पण नागेश, काहीहि कर, पण माझे नाव फोडूं नकोस."

"मी चोऱ्या छपविण्याचा धंदा करीत नसतो." नागेशने त्याला झिड-कारीत उत्तर दिले.

"अस्से काय!" विष्णूचा नूर पालटला. "मग मलासुद्धां तुझ्या चहाड्या सागतां येतील. अन्याजीच्या हॉटेलात तूंहि जात होतास, एवढेच मला माहीत आहे असे समजूं नकोस! नागेश, माझें नांव सांगूं नकोस, नाही तर आपल्या सगळ्याचेंच बिंग फुटेल बरें!"

"कसला हलकट मुलगा आहेस तूं आणि तुझ्या नादी लागून माझ्या चागल्या मित्रांशी मी भांडणे केली! मला कोण समजतोस तूं? माझ्या

चव्हाड्या तूं सांगशील म्हणून मी तुझ्या चोऱ्या छपवूं होय ? छे, छे, तूं आताच्या आता माझ्या दृष्टीसमोरून चालता हो. तुला स्पर्श करण्याचीसुद्धां मला किळस वाटते."

"नको रे, नागेश, माझ्यावर रागावूं. तुला इतके लागेल असे मला वाटलें नाहीं. मी अगदीं दुष्ट आहें, हलकट आहें, मला कबूल आहे; वाटलें तर माझें नांव सांग तूं. पण असा मला अगदी झिडकारून टाकूं नको. आजपर्यंतची आपली मैत्री आठव. आपलें एकमेकांवर किती निःसीम प्रेम होतें. पण, नागेश, एक वेळ मला सोडून दे. माझें नांव सांगूं नको. अशी वेळ येईल, तुझीं मला अशीं आर्जवें करावी लागतील याची कल्पना तरी कोणाला होती ?"

"तूंच चोर ठरलास अखेरीस! तुझी मला यत्किंचित्‌हि शंका आली नाहीं. तुला माझा खरा मित्र मी आजवर समजलों. अरे राम! मी तुला थोडासा उनाडपणाचा धडा शिकविला असेल, पण, विष्णु, मी तुला काहीं चोरी करायला तर नाही ना शिकविले ?"

"त्या एकामागोमागच सर्व गोष्टी आल्या. ह्या मूर्खाचा सहवास आणि अन्याजीचें हॉटेल—त्यामुळेच तर आज ह्या थराला सर्व आले. मी असलें घाणेरडें कृत्य करीन म्हणून दोन महिन्यांपूर्वी जर कोणी भविष्य वर्तविले असते तर मला खरेसुद्धां वाटले नसते. आणि तूंसुद्धा त्याच्याबरोबर, माझ्याबरोबर अन्याजीच्या हॉटेलांत येतच होतास ना ?" बिचाऱ्या विष्णूला आपला दुःखावेग आवरेना. अस्थिर मनाने तो हात चोळीत उभा राहिला.

"छे छे! नागेश, तूं माझे नाव सागितलेस तर मलाहि सगळे बाहेर काढणें जरूर होईल."

"तूं पुनः हे शब्द उच्चार तर खरे!" नागेशचा तिरस्कार त्याच्या मुद्रेवर स्पष्ट दिसूं लागला. "पुनः म्हण एकदां की मी ह्याच पावलीं आचार्यांच्याकडे जातों. नादान कार्ट्या, तूं माझी इतकीच किमत केलीस काय ? तूं कांहीं म्हटलेस तरी मी आतां थांबणार नाहीं. हा मी चाललो."

पण नागेश खुंटीवरची टोपी घ्यायला जाणार तोंच विष्णूनें त्याचा हात धरून त्याला अडविले. "मी अगदीं दुष्ट, नीच आहे. काय म्हणशील ते खरें आहे. पण एक वेळ मला क्षमा कर आणि माझे नांव फोडूं नको. नागेश,

तुलासुद्धां कोणाची तरी अशीं आर्जवें करण्याचा प्रसंग आलाच असेल ना ? माझे जन्माचे नुकसान करूं नको. मी लहान आहे. केवळ वाईट मुलाच्या नादीं लागलों म्हणून ही स्थिति झाली. माझ्यावर एवढी दया कर.''

विष्णूच्या कोवळ्या मुखावरील अल्लडपणाच्या छटासुद्धां अजून गेल्या नव्हत्या, आणि इतक्या वयांतच वाईट वर्तनाचा म्हणून त्याची कीर्ति किती तरी दिवस पसरली होतीच. आज तर तो चोर-गुन्हेगारांच्या सदरांत पडला होता. त्याच विष्णूचे चारित्र्य कदाचित् अधिक उज्ज्वल होऊं शकलें असते. त्याची दुःखी, उदास, भयत्रस्त मुद्रा आणि भूतकालीन आठवणी यामुळें नागेशचें हृदय द्रवलें. स्वतःचे अपराध उघडकीस येतील या धाकानेंहि जी गोष्ट करण्यास तो तयार झाला नाही तीच गोष्ट विष्णूबद्दल अनुकंपा उत्पन्न झाल्यामुळे करावीसे त्याला वाटूं लागलें.

'' मी काय सांगूं तुला, विष्णु! तूं माझा मित्र आहेस, पण तूं असे करशील असे मला कधींहि वाटलें नाहीं. ''

'' अन् नागेश, मला तरी परवांपरवापर्यंत कोठें वाटलें होते ? पण मला मोह पडला. मोह आवरतां येईना मला. मोह कसा आवरावा हें मला माहीतसुद्धां नाही. ''

'' मला तुझी खरोखर कींव येते. पण मला सांगितलें हें पाहिजेच. तें माझें कर्तव्यच नाहीं का ? आणि आजपर्यंत माझ्या कर्तव्याच्या बाबतींत इतका चुकारपणा मी केला आहे कीं आतां हलगरज करण्याची माझी छातीच नाही- हें काम माझ्याकडे नसतेंच आलें तर किती छान झालें असतें !''

विष्णूने एक शब्दहि उच्चारला नाहीं. सार्वजनिक अपमान, लज्जा, तिरस्कार यांचे भीषण चित्र त्याच्या डोळ्यांपुढे उभें राहिलें. त्यानें नागेशकडे केविल-वाण्या मुद्रेनें पाहिलें. त्याच्या डोळ्यांत त्याच्या अंतःकरणाचे सर्व भाव आरशासारखे प्रतीत होत होते.

'' विष्णु, तुझ्याकडे पाहिलें कीं माझें देहभान नाहीसें होतें. मी तुला आतां कांहीच सांगत नाही, पण मी विचार करून काय तें ठरवीन.''

'' तुला वाटेल तसें कर. माझें अखेरचें मागणें इतकेंच कीं, जरी तूं माझें नांव सांगितलेस, तरीहि माझी मैत्री सोडूं नको. विद्याश्रमांतून मी गेल्यावर

माझ्याबद्दल प्रेम वाटणारा एकहि मित्र मागें नाहीं, ही कल्पनासुद्धां मला सहन होणार नाही."

" अरेरे, विसू, इतक्या दिवस ह्या चोऱ्या तूंच करीत होतास हा विचार-सुद्धां कसासाच वाटतो."

" म्हणजे तूं सुद्धा, नागेश, मला झिडकारून टाकणार ? म्हणजे माझ्याशी सहानुभूति बाळगणारा कोणीहि नाही एकूण!" आणि विष्णूला रडें आवरेना.

" नाही, नाहीं, विसू, तुला झिडकारणारा मी कोण ? छे, छे, कांहींहि झाले तरी तुझ्यावरचें माझे प्रेम मी कधींहि कमी करणार नाहीं. पण तूं आतां जा. जेवण झाल्यानंतर मी काय ते तुला सांगेन."

विष्णु निघून गेला व घडलेल्या चमत्कारिक प्रकाराचा खिन्नपणे विचार करीत नागेश एकटाच कितीतरी वेळ बसून राहिला. विद्याश्रमातील सर्व विद्यार्थ्यांना विष्णूचे नांव जरी कळविलें नाहीं तरी आपल्या विभागांतील मुलांना तरी तें कळविणे जरूर आहे, यांत त्याला शंका नव्हतीच. मुलांचे चोरलेले पैसेहि विष्णूने परत दिले पाहिजेत हे तर उघड दिसत होतेच. आणि इतका सर्व प्रकार झाल्या-नंतर विष्णूनें विद्याश्रमात राहणे इष्ट नाही, याबद्दलहि त्याची खात्री होती. पण इतके करूनहि आचार्यांना किंवा इतर शिक्षकांना न कळविता हे प्रकरण दाबून टाकणें कितपत इष्ट आहे याचा निश्चय त्याला करता येईना. स्वतःचे अपराध उघडकीस आणण्याची विष्णूने दिलेली धमकी त्याला वारंवार आठवूं लागली, आणि आपले अपराध लपवून ठेवण्याच्या भित्र्या स्वार्थबुद्धीनें तर आपण विष्णूला ह्या सवलती देण्याचा बहाणा करीत नाही ना? विष्णूवर दया कर-ण्याचे सोंग करून आपण आपल्या मनाला फसवीत तर नाही ना? हा विचार त्याच्या अंतःकरणाला सारखा छेडूं लागला. विष्णूनें ही धमकी दिली नसती तर हें प्रकरण आपसांत मिटविण्याची विष्णूची मागणी त्यानें कदाचित् लवकर मान्य केली असती. अखेर विष्णूच्या प्रकरणाचा कसाहि निकाल लागो, एक गोष्ट त्यानें निश्चित ठरविली कीं, आपण स्वतः आचार्यांकडे जाऊन आपल्या आजपर्यंतच्या सर्व अपराधांचा पाढा वाचणार!

वर डोकावूं पाहणाऱ्या भित्र्या स्वार्थबुद्धीची शंका अशा तऱ्हेनें निर्मूल केल्यानंतर विष्णूच्या चोरीचें काय करावें याचा तो पुनः विचार करूं लागला.

पण पुष्कळ वेळ विचार करूनहि त्याचे कांहींच निश्चित ठरेना म्हणून त्यानें भार्गवचा सल्ला घेतला. शक्य तर विश्णूचा अपमान वाचविण्याची भार्गवचीहि इच्छा होती, पण स्वतःचे जबाबदारीवर असें करण्याची त्याला छाती होईना, म्हणून प्रभाकरचा सल्ला त्यांनीं घेतला. " तुम्ही असेंच करा ना," प्रभाकरनें सुचविले. "कोणाचीहि नावे न सागतां केवळ तात्त्विक चर्चेकरितां घेतलेले एक उदाहरण म्हणून हें प्रकरण आचार्याना सांगा, आणि ते सागतील तसें वागा म्हणजे झालें. " अर्थात् हा मार्ग सर्वानाच पसंत पडला.

आचार्यांनीं नागेशचें म्हणणें शांतपणे ऐकून घेतले, जरूर ते प्रश्न विचारून अधिक खुलासाहि त्यांनी करून घेतला. केवळ तात्त्विक चर्चेकरितांच हे बोलणें चाललें नसून अशा तऱ्हेचें उदाहरण खरोखर घडलेले आहे हे त्याच्या लक्षांत यावयाला वेळ लागला नाही. " तूं म्हणतोस तशी खरोखरच स्थिति असेल," त्यांनी अखेर आपला निर्णय दिला, " आणि केवळ संगतीने तो मुलगा बिघडलेला असेल तर मला वाटते तूं सुचविलेला मार्ग शहाणपणाचा आणि त्याच्या कल्याणाचाच आहे आणि तशी व्यवस्था करण्याचाहि मी तुला पूर्ण अधिकार देतो. विशेषतः या प्रकरणात तूं फारच सरळपणाने आणि जबाबदारी जाणून वागलास याबद्दल मात्र मला तुझें खरोखरच कौतुक वाटते."

आचार्यांनीं केलेली स्तुति ऐकून नागेश अगदींच ओशाळला. " आपण म्हणता तितका सद्गुणी मी खरोखरी नाही. आजपर्यंत मींहि अनेक चुका केल्या आहेत. आतां त्या सर्व आपल्याला निवेदन करून आपली क्षमा मागावी हाहि येथे येण्याचा माझा एक हेतु आहेच. कदाचित् माझे अपराध फार भयंकर आहेत. कदाचित् येथे राहण्याची माझी योग्यता नाहीं असेहि आपल्याला वाटेल; पण आपल्यापुढें अपराधांची कबुली दिल्याशिवाय माझ्या मनावरचें दडपण कमी होणार नाहीं."

" तुझा हा विचार निःसंशय चांगला आहे. अपराधांची कबुली हे पश्चात्तापाचें पहिलें लक्षण आहे. आपल्या चुका दुरुस्त करण्याचा तूं अंतःकरणापासून प्रयत्न करीत आहेस याबद्दल मला फार आनंद वाटतो. पण त्या सर्व चुकांची कबुली स्वमुखानें देण्याची जरूरच आहे असें नाही. तुला वाटतें त्यापेक्षा पुष्कळ अधिक गोष्टी मला माहीत असतात असेंहि तुला आढळून येण्याचा

संभव आहे. तूं अपराध कबूल करायला तयार झाला आहेस हेंच पुष्कळ झालें. तेव्हा आतां तें सर्व ऐकण्याची मला कांही जरूर वाटत नाही.''

"पण तें सर्व आपल्याला सागितल्याशिवाय मला समाधान वाटणार नाही.''

" मग तुझी इच्छा! शिक्षक म्हणून नव्हे तर एक सल्लागार म्हणून तुला त्या सर्व हकीगती मला सांगण्याची इच्छा असली तर मी ऐकेन आणि तुला योग्य तो सल्ला देईन.''

नागेशला इतकें उत्तेजन पुरेसें होतें; खालीं मान घालून अस्थिर चित्तानें एका हाताने सदऱ्याच्या गुंड्यांची चाळवाचाळव करीत नागेशने गेल्या दोन वर्षातील आपला कार्यक्रम थोडक्यात निवेदन केला. आपल्या कर्तव्याची आपण कशी हेळसांड केली व लहान मुलांना किती वाईट उदाहरण घालून दिले हे पण त्याने सांगितले.

आचार्य रत्नाकरानी त्याच्या चुकाबद्दल एक शब्दहि उच्चारला नाही; पश्चात्ताप झाल्याबद्दल उलट त्याचें कौतुक केले आणि अद्यापहि लहान मुलांना योग्य मार्ग दर्शविण्याकरितां त्याला काय करता येईल याचीच प्रामुख्यानें चिकित्सा केली. जातां जातां ते म्हणाले, " नागेश, ईश्वराचे सामर्थ्य हाच मनुष्याचा खरा आधार. मोहाचा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य ईश्वरावर श्रद्धा असल्यानेच प्राप्त होऊं शकते. परमेश्वराची भक्तियुक्त अंतःकरणाने केलेली प्रार्थना हीच मनावरील दडपण दूर करण्याचा एकच मार्ग आहे.'' असे म्हणून झाल्या गोष्टीबद्दल चिंता करीत न बसतां पुढे दृष्टि ठेवून कामाला लागण्याबद्दल उपदेश करून त्यांनी त्याला निरोप दिला.

आचार्यांचा आशीर्वाद आणि त्यांची प्रेमळ सहानुभूति यांमुळे आपल्या मनावरील पुष्कळ दिवसांचे दडपण कमी झालें असे त्याला वाटलें आणि आशायुक्त मनाने आणि आनंदाने तो आपल्या खोलींत परत आला. विष्णु त्याची वाटच पाहत बसलेला दिसला. बाह्य परिस्थितीत असलेले अंतर सोडून दिलें तर याच्या व आपल्या आजच्या मनोवृत्तीत किती तरी साम्य आहे असे त्याला वाटलें. अर्थात् विष्णूशीं बोलतांना त्याच्या अंतःकरणाला फुलासारखें संभाळून घेऊन अत्यंत कनवाळूपणानेंच तो बोलूं लागला.

" बैस येथें, विसू, एक गोष्ट निश्चित ठरली कीं तुझें नांव आचार्यांकडे

कळवावयाचे नाही.” विष्णूने उत्तर दिलें नाही, पण त्याला किती आनंद झाला होता हे त्याच्या डोळ्यांवरूनच दिसत होतें.

“ पण घेतलेले सर्व पैसे तूं परत केले पाहिजेस; आणि आपल्या विभागांतील मुलाना तरी तुझे नांव मी कळवीन; अर्थात् तुला विद्याश्रम सोडून जावयास पाहिजेच. ”

“ बरं, नागेश, आतां माझे एकच मागणे आहे.”

“ कोणते ते ?”

“ माझ्या जाण्याची वेळ येईतोपर्यंत माझे नाव आपल्या विभागांतील मुलांनासुद्धां कळवूं नये. ”

“ अर्थात् ! ” नागेश म्हणाला, “ तुझे नांव आजच सांगितलें तर तुला येथे एक दिवसहि राहणे शक्य होणार नाहीं हे मला माहीत आहे.”

“ पण विद्याश्रम सोडलाच पाहिजे कां? ”

“ त्याला इलाज नाही. विसू, मलासुद्धा फार वाईट वाटते, पण काय करूं मी—तुला जमेलना हे ?”

“ हो.” विष्णु अगदी रडकुंडीस आला होता. “ मी आईला सर्व हकीकत कळवितो म्हणजे ती मला घेऊन जाण्याची व्यवस्था करील. पण तिला किती दुःख होईल नाहीं ?”

“ पापाचें फळ दुःख हें नेहमीच ठरलेले आहे, विसू, मला स्वतःच्या मनाला काय कमी दुःख होतें आहे! आणि एक तुला सांगावयाचे राहिलेच. स्वतःच्या भीतीमुळे मी तुला ह्या सवलती दिल्या असें वाटूं नये म्हणून मी स्वतः आचार्यांना गेल्या दोन वर्षांतील माझी सर्व पापे सांगितली.”

“ खरेंच ? छे, छे, मला फारच वाईट वाटते. माझ्यामुळें तुला हें करावें लागले ना!”

“ तसे खरे, पण मला कांहीं वाईट वाटत नाही, उलट समाधानच वाटत आहे. उघडकीस न आलेले पाप हेंच मनाला खरें दुःखदायक असते नाहीं!”

“ तूं म्हणतोस तेहि काही खोटें नाहीं. मलासुद्धां आतां पुष्कळच बरें वाटतें. गेले पंधरा दिवस माझ्या मनाला किती वेदना होत होत्या याची कोणालाहि कल्पनासुद्धां येणार नाहीं. मला नेहमी भीति वाटावयाची, रात्री

स्वप्नांत मी दचकून जागा व्हायचा. 'माझी कोणाला शंका तर येणार नाहींना', 'कोणीं पाहिलें तर नाहींना' असे वाटून लाजेनें मी अर्धमेला होऊन जायचा. तूं मला पकडलेस याबद्दल एकापरी समाधानच वाटलें. बाकी तूं ज्या वेळीं माझ्या खांद्यावर हात ठेवलास त्या वेळीं मी किती भ्यालों म्हणून सांगूं! पण तूंच मला पकडलेस हे चांगलेच झालें. मी कधींच सांपडलों नसतों तर माझें पाप मला मनातल्या मनात खात राहिले असतें. त्यापेक्षा सांपडलों हे चांगलेंच झालें, नाही ?"

नागेश विचार करूं लागला. जो मुलगा अशा तऱ्हेने बोलूं शकतो त्याला जर योग्य मार्गदर्शक भेटले असते तर तो मुलगा किती निराळा झाला असता, हा विचार त्याच्या मनांतून कांहीं केल्या जाईना. तो उठला आणि आपल्या टेबलावरील एक छोटेसे पुस्तक घेऊन विष्णूजवळ पुनः येऊन बसला.

" हे पाहिलेस का, विष्णु, मी तुला ह्यातील कांहीं भाग वाचून दाखवितो."

" नागेश, तूं अजून माझ्याशी पूर्वीसारखाच प्रेमाने बोलतो आहेस, माझा तिरस्कार नाहीं करूं लागलास हें आश्चर्य आहे; अन् मी तर अगदी अट्टल—"

'चोर' हा शब्द अगदी विष्णूच्या ओठावर आला होता, पण त्या कल्पनेनेंहि त्यांच्या अंगावर शहारे आले.

नागेशने आपल्या हातातील 'वाल्मिकीचा जय' या पुस्तकातील एक पान उघडून वाचण्यास सुरुवात केली.

" वाल्मीकीला वाटलें–हायहाय! मी कितीजणांचा घातपात केला आहे. या पातकाचे क्षालन मी आता कसे करूं ? हायरे पाप्या चांडाळा! तुझ्या हातून काय थोर पापे घडलीं आहेत!"

वाचता वाचता नागेश क्षणभर थांबला.

" मी ही गोष्ट वाचली आहे, नागेश. त्यांतील वाल्मीकी हा अगदीं अट्टल दरोडेखोर होता नाही ? " विष्णु म्हणाला.

" होय, पण मी तेवढ्याकरिता नाहीं ती गोष्ट तुला वाचून दाखविली. मी ही कादंबरी पुनः पुनः कितीतरी वेळां वाचली आहे आणि त्यांतील वाल्मीकीच्या पश्चात्तापाचा माझ्या मनावर फार परिणाम झाला आहे. वाल्मीकि फार दुष्ट होता, पण ऋषींचें तें दिव्य गान ऐकतांच त्याच्या वृत्ति

अंतर्मुख झाल्या आणि तो आत्मपरीक्षण करूं लागला. आपलीं सर्व पापें त्याला एकामागून एक आठवूं लागलीं. आणि त्याला अंतःकरणापासून पश्चात्ताप होऊं लागला. आपलीं पापें लपवून ठेवून त्यानें सावाचें सोंग आणलें नाहीं, कीं पश्चात्तापाचें सोंग आणून कोरडा उपदेश तो करीत बसला नाही. त्याचें अंतःकरण कळवळलें, आपल्या दुःखी बाधवाकरिता तो अश्रू गाळूं लागला आणि त्याचा परिणाम अट्टलांतल्या अट्टल दरोडेखोरांवरहि झाला. जी गोष्ट वसिष्ठ व विश्वामित्र यांना शक्तीच्या जोरावर करिता आली नाहीं ती त्यानें अंतःकरणाच्या सामर्थ्यानें करून दाखविली; कारण त्याचें अंतःकरण पश्चात्तापानें पवित्र झालें होतें."

"खरेंच नागेश, तूं आजपर्यंत मला ह्या गोष्टी कां नाहीं सांगितल्यास ? म्हणजे आज मला त्या वाल्मीकीसारखा पश्चात्ताप करण्याची पाळी आली नसती."

नागेशनें उत्तर दिलें नाहीं. आचार्य रत्नाकरांनी नुकताच केलेला उपदेश त्याला आठवला. विष्णूचा हात त्यानें आपल्या हातात घेऊन त्याचेकडे एकदां पाहिलें. आपल्या उच्छृंखलपणाचे घोर परिणाम त्याचे डोळ्यासमोर स्पष्ट दिसूं लागले आणि आपल्या या पापांचा परिणाम विष्णूला तरी निदान भोगावा लागूं नये म्हणून त्यानें मनांतल्या मनात परमेश्वराला कितीतरी कळकळीनें विनविलें.

# प्रकरण एकतिसावें
# अखेरचा आघात

विष्णूचा व्यासविद्याश्रम सोडून जाण्याचा दिवस जवळ येऊं लागला; पण अद्याप नागेश व भार्गव या दोघांखेरीज त्याच्या जाण्याच्या कारणाची कोणासच कल्पना नव्हती. वसतिगृहांतील चोऱ्याची साथ अर्थातच थांबली होती; चोर कोण असावा, आता त्याचे उद्योग कां थांबले, याविषयीं अनेकांचे अनेक तर्क चालत आणि त्या काल्पनिक चोराला उद्देशून जे तिरस्काराचे तीव्र उद्गार मुले काढीत ते निमूटपणे ऐकून घेणे हे विष्णूला कांहीं कमी जड जात नसे.

तो लवकरच विद्याश्रम सोडून जाणार आहे हे बहुतेकास समजले होते; पण दर सत्राच्या अखेरीस कांहीं मुले घरगुती कारणाकरिता नेहमीच सोडून जात असल्यामुळे त्याबद्दल कोणालाच आश्चर्य वाटलें नाहीं; त्याच्या जाण्याच्या खऱ्या कारणाची कोणाला अंधुकशी कल्पनाहि आली नाही, यातहि आश्चर्य नाही.

अखेर त्याच्या निघण्याचा दिवस आला. संध्याकाळची जेवणे झाल्यावर भार्गवच्या बोलावण्यावरून विभागातले सर्व विद्यार्थी एकत्र जमले. आज कशा-करितां मुद्दाम जमविण्यात आले आहे याचेबद्दल तर्क चालू असतांनाच भार्गवने गेल्या काही दिवसात कोणाकोणाचे पैसे चोरीस गेले त्याची चौकशी केली. पाच-सहा जणानी आपआपल्या चोऱ्याचा तपशील सांगितला आणि भार्गवने त्याच्या चोरीस गेलेल्या लहान लहान रकमा त्यांना ताबडतोब दिल्या. कांहींहि पूर्व-सूचना नसतांना आपले पैसे परत मिळालेले पाहून त्याना अर्थातच आनंद झाला व आश्चर्यहि वाटले.

नंतर नागेश बोलण्यास उभा राहिला. "अपराधी मुलगा सांपडला असल्यानें आता चोऱ्या अर्थातच थाबतील असे समजून त्या मुलाच्या कृत्याकडे दयार्द्र बुद्धीनेच तुम्ही पहाल. शिवाय त्यानें सर्व रकमा ताबडतोब परत केल्या असल्यानें सर्वांचे झालेले नुकसान भरून आलेच आहे. सतीशवर खोटा आरोप घेतला जाऊन त्याला पुष्कळच त्रास झाला याबद्दलहि त्या मुलानें त्याची क्षमा मागितली आहे."

" पण तो मुलगा कोणता ? " चहूंकडून एकच प्रश्न उठला.

विष्णु नागेशच्या शेजारीच बसला होता. दुखः, लज्जा यांमुळे त्याच्या मनात इतकी विलक्षण खळबळ उडून गेली होती की त्याला वर मान करून मुलाकडे पाहण्याची हिमतहि होईना. आणि " हा तो मुलगा " असे म्हणून नागेशने त्याच्या खांद्यावर हात ठेवला, त्या वेळी जर पृथ्वी दुभंग झाली असती तर त्याने खास त्यांत उडी घेतली असती.

सर्व विद्यार्थी तर चकितच झाले. एक शब्दहि कोणीं उच्चारला नाही. नागेश पुढे म्हणाला, " त्याला आतांपर्यंत झाली ही शिक्षा पुष्कळ आहे. झालेलें नुकसान भरून देण्याचा त्याने शक्य तितका प्रयत्न केला आहे आणि **त्याच कारणाकरितां** तो आज विद्याश्रम सोडून जात आहे. झाल्या अपराधाबद्दल त्याला मनापासून पश्चात्ताप झाला आहे, आणि तुमच्या सर्वांची तो क्षमा मागतो आहे. तुम्ही त्याला क्षमा करणार नाही काय? "

" जरूर करूं, " हलक्या आवाजात शब्द ऐकूं आले व लागलीच सर्वत्र स्तब्धता पसरली. अनावर झालेले विष्णूचे हुंदके त्या स्तब्धतेत अधिकच करुण भासूं लागले. इतरांचेहि डोळे पाण्याने भरून आले. कसाहि असला तरी विष्णु लोकप्रिय होता, व त्याच्या दुःखाचा व पश्चात्तापाचा परिणाम पुष्कळ मित्रांच्याहि मनावर अतिशय झाला.

" मी एक महत्त्वाची गोष्ट सांगावयाची विसरलोच होतो. " नागेश पुढे म्हणाला. " आपल्या विभागांतील कोणतीहि गोष्ट बाहेर न फोडण्याबद्दल आपल्या मुलांची ख्याति आहेच. गुप्त ठेवलेल्या त्या सर्वच गोष्टी चांगल्या नव्हत्या याबद्दल मला फार वाईट वाटते. पण आजची ही गोष्ट गुप्त ठेवणे हे खरोखरच भूषणावह आहे. आपल्या विभागातील चोऱ्यांचा तुम्ही कोठेच उल्लेख केला नाहींत तर इतर मुलानाहि त्याचा लवकरच विसर पडेल. विष्णूच्या नांवाच्या आज चहूंकडे जाहिराती लावून त्याच्या नावाला कायमचा कलंक लावण्यात काय फायदा आहे? "

मुलांनीं ह्या विनंतीला ताबडतोब मान्यता दिली. विष्णु रात्रीच्याच गाडीने जाणार असल्याने टांगा फाटकाशी येऊन उभा राहिला; आणि विष्णूला निरोप देण्याकरितां त्याचेभोंवतीं मुलांची एकच गर्दी झाली. तिरस्काराचा

मर्मभेदी शब्दहि कोणीं उच्चारला नाही. बालकांनी क्षमा केली म्हणजे किती मनापासून करतात तो! आणि झालेले अपराध विसरतात तरी किती लवकर! एक शब्दहि बोलण्यासारखी विष्णूची मनःस्थिति नव्हती. सतीश त्याचा निरोप घ्यायला आला तेव्हां मात्र त्यानें पुनः एकदा क्षमा करण्यास त्यास विनविले. "त्याचा विचारसुद्धां मनात आणूं नकोस तूं!" सतीशनें निर्व्याजपणे उत्तर दिले.

त्याच्यामागोमागच मधू त्याला निरोप देण्याकरिता आला. "तुला माझा अगदी खूप राग आला असेल नाही, मधू?" विष्णु अनुतापाने म्हणाला.

"मुळीच नाहीं. पण तूं जातोस का? आता आपले मुळीच भांडण होणार नाही."

"बाकी, मधू, मी कांही खरोखर अगदी दुष्ट नाही. लोकाच्या नादी लागून मी तुला खूप त्रास दिला. पण तूं माझ्यापेक्षा किती श्रेष्ठ आहेस हे मी जाणून आहे."

"बरें आहे, नमस्कार आतां." मधूने गोष्ट बदलली. "आतां पुनः केव्हां भेट होणार आपली?"

"नमस्कार! जेव्हां होईल तेव्हा."

मधू परतला नागेश आणि विष्णु टांग्याकडे निघाले.

"विसू, तुझे सगळे सामान आहे ना नीट?"

"अगदी सगळे." विष्णूने टांग्यांत आपल्या सामानाकडे पाहिलें आणि नंतर विद्याश्रमाकडे—तेथील इमारती, बाग, क्रीडांगणे, त्या सर्व चिरपरिचित देखाव्याकडे अखेरची दृष्टि टाकली. दुसऱ्या मजल्यावरच्या खोल्यांतून मोठी मुले अभ्यास करीत होती; लहान मुलांच्या खोल्यांत निजण्याची तयारी असून हास्यविनोदाचे मधुर ध्वनी ऐकूं येत होते; बागेतील उंच उंच वृक्ष रात्रीच्या तारकांच्या मंद प्रकाशात अधिकच काळेभोर दिसत होते; आणि अर्ध-प्रकाशित निळसर आकाशाच्या पृष्ठभागावर इमारतींच्या खिडक्यांतून लुकलुकणारे दिवे तेजस्वी तारकांप्रमाणें चमकत होते. हे रमणीय दृश्य आता आपल्याला सोडून जावे लागणार, या कल्पनेने त्याचे अंतःकरण अधिकच उदास झालें.

"नमस्कार, नागेश! अखेर तुझा निरोप घेणे भागच आहे. तुला पत्र पाठवूं ना?"

" अगदीं जरूर. तूं कोणत्या शाळेत गेलास, काय करतोस, ते सगळे लिहीत जा. "

" पण तूं उत्तर पाठविशील ना? "

" असे काय करतोस ? न पाठवायला काय झाले?" नागेशने त्याचा हात आपल्या हातांत घेऊन दाबला. विष्णूचे डोळे पाण्याने भरून आले होते.

टांगा चालूं लागला आणि तो रात्रीच्या अंधारांत दिसेनासा होईतोपर्यंत नागेश तिकडे पाहत होता. बालपणीच्या सर्व स्मृति त्याच्या डोळयांपुढे उभ्या राहिल्या. आपली कृत्ये आणि त्याचे हे अनपेक्षित पर्यवसान पाहून त्याचे अंतःकरण उदास झाले आणि जड पावलाने तो आपल्या खोलीकडे परतला.

त्या दिवसापासून नागेशची वृत्ति अधिकच उदास झाली; आणि आपला उदासपणा घालविण्याकरितां तो अभ्यास अगदी झटून करूं लागला. वार्षिक परीक्षा जवळ आली होती आणि हे त्याचे विद्याश्रमांतील वास्तव्याचे अखेरचे वर्ष असल्याने नेटाने अभ्यास करणे आवश्यकहि होते. शिवाय या परीक्षेत पहिला नंबर येणाऱ्याला दरमहा २५ रुपयाची शिष्यवृत्ति मिळावयाची असल्याने व नागेशची सांपत्तिक स्थिति विशेष समाधानकारक नसल्यानेहि शिष्यवृत्ति संपादन करण्याकडे नागेशचे अधिकच लक्ष होते. प्रभाकर, मोहन, यांसारख्या बुद्धिमान् मुलांशीं या परीक्षेत टक्कर द्यावयाची असल्याने त्याला फारशी आशा नव्हतीच; पण प्रभाकरपेक्षा नागेशची गणित विषयात तयारी चांगली होती, आणि गुणाची भरती करून नंबर वर आणण्यांत त्याचा चागला उपयोग होत असल्याने त्याला थोडीशी आशा होती. आजपर्यंत उनाडपणा करण्यांत घालविलेला वेळ आज पुनः परत मिळाला तर! गणिताच्या जोडीला भाषाविषयाची तयारी करून प्रभाकराशी सामना देणे कांही फारसे कठीण नव्हते! पण यापुढील मिनिटामिनिटाचा सदुपयोग करण्याचा निश्चय करून तो अंमलांत आणला तरी गेलेला वेळ कांही भरून निघणार होता थोडाच!

वार्षिक परीक्षा आटोपली आणि नेहमींप्रमाणे निकालहि जाहीर झाला. मनोहर सहावा, नागेश तिसरा, मोहन दुसरा, आणि प्रभाकर पहिला! अर्थात् गाजलेली शिष्यवृत्ति प्रभाकरला मिळाली. पण आचार्य रत्नाकर यांनी लागलीच

जाहीर केलें कीं प्रभाकर यांची शिष्यवृत्तीची रक्कम स्वीकारण्याची इच्छा नाहीं म्हणून ती दुसऱ्या नंबरला, मोहनला, देण्यात येईल.

ह्या निकालाने नागेशच्या आशांचा मनोरा जमीनदोस्त झाला. शिष्यवृत्ति न मिळाल्यानें कॉलेजच्या उच्च शिक्षणाला मुकावे लागेल, ह्या कल्पनेने तो अगदीं उदास झाला. पण आपली खिन्नता यत्किंचित्‌हि दिसूं न देता तो शांतपणें आपल्या खोलीत गेला आणि जणूं काय कांहीच झाले नाहीं असे भासवून रोजच्या उद्योगाला लागला.

अशा रीतीने इतरांची आणि स्वत:ची फसवणूक करीत उद्योग करण्याचे सोंग करीत तो खोलीत बसला असताना दार उघडले. मोहनला आंत येतांना पाहून तर त्याचा डोळ्यावर विश्वासच बसेना.

"ओ मोहन, तूं आलास ? मला किती आनंद झाला म्हणून सांगूं ?" तो गडबडीनें म्हणाला. "मी तुझे अभिनंदन करतो."

"माझ्या मनात तुझ्याविषयीं कधीच किंतु नव्हता." मोहन त्याच्या अभिनंदनाबद्दल कृतज्ञता दर्शवीत म्हणाला. "आणि अलीकडे तुझे मनसुद्धां माझ्याविषयीं स्वच्छ झालेले दिसत आहे. खरे ना ?"

"खरे आहे. माझे मन एके काळीं तुझ्याविषयीं तितके स्वच्छ नव्हते हें मी कबूल करतो. पण आतां काय त्याचे ? माझी चूक मला कळून आली आहे. मोहन, मी तुला दोन वर्षे खूप त्रास दिला नाही ? माझ्यावर राग नाहीं ना ठेवणार तूं ?"

"छट्! रागावण्यासारखे काय आहे त्यात ? आणि आपणां दोघांनाहि त्याबद्दल भरपूर शिक्षा झालीच आहे. आपण भांडलो नसतो तर आपण कितीतरी सुखांत असतो! ते सुख आपले गेलेच ना ?"

"त्या दिवसांची आठवणसुद्धा मला सहन होत नाहीं."

"जाऊंदे रे. पण नागेश, मी आज एका विशिष्ट हेतूनें येथें आलो आहे. तूं माझ्यावर रागावणार नाहीस ना ?"

"या जन्मांत तरी नाही, मोहन."

"बरं तर, मला अगदी खरं सांग; ह्या शिष्यवृत्तीकरितां परिश्रम करण्यांत

तुझा कांहीं विशेष हेतु होता का ? बाकी ती तुलाच मिळायला पाहिजे. दैवयोगानें मला थोडे गुण जास्त पडले आणि मी वर आलो इतकेंच. ''

नागेशनें उत्तर दिलें नाहीं.

'' मी कॉलेजांत जाणार आहे. तूं जाणार का ?''

'' मला नाही वाटत. मला तितका खर्च झेपणार नाही. ''

'' मग असे पहा, मला कॉलेजमध्येसुद्धां एखादी शिष्यवृत्ति सहज मिळूं शकेल. आणि नाही मिळाली तरीहि कॉलेजचा खर्च काही नानांना फारसा जड वाटणार नाही. अशा स्थितीत ही शिष्यवृत्ति मी घेणे हा शुद्ध स्वार्थ आहे. मी ती नाकारणार आहे. आणि आता तुला शिष्यवृत्ति मिळाल्याबद्दल मी तुझें अभिनंदन करतों.''

'' पण, मोहन, मी तुला असे करूं देणार नाही.''

'' तूं कोण नाहीं म्हणणार ? हे व्यक्तिस्वातंत्र्याचें युग आहे समजलास. शिष्यवृत्ति नाकारण्याचा माझा हक्क आहे. शिवाय त्यांत काही मी स्वार्थत्याग करीत नाही. तुला ही शिष्यवृत्ति मिळाल्यानेच मला अधिक आनंद होणार आहे. बरं मी जातों आतां.''

'' थांब ना, मोहन, हे असेच नेहमी चालायचे काय? तूंच नेहमी माझ्यावर उपकार करायचा आणि मी मोबदला काहीच द्यावयाचा नाही?''

'' जाऊं देरे. यांत उपकार कसले आले आहेत ? '' इतके बोलून मोहन जाण्यास निघाला.

'' बैसरे जरा, इतकी कसली घाई ?''

'' अस्से ? दोन वर्षाचे उट्टे एका दिवसांत काढून घ्यायचा विचार आहे वाटते,'' मोहन पुनः खाली बसत म्हणाला. '' तुझी खोली मोठी थाटांत सजविली आहेस तूं. माझी खोली एकदां पाहायला येना तूं ! प्रभाकरच्यापेक्षाहि माझी खोली छान दिसते. खिडकींतून नदीकाठचा देखावा किती सुंदर दिसतो म्हणून सांगूं ? हा कोणाचा–विष्णूचा फोटो ना रे ? अलीकडे तो पुष्कळच सुधारला होता नाही ?''

विष्णूने विद्याश्रम कां सोडला याचे खरें कारण मोहनला माहीत नाहीं हे नागेशच्या लक्षांत आलें. मुलांनी गौप्यगोपन चांगलें केले आहे याबद्दल त्याची खात्री झाली.

आणखी कांहीं वेळ गप्पा ठोकून 'आतां तुझ्या तुरुंगांतून मी पळून जाणार' असे म्हणत मोहन जाण्यास निघाला. कितीतरी दिवसात झाला नव्हता इतका आनंद आज नागेशला झाला होता. ज्या शिष्यवृत्तीकरिता त्याने इतके परिश्रम केले होते ती अखेर त्याला मिळाली-हताश होऊन तिची आशा त्याने सोडून दिली त्याच क्षणी ती त्याला मिळाली, आणि त्याचबरोबर बाळ-पणीचा मित्र, त्याचा दोन वर्षापूर्वी हरवलेला दोस्त- त्याला परत मिळाला. ज्या मित्रप्रेमाकरिता तो इतके दिवस भुकेलेला होता ते मित्रप्रेमहि त्याला आज लाभले होते. आनंदाने उचंबळून येणाऱ्या हृदयाने तो आपल्या आईला पत्र लिहावयास बसला, प्रभाकरशी व मोहनशी पुनः आपली मैत्री दृढ झाल्याचे-चिरवाञ्छित शिष्यवृत्ति मिळाल्याचे-आनंददायक वर्तमान त्याने आईला कळविले. त्याचा आनंद त्याच्या हृदयात आज मावत नव्हता! पण निरागस आनंदाचा हा पेला- ओंठापर्यंत आणलेला हा पेला-दुष्ट दैवाने झडप घालून लवंडून टाकला, त्यातील आनंदाचा पूर्ण विरस करून टाकला!!

कारण त्याचक्षणी त्याच्या नांवचे आलेले एक पत्र एका मुलाने आणून त्याच्या हातीं दिले. पत्रावर कानगावच्या पोष्टाचा शिक्का होता, पण हस्ताक्षर त्याच्या आईचे नव्हते.

थरथर कापणाऱ्या हाताने त्याने पत्र उघडून वाचलें. त्यांतील मजकूर त्याच्या अपेक्षेपेक्षाहि अधिक भयंकर होता. आदलेच दिवशी एकाएकी छातीत कळ येऊन त्याच्या आईचे देहावसान झाल्याची दुःखद बातमी त्यात होती.

निष्पाप अंतःकरण, पवित्र वृत्ति, प्रेमळ व निःस्वार्थ स्वभाव इत्यादि गुणांत तिची बरोबरी करणारी दुसरी व्यक्ति क्वचितच आढळली असती. अंतः-करणाच्या पावित्र्याचे तेजाने कांतिमान् दिसणारी तिची सहजमनोहर मुद्रा नागेशच्या डोळ्यांपुढे उभी राहिली. मानवी जीवनाच्या अंधकारमय प्रवासांत तिला आशेचा किरण दिसला नाही की प्रेमाचा ओलावा आढळला नाही, तरीहि स्वतःच्या पावित्र्यांत व उच्च मनोवृत्तींतच स्वतःला धन्य मानून घेणारी ती एक स्वर्गीय देवता आहे हें कानगांवच्या मानवांना तिच्या मृत्यूपर्यंत समजले नाहीं आणि नागेशला तरी आपल्या आईची थोरवी आजपर्यंत कोठें समजली

होती ? आज तिच्या मृत्यूमुळें पोरका झालेला नागेश तिचे गुण आठवून शोक करीत होता. पण त्याच नागेशने क्षुल्लक कारणांवरून किती तरी वेळां तिचा अपमान केला होता! आपल्या दारिद्र्यांत समाधानी वृत्ति राखून तिला संतोष देण्याऐवजी आपल्या विडखोरपणामुळे तिचे कष्ट वाढविण्यासच तो कारणीभूत झाला होता. कानगांवचे निरुत्साही वातावरण आणि तेथील लोकांनी आपल्या वडिलांचा केलेला छळ यांबद्दलचा सूड तो आईवरच उगवून घेत होता ना ?

त्याच्या अंतःकरणाच्या खोल तळाशी रुतून बसलेले हे सर्व दोष आज त्याच्या दृष्टीस पडले. खोल विहिरीच्या तळाशी दडून बसलेले पदार्थ सूर्याच्या प्रखर किरणांत स्वच्छ दिसावेत त्याप्रमाणें मृत्यूच्या सान्निध्यांत त्याच्या वृत्ति अंतर्मुख झाल्यामुळे त्याचा ताठा आणि पोकळ अभिमान त्याच्या डोळ्यापुढे मूर्तिमंत उभा राहिला होता. ते सर्व दोष काढून टाकून आईला सुख देण्याचा त्याचा निश्चय कृतीत आणण्यालाहि त्याला संधि मिळाली नाहीं. आपला पश्चात्ताप कृतीत आणण्याची शक्यता नाहींशी झाल्याचें दुःख प्रत्यक्ष मृत्यूच्या दुःखापेक्षांहि त्याला अधिक दुःसह झाले.

खरोखर मानवी जीवित हे एक अज्ञात व अज्ञेय असे गूढच आहे.

## प्रकरण बत्तिसावें

# मृत्यूच्या दारीं

दुर्गा नदी शिथिलबन्धविडम्बिनी नौ-
रभ्युन्नता जलमुचो विषमः समीरः ।
आरूढवान्निजकुटुम्बयुतोऽध्वनीन-
स्तत्कर्णधार कुरु यत्सदृशं कुलस्य ॥

दिवसांमागून दिवस जाऊं लागले, आणि नागेशची विमनस्कता वाढूं लागली. त्याचे सांत्वन करण्याचा, त्याचे दुःख कमी करण्याचा प्रयत्न पुष्कळानीं केला; पण त्यांना यश आले नाही. मोहनने स्वतःच्या आनंदी व खेळकर वृत्तीने त्याला रिझविण्याचे केलेले प्रयत्नहि निष्फळ झाले. आपल्या खोलीत एकांतवासात गढून राहणे, किंवा एकट्यानेच लांबवर फिरावयास जाणें यातच तो स्वतःचा सर्व काळ घालवी. एखाद्या गहन विचारांत अखंड गढून गेल्यासारखे त्याचे खोल गेलेले डोळे दिसत; तो कोणाशी बोलला तर त्याचा आवाज लांब खोल भुयारांतून येत असल्याप्रमाणे गंभीर व विकारहीन भासे. ह्या त्याच्या वृत्तींचें पर्यवसान कशात होणार याची त्याच्या मित्राना अखंड चिंता लागून राहिली होती.

उन्हाळ्याच्या दिवसात वाळवंटांत अदृश्य होणाऱ्या नदीच्या ओघाप्रमाणें त्याच्या जीवनाचा झरा आटून गेला होता; दुःख, शोक आणि उद्वेग यांनी त्याच्या जीवनाचे आनंदी प्रवाह अडवून धरले होते.

वस्तुस्थिति अशी होती की, एकीमागून एक वेगाने बसणाऱ्या शिक्षांच्या तडाख्यांखाली त्याच्या वृत्ति पूर्णपणे चिरडून गेल्या होत्या. उनाडपणांतील त्याच्या सहकारी मित्रांची हकालपट्टी, स्वतःचा झालेला अपमान व निंदा, विष्णूच्या चोऱ्या, त्याचे विद्याश्रमांतून निघून जाणें आणि त्याच्या अनुषंगाने जागृत झालेल्या त्याच्या विवेकबुद्धीने त्याच्या अंतःकरणावर केलेले मर्मभेदी आघात, आचार्यांच्या जवळ त्याने दिलेला कबुलीजबाब, महत्त्वाकांक्षेचा नाश आणि ह्या सर्वांवर कळस म्हणून अखेर त्याच्या प्रेमळ आईचा मृत्यु—या सर्व

आघातांखालीं त्याची आनंदी वृत्ति चिरडली गेली नसती तरच आश्चर्य! दुःख, शोक, अपमान यांचा लागोपाठ बसलेला आघात आणि सहन कराव्या लागलेल्या शिक्षेच्या वेदना यानी त्याचे धैर्य खचले, त्याच्या मनाची शांति नाहीशी झाली व त्याच्या हृदयांतील जीवनाचा झरा शुष्क होऊन गेला. ईश्वरानें केलेल्या शिक्षेच्या अनुतापाने करपून गेलेल्या वेलीला जीवन घालण्याचे मनुष्यांनी किती प्रयत्न केले तरी त्याला टवटवी थोडीच येणार होती!

त्या वेलीला अखेर टवटवी आली, नागेशच्या मनाचा निरुत्साह नाहीसा होऊन तो पुनः आनंदी दिसूं लागला, आणि ते घडवून आणण्याला अगदी क्षुल्लक कारण–वाऱ्याची एक लहानशी झुळूक पुरेशी झाली.

नेहमींप्रमाणे नागेश एकटाच लांबवर असलेल्या टेकड्यांवरून फिरावयास गेला होता आणि नदीकांठच्या उंच तुटलेल्या कड्यावर नदीच्या पात्राकडे पाहत आपल्या उदास विचारांत गर्क होऊन बसला होता. सूर्य अस्तास जात असून त्याचे तांबडे सोनेरी किरणहि त्या काळ्या, निळ्या टेकड्यांवर थोडेसे रेंगाळून त्याच्या मागून जाण्याच्या विचारात होते. 'छे! किती वेळ झाला हा! भोजनाच्या वेळेपूर्वी परत पोहोंचले पाहिजे.' असे म्हणून नागेश परत जाण्याच्या विचाराने गडबडीनें उठला. उठण्याच्या धक्क्याने त्याची टोपी खालीं पडली आणि वाऱ्याच्या झुळुकीबरोबर थोडी लांब जाऊन कड्याच्या बाजूच्या एका करवंदीच्या जाळींत अडकली. दोन पावले खाली उतरून ती टोपी सहज हातीं लागेल या कल्पनेने त्याने खाली उतरण्यास सुरुवात केली. खालीं उतरून पुनः या सरळ कड्यावर चढण्याचा धोका पत्करण्यापेक्षा टोपीशिवाय घरीं जाऊन नवी टोपी विकत घेणे हे जास्त सोपे आहे हें त्याच्या लक्षात आले नाही. तो खालीं गेला, त्याने टोपी डोक्यावर ठेविली, आणि पुनः वर येण्यास सुरुवात केली. सरळ कड्यावरून खाली जाण्याइतके वर चढणें सोपे नसते हे त्याच्या आतां लक्षांत आलें. पाऊल पुढे ठेवून वर चढण्याचा प्रयत्न करतांच त्याचा पाय घसरून तो आणखी चार पावलें खालीं घसरला. दोन-चारदां असे प्रयत्न करून पाहिल्यानंतर वर जाण्यापेक्षां खालीं घसरण्यातच आपली प्रगति अधिक होत आहे हे त्याच्या लक्षांत आलें आणि तो मार्ग सोडून दुसऱ्या मार्गाने विद्याश्रमांत परत जाण्याचा त्याला निश्चय करावा लागला.

हा ऐशी-नव्वद फुटांचा कडा उतरून त्याच्या पायथ्याशीं असलेल्या वाळवंटांतून टेकडीला वळसा घालून नदीच्या काठाकाठानें जाणे हाच एक मार्ग शिल्लक होता. आणि उन्हाळ्यात, नदीला पाणी कमी असताना त्या मार्गानें जाणें शक्यहि झाले असते, पण त्याखेरीज दुसरा मार्ग नागेशला दिसत नव्हता, म्हणून अखेर त्याचा अवलंब करण्याखेरीज त्याला गत्यंतर नव्हते.

जपून पावले टाकीत, गुळगुळीत खडकावरून सावकाश घसरत तो खालीं उतरला. अगदी तळाशीं असलेला दहाबारा फुटाचा खडकाचा भाग पाण्याच्या प्रवाहामुळे झिजून जाऊन अगदी गुळगुळीत झाला होता; त्याजवरून त्यानें अलगद उडी मारली; आणि तो खालच्या वाळवंटात उभा राहिला. तेथून टेकडीला वळसा घालून तो चालण्यास सुरुवात करणार तोंच त्याच्या कानीं प्रचंड मेघगर्जनेसारखा गंभीर दणदणाट ऐकूं आला. शेंकडों कडे एकदम कडकडून डोंगरावरून कोसळून पडतांना त्यांच्या दुमदुमणाऱ्या प्रतिध्वनी-सारखा हा गडगडाट ऐकून तो घाबरला; तो आवाज त्यानें ओळखला—आतां काही करणे शक्य नाही, हे जाणून तो दिङ्मूढ होऊन गेला.

डोंगराळ मुलुखात नदीला एकाएकी येणाऱ्या प्रचंड लोढ्याचा तो आवाज होता. त्याने मागे वळून पाहिलें आणि त्या प्रचंड राक्षसाच्या तावडीं-तून सुटण्याकरिता जीव घेऊन पळण्यास सुरुवात केली. प्राण वांचविण्या-करिता त्या वाळवंटातून पळत असतांना क्षणोक्षणी मागे वळून पाहून लोढ्याचें व आपल्या दरम्यानचे अंतर कमी होत चाललेले पाहत असताना नागेशच्या मनाची स्थिति किती भयंकर झाली असेल याची कल्पना त्या स्थितीचा अनुभव घेतल्याखेरीज इतरांना येणें शक्य नाही. तो सारखा पळत सुटला, अखेर त्याला दम छाटेना, पायात गोळे येऊं लागले, वाळवंटांत तो ठेचाळून पडला, —आपले प्रयत्न यशस्वी झाले नाहींत हें त्याला कळून आले. पुराचा लोढा त्याच्या पायापर्यंत येऊन भिडला, पिवळसर गढूळ पाण्याचा विस्तार चहूंकडे पसरला, आणि त्याच्या लाटा जणूं काय टेकड्यानी व खडकांनीं अडथळा केल्यामुळें रागावून त्यांच्यावर गुरगुरूं लागल्या.

मोठ्या शिकस्तीनें नागेशनें खडक गाठला आणि त्यांत बळानें रुतून बसलेल्या एका मुळीचा आधार घेऊन तो उभा राहिला. आपल्या दोन्ही

हातांनीं त्या टेकडीला वळसा घालून नागेशसह त्या टेकडीलाच आपल्या उदरांत गडप करण्याच्या इच्छेनें आपलें विशाळ तोंड वासून राक्षसाच्या जबड्यासारखा तो भीषण लोंढा त्याला दिसूं लागला. मुळीचा आधार घेऊन त्या खडकावर चढून जाण्याचा प्रयत्न त्याने केला, पण त्यांत यश येण्याची मुळीच आशा नाहीं हे त्याला लवकरच पटलें.

प्राण वाचविण्याचा एकच अखेरचा प्रयत्न त्याने करावयाचें ठरविले. नागेश उत्कृष्ट पोहणारा होता. विद्याश्रमांतील होणाऱ्या पोहण्याच्या शर्यतीत त्याने कितीतरी वेळां विजय मिळविले होते. केवळ हौसेकरितां पोहून तो विजय संपादन करूं शकला, तर आज प्राणावर बेतली असताना त्याला यश का येणार नाही ? पण आजचा प्रसंग निराळा होता. पळून पळून तो थकला होता, भुकेने व श्रमानें व्याकुळ झाला होता, आणि डोंगरातून वाहणाऱ्या पुराचा जोरहि विलक्षण होता. पण पोहावयाचे नाही तर दुसरे करावयाचे काय? न पोहतांना, हा धोका न पत्करताना, येथेंच आपण उभे राहिलों तर—तर काय होईल याची कल्पना त्याला करवली नाही.

गार वारा अंगाला झोंबत होता, थंडीने हातपाय गारठत होते तरी त्याने ओले झालेले कपडे पाण्यावर फेकून दिले, आणि जिवावर उदार झालेल्या निराश हरणाप्रमाणे मागे लागलेल्या त्या राक्षसी कुत्र्याशी—त्या अफाट जल-समूहाशी टक्कर देण्यास तो तयार झाला. गार पाणी त्याच्या अंगाला लागताच त्याच्या अंगावर शहारे आले, दांत करकरा वाजूं लागले, [illegible] कळा येऊन ते लुळे पडतात की काय अशी त्याला भीति वाटूं लागली. पुराबरोबर वाहत येणाऱ्या लहान लहान वेली किंवा शेवाळ त्याच्या पायांच्याभोवती वेटाळतांच त्याच्या रोमारोमातून विलक्षण भीतीची चमक उठे. दोनचार हात मारतांच खोल पाण्यांत तो गेला. पण पुराचा आजचा रंग काही निराळाच त्याला दिसला. वाहत्या पुरांत पुढे शिरून टेकडीला वळसा घालणे त्याला कठीण वाटलें नाहीं, पण पाण्याच्या धारेत सांपडल्यानंतर बाहेर पडून जमिनीवर जाता येईल अशी त्याला खात्री वाटेना. पुराचा विलक्षण वेग, त्या वेगाबरोबर वाहत येणारे लहान मोठे वृक्ष, खडकांवर रागानें आदळून त्यांचा सूड घेण्याच्या इच्छेनेच जणूं काय आपटणाऱ्या लाटांमुळे होणारे

वर्तुळाकृति भोवरे, हा सर्व रागरंग पाहतांच आपल्या ह्या अखेरच्या प्रयत्नाचेहि वैयर्थ्य त्याच्या लक्षात आलें. गार वारा उदासपणे निःश्वास टाकीत वाहत होता. पाण्याच्या बुडबुड्यांचा गंभीर खळबळाट त्याच्या कानात घुमत होता, वर उडणारे तुरळक बगळे आपले करुण स्वर काढून जणूं भावी दुःखाची पूर्वसूचनाच करीत होते. भविष्य काळाचे दृश्य त्याच्या डोळ्यांपुढे उभे राहिले. होती तितकी सर्व शक्ति हातापायात एकवटून तो परत फिरला आणि खडकात रुतलेल्या मुळीला घट्ट धरून पूर्वीच्या जागी पुनः उभा राहिला. क्रमाक्रमानें वाढत जाणाऱ्या पुरात येणाऱ्या भयंकर मृत्यूपासून वांचविण्याला–निदान त्या मृत्यूला कांही काळ दूर लोटण्याला ह्या बारीक मुळीच्या नाजूक तंतुखेरीज दुसरा कशाचाहि त्याला आता आधार उरला नव्हता.

आणि अखेर मूर्तिमंत मृत्यु त्याच्या डोळ्यांपुढें उभा राहिला; त्याची कल्पना मनांत येताच भीतीनें त्याचें रक्त गोठून गेले आणि त्या भरांतच त्याने एक भयंकर किंकाळी मारली. मृत्यूच्या दारीं उभ्या असलेल्या जीवाने केलेली ही साहाय्याची याचना, त्या निर्जन अरण्यात चमत्कारिक भासणारी भीतिग्रस्त हृदयाची ही अखेरची हाक–पाण्याचा खळबळाट, आणि वाऱ्याचा सोसाटा यानाहि मागे सारून, एकात वातावरणांत दुमदुमली. टेकड्यांतून उठलेले तिचे प्रतिध्वनिहि हवेंत विरून गेले. पुनः एकदां त्याने आरोळी मारली, आणि पुनः एकदां त्याने साहाय्याची याचना केली. आणि मनुष्याच्या कठोर हृदयाला भेदण्याचें आपले सामर्थ्य अपुरे आहे असे समजून त्यांचे पुनः पुनः उठलेले पडसादहि निराश होऊन शात झाले. हताश होऊन दगडाच्या एका कपारीचा आश्रय घेऊन नागेश उभा होता; आणि निश्चल, विकारहीन डोळ्यांनी वेड लागलेल्या माणसाप्रमाणें भोवतालचे भयंकर दृश्य पाहत होता. हळुहळू उंच उंच चढत जाणाऱ्या फेंसांच्या रेषेकडे त्याची नजर खिळून गेली होती. थोड्याच वेळांत ह्या लाटा वाढत वाढत आपल्याला येथून वेगानें ओढून नेतील, मुळीवरचा शिथिल झालेला आपला हात सुटेल; आणि इच्छा नसतांहि आपल्याला लाटाशी धडपड करावी लागेल, व क्षुधा, तृषा, थंडी, आणि श्रम यांनी शिथिल झालेले आपले अवयव ह्या प्रचंड पुराशी अखेरची धडपड करतील; पाणी आपल्या डोळ्यांत, कानांत व तोंडांत खळखळ आवाज करीत शिरेल, श्वास बंद होईल आणि—आणि सर्व शांत होईल ! !

ह्या भयंकर भावी चित्रपटांतील एकूण एक रेषा त्याच्या डोळ्यांपुढें स्पष्ट दिसूं लागली, आणि जिवंत असतानाच मृत्यूच्या सर्व वेदना त्याने अनुभविल्या. एकाएकी आपलें सर्व आयुष्य त्याच्या डोळ्यांपुढे उभे राहिले. विजेच्या प्रचंड झोताने प्रकाशित केल्याप्रमाणें आपल्या आयुष्यांतील कोनाकोपऱ्यांत केलेली बारीकसारीक कृत्यें नेहमीपेक्षां दसपटीने त्याच्यापुढे उभी राहिलीं. विसरलेलीं पापें, नाहींसे झालेले विचार, विरून गेलेले शब्द त्याच्याभोंवती गिल्ला करून जिवंत भुतासारखे नाचूं लागले. आणि अखेर वाऱ्याच्या सोसाट्याबरोबर अधिक तीव्रतेनें उच्चारला जाणारा हा संदेश गंभीर पण भयंकर आवाजात त्याच्या कानांत कोणी तरी गुणगुणूं लागले: " तुझ्या जीविताचा तूं आजपर्यंत दुरुपयोगच केला आहेस, वाहत्या वाऱ्याबरोबर केवळ आळसानें तूं वाहत गेलास, आपल्या कर्तव्याचें स्मरणहि तुला राहिले नाहीं; आपली कुशाग्र बुद्धिमत्ता गंजून वाया जाऊं दिलीस; ईश्वराने तुला आयुष्य दिले त्याचा काय उपयोग करावा हेसुद्धां तुला समजेना, म्हणून ते तुझे जीवित आता ईश्वर हिरावून नेत आहे." आणि जणूं काय ह्या संदेशाचे प्रत्युत्तर म्हणूनच मृदु, कोमल व मधुर अशा आवाजांत, त्याच्या हृदयाला ज्या आवाजाची ताबडतोब ओळख पटली त्या अदृश्य स्वर्गीय गीताच्या शांत व रमणीय आवाजात दुसरा संदेश त्याला ऐकूं आला. "तुझें जीवित तुला परत दिले जात आहे, त्याचा सदुपयोग कर. ऊठ, जागा हो आणि परत मिळालेल्या आयुष्याचा सत्कारणीं व्यय कर."

नेहमीं निर्जल असलेल्या त्या नदीच्या कांठावरहि त्याने मारलेल्या दोन तीन आरोळ्या वाया गेल्या नव्हत्या. आदल्या दिवशीच्या पावसाने शेजारचा रेल्वे रस्ता वाहून गेला होता आणि तेथून रात्रीच्या वेळी प्रवास करणाऱ्या एका इंजिनास अपघात झाला होता. छिन्नविच्छिन्न झालेलें तें इंजिन पाहण्याकरितां साहजिकच आसपासच्या लोकांच्या झुंडी जमूं लागल्या होत्या, आणि ती गंमत दाखवण्याकरिता मधूला घेऊन मोहन तेथें गेला होता. तेथून परत येतांना विद्याश्रमांत वेळेवर पोहोंचण्याच्या इच्छेनें ह्या कड्यावरून जाणाऱ्या जवळच्या आडमार्गानें ते दोघे त्याच वेळीं परत चालले होते. नागेशची पहिली आरोळी कानीं पडताच ते चमकले; ह्या निर्जन कड्याच्या पायथ्यापासून नदीच्या

कांठावरून येणारी आरोळी ऐकून थोडीशी भीतिहि वाटली; तोंच पूर्वीपेक्षांहि अधिक कर्कश, हृदयाचें विदारण करणारी भयंकर किकाळी त्यांच्या कानावर आली.

" नक्की, मधू, येथें कोणी तरी असलें पाहिजे खास. " मोहन आश्चर्यानें म्हणाला.

" या वेळीं येथे कोणी येणे कसे शक्य आहे ? "

" पण तूं ह्या आरोळ्या ऐकल्यास ना ? "

" ऐकल्या खऱ्या. चांगल्या दोनतीन ऐकल्या ना ! खालीं कोणी दिसते का ? "

" कांहींसुद्धां दिसत नाही. " मोहनने खाली पाहून उत्तर दिले खडकाशीं चिकटून शक्य तितके अंग चोरून बसलेला नागेश त्यांना कसा दिसावा ? " पण ते कायरे पाण्यावर दिसते आहे ?"

" तें होय, अरे ती टोपी आहे. पिवळसर तांबूस रंगाची आहे ती अगदीं खास. "

" पिवळसर तांबूस? नागेश तर नाही? अरे राम ! काय भयंकर प्रसंग हा !'

" नागेश ! " ते दोघेहि चमकून उभे राहिले. त्यांनीं शक्य तितक्या मोठ्याने पुनः हांक मारली " नागेश ! " पण वाऱ्याच्या सोसाट्यांत त्यांच्या हांका नागेशला ऐकूं आल्या नाहींत आणि ऐकूं आल्या असल्या तरीहि पाण्याच्या किंवा वाऱ्याच्या त्या लीलाच तो समजला नसेल कशावरून !

" मधू, कोणी ओ देत नाही. पण कोणी तरी आहे खास." मोहन इतकें म्हणत आहे तोंच मधू खाली उतरूंहि लागला होता. त्याला थांबवीत मोहन म्हणाला, " थांब, थांब, असा अविचार करूं नको. तुला जमणार नाही ते. मी जातो." पण दोन मिनिटातच त्याच्या लक्षांत आले कीं, खालीं जाणे शक्य असले तरी नागेशला वांचविणे किंवा त्याला घेऊन परत वर येणे केवळ अशक्य होते.

" छे, असे जमायचे नाही, मधू !" इतक्यांत नागेशने मारलेली आणखी एक हांक त्यांच्या कानीं आली.

" ऐक पाह्यलेंस !" असें म्हणून "नागेश" म्हणून मोहननें आणखी एकदां आरोळी दिली, पण त्याचे उत्तर आलें नाही.

" मधू, आपल्याला विद्याश्रमात गेले पाहिजे. कोणीतरी येथें आहे यांत शंका नाहीं. तूं येथेंच थांबना. तुला माझ्याबरोबर पळवायचें नाही. बाकी माझा तरी उपयोग तितकाच आहे. येथून विद्याश्रमांत जाऊन कोणाला तरी घेऊन परत येईतोंपर्यंत तो मनुष्य जिवंत राहणे शक्य नाही. पण प्रयत्न तर करून पाहूं." हे बोलत असतांच मोहनने पळण्यास सुरुवात केलीसुद्धां होती.

" पण, दादा ?" मधूने त्याचा हात धरून त्याला अडविलें, " टाकळीच्या उताराजवळ नाव आहेना ? ती येथून अर्धा मैलसुद्धा नसेल."

"अरे हॅरे हो. तरी माझा मधू! बरें सुचविलेंस तूं!" असे म्हणून ते दोघेहि टाकळीच्या उताराकडे पळत सुटले. " थकलास तरी हरकत नाही. मधू, पळ, तुला पळवेल तितक्या जोरानें पळ. आज तूंसुद्धां चागलाच पळतोस कीं—हे पहा आपण आलोंच टाकळीला."

नदीकांठच्या झोपडीजवळ ते येऊन पोहोंचले. दाराजवळ जाऊन त्यांनीं हांका मारल्या, पण झोपडींत कोणीच नव्हते.

" कांही फिकीर नाही. नाव आहेना कांठाशीं ! आज शंभर अपराध माफ आहेत!" आणि त्यांनीं भराभर नावेंत उड्या टाकल्या.

मोहन तिचे तणावे सोडून ती पाण्यांत रेटूं लागलेला पाहतांच मधू म्हणाला,

" कसलें खिळखिळें खोके आहे हें, दादा, त्याला फटी तरी केवढ्या आहेत ह्या !"

" त्याचा विचार मागाहून. आपण पुष्कर तलावावर नाव चालवावयाला शिकलों त्याचा आज उपयोग झाला."

" आपली चंपा आज पाहिजे होती—येथें अशी ऐटीत वल्ही मारीत नेली असती !"

" आहे हीच चंपा समजावयाची आणि आपण तिच्यांत बसून पुष्कर तलावांतच निघालों आहोंत जसे कांही !" बोलतां बोलतांच मोहननें नाव पाण्यांत रेटली आणि उडी मारून आंत चढला.

पुष्कर तलावावर दोघांनाहि वल्ही मारण्याची संवय होती, पण आंजच्या-सारख्या भयंकर पूर आलेल्या नदींत आपलें कौशल्य दाखविण्याचा मधूचा हा पहिलाच प्रसंग होता. मनांत त्याला थोडीशी भीतिहि वाटलीच.

"पाण्याला किती ओढ आहे ही!" कागदाच्या नावेप्रमाणें लाटांवर खालीवर नाचणाऱ्या त्या नावेकडे पाहत मधू म्हणाला.

"घाबरूं नकोस अं, मधू. दम राखून वल्ही मार. तुला भीति नाहींना वाटत ?"

"भीति वाटायला काय झाले ? तूं आहेसना बरोबर. पण दादा—"

"काय ?"

"आतां अंधार पडेल ना थोड्या वेळांत !"

"पण आपण त्याच्याआंत तेथे पोहोचूंसुद्धा. अन् आपणाला पाण्याच्या-बरोबरच जावयाचे आहे, तेव्हां वेळ लागावयाचा नाहीं." थोडा वेळ दोघेहि आपली वल्ही वेगाने मारीत होते. इतक्यात मधू पुनः म्हणाला, "दादा–"

"आणखी काय काढले आहेस ? मला अशाने भीति दाखविण्याचा तुझा विचार दिसतो आहे." मोहन बळेच हंसत म्हणाला. "पण तूं कांही काढलेस तरी मी डगमगणार नाहीं."

"तसें नव्हे रे !" मोहनच्या टोमण्याने मधू थोडासा वरमलाच. "मी फक्त म्हणत होतो की तुझें वल्हे मोडले आहे ते पहा. तुझ्या हाताच्या खाली दोरीने बांधलेले दिसत आहे ते."

"मी पाहिलें आहे तें मघाशीच. आणि मी बेतानेच वापरतों आहे तें. पण तूं बराच भ्यालेला दिसतोस, मधू, जरा विश्रांति घे."

मधू थोडा वेळ स्वस्थ बसला. "ते पाहिलेस का काय आहे ते?" खडकाकडे बोट करीत मोहननें विचारले. खडकाच्या पायथ्यापाशी शक्य तितके अंग सकुंचित करीत बसलेला नागेश त्यांना आतां स्पष्ट दिसूं लागला होता.

"अगदी खास नागेशच. मी आतां ब्रसुद्धां काढणार नाहीं." आणि मधूनें जोराजोराने वल्ही मारण्यास सुरुवात केली.

उन्हाळ्याच्या दिवसांत संध्याकाळच्या शात वेळी चंद्राची शीतल रुपेरी किरणे मऊ वाळूवर नाचत असतांना आणि मधुर सुवासिक वाऱ्याच्या लकेरीमुळे लहान लहान लाटा नदीच्या स्वच्छ पात्रावर आपले मधुर संगीत गात असतांना हातपाय ताणून निश्चित मनानें वाळवंटात गप्पा मारीत बसणे खरोखरच आनंद-

दायक असते. आणि भोंवताली गुळगुळीत वाळूंत नाचणाऱ्या लहान लहान बालकांच्या हास्याचे डोंगरांत दुमदुमणारे प्रतिध्वनि ऐकत नदीच्या कोमल लाटांत पाय सोडून त्या लाटा मधून मधून पायावर आपटत असतांना त्यांचा शीतल मधुर स्पर्श अनुभविणे—यासारखें सुख दुसऱ्या कशानेंहि होणार नाही. पण पाठीमागे भितीसारखा उभा काळाभिन्न गगनचुंबी कडा उभा आहे, आकाशांत ढग जमाव करून पावसाचें आगमन सुचवीत आहेत, गार वारा अंगाला झोंबत आहे, क्रोधाने बेफाम झालेल्या नागाप्रमाणे पुराच्या लाटा फूत्कार टाकीत खडकावर आपटत आहेत, आणि खडकाच्या पायथ्याशी असलेली पांढुरक्या पिवळ्या फेसाची रेषा हळुहळू उंच उंच चढून आपला बळी घ्यावयाला तयार झाली आहे—अशा वेळीं मनाची स्थिति कांही निराळीच होऊन जात असते.

आणि तो दयाहीन, हृदयशून्य पुराचा लोंढा वाढतच होता; सृष्टिक्रमाने घालून दिलेल्या नियमाप्रमाणे आपले काम त्याने बिनचूक चालविले होते. गावेंची गावें उध्वस्त करणाऱ्या, मऊ जमिनीवर वृक्षाच्या आश्रयाने जीव धरणाऱ्या कोमल वनलता, आणि खडकांत पाय रोवून भक्कम उभे असलेल्या प्रचंड वृक्षांना सारख्याच निष्ठुरपणे उमळून टाकणाऱ्या त्या पुराला कांठावर उभ्या असलेल्या, थरथर कापणाऱ्या ह्या क्षुद्र जीवाची काय पर्वा होती? कांठावरच्या काळ्या खडकांशी लीलेनें सामना करीत, जयपराजयाचा आनंद मानीत, हास्यविनोद करीत, पुनः खडकावर प्रहार करणाऱ्या पुराला स्वतःच्या या उन्मत्त आनंदापुढें, त्या केविलवाण्या पोराच्या मनांत असलेली भयंकर चिंता, उद्वेग आणि निराशा यांकडे लक्ष देण्यास सुचत होते कोठे?

आणि खडकांत रुतलेल्या मुळीला घट्ट धरून, खडकांतील भेगांत पाय रोवून, तोंडावर व डोळ्यांवर उडणारे तुषार हाताने मधूनमधून पुसून टाकीत नागेश तेथे उभा होता. त्याच्या पायाला पुराचें पाणी केव्हाच भिडले होते. पंज्यात सापडलेल्या उंदराशीं गमतीनें खेळणाऱ्या माजराप्रमाणे त्याच्याशी थट्टाविनोद करीत लाटा हळुहळू वर चढत चालल्या होत्या. आतां पाणी ढोपरापर्यंत आलें, थोड्याच वेळांत गुडघे पाण्यांत बुडाले, आणि कंबरेलाहि पाण्याचा विळखा पडला. बालकाला उचलून कडेवर घेण्यास उत्सुक असलेल्या

मातेप्रमाणे ते पाणीहि आतां त्याला उचलून आपल्या छातीवर खेळविण्यास अधीर झालेले दिसूं लागलें. थोडक्याच वेळांत आपल्याला पोहणे भाग पडेल आणि मग जीव वाचविण्याची अखेरची धडपड सुरू होईल, हें नागेशला स्पष्ट दिसूं लागलें.

त्याचें डोकें सुन्न झालें, इंद्रियें बहिर झाली, मनाची विचारशक्ति नष्ट झाली. इतक्यात त्याच्यापासून थोड्या अंतरावर नावेच्या वल्ह्यांचा खळखळाट आणि मनुष्याचा आवाज त्याला ऐकूं आला. वेड्यासारखा तो तिकडे टक लावून पाहतच राहिला. आणि नाव जवळ येत आहे तोंच त्याचें अवसान गळालें, हात सुटले आणि बेशुद्ध होऊन लाटाबरोबर तो वाहूं लागला.

# प्रकरण तेहतिसावें

# महापुरांत

यज्जीव्यते क्षणमपि प्रथितं मनुष्यै-
विज्ञानशौर्यविभवार्यगुणैः समेतम् ।
तन्नाम जीवितमिह प्रवदन्ति सन्तः
काकोऽपि जीवति चिराय बलिं च भुंक्ते ॥

दुसऱ्याच क्षणीं मोहनने त्याला धरलें आणि शक्य तितक्या त्वरेनें त्याला बोटीवर उचलून घेतलें. अंधार वाढत चालला होता, वारा आणि लाटा याचा जोर कमी होण्याचे कांहीच चिन्ह दिसत नव्हतें; आणि त्याच्या जोरानें आपली नावहि खडकावर आदळून सर्वानाच जलसमाधि मिळूं नये याकरिता मोहनला कांहीं कमी श्रम करावे लागत नव्हते. मोहनच्या हातांतील वल्हे आता अगदीं खिळखिळे झाले होते. मधूच्याहि ही गोष्ट लक्षांत आली, पण एक शब्दहि न बोलता नाव वल्हविण्याचे काम मनापासून त्यानें चालू ठेविलें. इतक्यांत एक जोराची लाट आली आणि नाव वेगानें खडकाकडे रेटली जाऊं लागली. उत्साहाच्या भरांत मोहनने आपल्या हातांतील वल्हे जोरानें मारलें. त्याबरोबर नाव परत फिरली खरी, पण हातांतील अगोदरच करकरणारें तें वल्हें तार्ङदिशीं मोडलें गेलें, व त्याचें तुटलेलें पातें पाण्यावर तरंगूं लागलें. त्याला बांधलेल्या कुजक्या दोरीचे लहानमोठे तुकडे इतस्ततः विखुरले आणि मोहनच्या हातांत लहानसा निरुपयोगी दांडा मात्र उरला.

"देवाची मर्जी ! ग्रंथ आटोपला." दुःखाच्या भरांत मोहनच्या तोंडून अधिक शब्दच निघेनात. मधूनें आपलें आतां निरुपयोगी झालेलें वल्हें बोटीवर उचलून घेतलें आणि मोहनच्या गळयाला मिठी मारून मुक्तकंठानें रडण्यास सुरुवात केली. कृष्णेच्या भयंकर पुरांत वल्ह्यावांचूनच्या मोडक्या नावेवर बसलेले हे तिघे—पैकी एक तर बेशुद्धच होता—वारा आणि वादळ यांच्या तडाख्यांतून त्यांचे प्राण वांचविणें ईश्वराखेरीज कोणालाच शक्य नव्हतें. वारा वाहत होता, नदी पण वेगानें वाहत होती आणि त्याच्याबरोबर फुटक्या नावेंतील हे दुर्दैवी प्रवासीहि वाहत चालले होते. त्यांचा प्रवास कोठें संपणार हें कोणी सांगावें ?

" दादा, दादा, आपण मरणार आतां ? आणि ह्या भयंकर पुरांत! ना घर, ना दार; जवळ कोणी माणूससुद्धां नाहीं !"

" पण देव आपला पाठीराखा आहेच ना ? 'सदा सर्वदा राम सन्नीध आहे । कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे,' हे विसरूं नकोस. तो आपल्याला अंतर देणार नाहीं."

आणि आपले हात जोडून मोहनने ईश्वराची प्रार्थना केली. निष्पाप आणि पवित्र अंतःकरण कोणत्याहि संकटात निश्चल राहूं शकते, दुःखांच्या डोंगराखालीहि चिरडलें जाऊं शकत नाही. मोहनने शांत अंतःकरणाने सर्वांचे प्राण वाचविण्याबद्दल ईश्वराची प्रार्थना केली. मधूने आपलें दुःख आवरले आणि धीर धरून तोहि देवाचा धावा करूं लागला.

नागेश हळू हळू शुद्धीवर येऊं लागला होता. आपल्या शेजारी बसलेल्या मोहन-मधूला त्याने ओळखले. " मोहन, मी जगण्याची आशा अगदी सोडून दिली होती; त्याच क्षणी तूं येऊन माझे प्राण वाचविलेस." असे म्हणून हातपाय ताणून उठून बसण्याचा तो प्रयत्न करूं लागला. हळू हळू सर्व परिस्थिति त्याला आकलन होऊं लागली. " पण तुम्ही स्वस्थ कां ? वल्ही का मारीत नाहीं ? थकलांत होय ? आणा इकडे; वल्हे मी मारतो."

" त्याचा कांही उपयोग नाहीं, नागेश- म्हणजे वल्ही मारणें मुळी शक्यच नाही." असें म्हणून मोडलेल्या वल्ह्याचे थोटुक त्यांनी त्याला दाखविले.

" म्हणजे-मोहन-स्वतःचे जीव धोक्यात घालून-स्वतःच्या जीवाचे मोल देऊन तुम्हीं माझे प्राण वांचविलेत म्हणावयाचें!" नागेशच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले. " कसला भयंकर प्रसंग हा! मृत्यूशी माझा सामना चालला आहे. आज शाश्वत जीवित कीं कायमचा मृत्यु ? मोहन हें सर्व संकट माझ्यामुळें! माझ्या पापाचे फळ तुम्हांला भोगावें लागत आहे! तासन्तास मी मृत्यूशी सामना देत आहे. यम मला न्यायला आला आहे आणि अखेर तो मला घेऊन जाणार! मी सुटणें शक्यच नाहीं, पण निदान तुम्ही तरी जिवंत सुटा! माझ्याकरितां तुझा आणि मधूचा बळी न जावा!"

रात्रीच्या त्या मंद उजेडांत नागेशची भयभीत मुद्रा अधिकच भेसूर दिसत

होती. तासचे तास मृत्यूच्या दारी उभें राहिल्यामुळे त्याच्या मनावर भीतीचा इतका पगडा बसला होता की तो पुन: अर्धवट बेशुद्ध होऊन अर्थहीन बडबड करूं लागला.

"दादा, त्याला झोप लागली वाटते–पण तो मेला तर नाही ना?" घाबरून मधूने विचारले.

"छे रे, मधू, त्याच्या छातीवर हात ठेव. बघ ती धडधडते आहे. थकवा येऊन त्याला थोडीशी ग्लानि आली आहे, इतकेच!"

"तो घसरून पाण्यात तर पडणार नाहीना!" लाटांमुळे नावेला हेलकावे बसत होते आणि त्या प्रत्येक धक्क्याबरोबर नागेशचे शरीर खालीवर हलत होते, ते पाहून मधू म्हणाला.

"काय करावयाचे ते सांगतो तुला. आलेल्या परिस्थितीला तोंड दिलेच पाहिजे." असे म्हणून मोहनने आपल्या अंगावरील कोट काढला. नागेशचा ओला सदरा काढून टाकून आपला कोरडा कोट त्याच्या अंगाभोंवती गुंडाळला. आणि तुटलेल्या वल्ह्याची सुनळी सोडवून घेऊन नागेशला नावेशी घट्ट बांधून टाकले. इतके आटोपल्यावर तो पुन: मधूच्या शेजारी येऊन त्याच्या पाठीवर हात ठेवून शांतपणे बसून राहिला. स्वत:वरील संकटाची त्या नि:स्वार्थी मुलाला जाणीवहि नव्हती. मृत्यूच्या भीतीपेक्षां मधूला समाधान देणे, त्याला धीर देऊन त्याचे शांतवन करणे हेच त्याला अधिक महत्त्वाचे वाटले.

ह्या सर्व संकटांत पावसाचीच फक्त उणीव राहिली होती. दुष्ट दैवाने तीहि आतां भरून काढली. "दादा, मी भिजलो ना अगदीं. किती थंडी वाजते आहे ही! मला भीति वाटते. मी खूप मनाला धीर देतो, पण राहवतच नाहीं. येथे मजजवळ बैस ना."

मोहनने मधूला अगदी आपल्याशेजारी बसविले, त्याचे डोके आपल्या छातीवर ठेवून त्याच्या पाठीवर हात फिरवला, त्याचे अश्रू पुसले आणि मोठ्यानें परमेश्वराची प्रार्थना करण्यास सुरुवात केली. मोहनच्या ह्या सांत्वनानें मधूलाहि थोडा धीर आला आणि त्यानेहि आपलें रडे आंवरलें.

"दादा, देव आपला धावा ऐकेल ना? मला वाटतें अगदीं खास ऐकेल." आपल्या बालस्वभावास अनुसरून सरळपणें मधू म्हणाला.

" देव करतो ते सर्व आपल्या हिताकारितांच."

" पण आपण खरेंच मरणार कां ? " मृत्यूची कल्पना येतांच मधूचे शरीर थरारलें.

" असा घाबरूं नकोस. मृत्यु आलाच तर आपण सत्कार्य करतांना मरत आहोत ना ? नागेशचा प्राण वांचवितांना-आपले कर्तव्य करतांना मृत्यु आला तर आला. मृत्यु कांही इतका भयंकर नसतो. आपण सर्वच एक दिवस मरणार आहोत. माझ्याएवढी, तुझ्याएवढी आणि तुझ्यापेक्षां लहान मुलेसुद्धां मरतात की !"

" पण अशी ?—ह्या भयंकर तुफानांत, ह्या अफाट पुरात ? "

" हो, अगदीं अशा बरें, बाळ. भर समुद्रांत बोटी फुटतात आणि त्यावरील खलाशी, मुलेंबाळें, बायका-पुरुषसुद्धां शांतपणें मरतात. त्यांच्या हांका कोणाला ऐकूं जात नाहीत की त्याजागीं क्षणभर उठणाऱ्या बुडबुड्याखेरीज कांही निशाणीहि त्यांचे मागें राहत नाही. "

" खरेंच, दादा ? "

" किती तरी वेळा !—आणि देव त्यांना मरण देतो तेव्हां मरण्याचें धैर्य आणि सामर्थ्यहि पण देतो. जरूर तर आपल्यालाहि तो तितके धैर्य देईल. "

थोडा वेळ दोघेहि स्तब्ध होते. लागलीच मधू म्हणाला, " दादा, माझ्याशी बोल ना. तूं बोलत असलास म्हणजे वाऱ्याचा अन् पाण्याचा आवाज मला ऐकूं येत नाही. दादा, मला वाटते आपण मरणार. "

" असा धीर सोडूं नकोस, बाळ. आपण वाचूं अशी मला अजूनहि आशा आहे. पण मेलोच तर त्यांत काय मोठेसे ? मी तुला शेवटपर्यंत सोडणार नाही. शेवटपर्यंत मृत्यु आल्यानंतरहि आपण असे एकमेकांला घट्ट धरून बसलेलेच लोकांना आढळूं. "

" दादा, तूं मला कित्ती कित्ती आवडतोस ! पण अजून आपण वांचूं अशी तुला आशा आहे ? "

" ते बघ ते दिवे दिसतात ना ?"

" बरें मग?"

"ती रानवाडी. विद्याश्रमाच्या फाटकांत उभे राहिलो म्हणजे समोर दिसते ती. आणि हे उजवीकडे दिवे दिसतात ना? ते विद्याश्रमातले. आतां सभा-मंडपांत दिवे दिसत आहेत. रात्रीच्या प्रार्थनेकरितां मुले जमली असतील तेथें आतां. आपले सगळे दोस्त, प्रभाकर आणि अरविंदसुद्धां तेथे असतील. जेवायच्या वेळेला आपण गेलो नाही म्हणून त्यांना काळजी लागली असेल आणि आपल्याला सुखरूप ठेवण्याबद्दल कदाचित् ते देवाची प्रार्थना करीत असतील.

"आपणसुद्धां आतां तेथेंच असतो तर!"

"कदाचित् पुनः आपण तेथे जाऊंहि. आणि आपला हा आजचा अनुभवहि कांही अगदींच व्यर्थ जाणार आहे थोडाच!"

नदीच्या ओघाबरोबर त्याची नाव रानवाडीच्या जवळून जाऊं लागली. काठाच्या जवळच दोनतीन लहान झोपड्या दिसत होत्या आणि त्यात दिव्याचे अंधुक किरण काजव्यासारखे अंधारात चमकत होते. त्याच्याजवळून नाव जाऊं लागताच मोहनने आपले सर्व सामर्थ्य एकवटून आरोळी दिली. पण वारा, पाऊस याच्या नगाऱ्यापुढे ती तुतारीइतकीहि शोभली नाही. पुनः एक-दोनदा प्रयत्न केला, पण त्याच्या प्रयत्नाना यश येण्याची आशा दिसली नाही. नाव हळुहळू पुढे निघून गेली, दिव्याचे अंधुक किरण अंधेरात दिसेनासे झाले आणि त्यांच्या आशेचा अखेरचा किरणहि नाहीसा झाला.

मधू बराच वेळ गप्प बसला होता. मोहनच्या खांद्यावर मान टाकून श्रमाची ग्लानि व निराशेच्या दुःखानें अर्धवट गुंगीत तो पडून होता. पाण्यावर पड-णारी दिव्यांची प्रतिबिंबें त्याने पाहिली. हळुहळू पुसट होतहोत अखेर ती नाहीशी झालेली त्याच्या लक्षांत आली. तो म्हणाला, "दादा, आपण रान-वाडीच्या पुढे गेलोना?"

"होय, बाळ."

"दादा, मला भूक लागली आहे– पोटात कसे तोडते आहे अगदीं. काय करायचें आतां!"

"तिकडे लक्ष देऊं नको. थोडीशी भूक काढल्याने काय होणार आहे, बाळ!"

पुनः दोघेहि स्तब्ध झाले. मधू मोहनला अधिक चिकटून बसला. त्यांची हृदयें एकमेकांच्या अगदीं जवळ आलीं. जणूं काय एकाच्या हृदयाचे प्रति-

ध्वनीच दुसऱ्याच्या हृदयांतून उठत होते. थोड्या वेळानें मधू पुनः म्हणाला, "दादा!"

"मला माहीत आहे तूं काय म्हणणार आहेस ते."

"नावेंत खूपच पाणी शिरलें आहे. माझे गुडघेदेखील बुडायला आले आहेत."

"पाणी पुष्कळच शिरलें आहे, अन् ते सारखें शिरत आहेच. तूं जरा इकडे बसतोस का म्हणजे मी हे पाणी बाहेर टाकतों थोडेसें."

"नको नको. मला सोडून तूं जाऊं नको अगदीं."

"बरे तर नाहीं जात अं! त्याचा तरी मोठासा उपयोग थोडाच होणार आहे?"

"अरे देवा! दादा, आपण बुडणार–" मधू दुःखानें घाबरून ओरडला आणि मोहनला अधिकच घट्ट बिलगला. मोहननें त्याच्या पाठीवर हात ठेवून त्याला मिठी मारली. तोंडावरून हात फिरवून त्याला कुरवाळलें. "खरे आहे बाळ मधू. मृत्यु जवळ आला आहे, पण देव आपल्या पाठीवर आहे. मृत्यु आलाच तर आपण देवाच्याच घरीं जाऊं. घाबरूं नको. तुला मी सोडणार नाही. मृत्यु आला तरी मी अखेरपर्यंत अगदीं तुझ्याजवळच राहीन."

# प्रकरण चौतिसावें

## पुनर्जन्म

**स्वस्त्यस्तु विद्रुमवनाय नमो मणिभ्यः**
**कल्याणिनी भवतु मौक्तिकशुक्तिपंक्तिः ।**
**प्राप्तं मया सकलमेव फलं पयोधे**
**यद्दारुणैर्जलचरैर्न विदारितोस्मि ॥**

जेवणाची वेळ होईतोपर्यंत ही तीनहि मुले व्यासविद्याश्रमांत परत आली नाहींत, हें पाहताच सर्वांना काळजी वाटूं लागली, आणि रात्रीच्या प्रार्थनेच्या वेळींहि, आणि त्यानंतर निजण्याची वेळ झाली तरीहि, जेव्हां त्यांचा मागमूस दिसेना तेव्हां तर चिंतेनें बहुतेकांची मने व्याकुळ झाली. रात्रीच्या त्या भयंकर वादळांतहि जितका शोध करणें शक्य होते तितका तर त्यांनीं केलाच, पण सकाळपर्यंतहि जेव्हा त्यांची काही वार्ता समजेना तेव्हां तेथील शिक्षक व विद्यार्थी या सर्वांच्या मनांत अनेक बरेवाईट तर्क येऊं लागले आणि आसपासच्या सर्व प्रदेशभर त्यांनीं जारीनें तपास सुरू केला.

नागेश ज्या टेकडीवरून खालीं उतरला त्या जागेवरून कोणी तरी खालीं घसरत गेल्याच्या खुणा अस्पष्ट दिसत होत्या. पण त्यामुळे उलगडा होण्याच्या-ऐवजी मुलांचीं मने अधिक घोटाळ्यात मात्र पडली. टाकळीच्या उतारावरची नाव नाहीशी झाल्याचीहि बातमी पाठोपाठ आली, आणि ती नाव अगदी मोडकी खिळखिळी झालेली होती हें जेव्हा समजले तेव्हां मात्र त्यांच्या सुरक्षिततेबद्दल सर्वांना शंका वाटूं लागली. असल्या पावसात त्या मोडक्या नावेत बसून तुफान फुगलेल्या नदीवर ती मुले गेली कशाला, हेच कोणाच्या लक्षांत येईना. सहज करमणुकीकरितां गेलीं असणें शक्यच नव्हते. कारण पावसाळ्यांत बोटिंग करण्याची परवानगी नसे. सर्व दिवसभर तपास सुरूच होता. नदीकांठच्या वाड्यांतून शेतकरी आणि कोळी याचेकडेहि तपास केला, पण कांही सुगावा लागला नाही. त्या पुरांत टाकळीच्या उतारावरची खिळखिळी नाव घेऊन सहल करावयास जर ती मुलें गेली असतील तर जिवंत दृष्टीस पडण्याची आशा नाहीं याविषयीं बहुतेकांचे एकमत होऊं लागलें.

अखेर संध्याकाळच्या सुमारास कांही माग सांपडूं लागला. मनोहर, प्रभाकर आणि अरविंद सारा दिवसभर नदीच्या काठीं हिंडत होते आणि येणाऱ्या-जाणाऱ्याला वेड्यासारखे प्रश्न विचारीत फिरत होते. इतक्यात कांठावरच्या वाळवंटात दुरून काळसर तांबूस पडलेले कांहींतरी त्यांस दिसले. जवळ जाऊन पाहताच पावसानें भिजलेली आणि वेडीवांकडी होऊन विरूप झालेली ती टोपी होती. विद्याश्रमांतील मुलांपैकीच ती कोणाची तरी असली पाहिजे यात शंका नव्हती आणि आंतील बाजूस पाण्यानें पुसट झालेली ना. कु. हीं अक्षरें पाहतांच ती नागेशची टोपी म्हणून तात्काळ ओळख पटली. त्याच्याच पलीकडे पडलेला एक काळा कोटहि आढळला. काल मोहनच्या अंगांत पाहिलेला तो कोट पाहताच व त्या मुलांचें काय झालें असावे याची कल्पना येतांच त्यांच्या अंतःकरणाला धक्काच बसला. प्रभाकरनें कोट उचलून घेतला. मानेच्या मागे मोहनचे नांव स्पष्ट वाचता येत होतें, एका खिशांत वर्गातील टिपणें घेतलेली, कांही काहीं पानांवर वेडीवाकडीं हास्यचित्रें काढलेली वही सांपडली व दुसऱ्या खिशात त्याला नुकतेच आलेले त्याच्या आईचे एक पत्रहि आढळलें. कालच हा कोट घालून मोहन त्यांच्याबरोबर हिंडत होता आणि आज—त्याना आलेल्या शंका हळूहळू आता खऱ्या भासूं लागल्या. मोहनचे आई-वडील विद्याश्रमात येऊन दाखल झालेच होते, त्याचें दुःख कमी करण्याचा आणि स्वतःला काईींहि आशा वाटत नव्हती तरीहि त्याचे मनांत आशा उत्पन्न करण्याचा प्रयत्न प्रभाकर व मनोहर करीत होतेच. मोहनचा कोट पाहतांच त्याच्या आईने त्याला कडकडून मिठीच मारली. नागेशची टोपी आपल्या मित्राचे स्मृतिचिन्ह म्हणून प्रभाकरने आपल्या खोलींत नेऊन ठेविली.

आणखीहि दोन दिवस गेले, आणि मुलाच्याकरिता जरी सर्वांचे शोध चालू होते तरी त्यांच्या भवितव्याविषयी आता कोणालाच शंका राहिली नव्हती. नाहीं म्हणावयास फक्त अरविंदाने अजून आशा सोडली नव्हती. कांही असले तरी मुले जिवंत आहेत, ती आपल्याला निःसंशय भेटतील, याबद्दल तो निश्चयानें सांगे. "कशावरून म्हणतोस तूं हें?" मोहनची आई अधीरतेने त्याला विचारी. त्याचें त्याला कांहीच उत्तर देता येईना. "कशावरून तें माझे मलाच समजत नाही. पण मला असें वाटते खास, आणि पहाच तुम्ही, काकू, तुम्हाला अगदीं खास भेटतील तीं."

आणि चवथ्या दिवशी सकाळीं आचार्यांच्या घरीं मोहनची आई बसली असतांना अरविंद धावत धांवत आला आणि ओरडला, "पहा, काकू, मी म्हणालों तसेंच झालें की नाहीं? मी म्हणत नव्हतों– तीं येतील म्हणून? तीं पहा तीं आलीं."

"अरे जरा सावकाश!" आचार्यांच्या पत्नी म्हणाल्या. "अगदीं घाबरवून सोडतोस तूं." एकाएकीं ही आनंदाची बातमी समजल्यानें दुःखात चूर झालेल्या मोहनच्या आईला हर्षवायु होतो कीं काय अशीच त्यांना भीति वाटत होती.

"खरें म्हणतोस तूं, अरविंद? मोहन आला? कोठें आहे माझा मधू?"

"आतां येतील ते येथे." अरविंदानें उत्तर दिलें. त्याच क्षणी दार उघडलें आणि मधूनें येऊन आईच्या गळ्याला मिठी मारिली.

"बाळ मधू, खरंच आलास का तूं? अन् दादा कोठें आहे?" बिचारीचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. आपण स्वप्नांत तर नाहींना, असेंच तिला वाटत होतें.

"म्हणजे आई तूं मला नाहींच का ओळखलेंस?" शेतकऱ्याच्या वेषांत शेजारीं उभा असलेला मोहन म्हणाला, आणि आईच्या प्रेमळ संरंभांनी गुदमरून जाण्याचा अनुभव घेण्याची मोहनवर पाळी आली.

बिचारा मातृहीन नागेश हें दृश्य पाहत शेजारी उभा होता. नुकत्याच कालवश झालेल्या आपल्या आईची मूर्ति त्याच्या डोळ्यांपुढें उभी राहिली. इतक्यांत मोहन आपल्या आईला म्हणाला, "आई, मीं तुला पत्रांत लिहिलें नव्हतें का? तो हा नागेश."

"तो का? ये ये बाळ." मोहनची आई त्याला जवळ घेऊन त्याचा एक मुका घेत म्हणाली. "जसा माझा मोहन, तसाच तूं आहेस मला."

"मोहननें माझे दोनदां प्राण वांचविले आहेत, काकू, आणि ह्या खेपेस तर मला त्यानें अनेक प्रकारें पुनर्जन्मच दिला."

मुलांची हकीकत सांगण्यासारखी फारशी नव्हतीच. त्यांची नाव बुडण्याच्या बेतात असतांना रानवाडीच्या एका कोळ्यानें पाहिली आणि दोघांतिघानीं मिळून एक नाव पाण्यांत घालून त्यांना उचलून घेतलें. ते अगदीं

वेळेवर येऊन पोहोंचले. कारण दुसऱ्याच क्षणीं मुलांच्या नावेनें एक गिरकी घेतली आणि ती तळाशीं गेली. रानवाडीच्या कोळ्यांनीं ह्या मुलांची शुश्रूषा करण्यांत काडीचीहि कसूर केली नाहीं. भरपूर विश्रांति आणि त्यांचे अनुभविक उपचार यांचे योगानें दोन दिवसांतच नागेश सुधारला. भीतीचा धक्का आणि वारा-पाऊस यांचे त्याच्यावर झालेले परिणाम कमी झाले आणि मग आपल्या बैलगाडीत बसवून तो कोळी त्यांना विद्याश्रमांत घेऊन आला.

"आणि, आई, तो कोळी फारच चांगला आहे. आम्हांला अगदीं घरच्या-सारखें वाटत होतें." मधू म्हणाला.

"आम्हांला तुमची सारखी आठवण होत होती." मोहन पुढे सांगूं लागला. "पण नदीला उतारच नव्हता म्हणून आम्हांला निरोप पाठविता आला नाहीं. शिवाय आम्हांला वाटलेंच की, आम्हाला कोणीं तरी वांचविले हें तुम्हांला समजेलच."

"खरें रे बाबा! आमची मने आम्हांलाच माहीत. पण आतांच्या आनंदापुढे त्या दुःखाचे कांहीच वाटत नाहीं. ह्या अरविंदानें मात्र आमचा धीर खचूं दिला नाहीं. तो अगदीं खात्रीनें सांगायचा कीं तुम्ही परत याल म्हणून."

"पण, काकू, आतां त्यांना सोडाना," प्रभाकर हंसत म्हणाला. "अजून आम्हांला त्यांना भेटावयाचें आहे. सगळीं मुले आणि शिक्षक वाट पाहत उभे आहेतना तिकडे."

* * *

विद्याश्रमांतील आनंदोत्सवाचें वर्णन कोणीं करावें! तीं तीन मुलें आज प्रत्यक्ष मृत्यूच्या दाढेंतून परत आलीं होतीं. मृत्यूशीं दोन हात करून विजयोत्साहानें जरी तीं विद्याश्रमांत परत आलीं असलीं तरी त्या प्रसंगाचे परिणाम त्यांच्यावर कांहीं कमी झाले नव्हते. आपल्या जीवनाचे हेतु आणि त्याचें ध्येय यांविषयीं त्यांच्या डोळ्यांवर असलेलें पटल जणूं काय मृत्यूनें दूर केलें आणि त्यांच्या जीवनावर एक नवीन प्रकाश पडला. त्यांचा नेहमींचा आनंदी स्वभाव यापुढेंहि कायम असला तरी त्यांच्या वागण्यांत एक प्रकारचा गंभीरपणा दिसूं लागला. जीवित किती दुर्मिळ देणगी आहे हें त्यांनीं प्रत्यक्ष अनुभविलें होतें. म्हणून यापुढें उच्च ध्येय आणि उदात्त आकांक्षा यांचा पगडा त्यांच्या वर्तनांत कायमचा दिसूं

लागला. नागेशचा तर अनेक अर्थांनीं पुनर्जन्म झाला होता. तासचे तास मृत्यु आ पसरून समोर उभा राहिल्यामुळें त्याच्या मनाला जो धक्का बसला होता त्याचे परिणाम त्याच्या मुद्रेवर कांहीं काल दिसत होते आणि त्याच्या वर्तनावर झालेले परिणाम तर कायमचे टिकले. निष्काळजीपणा, दुःखाची किंवा शोकाची लहर अथवा अनियमित उच्छृंखलपणा त्याच्या वृत्तीतून कायमचा नाहीसा झाला. जीवनाचा उच्च आदर्श मृत्यूच्या सान्निध्यानेच स्पष्ट होत असतो.

## कै. आठवले यांचें वाङ्मय

| | | किमत |
|---|---|---|
| १. | इंग्लंडच्या राज्यघटनेचा इतिहास | १ रुपया |
| २. | राणा कोल्हा | ६ आणे |
| ३. | आत्महत्या–प्रसार प्रतिकार | ४ आणे |
| ४. | डॉ. शरच्चंद्र | १॥ रुपया |
| ५. | दुर्वर्तनी मुलांची सुधारणा | १॥ रुपया |
| ६. | व्यासविद्याश्रम | २ रुपये |
| ७. | बालकांचा मनोविकास | १॥ रुपया |

समर्थ भारत छापखाना,
४१ बुधवार पेठ, पुणें २.

# खादीमीमांसा

लेखक : बाळूभाई मेहता

सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति.

कि. १॥ रुपया.

प्रकाशक—
गो. वा. कुलकर्णी,
सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणें २.

# सुलभ राष्ट्रीय ग्रंथमालेचें आजपर्यंतचें प्रकाशन

*( १–२ ) **सत्याचे प्रयोग अथवा महात्मा गांधींचें आत्मचरित्र.** एकत्र बाइंडिंग किमत रुपये २.

( ३ ) **खादी मीमांसा** ( सुधारून वाढविलेली नवीन आवृत्ति छापत आहे. )

( ४ ) **स्वराज्य-शिष्टाई**—म. गांधींचीं गोलमेजपरिषदेपुढील भाषणें आणि विलायतेंतील इतर मुलाखती वगैरे. किंमत ६ आ.

( ५ ) **संयम कीं स्वैराचार**—म. गांधींच्या ब्रह्मचर्य व संततिनियमनावरील लेखांचें सुबोध भाषांतर. किमत ८ आ.

( ६ ) **हिंडलग्याचा प्रसाद**-लेखक : काका कालेलकर. कि. ९ आ.

*( ७ ) **हिंदुधर्माची मूलतत्त्वें व पुनर्घटना**–सर राधाकृष्ण यांच्या " Hindu View of Life" या अत्यंत नावाजलेल्या ग्रंथाचें सुबोध भाषांतर. किं. रु. १

*( ८ ) **उपनिषदांतील दहा गोष्टी** ( पुनर्मुद्रण )–ले. शंकर दत्तात्रय देव. किंमत ६ आ.

*( ९ ) **विद्यार्थि-जीवन** (पुनर्मुद्रण)–ले. श्रीपाद सदाशिव महाजन. कि.८आ.

*(१०) **फिलिपाइन्सच्या स्वातंत्र्याचा इतिहास**—ले. त्र्यं. र. देवगिरीकर. किमत १ रु.

(११) **कॉंग्रेसचा इतिहास** ( आवृत्ति २ री ). किमत २ रु.

(१२) **समाजवादच कां ?**–ले. जयप्रकाश नारायण. कि. १० आ.

(१३) **खानबंधूंचा अल्प परिचय**–अनुवादक प्रेमा कंटक. किमत ९ आ.

(१४) **जवाहरलाल नेहरू** ( आत्मचरित्र )–अनुवादक श्री. ना. ग. गोरे, B. A., LL. B. किंमत ५ रु.

*(१५) **विश्राम**–ले. सानेगुरुजी. किमन १० आ.

*(१६) **भारतीय संस्कृति**–ले. सानेगुरुजी. किमत १–८–०

(१७) **प्रसाददीक्षा**–म. गांधींचीं एका सेविकेस आलेलीं पत्रें. किं. १–०–०

(१८) **भिल्ल साधु श्री गुलामहाराज-त्यांचें चरित्र व कार्य.** कि. ६ आणे.

(१९) **आधुनिक भारत**–लेखक शं. द. जावडेकर. कि. ४ रुपये.

१ रुपाया प्रवेश फी भरून कायम ग्राहक होणारांस प्रत्येक पुस्तक पाऊणपट किमतीस मिळेल. कायम ग्राहकांस सर्व पुस्तकें घ्यावीं लागतील.

* हीं पुस्तकें मुंबई, मध्यप्रांत व वऱ्हाड सरकार विद्याखात्यांनीं शाळांकरितां मंजूर केलेलीं आहेत.